खंड
तीन


# होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें

# पत्रसंग्रह

इ. स. १७२० ते १७९७

संपादक
वा. वा. ठाकूर

सुधारित आवृत्तीचे संपादक
डॉ. देवीदास पोटे



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

## खंड तीन

# होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें

## पत्रसंग्रह

### इ. स. १७२० ते १७९७

संपादक
**वा. वा. ठाकूर**

दुसऱ्या सुधारित आवृत्तीचे संपादक
**डॉ. देवीदास पोटे**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मुंबई

➢ **पुस्तकाचे नाव** : होळकरशाहीच्या इतिहासाची साधने : खंड तीन
पत्रसंग्रह
Holkarshahichya Itihasachi Sadhane
Volume-Three
Patrasangraha

➢ **पहिल्या आवृत्तीचे संपादक** : वा. वा. ठाकूर

➢ **दुसऱ्या सुधारित आवृत्तीचे संपादक** : डॉ. देवीदास पोटे

➢ **प्रथमावृत्ती** : १९४४

➢ **दुसरी सुधारित आवृत्ती** : २०२१

➢ **प्रकाशक** :

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

➢ © **प्रकाशकाधीन** :

➢ **मुखपृष्ठ** : सतीश भावसार

➢ **मुद्रक** :

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई ४०० ००४.

➢ **किंमत** : रुपये ६५३

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः संपादकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षांचे मनोगत

छत्रपती शिवरायांनी हिंदवी स्वराज्याचे तोरण उभारले. लोककल्याणाचा आदर्श घालून दिलेल्या या राजाच्या लढवय्या शिलेदार-मावळ्यांनी पुढे अटकेपार स्वराज्याचा विस्तार केला. त्यात होते महाराजांचे मराठी सरदार शिंदे, घोरपडे, निंबाळकर, दाभाडे, गायकवाड आणि इंदूरचे होळकर. या होळकरशाहीचा इतिहास हा आधुनिक भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचा कालखंड होता. होळकर रियासत ही अखिल मराठेशाहीचे एक महत्त्वाचे अंग आणि आधारस्तंभ होती. होळकरशाहीत मल्हारराव होळकर आणि अहिल्याबाई होळकर यांचे कार्य ऐतिहासिक महत्त्वाचे आहे. त्यात अहिल्याबाईंचा शासनकाळ हा तर होळकरशाहीचा सुवर्णकाळच मानला जातो.

सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या अहिल्याबाई एका वैभवशाली होळकर राज्याच्या स्वामिनी बनल्या. त्या शूर लढवय्या, चांगल्या रणनीतिज्ञ आणि न्यायी वृत्तीच्या होत्या. त्यांच्या जीवनात आलेली अनेक संकटे, दु:खाला त्यांना सामोरे जावे लागले; पण प्रजेच्या कल्याणात आणि सेवेतच आपला मोक्ष आहे, हे ओळखून त्यांनी आयुष्यभर जनहिताची असंख्य कामे केली. अन्यायाची त्यांना चीड होती. त्यांनी धर्माचरण आणि राजकारणाची सुयोग्य सांगड घातली. कर्तव्यनिष्ठा, धर्मनिरपेक्षता आणि सात्त्विकता या गुणवैशिष्ट्यांमुळे त्या केवळ राजमाता न राहता पुण्यश्लोक लोकमाता ठरल्या. अत्यंत साधे निर्मळ जीवन आणि पराकोटीचे दातृत्व ही त्यांची जगावेगळी ओळख होती. काश्मीर ते कन्याकुमारी अन् द्वारका ते पूर्वेकडच्या देशभरातील अनेक मंदिरे, तीर्थस्थळे, नदीकाठ, धर्मशाळा, पिण्याच्या पाण्याचे हौद, विहीरी-बारवा त्यांनी बांधल्या, जगावेगळ्या दानशूरत्वाने देशभरात आपला कायमस्वरूपाचा ठसा उमटविणाऱ्या त्या एकमेव महाराणी आहेत. या देशात अनेक

राजे-रजवाड्यांनी आपापल्या राज्यात लोकोपयोगी कामे केली आहेत, हा इतिहास आहे; पण स्वत:च्या राज्याबाहेर देशभर जनसेवेची पाणपोई उभारणाऱ्या एकमेव अहिल्याबाईच होत्या. हिंदुस्थानच्या अनेक राजघराण्याच्या इतिहासात जनकल्याणाची कामे केल्याचा इतिहास बघायला मिळतो; पण आपल्या राज्याबाहेर सर्व जाती-धर्माच्या स्थळांच्या जीर्णोद्धारासाठी मदत केलेल्या अहिल्याबाईच दिसून येतात.

इंदूरच्या होळकर घराण्याचे मल्हारराव होळकर संस्थापक होते. त्यानंतर अहिल्याबाईंचा सुवर्णकाळ येतो. त्यांच्यानंतर यशवंतराव होळकरांनी हा वारसा सांभाळला. हा इ. स.१६९३ पासूनचा हा दोनशे वर्षांचा इतिहास आहे. भारताच्या इतिहासातील होळकरशाहीचा इतिहास हा आपला एक सांस्कृतिक वारसा आहे. तो एकत्रित स्वरूपात पुनर्प्रकाशित करावा यासाठी आमचे मित्र डॉ. देवीदास पोटे हे प्रयत्न करत आहेत, ही गोष्ट माहीत असल्याने हे काम करण्याची संधी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास द्या, अशी विनंती मी त्यांना केली. आणि त्यांनी ती स्वीकारून 'होळकरशाहीचा समग्र इतिहास' या प्रकल्पासाठी रात्रंदिवस झोकून देऊन काम केले. माणसाने ठरविले आणि नियोजनपूर्वक ध्यास घेतला की, ते काम वेळीच पूर्ण होऊ शकते, हा अनुभव डॉ. देवीदास पोटे यांच्या कामातून दिसून आला. केवळ सुमारे दीड वर्षात एकहाती दहा खंड करणे, हे अवघड नाही, हे त्यांनी या दहा खंडातील सुमारे पाच हजार पानांच्या बृहद प्रकल्पाच्या उदाहरणातून दाखवून दिले आहे.

या समग्र इतिहासाचे प्रकाशन साहित्य आणि संस्कृती मंडळाचा अध्यक्ष म्हणून माझ्या काळात होत असलेले दुसरे महत्त्वाचे काम आहे. असेच पहिले मोठे काम म्हणजे महाराष्ट्राचे वाङ्मयमहर्षी गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे बारा खंड तयार झाले आहेत. 'होळकरशाहीचा समग्र इतिहास' या प्रकल्पात पूर्वप्रकाशित खंडांचे लेखक तसेच प्रशासक आणि दूरदृष्टी असलेल्या दानशूर अहिल्याबाईंच्या अनोख्या पर्वाची ओळख सर्वांना होणार आहे.

इतिहास हा सरकारी दप्तरातील हुकूम, जाहीरनामे, सरकारी सनदा, दरबारातील खासगी जुन्या बारनिशा, कौटुंबिक समारंभाचे वृत्तांत, राजपुरुषांच्या वेळोवेळी केलेल्या भाषणांतून विखुरलेला असतो. तसाच तो सर्व प्रकारच्या खासगी तसेच सरकारी पत्रलेखनातही दडलेला असतो. त्यामुळे पत्रसंग्रह हा कोणत्याही इतिहासाच्या साधनांतील एक महत्त्वाचा भाग असतो. होळकरशाहीच्या इतिहासातील महत्त्वाचे साधन असलेला पत्रव्यवहार खंड तीन आणि खंड चार मध्ये आला आहे. होळकरशाहीतील वेगवेगळ्या कालखंडातील दप्तरांत विखुरलेल्या पत्रांचा शोध, संकलन आणि संपादनाचे काम श्री. वा. वा. ठाकूर यांनी केले आहे. या कालखंडातील सर्व पत्रव्यवहार मोडी लिपीत होत असे. या मोडी लिपीत लिहिलेल्या पत्रांचे देवनागरी लिपीत पुनर्लेखन मूळ संपादकांनी केले आहे. एवढेच नाही तर या एकशे पासष्ट वर्षातील या पत्रांचा इंग्रजी संक्षिप्त अनुवाद करण्याचे

कामही श्री. वा. वा. ठाकूर यांनी केल्यामुळे हा पत्रसंग्रहाचा खजिना सर्वांसाठी उपलब्ध होऊ शकला. मूळ भाषेसोबत इंग्रजी अनुवाद असलेले संकलन–संपादन मराठेशाहीच्या इतर इतिहासात अन्यत्र फारसे कुठे आढळत नाही. या संपादनाचे हे एक आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे.

होळकरशाहीतील अकरा राजपुरुषांच्या कालखंडातील ही पत्रे आहेत. या सर्व पत्रांतून त्या त्या वेळच्या प्रशासकांची प्रशासनाची दृष्टी, प्रशासनाच्या सूचना, न्यायवृत्ती, सोबतची उदारवृत्ती, कौटुंबिक दु:खातही राजकर्तव्याचे वर्तन दिसून येते. मल्हारराव होळकर ते दुसरे तुकोजीरावपर्यंतच्या होळकर राजांची ही पत्रे आहेत. मल्हारराव होळकरांनी अहिल्याबाईंस लिहिलेली पत्रे म्हणजे एका उत्तम प्रशासक सासऱ्याने तरुण सूनबाईंना उत्तम प्रशासनाचा दिलेला पाठच आहे. त्यामुळे या संग्रहातील विविध पत्रांतून अहिल्याबाईंचे प्रशासन, राजकारणपटुत्व, मुत्सद्देगिरी, दातृत्व आणि दूरदृष्टी दिसून येते. पत्रसंग्रहाच्या अक्षरधनातून अभ्यासू साक्षेपी संपादक श्री. वा. वा. ठाकुरांनी साक्षेपीपणाने उपयुक्त पत्रांची निवड केली. यातून होळकरशाहीच्या सुवर्णकाळातील अनेक पैलू समोर येतात. हा सांस्कृतिक खजिना पुनर्प्रकाशित करण्याची संधी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मिळत आहे, याचे खूप समाधान आहे. या निमित्ताने पूर्व प्रकाशित खंडांचे संपादक आणि या आवृत्तीचे संपादक डॉ. देवीदास पोटे आणि त्यांना मदत करणाऱ्या सर्व मित्रांचे आभार.

**बाबा भांड**

मुंबई, दि. २३ जुलै २०१८

अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई

# प्रस्तावना

इतिहासाच्या अभ्यासात हुकूमनामा, सनद, बातमीपत्रे, शस्त्रे, नाणी याबरोबरच महत्त्वाचा दस्तऐवज म्हणजे पत्रव्यवहार. होळकर दरबारातील इतिहास विभागाचे प्रमुख श्री. वा. वा. ठाकूर यांनी होळकर घराण्यातील विविध राज्यकर्त्यांच्या कारकीर्दीतील पत्रांचे सूक्ष्म अवलोकन आणि अभ्यास करून दोन खंडांतून ''होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें'' हा ग्रंथ सिद्ध केला. होळकर दरबारातील श्री. ठाकूर यांच्या महत्त्वाच्या पदामुळे त्यांना हे कागदपत्र आणि दस्तऐवज सहजपणे उपलब्ध होणे शक्य झाले.

श्री. ठाकूर यांनी मूळ मोडी लिपीत लिहिलेल्या या पत्रांचे मराठी देवनागरी लिपीत पुनर्लेखन करवून घेतले आणि अतिशय साक्षेपाने या पत्रांचे संकलन केले. पत्रांचा कालखंड इ. स. १७२० पासून ते इ. स. १८८५ पर्यंत म्हणजे एकशे पासष्ट वर्षांचा आहे.

या पत्रांचे संकलन आणि संपादन करताना त्यांनी आणखी एक महत्त्वाचे काम केले. ते म्हणजे या पत्रांचा केलेला इंग्रजी अनुवाद. मूळ पत्राचा महत्त्वाचा सारांश त्यांनी इंग्रजीत दिला आहे. यामुळे मराठी न जाणणाऱ्या अन्य भाषिक इतिहासकार आणि अभ्यासक यांची चांगली सोय झाली आहे. या ग्रंथाचे पुरःकथनकार वा प्रस्तावनाकार रियासतकार गो. स. सरदेसाई यांनीही श्री. ठाकूर यांच्या ग्रंथवैशिष्ट्याची मनापासून तारीफ केली आहे. अशा प्रकारचा द्वैभाषिक प्रयोग मराठेशाहीच्या इतिहासलेखनात अन्यत्र कुठे फारसा आढळत नाही. पेशव्यांच्या इतिहासाची साधने, शिंदेशाहीच्या इतिहासाची साधने, शिवशाहीतील इतिहासाची साधने आदी ग्रंथ मराठीत लिहिले गेले आहेत. मात्र ठाकुरांच्या या दोन खंडातील ग्रंथाचा द्विभाषा प्रयोग हा एक आगळावेगळा विशेष आहे, असे मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

''इतिहास'' या विषयात राजकीय घडामोडींबरोबरच सामाजिक, आर्थिक, व्यापारविषयक, साहित्य, कला इत्यादी अनेक बाबींचा अंतर्भाव असतो. या पत्रसंग्रहांत यापैकी अनेक विषयांचे विवेचन त्या त्या प्रसंगानुरोधाने आले आहे. या ग्रंथांत अकरा होळकर राज्यकर्त्यांच्या कारकीर्दी समाविष्ट आहेत. मल्हारराव होळकर, अहिल्याबाई होळकर, मालेराव होळकर, प्रथम तुकोजीराव होळकर, काशीराव होळकर, यशवंतराव होळकर, द्वितीय मल्हारराव होळकर, मार्तंडराव होळकर, हरीराव होळकर, खंडेराव होळकर आणि द्वितीय तुकोजीराव होळकर. या पत्रसंग्रहांत मल्हारराव, अहिल्याबाई, यशवंतराव आदी राज्यकर्त्यांना आलेली श्रीमंत पेशवे, सरदार, कमाविसदार, अन्य दरबारातील होळकरांचे वकील यांची पत्रे आहेत तशीच होळकर राज्यकर्त्यांनी लिहिलेली पेशवे, सरदार, कमाविसदार, मंदिराचे पुजारी, कारभारी, भारमलदादा होळकर आदींना लिहिलेली पत्रे आहेत.

कमाविसदारांना लिहिलेल्या पत्रात दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत आणि प्रामाणिकपणे वर्तणूक करण्याबाबत सूचना केल्या आहेत. आदेशाचे पालन न केल्यास काहीवेळा कडक कारवाईचा इशारा दिलेला आहे. या सूचनांमागे स्वच्छ प्रशासन, शिस्तबद्ध कारभार आणि प्रजाहिताची दृष्टी या बाबींचा ठाम विचार आहे हे स्पष्टपणे दिसून येते. त्यापैकी काही पत्रे खालीलप्रमाणे आहेत.

पत्र क्र. १३१ — इ. स. १७५८

राजश्री दामोदरपंत गोसावी यांसी स्नेहांकित मल्हारराव होळकर यांचे पत्र. ''या उपरि विलंब न लावतां यादीप्रमाणें कामकाजाचा गुंता उरकून जलद येणें. एक दिवस दिरंग कार्याचा नाहीं. जे याद ठरावून मुकरर करून दिली त्यापैकीं एक गोष्ट उणी अधिक केली तर कार्यास येणार नाहीं. विलंबाखाले घालून न राहणें.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें, पृ. ८८-८९)

पत्र क्र. २५२ — ता. २० मे इ. स. १७६६

राजश्री गोपाळ बल्लाळ कमाविसदार, सावेर यांस मालेराव होळकर यांचे पत्र. ''मागील बाकीचा ऐवज गडीमाणसाद्वारें तीर्थरूप मातोश्री आईंपासीं पावता करावा. त्यांचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करावी. सरकारांत नेमणुकीचा आकार पोहोचविणें व इमानेंइतबारें वागावें.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें, पृ. १६३)

पत्र क्र. २८५ — ता. २८ फेब्रुवारी इ. स. १७७०

त्रिंबक राजदेव कमाविसदार, प्रगणे इंदूर यांस अहिल्याबाईंचे पत्र कीं, ''चिरंजीव तुकबांनीं लष्करांतून नहेखान आरब याजला एक हजार रुपयांची वरात तुम्हांवर दिली आहे. त्यासी ते वरातीचा ऐवज सरकारचे आज्ञेशिवाय आरब मजकुरास न देणें. दिलिया मुजरा पडणार नाहीं.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें, पृ. १८७)

अ. क्र. ३३३ ता. ६ जून इ. स. १७७६

मामलेदार चांदवड यांस अहिल्याबाईंचे ताकीदपत्र.

ती. सुभेदारांनीं कोणकोणत्या प्रकारें आणून रयतेचे सांगोपन केले. अतःपर गैरवाजवी उपसर्ग लागूं नये. रयतेची दिलभरी करून हरएक प्रकारें गौर करीत जाणें. फिरून बोभाट आलिया उपयोगी पडणार नाही व परिणाम लागणार नाहीं. जाणिजे.

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें, पृ. २१६)

अ. क्र. ८१ ता. १९ आगस्ट इ. स. १८०७

रघुनाथ हरी दिमत पागा चिमणाजी कृष्ण यांस यशवंतराव होळकर यांचे पत्र. ''तुम्ही मशारनिल्हेचे पत्र त्यांजला देऊन सदरहू पांच खंड्या मेण निकट करून घेऊन भानपूरचे मुक्कामीं पोहोचवून देणें. या कामास दिवसगत लागल्यास मर्जी राहणार नाहीं. यावर तुम्हांकडून ढील झाल्यास ठीक नसे. हें खचित जाणोन कर्तव्य ते करणें.''

(खंड चार, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें, पृ. ६३)

मल्हाररावांनी अहिल्याबाईंना लिहिलेली पत्रे म्हणजे त्यांनी अहिल्याबाईंना दिलेल्या प्रशासनिक शिक्षणाचा एक उत्तम नमुना होय. अहिल्याबाईंची क्षमता ओळखून मल्हाररावांनी त्यांच्यावर प्रशासन आणि युद्धनीतीच्या अनेक जबाबदाऱ्या वेळोवेळी सोपविल्या होत्या. त्यांचा अहिल्याबाईंच्या कर्तृत्वावर आणि कार्यकुशलतेवर पूर्ण विश्वास होता. अहिल्याबाईंच्या चांगल्या कामगिरीबाबत ते त्यांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप देत. मात्र काही चूक झाल्यास कठोरपणे समज देत.

दि. ३१ जानेवारी १७६५ रोजी अहिल्याबाईंना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात,

''तुम्हांस जातेसमयीं सांगितले कीं मथुरेसी अगर आगऱ्यासी कांहीं मुक्काम न करतां भारीभारी मजली करून ग्वाल्हेरपर्यंत झाडून जाणें. म्हणून ऐसे असतां तुम्ही मथुरेसी दोन तीन मुक्काम करणार ऐसे ऐकिले. ऐसियासी जातेसमयीं समक्ष आज्ञा केली असतां त्या गोष्टी सर्व एकीकडे ठेवून मथुरेसी मुक्काम केले हें उत्तम नसे. आम्ही सांगितले ते न करावे आणि आपल्याच चित्तास येईल तसे करणें असेल तरी सुखरूप तीर्थे करून असणें. इतकियावरी पाणी पिण्यासी देखील मथुरेस न राहतां थोर थोर मजला करून चंमल उतरून ग्वाल्हेरीस जाणें. तेथें बनेल तर पांच मुक्काम करावे. त्यास्थळीं थोर तोफखाना ठेवून त्याचे गोळे व जंबुरियाचे गोळ्याची तजवीज होईल तितके करावें. परंतु ग्वाल्हेरी अलीकडे एक मुक्काम न करणें. मागाहून वरचेवर लिहूं त्याप्रमाणें वर्तणूक करणें. तोफखाना थोर ग्वाल्हेरीस ठेवून त्याची महिन्याभराची बेगमी खर्चाची करून मग पुढें तुम्ही जाणें. चौकी पहारा मार्गाचा जाबता करीत जावा.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें,
पत्र क्र. २११, पृ. १३८)

ता. २८ फेब्रवारी १७६५ च्या अहिल्याबाईंना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात,

''अतःपर आमचे मर्जीची दरकार आहे तर रा. बहिरो अनंत व गोविंद शामराज यांजबरोबर त्यांची (बनाबाई) रवानगी करून तुम्ही तोफखान्यासह सिरोंजेस जाणें. चिरंजीव मालबास वगैरे कोणी येऊं लागले तर कामास येणार नाही. लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें. अबदाली सरहद्दीअलीकडे आला. सुजाउदौला वगैरे झाडून सारे गिलचे दिल्लीस येणार. पुढें मनसबा कसा काय आढळेल त्याप्रमाणें केला जाईल. तुम्ही एक घडीचा विलंब न करता सिरोंजेस जाणें. मधीं कोठें न उतरणें. लिहिल्याप्रमाणें रवानगी वाटेश्वरचे मार्गे करणें.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें,
पत्र क्र. २२३, पृ. १४५-१४६)

या पत्रांवरून अहिल्याबाईंचे प्रशासन, युद्धनीती आदींबाबतचे शिक्षण किती कडक शिस्तीत झाले होते याची कल्पना येईल.

या पत्रांमधून होळकरशाहीच्या प्रशासनातील अनेक अंगांचे दर्शन होते. होळकर राज्यात धार्मिक बाबतीत सर्व धर्मांना सारखी वागणूक होती. म्हणजे सर्वधर्मसमभाव होता.

ता. २८ आक्टोबर १७६३ ला मल्हाररावांनी परगणे अंबाडच्या कमाविसदारास पत्र लिहिले आहे. त्यात त्यांनी आदेश देत म्हटले आहे,

''सयद मोहीदिन व सयद यासीन पीरजादे अवलिया शाहअसरक यांची दरगाह कसबे अंबाडला आहे. यांनीं जाहीर केले कीं पातशाही अंमलापासून इनाम जमीन चाहूर १ व चिरागचे तेल वजन आछेर आहे. तरी श्रीमंतांचे अंमलाप्रमाणें सुदामत चालत आलेप्रमाणें चालवावे.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें, पत्र क्र. १८६, पृ. १२३-१२४)

मल्हाररावांप्रमाणे अहिल्याबाईंनीही हिंदूंच्या मंदिराच्या निर्माणाकरिता वा जीर्णोद्धाराकरता जशी आर्थिक मदत दिली तशीच मुसलमानांच्या दर्गा वा मशीदींच्या निर्माणाकरिता वा दुरुस्तीकरिता देणग्या दिल्या असे उल्लेख आले आहेत.

(खंड एक, होळकरशाहीचा इतिहास, प्रकरण २५, पृ. २२१)

दि. ३ फेब्रुवारी १७६४ च्या पत्रात मल्हाररावांनी अंबाडच्या कमाविसदारांना पत्र लिहून वेदमूर्ती बाबा भट यांना मोगलांनी दिलेली सनद पुढे चालू ठेवावी याबाबत सूचना केल्या आहेत.

''वेदमूर्ती राजश्री बाबाभट बिन मुकुंदभट वैद्य गोत्र गार्ग्य, कसबे संगमनेर, यांनीं चांदवड मुक्कामीं विदित केले कीं, प्रगणे मजकुरी यजमानावर रोजीना चार आणे पूर्वी नवाब निजाम उलमुल्ख यांनीं करून दिले. अलीकडे श्रीमंतांचा अंमल झाला. तरी आपण मोगलांची सनद पाहून कृपा करून रोजीना चालवावा म्हणजे स्नानसंध्या करून अभीष्टचिंतन करुं. म्हणून मनास आणितां थोर सत्पात्र स्नानसंध्याशील ब्राह्मण चालविण्यास

श्रेयस्कर जाणून प्रगणे मजकुरीं माल ऐवजी सदरहू चार आणे रोजीना वेदमूर्तीस पावीत जाणें. प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न घेणें.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें,
पत्र क्र. १९३, पृ. १२७-१२८)

अहिल्याबाईंनी प्रशासनाबरोबर सैन्याबाबतही समतोलाचे धोरण आपल्या राज्यात अंगीकारले होते. पेशव्यांनाही त्यांनी जवळपास तीस हजारांचे सैन्य नेहमी जवळ बाळगावे अशा प्रकारच्या सूचना वेळोवेळी दिल्या होत्या. मराठेशाहीचा खरा शत्रू इंग्रज आहे हे त्यांनी ओळखले होते. इंग्रज सत्ता एखाद्या अस्वलाप्रमाणे असून ती माणसाला गुदगुल्या करून संपवते अशा प्रकारचा इशारा त्यांनी पेशव्यांना आणि इतर संस्थानांना दिला होता. या पार्श्वभूमीवर पुणे दरबारातील होळकरांचे वकील अप्पाजी जाखदेव यांनी नाना फडणवीस यांना दि. १२ जुलाई १७८० (खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें, पत्र क्र. ३७४, पृ. २४६-२४७) रोजी एक पत्र लिहिले. त्यात याच बाबीचा उहापोह केला आहे.

''१. इंग्रजांचा उत्कर्ष पाहून अहिल्याबाईं पेशव्यांस वेळींच त्यांचा मोड करण्यास सुचविते.

२. अहिल्याबाई बोलत होती जे इंग्रजांनीं चहूंकडून प्रसार करण्याचा मनसबा केला आहे. तरी ह्या समयास श्रीमंतांनीं शिलेदारांचा व हुजरातीचा भरणा पुष्कळ करावा, आणि इंग्रज जागजागां कोठें दोन तीन पलटणें अशी तोड काढली आहे. अशांत जागजागां फौज पाठवून द्यावी म्हणजे मागल्यास दहशत पडेल. पुढें कोणी येऊं पावणार नाही. नवाब, भोसले सारे जमा होऊन इंग्रजांचें पारिपत्य करावें.''

मात्र अहिल्याबाईंनी केलेल्या या सूचनांची दखल न घेतल्यामुळे इंग्रज सत्तेने हळूहळू मराठी मुलखात आपले पाय रोवले. प्रथम यशवंतराव होळकर यांच्या (इ. स. १७९८ - १८११) कारकीर्दीत यशवंतरावांनी इंग्रजांच्या विरुद्ध लढण्यासाठी पेशवे, अन्य सरदार आणि भरतखंडातील अनेक राजांना साद घातली. पण त्यांना कुणीही प्रतिसाद दिला नाही. परिणामी इंग्रज सत्ता अधिकाधिक प्रबळ होत गेली आणि इ. स. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त होऊन इंग्रज सत्तेचा अंमल प्रस्थापित झाला.

मातोश्री अहिल्याबाई होळकर यांनी श्रीमंत पंतप्रधान व छत्रपती यांस पत्र लिहिण्याच्या पद्धतीविषयी मायने ठरविले होते. ते असे -

१. पंतप्रधानांस पत्र लिहिण्याचा मायना :

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं. विनंती सेवक अहिल्याबाई कृतानेक विज्ञापना. येथील क्षेत्र जाणोन स्वकीय लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष.

२. छत्रपती महाराजांस पत्र लिहिण्याचा मायना :

श्रीमंत महाराज छत्रपती स्वामींचे सेवेसीं. आज्ञाधारक अहिल्याबाई होळकर कृतानेक विज्ञापना. येथील क्षेत्र स्वामींचे कृपावलोकनें करून यथास्थित असो विशेष.

(खंड ३, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें, पत्र क्रमांक ४०८, पृ. २६९-२७०)

अहिल्याबाईंचे प्रशासन, मुत्सद्देगिरी, राजकारणपटुत्व इतिहासप्रसिद्ध आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व, प्रशासन, राजकीय धोरण याबाबत अनेकांनी तारीफ केली आहे. यापैकी तीन व्यक्तींचे उद्गार प्रातिनिधिक म्हणून पहाण्याजोगे आहेत. पहिले आहेत पेशवाईतले चाणक्य नाना फडणवीस. अहिल्याबाईंच्या मुत्सद्देगिरी आणि साधेपणा या गुणवैशिष्ट्यांबाबत नाना फडणवीस म्हणतात,

''तुम्ही (=होळकर) व शिंदे श्रीमंतांचे बरोबरीचे सरदार. तुमचे व्यंग ते सरकारचे व्यंग. ये विषयींचा अर्थ पूर्णपणें बाईंचे ध्यानांत आहे. बाईंसारखी सावध व दूरदर्शी बाईच. श्रीमंतांचे सरकारांत वाघ व बकरी एक ठिकाणीं पाणी पितात.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें,
पत्र क्र. ६४६, इ. स. १७९२, पृ. ४२८)

अहिल्याबाईंच्या मुत्सद्देगिरीची आणि राजकारणातील नेतृत्वाची प्रशंसा हैदराबादचे नवाब यांनीही केली आहे. आपल्या एका पत्रात ते म्हणतात,

''बायको असतां पुरुषांपेक्षां त्या मजला दूरदर्शी फार दिसोन झाल्या.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें,
पत्र क्र. ५१३, नोव्हेंबर इ. स. १७८९, पृ. ३३८)

आपल्या दुसऱ्या दोन पत्रांत नबाबांनी अहिल्याबाईंची प्रशंसा केली आहे. त्यापैकी एका पत्रात ते म्हणतात,

''अहिल्याबाई होळकर यांचे प्रतिमेस बायकांत किंवा दौलतवंतांत कोणी योग्यतेस नाही. कैलासवासी मल्हारराव होळकर यांची कमाई या बाईंनीं नेक जागीं खर्च करून आपला देह ईश्वरार्पण केला. ही उपमा त्यांची त्यासच.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें,
पत्र क्र. ५७२, इ. स. १७९०, पृ. ३८१)

उत्तरेकडील लोक दक्षिणी लोकांवर भरवसा करीत नाहीत. मात्र अहिल्याबाई या नियमाला अपवाद आहेत. चितोडहून मकाजी गीते यांनी मेवाडच्या लोकांचे मराठ्यांबाबतचे मत कळविले. या पत्रात ते म्हणतात,

''दखनी लोकांचा भरवसा रतिमात्र न धरावा असें रांगडे म्हणतात. आम्ही चितोडास गेलो होतो. तेथें भीमसिंग, दुर्जनसिंग व संध्यागीर गोसावी हे म्हणो लागले कीं आम्हांस कित्येका गोष्टींनीं श्री.मा. (=मातोश्री) बाईसाहेबांचा भरोसा आहे. आम्ही कांहीं त्यास रतिमात्र अंतर करणार नाहीं.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें,
पत्र क्र. ३२६, ता. २९ मार्च, इ. स. १७७५, पृ. २१२)

रांगडे व रजपुत लोक मुली होताच मारून टाकतात असा रिपोर्ट चिखलदे येथील कामविसदाराने केला होता. इ. स. १८४३ साली होळकर दरबार आणि इंग्रज सरकार यांच्या विद्यमाने ही प्रथा बंद होण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार लोकांना ताकीद देवून कुणीही मुलींची हत्या करणार नाही असा बंदोबस्त ठेवावा अशा सरकारी सूचना गावोगाव दिल्या होत्या.

( खंड चार, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें,
पत्र क्र. २८५, इ. स. १८४३, पृ. २३१)

अहिल्याबाईंच्या न्यायदानाची कीर्ती सर्वत्र पसरली होती. त्यामुळे इतर संस्थानातील राजे त्यांच्या राज्यातील अंतर्गत तंटे वा विवाद सोडविण्यासाठी अहिल्याबाईंचा सल्ला घेत आणि त्यांची मध्यस्थी वा निवाडा मान्य करीत. अशा संस्थानांपैकी बडवाणी, झाबुवा हे प्रमुख होत. बडवाणीच्या राणीने अहिल्याबाईंना लिहिलेले पत्र या दृष्टीने पहाण्याजोगे आहे.

''राणी बखतकुंवर बडवाणीकर यांजकडून मातुश्री अहिल्याबाई होळकर यांस. पूर्वी आपण आज्ञा केली होती कीं राज्य डामडोल आहे, त्याचा बंदोबस्त करणें. त्यास कामांत चित्त घालून बंदोबस्त थोडाबहुत केला. पण कित्येकांचे वैरी झालों. खरे बोलल्यास वाईट मानतात. याकरितां आपले अभयपत्र आल्यास चित्त समाधान पावेल. आपल्या वचनाचा आधार सर्व प्रकारें धरून आहो. आम्ही विनंती केली कीं आमचे राज्य फितुरी आहे. फितुर झाल्यास आम्हांस आश्रय कोणाचा ? तेव्हां आपण वचन दिले कीं आम्ही बसलो आहोत. तुम्हांकडे कोण पाहिसा आहे ? तो प्रसंग आता आला आहे. पूर्वी वचन दिले त्याचे स्मरण धरून साहित्य करणार आपण समर्थ आहात.''

(खंड तीन, होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें,
पत्र क्र. ४३१, ता. ३१ आक्टोबर, इ. स. १७८६, पृ. २८४-२८५)

होळकरशाहीच्या वाटचालीत ज्यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे अशा दोन व्यक्ती म्हणजे भारमलदादा होळकर आणि गोविंदपंत गानू. गोविंदपंतांकडे खासगीच्या कारभाराची दिवाणपणाची सूत्रे होती. अहिल्याबाईंनी भारतभर लोककल्याणाची जी कामे आपल्या खासगीच्या उत्पन्नातून केली, त्या सर्वांचे नियोजन, आर्थिक अंदाजपत्र, बांधकामे, कामावर देखरेख, कामाचा दर्जा, वेळेचे गणित, कामाची पूर्तता या सर्वांचे योग्य ते संतुलन आणि समन्वय साधण्याचे काम गोविंदपंत गानू यांनी केले. त्यांच्या मृत्युनंतर त्यांचे पुत्र गोपाळराव गानू यांनी ही जबाबदारी समर्थपणे सांभाळली.

भारमलदादा हे होळकर प्रशासनाचे पडद्याआडचे सूत्रधार. महत्त्वाच्या राजकीय, सामाजिक आणि घरगुती बाबतीत अहिल्याबाई त्यांचा सल्ला घेत. अहिल्याबाईंवर त्यांची अपार श्रद्धा, भक्ती होती. अहिल्याबाईंना ते 'मातोश्री ' या नावाने संबोधित. भारमलदादांना शंभर वर्षांचे दीर्घ आयुष्य लाभले. होळकरशाहीतील मल्हारराव, अहिल्याबाई, मालेराव, तुकोजीराव, काशीराव, यशवंतराव आणि द्वितीय मल्हारराव अशा सात राज्यकर्त्यांच्या

कार्यकाळात त्यांनी होळकरशाहीतील महत्त्वाच्या राजकीय आणि प्रशासकीय कामांची धुरा सांभाळली. भारमलदादा हे आत्यंतिक निष्ठा, विवेक, समतोल आणि सात्त्विकता यांचे प्रतीक होते. ते होळकरशाहीचे जणू भीष्मपितामह होते.

या पत्रसंग्रहातील अहिल्याबाई, तुकोजीराव, यशवंतराव, तुळसाबाई, भीमाबाई, लाडाबाई यांनी भारमलदादा होळकर यांना लिहिलेली पत्रे पाहिली की अनेक प्रकारचे संघर्ष, चढउतार यातून त्यांनी होळकर राज्याची धुरा राजधानीत बसून त्यांनी समर्थपणे सांभाळली, हे लक्षात येते. ही पत्रे मुळातूनच वाचण्यासारखी आहेत. भारमलदादा हे कृतीशीलता आणि समर्पण यांचे दुसरें रूप होते. होळकरशाहीच्या सर्व सातही राज्यकर्त्यांचे ते आधाराचे खांब होते. होळकरशाहीच्या संघर्षाच्या काळात यशवंतराव होळकर यांनी राज्यकारभाराच्या प्रशासन, युद्धविषयक हालचाली, मोहिमा, लुटारूंचा उपद्रव, अहिल्याबाईंच्या छत्रीचे बांधकाम अशा विविध बाबींसंबंधात पत्रव्यवहार केला तो भारमलदादा होळकर यांच्याशी.

लोकहितकारी कामांचा अहिल्याबाईंच्या कारकीर्दीतील वारसा तिथेच थांबला नाही. तो तुकोजीराव, यशवंतराव, हरीराव आणि दुसरें तुकोजीराव यांनी सक्षमपणे पुढे चालवला. लोकहिताचे व्रत हा होळकरशाहीचा विशेष पैलू आहे. ही परंपरा दुसऱ्या तुकोजीरावांनंतर शिवाजीराव, तृतीय तुकोजीराव आणि द्वितीय यशवंतराव यांनी तितक्याच समर्थपणे पुढे चालविली.

हा पत्रसंग्रह श्री. वा. वा. ठाकूर यांची साक्षेपी निवड आणि नेटके संपादन यांचा उत्कृष्ट नमुना आहे. याकरिता मोडी लिपी ते मराठी देवनागरीत लेखन, मराठीतून प्रत्येक पत्राच्या महत्त्वाच्या मजकूराचा सारांशाने इंग्रजी अनुवाद अशा विविध प्रकारच्या दीर्घकालीन मेहनतीतून हे दोन्ही खंड साकार झाले आहेत. यातील अनेक दप्तरे, ग्रंथ पहाण्याचे आणि तपशील नोंदवण्याचे काम ठाकूर यांचे सहकारी आणि हुजूर सेवेतील मॅनेजर श्री. गणेश माधव विभूते यांनी केले आहे.

या पत्रसंग्रहांतून होळकरशाहीचा एक दीर्घ पट आपल्यासमोर उलगडला गेला आहे. यात राजकीय इतिहास आहेच पण सांस्कृतिक, सामाजिक, इतिहासाचे अनेक पैलू यातून प्रकट झाले आहेत. होळकरशाहीतील राज्यकर्त्यांचा पराक्रम, दूरदृष्टी, लोकाभिमुख विचारधारा, सर्वधर्मसमभाव, न्यायनिष्ठा, मुत्सद्देगिरी, देशासाठी सर्वस्व पणाला लावण्याची जिद्द या गुणांचे दर्शन होते. अहिल्याबाई होळकरांनी तर राज्याच्या सीमारेषा ही संकल्पना दुय्यम ठरवून अवघे भरतखंड हे आपले कार्यक्षेत्र मानले.

पत्रांची भाषा तत्कालीन मराठी आहे. भाषेचे वळण जुने आहे. पत्रांमध्ये अनेक अरबी, फारसी, उर्दू भाषेचे शब्द आले आहेत. मराठेशाहीत पत्रव्यवहारात अरबी सन, शालिवाहन शक, संवत वर्ष आणि इसवी सन यांचा प्रयोग केलेला दिसून येतो. पत्राचे मायने आणि पत्रांचा शेवटही फारसी, अरबी पद्धतीने केलेला आढळतो.

पत्राच्या आरंभी श्री, श्री म्हाळसाकांत असे शुभवाचक शब्द आले आहेत. कांहीं

ठिकाणी श्री मार्तंड, श्री शंकर, श्री सरस्वत्यैनमः, श्री दत्त, श्री मोरया, श्रीराम असे शब्द आहेत. मल्हारराव, अहिल्याबाई आणि यशवंतराव या प्रमुख राज्यकर्त्यांच्या पत्रात मात्र 'श्री' हे शुभाक्षर वापरलेले आहे असे दिसून येते. होळकर घराणे शिवभक्त. श्री म्हाळसाकांत वा श्री मार्तंड म्हणजे खंडेराय. हे शिवाचेच रूप आहे. म्हणूनच श्री म्हाळसाकांत, श्री मार्तंड वा श्री शंकर हे शब्द वापरले असावेत, असे अनुमान करता येते.

'होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें' या ग्रंथाचे दोन खंड अनुक्रमे १९४४ आणि १९४५ या वर्षी प्रकाशित झाले होते. त्यानंतर सुमारे ७५ वर्षांचा काळ लोटला आहे. आता ते नव्याने सुधारित स्वरूपात पुन्हा प्रकाशित होत आहेत. त्यामुळे इतिहासकार, अभ्यासक आणि रसिक यांची मोठी सोय होईल, हे निश्चित. या ग्रंथांचा दुर्मीळपणा ही एक मोठी उणीव या ग्रंथांच्या प्रकाशनाने दूर होईल असा विश्वास वाटतो.

पूर्वसूरींचे ऋण मान्य करून या ग्रंथांचे पुन्हा संपादन करताना काही आवश्यक ते बदल केले आहेत. अभ्यासाच्या दृष्टीने अधिक सुलभ व्हावे म्हणून भाग १ व भाग २ एकत्र करून पत्रक्रमांक सलग घेतले आहेत. याशिवाय अभ्यासकांच्या आणि रसिकांच्या आकलनाच्या सुलभतेकरिता शब्दार्थ/टीपा, सूची, संदर्भग्रंथ सूची अशा विशेष बाबी सोबत जोडल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष श्री. बाबा भांड यांनी होळकरशाहीच्या समग्र इतिहासाचा प्रकल्प संपादनासाठी माझ्याकडे सोपविला त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या ग्रंथांचे आवश्यक त्या ठिकाणी संपादन करून हे काम विहित कालवधीत पूर्ण करता आले याबाबत समाधान वाटते. या कामी अनेक नामवंत इतिहासकार, अभ्यासक, रसिक आणि सुहृद यांचे अनेक परींचे सहकार्य लाभले. या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो.

मा. जयसिंगराव पवार (कोल्हापूर), प्रा. सु. प्र. कुलकर्णी, डॉ. लीला गोविलकर (अहमदनगर), प्रा. ना. ग. काळे, राजेंद्र लाळगे, सुनील मतकर, सुभाष वाघमारे, विठ्ठलराव गावडे (इंदूर), वसंत महेश्वरकर (महेश्वर), रामभाऊ लांडे (अंबड, जि. जालना), डॉ. सुधीर तारे, डॉ. दिलीप बलसेकर, रवीन्द्र लाड, प्रतापराव पाटील, मुकुंद सराफ (मुंबई), डॉ. अरुणचंद्र पाठक, डॉ. गिरीश मांडके (पुणे) यांचे अनमोल सहकार्य लाभले. या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

ज्येष्ठ साहित्यिक, इतिहासकार आणि साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्याबरोबर झालेल्या चर्चेचा आणि मार्गदर्शनाचा संपादन कार्यात विशेष उपयोग झाला हे कृतज्ञतापूर्वक नमूद करणे आवश्यक आहे. त्यांचे मन:पूर्वक आभार.

या ग्रंथाच्या संपादनकार्यात अनेक इतिहासकार, अभ्यासक, तज्ज्ञ, रसिक आणि सुहृद यांचे बहुमोल सहकार्य लाभले. या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**डॉ. देवीदास पोटे**

मुंबई, दि. २५ जून २०१८ संपादक

# पुरःकथन

इतिहासाची मांडणी भूतकालीन घडामोडीवर अवलंबून असते. ऐतिहासिक घडामोडी तत्कालीन कागदपत्रांवरूनच कळून येत असल्यामुळें ऐतिहासिक व्यक्तींचा पत्रव्यवहार, निवाडे, सनदा, दानपत्रें, जमाखर्ची टिपणें अशा प्रकारची नानाविध साधनें जितकी मिळतील, तितकी इतिहासाची रचना साधार व सुस्पष्ट बनते हें सांगणें नकोच. तसेंच केवळ राजकीय बाबतींनीं इतिहासाची सांगता होत नाहीं. समाजस्थिती, व्यापारी देवघेव, वाङ्मयाची ठेवण इत्यादि अंगांचाही इतिहासांत समावेश होत असल्यामुळें, अशी सेवासाधनें हुडकून प्रसिद्ध करण्याचा उद्योग हल्लीं सर्व देशांत चालू असून, त्याच हेतूनें होळकरशाहीचा इतिहास तयार करण्याचा प्रयत्न आज कित्येक वर्षें इंदूर नरेशांनीं चालविलेला महशूर आहे.

मराठशाहीच्या निर्मितींत अनेक घराणीं दीर्घकालपावेतों खपत होती, त्यापैकीं कित्येक नामशेष झाली आणि जी कित्येक आपल्या सुदैवानें अद्यापि भिन्न परिस्थितींतही आपला राष्ट्रीय उद्योग चालवीत आहेत, त्यांत होळकरांचे घराणें सुप्रसिद्ध आहे. यांच्या इतिहासाचे कित्येक कागद पूर्वी प्रसिद्ध झाले असले तरी न प्रसिद्ध झालेलेही अद्यापि पुष्कळ उपलब्ध आहेत. असे अज्ञात कागद सर्व अभ्यासकास व्यवस्थित मिळावे आणि त्यावरून होळकरशाहीच्या इतिहासाचें स्वरूप जनतेस यथास्थित समजून यावें या हेतूनें तशा कागदांचे स्वतंत्र खंड मुद्दाम निराळे प्रसिद्ध करण्यांत येत आहेत. मराठी भाषा न जाणणारे वाचक पुष्कळच असल्यामुळें त्यांच्या सोयीसाठीं प्रत्येक कागदाचा त्रोटक मतलब खालीं इंग्रजीत देऊन, कालानुक्रमानें कागदांची रचना केली आहे ती अभ्यासकास उपयुक्त व सहायक होईल यात संशय नाहीं.

होळकर घराण्याचे संस्थापक सुभेदार मल्हारराव होळकर यांचा जन्म इसवी सन १६९३ चा असून बाजीराव पेशव्यांचे ते उजवा हात होते. अठराव्या शतकाच्या प्रथम

पादांत नर्मदोत्तर प्रदेशांत मराठ्यांचा संचार चालू झाला, त्या उद्योगांत मल्हाररावांचे शौर्य, चातुर्य व दूरदृष्टी इत्यादि गुण व्यक्त होऊन पन्नास वर्षेपावेतों त्यांनी जी स्वराष्ट्राची सेवा बजाविली, तीच आजच्या पिढीस आपणा सर्वांस विशेष स्फूर्ती देणारी आहे. मल्हाररावांच्या पश्चात् तीस वर्षें साध्वी अहिल्याबाई व त्यांच्या मागून पंधरा वीस वर्षें बाणेदार शूर पुरुष यशवंतराव यांच्या कर्तबगारीनें उत्तरकालीन मराठशाहीचे स्वरूप किती उज्ज्वल बनले आहे ते समस्त भरतखंडास विदित आहे.

सन १८१८ त मराठशाही संपून हिंदी राष्ट्राच्या नवीन मनूस सुरुवात झाली. ह्या बदललेल्या परिस्थितीत नवीन कर्तव्ये व नवीन व्याप उपस्थित झाले. त्यांची उस्तवारी द्वितीय तुकोजीराव महाराजांनीं केवढ्या चातुर्यानें केली त्याचे स्मरण भारतवासीयांस अद्यापि ताजे आहे. यांच्या कारभाराचा व त्यांचे पूर्वीच्या नरेशांचा पत्रसंभारही तसाच प्रदीर्घ व महत्त्वाचा असणार.

सारांश, होळकरशाहीच्या इतिहासाचे हे साधनग्रंथ पूर्वी प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांइतकेच सर्वत्र आदरणीय होतील अशी आशा प्रगट करून आम्ही वाचकांचे हातीं ते देत आहोंत. ही अल्पसेवा ते गोड करून घेतील, तर होळकर सरकारांनीं केलेल्या श्रमाचें चीज होईल.

इतिहासाचा अभ्यासक या नात्यानें मी इंदूर नरेशांच्या या ऐतिहासिक आस्थेबद्दल त्यांचें मनापासून अभिनंदन करून त्यांचा सदैव उत्कर्ष चिंतितो.

मुक्काम : कामशेत (पुणें)
ता. २ सप्टेंबर १९४०

**गो. स. सरदेसाई**

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **अध्यक्षांचे मनोगत** | तीन |
| **प्रस्तावना** | सहा |
| **होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें**<br>पत्र अ. नं. १ ते ७१२ | १-४७३ |
| **संदर्भग्रंथ सूची** | ४७४ |
| **परिशिष्ट :** | |
| होळकर रियासतीतील विविध पदनामे व त्यांची कार्ये | ४७५ |
| **शब्दार्थ/टीपा** | ४७७ |
| **सूची** | ४८२ |
| **संपादक परिचय** | ४९१ |

# होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें

## भाग १ ला

( इ. स. १६९३-१७९७ )

होळकर सरकारांच्या आज्ञेनें प्रसिद्ध झाला.

संपादकः—वा. वा. ठाकूर, बी. ए.

इ. स. १९४४

होळकर गव्हर्नमेंट प्रेस, इंदूर.

अ. नं. १ श्री

# टिप्पण

१ मल्हारजी होळकर. जन्म चैत्र शुद्ध ९ संवत् १७५० (इ. स.१६९३-९४) बारा घटकेस. बापाचे नांव खंडूजी. आईचे नांव जिवाई, मुलगी सार्बाजीबाबा बारगळ चौगुले मौजे तळोदे, परगणे सुलतानपूर जिल्हा खानदेश यांची. तिच्या भावाचे नांव भोजराज.

१ लग्न. जेष्ठ शुद्ध १३. वधूचें नांव गौतमाबाई. वधुवराचे वयात सव्वा वर्षाचे अंतर. वराचे वय ८ व वधूचें वर्षे ६ महिने ९. ?

१ खंडेराव होळकराचा जन्म आश्विन शुद्ध १० संवत १७८० (इ. स.१७२३) लग्न अहिल्याबाईंशी संवत १७९४ त झाले. वधूचे वय ८ वर्षांचे.

१ गौतमाबाईंच्या बापाचे नांव भोजराज व आईचें नांव मोहिनीबाई बारगळ.

१ अहिल्याबाईंच्या बापाचे नांव माणकोजी शिंदे.

१ तुकोजी होळकरांचा जन्म संवत १७८० (इ. स. १७२३)

१ मौजे चौंडी तालुके अष्टें जिल्हा बीड प्रांत निजामशाही दक्षिण हैद्राबाद हा गांव शिंदे घराण्याचे मूळ ठिकाण. तेथें या कुळांतील पुरूषांपैकीं कांहींस पाटीलकीची वतनें होतीं. तेथें अहिल्याबाईंचा जन्म झाला.

अहिल्याबाईंचा जन्म शके १६४७, (इ. स.१७२५). चौंडी गांवीं अहिल्याबाईंनीं एक देवस्थान स्थापिलें. ते चौंडी अहिल्येश्वर नावानें प्रसिद्ध आहे. या गांवीं सीणा व हरणा या दोन नद्यांचा संगम झाला आहे. त्यावर सरकारी घांट आहे. तेथें मंदिर आहे. त्यांत सिणेश्वर महादेवाची मूर्ती संगमरवरी असून भोंवतालीं शेष पिंडीला वेढा घालून आहे. श्री चौंडादेवीची मूर्ती असोन मंदिर आहे. ह्या देवांचे नेमणुकीबद्दल व गांवांत असलेल्या

श्री अहिल्येश्वर-महादेवाचे मंदिराबद्दल सरकारातून नेमणूक रु. ७४२ ची आहे.

1. Malharji Holkar-Birth-Chaitra Shuddha Navmi 9 Samwat 1750 (15th or 16th March 1693.) Father's name Khandojee; Mother's name Jiwai, daughter of Sabaji Baba Bargal, Chaugule of village Talode, Pergana Sultanpur, District Khandesh. Her brother's name Bhojaraja.

1. Marriage-Jeshtta Shuddha 13, Samwat 1758, with Gautamabai (daughter of Bhojaraj Bargal and Mohinibai.) Difference of age between that of the bride and of the bridegroom is $1^1/_4$ years. Bridegroom's age 8, and Bride's age 6 years and 9 months.

1. Khanderao Holkar's birth, Ashwin Shuddha 10, Samwat 1780, Marriage with Ahilyabai, Samwat 1790, Bride's age eight (8) years.

1. Gautamabai's father's name Bhojaraja, mother's name Mohinibai.

1. Ahilyabai's father's name Mankojee Shinde.

1. Tukoji Holkar's Birth Samwat 1780. (1723 A.D.)

Note : The above is a copy of the entry in the Record Book of the Holkar's Family priest at Nasik, when Malharji made his pilgrimage to that Holy place with his family (prior to the birth of his grandson Malerao Holkar, since his name is not entered in the above details.) about the year 1740 to 1743.A.D.

MEMO : Village-Mouja Chondhi, (Taluka Aste, District Bid, Nizam's territory Deccan Hydrabad)is the native place of the Shinde family. Some persons born in this family enjoyed Patilki rights, of whom Mankojee was one-the father of Ahilyabai Holkar. Her birth-place is village Chondi. The year of her birth is Shak 1647 (1725A.D.) Here she erected a temple named Chondhi-Ahileshwar on the spot where the confluence of the two rivers Seena and Harna has taken place, and where the State has built a Ghat with a temple having under it the Pindi of Mahadeo named Sineshwar with the folds of Shesh Serpent-made of Sangamrawari stone. There is also the temple of Goddess Choundi. In the village itself also there is a temple of God Mahadeo having the statue of Ahilyabai Holkar in the attitude of worshipping Him. All these temples are maintained with an yearly allowance of Rs. 742 from the State.

---

## अ. नं. २ श्री

वैशाख शुद्ध १३, शके १६४२, इ. स.१७२०

राजश्री राव नंदलाल मंडलोई परगणे इंदूर गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारराव होळकर रामराम येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणें. परगणे बढवाई येथील राजियाचा व आमचा बदसलुख झाला. तो कुलप्रसंग तुम्हांस ठावका आहे. त्याचे पारिपत्य जें कर्तव्य तें उत्तम प्रकारे करूं परंतु तुम्हीही मातबर आणि त्यासंनिध आहांत एकवेळ त्यांस बरवे प्रकारें माकूल करून कांहीं विचारास येत असतील तर पाहणें. नाहींतर आपण तो पारिपत्यास चुकत नाहीं. इतक्या उपर त्यांनीं आपला परिणाम उत्तम लागेल तो अर्थ अर्थिल्यास उत्तम. बहुत काय लिहिणें छ.११ माहे रजब. मोर्तबसुद :

| |
|---|
| श्री मार्तंड चरणीं<br>तत्पर बारगळ<br>रघोजी निरंतर |

**राजवाडे खंड ६ लेखांक ५८५**

No. 2 1720 A.D.

Malharrao Holkar informs Nandlal Mandloi of the strained relations between himself and the Rana of Burwaha; the Mandloi is requested to advise the Rana.

---

## अ. नं. ३ श्री

भाद्रपद वद्य ६, शके १६४२, इ. स. १७२०

राजश्री राव नंदलाल मंडलोई परगणे इंदूर गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारराव होळकर व दासोजी वाघ दंडवत सुरू सन इहिदेअशरीनमया व अलफ. आम्हांकारणें डेरा तयार करून पाठवून देणें. नारोपंत सांगतील त्याप्रमाणें शिवून पाठवून देणें. हयगयी न करणें. जाणिजे छ.१९ जिल्काद हे विनंती. मोर्तबसुद.

| |
|---|
| श्री मार्तंड<br>चरणीं तत्पर<br>बारगळ निरंतर |

**राजवाडे खंड ६ लेखांक ५८७**

No. 3 1720 A.D.

Malharrao Holkar and Dasojee Wagh ask Nandlal Mandloi to send them a tent to suit their needs.

---

**अ. नं. ४** **श्री**

इ. स. १७२०

दंडवत विनंती उपरि तुम्हीं पत्र पाठविलें, लिहिलें की, तळावर प्रहर सहा घटका मुकाम करणें, म्हणोन लिहिलें. त्यावरून प्रहर सहा घटका सडे तळावर राहतों, तों तुम्हीं ताबडतोब येणें. छ. १८ जिल्हेज. मंडलोई कारणें तळावरी राहणें, म्हणोन लिहिलें होतें यास्तव प्रहरभर राहिलों आहों. तरी तुम्हीं लवकर येणें. पुढें सांगोन आम्हांस निरोप पाठवणें. हे विनंती. लेखनसीमा.

**राजवाडे खंड ६ लेखांक ५८६**

No. 4 1720 A.D.

The Maratha leader (name not mentioned) is awaiting the arrival of the Mandloi at the spot previously determined. "Inform us beforehand."

---

**अ. नं. ५** **श्री**

आश्विन वद्य १२, शके १६४२, इ. स. १७२०

| |
|---|
| श्री मार्तंड चरणीं<br>दृढभाव शिवाजी<br>सुत राघोजी<br>बारगळ निरंतर |

राजश्री राऊ नंदलाल मंडलोई परगणे इंदूर. गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारराव होळकर दंडवत सुरू सन इहिदे अशरी नमया व आलफ. परगणे मजकूरच्या ऐवजाचा करार झाला. ते समयीं अंतस्थ रुपये चार हजार केले आहेत. ते तो तुम्ही दिलेच असतील. नसतील दिले तरी सदरहू रुपये राजश्री नारो शंकर दिमत मजकूर यांजवळ झाडियानिसी देणें. हयगय न करणें. कराल तरी एक दो रोजांत तुमचे भेटीस आम्हांसच येणे लागेल. मग जे होणे ते होईल. आजी छ.२५ जिल्हेजी मुकाम चिखलद्यानजीक झाला आहे. पुढें मजल दरमजल

त्या प्रांतीं येतों. तरी तुम्ही सदरहू रुपये व बाकी मशारनिल्हे जवळ देणें जाणिजे छ.२५ जिल्हेज.

राजवाडे खंड ६, लेखांक ५८९

No. 5 1720 A.D.

Malharrao Holkar presses Nandlal Mandloi for the payment of the secret agreement as entered into when the revenue of Pargana Indore was settled.

---

**अ. नं. ६**

## श्री शंकर

फाल्गुन वद्य १४, शके १६४६, इ. स. १७२१

पंतप्रधान

राजश्री अंबाजीपंत स्वामी गोसावी यांस सेवेसीं. अखंडित लक्ष्मी अलंकृत विराजित सदा यशवंत राजमुद्रा विराजित राजमान्य. सेवक आज्ञाधारक मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि येथील संतोष जाणून स्वकीये सामराज वैभव लिहिता आज्ञा करणें विशेष. बहुत दिवस आम्ही बांडियाकडे होतो हल्लीं याचा आमचा बिघाड पडला. त्यास्तव आम्ही मोहनसिंग राणे त्यांजकडे राजश्री बापूजी प्रभूचें मार्फतीनें तजवीज करीत होतों. मग यांनीं सायबाकडे तजवीज करून कागद पाठविलें आहे. तरी आम्ही मनापासून मनसिबियाचे वाटेनें जे तजवीज केली आहे. तुमच्या चित्तास उत्तम दिसून येईल तरी उभयतां येकत्र होऊन उत्तरें कागदाची मनापासून पाठविणें. कित्तेक वर्तमान तपशीलवार राजश्री बापूजी प्रभू यांनीं लिहिलीं आहेत. कुल मनास आणून उत्तरें पाठवितों. उत्तरें आल्यावरी राजश्री तुमचे सेवेसीं येतील. आपण इमानकुली मनापासून राजश्रीसी केला आहे. जेथें यांनीं आम्हास ठेवावे तेथें बिनाकसुर राहावें. जो धनी चाकर ठेवील त्यांनीं इज्जतीनें ठेवावें. चाकरीस उजूर नाही. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असोदीजे हे विनंती.

**पेशवे दप्तर**

No. 6 1724 A.D.

Malharji Holkar seeks service under the Peshwa through Ambaji Purandare and incidentally narrates his past history connected with Bandes and Mohansingh Rana.

---

अ. नं. ७ **श्री**

पौष वद्य १२, शके १६४६, इ. स. १७२४

| |
|---|
| राजा शाहू नरपति<br>हर्षनिधान, बाजीराव<br>बल्लाळ प्रधान |

राजश्री रघोजी भोसले गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित बाजीराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद. सुरू सन खमसअशरीनमया व अलफ. परगणे कंपेल सुभा इंदूर, सरकार उज्जनी प्रांत माळवा हा महाल खासगत पागेस मोकासा दिला आहे. तरी तुम्ही परगणे मजकुरास एकंदर तगादा न देणें. एक रुपया न घेणें. एक रुपया घेतलिया खुद तुम्हांस देणें लागेल. हे जाणून वर्तणूक करणें. जाणिजे. छ. २५ रविलाखर बहुत काय लिहिणे. लेखनसीमा.

No. 7 1724 A.D.

Peshwa Bajirao Ballal warns Raghojee Bhonsle against molesting Pargana Kampel Subbha Indore as it is already assigned to Khasgat Paga.

---

अ. नं. ८ **श्री शंकर**

फाल्गुन वद्य १४, शके १६४६, इ. स. १७२४

| |
|---|
| श्री राजा शाहू चरणीं<br>तत्पर संताजी<br>भोसले निरंतर |

छ. मश्रुल अनाम नंदलाल मंडलोई व कानगो परगणे इंदूर प्रांत माळवें यांसी सवाई संताजी भोसले सुाखमसअशरीन मयाबअलफ. राजश्री गोपाळपंत व अप्पाजीपंत महाराणाकडे उदेपूरास कांहीं नाजूक कार्यभाग प्रसंगामुळें रवाना केले आहेती. त्यास हे तुम्हाजवळ येतील त्यास आमच्या नजरेबाबत घोडा एक व वस्त्रें तुम्हांकडील यांचे स्वाधीन करून यांस मार्गस्थ करणें. या कार्यास विलंब न लावणें. विलंब लागून कार्यांत अंतर पडल्यास जबाब तुम्हास करणें लागेल हे स्पष्ट समजोन वर्तणूक करणें. छ.२७ जमादिलाखर मोर्तबसुद.

No. 8 | 1724 A. D.

Sawai Santaji Bhosale orders Nandlal Mandloi and Kanago of Paragana Indore to honour and help his agents named Gopalpant and Appajipant in their diplomatic mission to the Maharana of Udaipur.

---

**अ. नं. ९** **श्री**

पौष वद्य १२, शके १६४६, इ. स. १७२४

श्री राजा शाहू
नरपति हर्षनिधान
बाजीराव बल्लाळ
प्रधान

छ.मश्रुल अनाम मंडलोई व कानगो परगणे इंदूर यांसी. बाजीराव बल्लाळ प्रधान सुरू सन खमशअशरीनमयाअलफ. परगणे मजकुर राजश्री चिमणाजी बल्लाळ यांजकडेस पागेस मुकासा दिला आहे. तरी तुम्ही मशारनिल्हेसी रुजू होऊन परगणे मजकुरचे पडले पान आकार होईल त्याचे चौथाई वसूल मशारनिल्हेकडे सुरळीत देणें. खलेल न करणें. जाणिजे छ.२५ रविलाखर परवानगी हुजूर. लेखनसीमा.

No. 9 | 1724 A.D.

Peshwa Bajirao Ballal informs the Mandloi and Kango of Pargana Indore that the said Pargana is assigned to Chimnaji Ballal as Mokasa for the Paga maintenance. They are directed to pay one fourth of the revenue to Chimnaji.

---

**अ. नं. १०** **श्री**

ता. ६ आगस्ट, इ. स. १७२७

राजमंडळ पुणें दरबार

रोजकीर्द सुरू सन
मोहरम, छ २९, ११२७

१ मल्हारजी होळकरांस सरंजाम खर्चास देणें.

तपशील :

४ प्रांत गुजराथेत महाल चार

६ प्रांत माळव्यांत महाल सहा

१ प्रांत खानदेश एक

....

११

एकूण ११ अकरा. (इ. स. १७२७)

४ गुजराथ : १ मौजे मोधे
१ परगणे बलवद
१ परगणे खंबाइत
१ परगणे सवलके
....
४

६ माळवा : १ आरणिया
१ परगणे रूणीझा
१ परगणे पिंपलोद
१ परगणे देवळे
१ परगणे खाचरोद
१ परगणे जावरा
....
६

१ खानदेशपैकीं एक महाल
....
११

ROZKIRD OF RAJMANADAL-POONA 19 MUHARAM 1127
ARABI

(6th of August 1727)

The expenses of Malharji Holkar's Saranjam are to be met from the revenue of 4 districts in Gujarath, 6 in Malwa and 1 in Khandesh. In all 11 districts are assigned.

---

**अ. नं. ११** **श्री**

शके १६५१, इ. स. १७२९

श्री मार्तंड चरणीं
तत्पर मुकुंद नरहर
निरंतर

राजश्री नंदलाल मंडलोई गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य सेवेसीं मुकुंद नरहर नामजाद प्रांत तलाटी दिमत राजश्री उदाजी पवार सुरू सन सलासेनमया अलफ

परगणे बागोद येथील खंडणी सालगुदस्त राजमान्य राजश्री मल्हारराव होळकर यांनीं केली. त्याप्रमाणें वसूल भरून पावला आपला दामदिरीम राहिला नाही. देशमुखी, चौथाई, सायर, कारकुनी, कुलबाब भरून पावलो जाणिजे. रवाना छ.१५ जिल्हेज मोर्तबसुद.

No. 11 1729 A.D.

News : Malharrao Holkar collected the tribute consisting of Deshmukhi. Chowthai, Sayar, Karkuni of Pargana Bagoda last year.

---

**अ. नं. १२** **श्री**

शके १६५१, संवत १७८४, ता. २० जुलाई, इ. स. १७२९

वेदमूर्ती राजश्री शंकरभट तानभट खाडे उपाध्ये श्री क्षेत्र जेजुरी स्वामींचे सेवेसीं. सेवक मल्हारजी बिन खंडोजी होळकर दंडवत, विनंती ऐसीजे श्री क्षेत्र जेजुरीचे तीर्थ उपाध्येपण आम्ही तुम्हांस दिले आहे. तरी आम्ही अगर आमचे वंशीचे जे कोणी क्षेत्र मजकुरीं येतील ते आपल्यास अगर आपले वंशजास पूजीत जातील. आपण श्री मार्तंडजीपासीं आमचे विषयीं अभीष्टचिंतन करीत जाणें. सु।। आशर अशरीनमयाअलफ छ. ४ मोहरम बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

No. 12 20-7-1729 A.D.

Hereditary appointment of Shankarbhatt Khade as family Tirthopadhaya at Jejuri by Malharji Holkar.

---

**अ. नं. १३** **श्री**

कार्तिक, शके १६५१, इ. स. १७२९

श्री मंगलमूर्ति चरणीं
तत्पर नारो शंकर
निरंतर

राजश्री लाला हरनारायणजी परगणे सावेर व तालुके प्रगणे देपाळपूर. अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित उभयतां नारो शंकर दिमत राजश्री उदाजी पवार व राजश्री मल्हारराव आशीर्वाद. विनंती. सुरू सन सलासीनमयाअलफ. मार्फत राव नंदलाल मंडलोई परगणे इंदूर रू. हजार अंके १००० पावले. जाणिजे. शिवाय स्वारांचा खर्चपैकीं रुपये १००

शंभर एकूण रुपये ११०० अकराशें पावले असत. मोर्तबसुद. संवत् १७८६ विक्रमी.

No. 13 1729 A.D.

Naro Shankar in the joint service of Udajee Pawar and Malharrao Holkar acknowledges receipt of Rupees eleven hundred from Nandlal Mandloi of Pargana Indore.

(Inclusive of Rupees one hundred for the cavalry expenses).

---

**अ. नं. १४** **श्री**

कार्तिक वद्य ५, शके १६५१, ता. ३१-१०-१७२९

| श्री राजा शाहू नरपति<br>हर्षनिधान बाजीराव<br>बल्लाळ मुख्य प्रधान |
|---|

छ. मश्रुलअनाम नंदलाल मंडलोई परगणे इंदूर यांसी बाजीराव बल्लाळ प्रधान. सुरू सन सलासीनमयावअलफ. राजश्री कुसाजी गणेश हुजूर आले. यांनीं कित्तेक अर्थ निवेदन केला. त्याजवरून सविस्तर कळलें. ऐसियासी आमची स्वारी ते प्रांतीं सत्वरच येत आहे. माळव्याचा बंदोबस्ताचा अर्थ राजश्री लाला हरनारायण यांनीं लिहिला व जबानीं सांगोन पाठविला होता. त्यास, प्रांतमजकूरचा बंदोबस्त जालिया रयत निरूपद्रवी राहून दुतर्फा किफायतीचे आहे. एतद्विषयीं एथून उज्जनीच्या सुभ्यास व लाला हरनारायण यांस कित्येक अर्थ लेखन करून पत्रें पाठविली व जबानीही मशारनिल्हे सांगतील. तरी तुम्हीं त्यांस विचाराच्या चार गोष्टी सांगोन, मुलखाचा तह करून दुतर्फा कमाविस सुरळीत चालविणें. जर ही गोष्ट त्यांचे विचारास न येच तरी आम्ही ते प्रांतें येतच आहोंत. आमची फौज तिकडे आल्यावर मुलुख सुप्रयुक्त राहतोसा नाहीं, खराब होईल. तेव्हां नुकसान होईल. वरकड कित्तेक अर्थ मशारनिल्हे तुम्हांस सांगतील त्याजवरून कळेल. सारांश, तुम्ही मातबर कार्यकर्ते एकनिष्ठ आहां. हरएक विचारास चुकतासे नाही. तुमचे सर्व प्रकारें अगत्य आहे. तदनुरूप होणें तें होईल. आपला खातरजमा असो देणें. आमची स्वारी रेवातीरास येतांच तुम्ही मातबर मनुष्य हुजूर पाठवून देणें व त्यांजकडीलही मातबर मनुष्य बरोबर घेऊन तुम्ही भेटीस रेवातीरीं येणे. जाणिजे. छ. १९ रविलाखर आज्ञा प्रमाण लेखनसीमा.

No. 14 31-10-1729 A.D.

Peshwa Bajirao Ballal informs Nandlal Mandloi of Indore that he is soon coming up to that province. It is better that the subha of Ujjain

should see the Peshwa, and settle matters amicably'-Nandlal is exhorted to play a diplomatic part.

---

**अ. नं. १५** **श्री**

शके १६५२, इ. स. १७३०

| |
|---|
| श्री मार्तंड<br>चरणीं दृढभाव<br>होळकर<br>मल्हारराव |

राजश्री नंदलाल मंडलोई परगणे इंदूर गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारराव होळकर दंडवत. सुरू सन इहिदेसलासीनमयावआलफ. आम्हीं घाट चढोन देपाळपुरावर आलों. ये प्रांतींचा बंदोबस्त करावा लागतो. याजकरितां राजश्री निळोपंत दिमत राजश्री पंतप्रधान हे तुम्हांकडे पाठविले आहेत तर तुम्हीं भेटीस येणें. कित्येक वर्तमान मशारनिल्हे मुखवाचे सांगतील ते मनांत आणून निस्संदेह भेटीस लवकर येणें व जेजाला ८० ऐंशीं, दारूखंडी सव्वा व शिसे मण अर्धा पाठविणें व उंटें पन्नास ऐशी तयारी करून पाठविणें. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**राजवाडे खंड ६, लेखांक ६५०**

No. 15 1730 A.D.

Malharrao Holkar has reached Depalpur, and asks Nandlal Mandloito come over and see him, as the Pargana is unsettled. The latter is asked to despatch 80 small shooting missiles, one and one-fourth of Khandee of ammunition, and half a maund of lead. Fifty camels also must accompany the war material.

---

**अ. नं. १६** **श्री**

फाल्गुन शुद्ध ५, शके १६५२, ता. २ फेब्रुवारी, इ. स. १७३१

| |
|---|
| श्री राजा शाहू<br>नरपति हर्षनिधान<br>बाजीराव बल्लाळ<br>प्रधान |

राजश्री तेजकर्ण मंडलोई व कुंवर न्याहालकर्ण परगणे इंदूर गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर व राणोजी शिंदे दिमत पंतप्रधान दंडवत. सुरू सन इसनेसलासीन मयावअलफ. गिरमाजीपंत व भुटोजी तुम्हांकडून आले. याने हुजूर कित्येक वर्तमान निवेदन केले व राजश्री नारोपंतींही सांगितलें, त्यावरून कळून आले. ऐसियासीं हल्ली राजश्री नारो शंकर व राजश्री मल्हार गोपाळ उभयतांस कित्येक मसलती सांगोन पाठविले आहेत व गिरमाजीपंतही निवेदन करतील. त्याज माफिक कबूल करून तूर्त पोख्ता ऐवज जमा करून हुजूर पाठविणें. खरीपाचा हंगाम होऊन गेला. अद्यापि तुम्हांकडील निर्गम नाही. तरी या उपरि पोख्ता वसूल पाठवून देणें. आमचीही फौज त्या प्रांतें अविलंबेच येत आहे. तुम्हांस मग जे गोष्टीने लागे ते गोष्ट न करणें. तुमचा आमचा स्नेह जो आहे तो पुढें वृद्धी चाले, ऐसी गोष्ट करणें. वरकड मजकूर कित्येक पंत मशारनिल्हे उभयतां सांगतां कळों येईल. जाणिजे छ. ४ रमजान. लेखनसीमा.

**राजवाडे खंड ६, लेखांक ६०९**

No. 16 2-2-1731 A.D.

Malharji Holkar and Ranoji Shinde in the service of the Peshwa press the Mandlois of Indore for the payment already overdue.

---

**अ. नं. १७**

## श्री शंकर

ज्येष्ठ शुद्ध ४, शके १६५३, ता. २८ मे, इ. स. १७३१

| श्री मंगलमूर्ति चरणीं तत्पर<br>नारो शंकर निरंतर |
|---|

राजश्री राव तेजकर्णजी व कुंवर न्याहालकर्ण मंडलोई परगणे इंदूर गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित नारो शंकर व मल्हार गोपाळ दिमत राजश्री मल्हारराव होळकर व राजश्री राणोजी शिंदे सुरू सन इसनेसलासीन मयाअलफ. सन ११३९ बद्दल हवाला मनोती परगणे बेटमे पैकीं पोहचलें रुपये ५२५ सवापांचशें रास मनोतीबद्दल परगणे बेटमे पैकीं मुजरा असेत. जाणिजे. रवाना छ. २ जिल्हेज जाणिजे. मोर्तबसुद.

No. 17 28-5-1731 A.D.

The amount of Rupees Five hundred and twenty five is received by

Naro Shankar and Malhar Gopal (in the service of Malharrao Holkar and Ranojee Shinde) as part payment of Pargana Betma.

---

**अ. नं. १८** **श्री**

ज्येष्ठ वद्य ४, शके १६५३, ता. १२ जून, इ. स. १७३१

| श्री म्हाळसाकांत चरणीं<br>दृढभाव होळकर मल्हारराव |
|---|

राजश्री नंदलाल मंडलोई परगणे इंदूर गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दिमत राजश्री पंतप्रधान दंडवत सुरू सन इसन्ने-सलासीन मयावआलफ लिहिले पत्र पावोन वर्तमान विदित जाहले. लिहिलें कीं परगणे मजकुरी ताकीद करणें म्हणोन लिहिले. तरी ताकीद केली आहे. परंतु कोणी तुमचे अगोदर आले नाही. त्यांसी न कळत झाले, यांसी उपाय नाही. मग राघोदास व मयाराम भेटले ताकीद करविली. या कुल माळवियांत तुमची प्रामाणिकता, विश्वास, तुमचा आमचा घरोबा आणि तुम्ही बेइमानाची गोष्ट सांगावी, हें अपूर्व आहे. पैकीयाचा वसूल अद्यापि झाडियानिर्शी न दिला. यावरून काय म्हणावें? या उपरि पत्रदर्शनीं पैकीयाचा झाडा राजश्री नारो शंकर यापाशी करणें आणि कोणेविसीं इमानांत अंतर न करणें. जाणिजे छ. १० जिल्हेज. पैकीयाचा झाडा न केला यास्तव राजश्री बापूजीबाजी पाठविले आहेत. तरी यांच्या विद्यमानें राजश्री नारोपंत यांसी ऐवज झाडा करणे. ऐसें न होय कीं इष्टत्वास अंतर पडेल. पैकीयाच्या निशेचें वर्तमान न ये तोवर मुकाम पडेल. असें न करणें. सारांश, गोष्टीं स्नेहास अंतरता न होय तें करणें. कांहीं कामकाजास राजश्री रामराव गाडे पाठविले आहेत तरी कार्यभाग करून सत्वर पाठविणें. आणि पेशजी बुणगे यांचे कबिले होते, तेव्हां घोडीं वगैरे वस्तभाव बारीच्या तोंडीं गेली आहे ते पाठविणें. ये विसी बहुत लिहिणें नलगे. तुमचे जिमेची दि।। देवास बाकी झाडियानिर्सी देणें. उजूर न करणें, जाणिजे. रवाना छ १७ जिल्हेज. हे विनंती. मोर्तबसुद :

No. 18 12-6-1731 A.D.

Malharji Holkar in the service of the Peshwa takes Nandlal Mandloi to task for non-payment of his due, politely yet firmly; refers to events of military nature of the past year.

---

अ. नं. १९ **श्री**

ज्येष्ठ वद्य ६, शके १६५३, ता. १४ जून, इसवी सन १७३१

श्री राजा शाहू नरपति
हर्षनिधान बाजीराव बल्लाळ
प्रधान

राजश्री तेजकर्ण मंडलोई परगणे इंदूर गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर व राणोजी शिंदे दंडवत सुरू सन सलाससलासीन मयावअलफ. तुमचे भेटीकरितां तळावरी आम्ही वाट पाहतो. तरी पत्रदर्शनीं स्वार होऊन येणें. एक घडीचा विलंब न करणें. जाणिजे; छ. १९ जिल्हेज लेखनसीमा.

**राजवाडे खंड ६, लेखांक ६११**

No. 19 14-6-1731 A.D.

Malharji Holkar and Ranoji Shinde invite Tejkarna Mandloi for a visit in their camp as expeditiously as possible.

---

अ. नं. २० **श्री**

ता. ८-७-१७३१

श्री मार्तंड चरणीं दृढभाव
होळकर मल्हारराव

अजसुभा राजश्री मल्हारजी होळकर दिमत राजश्री पंतप्रधान. ता. मोकदम मौजे मांडवी प्रगणे उत्राण सुरू सन सलासीत मयाअलफ. मौजे मजकूर मोकासा सालगुदस्त शिवराम कृष्ण यांजकडे होता तो दूर करून राजश्री रामाजी यादव यांसी मोकासा दिला असे. मशारनिल्हेस मोकासा बाबीचा वसूल सुरळीत देत जाणें. जाणिजे. छ. १४ मोहरम मोर्तबसुद.

No. 20 8-7-1731 A.D.

Mokasa of Mauza Mandvi is granted to Ramaji Yadav (Palsikar) by Subhedar Malharji Holkar. Shivaram Krishna is removed from the post.

---

अ. नं. २१ **श्री**

ता. ८-७-१७३१

राजश्री रामाजी यादव खासनीस
गोसावी यांस,

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुरू सन इसन्नेसलासीन मयाअलफ. तुम्हांस साल गुदस्तां खासनिशी सांगितली आहे तेणें प्रमाणें करार असे. इमाने इतबारें वर्तोन निष्ठेनें सेवा करित जाणें. तुम्हांस वतन सालिना रू. १५०० दीड हजार केले असे. पावते करूं. जाणिजे. चंद्र १४ मोहरम हे विनंती. मोर्तबसुद.

| श्री मार्तंड चरणीं दृढभाव<br>होळकर मल्हारराव |
|---|

No. 21 8-7-1731 A.D.

Malharji Holkar confirms Ramji Yadav Palshikar in the post of Khasnis on an annual salary of Rupees fifteen hundred only.

---

अ. नं. २२ **श्री**

ता. ८-७-१७३१

राजश्री नारो शंकर कमाविसदार महालहाय
प्रांत मालवा.
गोसावी यांस.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य मल्हारजी होळकर दंडवत सुरू सन इसन्नेसलासीन मयाअलफ गुदस्त देणें राजश्री रामाजी यादव खासनीस रू. ६००२ देवविले असे ते पावते करून पावलियाचा कबज घेणें. देणें प्रांत मजकुरांत. जाणिजे. चंद्र १४ मोहरम हे विनंती. मोर्तबसुद.

| श्री मार्तंड चरणीं दृढभाव<br>होळकर मल्हारराव |
|---|

No. 22 8-7-1731 A.D.

Malharji Holkar orders Naro Shankar (Kamavisdar of Prant Malwa) to pay Rs. 6002 to Ramaji Yadav and get receipt of the same

from the latter. The amount is to be paid from the collection of Prant Malwa.

---

**अ. नं. २३** **श्री राम**

कार्तिक शुद्ध ४, शके १६५३, ता.२३-१०-१७३१

नकल खत बमोहर राजश्री बाजीराव पंतप्रधान बाबत छ.२ जमादिलावल. मतलब मश्रुलअनाम मंडलोई तेजकर्ण परगणे इंदूर यांसी बाजीराव बल्लाळ प्रधान सुरू सन इसन्ने सलासीन मयावअलफ. तुम्ही विनंतीपत्र पाठविले ते पावोन सविस्तर कळलें. नंदलाल मंडलोई यांस देवाज्ञा झाली. तरी आपले प्रकारें चालवावे म्हणून कित्येक निष्ठापुरःसर लिहिलें ते कळले. ऐसियासि मालवा प्रांतींचें अखत्यार राजश्री मल्हारजी होळकर, राजश्री राणोजी शिंदे यांसी देऊन पाठविले आहेत. यांस तुमचा गौर करावयासि कित्येक आज्ञा केली आहे. उभयतां मशारनिल्हे आज्ञेप्रमाणें तुमचा गौर करतील. तुम्ही त्यांस भेटोन कामकाज करीत जाणें. तुमचा सर्व प्रकारे आम्हांस अभिमान आहे. तद्नुरूप निर्वाह होईल. चिंता न करणें. वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. जाणिजे.

No. 23 23-10-1731 A.D.

News of the death of Nandlal Mandloi. Mandloi Tejkarna receives a letter of condolence from Peshwa Bajirao 1. Malharji Holkar and Ranojee Shinde are the Peshwa's accredited agents in Malwa, and the Mandloi is advised to work in co-operation with them.

---

**अ. नं. २४** **श्री**

माघ शुद्ध ४, शके १६५३, ता. २१-१-१७३२

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>खंडोजी सुत मल्हारजी होळकर |

राजश्री तेजकर्ण मंडलोई गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य :

स्नेहांकित मल्हारजी होळकर दिमत राजश्री पंतप्रधान सुरू सन इसनेसलासीन मयाव-अलफ. राजश्री कुशाजी गणेश व भोलूभट व गिरमाजीपंत यानीं वर्तमान विदित केलें त्यावरून नबाब उमरखान यांसी फारसी कागद रजपुताविर्सी लिहिला आहे व दामाजीपंत कमाविसदार

प्रगणें धार यांसीही लिहिले आहे. कागद पोहचवून देणे. रजपूत काहडूना देतील, उपरि उपद्रव देणार नाही, ऐसेच लिहिलें आहें. धोंडोपंत व भेवजी अवधूत कमाविसदार परगणे काटकूट यांसी कागद लिहिला आहे कीं, मवाशांनीं तपिया याच्या गांवची वस्तभाव घेतली ती फिरोन देणें. हुजूर बोभाट यावयासी प्रयोजन नाहीं ऐसें त्यांसहीं लिहिले आहे. तुम्ही हरएकविर्सी आपली खातिरजमा राखणें. जाणिजे. छ.४ साबान मोर्तबसुद.

**राजवाडे खंड ६, लेखांक ६१६**

No. 24 21-1-1732 A.D.

Malharji Holkar in the service of the Peshwa writes to Tejkarna Mandloi that he (Holkar) is in communication with Nabab Umarkhan whom he (Holkar) has advised to be tolerant towards the Rajput. The Kamavisdar of Pargana Katkut is ordered by Holkar to see that the stolen property of Tapia village is restored back to the villagers.

---

**अ. नं. २५** **श्री**

ज्येष्ठ वद्य ३, शके १६५४, ता. ३१-५-१७३२

श्री राजा शाहू नरपति हर्षनिधान
बाजीराव बल्लाळ प्रधान

राजश्री तेजकर्ण मंडलोई परगणे इंदूर गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर व राणोजी शिंदे दंडवत सुरू सन सलास सलासीनमया-अलफ. उपरि हल्लीं छ.१७ जिल्हेजी मुळसकर नजीक बखेडे झाले आहेत. ऐसियासी परगणें बागोदचे खंडणीचा पैसा हा काळपर्यंत बेदाम न जाहला. हे गोष्ट उत्तम न केली. हल्लीं लिहिले जातें कीं देखत पत्र झाडियानिसी पैका वसूल राजश्री माधवराव जिवाजी कमाविसदार यांस देणें. एक घडीचा उजूर न करणें. ढील जालिया मुलकाची खराबी होईल. ते गोष्ट न कीजे. जाणिजे. छ.१७ जिल्हेज मोर्तबसुद.

**राजवाडे खंड ६, लेखांक ६१९**

No. 25 31-5-1732 A.D.

Malharji Holkar and Ranoji Shinde press Tejkarna Mandloi for immediate payment of the revenue of Pargana Bagoda to their Kamavisdar.

---

अ. नं. २६ श्री

ता. २२ जून इ. स. १७३२

राजश्री मल्हारजी होळकर गोसावी यांसी.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित बाजीराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणोन स्वकीये लिहिणें विशेष प्रांत माळवा येथील वाटणीचे महाल वाटणी पांच ५ पैकी दोन तक्षिमा तुम्हांकडे त्यांजबद्दल महाल बी तपशील.

| | | |
|---|---|---|
| १ परगणे इंदूर | १ परगणे बुढा (नारायणगड) | १ परगणे झाबवा |
| १ परगणे गांगुरनी | १ परगणे जावरा | १ परगणे पिढावा |
| १ परगणे जिरापूर | १ परगणे डोंगरपूर पैकी चौथ | १ परगणे खैराबाद |
| १ परगणे करहई | १ परगणे तराणे | १ परगणे रामपूर |
| १ परगणे जेपालपूर (देपालपूर) | १ परगणे बेटमे | १ परगणे कायथे |
| १ परगणे महतपूर देखील लालगड | | १ परगणे महेश्वर |
| १ परगणे पिंपळोदे | १ परगणे आवेर | १ परगणे बाकाणीनिमे |
| १ परगणे बरडावद | १ परगणे भिलवडी | १ परगणे काटकूट |
| १ परगणे हासलपूर | १ परगणे पिंपलोद तलाठी | १ परगणे देवळे |
| १ परगणे लवाणी | १ परगणे कोठडे (चिखलदे) | १ परगणे पाटण |

येकुण २८१/२ साडे अठ्ठावीस

येणेप्रमाणें लावून दिले असत, तर सदरहू महालांचा ऐवज फौजेचे सरंजामीस घेत जाणें.

छ. १० माहेरम सुरू सन सलाससलासीन मयावअलफ. आज्ञा प्रमाण. मोर्तबसुद.

**हुजूर फडणीसी रेकार्ड**

No. 26 22nd June 1732 A.D.

List of the Grant of 2/5th of the territory of Prant Malwa to Malharji Holkar by Bajirao Ballal Pradhan for the maintenance of his army.

---

**अ. नं. २७** **श्री**

ता. १० आगस्ट, इ. स. १६३२

कर्जरोखा शके १६५४ परिधावी संवत्सरे भाद्रपद शुद्ध १ ते दिवर्शी खत लिहिते धनकोनाम राजश्री कृष्णराव महादेव व दादोबाराव गोडसे मुक्काम पुणें यांस रिणकोनाम मल्हारजी होळकर आत्मकार्यप्रवर्तकतेस घेतले. (मोहर) तुम्हापासोन कर्ज मुद्दल रुपये ३१९१ एकतिसशें एक्याण्णव घेतलें यांस व्याज दरमहा दरसदे रुपये ३ तीन प्रमाणें देऊं हें खत लिहून दिलें. सही विद्यमान गंगाधर यशवंत फडणीस दिमत मजकूर. यांस मुदत श्रावणमार्शी देऊं. अन्य उत्तर न करूं हे सही. मोहर.

No. 27 10.8.1632 A.D.

Bond for a debt of Rupees 3191 passed by Malharji Holkar at the rate of 3 per cent per month to Krishnarao Mahadeo and Dadobarao Godse.

---

**अ. नं. २८** **श्री**

इ. स. १७३२

रा. नारो शंकर यांनीं थोरले मल्हारजीबाबा होळकर सुभेदार यांजपार्शी प्रथम शिलेदारीचा रोजगार करून लढाईचे प्रसंगीं तलवारीचे मर्दुमकीचें काम केले. त्यावरून होळकर यांनीं नगारानिशाण पागा देऊन जमियत १०००, १५०० निर्शी वाढविली आणि इंदूर सुभ्याच्या बंदोबस्ताचें काम सांगितले. पुढें होळकर यांनीं नारो शंकर यांचे मर्दुमकीची तारीफ स्वमुखें पेशवे सरकारचे कानावर घालून सरकार आज्ञेनें त्यांजला पुण्यास बोलाविले नंतर हिंदुस्थानचे मोहिमेचीं वस्त्रें दिलीं.

मि. शिवराम गोपाळ यांनीं इवार्डन डेप्युटी एजंट दक्षिण यांस दिलेली माहिती. ता. ८ सप्टेंबर इ. स. १८३२.

No. 28 1732 A.D.

The rise of Naro Shankar was due to Malharji's appreciation of his services and recommendation to the Peshwa; first a Shiledar, then a Subha and lastly Commander-in-chief. (As reported to the Agent in 1832.)

---

अ. नं. २९ **श्री दत्त**

इ. स. १७३३ ते १७९९

महेश्वर (माहेष्मति) बद्दल हकीगत.

१. मोगलाईचे वेळीं किल्ला मातीचा होता. संवत् १७९० त (इ. स. १७३३ होळकरांचा अंमल झाल्यावर दुरूस्तीचें काम सुरू झाले.

१. श्रीमंत अहिल्याबाई साहेबांची स्वारी इंदूराहून महेश्वरी संवत् १८२४ भाद्रपदमासीं (इ. स. १७६७ मध्यें) येऊन राहिली. वाडे, मंदिरें प्राचीन देऊळें कसकसी बांधविलीं व स्थापना केली :

१ प्रथम सरकार वाडा बांधविला व श्री नर्मदेचा घाट वाड्याखालील बांधविला. नंतर श्री काशी विश्वेश्वराचे मोठे देऊळ शिखरबंद बांधवून स्थापना केली. त्यानंतर किल्ल्यावर श्री राम मंदिर बांधवून पूजा नथ्थूभट भिकंभटास सांगितली. त्यानंतर श्री कृष्ण मंदिर बांधविलें व नंतर रेवाकाठी विठोबाचें देऊळ बांधविलें. प्रत्येक देऊळ बांधीत जाऊन त्याचे पूजेअर्चेची व्यवस्था करीत गेले.

२ प्राचीन किल्ला मातीचा होता त्याची डागडुजी करून चुन्याचे थर बसविले व दक्षिण पश्चिमची बाजू पक्के फत्तराची केली. कमानी दरवाजा मोंगली अमलाई पैकीं दगडी होता तो पडल्यामुळें बुरूज वगैरे सुद्धां बांधविला.

३ कस्बे महेश्वर येथील वस्ती आबादीबद्दल संक्षिप्त माहिती.

१ किल्ल्याखाली जुनाबाजार व मारूवाडा (कापड विणकर लोकांची वस्ती) येथें वस्ती होती व किल्ल्यावर थोडी वस्ती होती. नंतर शहराची आबादी बाईसाहेबांनीं करविली. आदितवार बाजार, मंगळवारपूरा; बाईसाहेबांचें जावई यशवंतराव फणसे यानी फणसेपुरा वसविला. कृष्णाजीपंत दिवाण यानी मल्हारगंज, कृष्णपुरा वसविला खाजगीवाले दिवाण गोविंदपंत गानू यानी गोविंदपुरा वसविला. श्री भवानी देवीचे मंदिर शहराचे उत्तर दिशेस संवत् १८३५ (इ. स. १७७८) सालीं बाईसाहेबानीं बांधवून स्थापना केली. त्याचप्रमाणें श्री परशुराम मंदिर श्री रेवातीरीं बांधवून याचे खाली पेशवे घाट म्हणून बांधविला.

४ श्री केशवराव यांचे मंदिर बाईसाहेबांच्या सासू श्रीमंत गौतमबाई साहेबांनीं बांधवून स्थापना केली.

५ श्री चतुर्भुज नारायणाचें मंदिर किल्ल्यावर श्रीमंत सुभेदार थोरले मल्हारराव यांनीं बाईसाहेब महेश्वरी जाण्याचे पूर्वीच बांधविलें. सहस्रबाहू कार्तवीर्य (राजराजेश्वर) यांचे मंदिराचा जीर्णोद्धार केला.

६ श्री कालाग्निरूद्र (श्री काळेश्वर श्री नर्मदातीरी प्राचीन मंदिर) त्या मंदिराची अहिल्याबाई साहेबांनीं डागडुजी करून जीर्णोद्धार करून धर्मशाळा बांधविली.

(प्रदक्षिणावासी लोकांचें सोयीसाठीं)

७ श्री मातंगेश्वर व श्री भर्तृहरीची गुफा प्राचीन आहे. त्यांची व्यवस्था अहिल्याबाई साहेबांचें वेळींच झाली.

८ श्री अहिल्या घाट भारमल दादा होळकर यांनीं बाईसाहेबांचे कैलासवासानंतर संवत् १८५८ विक्रमी सालीं काम सुरू केलें ते श्रीमंत कैलासवासी हरीराव महाराजांचे कारकीर्दीत छत्रीसुद्धां पूर्ण झाले. संवत् १८९५ (इ. स. १८३८) सालीं.

सदरची माहिती जुने यादीवरून महेश्वर येथील मंडलोई व विठ्ठलदास कानगो यांचे रेकॉर्डवरून संपादिली.

No. 29 1733 to 1799 A.D.

Growth and development of Kshetra (Holy City) Maheshwar during the reigns of Subhedar Malharrao, Devi Ahilyabai Holkar, and after (1733-1838 A.D.)

---

**अ. नं. ३०** **श्री**

ता. २० जानेवारी इ. स. १७३४

राजा शाहू हर्षनिधान
बाजीराव बल्लाळ मुख्य प्रधान

राजश्री मल्हारजी होळकर गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित बाजीराव बल्लाळ पेशवे पंतप्रधान अनेक आशीर्वाद सुरू सन अर्बासलासीन मयावअलफ. माळवें प्रांतीं वाटण्या होळकर २ शिंदे २ पवार १ असे पांच हिश्श्याने प्रगणे जिल्हे निहाय सन गुदस्तसालीं सनद दिली गेली त्यावर तुम्ही परगणेनिहाय खाजगीचा हिस्सा काढून सरंजामेतून वजा करून आपले कुटुंबास इनाम लाऊन देणे विषयी बल्लाळ पेशवे यांचे नावें पत्र लिहिलें त्यास दफाते पत्राचे पोटीं सरंजामेतून वजा करून इनाम मखलसीची याद पेश जाल्यावर तुम्हास लिहिण्यांत येतें कीं तुमचे ताब्यांत खाजगी व दौलत असे दोन्हीं प्रथक प्रथक कायम करून तुमचे कुटुंब सौभाग्यवती गौतमाबाईचे नांवें इनाम देऊन सनद व कपडे पाठविलें आहे. तरी खाजगीकडेस इनामी तालुके निरंतर चालविणें तपशील येणेंप्रमाणें :

२६३०००-००-०० प्रगणे महेश्वर, चोळी व प्रगणे इंदूर, प्रगणे हरसोला, प्रगणे सावेरपैकीं बरलाई तालुका परगणे देपाळपूरपैकीं तालुके

| | |
|---|---|
| | हातोदा परगणे महदपूरपैकीं तालुके जगोठी व करंज माकडोन वगैरे बरहुकूम यादी मखलसीची. |
| ३६०१०-१०-०० | दक्षिण प्रांतीं चांदवडपैकीं गांवें व अबांडपैकीं कोरेगाव वगैरे मोंगलाई कडील बरहुकूमयाद. |
| ........................... | |
| २९९०१०-१०-०० | एकूण इनाम कुलबाब कुलकानुगांवें दरोबस्त खासगीकडेस नेमून दिले आहे. तरी निरंतर उपभोग घेऊन नवीन सनदेची अक्षेप न घेणे जाणिजे. चंद्र २५ साबान बहुत काय लिहिणें. लेखनसीमा. |

No. 30 20.1.1734 A.D.

Grant of khasgi sanad in the name of saubhgyawati Gautamabai Holkar by Bajirao Ballal Peshwa, Pant-Pradhan. Territory of nearly three lacs given in charge of the lady at the request of Subhedar Malharji.

---

**अ. नं. ३१** **श्री**

इसवी सन १७३४

कर्जरोखा शके १६५६ आनंदनाम संवत्सरे भाद्रपाद शुद्धांत खत धनको नाम राजश्री बाबूराव मल्हार यांस रिणको नाम मल्हारजी होळकर कर्जरोखा लिहून दिला ऐसाजे तुमचे देणें बी तपशील रुपये.

२००० रुपये सालमजकूरी द्यावें. नेमणूक प्रगणे महतपूर पैकीं.

१६५० रुपये साल ऐंदेमध्यें द्यावे.

.............

३६५०

एकूण तीन हजार सहाशें पन्नास रुपये बिनव्याजी लिहिलेप्रमाणें पावते करूं. चंद्र २९ रविलाखर हे लिहिलें. सही. मोर्तबसुद.

यांसी उगवणी जमानत रामाजी खुद्द निस्बत उगवून देऊ हे लिहिलें. सही.

**पळसी दप्तर**

No. 31 1734 A.D.

Bond of debt due passed by Malharji Holkar to Baburao Malhar-debt, however, without any interest Ramaji Yadav Palshikar being surety.

---

**अ. नं. ३२** **श्री**

ता. १५ आगस्ट इ. स. १७३५

रा. मल्हारजी होळकरांचा पुत्र खंडेराव होळकर सीतसलासीन मयावअलफ. (राजमंडळ पुणें)

१ खंडेराव होळकर यांस जहागीर मोकासा दिल्याबद्दल पत्रें :

१ सनद. मौजे कोरेगांव तालुके पाबळ प्रांत जुन्नर.

१ सनद मौजे उडवडी तालुके सांडस प्रांत पुणें येथील मोंगलाई बाबती व सरदेशमुखी व साहोत्रा, कुलबाब कुलकानु दरोबस्त साल मजकुर पासोन.

No. 32 15.8.1735 A.D.

Khanderao Holkar, son of Malharji Holkar is granted the Sardeshmukhi and some other rights of two villages (Koregaon in Prant Junnar and Udawadi in Prant Poona.)

---

**अ. नं. ३३** **श्री**

ता. ८ जून इ. स. १७३६

राजश्री राऊ तेजकर्ण मंडलोई व कुंवर न्याहालकर्ण, परगणे इंदूर गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुरू सन सबासलासीन मयावआलफ. राजश्री श्री चंद व शंकराजीपंत तुम्हांजवळून आले त्यांनीं कित्येक विचार तुम्हांकडील सांगितल्यावरून कळो आले. ऐसियासीं येथील ज्या प्रकारें निर्गम झाला तो विचार साद्यंत तुम्हांस हे उभयतां निवेदन करतील. त्यावरून समजेल. तुम्ही आपलें सर्व प्रकारें समाधान असो देणें. जे तुम्हांस अगत्य तेंच आम्हांस. तुमचा कार्यभाग आमचे जिमेस आहे. परगण्यांत झाडून लावणी करणें. कोणी गांवचें एक शेत पडों न देणें. सर्व प्रकारें खातीरजमा असो देणें आणि आपलें वर्तमान वरचेवर लिहित जाणें व डेरियाचे सामान व कोरे कागद व मेणकापड व सरकारचे उंटास चरशे. येणेंप्रमाणे सरंजाम करून सिताबीनें पाठविणें. विलंब न लावणें. रुबरू वस्तु पाहून पाठवीत जाणें. जाणिजे. छ. ९ सफर मोर्तबसुद.

**शिक्का**

No. 33 8-6-1736 A.D.

Subhedar Malharji Holkar exhorts Tejkarna Mandloi and Kunwar Nyahalkarna of Pargana Indore to exert themselves for the encouragement

of agriculture throughout the Pargana. He also orders them to send him furniture and material for tents and some miscellaneous articles.

---

**अ. नं. ३४** **श्री**

पौष शुद्ध १०, शके १६५९, ता. २०-१२-१७३७

ती. राजश्री बाबा वडिलांचे सेवेसीं. छ. ४ रमजानीं पंतप्रधानासीं व नबाबासीं लढाई झाली. हत्ती पारखेड. परगणे दुराब. येथून नबाबानें कूच करून बारा कोसांचे मजल तों प्रधानांनीं प्रातःकाळापासून भांडत भांडत नवकोस मजल. तीन कोस जेथें राहिली. तेथें बनसिंग जाट व दोस्त महमदाचा लेक व जयसिंगाचा लेक. ऐसियास बरीच लढाई जाहली. त्यास आघाडीस मल्हारजी व राणोजी शिंदे व पिलाजी जाधव, यांसी बरीच लढाई जाहली. ऐसी जाहली कीं तोफखाना फोडून निमचाची लढाई झाली. होळकरांकडील लोक तीनशें माणसें, दोघे सरदार, कांहीं जखमी, वरकड शांत मेले. ऐसी संध्याकाळ दोन घटका दिवस राहत तोंपर्यंत जाहली. त्यास दोघेही कायम राहिले. मग होळकरांकडील व पंतप्रधानाकडील पंतप्रधानसुद्धां नबाबाचे लष्करापासून दोन कोसांवर मुकाम केला आहे. छ. ५ नबाबानीं भूपालगडास भांडत भांडत दाखल जाहले. वीस कोस जिकडे नबाब जातो, तिकडे धान्यास अग्निप्रवेश होतो. या प्रकाराचें वर्तमान आहे. छ. ६ रमजानीं भुपालगडाहून अलीकडे होते. ऐसें वर्तमान आले आहे. तें सेवेसीं लिहिलें आहे. तीर्थरूप राजश्री अप्पाचें वर्तमान तरी. छ. २६ साबानचे पत्रच आलें होतें. अलीकडे ह्या कालपर्यंत आलें नाहीं. विदित होय. हे विज्ञापना. छ. ८ रमजान प्रहर दिवस. पैवस्त मुकाम सासवड पत्र आलें. छ. २६ रमजान.

**बातमीदाराचे पत्र**

No. 34 20-12-1737 A.D.

News of the fight between the Peshwa and the Nawab near Bhopal. Malharji, Ranoji Shinde and Pilajee Jadhav are present. The Nawab's corn is set on fire wherever he goes.

---

**अ. नं. ३५** **श्री**

शिलालेख, इ. स. १७३७ श्री जेजुरी

(शिलालेख नं. १ दक्षिणेकडीलबाजू श्री गणपती जवळील.)

१ श्री शके १६५९ पिंगल

२ नामा संवत्सरे श्री मा -

३ र्तंड भैरव चरणीं त -
४ त्पर खंडोजी सुत म -
५ ल्हारजी होळकर -

---

अ. नं. ३६

**श्री**

शिलालेख नंबर २, इ. स. १७४२

(पश्चिमबाजू तटाची श्री म्हाळसाशिलेजवळील.)

१ श्री शके १६६४ दुंदु -
१ भिनाम संवछरे.
१ श्री मार्तंड भैरव -
१ चरणीं खंडोजी सु -
१ त मल्हारजी होळकर

---

अ. नं. ३७

**श्री**

शिलालेख नं. ३, इ. स. १७५१

(पश्चिम दरवाज्याजवळील कोपऱ्यात)

१ श्री मार्तंड ................
२ शके १६७३....
३ ............खंडो -
४ जी सुत मल्हार -
५ जी होळकर

---

अ. नं. ३८

**श्री**

शिलालेख नं. ४, इ. स. १७५६

(उत्तरेकडील नगारखान्याशेजारचा)

१ श्री शके १६७८ धातृ
२ नाम संवत्सर श्री मा -

३ मार्तंड भैरव चरणीं
४ खंडोजी सुत मल्हा_
५ रजी होळकर निरंतर

Nos. 35-38 (both inclusive)

Inscriptions on the walls of the temple of Shree Martand at Jejuri. in 1737, 1742, 1751 and 1756 A.D., all in the name of Subhedar Malharrao Holkar.

---

**अ. नं. ३९** **श्री**

शके १६५९, ३१ मे १७३८

हिशेब येणे निस्बत राजश्री मल्हारजी होळकर. लेकाचे लग्नांत खर्च गुजारत राजश्री खासा सुभेदार सुरू सन समान सलासेन मयावअलफ. इस्तकबील ३० तागाइत छ ८ माहे सफर मुकाम कुरवाई.

रुपये.

३१३-४-० कडें सोन्याचें नवरीकडे. गंगाजी सोनार गुजारत देवाजी यशवंतबद्दल चिठ्ठी रास १ एकूण वजन मोहरा भार २३ मासे ७६ रू ३१३-४-०

१०६०-०-० मोहरा गुजारत संभुपगडा अफराद सुभेदार. रास ८० दर १२

५६९-१२-० रू. नवरीकडे नगास रू. देवाजी यशवंतबद्दल चिठ्ठी १९ मोहरम.

३३ छ. २ सफर

१३ छ. ३ सफर

.......

४६ दर रु. १३। प्रमाणें

२५१-१२-० छ. ८ सफर मााो किरकोळ खर्च बद्दल चिठ्ठ्या

१९ मोहरम

९ वरदक्षिणा, उपाध्ये व सुवर्णाभिषेक सखंभट

६ पत्रिका लेखन व प्रतिमा, कुशंभट

२ गणपती पूजनास सखंभट

२ नवरीकडील उपाध्ये

.....

१९ दर १३-६-९

२३८-८-०  ऐरणी पूजनास वगैरे गणपती पूजन मोहरा. दर १ शें.

..............

१०६०

..............

१३७३-४-०

सदरहू रू. १३७३ राजश्री पिलाजी जाधवराव यांचे देणें असे. सुरू सन समान छ. २२ सफर. शके १६६० कालयुक्त नाम संवत्सरे ज्येष्ठ वद्य १० दसऱ्याकारणें सदरहू ऐवज पावता करूं. याखेरीज सखोजी सावता बरोबर रुपये २०० अक्षरी दोनशें समजाविशींत गोऊन देऊं.

No. 39 31-5-1738 A.D.

Account of the expenditure incurred by Subhedar Malharji Holkar in the marriage of his son on the 10th day of Jestha, Shak 1659.

---

**अ. नं. ४०** **श्री**

इ. स. १७३७-३८

हिशेब महाल झाडा निस्बत राजश्री मल्हारजी होळकर सुरू सन समान सलसीन मयावअलफ.

| | महाल | आकार बेरीज |
|---|---|---|
| २३ | आकारले | ७१८९५४ |
| ७।। | मोघम | |

.............

३०।।

खेरीज मोकासी महाल

१४३८०४ प्रांत इंदूर

६५००० प्रांत देवळे

१५०००० प्रांत देपाळपूर

७५००० प्रांत रामपूरा

............

४३३८०४

मोकासाकडे व सरकारात सामलांत

| नाव परगणे | ऐन | मोकासी | मोगलाईबाब |
|---|---|---|---|
| परगणे बुढे | ५०००० | २५००० | २५००० |
| परगणे तराणे | ४३००० | १३००० | ३०००० |
| परगणे पिढावे | ३५००० | १०००० | २५००० |
| परगणे जावरा | २३००० | ११००० | १२००० |
| परगणे सावेर | १५००० | २००० | १३००० |
| परगणे पिंपलोद | ९००० | २००० | ७००० |
| परगणे बरडावदा | ६००० | ३००० | ३००० |
| परगणे करहाई | ५००० | २००० | ३००० |
| परगणे महेश्वर | ५५०० | ३००० | २५०० |
| '' (नांव लागणें) | ९००० | ४५०० | ४५०० |
| | ............. | ............. | ............. |
| | २००५०० | ७५५०० | १२५००० |

निखालस मोकासाकडे

| आकार बेरीज | | | मोघम महाल |
|---|---|---|---|
| ४०००० | पाटण, विठुजी बुळे १ | ४।। | विठुजी बुळे |
| २१००० | महतपूर, संताजी वाघ १ | | १ झाबवे |
| | | | ।। कोठडे (चिखलदे) |
| १००० | बेटमे, मावजी वाघ. | | १ लवाणी |
| | | | १ पिंपळोद (तळेटी) |
| ८०० | उदाजी लांबहाते, आंबे १ | | १ हिंडोले (निमखेडा) |
| ४३५० | शिवाजी शंकर, खेराबाद व बकाणी २ | | ..... |
| ६००० | डोंगरपूर, मावजी चितालकर | | ४।। |
| २५०० | हासलपूर व संधारा. म्हसके, तुकोजी वगैरे व केरोजी कापडे | | १ खंडोजी कडू, काटकूट |
| | | | १ रामचंद्रबाबा, कायथे |
| | | | १ लांभाते, जिरापूर, माचलपूर |
| .................. | | ........ | |
| ८४६५० | | ७ ।। | |

महाल सुमारे नऊ ९

| तपशील महाल सुमारी | | एकूण रुपये | मोकासी | ऐन सरकार. |
|---|---|---|---|---|
| खेरीज जमा खालसा महाल | ४ | ४३३८०४ | ० | ४३३८०४ |
| सामिलांत | १० | २००५०० | ७५५०० | १२५०० |
| निकालस मोकासे | ९ | ८४६५० | ८४६५० | ० |
| | ..... | .......... | .......... | ............ |
| | २३ | ७१८९५४ | १६०१५० | ५५८८०४ |
| मोघम महाल | ७।। | ० | ० | ० |
| मोकाशाकडे | ..... | | | |
| | ३०।। | | | |

तपशील. मोकासदार येकंदर — मोघम.

४०००० विठूजी बुळे, परगणे पाटणवसूली

१ परगणे झाबवा
।। कोठडेनिमे
१ परगणे लवाणी
१ ,, पिंपलोद
१ ,, हिंदोले
.....
४।।

२६००० संताजी वाघ, महतपूर २१०००, प्र. पिढावे ५०००
२०००० भोजराव बारगळ, बुढे १५००० व प्र. पिढावे ५०००
१०००० मावजी वाघ, प्राो बेटमे
६००० मालजी चितालकर, डोंगरपूर
११००० गंगाजी भागवत, प्राो जावरा
२००० कासीबा बेरहडा, प्र. आ. सावेर
१०००० खंडोजी ढमढेरे, बुढेपैकीं
२००० महादोबा पुरंधरे, पिंपळोदपैकीं
३००० भानजी कदम, प्र. बरडावद
२००० केरोजी शितोळे, प्र. करहईपैकीं
३००० संभाजी भागवत व सोनजी भागवत, प्र. महेश्वरपैकीं
४५०० नारो शंकर
२५०० हासलपूर व संधारा. तुकोजी म्हसके, केरोजी कापडी वगैरे
४३५० रायाजी बिंगले दिमत शिवाजी शंकर

८०० उदाजी लाबांते, प्र. आंबे

१३००० किता आसामी तराणेपैकीं. हरजी चितालकर ५०००, मल्हारजी ३००० संभाजी पिंगळे. रूपाजी ३००० व वाघोजी होळकर. रामचंद्र बाबा २०००

.......................

१६०१५०

४॥

मोघम महाल खंडोजी कडू ३

...........

७॥

शिवाय सरकार ऐवज ऐन. खेरीज मोकासी व सामलातपैकीं.

४३३८०४ १२५०००

एकूण ......................................

५५८८०४

**पेशवे रेकॉर्ड नं. १०८**

No. 40 1737-1738 A.D.

Account-sheet of Subhedar Malharji's Mahals.

---

**अ. नं. ४१**

## श्री मोरया

ता. १०-३-१७३८

राजश्री रामाजीपंत गोसावी यांस. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती सुरूसन समानसलासीन मयावअलफ. सालमजकूरीं तुमच्या पागेच्या सरंजामास बेगमी परगणे बरडावद वजा बाबतीत सरदेशमुखी करून बाकी ऐवज निमे निम तुम्हांकडे मोकासा दिला असे. आकाराप्रमाणें ऐवज घेऊन जमावाढखर्च करणें जाणिजे. चंद्र २९ जिल्काद हे विनंती. करार मोर्तबसुद.

श्री म्हाळसाकांत चरणीं
तत्पर खंडोजी सुत
मल्हारजी होळकर

**पळसी दप्तर**

No. 41 10-3-1738 A.D.

Grant of half the Mokasa of Pargana Bardawad to Ramaji pant (Palshikar) for the maintenance of his Paga; the grant is by Malharji Holkar.

---

अ. नं. ४२ श्री

ता. २२ जून, इ. स. १७३८

राजश्री राव तेजकर्ण मंडलोई व कुंवर न्याहलकर्ण यांसी मल्हारजी होळकर दंडवत सुरू सन तिसासलासीन मयावआलफ तुम्ही पत्र पाठविलें ते प्रविष्ट झालें. लिहिलें वर्तमान विदित झालें. परगणे मजकूरचा वसूल दीड लक्ष केला म्हणून मजकूर लिहिला तरी अखेर साल होऊन गेले. आजींपावेतों झाडा वसुलाचा केला नाही, हे कोण गोष्ट ? आमचा मामला ओढीचा. देखील कर्जाचा ऐवज निळोबाबद्दल वगैरे कुल ऐवज राजश्री त्रिंबक विनायक यांजकडे पावता करून त्यांचे उत्तर तसेच आम्हांकडे पाठविणें. तुम्हांकडील कित्येक वर्तमान लछीराम यांनीं सविस्तर सांगितलें. ते साद्यंत कळों आलें. जो कोणी विचारे वर्तेल त्याची गोष्ट सहजच पार पडेल आणि बेइमानीस जो कोणी येईल त्याची सहजच खैर राहणार नाहीं. हें तुम्हांस कळतच आहे. त्यांस या उपरि तुम्ही बाकी न ठेवणें. कराराप्रमाणें ऐवज झाडून वसूल दिल्याने तुम्हांस उत्तम आहे आणि ऐसी सचोटी राखल्यानें सहजच मेहरबानी होईल. जाणिजे. छ. ५ रविलावल.

No. 42 22-6-1738 A.D.

Malharji Holkar presses Tejkarna Mandloi and kunwar Nyhalkarna for payment of revenue and debt immediately. The Revenue of the Pargana has risen to a lac and a half.

---

अ. नं. ४३ श्री

अंदाजे इ. स. १७३९

राजश्री अप्पासाहेबांचे सेवेसीं श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर कृतानेक दंडवत विज्ञापना येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. यानंतर राजश्री रामाजी यादव (पळसीकर) आपणांकडे आहेत त्यास हे सर्व प्रकारे आमचे मायेचे आहेत. एकनिष्ठतेनें सेवा करावयास

अन्तर करीत नाहींत. त्यास यांचे चालविणें उर्जित करावें हें आमचे चित्ती हेतुपुरःसर आहे. परंतु सांप्रत आम्ही कर्जदार जाहलो त्याजमुळें हे आमचे मायेचे म्हणून हेही कर्जदार आपले शक्तिहून विशेष जाहले हे परस्परें साहेबांचे सेवेसीं विदितच आहे. त्यास मशारनिल्हेचा आम्हांस आगत्यवाद चालविणें आहे ह्या गोष्टीवर स्वामींनीं दृष्ट देऊन हरएकविशीं आश्वासन यांसी दिले पाहिजे. हे कित्येक आपले नातवानीचें व कार्यभागाचें वर्तमान विदित करतील तदनरूप चित्तीं धरून अभय दिले पाहिजे सेवेसी श्रुत होय हे. विज्ञापना. मोर्तब.

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं<br>तत्पर खंडोजी सुत<br>मल्हारजी होळकर |

No. 43 (about) 1739 A.D.

Subhedar Malharji Holkar entreats Chimnaji Appa (brother of Peshwa Bajirao 1) to promote the interests and welfare of Ramajee Yadav (Palshikar) who has served the Subhedar hard and honestly.

---

**अ. नं. ४४** **श्री**

छत्रपती :

राजश्री राघो हरी गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणें विशेष. श्रीमंत महाराज राजश्री स्वामी यांनीं राजश्री रामाजी यादव यांसी मौजे पळसी व मौजे मांडवे बुद्रुक प्रगणे पारनेर येथील मोकासा दरोबस्त नूतन इनाम करून दिले. त्यास तुम्ही मौजे मजकुरास ताकीद करून मोकासा बाबेचा अंमल दरोबस्त सुरळीत देवणें जाणिजे छ. ९ रजब. देवावें. मोर्तबसुद.

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>खंडोजी सुत मल्हारजी होळकर |

**पळसी दप्तर**

No. 44

Subhedar Malharji Holkar writes to Ragho Hari that the latter should give every possible help to Ramaji Yadav in securing the Mokasa rights granted Inam in Palsi and Mandwe by the Chhatrapati.

---

अ. नं. ४५

**श्री**

आश्विन शुद्ध १३, शके १६६१, ता. ३-१०-१७३९

श्री म्हळसाकांत चरणीं तत्पर
खंडोजी सुत मल्हारजी होळकर

राजश्री बापूजी महादेव व दामोदर महादेव गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष तुम्ही पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन अर्थ विदित झाला. नवाब मनसूर अलीखान यांजला वजिरीची वस्रें व सादतखान याजला बक्षीगिरीची वस्रें झालीं. आणखी कित्येक दुराणियाकडील वगैरे वर्तमान लिहिले तें अक्षरशः ध्यानांत आलें. पूर्वी मुजरद कासीदजोड्या पाठविल्या त्याचें उत्तर न आले. सांप्रत पत्र पावून वृत्तांत कळो आला. ऐसेच वरचेवर तेथील अमीराचे व पठाणाकडील सविस्तरें लिहून पाठवीत जाणें. आळस न करणें. इकडील वर्तमान तरी ईश्वरसिंग याची बुद्धी क्षणभंगूर-निखालसता नाही. आम्हांस तो कार्य करून घेणें. मुकाम तेरा कोस येथून. तेही फौजेची तयारी करितात. बाहेर निघाल्यावरी त्याचे मनोरथ भग्न करून खावंदाचे प्रतापेंकरून आपले कार्य करून घेतले जाईल. चिंता नाही. तुम्ही तेथल्या खबरीस पाठवावयाचा आळस न करणें. श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामी माळवे प्रांतें जाऊन धारेपासी मुकाम झाले. त्यांसी राजश्री यशवंतराव पवार येऊन धार, सोनगड, दोन्ही स्थळें श्रीमंत स्वामीकडे देऊन कृपा संपादन केली. धार सोनगड बंदोबस्त करून श्रीमंत देशास गेले. ऐसें वर्तमान आलें आहे. राजश्री जयाजी शिंदे व राजश्री रामचंद्रबाबा उज्जेनीस छावणीस राहिले, ऐसें वर्तमान आहे. तत्त्वतां पत्र आलिया लिहून पाठवून दिल्लीतील सार्वभौमाचें व सामादिकांचे वर्तमान मनसबा लिहावयासी अंतर केले न पाहिजे. आम्हीही येथें उपराळियासीं आहो. उत्तर पाठवीत जाणें. छ रजब बहुत काय लिहिणें? हे विनंती मोर्तबसुद.

No. 45 3-10-1739 A.D.

Exchange of news between Subhedar Malharrao Holkar and Hingane brothers of Delhi.

---

अ. नं. ४६

**श्री**

कार्तिक वद्य ५, शके १६६१, ता. ९-११-१७३९

शके १६६१ सिद्धार्थि नाम संवत्सरे कार्तिक वद्य ५ ते दिवशीं वेदमूर्ती राजश्री

महादेवभट वल्द गोविंदभट हिंगणे साकिन नाशिक यांसी मल्हारजी वल्द खंडोजी पाटील होळकर मोकदमनिमे व रतनभाऊ पाटील व सटबाजी पाटील मोकदमनिमे मौजे आडगांव प्रगणे गुलशनाबाद सरकार संगमनेर सन ११४९ इनामपत्र लिहून दिलें. तुम्ही गोदातीरीं अग्निहोत्री, थोर ब्राह्मण, सर्वांस पूज्य, जाणोन इनाम जमीन बिघे ३०, बागाईत बिघे १० व जिराईत बिघे १०, इतर बिघे १०, इनामजमीन व घर बांधणें व गोदातीरीं शुभचिंतन करीत जाणें. कोणी मुजाहिम करणार नाही जमिनीचे उत्पन्न खात जाणें.

No. 46 9-11-1739 A.D.

Malharji son of Khandoji Patil Holkar Mokadam of Mouza Adgaon grants Inam land for garden, field and housed building to Mahadeo Bhatt Hingane to pray for his welfare, on the banks of the Godavari river.

---

**अ. नं. ४७** **श्री**

ता. १९-५-१७४०
मिती ज्येष्ठ शुद्ध ५,
शालिवाहन शके १६६२ रौद्र नाम संवत्सरे

श्री गणेशायनमः श्री मद्विक्रमवत्सरेषु, विगतं द्विपैकसत्यग्रहं प्रामोदे नृप शालिवाहन शके सत्वैकनेवंबटः ।। रौद्राव्हेसित जेष्ठ पंचमी शशीवारेषु पुष्ये धृवेः मल्हारीवरनामेनरचिंत दिव्यशिवस्यालयं ।।१।। श्री शाहू नृप छत्रचामरपतिः सिंव्हासने संस्थित बाजीराव प्रधान तस्य सततं तत्सेवको धार्मिकः श्री मद्दोलकरोप नाम विजयी खंडोजी पुत्रोमहान्मलारिः परमेश्वरस्य निलयं पौरे तराणे करोत ।।२।। तराणाभिदग्राम पूर्वे सदास्या स्वयंभुः शिवः प्राणिकार्योद्यतश्च अहोखंडुपुत्रेण मल्लारिनम्नमकृतं चालयं देवदेवस्यतने ।।३।। श्री विक्रमातीत संवत् १७९७ प्रमोदनाम संवत्सरे तथा शालिवाहन शके १६६२ रौद्रानाम संवत्सरे.

श्री तिलभांडेश्वर चरणीं तत्पर खंडोजी सुत मल्हारजी होळकर निरंतर.

No. 47 19-5-1740 A.D.

Shree Til Bhandeshwar temple of Tarana was built by Subhedar Malharrao Holkar.

---

अ. नं. ४८ **श्री**

आषाढ वद्य ९, शके १६६२, ता.६-७-१७४०

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर खंडोजी सुत मल्हारराव होळकर |
|---|

वेदमूर्ती राजश्री महादेव भट हिंगणे गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर कृतानेक दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहिणें-विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावोन भावगर्भ ध्यानास आला. दिल्लीकडील मजकूर लिहिला कीं, निजामानीं बहुतसा उपद्व्याप मांडून अजीमुल्लाखानास माळव्याची सुभेदारी सांगून वस्त्रें देऊन रवाना केले आहेत. बरोबरी फौज पंधरा हजार कुल आहे. डेरियासी दाखल जाले. पुढें चालणार. असे कित्येक प्रकारें सविस्तरें अर्थ लिहिला तो कळूं आला. ऐशास पूर्वी जे जे आले, त्यांनीं पराक्रम केला, तोही तुम्हांस दखल आहेच, ज्यांनीं इतका उपद्व्याप केला, त्यांनीं पराक्रम केला, तोही तुम्हास पूर्ण श्रुत आहेच आणि देखिलेही आहे. प्रस्तुत अजीमुल्लाखान येणार त्यास माळव्या प्रांतीं छावणी असती तर या दिवसांत ते नांव इकडे यावयाचे न घेते. तथापि आम्ही देशास आलों म्हणून काय जालें? याउपरि सेनासह-वर्तमान त्या प्रांतीं सत्वरीच येऊन अविंधास बरेवजेनें नतिजा पाविला जाईल आणि कोणी लबाडी करतील तेही आपल्या गुणेंच फजीत पावतील. चिंता काय आहे ? श्रीमंत राजश्री आप्पास्वामी व ते ऐसे उभयतां सातारियांतच आहेत. तेथून सत्वरच पुणियासी येतील. कळलें पाहिजे. रवाना छ २२ रविलाखर बहुत काय लिहिणें हे विनंती. हेच पत्रीं सेवक. गंगाधर यशवंत व रामाजी यादव यांचे साष्टांग नमस्कार. मोर्तबसुद.

No. 48 6-7-1740 A.D.

Bold and forcible reply of Subhedar Malharji to Mahadeo Bhat Hingne's letter of intelligence from Delhi. re : Nizam's doings and upsettings. News of Nanasahib's appointment as Peshwa from Malharji Holkar.

---

अ. नं. ४९ **श्री**

ता. ५-१०-१७४०

राजश्री कमाविसदार प्रगणे कोटे. गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य. स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती सुरू सन इहिदेअर्बेनमयाअलफ. परगणे मजकूरची सालमजकूरची मजमू (मुजुमदारी) राजश्री त्रिंबक मुकुंद यांजकडे सांगितली असे.

मशारनिल्हेच्या हातून लिहिण्याचें प्रयोजन घेऊन वेतन रुपये ४०० चारशें करार केले असे. ते परगणे मजकूरपैकीं पावते करणें मुजरा असेत. जाणिजे चंद्र २४ रज्जब बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>खंडोजी सुत मल्हारजी होळकर | बार. |
|---|---|

**पळसी रेकॉर्ड**

No. 49 5-10-1740 A.D.

Grant of Muzumdari in Kota Pargana by Malharji Holkar to Trimbak Mukund on a salary of Rupees Four Hundred.

---

अ. नं. ५०

## श्री मोरया

ता.२१-१०-१७४०

वाटणी मुक्काम पुणें सरकार राजश्री मल्हारजी होळकर सुरू इसवी सन इहिदेअर्बेनमयावअलफ.

साक्ष.
१ राघो लक्ष्मण.

निस्बत गंगाधर यशवंत.

१ पोते जामदारखानियाचे चिठ्ठीवरील तारीख. कारखाने २

१ शिल्लकबंद पोते व जामखानियांच्या नक्त कापडाच्या चिठ्ठीप्रमाणे कीर्द कापडाची पट्टी धरावी तिकडील दाखल्यांनीं उभयतांनीं धरावी.

कलम

१ फडचे लिहिणे रोजकीर्द कुलबाबजदी जमासूदगी व कर्जखताचे हिशेब व्याज फैलावणी सनदीकलम रुजूनिशाण त्यांनीं करून अवर्जा बार करून, बार जाहल्यावर, त्यांनीं फिरोन द्यावी. त्यांजकडे कीर्द गरज

निस्बत रामाजी यादव.

१ पोते व जामदारखानियाची चिठ्ठीखेरीज कारखाने २ तारीख

१ पोते जामदारखान्यावर कारकून शिल्लकबंद नक्त व कापडाच्या चिठ्ठीप्रमाणें धरावा. कापडाची पटी तिकडील दाखल्यांनी उभयतांनीं धरावी.

कलम

१ दप्तर फरडा रोजकीर्द घडेल तिजवर निशाणरुजु यांनीं करून दफतरी अवर्जा आणून बार करावी. रोज सायंकाळीं रुजु करोन फडचे कारकुनापाशीं द्यावी. अवर्जा ठेवायची

| | |
|---|---|
| गरज नाही. इकडे अवर्जा राखावयाची नाही. | इकडे राखावा-तिकडे राखावयाची नाही. |
| १ सनदी महाल वगैरे कागज देखील कुलबाब वगैरे देखील कारखानेजात तारीखसुद्धा कलम इकडे-तिकडे फक्त रुजुबार करावे. | १ सनदी महाल वगैरे कागद देखील कुलबाब सनदी कागद कारखानेजात तारीखसुद्धां तिकडे लिहावे-फक्त रुजु व बार इकडे करावे. |
| १ महालचे हिशेब कितेब वगैरे येतील ते उभयतांनीं समजून घेऊन तिकडे रुजुनिशाण करून इकडे घेऊन कीर्द घालून दप्तरी बार करून कीर्दीस इकडे यांनीं ठेवावे. | १ महालचे हिशेबकितेब येतील ते उभयतांनीं समजून घेऊन इकडे रुजु-निशान करून कीर्दीकडे दाखला करून दप्तरी बार करून कीर्दीकडे द्यावे. |
| १ चिटणिसीच्या कागदावर उभयतांनीं निशाण करावे. | १ चिटणिशीच्या कागदावर उभयतांनीं निशाण करावे. |
| १ पोते जामदारखान्याच्या शिल्लकबंद उभयतांनीं रुजुवात करून धन्यास समजवावा. | १ पोते जमादारखान्याचा शिल्लकबंद उभयतांनीं रुजु करून धन्यास समजवावा. |
| १ हिशेबकितेब रोजकीर्द वगैरे होतील ते उभयतांनीं धन्यास समजवावे. | १ हिशेबकितेब रोजकीर्द होतील ते उभयतांनीं धन्यास समजवावे. |
| १ लिहिणार कलम. | १ लिहिणार कलम. |
| १ रामाजी गंगाधर १ त्रिंबक विनायक व | १ एसो देवजी, १ बालाजी नरसी |
| १ रावजी महादेव. | १ चिमणाजी दादाजी. |
| ... | ... |
| ९ | ९ |

एकूण कलमें अठरा तहनामा कार्तिक शुद्ध १३ सहाजण कारकुनांनीं उभयतांचे आज्ञेंत चालावे. हस्ताक्षर रामाजी गंगाधर.

गंगाधर यशवंत. रामाजी यादव.

No. 50 21-10-1740 A.D.

Distribution of Office-work between Gangadhar Yeshwant (Chandrachud) and Ramaji Yadav (Palshikar) in the Court of Sarkar Malharji Holkar, as decided at Poona. The distribution indicates the growth of the territory and power which Subhedar (now Sarkar) Malharrao had attained in the year 1740 A.D.

---

**अ. नं. ५१** **श्री**

ता. १६ नोव्हेंबर, इसवी सन १७४०

राजश्री कमाविसदार वर्तमानभावी परगणे इंदूर गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य : स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुरू सन इहिदेअर्बेन मयावअलफ. शके १६६२ श्री मारुती खेडापती कस्ब्यांतील यांची पूजा अविंधराज्य झाल्यावरून मुरादशहा फकीर करीत होता. अलीकडे हिंदुराज्य झाल्यावरून परगणे मजकूरचे मामलेदार व जमीदार वगैरे यानीं जाहीर केलें. आपले देवतांची पूजा अविंध करितो हे आपल्या राज्यास चांगलें नाहीं. त्याजवरून सर्वांचे अनुमतें फकीरास राजीकरून या निमित्य तीन बिघे वाडा देऊन पूजा बंद करून सरकारांतून पूजा कृष्णभक्त, महंत बैरागी रुपदासबाबा सांप्रदाय निजानंदी निर्वाणी सत्पात्र पाहून यांजकडेस सांगून हे सनद तुम्हांस सादर केली असे. तरी बाबा यांचे शिष्यपरंपरा श्रीजीचे पूजेचे काम यांचे हातें घेत जाऊन पुनः पत्राचा हरएकविसीं आक्षेप न घेतां याची नक्कल लिहून घेऊन अस्सल पत्र महंतबाबास भोगवटियास परतोन देणें. जाणिजे. छ.७ रमजान बहुत काय लिहिणें.

मोर्तबसुद.

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>खंडोजी सुत मल्हारजी होळकर |

**चॅरिटेबल फाईल नं. ३५ वरून**

No. 51 16-11-1740 A.D.

Subhedar Malharji's grant of Sanad to Rupdas Baba Nijanandi for the worship of Khedapati of Kasba Indore, after the removal of Muradshah Fakir from the post, with the consent of the Mamledar and Jamedar. The Fakir is also provided for, by grant of house and land.

---

**अ. नं. ५२** **श्री**

ता. २-१२-१७४१

राजश्री रामाजी यादव गोसावी यांस. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य : स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती सुरू सन इसन्नेअर्बेनमयावअलफ तुमच्या पागेच्या बेगमीस सरंजाम पेशजीप्रमाणें बी तपशील :

१ परगणे बरडावद प्रांत माळवा कुलबाब कुलकानून आकार पैकीं निम्मेमोगलाई व बाबतीसरदेशमुखी वसूल आकाराप्रमाणें.

१ मौजे भटगांव परगणे उत्राण प्रांत खानदेश पेशजी प्रमाणें मोकासा करार.

श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर
खंडोजीसुत मल्हारजी होळकर

सदरहू प्रमाणें साल मजकूरीं करार केले असे. आकाराप्रमाणें ऐवज घेऊन पागेच्या सरंजामास खर्च करणे जाणिजे चंद्र ४ सवाल बहुत काय लिहिणें हे विनंती. रूजु मोर्तबसुद बार.

**पळसी दप्तर**

No. 52 2-12-1741 A.D.

Subhedar Malharji Holkar sanctions Bardawad Pargana and the village of Bhatgaon for the maintenance of Paga to Ramaji Yadav (Palshikar).

---

**अ. नं. ५३** **श्री**

ता. २-१२-१७४१

श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर
खंडोजीसुत मल्हारजी होळकर

राजश्री एसाजी त्रिंबक कमाविसदार परगणे सेंधवे गोसावी यांस. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर रामराम सुरू सन इसन्ने अर्बेनमयावअलफ प्रगणे मजकूरपैकीं देह मुकासा.

१ राजश्री गंगाधर यशवंत मौजे डोंगरगांव
१ राजश्री रामाजी यादव मौजे केळण
.....
२

सदरहू दोन्ही गांव उभयतांकडे मोकासा सरकार तर्फेनें सांगितला असे यांचे तर्फेचे, देह मजकूरीं येतील ते अंमल करतील जाणिजे. चंद्र सव्वाल बहुत काय लिहिणें. रूजु मोर्तबसुद बार.

**पळसी रेकॉर्ड**

No. 53 2-12-1741 A.D.

Subhedar Malharji Holkar allots Mokasa of Dongargaon to Gangadhar Yeshwant and of Kelan to Ramaji Yadav in the Sendhwa Pargana.

---

**अ. नं. ५४** **श्री**

ता. २६ मार्च, इ. स. १७४२

मिर्झा आदिलबेग व गोविंद संभाजी कमाविसदार प्रांत इंदूर गोसावी यांसी. अजदिल मल्हारजी होळकर बादज. सुरू सन इहिदेआर्बेन मयावअलफ. राजश्री तेजकर्ण मंडलोई प्रांत मजकूर यांसी सनद अलाहिदा दिली आहे तेणेंप्रमाणें सालमजकुरीं अव्वल सालपासून दामी दस्तुरी हिस्सा शिरस्त्याप्रमाणें होईल तो ऐवज गांवाकडून ताकीद करून पाठविणें व इनामी पांच गांव तेथील सालमजकूरचा वसूल तुम्हांकडे आला असेल त्याचा हिशेब निम्मे तुम्ही घेणें आणि निम्मे यांजकडे देणें व यांची शेते जिरायतीचीं तेथील माल तुम्हाकडे आला असेल तो तुम्हांस ठेवणें असेल तों घेणें. नाहीतर यांचा यांजकडे देणें. तुम्ही घ्याल त्याचा ऐवज यांसी मुजरा देणें. सायर चौत्रा, जमीदारी दस्तूर जो वसूल आला असेल तोही मुजरा देणें. छत्तरमल याची बायको व पुत्र दोघे सोडून देणें. वरकड बंदवे मंडलोई यांकडील त्यांचे हवाले करणें. जाणिजे. छ. ३० मोहरम.

No. 54 26-3-1742 A.D.

Malharji Holkar orders the Kamavisdars of Indore to release the territory etc. granted to Tejkarna Mandloi by this Sanad. His slaves (serfs) also should be returned to him.

---

**अ. नं. ५५** **श्री**

ता. ८ एप्रिल, इसवी सन १७४२

मिर्झा आदिलबेग व राजश्री गोविंदराव यांसी. अजदिल भोजराज बारगळ बादज अनुक्रमें दंडवत. मंडलोई तेजकर्ण यांच्या कामाचा फैसला झाला. पैक्याचीही वाटी झाली. त्यांची पत्रें यजमानांचीं तुम्हांस आहेत. त्यांजवरून विदित होईल. यानंतर यांचे दामीदस्तूरीचे जें कांहीं पूर्वापार चालत आलें आहे त्याजप्रमाणें सरकारांतून सनद यांसी झाली आहे व आपणासही यांचेविसीं पत्रें यजमानांची आहेत. ऐसियासी आपण यांचे

कांहीं चित्तामधें दुसरा विचार न धरणें. हरएक गोष्टीनें यांचा गौर करणें. पूर्वील स्मरण धरणें. यांजवर दुसरा विचार न करणें. त्यांनीं केलें त्याचे फल ते पावले. अतःपर हे आपणाशिवाय कांहीं नाहीं. तर यांजवर मायादया करून सरकारची चाकरी हे करतील. सरकार नुकसान न होतां आणि या ब्राह्मणाचा कालक्षेप उत्तम प्रकारें चालेल ते केले पाहिजे. यजमानाच्या पत्राप्रमाणें कार्यभाग करणे. रा छ. ३ सफर जादा काय लिहिणें. मोर्तबसुद.

| श्रीकृष्ण चरणीं तत्पर शिवजी सुत भोजराज बारगळ |
|---|

या टिप्पणांत भोजराजांचे वडिलांचे नांव 'साबाजी' असें दिलेलें आहे.

No. 55 8-4-1742 A.D.

Bhojraj Bargal (on behalf of Subhedar Malharji) writes to the Kamavisdars of Indore to follow the way of "Forget and Forgive" in the case of Mandloi Tejkarna whose case has been finally decided by the Subhedar.

---

**अ. नं. ५६** **श्री**

ता. २७-६-१७४२

(अबस्ट्रयाक्ट) चंद्र. जमादिलावल ११४३

मल्हारजींचे चित्तांत कीं, मशीद श्री विश्वेश्वराची ज्ञानवापीजवळी ते पाडून देवालय करावें. सर्वांचे चित्तास येत नाहीं. ब्राह्मण चिंता करितात, दुर्दशा होईल म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 56 27-6-1742 A.D.

Malharji's intention to erect a temple in the place of Masjid near the Vishweshwar temple. Opposition of the Bramhins through fear.

---

**अ. नं. ५७** **श्री**

ता. १४-९-१७४२

राजश्री रामाजी यादव गोसावी यांस. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित

मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि. तुम्ही आमची सेवा करीत आहां त्यास इस्तकबील पासून आजपावेतों तुमचा हिशेब घेतला त्यास हिशेबासंबंधीं तुम्हांकडे रुपये निघाले. ते मुकरर केले रुपये ३०००० तीस हजार आणि तुम्हास फारकती लिहून दिली. याजवर आमचें लिगाड तुमचेकडे राहिलें नाहीं. तुमचे निस्बतीचा हिशेब भरून पावलो. पुढें एकनिष्ठेनें चाकरी करून ऊर्जित करून घेणें. कळलें पाहिजे चंद्र २५ रजब सुरू सन सलासअर्बेन-मयाबअलफ. शालिवाहन शके १६६४ दुंदुभीनाम संवत्सरे विक्रम संवत् १७९९ बहुत काय लिहिणें हे विनंती.

**पळसी रेकॉर्ड**

No. 57 14-9-1742 A.D.

Malharji Holkar passes a note of full receipt of Rupees Thirty thousand due from Ramaji Yadav (Palshikar) and exhorts him to serve faithfully to achieve greater fortune.

---

**अ. नं. ५८** **श्री**

ता. २-११-१७४२

शिक्का

आज सुभा राजश्री मल्हारजी होळकर ताा मोकदम मौजे केळणी प्रगणे सेंधवे सुरू सन इसन्ने आर्बेनमयावअलफ मौजे मजकूर सरकार तर्फेने मोकासा राजश्री रामाजी यादव यांजकडे दिला असे. मशारनिल्हेच्या तर्फेचे जे कोणी येतील त्यांसी रुजु होऊन अमल देणें. जाणिजे. चंद्र ४ सवाल रुजु मोर्तबसुद.

**पळसी रेकॉर्ड**

No. 58 2-11-1742 A.D.

Subhedar Malharji Holkar grants Mokasa of Mauja Kelanee to Ramaji Yadav (Palshikar)- His representatives should be given every assistance and co-operation by the local officers.

---

अ. नं. ५९ **श्री**

ता. ७-१-१७४३

(शिक्का)

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर खंडोजी<br>सुत मल्हारजी होळकर निरंतर |

मशनल अनाम चतुरभुजदास कानगो सायर इंदोर स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुरू सन सलासअबनमयावअलफ. सालगुदस्तंसालीं पत्र पाठविले. त्याप्रमाणें तुमचा राहण्याचा वाडा खान नदीतीरीं होता तो तुम्ही कचेरीकरितां सरकारांत देऊन आपली बिरादरीसह सरकार वाड्याजवळ जागा बांधून राहू लागले. कसब्यांत वस्ती व्हावी या उपदेशानीं उज्जेनी वगैरे ठिकाणें जाऊन पन्नास सावकारांची घरें आणून आबादी केली आणि जास्त करण्याची मनशा आहे, असें मिरजा आदिलबेग व नारो शंकर यांनीं पुणें मुक्कामीं विदित केलें. त्यास मोठी खुशी होऊन आनंद झाला. आपले घराण्याचें असेंच काम आहे. हें शहर वसाहत झाल्यास त्यापासून आपली आमदनी वाढून निरंतरकरितां कायम राहील असें वारंवार मनांत आणोन सावकारांची भरती करा. यात तुमचें कल्याण असोन सरकारांत आमदानी होईल व यामुळें तुम्ही शोभेसी याल. जे सावकार येतील त्यांची उत्तम प्रकारें सोयी करून मानापानाच्या सनदा दिल्या जातील, अशी खातरी करीत रहावी. या संबंधें जो खर्च लागेल त्याची यादी करून पाठवावी. कळावे लोभ असावा हे विनंती.

जाणिजे. चंद्र २१ जिल्काद मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 59 7-1-1743 A.D.

Subhedar Malharji Holkar exhorts the Indore Kanungo to induce outside merchants and Sawkars to come and stay at Indore, as the latter had already worked in that direction satisfactorily.

---

अ. नं. ६० **श्री**

मार्गशीर्ष शुद्ध १२, शके १६६५, ता. १७-११-१७४३

राजश्री दामोदर महादेव गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत. विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें.

विशेष शहापूर, अकबरपूर व सिवली व खेवराबरा येथील जमीदार गढया बळकावून नबाबाच्या लष्करांत येऊन मिळाले आहेत. त्यासी त्यांनीं रुजू होऊन गढी खाली करून अंमल सुरळींत द्यावा. ऐसे असोन उठोन तेथें आले आहेत. त्यासी येविसीं नबाबास लिहिलें आहे कीं, परगणे मजकूरच्या जमीदारांस ताकीद करून गढ्या खालीं करून देत आणि रुजु राहोन सरकार काम बजावीत, तें करणें. गढिया खाली झाल्यावाचोन अंमल सुरळीत होत नाहीं. तरी तेथें जमीदार आहेत. त्यांजला जोर पोंहचवून आपले हातीं घेऊन, राजश्री लक्ष्मण शंकर यांजपाशीं पोहचवून देणें. येविसीं गई न करणें. परगणे मजकूरच्या जमीदारांस सजा पावून गढ्या खाली करून येत तें करणे छ.११ साबान बहुत काय लिहिणें हे विनंती मोर्तबसुद :

श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर
खंडोजी सुत मल्हारजी होळकर

No. 60 17-11-1743 A.D.

Subhedar Malharji writes to Damodar Mahadeo (Hingane) that the Jamidars of Shahapur, Akbarpur, Siwali and Khevrabara (U. P.) be forced to evacuate their fortresses, and serve the Sarkar (Subhedar).

---

## अ. नं. ६१ श्री

ता.३ फेब्रुवारी, इसवी सन १७४४

राजश्री संकराजी महादेव व रा. शिवराम गणेश कमाविसदार प्रगणे इंदूर गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राज्यमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत अर्बाअर्बेन-मयावअलफ. कसबे मजकुरीं सरकारी हकिमाचा वाडा आहे त्यास हल्लीं तुम्ही मंडलोई यांचे वाड्यांत राहतां तर सरकारची जागा टाकून तेथें राहावे ऐसें नाहीं-तरी तुम्ही जाऊन सरकारी गुदस्तां राजश्री भोजराव राहत होते तेथें जाऊन राहणें व आणिक कोणी मंडलोई यांचे वाड्यांत राहतील त्यास ही राहूं न देणें व तुम्हीही मंडलोई यांचे वाड्यांत न राहणें. जाणिजे. छ.२९ जिल्हेज बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

No. 61 3-2-1744 A.D.

Sarkar Malharji Holkar admonishes the Kamavisdars of Indore for their lodging in the Mandloi's Wada - They are ordered to lodge in the Sarkar Wada, known as "Hakim Wada".

---

अ. नं. ६२ **श्री**

ता. ३ जून, इसवी सन १७४५

शिक्का

रोजकीर्द राजमंडळ स्वारी राजश्री पंतप्रधान सुरू सन सीतआर्बेनमयावअलफ छ.२३ माहे जमादिलावल यांत दफाते पत्रांचे पोटीं मल्हारजी होळकर व राणोजी शिंदे यांजकडे सरंजाम महाल देण्याबद्दल रामचंद्र बल्लाळ कमाविसदार यांस पत्र देण्याचे बार आहे त्याचा उतारा :

परगणे नेमावर पंच महाल सरकार हांडे :

१ परगणे नेमावर १ परगणे हरणगांव १ परगणे काठाफोड व सत्वास.

१ परगणे राजोर १ परगणे निमनपूर. एकूण पांच महाल, ५.

एकूण पांच परगणे पेशजीपासून राजश्री मल्हारजी होळकर व राजश्री राणोजी शिंदे यांस सरंजाम आहे. त्यास तुम्हांकडे सरकारातून इजारा दिला होता. ऐसियास परगणे मजकूर इजारा तुम्हांकडून दूर करून मशारनिल्हेकडे सदरहू महाल दिले आहेत. तरी मशारनिल्हेकडे अंमल सुरळीत देवणें म्हणून रामचंद्र बल्लाळ यांस पत्र.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 62 3-6-1745 A.D.

Grant of a Joint-Saranjam to Malharji Holkar and Ranojee Shinde-5 Mahals of Pargana Nemawar.

---

अ. नं. ६३ **श्री**

(पेशवे दप्तर पुणें रेकॉर्ड) ता. ६-१०-१७४५

घडणीकडील अवर्जा राजमंडळ स्वारी राजश्री पंतप्रधान. सुरू सन सीतआर्बेनमयाव-अलफ. यांत दफाते पत्रांचे पोटीं. मल्हारजी होळकर यांजकडे परगणे दरोबस्त दिल्याबद्दल पत्र बार आहे. त्याचा उतारा. छ.२१ रमजान.

१ छ.२१ रमजान पेशजी पासून सरकार बिजागड येथील परगणे दरोबस्त आहेत.

१ परगणे सेंधवे देहे १०४ व परगणे नागलवाडी देहे ६६

सदरहू परगणे पेशजीपासून मशारनिल्हेकडे चालत आले आहेत. त्यासी कजिया न करणें. म्हणून रामचंद्र बल्लाळ कमाविसदार सरकार मजकूर यांसी पत्र.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 63 6-10-1745 A.D.

Ramchandra Ballal Kamavisdar is warned against disputing the Parganas already granted to Subhedar Malharji-Sarkar Bijagad entire: Pargana Sendhwa (104 villages); Pargana Nagalwadi (66 villages).

---

**अ. नं. ६४** **श्री**

ता. १५-१०-१७४५

श्री राजराजेश्वर :

(शिक्का होळकर) (मोहर काजी महेश्वर)

कौल : कवलनामा समस्त ब्राह्मणमंडळी वे महाजन, वे साळी, वे मारू, वे समस्त. इनसूं राजेश्री पंडत ईसाजी देवाजी अंमल परगणे चोळी महेश्वर विद्यमान राजेश्री मल्हारराव होळकर. आगुं तुमको कवलनामा लिख दिया ऐसा जो श्री जीकडे गड पर रेहनेकु जगा दिवी सो तुम सब खातरजमासूं गडपर घर बांधना, वस्ती करना, तुमचे कोई बिराडभेट वे मेहसूल हरएक बाबतसे मुजाहम न होय. तुमारी खातर आवे जिस जगे घर बांधना. जगे वस्ति कोई दावा करे के यह जगा हमारी है. उस बद्दल तुमको लेख अलाहिदा दिया है. सो कोई तुमको मुजाहम दावा करने का नहीं. तुमको यह कौल जनम तक दिया है. आगे को अमल अगर हरएक बातसुं मुजाहम होवेगा. उनको श्री परमेश्वरजीकी सोगन (शपथ) है-सब तरहसूं खातरजमासूं वस्ती करना. आनंदसूं रहना. ता.२९ रमजान सन ११५५ कार्तिक शुद्ध प्रतिपदा सोमवार शके १६६७ क्रोधनाम संवत्छर संवत् १८०२ सुरू सन सीतअर्बेनमयावअलफ मोर्तबसुद.

१. साक्ष : मंडलोई दयाराम व केसरीसिंग उदेसिंग.

१. साक्ष : कानगो नरोत्तमदास, लालमन गोविंदराय. परगणे चोळीमहेश्वर.

**महेश्वर येथील श्रीहरी नरहर जोशी दप्तर**

No. 64 15-10-1745 A.D.

Public announcement by Pandit Isajee Dewajee on behalf of Subhedar Malharji to the general public of Choli Maheshwar. The Fort is open to all for residence etc.

---

**अ. नं. ६५** **श्री**

ता. १४-२-१७४६

शिक्का

राजश्री बाळाजी यशवंत व रा.हरी बल्लाळ कमाविसदार परगणे कोटे गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुरू सन अर्बेनमयावअलफ. तुम्ही पत्र पाठविलें तें पावोन वर्तमान निवेदन झालें. लिहिलें कीं सरकारचा लाखो रुपयाचा हवालासुद्धां दोन लक्ष रुपयाची तनखा पेशजी दिली. त्यापैकीं आजतागाइत पाऊण लक्ष रुपये वसूल झाले. बाकीची तहसील होत आहे. ऐसियासी लष्करचें आगमन ऐकोन पांच लक्ष रुपयाचा मुलुख परगणे बरें, बडोद व मऊ वगैरे ऐसि तनखा द्यावीसी केली, म्हणून लिहिलें ते सर्व कळून आलें. ऐसियासी आम्ही परगणे सुलटाणे, तांडा, पावागड, प्रांतींचा मुलुख सोडवून तेथील बंदोबस्त करून सांप्रत डोंगरपूर, प्रांतीं आलो. येथील तहरह जालियानंतर उदेपूर प्रांतें जाऊन तेथील कार्यभाग उरकून हाडोतिकडे येतो. तिकडे लष्करचा रोख आलियाउपरि तुम्ही पुढें भेटीस येणे. मग जो विचार होईल, कर्तव्य तो केला जाईल. जाणिजे सफर.

**कोटे, गुलगुले दप्तर**

No. 65 14-2-1746 A.D.

Subhedar Malharji Holkar informs the Kamavisdar of Kota that after conquering Parganas Sultana, Tanda, Pawagad he has reached Dongarpur. He informs him of his future plans regarding Undaipur and Hatod.

---

**अ. नं. ६६** **श्री**

ता. ७ जून, इ.स. १७४६

| श्री राजा शाहू हर्षनिधान<br>बाळाजी बाजीराव मुख्य प्रधान |
|---|

राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे गोसावी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद सुरू सन सबाअर्बेन मयावअलफ तुम्हीं पत्र छ. २४ रविलाखरचे पाठविलें तें छ. २४ जमादिलावलीं प्रविष्ट झालें. जैतपुरास राजश्री जयाप्पा अगोदर येऊन मोर्चे दिले. मागाहून आम्ही आलों. बुंधेलियांनीं जैतपुरास सामान विपूल ठेविलें होते. तोफा, जेजाला व बरकंदाज, दारूगोळा व बाजे सामान बहुत होते.

रेवणीतून (मातीचा बुरूज) हमेसा झुंझत. आपलेकडील हजार माणसें मेली. चार हजार जखमी झाले. तथापि सुरूंग चालवून दोन सुरंग उडविले. कांहीं भिंताड पडलें. तेणेंकरून गावकरी कौलास येऊन आजीच किल्ला फत्ते केला, म्हणोन विस्तारें लिहिलें तें श्रवण होऊन संतोष झाला. जैतपूर बाकी जागा व लढाऊ सामान बहुत, दारूगोळा विपूल असतां तुम्हीं व बाजे सरदारांनीं लोकांनीं श्रमसाहस करून जागा फत्ते केली-शाबास तुमची व लोकांची मोठी गोष्ट जाहली. जैतपूर लहान सामान्य जागा नव्हती. जर हस्तगत न होतें तर बदनक्षास कारण होतें. तुम्हांसारखे उमदे सरदार इरेस पडल्यावर जैतपूर काय आहे? किंबहुना याहूनही बाकी बिकट जागा असल्यास हस्तगत कराल. या उपरि तिकडील नवलविशेष व कर्तव्य मनसुबा उल्लेख पुरःसर लिहित जाणें. जाणिजे छ. २८ जमादिलावल बहुत काय लिहिणें. लेखनसीमा : पैवस्त मुकाम सेवडा परगणें.

**राजवाडे संग्रह**

No. 66 7-6-1746 A.D.

Balajee Bajirao Peshwa congratulates Malharji Holkar and Jayajee Shinde on their superb success at Jaitpur against the Bundelas.

---

**अ. नं. ६७** **श्री**

१७ जुलाई, इसवी सन १७४६

श्री राजा शाहू हर्षनिधान
बाळाजी बाजीराव मुख्य प्रधान

राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे गोसावी स्नेहांकित बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद सुरूसन सबाआर्बेनमयावअलफ तुम्ही फौजेसुद्धां बुंदेलियावरी कालिंजराकडे गेलिया आलीकडे कांहीं वर्तमान अवगत नाहीं. पत्रही येत नाहीं. तरी प्रस्तुत तुम्ही कोणे जागा अहां, काय मनसुबा योजिला आहे, बुंदेलियानें सुप्रवृत्त होऊन तुमच्या मनोदयानुरूप मामलत विल्हेस लावून टाकली कीं नाहीं, या तह करू नये, झुंझावेंच, हाच त्यांनीं विचार चित्तांत आणिला आहे? पुढें तुम्ही काय, कैसे, करावयाचे ते सर्व वरचेवर लिहिणें-इकडील कांहीं नवीन लिहिणेंसे नाही-अद्यापि सातारियासच अहों. पुढें होईल वर्तमान लिहूं जाणिजे. छ. ९ रजब बहुत काय लिहिणें. लेखनसीमा :

**राजवाडे संग्रह**

No. 67 17-7-1746 A.D.

Balajee Bajirao Peshwa (Nana Sahib) inquires of Malharji Holkar and Jayajee Shinde regarding their plans about Bundelkhand after their encampment at Kalinjer.

---

**अ. नं. ६८** **श्री मोरया**

ता. ६ आगस्ट, इ. स. १७४६
भाद्रपद शुद्ध १, संवत १८०२

| श्री राजा शाहू नरपति हर्षनिधान<br>बाळाजी बाजीराव प्रधान |
|---|

राजश्री बाळाजी यशवंत व हरी बल्लाळ व आबाजी रघुनाथ कमाविसदार परगणे कोटे. गोसावी यांसी. स्नेहांकित मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे दंडवत सुरूसनसबाअर्बेनमयाआलफ, परगणे मजकुरीची सरमजमु राजश्री शिवाजी शंकर यांजकडे पेशजी सनद आहे, त्यासी हल्लीं मशारनिल्हेकडेस मजमु करार केली असे. यांच्यातर्फेनें जो कोणी तेथें येईल त्याच्या हातें सरमजमुचें लिहिण्याचे प्रयोजन घेऊन वेतन पेशजीच्या सनदेप्रमाणें पावणें. रोजाविसीं गुदस्तां चालत आलें त्याप्रमाणें चालवणें. नवी दिक्कत न घेणें जाणिजे. ५२९ रजब बहुत काय लिहिणें हे विनंती. लेखनसीमा :

**गुलगुले दप्तर**

No. 68 6-8-1746 A.D.

Malharji Holkar and Jayajee Shinde inform the Kamavisdar of Kota that the Saranjamship of the pargana is assigned to Shiwajee Shankar.

---

**अ. नं. ६९** **श्री म्हाळसाकांत**

ता. १३-११-१७४७

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर खंडोजी<br>सुत मल्हारजी होळकर निरंतर |
|---|

मशरूलनाम चतुरभुजदास कानगो सायर परगणे इंदोर गोसावी यांस.

स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुरूसनइसनेअरबेनमयाअलफ कसबे इंदोर सरकारीवाड्याची जागा पसंत होऊन बांधण्याचे आरंभ केले आहे, आपण सायरशिवाय जमेचे कानगो असून शहराची आबादी होऊन कटती भरती (मालाची आवक जावक व्हावी यामुळें आमदानी जी वाढेल) यात आपला हक्क प्राचीन वहिवाटीप्रमाणें एक रुपयात चार आणे घेत आला आहांत. हल्लीं सरकारवाड्याचे जवळ आपली बिरादरीसह जागा बांधून आबादी करावी आणि उज्जैन वगैरे ठिकाणाहून सावकार वगैरे लोक आणून आबादी करणें याची कुल जिम्मेवारी आपलेकडेस आहे. शहर आबाद जाहलियावर आपलीच आमदनी वाढेल आणि कुटुंबाचा उत्तम प्रकारें पोषण होऊन आपली खैरख्वाही सरकारचे दृष्टीस पडेल. जाणिजे चंद्र १५ रमजान-मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 69 13-11-1747 A.D.

Sarkar Malharji Holkar exhorts the Indore Kanungo to see that merchants etc., from Ujjain and the surrounding territory do come to stay at Indore and make the Kasba, prosperous: the prosperity will rebound to the latter's glory as well as gratification.

---

**अ. नं. ७०** **श्री**

ता. १६-१२-१७४७

श्री म्हाळसाकांत चरणीं
तत्पर खंडोजी सुत
मल्हारजी होळकर

जाब्ता सरकार राजश्री मल्हारजी होळकर. बोली पागा निस्बत राजश्री रामाजी यादव दिमत सरकार मजकूर सुरूसनसमानअर्बेन मयावअलफ. बोली स्वार ५० पन्नास यांसी तैनात दर स्वारास रुपये ४२५ एकूण तैनात रुपये २१२५०

पैकी वजा ................

२६५० कापड. २७९० बट्टा दरसदे १५ प्रमाणें एकूण रू. ५४४०

बाकी रुपये रू. १५८१०

यांसी तपशील....

सरंजामी बोली परगणे बरडावद प्रांत मालवा इतलाखी बोली पन्नास स्वारांपैकीं सरंजामी

कुलबाबकुलकानु दरोबस्त देखील सायर जकात पेशजी प्रमाणें. करार कुल आकार ऐवजी खासा रामाजीपंत यांस सरंजाम निम्मे मोगलाई जागीर व निम्मेऐवजी बाबती सरदेशमुखी ऐसा मोकासा वजा होऊन बाकी मोकासा बाबेचा ठराव रुपये ४५०० साडेचार हजार करार सदरहू ऐवजी बोली ५० स्वारांची पैकीं नेमणूक सरंजाम नेमून दिला असे. ५०० खासा, ४००० स्वार १० दर ४०० प्र. येणेप्रमाणें करार करून दिला असे.

११ बाकी असामी ३९ एकूण तैनात रुपये ११८१० नक्त बिनवट्टा हुजुरुन पावावे.

१ कापड २६५० याचा करार सरकारची खरेदी होईल त्याप्रमाणें कापडाचा ठराव करार १५०० पंधराशें हुजुरुन पावावे.

हस्ताक्षर सुभेदार. सदरहू लिहिलेप्रमाणें करार पावावें. चंद्र २४ जिल्हेज मोर्तबसुद.

**पळसी रेकॉर्ड**

No. 70 16-12-1747 A.D.

The Sarkar of Malharji Holkar draws up a tabular form of payment of Rs. 21,250/- to Ramaji Yadav (Palshikar) for the maintenance of the latter's Paga of 50 horses.

---

**अ. नं. ७१** **श्री**

राजश्री दामोदर महादेव गोसावी यांस. स्नेहांकित मल्हारजी होळकर व राणोजी शिंदे दंडवत विशेष. तुमचे पत्र ढवलपूरचे मुक्कामाचें आलें तें पावलें. खजाना समागमें आहे, कोणे रोखे यावें म्हणून लिहिलें, ऐसियासी श्रीमंत व आम्ही सर्व फौज एकत्र झाली आहे. तुम्हांस श्रीमंतांनीं सिरोंजचे सुमारे बोलाविले आहे. सरकारचें पत्रही पाठवले असे, त्यावरून कळेल. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

No. 71

Malharji Holkar and Ranoji Shinde inform Damodar Mahadeo (Hingane) that the armies (inclusive that of the Peshwa) have met together, and that the Peshwa desires Hingane to see him near about Sironj.

---

अ. नं. ७२

श्री

श्रावण वद्य १३, शके १६७०, ता. ९ आगस्ट, इ. स. १७४८

श्री राजा शाहू नरपति हर्षनिधान
बाजीराव बल्लाळ प्रधान

राजश्री बापूजी महादेव व राजश्री दामोदर महादेव गोसावी यांसी.

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन अर्थ ध्यानास आला. दिल्लीचें सविस्तरें राजचर्येचें वर्तमान लिहिले आणि सादतखानाच्या मर्जी कुमक चार पांच हजारांची पाठवावी ऐसी घेऊन ठेविली. प्रतिउत्तर आलिया तजवीज करूं, म्हणून पत्रीं लेखन केलें. ऐशास आपले स्वहिताचा मनसबा देखिला तो तुम्हीं त्यांची मर्जी घेतली हे गोष्टी प्रसंगास उचितच आहे. इकडील वृत्तांत तरी पूर्वी या प्रांतास आलियावर दोनतीन पत्रें तुम्हांस लिहिलीं, त्यावरून अर्थ कळलाच असेल. राजे ईश्वरसिंग यांनीं लटकी रदबदल दोन महिने लावून आपल्या फौजा तमाम मेलवून युद्धप्रसंग करावा, ऐसा त्यांचा विचार देखोन राजश्री गंगाधरपंत यांजबरोबर फौज देऊन फागईच्या मुकामींहून जयपुरास रवाना केलें त्यासी आषाढ वद्य २ स आपली फौज जाऊन शहराभोवतीं उभी राहून भोंवतालीं वाड्या होत्या, त्या जाळून दोन प्रहर झालिया तेथून दोन कोस अलीकडे येऊन मुकाम केला. त्यासी राजियानें जाट, सेखावट, नरोके, राजावत व राय केशवदास अवघे सरदार यांजबरोबर फौज देऊन, आपली फौज राहिली होती, तेथें चालून आले आपली फौज तयार होऊन, दोन्ही फौजेची गांठ पडून युद्ध चार घटका जालें. आपल्याकडील +++ कामास आले. आणखी चांगले माणूस त्यांजकडील शेदीडशें ठार जाले. दोनतीनशें जखमी झाले. कछवे, सिकंदेकरून, माघारे जयपुराशेजारीं नेऊन घातले. तेव्हां त्याजला भारी मनसबा पडून, अवघे सरदार, ठाकुर, राजा, एकत्र होऊन मसलत ठरवून खासा राजा यांनीं बाहेर निघावें, ऐसा विचार करून आषाढ वद्य ६ स बाहेर राजे ईश्वरसिंग निघाले. यापरि जाले वर्तमान पुरवणीपत्रीं लिहिलें आहे त्यावरोन कळो येईल. छ.२५ साबान बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

पुरवणी रा.गंगाधरपंत पुढें पाठविले होते. कछव्यांचीही फौज चालून आली. दोहीं फौजेचा मुकाबला होऊन, ईश्वरसिंगाचा व आमचा मुकाबला होऊन चार घटका युद्ध जाले. सेखावत, नरोके, जाट मोडून ताराज केले. राजियाचे हत्तीपावेतों मारीत आपले लोक गेले. शेवटीं सलुखास केशोदासास पाठविले. बुंदी सोडून देतो. माधोसिंगाचे चारी

परगणे खाली करून देतो. ऐसा करार केला.

No. 72 9-8-1748 A.D.

Exchange of news between Subhedar Malharji and Hingane brothers of Delhi. Subhedar gives, in detail, the news of the defeat of Ishwarsingh of Jeypore.

---

**अ. नं. ७३** **श्री**

इ. स. १७४८

यादी झाबव्यासंबंधांत :

१ भोलानाथ भट यांजला सनद नाक्यावर दरमहा रु.३ ची करून दिली. विद्यमान चिमाजीराव बुळे यांनीं. सुरू सन सीततिसेन. संवत् १८५२.

१ हरभट याजला मौजे दौलतपुरा हा गांव जहागीर. चिमाजीराव बुळे यांनीं दिला. त्याची सनद संवत् १८३८ सुरूसनइसन्नेसमानीन सालांत.

१ हरभट दुसरें याजला दरमहा रु.५ नाक्यावर सनद करून दिली. चिमाजीराव बुळे यांची सही संवत् १८४६.

१ मिठाभट रामभट याजला सामलांत सनद झाली. त्यांत गोविंदराव बुळे यांनीं शिवगडचे नाक्यावर दरमहा रु. २ करून दिले त्याची सनद संवत् १८३६.

१ किसनाजी जगनेश्वर शुक्ल याजला श्री विश्वेश्वर महादेव यांचे पुजेबद्दल अडाण : बिघे २ व माळेत्रु बिघे जमीन १० ऐसे बारा बिघेची सनद चिमाजीराव बुळे यांचे व झाबवेवाल्यांचे सामलाती करून दिली संवत् १८४५ शके १७१० त्यांत मजकूर पूर्वीची सनद संवत् १८०४ चे सालची होती, ती गहाळ झाली. सबब नवीन करून दिली. म्हणोन मजकूर.

**विभूते दरखीअमीन पेटलावद यांचे दप्तर**

No. 73 1748 A.D.

Sanads of gifts-to a number of persons-granted by Sardars Chimaji and Govindrao Bulye in the Zabwa Pargana.

---

**अ. नं. ७४** **श्री**

ता. १३ आगस्ट, इसवी सन १७४९

राजश्री खंडो बाबूराव कमाविसदार परगणे इंदूर. गोसावी यांसी. स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुरू खमसेनमयावआलफ. राजश्री राव तेजकर्ण मंडलोई यांसी बहुमान पालखी दिली असे. त्यांसी भोईयामुळें रु. ७०० सातशें परगणे मजकूर ऐवजी देविले असेत. तरी दरसाल सदरहू सातशें शिवाय दामी परगणे मजकूर ऐवजी पावीत जाणें. उजुर न करणें. जाणिजे. छ.१० रमजान हे विनंती मोर्तबसुद. शिक्का.

No. 74 13-8-1749 A.D.

Sarkar Malharji Holkar has presented a palanquin to Rao Tejkarna Mandloi with an assignment for the pay of the bearers.

---

**अ. नं. ७५** **श्री ऋख्मिणी**

ता.१ एप्रिल, इसवी सन १७५०

वेदशास्त्रसंपन्न राजश्री समस्त श्रींचे पुजारी. गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित खंडेराव होळकर दंडवत विनंती उपरि. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करणें विशेष. श्रींच्या महानैवेद्याकारणें रुपये ४५ पंचेचाळीस श्रींस करार केले असेत. तर प्रतिवर्षी पावते करून महानैवेद्य श्रीपाशीं करीत जाणें. यांसी अंतर करूं नये. शके १६७२ प्रमोदनाम संवत्सरें वैशाख शुद्ध ७ बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद. शिक्का खंडेराव होळकरांचा.

**श्री पंढरपूर येथील एकनाथ गोविंद उत्पात यांचे दप्तर**

No. 75 1-4-1750 A.D.

Khanderao Holkar (son of Malharji) orders an annual grant of Rs. 45 - for daily-dish service of Shree Vitthal of Pandharpur.

---

**अ. नं. ७६** **श्री**

ता. ६ एप्रिल, इसवी सन १७५०

वेदशास्त्रसंपन्न राजश्री उत्पात समस्त क्षेत्र श्री पंढरपूर स्वामींचे सेवेशीं. सेवक सौभाग्यवती अहिल्याबाई होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल

लिहित जाणें. विशेष. श्री. आईस पायेचा रमझोन सोन्याचा बाळोजी नाटे यांजबरोबर पाठविले आहेत तरी प्रत्यहीं भोगवीत जाणें. यात अंतर पडिले तर उत्तम नसे. येविशींचा जाबसाल तुम्हांस पुसिला जाईल. जाणिजे. छ.१० जमादिलावल. बहुत काय लिहिणें. हे विनंती. मोर्तबसुद.

**पंढरपूर येथील एकनाथ गोविंद उत्पात यांचे दप्तर**

No. 76 6-4-1750 A.D.

Saubhagyawati Ahilyabai Holkar sends a present of golden ornament to Goddess Rukminee of Pandharpur for daily wear.

---

**अ. नं. ७७** **श्री**

ता. ३-६-१७५०

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर खंडोजी सुत मल्हारजी होळकर |
|---|

अजस्वारी राजश्री मल्हारजी होळकर ताा मोकदम मौजे पळसी प्रगणे पारनेर सुाा इहिदेखमसेनमयावअलफ, श्रीमंत महाराज राजश्री स्वामींनीं राजश्री रामाजी यादव यांसी मौजे मजकूर मोकासा बाब व सरदेशमुखी दरोबस्त इनाम वंशपरंपरेनें करून दिला आहे. तर यांजकडे रुजू होऊन मोकासबाब व सरदेशमुखी कुलबाब कुलकानू मशारनिल्हेकडे अंमल सुरळीत देणें. जाणिजे. छ.९ रजब मोर्तबसुद.

**पळसी रेकॉर्ड**

No. 77 3-6-1750 A.D.

Subhedar Malharji Holkar respectfully acknowledges the grant of Mokasa of Mauza Palshi to Ramaji Yadav (Palshikar) granted by Chhatrapati, and orders the local officers accordingly.

---

**अ. नं. ७८** **श्री**

ता. १८-८-१७५०

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री बाळाजी पंडित प्रधान ताहा मल्हारजी होळकर मोकदम मौजे लोणी व्यंकनाथ प्रगणे चांभारगोंदे व कस्बे कातराबाद

मांडवगण प्रगणे मजकूर सुाा सनइहिदे खमसेनमयावअलफ. तुम्हीं हुजूर येऊन विदीत केलें कीं आपण राजश्री स्वामीसन्निध साताऱ्याचे मुक्कामीं विनंती केली त्याजवरून राजश्री स्वामी कृपाळू होऊन हरदू गांव पेशजीचे मुकासी याजकडोन दूर करोन स्वराज्यातर्फेनें मोकासा व बाबती सरदेशमुखी कुलबाब कुलकानू खेरीज हक्कदार करून नूतन इनाम आपल्यास करून देऊन पत्रें करून दिलीं आहेत. तरी स्वामींनीं सदरचीं पत्रें भोगवट्यास करून दिलीं पाहिजेत म्हणून विनंती केली. त्यांजवरून हें पत्र सादर केलें असे. तरी हरदू गांव मोकासा बाबती सरदेशमुखी कुलबाब कुलकानू तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपेरेनें अनुभवणे. जाणिजे चंद्र २४ साबान. आज्ञापत्र. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 78 18-8-1750 A.D.

Peshwa Balaji Pandit-Pradhan grants hereditarily the Mokasa of Mouza Loni Vyankanath and Kasba Katrabad and Mandavagad to Malharji Holkar.

---

**अ. नं. ७९** **श्री**

ता. २८ सप्टेंबर, इसवी सन १७५०
आश्विन शुद्ध ९, शके १६७२

राजश्री दामोदर महादेव गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. गंगापार होऊन पठाणास तंबी पोहचवावयाचा विचार करून पुलाची तरतूद करवीत असों. बाहिरबार ठेवणें लागेल. निगेराणीस कांहीं जमियत राहील. रूपराम खिचर यांसी श्रीमंत रावसाहेबी बिरादरांत जाणत होते. येथें जमियतसुद्धां पोंहचल्यास त्याचे तर्फेनें निकेबानी खातरजमा असे. तरी नबाबास सांगोन दोघा भावांतून एकजण जमियतसुद्धां येऊन येथें पोहचत तें करणें. ते इकडे चाकरीस येतील; मागें त्यांच्या तालुक्यासी कांहीं उपसर्ग न लागे तें करणें. विश्वासुक, कार्याचे मनुष्य असत. याजकरितां लिहिलें आहे. तरी लिहिल्याप्रमाणें त्यांचें येणें होय, तें जरूर करणे. छ.७ जिल्काद बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

श्री म्हाळसाकांत चरणीं
तत्पर खंडोजी सुत
मल्हारजी होळकर

**राजवाडे खंड**

No. 79 28-9-1750 A.D.

Subhedar Malharji Holkar informs Damodar Mahadeo Hingane that he himself is engaged in building a bridge with the object of punishing the Pathan. Any one of the Khichar brothers, serviceable as they are, will be a welcome addition. Try to send them through the Nawab.

---

अ. नं. ८० श्री

अंदाजे इ. स. १७५०

राजश्री दामोदर महादेव गोसावी यांसी. स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जावें. विशेष तुम्ही पत्र पाठविले ते पावोन वृत्तांत कळो आला. नबाब वजीर यांनीं पुसलें कीं, बाहिरसुद्धां कोठपावेतों जावे ? अथवा बाहिर कोणे ठिकाणीं ठेवावीं ? वरकड इसमाइलखान, रायरामनारायण वगैरे पुढें पाठविले ते पोंचलेच असतील. भेटी कोणे दिवशीं व्हावी याचा विचार मनास आणून उत्तर पाठवावें, म्हणून लिहिलें. त्यासि नबाबाही बाहिरसुद्धां पुलापर्यंत यावें. राजश्री जयाजीअप्पा व चिरंजीव राजश्री खंडेराव व राजश्री गंगाधरपंत फौजेसुद्धां पुलापासूनच समीपच आहेत. पठाण तो रामगंगेच्या पार आहेत. त्यांचा कांहीं विश्वास न धरावा. उत्तम प्रकारें थंडा केला आहे. त्याचा हिशेब नाहीं. पुलापुढें आपल्या फौजा आहेत. याउपर दिवसगत लागले तरी पठाण तेथून निघोन जाईल. ऐसा त्याचा मतलब दिसतो. याकरितां नबाबास सांगून कूच करून बाहिरसुद्धां जलदीने पुलापर्यंत येत तेथें आलिया त्यांच्या आमच्या भेटी. नंतर जो विचार कर्तव्य तो करून रामगंगेस पायाबा सांपडला तरी उतरोन, अगर पूल बांधोन, रामगंगा उतरोन पठाणास उत्तम प्रकारें नतिजा पाविला जाईल. या कामास दिवसगत लावायासी कार्याचें नाही. नबाब जल्दीनें आलो म्हणून जो विचार करणें तो शीघ्र करून शत्रूस नतिजा होईल, येविसीं आप्पानीं व चिरंजीवानीं उत्तरें लिहिलीं असत. नबाबास शीघ्र घेऊन येणें. छ.७ मोहरम बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

शिक्का

No. 80 About 1750 A.D.

Subhedar Malharji informs Damodar Mahadeo Hingane of the complete subjugation of the Pathan near the Ram-Ganga river, and of plans about the visit of the vazir.

---

अ. नं. ८१ **श्री**

आश्विन वद्य ९, इ. स. १७५०-५१

वेदशास्त्र संपन्न राजमान्य राजश्री दीक्षित स्वामींचे सेवेसीं. आज्ञाधारक मल्हारजी होळकर कृतानेक दंडवत विज्ञापना येथील कुशल तागाइत आश्विन वद्य ९ मुक्काम पुणें स्वामींच्या आशीर्वादें करून यथास्थित असो विशेष. कृपाकरून पत्र पाठविलें प्रविष्ट होऊन बहुत संतोष झाला. पत्रार्थ ध्यानास आला-रुपयाविसीं लिहिले. ऐशास, स्वामींच्या लिहिण्यापूर्वीच बुंदेलखंड प्रांतांतून राजश्री गोविंद बल्लाळ यांजकडून हुंडी आमच्या ऐवजीं श्रींची करवून आपणाकडे रवाना करविली. ऐसें असतां, अद्यापि रुपये न पावले. प्रस्तुत राजश्री गोविंद बल्लाळ यांसी पत्र लिहिलें आहे. बहुधा मागें ऐवज त्यांनीं पाविला असला तरी उत्तमच झालें. नाहीं तरीं हल्लीं पत्र पाठविलें आहे, ते त्यांसी पावावें. रुपये पावते करतील. येणेप्रमाणें ऐवज तुम्हांकडे मशारनिल्हेच्या मार्फतीने पाठविला. रुपये :

१७२३५ कर्ज देविलें तें. ५००० घाट बांधावयासी.

एकूण रु. २२२३५.

बावीस हजार दोनशें पस्तीस पाठविले आहेत मशारनिल्हे पावते करतील. आपल्या लिहिल्यापूर्वीच अगोदर रुपयांची रवानगी स्वामींकडे केली आहे. ते घेऊन उत्तर पाठविले पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. मोर्तबसुद.

No. 81 1750-51 A.D.

Subhedar Malharji Holkar pays to Dixit Swami five thousand rupees for building a certain Ghat.

---

अ. नं. ८२ **श्री**

ता.२० फेब्रुवारी, इसवी सन १७५१

फाल्गुन शुद्ध ६, शके १६७२

राजश्री दामोदरपंत रावजी व पुरुषोत्तमपंत गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असावें. विशेष. पत्र पाठविलें प्रविष्ट झाले. आपला मुकाम कोणे ठिकाणीं आहे, आम्ही कोणे ठिकाणीं यावें, म्हणून लिहिलें, ऐशियासी उदईक गुरुवारी कूच करून झुणकीवर पांचा कोसांचा मुक्काम नेमिला आहे. त्यास सत्वर आलिया तळावरच भेटी होतील, अथवा मजलीस भेटी होतील. सत्वर आलें पाहिजे. छ.रविलाखर बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

श्री म्हाळसाकांत चरणीं
तत्पर खंडोजी सुत
मल्हारजी होळकर

**राजवाडे खंड ६**

No. 82 20-2-1751 A.D.

Malharji Holkar and Jayajee Shinde inform Damodarpant (Hingane) of their intended march to Zunki the next day.

---

**अ. नं. ८३** **श्री**

ता. २३-२-१७५१

राजश्री विष्णु महादेव, कमाविसदार परगणे तोडा गोसावी यांस. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे. दंडवत सुरू सन इहिदेखमसेनमयावअलफ मौजे धाबला परगणे मजकूर हा गांव राजश्री माधोसिंग यांनीं पेशजी राजश्री रामाजी यादव यांजला दरोबस्त दिला तेणेंप्रमाणें करार करून त्यांजकडेस दरोबस्त मौजे मजकुर दिला असे तरी तुम्ही त्या गांवच्या अंमलास मुजाहिम न होणें. मशारनिल्हेकडील कमाविसदार अंमल करतील. जाणिजे चंद्र ७ रविलाखर बहुत काय लिहिणें लेखनसीमा. (शिक्का) बार.

**पळसी रेकॉर्ड**

No. 83 23-2-1751 A.D.

Re-confirmation, by Malharji Holkar and Jayajee Shinde, of a previous grant (granted by Madhosingh to Ramajee Yadav) of Mauza Dhabla.

---

**अ. नं. ८४** **श्री**

ता. २८ आक्टोबर, इसवी सन १७५१

श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर
खंडोजी सुत मल्हारजी होळकर

राजश्री बाळाजी यशवंत गोसावी यांसी स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती

सुरुसनइसनेखमसेन मयावअलफ. तुम्ही पत्र पाठविलें तें पावून वर्तमान कळो आलें. महाराजांकडील मजकूर लिहिला कीं तरदूद ऐवजाची करून प्रस्तुत श्री नाथद्वाराकडे गेले आहेत. ते आल्यावाचून ऐवज हातास येत नाही. ते आलिया निकाल करून घेतों म्हणून लिहिले. ऐसियासी तुम्ही वरचेवर त्यासी तगादा करून ऐवज वसूल येईल तो घेणें. इकडील कार्य संपत आलें. पठाणास तंबी पोहचवून सत्वरी त्या प्रांतासीं येतो. उपरांतिक सर्वांचे पारिपत्य केलें जाईल. छ.१९ जिल्हेज बहुत काय लिहिणें हे विनंती, मोर्तबसुद.

No. 84 28-10-1751 A.D.

Subhedar Malharji presses Balaji Yeshwant (his agent) to recover the tribute due from the Maharana.

---

अ. नं. ८५ **श्री**

ता. ३०-१०-१७५१

श्री राजा शाहू नरपति हर्षनिधान
बाळाजी बाजीराव प्रधान

राजश्री दामोदर महादेव व राजश्री पुरुषोत्तम महादेव गोसावी यांस.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे दंडवत विनंती. सुरुसन इसने खमसेन मयावअलफ. वेदमूर्ती राजश्री पौंडरिक सूर्यनारायण शास्त्री यांजला मौजे हारीराजपूर परगणे सिद्धपूर हा गांव दरोबस्त धर्मादाय पेशजी पासून आहे तेणेंप्रमाणे सनद देऊन चालवावें. त्यावरून पौंडरिकजीकडे मौजे मजकूर करून दिल्हा असे त्यांजकडे मौजे मजकूर दरोबस्त चालविणें. नवीन पत्रांचा आक्षेप न करतां या पत्राची नक्कल घेऊन हे पत्र भोगवटियास फिरोन देणें. थोर ब्राह्मण पूज्य आहेत. यांच्या गांवास एकजरा तसदी न देणें. छ.२१ जिल्हेज बहुत काय लिहिणें हे विनंती. लेखनसीमा.

No. 85 30-10-1751

Sanad of a joint-gift of the village Harirajpur to Paundarik Suryanarayan Shastri by Malharji Holkar and Jayajee Shinde.

---

अ. नं. ८६ **श्री**

इ. स. १७५१-५२

सरंजाम देशीहून फौजेसह हिंदुस्थान मुलूख सर करून घेण्यास व स्वारीबरोबर खर्चास महाल सन ११६१ फसली सालांत श्रीमंत पेशवे सरकारने दिले. (ह्या यादीपैकी फक्त होळकरांचे सरंजामाचा खुलासा घेतला असून शिंद्यांचे सरंजामाचा घेतला नाही.)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २००००० | परगणे आंबाड | १००००० | परगणे चांदवड | ४०००० | परगणे देपूर |
| ३०००० | गाळणा | ४०००० | पैठणनिमे | २०००० | कोरहाळे |
| ४५००० | उत्राण | ५०००० | अडावद | ६०००० | थालनेर |
| १२५००० | सुलतानपूर | १००००० | नंदुरबार | ७००० | आंबे |
| १५०००० | बिजागड | .............. | | ............. | |
| १००००० | वारखेडी, | २९०००० | | १२७००० | |
| | वाफगाव आले, | | | | |
| | लोणी, बिबी, लाखनगांव, मंचर, काटापूर वगैरे. | | | | |

.............

६५००००

७५००० वेरूळ व रावेर निम्मे मिळून.

एकूण एकंदर होळकरांचे हिश्शाची बेरीज रु.११४१००० अकरा लक्ष एकेचाळीस हजार.

सदरहू सरंजाम देशींहून आणले त्याचे खर्चास. एकूण देशचे महाल फौजेचे खर्चास रु. १६६१००० सोळा लक्ष एकसष्ट हजार रुपये दोन्ही सरदारांस खर्चांस दिले. तपशील : ११४१००० होळकर सरकारकडे. महाल. ५२०००० पांच लक्ष वीस हजार, शिंदे सरकारकडे. एकूण रु.१६६१००० दोन्ही सरदारांस श्रीमंत पेशवे सरकारनें खर्चास दिले. सुरुसन इसन्ने सलासेन मयावअलफ. फसली सन ११६१ साली खर्चास.

**सरकारी रेकार्ड**

No. 86 1751-52 A.D.

List of Mahals assigned to Malharji Holkar to defray army expenses of the campaign in the North.

अ. नं. ८७ **श्री**

ता.१२ जून, इसवी सन १७५२

| |
|---|
| श्री राजा शाहू नरपति हर्षनिधान<br>बाळाजी बाजीराव प्रधान |

दस्तक सरकार राजश्री मल्हारजी होळकर व रा.जयाजी शिंदे. कमाविसदारान, चौकीदारान, राहदारान व बाजेलोकान व जकाते महलहाये व नदीना-वाडियान, वगैरे सुरूसन सलासखमसेनमयावअलफ. राजश्री हरी दामोदर कुटुंबासहवर्तमान श्री काशीचे यात्रेस जात आहेत. यांजबरोबर पालख्या २, घोडीं ५००, डोल्या १००, मनुष्यें २००० वगैरे भारबदारी असे. यांजला रहादरम्यान कोणी मुजाहिम न होतां सुखरूप जाऊं देणें व जेथें वस्तीस राहतील तेथें जागा देऊन रखवाली करणें. हासिलांचा तगादा न करणें. ताकीद असे. जाणिजे छ.१० साबान. लेखनसीमा.

**शिं.इ.सा.भा.२ कोटा दप्तर**

No. 87 12-6-1752 A.D.

A joint-order of Sarkar Malharji Holkar and Rajeshree Jayajee Shinde to all the officers concerned regarding the arrangements to be made on behalf of Hari Damodar on his way of pilgrimage to Benaras.

---

अ. नं. ८८ **श्री मोरया**

ता. ९ आगस्ट, इसवी सन १७५२

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामींचे सेवेसीं. विनंती सेवक मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे कृतानेक विज्ञापना स्वामींचे कृपावलोकनें करून छ.१० सवाल रेवातीरीं यथास्थित असो विशेष. स्वामींकडून आज्ञापत्रें सादर झालीं, त्यांजवरून लेखनार्थ सविस्तर कळला. उत्तरे निराळे पुरवणीपत्रीं सेवेसीं लिहिली आहेत, त्यांजवरून सविस्तर निवेदन होईल. आम्ही व नबाब निजाम उलमुल्कसह वर्तमान नर्मदातीरास येऊन पोंहचलों. या उपर सारें लष्कर लौकरच पार उतरोन येत असो. स्वामींनीं तिकडून फौज जमा करवून पुण्याहून कूच करून अलीकडे अविलंबें आलें पाहिजे. आम्ही बऱ्हाणपूरचा बंदोबस्त करून येतों. मग पुढील बंदोबस्त होणें तो उत्तमच होऊन येईल. स्वामींच्या विचारानुरूप साऱ्या गोष्टी होतील. वरचेवर आज्ञापत्रें सादर केली पाहिजेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ती.

No. 88 9-8-1752 A.D.

Malharji Holkar and Jayajee Shinde inform Bhau Saheb Peshwa of their arrival with the Nizam-ul-Mulk on the Narmada. They request Bhau Saheb to start for the North from Poona.

---

**अ. नं. ८९** **श्री**

ता. १२-८-१७५२

(बाळाजी बाजीराव पेशवे यांजकडून वासुदेव दीक्षित यांस) मल्हाररावांनीं जो पक्ष धरला तोच आपण वळवावा. आम्हांसही त्यांकडे पत्रें पाठवावी लागतील आम्ही जो पक्ष धरला तो धरला त्यास अन्यथा करीत नाहीं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 89 12-8-1752 A.D.

Balajee Bajirao Peshwa declares his faith in the sound judgment of Malharrao and informs so to Vasudeo Dixit.

---

**अ. नं. ९०** **श्री**

ता.२७-१०-१७५२

(शिक्का मल्हारजींचा)

अज सरकार राजश्री मल्हारजी होळकर ता. मोकदम मौजे वणकुटे परगणे पारनेर सुरूसलासखमसेनमयावअलफ. मौजे मजकूर हा गांव मोगलाईकडोन अतलमगाहईनाम राजश्री रामाजी यादव दिमत सरकार यांजला नबाब गाजुदिनखान फेरोज जंगबहादूर यांनीं दिला आहे, तेणेंप्रमाणें सरकारांतून इनाम दिला आहे. त्यास पंतमजकुरासीं रुजु होऊन मौजेमजकुरचा अंमल सुरळीत यांजला देणें. उजर न करणें. जाणिजे छ.१९ जिल्हेज मोर्तबसुद.

**पळसी दप्तर**

No. 90 27-10-1752 A.D.

Sarkar Malharji Holkar re-confirms the gift of the village Mauza Vankute to Ramajee Yadav (Previously granted by Moguls.)

---

अ. नं. ९१ **श्री**

शके १६७४ पौष शुद्ध, ता.८-१२-१७५२

| श्री म्हाळसाकांत चरणीं<br>तत्पर खंडोजी सुत<br>मल्हारजी होळकर |
|---|

राजश्री दामोदर महादेव व पुरुषोत्तम महादेव गोसावी यांस. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य. स्नेहांकित मल्हारराव होळकर दंडवत विनंती सुहुरसनसलासनखमसेन-मयावअलफ - परगणे सोरम व परगणे गंगेरी व परगणे बांचलाणा कटक प्रांत अंतर्वेद येथील फडणिशीचें काम राजश्री वासुदेव राम यांजकडे सांगितलें असे. तरी यांच्या हातून लिहिण्याचें प्रयोजन घेऊन वेतन रुपये ३०० तीनशें परगणे मजकूरपैकीं पावते करीत जाणें. छ.१ रविलावल बहुत काय लिहिणें, हे विनंती. मोर्तबसुद.

**सं.भागवत**

No. 91 8-12-1752 A.D.

Subhedar Malharji Holkar informs Damodar Mahadeo (Hingane) that the Fadnisi of Parganas Soram, Gangeri and Banchlana (of Prant Katak) is assigned to Vasudeo Rama on a salary of Rupees 300.

---

अ. नं. ९२ **श्री**

संवत् १८०९, इ. स. १७५२

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>श्रीमन्महाराज मल्हारराव होळकर |
|---|

नेमाड, नजिक मांडवगड.

अज स्वारी राजश्री गोविंदरावजी बुळे सुभेदार बंचनात. ठाकूर केसरीसिंग परगणे सितापूरी सुरूसनसलासखमसेनमयावअलफ. विद्यमान आगुं पंडित गोविंदराव. राजश्री खंडोजी पंडतकु कमावीस कहीं छे सो वे तुम एक विचारसे मिलकर काम करना. आबादी उस्तवारी करना. तजावत तफावतका मुलाजा होने का नहीं. ताकीद जानो. जाणिजे छ.१९ माहे जमादिलावर. मोहसा.

**सरदार बुळे दप्तर**

No. 92 1752 A.D.

Grant of Mauza Sitapuri (Pargana Lavani) to Thakur Kesarisingh by Sardar Govindrao Bulye for cultivation, under the seal of Subhedar Malharji Holkar.

---

**अ. नं. ९३** **श्री**

इसवी सन १७५२-५३

राजमंडळ स्वारी पंतप्रधान. राजश्री मल्हारजी होळकर यांजकडे इनाम गांवें दिल्याबद्दल सनद बार आहे छ.२९ रविलावल.

प्रांत खानदेश.

२ परगणे ललींग येथील गांवदेखील वाडिया, मजरें हल्लीं १ गांवाखालीं चालत असतील त्यांसुद्धां; मौजे मुंगठी. १ मौजे वडजाई

१ मौजे न्याहळोद सोनगीर गांव मजरे वाडियासुद्धां

२ परगणे थालनेरपैकी गांव. १ मौजे करवंदी १ मौजे वनावला

२ परगणे आंबेपैकीं १ मौजे वतेवा. १ मौजे सांगवी

१ मौजे चंदनपुरी वाडीमजरेसुद्धां

१ मौजे मंडले देखील मजरेवाडीसुद्धां

--

९

सदरहू गांवें पुत्रपौत्रादि वंशपरंपरे इनाम असे.

**सरकारी रेकॉर्ड व पेशवे रेकॉर्ड**

No. 93 1752-53 A.D.

A hereditary grant of nine villages of Prant Khandesh to Subhedar Malharji Holkar.

---

**अ. नं. ९४** **श्री**

इसवी इसवी सन १७५२-५३

नबाब गाजुदिनखानकडून राजश्री मल्हारजी होळकर यांचे नांवें प्रांत खानदेश येथील

गांवें दिली, ती येणेंप्रमाणें :

| महाल | प्रांत खानदेश | गांवें |
|---|---|---|
| १ परगणे थालनेर | | १ मौजे मुंगठी |
| १ परगणे आंबे | | १ मौजे न्याहळोद, परगणे सोनगीर |
| १ परगणे अडावद | | १ मौजे करवंदी, परगणे थालनेर |
| १ परगणे उत्राण | | १ वनावळ, परगणे थालनेर |
| .... | | १ मौजे भडगांव |
| ४ | | २ मौजे सांगवी व बतेली |
| | | १ मौजे मोवर, परगणे सुलतानपूर |
| | | १ मौजे दहीवल |
| | | .... |
| येणेंप्रमाणें. | | ९ |

**सरकारी रेकॉर्ड**

No. 94 1752-1753 A.D.

List of villages granted to Malharji Holkar by Nawab Gajuddinkhan.

---

**अ. नं. ९५** **श्री**

सुमारे इ. स. १७५३-५४

वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेसीं चरणराज मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत असलें पाहिजे. विशेष, कृपा करून पत्र पाठविलें तें सुसमयीं प्रविष्ट होऊन बहुत संतोष झाला. श्री यात्रेसी जाणें, साहित्य पत्राविशीं लिहिले. त्यावरून पत्रें पाठविली आहेत. पावतील. राजश्री दिनानाथजीविशीं लिहिले त्यास आपणही लिहिलें आणि याचा अगत्यवाद सर्वांसही आहे. पुढें त्या प्रांतास गेलियावर बोलाविलें आहे. प्रस्तुत आपण समागमें न्यावें येविसीं बोलाविलें त्यावरून त्यांची रवानगी केली. बलवंतसिंग याचा मजकूर लिहिला. त्यास साकल्य अर्थ पंतमशारनिल्हेशीं समक्ष बोललो. निवेदन करतील, त्याजवरून ध्यानास येईल. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**राजवाडे खंड**

No. 95 About 1753-54 A.D.

Subhedar Malharji makes arrangements for a comfortable pilgrimage to Benares undertaken by Vasudeo Dixit.

---

अ. नं. ९६ श्री

शके १६७५, ता.४-३-१७५३

(उतारा पेशवे रेकॉर्ड राजमंडल स्वारी)

घडणीकडील अवर्जा सुरू सन आर्बाखमसेनमयावअलफ दफाते पत्रांचे पोटीं.

मल्हारजी होळकर यांचे नांवें सनद बार आहे तिचा उतारा :

१ छ.९ जमादिलावल मशारनिल्हेचे नांवें सनद कीं, परगणे इटावे व परगणे फफुंद प्रांत अंतरवेद येथील अंमल दरोबस्त सरकारांत आहे. त्यास सदरहू परगणेमजकूर येथील तो आकार होईल त्याजप्रमाणें दिल्लीस समाईक फौज राहील त्याचा खर्च वजा होऊन बाकी जो ऐवज राहील तो हिस्सेरसीनें वाटून घ्यावा दर शेकडा.

५३-०-० सरकारी वाटणी

२३-५-० मल्हारजी होळकर

२३-५-० जयाजी शिंदे

---------

१००

येणेंप्रमाणें दर शेकडा याप्रमाणें जो निव्वळ ऐवज राहील त्याची वाटणीं सदरप्रमाणे जिकडील तिकडे घेत जाणें.

म्हणून पत्र.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 96 4-3-1753 A.D.

Parganas Itawa and Phapunda (in the United Provinces) are under the Peshwa. The expenses of the joint army maintained at Delhi will be deducted of the revenue of these Parganas; of the remainder :

| | | |
|---|---|---|
| The Peshwa to receive | Rs. | 53-0-0 |
| Malharji Holkar ” | ” | 23-5-0 |
| Jayajee Shinde ” | ” | 23-5-0 |

out of every 100/- Rupees.

---

अ. नं. ९७ श्री

ता. १८-३-१७५३

राजश्री विश्वासराव लक्ष्मण हवाला मुतालिक किल्ले धोडप गोसावी यांस अखंडित

लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुरूसन सलासखमसेन-मयावअलफ किल्लेमजकूरची कारखाननिशीं राजश्री अप्पाजीराम यांस करार करून सांगितली आहे तरी किल्लेमजकूरचे कारखाननिशीचे कामकाज यांचे हातें घेत जाणें यांसी वेतन रुपये ९०० नऊशें देविले असे. देत जाणें ते मंजूर असे. चंद्र १२ जमादिलाखर मोर्तबसुद.

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>खंडोजी सुत मल्हारजी होळकर |

**पळसी रेकॉर्ड**

No. 97 18-3-1753 A. D

Subhedar Malharji Holkar assigns the Karkhandarship of the Dhodap fort to Appaji Rama (Palshiker) on a salary of Rupees nine hundred.

---

**अ. नं. ९८** **श्री**

ता. १८-३-१७५३

राजश्री पिराजी ढमढेरे हवाला किल्ले मुतालकी चांदवड गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर रामराम सुरुसनसलासखमेसन-मयावअलफ राजश्री आप्पाजीराम इतबारी जाणून किल्ले मजकूरचे कारखानीहीचें काम करार करून सांगितलें असे तरी किल्ले मजकूरचे कारखानीशीचे कामकाज लिहिण्याचें प्रयोजन मशारनिल्हेंच्या हातीं घेऊन वेतन रुपये ६०० सहाशें नेमणूक ऐवजी पावणें. मुजरा असेत चंद्र १२ जमादिलाखर मोर्तबसुद.

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>खंडोजी सुत मल्हारजी होळकर |

**पळसी रेकॉर्ड**

No. 98 18-3-1753 A. D

Subhedar Malharji Holkar assigns the Karkhandarship of the Chandwad fort to Appaji Rama (Palshiker).

---

अ. नं. ९९ **श्री**

शिक्का शके १६७५ चैत्र शुद्ध ३, ता.६ एप्रिल, इसवी सन १७५३

राजश्री दामोदर महादेव व पुरुषोत्तम महादेव गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष श्री भक्तिपरायण राजश्री तिमण्णा गोसावी यांस देवाच्या पूजा-नैवेद्या व ब्राह्मणसंतर्पणाकरितां, प्रांत अंतरवेद येथें दरगांवास अंमल आहे. त्यास रु.१ एक प्रमाणें दरसाल करार करोन हे पत्र तुम्हांस दिले असे. त्यास तुम्हांकडील महाल बितपशीलः

१ परगणे कन्नोज, १ परगणे सोरा, १ परगणे गंगेरी, १ परगणे बचलाणा, १ परगणे सिकंदरा, १ परगणे जलाली, एकूण सहा महाल प्रांत अंतर्वेद येथील दरगांवास दरसाल रु.१ एकप्रमाणें आकारून जमा करून 'श्री' स प्रविष्ट करीत जाणें. नूतन पत्रांचा आक्षेप न करणें. या पत्राची नक्कल घेऊन भोगवटियास हें पत्र माघारे देणें. छ १ जमादिलाखरसुरू सन सलासखमेसनमयावअलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद ः

No. 99 6-4-1753 A.D.

Subhedar Malharji Holkar assigns one rupee per village (of his six Parganas in the United Provinces) to Timanna Gosavi for defraying his religious duties-worship, light and food to the Deity.

---

अ. नं. १०० **श्री**

ता. ७-५-१७५३

खंडोजी आबाजी किल्ले इंद्रगड यांस कीं अप्पाजीराम यांस कारखानिशीचें काम सांगून वेतन रु.५५० नेमणूक देत जाणें संबंधांत.

No. 100 7-5-1753 A.D.

Subhedar Malharji Holkar assigns the Karkhandarship of the Indragad for on Rs. 550/- to Appaji Rama (Palshikar).

---

अ. नं. १०१ **श्री**

शिक्का शके १६७५ चैत्र वद्य ४ ता. २१-५-१७५३

(दामोदर महादेव व पुरुषोत्तम महादेव यांस मल्हारजीचें पत्र) अंतरवेदचे महालाऐवजी

तुम्हांपासून ऐवज घेतला आहे.

१२५००० दस्तखत अलाहिदा. १७०८७ लोकांस देविले, त्यातें व्याज सव्वा लक्षाच्या खताप्रमाणें करार. एकूण एक लक्ष बेचाळीस हजार त्यासी रुपये सदरहू ऐवज अंतरवेदीचे महांलातून उगवून घेणें.

No. 101 21-5-1753 A.D.

Subhedar Malharji is in receipt of Rupees 1,25,000 from Damodar Mahadeo Hingane. The amount is to be recovered by Hingane from the former's territory in the United Provinces.

---

**अ. नं. १०२** **श्री**

ता. २३ जून इसवी सन १७५३

खंडेराव होळकरस्य मुद्रेयं. ज्येष्ठ वद्य ७ शके १६७५

राजश्री दामोदर महादेव गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित खंडेराव होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करणें. विशेष. राजश्री बिजेसिंग खत्री यांसी श्री काशीस राजश्री बळवंतसिंग राजे यांजकडे पैक्याच्या तहसिलेनिमित्य पाठविले आहेत. त्यास तुम्हांपासी येतील. तरी नबाब मनसूरअली याजकडील रोजिन्याचें दस्तक यांस करवून देवविणे आणि खावंदचाकरी जलदीनें करू नयेत तो अर्थ करणें. अनमान न करणें. जाणिजे. रवाना छ.२१ माहे साबान बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

No. 102 23-6-1753 A.D.

Khanderao Holkar (son of Subhedar Malharji) sends his agent to the Raja of Benares on monetary matters.

---

**अ. नं. १०३** **श्री**

ता. २९-६-१७५३

श्री म्हाळसाकांत चरणीं<br>तत्पर खंडोजी सुत मल्हारजी होळकर

राजश्री खंडो बाबूराव कमाविसदार प्रगणे इंदूर. गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत. सुरू सलासखमसेनमयाअलफ. तुम्ही मुजरद कासिदासमागमें पत्र पाठविलें पावलें. लिहिलें कीं आज्ञेप्रमाणें तोफा व बाणाच्या काठ्या सर्व सिद्धता आहे. ज्या रोखे घेऊन येऊं म्हणून लिहिलें. कळों आलें. ऐसीयासी इकडील वर्तमान नबाब गाजुदीनखान यांसी दक्षिणच्या सुभ्याचीं वस्त्रें पातशहाकडून देविलीं. त्यांस समागमें घेऊन आगरियापर्यंत आलों. बारा बारा कोसांच्या मजली करून देशास जात आहों. रेवा हंडियाच्या घाटापासीं उतरायाचें आहे. तुम्हांस पूर्वी दोनचार वेळां तोफखान्याचे सिद्धतेविर्सी तपसिलें लिहिलें होतें त्याप्रमाणें तोफासेरी दुसेरी तीनशेरी साडेतीनशेरी चौशेरी पांचशेरी या गोळ्याप्रमाणें तोफा व त्याचे गाडे बैल वगैरे त्याचे सामान व तोफाच्या सांच्याचे गोळे व बाणाच्या छड्या व जिजालाचें सामान इंदुरीं आहे ते व सेंधव्यांत आहे ते व तुम्हांपासी हत्ती आहे तो वगैरे जिन्नस पूर्वी लिहिल्याप्रमाणें घेऊन खरगोणाकडे सरंजामासुद्धा तुम्ही येणें. आम्ही इकडून हंडियाचे घाटास येत असो. तुम्हीं हयगय करून रहाल. आम्ही आलिया तोफांमुळें व सामानामुळें खोळंबा जालिया कार्यास येणार नाहीं. हे पत्र बहुत पत्रांचे जागा जाणून लिहिल्याप्रमाणें सरंजाम घेऊन खरगोणाच्या रोखें सिद्ध असावें. आम्हांस तेथें एक घडीचा अटकाव न होय ऐसें करणें. पर्जन्य लागला नाहीं, उघाड जों आहे तों सिद्ध असणें. मानपूरचा मजकूर लिहिला त्यास पूर्वी राजश्री त्रिंबक–राजदेव यांसी ताकीदपत्रें दिलीं आहेत. ते गोष्टीचें संकट काय. थोरलीं कामें जालियाउपरि पारिपत्य केलें जाईल. जाणिजे छ.२५ रजब. बहुत काय लिहिणें. हें कार्य निकडीचे जाणून मुजरद सरकारची जोडी पाठविली आहे. हे विनंती. मोर्तबसुद : पैवस्त छ १८ साबान.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 103 29-6-1753 A.D.

Malharji's quick despatch of undertakings; ammunition and artillery work. Orders peremptory. He is "King-maker" in the disposal of the Deccan Subbha to Nabab Gazudinkhan.

---

**अ. नं. १०४** **श्री**

आषाढ शु।। १३ शके १६७५, ता.१३ जुलाई, इ. स. १७५३

राजश्री दामोदरपंत : स्वामी गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य : स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष : तुम्हीं पत्र पाठविले तें पावून वर्तमान कळों आलें. आमची हिन्दुस्थानांत जावयाची त्वरा आहे. त्यांस तुम्हीही नाशिकहून कूच केलें म्हणून

लिहिलें त्यासी, आपलाही मुहूर्त आज शुक्रवारचा आहे. कूच होईल. तर तुम्हींही येणें. तुमचे आमचे भेटीचा योग घडोन आलियावर परस्पर वर्तमान कळेल. इकडे योग न आला तर दिल्ली जातां तो घडोन येईल. कळले पाहिजे छ १८ रमजान बापूजी त्रिंबक यांचें प्रयोजन आहे, तरी समागमें घेऊन येणें जाणिजे. अगत्य घेऊन येणें मोर्तबसुद :

No. 104 13-7-1753 A.D.

Subhedar Malharji informs Damodar Hingane that he himself has started for Hindustan-campaign, and asks the latter to start in the same direction.

---

**अ. नं. १०५** **श्री**

मल्हारीसुत खंडेरावस्य मुद्रेयं इ. स. १७५३

राजश्री दामोदर महादेव गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य : स्नेहांकित खंडेराव होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन करणें. विशेष. तुम्ही पत्र पाठविले, प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय सविस्तर कळो आला. नबाबाचे बाहिरीचा मजकूर लिहिला, तरी पठाण रामगंगेच्या पलीकडे गेला. याउपरि त्याचा विश्वास धरावा ऐसें नाही. समागमेंच असो द्यावी. नदीपलीकडे फौज जाऊन शत्रूचे पारिपत्य करावयाचा प्रसंग लिहिला. बहुत उत्तम. नबाब आलियावरी पायाबा दाखवितील, अथवा पूल बांधून देतील, तेथें उतरून नतिजा दिला जाईल. भेटीचा विचार तरी तीर्थरूप सुभेदार पुलाजवळ संनिधच आहेत. नबाब कोसी दुकोसी आलियास तेही अलीकडे उतरतील व भेटतील. मुख्य गोष्टी याउपरि विलंब केल्यास पठाण पलायन करील. मग आजीपर्यंत केल्याचें सार्थक काय ? यास्तव नबाब जलदीनें आल्यास बहुत उत्तम आहे. जाणिजे छ ७ मोहरम प्रथम प्रहर. बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद :

No. 105 1753 A.D.

Khanderao Holkar discusses with Hingane war plans against the Pathans of the United Provinces.

---

**अ. नं. १०६** **श्री मोरया**

ता. १७-१०-१७५३

| श्री म्हाळसाकांत चरणीं<br>तत्पर खंडोजी सुत मल्हारजी<br>होळकर |
|---|

राजश्री अप्पाजीराम गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुरुसन अर्बाखमसेनमयावअलफ. मौजे धारणगांववीर प्रगणे चांदवड येथील जागीर मोगलाई अंमल देखील फौजदारी कुलबाब जहागिरीचा अंमल मख्ता............................रुपये

४५० सन आर्बा. ऐन ४०० जास्ती, ५०
५०० सन खंमस. ऐन ४५० जास्ती, ५०
५५० सनसीत. ऐन ५०० जास्ती, ५०
६०० सन सबा. ऐन ५५० जास्ती, ५०
------
२१००

एकवीसशें रुपये चौसाला करार केले असेत. सनसबापासून पुढें दरसाल रुपये सहाशें करार बमोजीब सरकारांत पावीत जाणें. साल दरसाल रु. ६०० सहाशें मख्ता करार केले असेत पावीत जाणें. रा. छ १९ जिल्हेज बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तब (सुदची अक्षरे येथपासून) मौजे मजकुरचा कौलाप्रमाणें सदरहू ऐवज राजश्री कृष्णाजी व्यंकटेश यांजकडे खरीप रब्बी दो वायदीयानें ऐवज पावता करून कबज घेत जाणें. रवाना छ. मजकूर बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**पळसी संस्थानचे रेकार्ड**

No. 106 17-10-1753 A.D.

Subhedar Malharji grants Mauza Dharangaonvir to Appaji Ram (Palshikar) as Jagir but with a stipulated annual payment by the latter.

---

**अ. नं. १०७** **श्री**

ता. ३ मार्च, इसवी सन १७५४

राजश्री गोविंदपंत गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य. स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती सुरूसन आर्बाखमसेनमयावअलफ. तुम्हांकडून दारू शिसे

कुंभेरीच्या मोर्चामुळें वजन पक्के दारू खंडी २४ शिसे ४ बुधले सुमारी १६ एकूण सव्वादोन खंडी साडेतीन मण सरकारांत जमा असे. छ.९ जमादिलाखर हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकार्ड**

No. 107 3-3-1754 A.D.

Receipt of Gun-powder received during the siege of Kumbher-passed by Malharji Holkar.

---

अ. नं. १०८ **श्री**

ता. ६ मार्च, इसवी सन १७५४

राजश्री गोविंदपंत गोसावी यांसी. स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुरूसन आर्बाखमसेन मयावअलफ. कुंभेरीच्या मोर्च्यामुळें तुम्हांकडील शिसे गुजारत गंगाधर बापू वजन पक्के सहा मण बारूदखानियांत जमा असे.

छ १२ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

No. 108 6-3-1754 A.D.

Receipt of the amount of lead received during the siege of Kumbher-passed by Malharji Holkar.

---

अ. नं. १०९ **श्री**

फाल्गुन शुद्ध १२ शके १६७५, ता. ६-३-१७५४

राजश्री बाजीराव रुखमांगद गोसावी यांसी. स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत. सुरूसन अर्बाखमसेनमयावअलफ. आगऱ्याच्या किल्ल्यांतील तोफा काहडावयास आजबसिंग व महंमद मुरीदखान यांजला येथून पाठविले आहेत. तर किल्लेदारास सांगून तोफा जलद तयार करून पाठविणें. आगऱ्याच्या मुत्सदियास खर्चामुळें रु. १४०० चौदाशें सामलांत देविलें आहेत. त्याप्रमाणें दोन तोफा तयार करून जलद पाठविणें. येविसीं श्रीमंतांनीं राजश्री रामाजी सखाजी व केशव गोविंद यांजला लिहिलें आहे, त्याजवरून कळेल. जाणिजे. छ.११ जमादिलावल. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर
खंडोजी सुत मल्हारजी होळकर

No. 109 6-3-1754 A.D.

Subhedar Malharji Holkar orders Bajirao Rukhamangad to immediately despatch two guns from the Agra-Fort for which joint-payment has already been made.

---

**अ. नं. ११०** **श्री**

ता. २४ मार्च, इसवी सन १७५४

हिशेब गुजारत गोविंद बल्लाळ ऐवज अंतर्वेद हुंडी विठ्ठल जोशी यांजवर औरंगाबादेस शके १६७६ भावनाम संवत्सरे चैत्र शुद्ध १

हुंडी रुपये २५०००

सदरहू ऐवज गोविंद सखोजी यांजकडे देविला असे. यांजपासून आग्रीयाच्या हुंड्या घेतल्या. जिम्मे गिरमाजी त्र्यंबक दिमत मजकूर-ऐवज मथुरेस आणविला असे. रवानगी छ.३० जमादिलावल सोमवार. सदरहू ऐवज जमापोता मुक्काम श्री मथुरा खंडेरावबाबाचे क्रियेमुळें छ.९ जमादिलाखर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 110 24-3-1754 A.D.

Expenses incurred for the funeral-rites of Khanderao Holkar (son of Malharji Holkar) sum of Rupees 25000/-.

---

**अ. नं. १११** **श्री**

ता. २४ मार्च, इसवी सन १७५४

हिशेब शके १६७६ भावनाम संवत्सरे चैत्र शुद्ध प्रतिपदा हुंडी २७००० विठ्ठल रघुनाथ जोशी यांजवर औरंगाबादेस हिशेब गुमास्तां गोविंद बल्लाळ-ऐवज अंतरवेद सदरहू ऐवज गोविंद सखाजी यांजकडे देवविला असे. याजपासोन आगरियाच्या हुंडिया घेतल्या. जिम्मे गिरमाजी त्रिंबक दिमत मजकूर (मल्हारराव) ऐवज मथुरेस आणविला असे. रवानगी छ.३० जमादिलावल सोमवार.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 111 24-3-1754 A.D.

Bills of exchange passed on behalf of Malharrao Holkar. (U. P - Aurangabad Agra - Mathura)

---

**अ. नं. ११२** **श्री**

ता. २३ एप्रिल, इसवी सन १७५४

यादी :

१० सौभाग्यवती गौतमाबाईंच्या कुणबिणीची रवानगी.

१०० कुणबिणी दिमत मल्हारराव बाबा. खंडेराव यांस रवानगी देखील उदाबाई, संताबाई कडील वगैरे.

१०००० छ.२९ खंडेराव यांचे क्रियेस.

विजयादशमीनिमित्त वस्त्रें :

८७४-१२-० खासा मल्हारजी वस्त्रे साडेतीन. १ मंदील २२५, १ दुपट्टा १९९, ।। किनखाब २०० व १ झगा २५० एकूण साडेतीन.

३५७-१२-० सौभाग्यवती गौतमाबाई. पैठणी, चोळी.

३११-०४-० अहिल्याबाई खंडेरावांची स्त्री.

२१३-००-० मल्हारराव होळकरांच्या कन्या २ व सौभाग्यवती गौतमाबाईचे आईस वस्त्रें येणेंप्रमाणें पुणें दरबारांतून बहुमान.

No. 112 23-4-1754 A.D.

List of the expenses incurred by the Poona Durbar on various occasions. The funeral-rites of Khanderao, Malharji's son. The Dasera gifts to Malharji and his family.

---

**अ. नं. ११३** **श्री**

यादी १

१ परगणे लाखेरी येथील सनद रावराजा उमेदसिंगजी बुंदीवाले यांनी खंडेरावजी यांचे नांवें करून दिली ते मिती आषाढ शुद्ध १ संवत् १८०० इ. स. १७४४.

१ परगणे वेरूळ येथील पातशाही फरमान सौ. गौतमाबाई यांचे नांवें आलमगीर शाही सनदा दोन छ.१७ रमजान इ. स. ता.१६-६-१७५४.

१ श्री खंडेराव होळकर पातशाही हुकुमावर कुंभेरकर सुरजमल जाट यांचें लढाईत कामास आले. सबब परगणे अंबाड हा महाल मालेराव होळकर यांचे नांवें दिला. आलमगीर शाही सनदा छ.२५ रमजान ता.२४-७-१७५६.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 113

Abstract :

(1) Pargana Lakheri was granted to Khanderao Holkar by Rao Raja Umedsinghji of Bundee in 1744 A. D.

(1) Pargana Verula was granged by Padshah to Soubhagyawati Gautamabai Holkar (consort of Malharji Holkar) on 16-6-1754 A. D.

(1) Pargana Ambad was granted to Malerao Holkar on 24-7-1756 as his father died in the service of the Emperor on the field of Kumbheri.

---

**अ. नं. ११४** **श्री**

कार्तिक वद्य १३ संवत १८११, मंगळवार ता. १२-११-१७५४

वेदमूर्ती राजश्री सूर्यनारायण शास्त्री पौंडरिक स्वामी गोसावी यांसी. सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार सुरूसनखमसेनमयावअलफ. मौजे पछावर परगणे शहाबाद सरकार कोले प्रांत अंतरवेद सुभे अकबराबाद. हा गांव तुम्हास खंडेराव होळकर यांचे धर्मदान समयी राजश्री मल्हारजी होळकर यांनी उदक घालून इनाम दिला आहे. त्याप्रमाणें सरकारांतून करार करून चालवावें, म्हणून मशारनिल्हेनीं हुजूर दिल्लीचे मुक्कामीं विनंती केली. त्यावरून मल्हारजी होळकर यांनीं धर्मदानसमयीं उदक घालून मौजे मजकूर तुम्हांस इनाम दिले. त्याप्रमाणें सरकारातून खेरीज हक्कदार व इनामदार करून इनाम दिला असे. तरी मौजे मजकूर इनाम अनुभवून सुखरूप राहणें. जाणिजे छ.२६ मोहरम बहुत काय लिहिणें.

शिक्का

No. 114 12-11-1754 A.D.

Raghunathrao Peshwa confirms the grant of the village Pachhavar already made by Malharji Holkar to Suryanarayan Shastri on the occasion

of funeral rites of Khanderao, his son.

---

**अ. नं. ११५** **श्री मोरया**

ज्येष्ठ शुद्ध २, शके १६७७, ता. ११-६-१७५५

राजश्रियाविराजित बापूजी व रा.दामोदरजी स्वामींचे सेवेसीं सेवक गंगाधर यशवंत व रामाजी यादव साष्टांग नमस्कार विनंती उपरि. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. इकडील वृत्त राजश्री सुभेदारांनीं लिहिलेंच आहे. त्यावरोन कळोन येईल. मुख्य गोष्टी राजश्री मल्हारजी सुभेदार यशस्वी. खावंदाच्या प्रतापें अमित्र हतवीर्य करोन कार्यभाग संपादून, बहुत यश संपादिलें. रजपूत बहुत मत्त झाले होते. परंतु बहुत थंडे झाले. हुरूप त्यांजमध्यें राहिला नाहीं. सदैव पत्र पाठवून परामर्ष करीत जाणें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

No. 115 11-6-1755 A.D.

Gangadhar Yeshwant and Ramjee Yadav (Ministers of Subhedar Malharji) write to Bapujee & Damodarjee of the grand victory of the Subhedar over the Rajputs.

---

**अ. नं. ११६** **श्री**

ज्येष्ठ वद्य १०, संवत १८११, शुक्रवार ता. ४-७-१७५५

वेदशास्त्रसंपन्न पौंडरिक यांसी, राजश्री सूर्यनारायण शास्त्री पिता व्यंकट शास्त्री द्राविड, गोत्र बाधुल आपस्तंब वास्तव्य राजमंदिर क्षेत्र काशी. स्वामींचे सेवेसीं. विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान. नमस्कार विनंती सुरूसन सीताखमसेनमयावअलफ. राजश्री गंगाधर यशवंत यांनीं हुजूर इंदूरचे मुक्कामीं येऊन विनंती केली कीं पौंडरिकयाजी सूर्यनारायण शास्त्री हे थोर शिष्ट ब्राह्मण कुटुंबवत्सल श्री क्षेत्रीं स्नानसंध्याकरून राज्यास अभीष्ट चिंतून राहतात. याकरितां स्वामींनीं कृपा करून एक गांव नूतन इनाम करून दिला पाहिजे, त्यावरून मनास आणितां तुम्ही थोर विद्यावंत सत्पात्र कुटुंबवत्सल श्री क्षेत्रीं राहून तुमचे चालविणें आवश्यक म्हणोन तुम्हास मौजे केथरा परगणे अकबरपूर, शहापूर प्रांत अंतर्वेद सरकार कालपी हा गांव नूतन धर्मादाय जलतरू पाषाणनिधीं निक्षेप आदिकरून धर्मादाय दिला असे. तर मौजेमजकूर दरोबस्त तुम्हीं आपले दुमाला करून घेऊन तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें धर्मादाय अनुभवून श्री मध्यें स्नानसंध्याकरून राज्याचें अभीष्ट चिंतून सुखरूप राहणें. जाणिजे छ.२३ रमजान.

No. 116 4-7-1755 A.D.

Grant of an Inam village Viz Kethra to Suryanarayan Shastri by Peshwa Balaji Bajirao, on the recommendation of Gangadhar Yeshwant (Chandrachud, Minister Subhedar Malharji Holkar.)

---

**अ. नं. ११७** **श्री**

मार्गशीर्ष, शके १६७७, इ. स. १७५५

मार्गशीर्ष शुद्धांत शके १६७७ युवानाम संवत्सरी मालेराव होळकर राजेश्री सुभेदार मल्हाररावांचे नातू यांची तुळा नवसाची श्रींच्या कासवावर केली. त्याचा धर्मादाय ब्राह्मणांसी केला. प्रत्येक ब्राह्मणांस वाटणी केली. म्हणोनः ही तुळा सौभाग्यवती गौतमाबाईनीं करविली.

No. 117 1755 A.D.

Malerao Holkar was weighed, and the gifts were distributed among Bramhins. The ceremony was ordered by Saubhagyawati Gautamabai (consort of Subhedar Malharrao Holkar.)

---

**अ. नं. ११८** **श्री**

ता. २० सप्टेंबर, इसवी सन १७५५

(बाबुराव बल्लाळ यांजकडून वासुदेव दीक्षित यांस)

मल्हारजी होळकर खानदेश दरोबस्त जहागिरीच्या पातशाही सनदा आणल्या आहेत.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 118 20-9-1755 A.D.

Malharji Holkar has fetched Jajir-sanads for the whole of the Khandesh districts from the Emperor.

---

**अ. नं. ११९** **श्री**

शिक्का ता. २ जानेवारी, इ. स. १७५६

राजश्री मालजी होळकर बिन खंडेराव येबिन मल्हारजी होळकर व राजश्री जनकोजी बिन जयाजी येबिन राणोजी शिंदे यांनीं हुजूर विनंती केली कीं, सरकार मांडवगड प्रांत माळवा येथील दरोबस्त एकतीस महालचे कानगोईपणाचें वतन सरकारचें आहे. ते स्वामींनीं कृपाळू होऊन आम्हां उभयतांस वतन करून देऊन वतनपत्रें करून द्यावीं. म्हणोन त्याजवरोन हे पूर्वीपासून राज्यांतील सेवक. श्रमसाहस करून कित्येक महत्कार्ये संपादिलीं. स्वामीसेवा एकनिष्ठपणें केली. यांचे चालविणें आवश्यक जाणोन यांजवरी कृपाळू होऊन सरकार-मजकूरचे दरोबस्त एकतीस ३१ महालचें कानगोईपणाचें वतन सरकारचें होतें. तें हल्लीं उभयतांस वतन करून देऊन वतनपत्रें करून दिली.

२ दोन सनदा उभयतांचे नांवच्या.

२ देशाधिकारी, वर्तमानभावी यांस, चौधरात देशमुख सरकार मजकुरास.

...

४

एकूण चार.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 119 2-1-1756 A.D.

Sanad of Joint-gift bestowing the Kangoship of 31 Mahals of Sarkar Mandavagad to Maljee Holkar and Jankojee Shinde-from the Peshwa-on their request to that effect.

---

**अ. नं. १२०** **श्री**

(राजमंडळ पुणें) ता. ९-१-१७५६
जमादिलावल छ.१८ सुरूसन ११५६

१ मौजे सोनगीर तालुके कोपाटणे राजश्री मालेराव होळकर यांचे नांवें जहागीर देणेंबद्दल हुकूम.

१ परगणे चांदवडची सरदेशमुखी सनद रा.मल्हारजी होळकर यांसी देणें मंजूर.

No. 120 9-1-1756 A.D.

1. The village of Songir in the Kopatana Taluka is ordered in Jagir to Malerao Holkar.

1. A Sanad for the Sardeshmukhi of Chandvad is sanctioned to Malharji Holkar.

---

अ. नं. १२१ श्री

ज्येष्ठ शुद्ध ३, शके १६७८, ता. ३१ मे, इसवी सन १७५६

राजश्री भिवजी बाबूराव कमाविसदार परगणे कलबुरगे गोसावी यांस. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य. स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुा सीत खमसेन मयावअलफ. तुम्ही कार्यकर्ते जाणून परगणे मजकुरची कमावीस तुम्हांस सांगितली असे तरी इमानें इतबारें वर्तोन सरकार किफायत करणें. परगणे मजकुर ऐवजीं रसद तुम्हांपासोन करार रु.११०००० एक लक्ष दहा हजार करून राजश्री आप्पाजीराम प्रभु यांजला देविले आसेत तर मशारनिल्हेस सदरहू एक लक्ष दहा हजार पावतेकरून कबज घेणें. कबजाचे मितीप्रमाणें सदरहू व्याज दरसदे रु. सवोत्रा देत जाऊं व्याज मुद्दल परगणे मजकुर ऐवजीं घेऊन सालअखेरीस हिशेब घेऊन हुजूर येणें: व्याज बिनसूट देत जाऊं जाणिजे. छ.२३ रमजान बहुत काय लिहिणें. शके १६७८ धातानाम संवत्सरे ज्येष्ठ शुद्ध ३ हे विनंती. मोर्तबसुद.

श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर
खंडोजी सुत मल्हारजी होळकर

No. 121 31-5-1756 A.D.

Subhedar Malharji Holkar grants the Kamavisdarship of Paragana Kalburga to Bhivji Baburao, after first receiving amount therefor.

---

अ. नं. १२२ श्री

ज्येष्ठ वद्य २, ता. १४ जून, इसवी सन १७५६

श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर
खंडोजी सुत मल्हारजी होळकर

राजश्री चिमणाजी गोविंद कमाविसदार परगणे पाटण गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुासबा खमसेन मयाअलफ राजश्री जनकोजी शिंदे यांजकडून रा.बाळाजी यशवंत प्रगणे मजकुरीं आहेत. त्यास पूर्ववत मामलत चालत आली आहे तेणेंप्रमाणें तुम्ही व ते एका विचारें राहून मामलत करीत जावी. लटका हर्षामर्श वाढवावा यांत जीव नाही. काडीमात्र द्वैत न दाखविणें. पूर्ववतप्रमाणें एका विचारें रहाणें. देवदान मौजे गुंडलेकर यांजकडे समाईक बाकी येणें आहे. त्यास तो पळोन गेला ते समयी उभयतां कमाविसदारानीं त्याचे घरास कडी दिली म्हणून हुजूर विदित जालें.

त्यावरून हल्लीं लिहिले असे तरी उभयता कमाविसदारांनीं त्याचे घरास कडी दिली. त्याप्रमाणेंच तुम्ही व बाळाजी यशवंत एकेविचारे राहून त्याजकडील निर्गम करावयाचा तो करणे. परगणें मजकुरची आबादी एके विचारें राहून त्याजकडील निर्गम करावयाचा तो करीत जाणें. येविसीं फिरोन ल्याहावे ऐसे न करणें. जाणिजे. छ.१५ रमजान. बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**गुलगुले दप्तर, कोटा**

No. 122 14-6-1756 A.D.

Subhedar Malharji exhorts the Kamavisdar of Patan that as the Pargana is a joint property of Holkar and Shinde, their Kamavisdars should co-operate in all matters-past as well as present.

---

**अ. नं. १२३** **श्री**

शके १६७८, संवत् १८१२, ता.१९-१०-१७५६

| श्री राजा शाहू नरपति हर्षनिधान<br>बाळाजी बाजीराव प्रधान |
|---|

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाळाजी पंडित प्रधान ताहमोकदम व गुरव मौजे जेजुरी कडेपठार प्रांत पुणें सुरूसन सबाखमसेनमयावअलफ. मौजे मजकुरी श्री मार्तंडाचे वाघे मुरळ्या यांस बेगार पडत आहे ते माफ करावी म्हणोन राजश्री मल्हारजी होळकर यानीं विनंती केल्यावरून श्री चे वाघे मुरळ्या यांस वेठबेगार माफ केली असे. छ.२४ मोहरम आज्ञाप्रमाण. लेखनसीमा.

No. 123 19-10-1756 A.D.

At the request of Subhedar Malharji the Chhatrapati orders the exemption of Vaghes and Murlies (male & female life-servants) of Shree Martand of Jejuri from forced labour.

---

**अ. नं. १२४** **श्री**

शके १६७८, इ. स. १७५६

श्री क्षेत्र जेजुरी येथील कोटाचें काम राजश्री मल्हारजी होळकर सुभेदार यांनीं सुरू

करविले. किल्ल्याचे कामास प्रारंभ शके १६५२ (ता.९-३-१७३०) वैशाख शुद्ध ३ रोजीं केला. एकंदर खर्च ५८००००० खर्च झाला. कारखान्यावर शामजी नारायण यांचे हातून हिशेब झाला. १ तलावाचे कामास रु.१८००००० खर्च झाला. सुरुवात शके १६७८ सालीं झाली. म्हणोन.

**जेजुरी उपाध्ये याचे वहीवरून**

No. 124 — 1756 A.D.

The Compound-wall round the temple of Sri Martand at Jejuri was commenced in 1730 A.D. by the orders of Subhedar Malharrao. The Tank-work was also completed by his orders.

---

**अ. नं. १२५** — **श्री**

इ. स. १७५६

यादी श्रीमंत खंडेराव होळकर पातशाही हुकुमावरून लढत असतां कुंभेरीस कैलासवासी झाले. सबब जायदादींत परगणे आंबाड महाल वगैरे. मातुश्री अहिल्याबाईसाहेब यांस चोळीकरितां परगणे वेरूळ देऊन पातशहानीं सनदा फरमानें सरकारांत दिले ते खानदेश प्रांतीं बाळासाहेब यांजवर अरबांनीं गर्दी केली त्यावेळेस दप्तराचे कागद संदुकांत होते त्या संदूका गेल्या. त्यांत आंबाड वगैरे महाल व वतनदारी प्रकरणीं कांहीं कागद गेले. अस्सल कागद राहिले नाहीं. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 125 — 1756 A.D.

Imperial grant of Pargana Verul to Ahilyabai as garment-gifts, as her husband fell on the battlefield of Kumbheri in Imperial service.

---

**अ. नं. १२६** — **श्री**

संवत १८१२ शके १६७७, इ. स. १७५६

थोरले सुभेदार मल्हारराव यांनीं खंडेराव होळकर यांचा काळ जाहलेवर मलका जमानीची लूट फसली सन ११६३, शके १६७७, इसवी सन १७५६ मध्यें केली.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 126 1756 A.D.

The camp of Malka Jamani was attacked by Subhedar Malharji Holkar after the demise of Khanderao (His son)

---

**अ. नं. १२७** **श्री**

संवत १८१२, इ. स. १७५६

यादी कैलासवासी श्रीमंत खंडेरावबाबा होळकर यांच्या स्त्रिया व नाटकशाळा व त्यांची माहेरची नांवें. सुरूसन सीताखमसेनमयावअलफ.

३ लग्नाच्या बायका व त्यांनीं नांवें

१ अहिल्याबाई शिंद्यांची कन्या

१ पार्वतीबाई गावड्यांची कन्या

१ सूरत कुंवरबाई अलीमोहन राजाकडील

७ उपस्त्रिया, नाटकशाळा, खांडाराण्या वगैरे

१ पोपाबाई १ राजकुंवरबाई

१ पेमकुंवरबाई १ रामकुंवरबाई

१ गंगाबाई १ सुंदरबाई

१ कुंवारबाई

१ साहेब कुंवर रामजनी १ नाखूबाई दिल्लीची

....
२

....
१२

एकूण बाराजणी. ह्यापैकीं अहिल्याबाई खेरीजकरून अकरा जणी सती गेल्या. कुत्री गुलबदन चितेंत उडी टाकून मेली.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 127 1756 A.D.

List of the wives, and concubines, of Khanderao Holkar; of these Eleven went Satee. A bitch named Gulbadan threw hereself in the funeral-fire and died.

---

अ. नं. १२८ **श्री**

ता. २५-४-१७५७

(इंदूर जमीदार यांचे भाऊबंदांचें निवाडापत्र)

निवाडपत्र शके १६७९ ईश्वरनाम संवत्सरे वैशाख शुद्ध सप्तमी माळवी संवत् १८१४ सर्वजातीनाम संवत्सरे ते दिवशीं न्याहालकर्ण मंडलोई व कनिष्ठ बलकर्ण व जेतकर्ण मंडलोई, परगणे इंदूर सुभा उज्जैन, सुरूसन सबाखमसेनमयावअलफ सन ११६४ निवाडपत्र पंच हार्ती वतनाचा निवाडा करून दिला. उभयतां बंधू वाटा वतनाचा परस्परें मागों लागलें. त्यामुळें कलह होऊन बलकर्ण श्रीमंत राजश्री सुभेदार साहेबांपाशीं गेलें. तेथें जाऊन वर्तमान सांगितलें. त्यावरून श्रीमंतांनीं एका बापाचे पुत्र जाणोन वाटा द्यावा म्हणोन पत्रें दिलीं. परंतु निहलकर्ण मंडलोई यांजकडे वडीलपण व नंदलाल मंडलोई यांच्या स्त्रिया व तेजकर्ण यांच्या स्त्रिया व पुरातन सेवक ऐसा रुपयाचा ऐवज ठरावून हुजूरने द्यावा. त्यास एक बंधू बलकर्ण मजकूर हुजूर गेले. उभयतां जाऊन फडशा व्हावा तो न झाला. निवाड-पत्रें अवकाशें करून आलीं. त्यावर दक्षिण प्रांतांतून स्वारी श्रीमंतांची कस्बेमजकूरीं माघ मासीं आलीं. ते समयीं सरदारी खर्चाविषयीं वाटा असावा ऐसा अर्ज श्रीमंतापाशीं केला त्यावर येथून कूच होऊन अवंतिकेस गेले. तेथें उभयतां बंधूही मागती अर्ज केला. त्याजवर श्रीमंतांनीं पंचाईत प्रमाण आहे. तेथील वतनदार व परगणे मजकूरचे वतनदार पाटील साहुकार मातब्बर जमा करून पंचाईत करावी, येविशीं राजश्री दत्ताजी गणेश कमाविसदार यांस आज्ञा झाली. त्यावरून मशारनिल्हेनीं पंचाईत जमा केली येणेप्रमाणें तपशीलवार.

| पंडित व वैदिक ब्राह्मण, तपशीलवार | दरमहालचे वतनदार |
|---|---|
| १ वे. शा. सं. पदमाकर उपाध्ये ज्योतिषी व धर्माधिकारी, संगमेश्वर | २ निहालचंद ठाकूर, संस्थान धार मांडव, खासा व गुमास्ते |
| १ वे. मू. रा. बालंभट भसे, सांप्रत वास्तव्य पुणतांबे | १ देहसिंग मंडलोई सावेर |
| १ वे. शा. सं. अंबादास पुराणिक निस्बत गंगाभागिरथी अहिल्याबाई | १ गजसिंग मंडलोई देपालपूर |
| १ वे. शा. सं.मल्हारभट पुराणिक निस्बत सौभाग्यवती गौतमाबाई | २ मंडलोई रजपूत हिसेदार बिजेसिंग, हटेसिंग |
| १ वे. शा. सं. राजश्री महादेव जोशी अडवेकर प्रांत राजापूर | २ कानगो |
| ... | १ भगोतीदास |
| ५ | १ नाथूराम |
| असामी | १ सायर कानगो दुर्गादास |

१ रणजीतगीर गोसावी
१ धोंडो कृष्ण कोतवाल
१ नारो सिद्धेश्वर
१ कुंवरचंद व्यास
१ हजरत काजी हिदायतउल्ला
...
५

४ पाटील. कनाडेकर १ हरजी
१ नरसिंग मंडलोई, फकीरचंद पाटील, सुंदर पाटील भिचोली
४ साहुकार...
१ गंभीरचंद
१ रामरतन
१ सेख महंमद
१ रणछोड जोशी
....
१७

तेरीज पंचाईत इसम २७

एकूण सत्तावीस असामी एकत्र करून परस्परें उभयतां बंधूचे राजीनामे एकत्र घेऊन पंचाईत न्याये वाटे ठरावून दिले. येणेंप्रमाणें तपशीलवार.

१ दामी परगणे मजकूरची होईल त्याचे सुद्धा पांच ५ करावे. पैकीं वजा सरदारी वडीलपणा व खर्च कुटुंब परिवार, राव नंदलाल यांच्या स्त्रिया व राव तेजकर्ण यांच्या स्त्रिया वगैरे यांस वाटण्या बलकर्णाकडे. कलम

१ बाकी वाटें सुमारे चार ४ तपशील.

२ राव निहालकर्ण मंडलोई दोन वाटे. राव बलकर्ण व तेजकर्ण दोन वाटे. मौजे केळोद गांव सरकारातून इनाम आहे. त्याचा वर्षास आकार करून वाटें सुमारी ५ पांच करावे. पैकीं वजा निहालकर्ण मंडलोई यांजकडे. वडीलपणा खर्च वगैरे वाटा.

१ तपशील बाकी वाटे २ राव निहालकर्ण व राव बलकर्ण व तेजकर्ण २

१ जिरायती गांवगन्नावार ज्या आहेत त्यापैकीं राव नंदलाल व राव तेजकर्ण आपल्या स्त्रियास व बहिणीस व कन्यास जी जमीन आपण दिली असेल त्या जिरायती वजा करून बाकी जिरायती राहतील त्यापैकीं राव मशारनिल्हे यांनीं आपल्या स्त्रियांस ज्या जिरायती दिल्या आहेत तो त्यांजकडे चालतच आहे. पुढें त्यांचे दिवसकार्य उभयतांही खर्च लाविला तर दोघांही वाटून घ्यावा. निहालकर्ण एकेच खर्च लावतील तर तेच घेतील. परंतु त्यांनीं जिरायती तूर्त वजा करून बाकी राहिल्या जिरायती त्यांचे वाटे सुमारें ५ पांच करावे. पैकीं वजा सरदारी खर्च वगैरे निहालकर्णाकडे वाटा सुमारी १, बाकी सुमारें जिरायती ४ तपशील २ निहालकर्ण वाटे. २ बालकर्ण व तेजकर्ण वाटे :

एकूण दामी व जिरायती व इनामगांवचा वाटा सदरहूप्रमाणें पंचाही करार करून दिले. येणेंप्रमाणें उभयतांही उपभोग करावा. शिवाय कलम

पित्याच्या वेळेस कर्ज देणें लोकांचे असेल त्यांचा काळ झाल्यावर आजवर निहालकर्ण यांनीं वारलें असेल त्याचा वाटा उभयतां कनिष्ठ बंधू यांनीं पंचादोई प्रमाणें

वारावें तपशीलवार.

३ वाटे निहालकर्ण यांनीं वारावें. २ वाटे उभयतां बंधूंनीं वारावे. बागबगीचे शिवाय असतील ते पंचादोई प्रमाणें वाटून घ्यावे. कलम १

दप्तर निहालकर्ण, बलकर्ण व तेजकर्ण मिळोन गुमास्ता एक-दप्तर निहालकर्णाकडे असावें. कलम १

राणीपुरा येथे पैदास होईल ते सदरहूप्रमाणें वाटून घ्यावें. कलम १

तेल्याबाबत खुंट वगैरे सुतळीचा तोडा व उगाई सदरहू पंचादोईप्रमाणें वाटून घ्यावें. कलम १

पालखी सरकारांतून वेतन आहे. निहालकर्ण वडील बंधू यांजकडे करार. कलम १

पाटीलकीचा गांव, परसाईपणाचे गांव असतील ते सदरहू पंचदोईप्रमाणें वाटून घ्यावें. कलम १

हवेली वाडा दुकान वगैरे घरें पंचदोईप्रमाणें वाटे. कलम १

मानपान वडीलपणा दसकते वासलातीवर निहालकर्ण यानीं करावे. कलम १

वेतनसंबंधीं परस्परें गुन्हेगारी वगैरे प्राप्त झाली तर सदरहूप्रमाणें पंचदोईप्रमाणें घ्यावें. कलम १

सायरीवर. प्राप्त होईल ते सदरहू पंचदोईप्रमाणें वाटून घ्यावें. कलम १

कलमे ११

एकूण कलमें सुमारे ११ अकरा पंचादोईकरून दिविली असेत. तरी सदरहू लिहिल्याप्रमाणें दामी व जिरायती व इनामी वगैरे करार करून दिल्याप्रमाणें वाटून घ्यावें. जाणिजे. उपभोग करावा छ.५ माहे साबान.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 128 25-4-1757 A.D.

An illustration of the Judicial Panchayat System in the times of Subhedar Malharrao Holkar. Distribution of family property, honours & among Nihyalkarana Balkarna, and Jetkarna Mandloi of Indore.

---

**अ. नं. १२९** **श्री**

ता. ६-१०-१७५७

राजश्री (या पुढील कागद फाटला) अधिक आश्विन वद्य ९, शके १६७९,

स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत उपरि साकल्य अर्थ. महाराजा रामसिंग

व बखतसिंग या उभयतांचे सौरस्य करून दिर्ली याचे वृत्त तुमच्या कासिदा समागमें अलाहिदा पत्रें पाठविली असत. त्यावरोन कळों येईल. मेवा, डाली पाठविली तीं पोहचलीं. तुम्ही आपलेकडील दिनचर्येचे वर्तमान पातशहा व अमीर यांचा मनसबा कर्तव्य तो लिहीत जाणें. छ.२१ मोहरम बहुत काय लिहिणें. लोभ असो दिजे. हे विनंती. मोर्तबसुद.

श्री म्हाळसाकांत चरणीं
तत्पर खंडोजी सुत
मल्हारजी होळकर

No. 129 6-10-1757 A.D.

News of the reconciliation of Maharaja Ramsing and Bakhatsing sent from the court of Subhedar Malharrao Holkar.

---

**अ. नं. १३०** **श्री**

ता. ३१ डिसेंबर, इसवी सन १७५७

(ॲब्स्ट्रॅक्ट) राघोबांचे मल्हारजी होळकरांस पत्र छ.१९

अंतर्वेद प्रांतांतील परगणे फत्तेपूर, कुंवरपूर, कटिया गुजर या महालांची जमा रु. ३१४५८१ तीन लक्ष चौदा हजार पाचशें ऐक्यांयशीं सालिना तुमच्या फौजखर्चास दिले आहेत.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 130 31-12-1757 A.D.

Peshea Raghobadada assigns to Malharji Holkar the Pargana of Fatepur, Kuvarpur, and Katiya-Gujar (in the United Provinces) with an annual revenue of Rs. 3,14,581 for the maintenance of his army.

---

**अ. नं. १३१** **श्री**

पौष, शके १६७९, इ. स. १७५८

राजश्री दामोदरपंत गोसावी यांसी स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि.

तुम्हांस जाऊन आज पांच रोज झाले. अद्याप निर्गमाची गोष्ट करून आले नाहींत. पातशहास आर्जी आणविली. त्यास तुम्ही गेलेसे तेव्हां आर्जीचा मजकूरही नव्हता. खिल्लत बहुमान देखील आणावयास कांहीं विलंबाची गोष्ट नव्हती. हल्लीं तुमची चिठ्ठी विलंबाचीसी दिसोन येती. तर ही गोष्ट कार्याची नाहीं. या उपरि अम्हांस दिरंगाईखालें आणि दिवसगतीवर टाकायासी अनुकूल पडत नाहीं. याजकरितां श्रीमंतांचीही चिठ्ठी आली आहे आणि या उपरि विलंब न लावितां यादीप्रमाणें कामकाजाचा गुंता उरकून जलद येणें. जर दिवसगतीचीच गोष्ट असली तर साफ जाब घेऊन येणें. परंतु याउपरि एक दिवस दिरंग कार्याचा नाही. जे याद ठरावून मुकरर करून दिली त्यापैकीं एक गोष्ट उणी अधिक केली तर कार्यास येणार नाही. तसेंच असेल तर तुम्हीं साफ उठोन येणें. विलंबाखाले घालून न राहणें. बहुत काय लिहिणें. हे विनंती. मोर्तबसुद.

No. 131 1758 A.D.

Subhedar Malharrao Holkar sends peremptory orders to Damodarpant (Hingane) regarding the robe of honour to be secured from the Padshah, and other political matters.

---

**अ. नं. १३२** **श्री**

ता.१ एप्रिल, इ. स. १७५८

राजश्री चिमणाजी गोविंद गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुरूसन समानखमसेनमयावअलफ परगणे अलीपूर खेडा प्रांत अंतर्वेद महाल तुम्हांकडून दूर करून राजश्री आनंदराव राम यांजला सरंजाम दिला असे. त्याप्रमाणें मशारनिल्हे परगणे मजकुरी अंमल करतील. तुम्ही दखलगिरी न करणें आणि सालमजकूरचा ऐवज तुम्हाकडे वसूल आला आहे तो पंत मशारनिल्हेकडे देणें. परगणे मजकूरचे तालुकेसुद्धां अंमल देणें जाणिजे. चंद्र २२ रज्जब बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**पळसी रेकॉर्ड**

No. 132 1-4-1758 A.D.

Subhedar Malharrao Holkar assigns Pargana Alipurkheda (United Provinces to Anandrao Rama (Palshikar) as Saranjami, after removing Chimanaji Govind the previous assignee.

---

**अ. नं. १३३** **श्री शंकर**

आषाढ वद्य १, ता. २१ जुलाई, इ. स. १७५८

तीर्थस्वरूप राजश्री गंगोबा तात्या वडिलांचे सेवेसीं. अपत्येसमान रामचंद्र कृष्णराव साष्टांग नमस्कार सुरूसन तिसाखमसेनमयावअलफ. परगणे आगर येथील मुजमूचें वेतन रुपये ३५०० साडेतीन हजार श्रीमंत राजश्री दादासाहेब यांनीं रुपराम कटारी दिमत सुरजमल जाट त्यांजकडून देविलें सन खमसखमसेनमयावअलफ बाबत ते सदरहू रुपये केसो गोपाळ कारखाना घाट श्री वृंदावन यांजकडे तुम्हीं जमा करविले होते ते रुपये वेदमूर्ती राजश्री सखंभटजी वेसीकर यांचे विद्यमानें साडेतीन हजार भरून पावलो. मुक्काम नजीक मालपुरा प्रांत जयनगर मिती आषाढ वद्य प्रतिपदा शके १६८० बहुधान नाम संवत्सरे बहुत काय लिहिणें हे विनंती.

साक्ष. (सही) रामभट सुदामे.

खंडो बच्याजी कुलकर्णी कसबे कोरहाळे परगणे संगमनेर

**चंद्रचूड दप्तर**

No. 133 21-7-1758 A.D.

Raghoba Dada Peshwa granted the Muzum-ship of Prant Agar to Ramchandra Krishnarao-the latter paid the amount to Brindawan Ghat Karkhana (working under the Holkar Raj.)

---

**अ. नं. १३४** **श्री**

शिक्का

ता. ३० आगस्ट, इसवी सन १७५८
श्रावण वद्य १२, संवत १८१५

राजश्री आबाजी रघुनाथ कमाविसदार परगणे कोटे गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत. सुा तिसाखमसेनमयावअलफ. अखारामाची पत्रें येतात कीं ऐवजाचा निकाल कराराप्रमाणें करून देतों पण ऐवज अद्याप सरकारांत पावत नाहीं. तर निकड करून ऐवज घेणें. राजश्री जनकोजी शिंदे यांच्या आमच्या भेटी झाल्या. परस्परें सारस्य होऊन कोणेविसीं संशय राहिला नाहीं. त्यास तुम्ही व राजश्री बालाजी यशवंत पूर्ववत्प्रमाणें एकचित्त राहोन सरकारचे कामकाज करीत जाणें आणि एकंदर हिशेब तीनसाला त्यांजकडे ऐवज काय, तुम्हाकडे काय, फाजील ऐवज कोणाकडे निघतो ते सविस्तर लिहिणें. सारांश, उभयतां एकविचारें राहून हुजूर नालीस येऊं न देणें. त्यांचा आपला सामाईक कारभार चालत आल्याप्रमाणें चालविणें. जाणिजे. छ.२५ जिल्हेज. बहुत

काय लिहिणें. मोर्तबसुद.

**कोटे येथील गुलगुले दप्तर अस्सल पत्र व्यवहार**

No. 134 30-8-1758 A.D.

Subhedar Malharji writes to the Kamavisdar Pargana Kota to recover the amount due from Akharam (the joint-Kamavisdar of Shinde and Holkar.)

---

**अ. नं. १३५** **श्री**

ता.११-९-१७५८

राजश्री नारो बालाजी व राजश्री सदाशिव गोपाळ कमाविसदार परगणे बुंदी गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे दंडवत सुरूसन तिसाखमसेनमयावअलफ. प्रांत मजकूर पैकीं राजश्री आनंदराव राम यांजकडे गांव तपशील

१ परगणे बुंदीपैकीं

१ परगणे नेणवेपैकीं

.........

२

दोन गांव. कुलबाब. कुलकानू सरकारातून समाइक चालत आल्याप्रमाणें करार करून दिला आहे तरी सदरहू दोन गांव पंत मशारनिल्हेकडे चालत आलेप्रमाणें चालवीत जाणें. प्रतिवर्षी नवीन पत्रांचा उजर न करणें. देखील सरकारची चौथाई दरोबस्त दिले असेत. कोणेविर्सी दिक्कत न करणें. जाणिजे छ. ७ मोहरम बहुत काय लिहिणें हे विनंती. मोहरम.

**पळसी रेकॉर्ड**

No. 135 11-9-1758 A.D.

Joint-Grant of two villages to Anandrao Rama (Palshikar) By Malharji Holkar and Jankoji Shinde.

---

**अ. नं. १३६** **श्री**

ता. २ फेब्रुवारी, इसवी सन १७५९

सौभाग्यादिसंपन्न वज्रचुडेमंडित गौतमाबाई यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित गोविंद बल्लाळ आशीर्वाद विनंती. येथील कुशल तागाइत फाल्गुन शुद्ध ४ पावेतों कृपेंकरून वर्तमान यथास्थित असो विशेष. आपला निरोप घेऊन स्वार जाहलों ते जगमनपुरीं आलो. मार्गामध्ये दांडग्यांनीं फारच हंगामा केला. दोन दोन हजार हत्यारबंद आड होऊन दंगेबारीनें जुमस येऊं लागले. रात्रंदिवस कंबर बांधून उभेच. निघों दिलें नाहीं. अंतर्वेदींत जमीदारांनीं मोठी गडबड केली आहे. तालगांवीं आमचे कमाविसदारापाशीं पांचसहाशे राऊत होते. त्यांजवर जमीदाराचे प्यादे सात हजार व राऊत हजार जमा होऊन आला. गढ्या जागा जागा आम्हीं पाडल्या. त्या बांधो लागले. ठाण्यासी कजिया केला. रात्रीचे छापे कमाविसदारावर घातले. गांव तमाम तालगांव कनोज चोंडळ येथें जाळलें. रयत बेफाम आणि त्यांचा जमाव मातबर जाहला. टिकाव न होय. कमाविसदार व कारकून निघोन फुफुंदीजवळ एक शंकर म्हणून गढी आहे तेथें चिरंजीवानिसीं फौज त्यांचे कुमकेस पाठविली आहे. आम्ही दोन रोजांत जाऊन पोचतों. जमीदाराचे पारिपत्य उत्तम प्रकारे करितों. मागाहून सविस्तर लिहून पाठवितो. दिल्लीकडील वर्तमान आपणांकडे वरचेवर येतच असेल. गिलच्या आपले फौजेवर चालोन येऊ लागला तेव्हां दिल्ली सोडून पुढें बरा अंतरा पडतांच पिछाडीवर राजश्री गंगाधरपंत तात्यांनीं जाऊन घातले. त्याजवर गिलच्या फिरतो तों इतक्यांत पुढें राजश्री सुभेदार व राजश्री जनकोजी बाबा होते यांनीं तो मागें मुरकता पछाडी जाऊन मारिली. दोन हत्ती व दोनतीनशें घोडें पाडाव करून आणिले व गिलचेही बहुत मारिले. त्यांजवर सहलावत चांगली बसली. गिलचा मुकाम करून राहिला. आपल्याही फौजा त्याचे आसपास आहेत. रसद त्याजला पोहचत नाहीं. दोन शेर पीठ त्यांचे लष्करांत जाहलें. याप्रमाणें वर्तमान आले. आमच्या मुजरत जोड्या पांच-सहा गेल्या आहेत. वरचेवर वर्तमान येत जाईल ते लिहित जाऊं. गिलच्याचे पारिपत्य ईश्वर इच्छेने थोड्याच दिवसांत होईल. आपला मुक्काम कोठें ठरेल तो लिहावा. देशाकडील मजकूर तर श्रीमंत राजश्री भाऊसाहेब पुढें तीस हजार फौजानिसीं मोंगलाकडे गेले. भालकीवर मोगलांची गाठ पडली. मोंगलापाशीं जमाव थोडाच आहे. सलुख होईल श्रीमंत राजश्री नानासाहेब आमदा नगरावर आहेत. आतांच दुसरी पत्रें आम्हाकडे डिगेहून आली. त्यात वर्तमान कीं अबदाली मेवाड प्रांतीं आहे. त्यांचे पलीकडे, आसपास आपल्या फौजा आहेत. अबदालीची रसद बंद केली आहें. ईश्वरकृपेनें सत्वरच त्यांचे पारिपत्य होईल. बहुत काय लिहिणें कृपा करीत जावी हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 136 2-2-1759 A.D.

Govind Ballal (Bundele) writes a series of news to Saubhagyawati Gautamabai Holkar (consort of Subhedar Malhar Rao).-news from the United Provinces skirmishes with the Gilchis; the fight at Bhalki, (Hyderabad State). Abdali in Mewar.

---

**अ. नं. १३७** **श्री**

ता. ६ फेब्रुवारी, इसवी सन १७५९

राजश्री मल्हारजीबाबा सुभेदार गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित गोविंद बल्लाळ कृतानेक आशीर्वाद विनंती उपरि. श्रीमंत रा.पंतप्रधान यांनीं प्रांत अंतर्वेदी येथील हिस्सा शेकडा रुपये २३-५-० प्रमाणें वाटणी करून देणें, म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें वाटणी करून द्यावी तो आज अंमल आम्हाकडे गुदरला. बाकी सहा महिने राहिले. त्यास यांचा हिस्सा जो बसेल तो शिरस्त्याप्रमाणें हल्ली सालची जमा पैसानपैसा आकार होईल तो साहेबांस प्रविष्ट करूं. फिरून सनदेचा हिला करणार नाही. अखेरसालीं हुजूर येऊन आज्ञेप्रमाणें वाटणी करून देऊं. तपशील.

१ परगणे सकुराबाद. १ परगणे फफुंद. १ परगणे इटावा १ चकलाकुरा.

१ चक्तानाकडा. एकूण महाल ५ पांचाचा जो ऐवज होईल, त्यापैकीं रु. २३-५-० तेवीस रुपये पांच आणे प्रमाणें देऊं साहेबांचे हल्लीसालचा ऐवज व आषाढ अखेरसालीं वाटणी आपण येऊन करून देऊं. मिती माघ शुद्ध १० रोज संवत् १८१५ सुरूसन तिसा खमसेनमयावअलफ. बल्लाळ नारो केशव. बहुत काय लिहिणें हे विनंती. सन तिसाचे सालचा जमाबंदीचा ऐवज जो जमा होईल त्याप्रमाणें सरकारी हिस्सा साहेबांचा पोंचवून देऊं. मिती मजकूर. हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 137 6-2-1759 A.D.

Govind Ballal (Bundele) promises to pay Subhedar Malharji the latter's portion of Rs. 23-0-5 per cent from the five Parganas of the United Provinces, as ordered by the Peshwa.

---

**अ. नं. १३८** **श्री**

ता. १७ जून, इसवी सन १७५९

राजश्री विनायक. त्रिंबकराव सदाशिव दीक्षित गोसावी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत उपरि. आत्मकार्य वतनसंबंधीं तुम्हांपासोन घेतले कर्ज रुपये ५०००० अंके पन्नास हजार यांसी व्याज दरमहा दरशेकडा १ एकोत्राप्रमाणें बिनसूट पुण्यास जालेमुदतीस देऊं. मिती शके १६८१ प्रमाथीनाम संवत्सरे ज्येष्ठ वद्य ७ सुरुसन मयावअलफ याशिवाय रुपये २५००० पंचवीस हजार यांसी व्याज सदरहूप्रमाणें जाल्या मुदतीस पुण्यास पावते करूं. पाऊण लक्ष रु. मिती मजकुर हे विनंती.

**सरकारी रेकार्ड**

No. 138 17-6-1759 A.D.

Subhedar Malharji passes a bond of Rupees Seventy five thousand at the rate of Re. 1/- per month to Vinayakrao Dixit.

---

**अ. नं. १३९** **श्री**

कार्तिक शुद्ध १० शके १६८१, ता. ३१-१०-१७५९

राजश्री दामोदर महादेव गोसावी यांसी स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि तुम्ही येथून हत्ती घेऊन गेला. तेव्हां बोलोन गेलेत कीं राजश्री सटवाजी खराडे यांजकडील घोडीं पाठऊन देतो. त्यास अद्यापि घोडीं आली नाहीत, तर घोडीं गेली आहेत, ते आणून मग हत्ती वजीरास देणें. घोडीं आलियाशिवाय हत्ती न देणें घोडीं तुम्हापासी आलीं म्हणजे हत्ती देणें. छ.९ रविलावल हे विनंती. मोर्तबसुद.

No. 139 31-10-1759 A.D.

Subhedar Malharji writes to Damodar Mahadeo that the elephant given by the Subhedar should be presented to the Vazir after the return of the horses, as first settled.

---

**अ. नं. १४०** **श्री**

इ. स. १७५९

राजश्री वासुदेव संभाजी कमाविसदार परगणे अंबाड. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मालेराव होळकर दंडवत सुरूसन सितेनमयावअलफ. सरकारांत कापडाचे प्रयोजन याजकरितां कापड खरीद करावयासी हुजुराहून साताप्पा व नारो सामराज पैठण व जालपुरास पाठविले आहेत. त्यास खर्चीकरितां रोजमुरा दीडमाही रुपये १० साताप्पा खुः द. ३०, नारो सामराज दुमाही. एकूण ४० रुपये तुम्हांपासून देवविले असे तरी सदरहू चाळीस रुपये उभयतां पावते करून पावलियाचे कबज देणें जाणिजे छ.२६ बहुत काय लिहिणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 140 1759 A.D.

Malerao (Grandson of Subhedar Malharrao) orders the Kamavisdar Pargana Ambad for certain payments incurred in cloth-purchase at Paithan and Jalpura.

---

अ. नं. १४१ श्री

(शिक्का) पैवस्त छ. ३० रजब

राजश्री पुरूषोत्तम महादेव गोसावी यांसी स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि. तुम्ही पत्र पाठविले तें पावलें. दुदेखान वगैरे रोहिले निघाले. पारीहून कूच करून गुणमुक्तेश्वराचें रोखें जाऊन, शेरपुरचे घाटास पूल बांधोन, अलीकडे उतरून परिक्षित गडास यावे. तेथून मेरठ जवळ आहे, म्हणून लिहिलें. ते सर्व विदित झाले. ऐसियासी, त्यांची बातमी पक्की राखून तुम्ही आपले जागां सावध राहून आम्हांस लिहून पाठविणें. त्यासारिखें कुमकेची तजवीज केली जाईल. खरी बातमी राखून वरचेवर पै दर पे लिहित जाणें. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

No. 141

Subhedar Malharji is informed by Purushottam Mahadeo of 'the march of Rohillas. The Subhedar is requested to march from Gunamukteshwar, Sherpur-Ghat Parikshit Gad to Meerat.

---

अ. नं. १४२ श्री

राजश्री मल्हारजी होळकर सुभेदार व राजश्री जयाजी शिंदे सुभेदार गोसावी यांसी सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित बापूजी महादेव अनेक आशीर्वाद विनंती उपरि येथील कुशल ता. छ. २५ माहे जिल्हेज मुकाम इंद्रप्रस्थ जाणार स्वकुशल लिहित असलें पाहिजे. विशेष रामसिंग यांजकडून जगन्नाथ पुरोहित व सावंतसिंग आपणासमीप आले आहेत. कित्येक कामकाजानिमित्त विनंती करतील, ते मान्य करावी. थोड्या गोष्टीनें व शिष्टाचारानें काम होत असलिया कां चुकतील? पांचसातशें स्वार एखादा नामी सरदार यांच्या समागमें द्यावा. हेच आपलें काम बजावून घेतील. रजपूत बखतासिंगाकडोन फुटोन यांजकडे आले व येतात व आपल्यास यश येते, याजकरितां

आपणास लिहिलें असे. करणार आपण समर्थ आहात. बहुत काय लिहिणें कृपा लोभ दुणाविजे हे विनंती.

No. 142

Subhedar Malharji Holkar and Jayaee Shinde are informed by Bapujee Mahadeo (Hingane). Both should comply with the request that will be made by the agents Ramasingh. Very great advantage will be reaped by a little sacrifice on their part. A large number of the Rajputs has come over to his party.

---

**अ. नं. १४३** **श्री**

शिक्का पैवस्त छ. २५ रजब

राजश्री पुरूषोत्तम महादेव गोसावी यांसी स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि. तुम्ही पत्र पाठविले ते पावोन सकल अर्थ ध्यानांस आला. राजश्री नारोपंत व अप्पाजीपंतांचीं पत्रें गंगापारीहून आलीं, ती सेवेसीं पाठविलीं आहेत. मिरापुराकडील जेथें आहे तेथेंच आहे. धामधुम करून जातात, आमची बंदोबस्ती सर्व यथास्थितच आहे. म्हणोन कित्येक अर्थी पत्र दर्शविलें ते कळलें. ऐशास उभयतां पंत मशारनिल्हेकडे कासीद पाठवून तिकडील बातमी ठीक आणून लिहीत जावी. तुम्हीही मिरापूरचे फौजेची बातमी पै देर पै आणून, ठाणियांत बहुत सावधपणे असत जाणें. रवाना छ. २४ रजब बहुत काय लिहिणें रवाना हे विनंती. मोर्तबसुद.

No. 143

Subhedar Malharji asks Pururshottam Mahadeo (Hingane) to send him news of the army stationed at Mirapur.

---

**अ. नं. १४४** **श्री**

राजश्री दामोदर महादेव व पुरूषोत्तम महादेव. गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असावें. विशेष. पत्र पाठविले तें पावोन वर्तमान कळों आले. नबाबांनीं इसमालखान व रामनारायण व आलाकुलीखान व बालाउल्लाखां वगैरे सरदार मातबर फौजसुद्धां व भारी तोफखान्यासुद्धां पुढें आपणाकडे पाठविले आहेत. नबाबही लांब लांब

मजला करून येत आहेत, म्हणून लिहिलें कळो आलें. त्यास, इकडील वर्तमान तरी रोहिले शनिवारचे रात्रीं पळोन गेले. पठाण रविवारीं पळाले. त्यास रामगंगेस पूल सिद्ध केला. याउपरि फौजा रवाना होतील. लुगारे राउत हजार दोन हजार ताफे बांधून गेले. याप्रकारचें वर्तमान जाले. त्यास नबाबानीं सत्वर आलिया उत्तम आहे. दिरंग लावण्याचा प्रसंग नाहीं. तुम्ही सर्व वृत्त नबाबास निवेदन करून सत्वर येत ते करावे. छ. १० मोहरम बहुत काय लिहिणें. हे विनंती मोर्तबसुद.

**राजवाडे संग्रह**

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>खंडोजी सुत मल्हारजी होळकर |
|---|

No. 144

Subhedar Malharji informs Damodar Mahadeo (Hingane) of the complete route of the Rohillas and the Pathans near the Rama-ganga river.

---

**अ. नं. १४५** **श्री**

शिक्का पैवस्त छ. २४ रविलावल

राजश्री दामोदर महादेव गोसावी यांसी. स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि. पत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें. लिहिलें कीं श्रीमंत राजश्री दादा गणमुक्तेश्वराकडे गेले आणि आपण रेवाडी प्रांतें मुकाम केलें आणि आपली फौज खानखानाचे कार्याकरितां येथें आली. याजमुळे, वजीर पैका द्यावयासी गईगुदर करितात म्हणोन तपशिल लिहिलें. ऐसीयासीं, श्रीमंत गुणमुक्तेश्वरास गेले, त्या मजकुरांत तुम्हीच होतां. खानखानास लाहोरास पोहोचविण्याकरितां फौज द्यावी, या इत्यर्थांत तुम्हीच आहांत. त्याजला हे सर्व मजकुर तुमच्याच विद्यमानाचे आहेत. वजीर पैका देतीलच. ते अनमान करतील तर तुम्हीच त्यांजकडून देवाल, येअर्थी संदेह नाही. आम्हाकडील मजकुर तरी आम्ही कूच करून जात असो. आमचे मुक्कामाचा येथे कांहीं गुंता नाही. सत्वरीच कूच करून जात असे. वजीरानीं आमचा पैका न द्यावा हे काय ? सर्व कारभार तुमचेच विद्यमानें झाला आहे. वजीरास ताकीद करून ऐवज वसूल तुम्हीच कराल. येविसीं सर्व प्रकारें तुमचा भरवसा आहे. रवाना छ. २२ रविलावल. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

No. 145

Subhedar Malharji Holkar writes to Damodar Mahadeo (Hingane).

Subhedar holds the latter responsible for all the steps taken by Dadasaheb in the march and the aid given to Khankhan. He, further, pressess Hingane to recover all the money promised by the Vazir.

---

**अ. नं. १४६** **श्री**

पैवस्त छ. २८ साबान

राजश्री दामोदर महादेव व राजश्री पुरूषोत्तम महादेव व रा. देवराव महादेव गोसावी यांस स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि. पत्र पाठविले ते पावून वर्तमान कळो आलें. अबदाल्ली दिल्ली पलीकडें गेला. गाजुदिनखान अंतर्वेद प्रांतें पठाण रोहिल्यासी मिळोन आहे, दोन शाहजादे समागमें आहेत. नजीबखान दिल्लीस आहे यास्तव आपलें आगमन या प्रांतें जालियाने सर्व बंदोबस्त होईल म्हणोन विस्तारें लिहिलें कळों आलें. ऐसियास प्रस्तुत त्याच प्रांतें यावयाचें म्हणून विचार केला, परंतु जैपूरचे मामलतीमुळें गुंता जाला आहे. येथील निर्गम करून सत्वरीच त्या प्रांतें येत असों. तिकडे आलियानंतर उपयोगी अर्थ पाहून कर्तव्य तें केलें जाईल. रवाना छ. १३ साबान बहुत काय लिहिणें हे विनंती मोर्तबसुद.

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>खंडोजी सुत मल्हारजी होळकर |
|---|

No. 146

Subhedar Malharji Holkar acknowledges the receipt of a letter from the Hingane brothers giving details of the march of Abdali. In compliance with their request he declares his intention to march in that direction after finishing political affairs of Jeypore.

---

**अ. नं. १४७** **श्री**

राजश्री बापूजी महादेव व पुरूषोत्तम महादेव. गोसावी यांसी स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि तुम्हीं छ. १ रविलखरर्ची पत्रें पाठविलीं, ती छ. ११ मिनहूस प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहला; दिल्लीकडील नजीबखान व याकुबअली खान व ठाकुर सुरजमल व सुजाउदौले व शहाजादे वगैरेचें वृत्त तपशिलें लेखन केलें

व रायाचीं पत्रें पाठविली ती सविस्तर अवगत जाहलीं. इकडील वर्तमान तर : माधोसिंगानी बदफैली आरंभिली, नेणवियास फौज पाठवून मोर्चे लाविले व कांहीं फौज माळवियांत रवाना केली ती पाटणास पुढें येऊन धूम करावी हा प्रकार योजिला. याचे पारिपत्य करणें जरूर याजकरितां फौजेची संचणी करून, इंदूरीहून कूच करून दरमजल मुकुंदबारीनजीक स्वारी आली. पुढें दर कूच जात असो. माधोसिंग उन्हरियाहून माघारा रणथंबोरीस गेला. पाटणीं फौज आहे त्याचें पारिपत्य करून बंदोबस्त करून पुढें उपयोगी कर्तव्य ते केलें जाईल. देशीं निजामअलीनें बिघाड केला. बेदरावर आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेब अहमदानगरावर आहेत. फौज जमा जाली आणि होती. मागें मोंगलावर जातात. सत्वर पारिपत्य करतील, अगाध नाहीं पै दर पै पत्रें पाठवून त्या प्रांतीचें सविस्तर वृत्त वरचेवर लिहित जाणें. दिलारायाचें पत्राचें उत्तर पाठविलें आहे. जाणिजे छ १५ रविलाखर. बहुत काय लिहिणें हे विनंती.

No. 147

News-letter to Bapujee Mahadeo and Purushottam Mahadeo from Subhedar Malharji Holkar :

Subhedar marched from Indore against Madhosing to Mukundbari. The Subhedar is determined to bring Madhosing to terms. News from the Deccan-Dadasaheb has marched up to Ahmadnagar, directing the campaign against the Nizam.

---

**अ. नं. १४८** **श्री**

श्रीमंत राजश्री सुभेदार साहेब गोसावी यांसी स्नेहांकित पुरूषोत्तम महादेव आशीर्वाद विनंती विज्ञापना येथील कुशल ता. छ. माहे साबान मुक्काम शामली प्रांत अंतर्वेद जाणोन यथास्थित असे विशेष. येथील वर्तमान, पांच चार कासीद जोड्यांसमागमें विस्तार पत्रें पाठविली आहेत. त्यांवरून श्रुत जाहले असेल. परंतु प्रत्योत्तर सादर न जाहले आणि जोडी न आली. हल्लीं शहा अबदाली लाहोरीहून कूच करून शिखांचे मागे धावला तो दोन दिवसांत शतद्रू (सतलज) नदीवर धावणी करून, सडे स्वारीनिशीं पोहचून सीखांसीं युद्ध केले. सीख पांच सात हजार ठार जाहले. कांहीं राहिले ते धरले व पळोन गेले. आतां सरहिंद पलीकडे विसा कोसांवर आहे. सरहिंदेत शालीमार बाग रहावयासी तयार करविला आहे. कांहीं एक दिवस तेथें राहणार. राजे लक्ष्मीनारायण सरहिंदेकर पूर्वी सरकारचा चाकर होता. तो जेनखान दिवाण शहाचे तर्फेचा आहे. त्यानें शहास पन्नास लाख रुपये पेशकस कबूल करून, आतां जाटाचे गढीस घेऊन जावें हा मनसुबा केला आहे. या गोष्टीस एक महिना लागेल. तें काम जालियावर मग ठाकूर सुरजमल यांजकडे येणार वंदता आहे. ठाकुरानें भरतपूर वगैरा गड कुल सरंजाम करून युद्धाचे तयारींत बसले आहेत. आगरियाचे

किल्ल्याची बंदोबस्ती उत्तम प्रकारें केली आहेत. याप्रकारचें वर्तमान येथील आहे. पातशहा अली गोहर व सुजाउदौले हे झांशीचे किल्ल्याशी कजिया करितात तमाम मुलुखांत झांशी काल्पीचे मैदानांत अमल बसवितात. आतां झांशीचे नजीक आहेत पुढें पाहवे, कोणीकडे जातील ? होईल वृत्त तें विनंती लिहूं, कृपा केली पाहिजे हे विनंती.

No. 148

News-letter from Purushottam Mahadeo (Hinge) to Subhedar Malharji Holkar : Abdali has left Lahore and is pursuing the Sikhs. Five to six thousand Sikhs have fallen in the battle that took place on the river Satlaj. Raja Laxmi Narayan has promised Fifty Lakhs to Abdali. It is said that Abdali will proceed against the Jats. Thakur Surajmal is prepared to meet him. Ali Gohar and Suja Uddaualla are disputing the Fort of Zanshi.

---

**अ. नं. १४९** **श्री**

राजश्री दामोदर महादेव गोसावी यांसी स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीये लिहित जाणें विशेष ईश्वरनाथ शुक्ल हे बहुत थोर विद्वान आहेत. आम्हांस सर्व प्रकारें यांचे आगत्य आहे त्यासी, यांचे कार्य-प्रयोजन साहित्याविसी उदेराज हरकारे पातशाही, हे तुम्हास सांगतील, तरी तुम्हीं आपले तर्फेनें हरएक प्रकारें साहित्यास अंतर न करणें. जरूर जाणून साहित्य करीत जाणें. छ. १८ सवाल बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>खंडोजी सुत मल्हारजी होळकर |

No. 149

Subhedar Malharji pleads the cause of Iswarnath Shukla a highly learned Bramhin and requests Damodar Madadeo to help him in every way possible as regards his maintenance.

---

**अ. नं. १५०** **श्री**

फाल्गुन वद्य ६ शके १६८१, ता. ८ मार्च इसवी सन १७६०

राजश्री दामोदर महादेव व पुरूषोत्तम महादेव गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत

राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जाणें. विशेष. तुम्ही पत्रें दोन चार पाठविलीं तें पावून वर्तमान कळूं आलें. अबदालीकडील वगैरे मजकुर कितेक लिहिला. ऐसियासि आम्ही या प्रांतें आलियाचें वर्तमान तुम्हांस एक दोन वेळां लिहिलें आहे. सांप्रत बलवाडियास आलो. येथील मंजावताचा मामला फैसला झाला. एक दों रोजांत कुच करून दिल्लीच्या सुमारें जात असो. अमित्राचें उत्तम रीतीनें पारिपत्य होऊन बंदोबस्त होणें तो होईल. चिंता नाही. तुम्ही आपल्याकडील वर्तमान वरचेवर तपासिलें लिहित जाणें. रवाना छ. १० रजब बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं<br>तत्पर खंडोजी सुत<br>मल्हारजी होळकर |

**राजवाडे खंड ६**

No. 150 8-3-1760 A.D.

The news of Subhedar Malharji's arrival at Balwadia, his determination to march towards Delhi in a day or two.

---

## अ. नं. १५१ श्री

चैत्र वद्य १ शके १६८२, ता. १ एप्रिल, इसवी सन १७६०

बंधुवर्य शिरोमणी राजश्री लक्ष्मण भटजी व घमंडीपंत. स्वामींचे सेवेसीं. पोष्य बाबूराव गोपाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशल तागाइत छ. १४ साबान मंगळवार, नजीक मलकापूर प्रांत वराड जाणोन स्वक्षेम लेखन करावें. विशेष श्रीमंत राजश्री भाऊसाहेब मजल दरमजल हिंदुस्थान प्रांतीं जातात. तिकडील वृत्त. राजश्री मल्हारराव होळकरांनीं जाऊन सिकंदरा मारून चौकोसावरी राहिले होते. तो अबदालीची फौज आली म्हणोन अवाई आली. हे आपले ठिकाणीं खबरदार होऊन जमाबंदी करून, पुढें रा. गंगाधरपंत तात्या आनंद रावराम व सेट्याजी खराडे यांस फौज देऊन पाठविलें. आपले एकीकडे दहा कोस आले. याजकडील त्रिवर्ग सरदार गेले होते. त्यांतून एक गंगाधरपंत कांहीं फौज घेऊन निघाले. वरकड कामास आले. गंगाधरपंत यमुना उतरोन आगरियापास फतियाबाद आहे तेथें राहिले. मागाहून खास मल्हारबाही फतियाबादेस आले. अबदाली मथुरेवर आहे. आगरियास येणार. शिंद्यांस व होळकरांस तों तोलेसी गोष्ट दिसत नाही श्रीमंतांचें प्राक्तन थोर. यांतच ईश्वर यश देईल. आमचे यजमानाचे हत्तीस खर्चास देऊन पाठविणें. आमचे माणसास अगर

मुलास न पाठवणें. प्रसंग विलक्षण दिसतो. आम्हीही नर्मदेपासून स्वार घेऊन येतों. घरांचा कारखाना चालूं देणें. कनिष्ठ यजमान देशीं राहिले आहेत. सावध राहत जाणें. आम्ही आलियावर चिंता नाहीं. गढींत बिगर परवानगी माणूस जाऊं न देणें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

**बातमीदाराचे पत्र**

No. 151 1-4-1760 A.D.

News-letter : Holkar's subjugation of Sikandara; Gangadharpant (Chandrachud) encamped at Fatiabad: Abdali at Mathura, Abdali appears, to the writer, too strong a foe for Holkar and Scindia combined.

---

**अ. नं. १५२** **श्री**

ता. २५-५-१७६०

राजश्री श्रीपतराव मैराळ कमाविसदार परगणे थालनेर गोसावी यांसी स्नेहांकित सौभाग्यवती गौतमाबाई होळकर दंडवत तुम्हांकडून दिपवाळीची ओवाळणी साल मजकुरची येणें रू. १००० एक हजार रुपये येणें ते राजश्री लाला शेवकराम यांजकडे देविलें. तरी सदरहू सावकार मजकुर यांस एक हजार रुपये देऊन पावती घेणें. जाणिजे छ. ९ सवाल बहुत काय लिहिणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 152 25-5-1760 A.D.

Saubhagyawati Gautamabai Holkar (consort of Subhedar Malharji) asks Shripatrao Mairal to pay her Diwalee-present of Rupees one thousant to Lala Sevakram.

---

**अ. नं. १५३** **श्री**

ता. १७ आगस्ट, इसवी सन १७६०

राजश्री सटवाजी गायकवाड व वासुदेव संभाजी गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित सदाशिव व गंगाधर नमस्कार अनुक्रमें आशीर्वाद विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. प्रगणे अंबाड येथील दुमालेगांव सरकार

सनदेप्रमाणें वजा जहाले ते मात्र सोडून बाकी दरोबस्त महाल जप्त करून दरगांवची आबादी करणें. गांव बी तपशील :

५ निस्बत जनकोजी शिंदे १ घनसांगवी, १ मौजे पांजारवाळवे १ मौजे कुंभार पिंपळगांव, १ मौजे राणी उचेंगांव व १ मौजे भडोल

४ निस्बत तीर्थरूप राजश्री तात्या गंगोबा चंद्रचूड १ कसबे ब्याहमांडवें, १ मौजे गोंदी, १ मौजे साष्टपिंपळगांव, १ मौजे हिरवे चौढाल

१ निस्बत रामाजी अनंत, मौजे नवगांव

१ निस्बत रंगभट गोंदीकर, मौजे हसनापूर

१ निस्बत शेषंभट, मौजे गंगाचिंचोली

१ मौजे मानलेयाल, बाबाकडे

५ हकीम महंमद अलीखान वैद्य यांजकडे १ मौजे शिंदखेड १ मौजे अर्धेअडगांव १ मौजे राहीरखुर्द १ मौजे बुदीरगयबे १ मौजे ब्राह्मणगांव.

....

१८

सदरहू अठरा गांवें वजा करून बाकी दरोबस्त महाल जप्त करून अंमल उत्तम रीतीनें करून लावणी चांगली करणें. जहागिरीचा अंमल उत्तम रीतीनें करून लावणी चांगली करणे. जहागिरीचा अंमल इनाम जाहला असे. यास्तव खबरदारीनें महाल गुजार करणें. यानंतर राजश्री कृष्णराव गोविंद यांस खर्चास रुपये ५०० दिले आहेत. ते त्यांस पावते करून कबज घेणें. सरकार हिशोबीं मजरा येतील. अलाहिदा चिठ्ठी मागाहून येईल. तुमच्या कारकुनांचें हुजूर प्रयोजन आहे, तर अप्पाजीपंत अथवा दुसरा कोणीतरी पाठवून देणें. रवाना छ.५ मोहरम बहुत काय लिहिणें हे विनंती मोर्तबसुद

**सरकारी रेकॉर्ड**

No. 153 17-8-1760 A.D.

The Pargana Ambad, with the exclusion of 18 villages becomes Inam to Subhedar Malharji. It is granted for cultivation and settlement for habitation to Satwaji Gaikawad and Vasudeo Sambhaji.

---

**अ. नं. १५४** **श्री**

इ. स. १७६०-६१

हिशेब नबाबाकडील मुसरिया (मुत्सदीयान) व येदी याची तनखा सुरू इसनेखमसेन मयावअलफ फसली सन ११६१ रु. २५००००० तपशील

यादी वसुलास कमाविसदार पाठविले.

| लक्ष्मण नारायण | | लक्ष्मण दिगंबर | |
|---|---|---|---|
| २७१४९३ | बळवंत काशीकर | ३००००० | विक्रमाजित जमादार प्र.सवलीसे सुभा अयोध्या |
| २८५०७ | धीरवा, बुधापुरकर | | |
| १००००० | विक्रमाजित बिजेपुरकर | १००००० | समसात निहाल जमेदार सुभे अयोध्या |
| १५०००० | प्रगणे गाजीपुर | २००००० | बलभद्रसिंग सुभे अयोध्या |
| २००००० | पृथिवी दत्त | २५०००० | मेहमदखान अजमगड |
| ............... | | ............ | |
| ७५०००० | | ८५०००० | |

एकूण १६०००००

बाकी ९००००० रु.

**सरकारी रेकार्ड**

No. 154 1760-61 A.D.

Subhedar Malharrao's revenue from the United Provinces.

---

**अ. नं. १५५** **श्री**

ता. १९-२-१७६१

चिरंजीव विजयी भव राजश्री मालबा यांसी प्रती मल्हारजी होळकर आशीर्वाद उपरि मौजे सारंगखेडे प्रगणे सुलतानपूर येथील फत्तेसिंग राऊळ याची स्त्री अमरावतीनें तुम्हांपासी येऊन केसरीसिंग राऊळ फत्तेसिंगाचा भाऊ यांजला गांवाकडून परागंदा करून राऊलकीचें वतन जप्त करविलें. त्यांस तेथील जप्ती तूर्त उठवून, देशास आलिया मनास आणावें म्हणून मीरखान टोके यांनीं सांगितलेवरून तुम्हांस लिहिलें आसे. तरी मौजे मजकुरचे राऊळकीची तुम्ही जप्ती करविली असेल ते सोडवून देणें. आम्ही देशास आलिया मनास आणून करणें तें केलें जाईल. तूर्त केसरीसिंगास आणून त्याचे हातें राऊळकीचें कामकाज सुदामत प्रमाणें घेणें. छ.१३ रजब हे आशीर्वाद. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 155 19-2-1761 A.D.

Subhedar Malharji Holkar advises Malba (grandson) to reinstate Kesarising in his former post of Raulki of Mauza Sarangkhede.

---

**अ. नं. १५६** **श्री**

संवत् १८१८ चैत्र वद्य २, ता. २१ एप्रिल, इसवी सन १७६१

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>खंडोजी सुत मल्हारजी होळकर |

राजश्री लालाजी बल्लाळ गुलगुले गोसावी यांसी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुरूसन इहिदेसितेन मयावअलफ. तुम्ही पत्र चैत्र शुद्ध त्रयोदशीचें पाठविलें. तें वद्य १ ला पावोन लेखनार्थ अवगत झाला. 'राजसिंग घोडचढा जेवळीहून सेरपुरास गेला. सुरतराम सुभराम पोता दोनतीनशा स्वारानशीं मकुंदरा उतरोन रामपुऱ्याचे सुमारे गेला. म्हणोन विस्तारें लिहिले ऐसियास ग्वाल्हेर, झाशी प्रांतींचा बंदोबस्त करून राजपुऱ्याकडे जावे, यास्तव पोहरीपुढें सातआठ कोसावर येऊन मुक्काम केला, तों वर्तमान आलें कीं राजश्री जनकोजी शिंदे बिजेपुरास आले. दो मजलीनें लष्करांत येणार याजकरितां दोन मुक्काम पारथलीं करून राजश्री जनकोबाची भेट झाली म्हणजे दरमजल रामपुऱ्याचे सुमारे येतो. हरामखोराचें उत्तम प्रकारे पारिपत्य होऊन येईल. आणखीही ज्यांनीं जैसी नेकी केली ते आचरणानुरुप फल पावतील. चिंता नाहीं. वरचेवर पत्र पाठवून वर्तमान लिहीत जाणें. जाणिजे छ.१५ रमजान. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**गुलगुले दप्तर कोटा**

No. 156 21-4-1761 A.D.

Subhedar Malharji Holkar informs Gulgule (agent at Kota) that he would see Jankojee Shinde at Bijapur and then march in the direction of Rampura.

---

**अ. नं. १५७** **श्री**

ता. १३-७-१७६१

परगणे रामपुरा महाल, सरकार होळकरांनीं सर करून घेतला. सुरूसन इसनेतिसेन मयावअलफ. ११६२ व फसली सन ११७१ व संवत् १८१८ मिती आषाढ वद्य सोमवारीं खाली होऊन होळकरांचें ठाणें कायम झालें. देह एकंदर ५१९ पैकीं वजा

| | | |
|---|---|---|
| लक्ष्मणसिंग चंद्रावतकडे देह ३१ | रु. | १००००-०-० |
| नगदी नक्त वराता | रु. | ५०००-०-० |
| एकूण ठेराव | रु. | १५०००-०-० |

बाकी सरकारकडे देह सुमारी ४८८ जमा रु. ३५००४०-८-३

३२७४३९-०-९ ऐनमाल

२२६०१-७-६ शिवाय जमा

..................

३५००४०-८-३

**सरकारी रेकार्ड, हुजूर फडणीसी**

No. 157 13-7-1761 A.D.

Pargana Rampura had - 519 villages out of which 488 came over to Holkar. Annual revenue Three Lacs and a half. Laxmansingh Chandrawat was granted 31 villages.

---

**अ. नं. १५८** **श्री**

ज्येष्ठ वद्य ४, शके १६८३, ता. २१-७-१७६१

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं<br>तत्पर खंडोजी सुत मल्हारजी<br>होळकर |

राजश्री मंडलोई न्याहालकर्ण व बलकर्ण व मोहनसिंग व कृपाराम कानगो व भगोतीदास परगणे इन्दूर गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर रामराम सितैनमयावआलफ तुम्ही पत्र पाठविलें छ.१३ रमजानचे तें छ. १७ जिल्कादी पावोन लेखनार्थ अवगत झाला. परगणे मजकुराचा बालबाला जाहिरात लिहून पाठविला. आमीन नव्या पाठविल्या रयतीची दिलभरी करून लावणी टुपणी होईल, म्हणोन विस्तारपूर्वक लिहिलें. उत्तम असे. ऐसियासी, इंदूर, देपाळपूर, दोहीं महालांचा बोभाट पूर्वीच आला होता. त्यांवरून चिरंजीव राजश्री मालबास लिहावयाचें तें लिहितो. ते सर्व बंदोबस्त करतील. कामकाज उरकोन खासा स्वारी जलद तिकडे येत असे. जाणिजे छ.१७ जिल्काद बहुत काय लिहिणें. तुम्ही रयतेची दिलभरी चांगली करून कीर्दीस लावणें. छ.मजकूर मोर्तबसुद.

**राजवाडे खंड ६, लेखांक ६२३**

No. 158 21-7-1761 A.D.

Subhedar Malharrao Holkar informs the Mandlois and Kanungos that Malba (His grandson) will take the necessary steps in connection with the agricultural arrangements of Indore and Depalpur Parganas.

---

**अ. नं. १५९** **श्री**

ता. २८-८-१७६१

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री बालाजी, जकात प्रांत कल्याण भिवंडी गोसावी सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार सुरुसन इसनेसीतेनमयावआलफ. राजश्री आप्पाजीराम निस्बत राजश्री मल्हारजी होळकर यांजकडील हरजिन्नसगल्ला कोकणातून कल्याण प्रांतांतून सरकारचे दस्तकाप्रमाणे बैल भरून येत असतां मालसेज घाट येथें तुम्हांकडील कारकुनांनीं हासिल घेतला, म्हणून हुजूर विदित जाहलें ऐसीयासी. दस्तक असतां हासिल घ्यावया प्रयोजन काय ? तरीं हे पत्र तुम्हास सादर केलें असे. तरी दस्तक असतां हासिल घेतला आहे तो माघारा देणें व यापुढें दस्तकाप्रमाणें बैल भरून येऊं देणें. जाणिजे चंद्र २४ मोहरम आज्ञाप्रमाण लेखनसीमा.

**पळसी रेकॉर्ड**

No. 159 28-8-1761 A.D.

Peshwa Madhaorao I takes the excise officer of Kalyan to task for exacting fees on the goods of Appaji Rama (in the service of Subhedar Malharji Holkar).

---

**अ. नं. १६०** **श्री**

ता. ५ सप्टेंबर इसवी सन १७६१

शिक्का वरीलप्रमाणें

राजश्री लालाजी बल्लाळ गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुा इसनेसितेनमयावअलफ. तुम्ही पत्र पाठविलें तें पावोन लेखनार्थ अवगत झाला. माधोसिंगाकडील मजकूर वगैरे बातमी विस्तारेंकरून लिहिली. ते सर्व कळलें. ऐसियासी तुमच्या लिहिल्यावरून खखेरामजीस ताकीदपत्र पाठविलें तें त्यास प्रविष्ट करून कराराप्रमाणेंऐवज वसुलांत ये ते गोष्ट करणें. नेणवी यांसी खर्चास वरातेपैकीं ऐवज वसूल करून पावता करणें. ऐवजाची सुस्ती एकंदर न करणें. येथेंही फौजेचे समजाविसीचा गुंता उरकला पुढील योजना आरंभिली. देसीहून नव्या फौजा आणविल्या त्या विजयादशमीपर्यंत येऊन पोहोंचतील. तदनंतर कर्तव्यार्थ केला जाईल. तिकडील वर्तमान सर्वदा पत्र पाठवून लिहित जाणें. जाणिजे छ.५ सफर बहुत काय लिहिणें हे विनंती.

मोर्तबसुद.

**कोटे येथील गुलगुले यांचे दप्तर : अस्सल पत्रव्यवहार**

No. 160 5-9-1761 A.D.

Subhedar Malharji writes to Laljee Ballal of Kota to press Khakheramjee for immediate payment of his due. Militia ordered from the South is on the way.

---

**अ. नं. १६१** **श्री**

ता. १३ सप्टेंबर, इसवी सन १७६१

राजश्री गोविंदराव बाळाजी कमाविसदार परगणे रामपुरा गोसावी यांस. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य. स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत. सुरूसन इसनेतिसेन मयावआलफ. लक्ष्मणसिंग चंद्रावत यांजकडे परगणे मजकूरचेपैकीं सालमजकूर पासून जहागीर एकंदर रुपये १०००० दहा हजाराची करार करून हें पत्र सादर केलें असे. तरी तुम्हीं परगणे मजकूरपैकीं हरजागांत नफ्यास पुरली असतील तेवढी वसूली सदरहू दहा हजाराची नेमून देणें. मुजरा असेत. जाणिजे. छ.१३ सफर बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

श्री म्हाळसाकांत चरणीं
तत्पर खंडोजी सुत
मल्हारजी होळकर

बार.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 161 13-9-1761 A.D.

Subhedar Malharji Holkar assigns Jagir worth ten thousand to Laxmansingh Chandrawat in Rampura Pargana. The Kamavisdar is ordered to make the necessary arrangement in a colletive way throughout the Pargana.

---

**अ. नं. १६२** **श्री**

ता. ३०-१०-१७६१
रोजकीर्द. सरकार रा.मल्हारजी होळकर
माहे रविलाखर. दफाते पत्र

प्रगणे इंदूरीं मौजे पिंपळपाराय येथें सौभाग्यवती गौतमाबाईंचा काळ जाहला. पृथ्वीदान ब्राह्मण असामी ३ इनाम जमीन दर असामीस बिघे सुमारे ३० येणेंप्रमाणें बिघे ९० दिले. त्याची इनामपत्रें तपसील.

४ मुरलीधर भट पिता रघुनाथ भट उपमन्यू गोत्र औदुंबर जोशी वास्तव्य मजकूर स्वतः १ वर्तमान भावी कमाविसदार १, जमीदारास १ व गांवकरीस १

४ छत्रेश्वर जोशी पिता उपमन्यू गोत्र औदुंबर वास्तव्य किल्ले मजकुर : वरीलप्रमाणें चार पत्रें.

४ हरीचंद्र वैद्य. ब्राह्मण वरीलप्रमाणें चार पत्रें.

...

१२

येणेंप्रमाणें पत्रें बारा इनामाची करून दिली असेत. जमीन अव्वल दुयम सीयम प्रतीची लायक, बागाइत व जिरायत, बाबत सरदेशमुखी जागीर मोकासा दरोबस्त खेरीज इनामदार करून बंदोबस्त पत्रें दिली. इनामाची.

**सरकारी रेकार्ड**

No. 162 30-10-1761 A.D.

Memo of the grant of land to three Bramhins of Mauza Pimplya Rai where Saubhagyawati Gautamabai (consort of Subhedar Malharji) breathed her last.

---

**अ. नं. १६३** **श्री**

ता. ६-११-१७६१

सरकार राजश्री मल्हारजी होळकर माहे रविलाखर छ. ८ कमाविसदार परगणे इंदूर. खाजगीकडील कर्ज कमाविसदार अंताजी नारायण व माणको गिरधर यांजकडून येणें आहे. त्यांस तगादा करून वाजवी कर्ज व्याजसुद्धां वसूल करितील. जो कोणी हरकत करील, लबाडी-लाताडीस येईल त्यांस ताकीद करून वाजवी कर्जाचा निकाल व्याजासुद्धां करून घेणें. म्हणून.

**सरकारी दप्तर**

No. 163 6-11-1761 A.D.

Sarkar Malharji Holkar commands the Kamavisdar of Pargana Indore to recover the debt of Khasgi due from Kamavisdar Antajee Narayan and Manko Girdhar.

---

**अ. नं. १६४** **श्री**

शके १६८३ संवत् १८१७ इ. स. १७६१

याद. समाईक ऐवज सन ११७१ फसली

१ राजश्री मल्हारजी होळकर श्री मार्तंडाचे दर्शनास आले. दर्शन घेऊन हाताचे जखमेकरितां श्रीपासीं राहिले. मुक्काम शके १६८३

वृषा नाम संवत्सरे फाल्गुन शुद्ध ११ रविवार तागाइत चैत्र शुद्ध १४ ऐसियांस त्यांनीं श्रीपासीं अनुष्ठान करविलें. ब्राह्मण १८ गुजारत अंबादास पुराणिक तिनकर; पुराणिक बाबांनीं आपले मार्फतीनें ब्राह्मण लाविले. मांडवगणकर व तांबेकर वगैरे ९ बाकी गांवचे १ भटंभट लोणकर १ खंडभट लोणकर १ सीतारामबाबा १ मोरभट अग्निहोत्री १ खांडे बेलसरे १ संकराजी तीर्थ उपाध्ये १ यादवरावांचा पुत्र १ मोरो बाबाजी १ बालंभट दत्तात्रय एकूण १८ ब्राम्हण म्हणोन.

No. 164 1761 A.D.

Subhedar Malharji came to pay his respects to Shree Martand at Jejuri, and stays for a month. Religious rites were performed through Ambadas Puranik who engaged eighteen Bramhins for a continued service during the time.

---

**अ. नं. १६५** **श्री**

सरकार राजश्री मल्हारजी होळकर रोजकीर्द. सुा सन सलास सन ११६३ मुक्काम पुणें दफाते पत्र राजश्री दामाजी गाईकवाड यांसी पत्र कीं आम्ही पुणियासी आलो. आपल्याकडील राजश्री रामचन्द्र महादेव व शिवराम भास्कर आहेत. त्यांनीं पै दर पै आपल्यास लिहिलें असेल. सांप्रत शिवराम भास्कर आपलेकडे आले आहेत. हे सर्व अंतरबाह्य सांगतील. त्यावरून ध्यानास येईल. त्या अन्वयें येथील जाबसाल पैरवी होईल. येथें प्रसंगानुरूप निकाल होणें तो आपला यत्न चालेल त्या प्रमाणें निर्गमांत येईल. तदनुसार आपणास मान्य तैसेंच लिहावें, अगर आपल्या चित्तानुरूप ध्यानास येईल ते निश्चयें तपशिलें लिहावें. त्याच अनुलक्षणें आपला प्रयत्न चालेल, तेथवर होईल. सर्वदा पत्रद्वारें संतोषवीत असावें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 165

Sarkar Malharji Holkar promises Damaji Gaikwar that he would exert his best on the latter’s behalf in the Poona Durbar. Gaikwar should, however, let him know his mind clearly.

---

**अ. नं. १६६** **श्री**

ता. ३ जून, इसवी सन १७६२

सरकार राजश्री मल्हारजी होळकर : रोजकीर्द, जिल्काद मुक्काम वाफगांव छ.९

विशेष मोहाजी पाटील दिघे मौजे धानोर परगणे संगमनेर, मौजे सोनगांवकर माळी याची कन्या. नुसतां दांडगावा करून सोनगांवकर सोयरा माळी याच्या लोकांनीं हाकनाहक जिवे मारिले, म्हणून हुजूर विदीत झाले. ऐसियास दुनियांत कजीयेही आहेत. परंतु कोणी कोणास जिवे मारिलें नाहीं. तो गांव तुमच्या जिल्ह्यांतील, याजकरितां हे पत्र लिहिलें असे. तरी तुम्ही सोनगांवकर माळियास पुरसीस करावी. खासास्वारी ते प्रांतीं आलियावर मनास आणून पारिपत्य केलें जाईल. म्हणून (बाळाजी महादेव कमाविसदार संगमनेर यांस पत्र)

**सरकारी रेकॉर्ड**

No. 166 3-6-1762 A.D.

Sarkar Malharji Holkar commands the Kamavisdar of Sangamner to institute inquiry regarding the murder of the gardener's daughter of Mauza Dhanor (lying within his jurisdiction). Final steps will be taken, when the Subhedar encamps on that side.

---

**अ. नं. १६७** **श्री**

ता. २८ जून, इसवी सन १७६२

श्रीमंत राजश्री गंगाधरपंत तात्या स्वामींचे सेवेसीं पोष्य गोविंद सामराज कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागाइत छ.५ जिल्हेज. मुकाम किल्ले गवालियर जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा करीत गेलें पाहिजें विशेष. स्वामींस पूर्वी एक दोन पत्रें पाठविली त्याची उत्तरें आली कीं राजश्री सुभेदारसाहेब व आम्ही पुणियास गेलियाउपरि किल्ल्याचे पोक्त बेगमी करून पाठवितों त्यास बेगमीचा मजकूर हा कालपर्यंत होऊन आला नाही. जी आज तीन वर्षे कर्जवाम घेऊन स्थळ रक्षण केलें. आपणांस सर्व विदित आहे. कुंभेरीहून आपण व चिंतोपंत तात्या आले, तेव्हां आज्ञा केली कीं आम्ही बेगमी करून सत्वरच पाठवितों, त्याजवर पत्रें दोनचार आली परंतु ऐवजाची तरतूद कांहींच जाहली नाही. हिंदुस्थानचा अंमल सर्व उठला. मातबर मामलेदारांनीं ठाणीं सोडलीं. आम्ही राजश्री सुभेदारांच्या व स्वामींच्या वचनावर आजपर्यंत स्थल रक्षिले. लोकांची बाकी आजपर्यंत साठ हजार रुपये देणें निघालें. त्यांनीं प्राणाशीं गांठ घातली आहे. पुढें फौजा या प्रांतीं यावयासी सहा महिने पाहिजेत. तरी बेगमी सत्वर करून पाठविल्यास, स्थल तीन वर्षे रक्षिल्याचें सार्थक होईल. स्वामींचें पुणियास जाणें जाहलें असेल. श्रीमंत रा. पंतप्रधान

स्वामींस विनंती करावी. त्यांनीं तर हिंदुस्थानाची आस सोडली. पत्रें वरचेवर लिहितां दमलों. परंतु बेगमी होऊन आली नाही. याज उपरि बेगमी झाल्यास जागा राहील. नाहीं तर आमचा उपाय नाही. कृपा निरंतर असो दिली पाहिजे हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 167 28-6-1762 A.D.

Govind Shamraj's complaints of his, and his works, neglect at the hands of his officers. The letter is addressed to Gangadharpant (Chandrachud)

---

**अ. नं. १६८** **श्री**

ता. ८ जुलाई, इसवी सन १७६२
सुभा राजश्री मल्हारजी होळकर रोजकीर्द
सलास ११७२ मुकाम वानवडी छ.१५

आनंदराव सदाशिव कमाविसदार परगणे सिऊर व मौजे धोधलगांव येथील पत्रें.

१ तुम्ही कार्यकर्ते जाणून खाजगीकडील गांव देहे परगणे गांडापूर तालुके :

१ कस्बे सिऊर बमये मजेर १ मौजे धोधलगांव बमये मजरे. एकूण २ एकूण दोन्ही गांवची कमावीस साल मजकुरीं तुम्हांस सांगितली असे. तरी माल सायर, राहदारी व दंडफुरोई, हावालदारी बाबद आकार करून इमानेंइतबारें वर्तोन सरकारची किफायत करणें. पंत मशारनिल्हेचें नांवें सनद.

१ खासगीकडील कस्बे सिऊन व धोधलगांव परगणे गांडापूर येथील कमाविसदार तुम्हांकडून दूर करून सालमजकूरी आनंदराव सदाशिव यांस सांगितली आहे. तरी तुम्ही दखलगिरी न करितां दोही गावचा अंमल सुरळीत देणें. म्हणोन अंताजी त्रिंबक यांस पत्र. कलम १

१ कस्बे सिऊर येथील पत्रें मेघश्याम विश्वनाथ यांस पाठविण्याची पत्रेंबद्दल मनाईचिठ्ठी दिली.

१ राउतास मनाईचिठ्ठी पाठविली अलाहिदा.

....
४

एकूण चार पत्रें दिली. समक्ष परवानगी.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 169 8-7-1762 A.D.

Kasbas Siur and Dhodhalgaon are transferred from Antajee Trimbak to Anandrao Sadashiv : the latter gentleman is ordered to make the concern profitable to the Sarkar.

---

**अ. नं. १६९** **श्री**

जिल्हेज छ. २८, ता. २१ जुलाई, इसवी सन १७६२

रोजकीर्द सुभा राजश्री मल्हारजी होळकर : रोजकीर्द मुक्काम पुणें. माहे जिल्हेज.

श्रीमंतांनीं आम्हास ग्वालेरीवर गंगासागर घोडी दिली होती ती फिरोन रायांनीं मागितली. सबब पाठविली आहे.

**सरकारी रेकार्ड**

No. 169 21-7-1762 A.D.

Malharji Holkar returns the mare that was presented to him by the Peshwa at Gwalior, as The Peshwa asked for her back.

---

**अ. नं. १७०** **श्री**

आगस्ट, इसवी सन १७६२

सुभेदार मल्हारजींचे मालेरावास पत्र आगस्ट सन १७६३. चिरंजीव राजश्री मालबास आशीर्वाद उपरि. राजश्री सदाशिव बारगळ अद्याप शेवगावांस जाऊन रुजुवात झाली नाहीं. पंधरावे दिवशीं हिशेब तयार करितों म्हणून कबूल केले होतें. पहिलेच लटकी वर्तणूक करितां हे उत्तम नाही. अतःपर तुम्ही त्यांस शिक्षा करून सरकार कार्यावर नजर देऊन कामकाज करीत ऐसें सांगून परगणे मजकुरीं किस्तकारी लावणें. त्याचे चित्तास न ये तर हर कोणास सांगून आबादी करविणें. जमीदार २ व अंताजीपंत १, त्याचा भाऊ १ चौघांस हुजूर पाठवून देणें. सदाशिव बारगळ्यास रियासत न करितां रुजुवात करून पाठविणें. कोणी बखेडा केल्यास ताकीद करणें. छ.१७ मुजरद रघु खिजमतगार व जासूद दोघे पाठविले आहेत. हिशेबाची रुजुवात जलदी करणेची ताकीद करणें.

**सरकारी रेकार्ड**

No. 170 August 1762 A.D.

Subhedar Malharji writes to Malerao (grandson) rather in a stern tone regarding the conduct of Sadashiv Bargal. The latter should be asked to be diligent in his work in Sheogaon both in monetary accounts and agricultrual arrangements.

---

**अ. नं. १७१** **श्री**

ता. ६ आगस्ट, इसवी सन १७६२

बोली मकाजी ढमढेरे वलद भुलोजी ढमढेरे सुरूसन सलासीतैनमयावअलफ. बोली खासे खार, ५ व ५ करवल व १ कारकुन, एकूण ११

एकूण अकरा यांसी सरंजाम परगणें सुंदरसी निम्मे महाल खेरीज सकराई गांव परभारें आबाद करून आकार करावा-त्यावर सदरहूप्रमाणें पांच खांसे व पांच करवल कारकुन यानीं हमेशा निशाणाबरोबर कांहीं चाकरी करावी. हजरीस कमी जालिया तैनात कमी करावी. खेरीज नजराणा सुदामतप्रमाणें देत जावा. येणेंप्रमाणें करार छ.१५ मोहरम.

मुकाम पुणें. रूजू.

**सरकारी रेकार्ड**

No. 171 6-8-1762 A.D.

Agreement of Makajee Dhamdhere to serve in the field with eleven persons of the condition of receiving half the Pargana of Sundersi as Saranjami (the land to be brought under cultivation.)

---

**अ. नं. १७२** **श्री**

ता.१० आगस्ट १७६२

इ. स. १७६२ सरकार राजश्री मल्हारजी होळकर

रोजकीर्द ११७२ मुक्काम पुणें छ.१९ माहे मोहरम, दफाते

राजश्री नारो बाळाजी यांसी कीं मौजे निंबगांव तालुके कोल्हेर मक्ता करून दिला. त्याचा ऐवज इसनेसीतेन सालचा रु.२४७५-२-० प्रमाणें रु.१४८५० १२-० पैकीं वसूल

खाजगीकडे रुजू रुपये ९२०० ब्याणवसे. बाकी रु.५६५०-१२-०, ५६५०-१२-० ऐनबाकी. ८१४-४-० व्याजाबद्दल. एकूण ६४६५ एकूण सहा हजार चारशें पासष्ट रुपये खाजगीकडे देविले असेत. तर सदरहू ऐवज चिरंजीव अहिल्याबाई जमा करवतील. हुजूर नकल पाठविणें. देशचे गांवचा ऐवज सरकारात वसूल न यावा हें योग्य नाहीं. येणेंकरून परिणाम कसा होईल. अतःपर सत्वर ऐवज आदा करणें म्हणून पत्र. राजश्री महादाजी रंगनाथ पिंपलसकर यांसी कीं तुम्हांकडे सरकारचे तीन गांवांचा मक्ता आहे. तेथील ऐवज चौसाला अखेर इसनेसीतैनमयाअलफ पावेतों बाकी रु. ८३३६-१०-० ऐवज खाजगीकडे देविला असे तर सदरहू रुपये चिरंजीव अहिल्याबाई यांजकडून जेथे जमा करवितील तेथें पावती घेणें.

चिरंजीव अहिल्याबाई यांजकडे ऐवज जमा करविला.

८६३६-१०-० महादाजी रंगनाथ पिंपळसकरकडील.

६४६५--०-० नारो बालाजी, व्याजसुद्धां.

..................

१५१०१-१०-०

एकूण पंधरा हजार एकशें एक रुपया दहा आणे. वराती दोन पाठविल्या आहेत. ज्याच्या त्यांजकडे देऊन ऐवज वसूल करून घेणें. म्हणून पत्रें :

**सरकारी रेकॉर्ड**

No. 172 10-8-1762 A.D.

Sarkar Malharji Holkar orders the collection of Rs. 15,101/- from two contractors holding several villages in contract. The amount is to be credited to the Khasgi according to the discretion of Ahilyabai.

---

**अ. नं. १७३** **श्री**

ता. १८-११-१७६२

सरकार राजश्री मल्हारजी होळकर : रोजकीर्द

माहे जमादिलाखर मुक्काम वाफगांव. दफाते पत्र

पेटे मौजे वाफगांव तालुके खेड यांस पत्र कीं पेठ मजकूर ऐवजी रुपये ११६ एकशें सोळा रुपये खाजगीच्या जमादारखानी यांजकडे जमा असे. गुजारत खंडू माहजन व मनीराम कोतवाल सालगुदस्त बाकी ऐवजी जमा असे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 173 18-11-1762 A.D.

Sarkar Malharji Holkar informs the Wafgaon officer that a sum of Rupees 116/- of Wafgaon Peth due for the past year is credited to the Khasgi Jamdarkhana.

---

**अ. नं. १७४** **श्री**

भाद्रपद मास, ता. ६-९-१७६२
सरकार राजश्री मल्हारजी होळकर : रोजकीर्द
माहे सफर. चंद्र १७, मुक्काम पुणें, सन ११७२

सोनपत पानपतचे लढाईवर जाते वेळेस हरीप्रसाद भट परसाई यांनीं प्रश्न दिला होता, याजकरितां भटजी यांस २५ पंचवीस बिघे जमीन व चार आणे प्रमाणें रोजींदा करून देण्याबद्दल अहिल्याबाईंचे नांवें पत्र लिहिलें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 174 6-9-1762 A.D.

Sarkar Malharji Holkar writes to Ahilyabai to grant 25 Bighas of land, and four annas daily, to Hariprasad Bhat Parsai for astrological advice granted on the eve of the Sonapat-Panpat war.

---

**अ. नं. १७५** **श्री**

ता. ३ डिसेंबर, इसवी सन १७६२

चिरंजीव अहिल्याबाई प्रती मल्हारजी होळकर आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिणें. विशेष. आपणांस पत्र श्रीमंतांचें कीं राजश्री कुसाजी पाटील शिंदे मौजे पिंपरखेड येथील संभूगीर गोसावी याने कुसाजीमजकूर याचा पुतण्या व शेत व मळे व घर जप्त केले, म्हणून कळलें. त्यास वाफगांवीं व जेथें त्यांची मुलेंमाणसें असतील तेथें तुम्ही गोसावी यांसी ताकीद उत्तम प्रकारें करून इसम मजकुराची जप्ती शेत मळे जे असतील ते ताकीद करून सोडून देणें. त्यावरून हे पत्र लिहिले आहे. तरी वाफगांवीं शिंदे मजकुरचा पुतण्या आहे तो सोडून देणें व पिंपरखेडी गोसावी यानें माणसे कैद केलीं असतील ती माणसे व शेतमळे याची

मोकळीक करणें. ऐसी ताकीद करून सोडून देवविणें. रवाना छ.१५ हे आशीर्वाद. मोर्तबसुद.

**सरकारी दप्तर**

No. 175 3-12-1762 A.D.

Subhedar Malharji Holkar writes to Ahilyabai that in obedience to the orders of Shreemant Peshwa, Shambhugir Gosavi be commanded to release the persons, as well as the property, of Kusaji Patil Shinde of Pimparkhed.

---

**अ. नं. १७६** **श्री**

ता. ९ जानेवारी, इसवी सन १७६३
रोजकीर्द सुरूसन ११६३

सुभा राजश्री मल्हारजी होळकर. मुक्काम पुणतांबे. माहे जमादिलाखर. छ.२४ मावळ्यांचे पथकास रोजमुऱ्याबद्दल देणें मंजूर केले असे. रु.१५००.

**सरकारी रेकार्ड**

No. 176 9-1-1763 A.D.

Subhedar Malharji Holkar encamped at Puntambe orders payment of Rupees Fifteen Hundred to the Mawla-Corps.

---

**अ. नं. १७७** **श्री**

ता. ६ मार्च, इसवी सन १७६३

राजश्री बाबाजी प्रल्हाद कमाविसदार प्रगणें सुलतानपूर गोसावी. स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुरूसन सलातिसेनमयावअलफ वेदमूर्ती राजश्री वासुदेवभटजी अग्निहोत्री प्रकाशकर यांसी वर्षासन प्रगणे मजकुरीं आहे. त्यास साल मजकुरीं मामलत तुम्हांकडे जाली. नूतन सनदेचा उजर केला म्हणून भटजींनीं विदित केलें त्यावरून हें पत्र सादर केलें असें, तरी भटजींचा पुरातन भोगवटा मनास आणून पेशजी चालत आल्याप्रमाणें तुम्ही सदरहू सनदेप्रमाणें साल दरसाल भटजीस पावते करून कबज घेत जाणें. दरसाल नूतन पत्राचा आक्षेप न घेणें. हे पत्र वेदमूर्तीस भोगवटियास देऊन पत्राची प्रत लिहून घेणें. जाणिजे छ.२० साबान बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकार्ड**

No. 177 6-3-1763 A.D.

Subhedar Malharji Holkar writes to the Kamavisdar, Pargana Sultanpur, to continue the annual religious grant already sanctioned to Vasudeo Bhatjee Agnihotree.

---

**अ. नं. १७८** **श्री**

ता. ८ मे, इसवी सन १७६३

राजश्री लिंबाजी आबाजी निस्बत सरकार गोसावी मुक्काम प्रकाशे यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुरूसन इसने सितेन मयावअलफ. सरकारचा गल्ला तुम्हाकडून खालसा करविला आहे. त्या ऐवजीं पागा यांस चंदी दुमाही बेगमी.

| | | | |
|---|---|---|---|
| ९.३ | बालाजी मल्हार | ६.० | सटवाजी गायकवाड |
| १२.० | सुभानजी लबडे | ७.० | सेटीबा माने |
| १.३ | रघोजी कठणे | १०.० | तानबाजी लकचणे |
| ६.३ | रामाजी आा | | |

एकूण ५३।।। १। त्रेपनखंडी सव्वासोळा मण कैली चौसरी वारूले तुम्हांकडून देविलें असे तरी सदरहू त्रेपन खंडी सोळा मण तीन पायली सरकारचे खाते पैकीं निम्मे बाजरी व निम्मे चणे. ज्याचे त्यास पावते करून कबज घेत जाणें. जाणिजे छ.२४ सवाल. बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद ः

**सरकारी रेकार्ड**

No. 178 8-5-1763 A.D.

Subhedar Malharji orders his officer at Prakashe to distribute Bajri and Gram among his military officers from out of his own store.

---

**अ. नं. १७९** **श्री**

ता. २१ मे, इसवी सन १७६३

राजश्री बाबाजी प्रल्हाद कमाविसदार प्रगणे सुलतानपूर गोसावी यांसी स्नेहांकित

मल्हारजी होळकर दंडवत सुरूसन सलाससितेनमयावअलफ कामाठी नत्थे अलब, दुर्गा किल्ले सेंधवे येथे कारखानियाचे कामावर तैनातीस आहेत. असामी ६२ यांची तुपामुळें दर असामीयास अधेला प्रमाणें छ.१८ साबान वैशाख वद्य जिल्हेज आखेर एकूण रोज ७२ दररोज रु. ०-१५-६ प्रमाणें बेगमी रुपये ६९-१२-० पावणे सत्तर परगणे मजकूर पैकी साल मजकुरचे देविले असत. पावते करून कबज घेणें प्रकासियां कामाठी याचे शेराबराबर गल्ला देविला असे. यांसी बिगारीनें पोचवून देणें. जाणिजे छ. ७ जिल्काद बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकार्ड**

No. 179 21-5-1763 A.D.

Subhedar Malharji Holkar orders payment of Rs. 69-12-0 for the Ghee allowance of 62 persons for 72 days service at Fort Sendhwa.

---

**अ. नं. १८०** **श्री**

ता. १३ जून, इसवी सन १७६३

आर्बासितेन मयावअलफ जिल्हेज छ.

राजश्री मल्हारजी बिन खंडोजी होळकर यांस सनद कीं तुम्हांस फौजेच्या सरंजामास सालमजकुर पासून पेशजीचे अंमलदारापासोन दूर करून करार करून दिले महाल व गांव बितपशीलः

१ प्रगणे सावेर, प्रांत माळवा दरोबस्त खेरीज इनाम व दुमाले गांव करून बाकी दरोबस्त.

१ प्रगणे सिरोंज, प्रांत माळवा दरोबस्त खेरीज दुमाले गांव व इनाम वजा करून बाकी दरोबस्त.

१ तर्फ देपूर प्रगणे संगमनेर अजदेह पैकी दुमाले गांव ६ बाकी देह ३९.

१ मौजे पांडे, परगणे दिंडोरी येथील जहागीरीचा अंमल दरोबस्त.

१ सरकार बिजागडपैकी दुमाले महाल वजा.

१ प्रगणे कसरावद, निस्बत व्यंकटराम शास्त्री.

१ प्रगणे कान्हापूर, कैलासवासी तीर्थरूप (बाजीराव साहेब) राव यांजकडील अन्नछत्राकडे.

२ निस्बत खंडेराव पवार. १ प्रगणे सुलतानबाद. १ प्रगणे बडखल.

१ परगणे बरडे निस्बत बहिरजी बाबर.

२ तुम्हांकडे पेशजीपासून चालू आहेत. १ परगणे सेंधवे. १ प्रगणे नागलवाडी.

....

७

सात महाल खेरीजकरून बाकी सरकार मजकुर खेरीज मोकासा व धोंडो मल्हार यांचे गांव वजा करून बाकी दरोबस्त अंमल.

१ परगणे गाळणा प्रांत खानदेश अजदेह ६४ पैकीं वजा देह दुमाले गांव.

१० निस्बत दादूखान टोके पहिले सनदेप्रमाणें.

३ इतर (नांव नाहीं.)

एकूण तेरा गांव वजा करून बाकी दरोबस्त परगणे मजकुर जहागीर व बाबती सरदेशमुखी खेरीज मोकासा दरोबस्त :

ह्याप्रमाणें महाल व सरकार व देहे सरंजाम करार करून दिले असे, तरी सदरहूप्रमाणें अंमल करून सेवा एकनिष्ठ करीत जाणें. म्हणोन मशारनिल्हेचे नांवें सनद १ याविशीं जमीदाराचे नांवें, रुजु होऊन अंमल सुरळीत देणेंबद्दल ताकीद पत्रें ३ देपूर, सरकार बिजागड व गाळणा.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 180 13-6-1763 A.D.

Sanad granting 2 Parganas in Malwa, one Taluka and one village in Khandesh, the whole of Sarkar Bijagad (excluding 5 Parganas), one Pargana (excluding 13 villages) in Khandesh - to Subhedar Malharji Holkar as saranjam.

---

**अ. नं. १८१** **श्री**

ता. ४ आगस्ट, इसवी सन १७६३

राजश्री बाबाजी प्रल्हाद कमाविसदार प्रगणे सुलतानपूर गोसावी यांसी स्नेहांकित अहिल्याबाई होळकर दंडवत सुरूसन अर्बासितेनमयावअलफ खेमाजी सुर्वे व येसू मुरकुटे दोन्ही पागा परगणे मजकुरीं तुम्हांपासी पाठविल्या आहेत. यांजकडील पागेची घोडीं त्यांस रतीबास तूप व कणिक चौदा रोजा वजनी तपशील.

॥८॥।९। तूप चौदा रोजा

।·॥५॥। खेमाजी सुर्वे. थोर रास ५१ दर ८८॥ प्रमाणे ८८॥५॥ रोज तट्टें
खेचरें २७ दरराशी तूप ८८८९ प्रमाणे ८८३।९ रोज

।·।३॥ येसु मुरकुटे : थोर रास ५१ ८८॥ तट्टे रास २० ८८८९

........
।।·।।।९।
१।१८३ कणिक वजन चौदा रोजा. सुर्वे. रास थोर लहान दररोज वजन ८८।।
प्रमाणें.
शेर ८।।।९ व येसू मुरकुटे. थोर लहान मिळोन ७१ यांसी दररोज
वजन ८८।। प्रमाणें. रोज ८।।।५।।

.............
१।।।२ ८ ≈।

एकूण एक खंडी सतरा मण सव्वादोन सेर चौदा वजन रोज बेगमी तुम्हांकडून देतील. तरी सदरहू एक खंडी सतरा मण सवादोन शेर वजन घोड्यांची हजेरी पाहून जिन्नस सरकार निरखे खरीदी करून मशारनिल्हेस पावता करणें आणि पावती घेणें. तेणेंप्रमाणें सरकारांतून मंजूर होईल. जाणिजे. छ.२३ मोहरम बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

No. 181 4-8-1763 A.D.

Devi Ahilyabai orders the Kamavisdar, Pargana Sultanpur the ration of horses of Government Paga - Ghee and wheat-flour (one Khandee, seventeen Maunds, two Seers and a quarter for two weeks).

---

अ. नं. १८२ **श्री**

ता. १४ सप्टेंबर, इसवी सन १७६३

राजश्री सटवाजी व वासुदेव संभाजी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर रामराम दंडवत सुरूसन अर्बासितेनमयावअलफ परगणे अंबाड ऐवज इरसाल पोते रुपये हस्ते आबाजी महादेव.

१३०० चलनी रुपये
२०० बट्याचे रुपये
........
१५००

पंधराशें रुपये पोता जमा आहेत. जाणिजे छ.६ रविलावल. बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 182 14-9-1763 A. D

Receipt of Rupees 1500- received from Pargana Ambad and passed

by Subhedar Malharji Holkar.

---

**अ. नं. १८३** **श्री**

ता. १० आक्टोबर, इ. स. १७६३

राजश्री बाबाजी प्रल्हाद कमाविसदार प्रगणे सुलतानपूर गोसावी यांसी स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुा अर्बासितेनमयावअलफ रा.अबाजी महादेव यांजला पेस्तर श्रीमंतांनीं दिवाणगिरीची असामी सांगितली होती. सांप्रत प्रगणे सरकार जहागीर जाणून, असामी सुदामतप्रमाणें करार करून दिली असे तरी वेतन रु.५०० पावते करून मशारनिल्हेचे हातून दिवाणाचें काम घेणे. जाणिजे. छ.२ रविलाखर. बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 183 10-10-1763 A.D.

Subhedar Malharji Holkar orders the Kamavisdar, Pargana Sultanpur to uphold and contiune the Diwanship of Abajee Mahadeo formerly granted by the Peshwa on a salary of Rupees Five Hundred. It is renewed by Subhedar Malharji as the Pargana has become his Jagir.

---

**अ. नं. १८४** **श्री**

ता. १६ आक्टोबर, इ. स. १७६३

राजेश्री वर्तमानभावी कमाविसदार प्रगणे अंबाड गोसावी यांसी स्नेहांकित मल्हारजी होळकर सुरूसन अर्बासितेनमयावअलफ अब्दुल सत्तार व शहाबुद्दीन खातीब मसीद प्रगणे मजकूर यांनीं टोकियाचे मुक्कामीं हुजूर येऊन विदित केलें कीं आलमगीर पातशहा यांनीं आम्हास प्रगणे मजकुरीं जमीन कसबे मजकुरीं बिघे ३४ व मौजे वारसवडे प्रगणे मजकुर येथें जमीन चाहूर १ व प्रगणे मजकुरीं राज मालावर चार आणे येणें प्रमाणें करून दिले. ते चालत आले त्यास सांप्रत परगणे मजकूर आपलेकडे जाहला आहे. त्यास आपण कृपा करून पातशहाच्या सनदेप्रमाणें सुदामत चालत आलें त्याप्रमाणें चालते करावे म्हणून त्याजवरून हे पत्र सादर केले असे. तरी मशारनिल्हेकडील मौजे मजकुर पैकी व कसबे मजकुर जमीन एकशें चौप्पन बिघे व प्रगणे मजकुर मालावर चार आणेप्रमाणें पातशहाचे फर्मानप्रमाणें सुदामत चालत आलें त्याचा भोगवटा पाहून त्याप्रमाणे चालविणें. नव्या पत्राची अपेक्षा न करणें. या पत्राची नक्कल घेऊन अस्सल पत्र मशारनिल्हेकडे भोगवटियास देणें.

श्रीमंतांचे अंमलाचे वेळचा भोगवटा मनास आणून सुकृत प्रमाणें चालविणें. छ.८ रविलाखर. बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 184 16-10-1763 A.D.

Subhedar Malharji Holkar commands the Kamavisdar of Pargana Ambad to continue the gift of land and money granted by Alamgir Padshah to Abdul Sattar and Shahabuddin.

---

**अ. नं. १८५** **श्री**

ता. २८ आक्टोबर, इसवी सन १७६३

राजश्री वर्तमानभावी कमाविसदार प्रगणे अंबाड. गोसावी यांसी. स्नेहांकित मल्हारजी होळकर अर्बासितेनमयावलफ. अब्दुल हकीम खातीब कसबे जामखेड (याचा अर्थ वरीलप्रमाणें) जमीन इनाम चाहूर १ व मालावर पैसे दररोज चार. पातशाही फर्माने असून हल्लीं आपला अंमल. सबब सुदामत चालवावें म्हणून. त्यास श्रीमंतांचे वेळचा भोगवटा मनास आणून चालविणे. जाणिजे छ.२० रविलाखर बहुत काय लिहिणें मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 185 28-10-1763 A.D.

Subhedar Malharji Holkar commands the Kamavisdars (present and future) of Ambad to continue the gift of land and money granted by Padshah to Abdul Hakim.

---

**अ. नं. १८६** **श्री**

ता.२८ आक्टोबर, इसवी सन १७६३

वर्तमानभावी कमाविसदार परगणे अंबाड यांचे नांवें सुभेदार मल्हारजी होळकर यांचे पत्र कीं सय्यद मोहीद्दीन व सयद यासीन पीरजादे. अवलिया शाहअसरफ बियाघानी यांची दरगाह कसबे अंबाडला आहे. यांनीं जाहीर केलें कीं पातशाही अंमलापासून इनाम जमीन चाहूर १ व चिरागचे तेल वजन आछेर आहे. तरी श्रीमंतांचे अंमलाप्रमाणें सुदामत चालत

आलेप्रमाणें चालवावे. जाणिजें. छ.२० रविलाखर बहुत काय लिहिणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 186 28-10-1763 A.D.

Subhedar Malharji Holkar commands the Kamavisdars of Pargana Ambad to continue the grant of land and oil made by the Padshah for honouring the Darga of Shahaasraf Biyaghanee, to Sayyad Mohidin and Sayyaid Yasin.

---

**अ. नं. १८७** **श्री**

ता. ८ नोव्हेंबर, इसवी सन १७६३

राजश्री सटवाजी गायकवाड व वासुदेव संभाजी गोसावी यांसी स्नेहांकित मल्हारजी होळकर सुरूसन अर्बासितेनमयावअलफः तुम्ही प्रगणे अंबाडापैकीं ऐवज मानाजी अहिर बारगीर दिमत मजकूर या समागमें रुपये १७,९०० सत्रा हजार नऊशें पाठविले ते पोता जमा असेत. जाणिजे छ.२ जमादिलावल. बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 187 8-11-1763 A.D.

Receipt of Rupees 17,900- received from Pargana Ambad, passed by Subhedar Malharji Holkar.

---

**अ. नं. १८८** **श्री**

ता. १६-११-१७६३

(वरीलप्रमाणें पत्र. परगणे अंबाडबद्दल रु. १०,००० सरकारांत पोता जमा हस्तें तामीलनवीस धोंडो जमादार व रावजी फडके शिलेदार. छ.१० जमादिलावल. (ता.१६-११-१७६३)

**सरकारी रेकॉर्ड**

No. 188 16-11-1763 A.D.

Receipt of Rupees 10,000 received from Pargana Ambad, passed by Subhedar Malharji Holkar.

---

**अ. नं. १८९** **श्री**

ता. २९ नोव्हेंबर, इसवी सन १७६३

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाबाजीपंत कमाविसदार परगणे सुलतानपुर प्रती देवीप्रसाद शुक्ल वास्तव्य ब्रम्हावर्त गंगातीर आशीर्वाद उपरि श्रीमंत राजश्री मल्हारराव होळकर यांनीं तुम्हाकडोन धर्मादाय रुपये १०० शंभर परगणे मजकुरपैकीं देवविले ते सदरहू रुपये आपण सुलतानपुरीं भरून पावलो. शके १६८५ सुभानुनाम संवत्सरे कार्तिक वद्य ९ मंगळवार. लिहिलेप्रमाणें.

सही
देवीप्रसाद

**सरकारी रेकॉर्ड**

No. 189 29-11-1763 A.D.

Receipt of one hundred Rupees for charitable purposes-passed by Deviprasad Shukla, resident of Bramhavarta; the amount was paid to him by the Kamavisdar of Pargana Sultanpur under orders of Subhedar Malharji Holkar.

---

**अ. नं. १९०** **श्री**

ता. ३ डिसेंबर, इसवी सन १७६३

राजश्री सटवाजी गायकवाड. गोसावी यांसी स्नेहांकित अहिल्याबाई होळकर सुरूसन अर्बासितेनमयावअलफ हस्ते मशारनिल्हे व मानाजी अहीर दिम्मत मजकुर सनगे पैठणी एकूण रुपये जबानी करार.

| | | |
|---|---|---|
| ८ तिवटे पैठणी. आकार | रु. | २०३-०-० |
| ६ जाफरखानी पैठणी | रु. | २५१-०-० |
| ७ पातळें पैठणी ३ जरीकाठी लाल १६४-१२-०,<br>१ चांदणी जरीकाठी ९० | | |

| | | |
|---|---|---|
| | १ साफा रेशमी ३०, | |
| | २ काजळी बुटेदार २०० एकूण आकार. | रु. ४८४-१२-० |
| ८ | लुगडी पैठणी | रु. ५७१-०-० |
| १२ | खण पैठणी, काजळी, कुसुंबी, जरीकाठी. | रु. ५०-०-० |
| .... | | .................... |
| ४१ | | रु. १५५९-१२-० |

एकूण एकेचाळीस सनगें एकूण रुपये पंधराशें पावणेसाठ रुपयेचीं सनगीं खाजगीकडे जमा तागायत शेटी खुद्द. मुक्काम चांदवड. शके १६८५ सुभानुनाम संवत्सरे कार्तिक वद्य १३ रवाना छ.२७ जमादिलावलः बहुत काय लिहिणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 190 3-12-1763 A.D.

Ahilyabai passes receipt for 41 high-class garments priced at Rs. 1559-12-0 credited to the Khasgi.

---

**अ. नं. १९१** **श्री**

ता. ४ डिसेंबर, इसवी सन १७६३

राजश्री सटवाजी गायकवाड गोसावी यांसी स्नेहांकित अहिल्याबाई होळकर सुरू सन अर्बासितेनमयावअलफ हस्ते मानाजी अहिर दिमतमजकूर रुपये.

| | |
|---|---|
| १८०० | अटकगंजी कोट रु.९९ बागलकोटी. १०० सरदाराचे. एकूण १९९९ पैकीं वजा बट्टा रुपये. |
| २४-१२-० | बागलकोटी रु.९९ दर चार आणेप्रमाणें. |
| १२-८-० | सरदाराचे रुपये १०० दर दोन आणेप्रमाणें. |
| .............. | |
| ३७-४-० | |

बाकी रु.१९६१-१२-० खाजगीकडे जमा. ताबेदार सेटीबा खुद्द मुक्काम चांदवड शके १६८५ सुभानुनामसंवत्सरे कार्तिक वद्य १४ छ.२८ जमादिलावल बहुत काय लिहिणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 191 4-12-1763 A.D.

Ahilyabai passes receipt of Rs. 1961-12-0 credited to the Khasgi, and received from Satwaji Gaikwad, after deducting Rs. 37-4-0 as discount etc.

---

**अ. नं. १९२** **श्री**

ता. ३१ जानेवारी, इसवी सन १७६४

राजश्री सटवाजी गायकवाड व वासुदेव संभाजी गोसावी यांस स्नेहांकित मल्हारजी होळकर रामराम दंडवत सुरुसन अर्बासितेनमयावअलफ. बिरमान नबीद शिलेदार, असामी ३०२ यांसी नालबन्दी ऐवजी रु.३२,२०० रुपये बत्तीस हजार दोनशें तुम्हाकडून अंबाड पैकी देवविले असेत तरी सदरहू रुपये पैकीं वजा धर्मादाय दरसदेप्रमाणें १२९० वजा करून देऊन बाकी ऐवज मशारनिल्हेस पावते करून कबज रिवाजाप्रमाणें घेणें. धर्मादाय पैकींचा ऐवज हुजुर आणून पोता दाखल करणें. दिरंग न करितां पत्र पावतांच देणें. फिरोन पत्राचा आक्षेप न करणें. जाणिजे छ.२७ रजब बहुत काय लिहिणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 192 31-1-1764 A.D.

Subhedar Malharji Holkar commands Satwaji Gaikwad and Vasudeo Sambhaji of Pargana Ambad to pay Rs. 32,000- to Birbhan Nabid Shiledar for Nalbandi : the usual charity charge is to be deducted.

---

**अ. नं. १९३** **श्री**

ता.३ फेब्रुवारी, इसवी सन १७६४

राजश्री कमाविसदार वर्तमानभावी प्रांत अंबाड स्नेहांकित मल्हारजी होळकर रामराम सुरूसन अर्बासितेनमयावअलफ वेदमूर्ती राजश्री बाबाभट बिन मुकुंदभट वैद्य गोत्र गार्ग्य वाजसनेई शाखा. कसबे संगमनेर यांनीं चांदवड मुक्कामीं विदित केलें कीं, प्रगणे मजकुर यजमानावर रोजीना चार आणे. पूर्वी नबाब निजाम उलमुल्ख यानीं करून दिले अलीकडे श्रीमंतांचा अंमल झाला. तरी आपण मोंगलाची सनद पाहून कृपा करून रोजीना चालवावा म्हणजे स्नानसंध्या करून अभीष्ट चिंतन करूं. म्हणून मनास आणितां थोर सत्पात्र

स्नानसंध्याशील ब्राह्मण. चालविण्यास श्रेयस्कर जाणून प्रगणे मजकुरीं माल ऐवजी सदरहू चार आणे रोजिना वेदमूर्तीस पावीत जाणें. प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न घेणें. हें पत्राची प्रत घेऊन भोगवटियास परतोन देणें. जाणिजे. छ.१३ रजब.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 193 3-2-1764 A.D.

Subhedar Malharji Holkar commands the Kamavisdar of Ambad to uphold the grant of money (four annas per householder) to Baba Bhatt, formerly ordered by Nizam-ul-Mulk.

---

**अ. नं. १९४** **श्री**

ता. १६ फेब्रुवारी, इसवी सन १७६४

राजश्री खंडोजी कोपरे दिमत पागा निस्बत सरकार स्नेहांकित मल्हारजी होळकर रामराम सुरूसन अर्बासितेनमयावअलफ मौजे ढारे जळगाव प्रगणे सेगांव हा गांव पूर्वीपासून आम्हाकडे इस्ताव्यानें चालत आला. त्याप्रमाणें पुढेंही मक्ता करून द्यावा. त्याप्रमाणें ऐवज सरकारात देऊं म्हणून त्यावरून मौजे मजकुर येथील करार इस्ताव्यानें गांवखर्च व हकदार इनामदार वजा होऊन बाकी अंमल जागीर सुभा बाबती सरदेशमुखी व मुकासा देखील कुलबाब रुपये.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८०० | अर्बासन | ११७३ | १२०० | सलाससीतेन | ११७४ | १५०० | सीत | ११७५ |
| १८०० | सलासितेन | ११७६ | २३०० | समानसितेन | ११७७ | ० | | |

एकूण शहात्तरशें रुपये पांचसाला करार केले आहेत, तरी दरसाल ऐवज कराराप्रमाणें त्यापैकीं मुकासा ऐवज परभारे बरदास्त त्यास देऊन बाकी ऐवज सरकारांत पावता करून कबज घेणें. मक्त्यांत मुजरा दिला जाईल. आफतफितूर मुजरा पडेल. मुक्काम चांदवड छ.१३ साबान.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 194 16-2-1764 A.D.

Subhedar Malharji Holkar assigns Mauza Dhare to Khandojee Kopre on a lease of five years for Rupees 7600- in toto (on an annual increasing scale).

---

**अ. नं. १९५** **श्री**

ता. २२ मार्च, इ. स. १७६४

राजश्री मल्हारजी होळकर सुभेदार साहेबांचें सेवेसीं स्नेहांकित पिराजी नाईक निंबाळकर. रामराम विनंती उपरि. तुमचे विद्यमानें ऐवज कर्ज घेतला रुपया दीडलक्ष सदरहू ऐवजास कबज परगणे काल्पी व परगणें कोंच दोन्ही महालची कमाविसी तुमचे विद्यमानें दिली असे, व्याज दर सदे दीड प्रमाणें व वेतन रु.१०,५०० करार असे. शिबंदी खर्च सुदामतप्रमाणें करावा. मुजरा देऊं. शके १६८७ तारणनामसंवत्सरे चैत्र शु. १ सोमवार बहुत काय लिहिणें.

हस्ताक्षर आनंदराव कृष्ण फडणीस दिमत मशारनिल्हे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 195 22-3-1764 A.D.

Pirajee Naik Nimbalkar has secured a loan of Rupees a lac and a half through the negotiation of Subhedar Malharji Holkar, the Kamavishi of Pargana Kalpi and Kaunch being mortgaged in return.

---

**अ. नं. १९६** **श्री**

ता. ३ एप्रिल, इ. स. १७६४

कर्जरोखा शके १६८२ तारणनामसंवत्सरे चैत्र शुद्ध द्वितीया ते दिनीं खत लिखिते धनकोनाम राजश्री मल्हारजी होळकर सुभेदार यांसी रिणकोनाम पिराजी नाईक निंबाळकर कारणे लिहून देतों ऐसे जे आत्मकार्यालागीं तुम्हांपासोन घेतले मुद्दल रुपये १,५०,००० दीड लक्ष यांसी व्याज दरमहा दरशेकडा रुपये दीड १।। दिडोत्र्याप्रमाणें जाले मुदतीपावेतों व्याजमुद्दल हिशेब करून देऊं. हें लिहिलें. सही. मोर्तबसुद.

हस्ताक्षर बाजी आप्पाजी कारकून दिमत मशारनिल्हे सन ११७३ चे सालीं खत लिहिलें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 196 3-4-1764 A.D.

Pirajee Naik Nimbalkar passes a bond of Rupees one lac and a half to Subhedar Malharji, the interest thereon being at the rate of a rupee and a half percent per mensum.

---

अ. नं. १९७ **श्री**

ता. ६ एप्रिल, इसवी सन १७६४

राजश्री माधवराव गणेश व शिवराम कृष्ण व भास्कर हरी गोसावी यांसी स्नेहांकित अहिल्याबाई होळकर दंडवत सुरूसन आर्बासितेनमयावअलफः तीर्थरूप राजश्री सुभेदारांनीं राजश्री हरी दामोदर यांचे विद्यमानें तुम्हांपासून कर्ज घेऊन खत व मुशाहिरेची सनद लिहून देऊन आमचे नांवें पत्र दिलें आहे. त्यास तीर्थरूपजीच्या पत्राप्रमाणें मामलत सांगून कदाचित मामलतीचे ठीक न पडले तरी सुभेदारांच्या कराराप्रमाणें ऐवजाचा निकाल करून देऊं. येणेंप्रमाणें पत्र छ.४ सवाल चैत्रमास सन ११७३ : इ. स. १७६४.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 197 6-4-1764 A.D.

Ahilyabai Holkar passes a note of acknowledgment to Madhaorao Ganesh and two others to the effect that the amount received by Subhedar Malharji will be paid according to the agreement in case the Mamlat-offer be not agreeable.

---

अ. नं. १९८ **श्री**

ता. १२-५-१७६४

हरीराम व नंदराम फघडे वगैरे खरगोण बत्तीसीकर यांनीं कुकसीकर दोघे ब्राह्मण पिरजादे याचे शिष्य व त्यांचे मार्गानें चालत होते. माणसे मेलियानंतर अग्निदहनादि संस्काररहित, ऐसे शंभर वरसे करीत आले होते, म्हणोन ज्ञातीबाहेर होते, त्यास गतवर्षी नंदराम यांनीं पंगतीस घेऊन बसला. ज्ञातिलोकांस न पुसतां व शास्त्रोक्त प्रायश्चित न देतां आपले सगेसोयरे पन्नास घरासी तल बसला आहे. ज्ञातीलोक म्हणतात त्यांचे आईकत नाहीं. त्यास पूर्ववत् ज्ञातीबाहेर करून आपण प्रायश्चित्त घेऊन सर्व ज्ञातीनें एकत्र भोजन करावे म्हणोन मल्हारजी सुभेदार यांस.

**पत्र १**

शत वर्षे यावनी मार्ग आचरला असतां त्यास शास्त्र न पाहतां त्याचे ज्ञाती लोक हरीराम नंदराम यांनीं आणिक पन्नासा घरांनीं मिळोन त्यास पंगतीस घेतला. त्याचे आणिकही ज्ञातीचे ब्राह्मण आहेत ते या गोष्टीस मान्य नसतां या पन्नासा घरांनीं तड करून अनाचार वर्तले आहेत म्हणोन विदित जालें. त्याजवरून तुम्हांस पत्र लिहिले असे. तरी काणव ज्ञातीचे ब्राह्मणाव्यतिरिक्त दुसरें ब्राह्मण नागर वगैरे जे शास्त्रसंपन्न असतील त्यांस हा शास्त्रार्थ

पुसोन शास्त्रमतें निवडेल त्याप्रमाणें हरीराम नंदराम वगैरे पन्नास घरें तड जाला आहे त्यांस वर्तवणे. शास्त्रमार्गानें वर्तावयाचे न ऐकत त्यांस सख्तपणें सांगोन शास्त्ररीतीनें चालवणें म्हणोन मल्हारजी होळकर यांस सदरहूप्रमाणें पत्र देणें. छ.१० जिलकाद वैशाख आर्बासितैन.

No. 198 12-5-1764

Peshwa Madhaorao I commands Malharji Holkar to investigate the case of Nandram of Khargone Battisi and to compel the violaters of Shastric orders to follow the same.

---

**अ. नं. १९९** **श्री**

शके १६८६ चैत्र वद्य ११ ता. २६-५-१७६४

राजश्री मल्हारजी बाबा होळकर गोसावी यांसी सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य. स्नेहांकित केदारजी शिंदे व माधवराव शिंदे रामराम विनंती उपरि येथील कुशल तागाइत छ.२४ सवाल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत गेले पाहिजे. तद्नंतर सटवाजी गावडे शिलेदार नालबंदी रुपये ९८१६-८-० नऊ हजार आठशें साडेसोळा आपणाकडून देविले आहेत. तर उसणवारी ऐवज देऊं केला आहे, त्यापैकीं नऊ हजार आठशे सोळा आठ आणे पावते करावे. याची रसीद घ्यावी. मिति चैत्र वद्य ११ शके १६८६ तारणनामसंवत्सरे. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे. हे विनंती मोर्तबसुद.

| श्री ज्योतिस्वरूप चरणीं तत्पर जयाजी सुत जनकोजी शिंदे. निरंतर |
|---|

**सरकारी रेकॉर्ड**

No. 199 26-5-1764 A.D.

Kedarjee Shinde and Madhavrao Shinde ask Subhedar Malharji to pay Rs. 9816 and odd to Gawade out of the amount promised to be lent to them.

---

**अ. नं. २००** **श्री**

ता. १४-६-१७६४

सनखमससितैनमयावआलफ जिल्हेज छ.१३ राजश्री मल्हारजी होळकर बिन खंडूजी

होळकर यांनीं हुजूर विनंती केली कीं आपण राज्यातील एकनिष्ठ सेवक, स्वामीसेवा एकनिष्ठेनें केली, त्यास कृपाळू होऊन प्रगणे अंबाड, सरकार जालनापूर व कोरेगाव, तर्फ पाबळ प्रांत जुन्नर नूतन इनाम करून देऊन चालविलें पाहिजे, त्यावरून मनास आणितां यांजवर कृपाळू होऊन सदरहूप्रमाणें इनाम नूतन पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें करार करून देऊन भोगवटियास सनदा.

No. 200 14-6-1764 A.D.

Sanad graciously granting Pargana Ambad and Mauza Khargone to Malharji Holkar on his request to that effect.

---

**अ. नं. २०१** **श्री**

ता. ६ नोव्हेंबर, इ. स. १७६४

राजश्री वासुदेव संभाजी कमाविसदार प्रगणे अंबाड गोसावी स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत सुरूसन खमससितेनमयावअलफः प्रगणे मजकुरचे ऐवजीं श्रीमंत राजे दादासाहेबांस देविले रुपये ६५,००० पासष्ट हजार साल मजकुरचे ऐवजीं मजरा पडती श्रीमंतांचे जप्तीवाले कारकून यांनीं प्रगणे मजकुरीं वसूल घेतला असेल तो पासष्ट हजार मजरा घेऊन बाकी श्रीमंतांस ऐवज देऊन कबज घेणें. श्रीमंतांस ऐवज ज्या मितीस दिला त्या मितीपासून महालीं वसूल होईपावेतों शिरस्तेप्रमाणें व्याज दिले जाईलः छ. १०.

जमादिलावल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 201 6-11-1764 A.D.

Subhedar Malharji Holkar commands the Kamavisdar of Pargana Ambad to Rs. 65,000- to Srimant Dada Saheb Peshwa. Amount collected by his officers to the period of confiscation would be deducted.

---

**अ. नं. २०२** **श्री**

ता. ३ डिसेंबर, इ. स. १७६४

राजश्री वासुदेवपंत दिमत रा.मल्हारजी होळकर सुभेदार प्रगणे अंबाड. गोसावी यांसी

स्नेहांकित भागोजी कडलग व रंगोजी घोगरे दिमत राजश्री जयवंतराव दंडवत तुम्हाकडे वरात सरकारची रुपये ५२०२-१२-० पांच हजार दोनशें पावणेतीन रुपयेची होती त्यापैकीं सदरहू वरातेचा ऐवज भरून पावलों. हे कबज लिहून दिले. सही. मार्गशीर्ष शु.१३ तारणनामसंवत्सरे हस्ताक्षर विठ्ठल महादेव दिमत त्रिंबक खंडेराव.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 202 3-12-1764 A.D.

Bhagoji Kadlag and Rangoji Ghogare in the service of Jayawantrao pass a receipt of Rs. 5202-12-0 (amount due to the Sarkar) to Vasudeopant in the service of Malharji Holkar Subhedar of Pargana Ambad.

---

**अ. नं. २०३** **श्री**

ता. २३ जानेवारी, इसवी सन १७६५

चिरंजीव राजश्री मालबास प्रती मल्हारजी होळकर आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणें. विशेष. सटवाजी गायकवाड याजकडील सरकार पागेची घोडीं, उंटे तुम्हां समागमें आलीं आहेत, त्यास रोजमुरा दीडमाही रुपये ५९ तुम्हांकडून देविले असेत. तरी एकूणसाठ रुपये मशारनिल्हेकडील पागेसी देणें आणि पागेकडील घोडीं, उंटे, शिंगरें तेथें आली असतील त्यांची हजेरीगणती चौकशीं करून चंदी दररोज देत जाणें. ता छ.१ साबान बहुत काय लिहिणें. पैवस्त छ.८ साबान माघमास.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 203 23-1-1765 A.D.

Subhedar Malharji Holkar advises Malba (grandson) to mark the daily presence of horses, camels, etc., of the Paga; to feed them punctually and properly. The expenses of the feeding for 45 days come to Rs. 59. The amount is to be paid by you. The Paga is under the command of Satwaji Gaikawad.

---

**अ. नं. २०४** **श्री**

ता. २५ जानेवारी, इसवी सन १७६५

चिरंजीव अहिल्याबाईस आशीर्वाद. उपरि येथून ढालाईत, कामाठी व बारूवान साज.

जंगली रोजमुरा घेऊन न पुसतां उठून तुम्हां समागमें आलेत. याजकरितां तुम्ही ढालाइतापासून रोजमुरा परतोन घेऊन त्यास चाकरीवरून दूर करून टाकणें आणि बारूद साजास इकडे पाठवावें. कामठ्याचे जमानतीपैकीं तेलगी जमानत तेलंगे जे असतील तेही आपल्यापाशीं ठेवणें. वरकड इकडे पाठवावे. छ.३ साबान अर्बा ११६५ बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 204 25-1-1765 A.D.

Subhedar Malharji Holkar's orders to Ahilyabai to dismiss the Shieldbearers etc. who left the camp without the master's permission. She should retain only the Telangis out of the Kamathi class. All the rest should be ordered to go back to Subhedar Malharji.

---

**अ. नं. २०५**

## श्री मोरया

ता. २५ जानेवारी, इसवी सन १७६५

चिरंजीव अहिल्याबाई होळकर यांसी मल्हारजी होळकर आशीर्वाद उपरि तुम्ही पत्र पाठविलें तें पावले. लेखनार्थ अवगत जाहला. वजीर गाजुदिन खानाचा मजकूर लिहिला तो कळला. येविषयीं वजिराला इतकियावरी डीग, भरतपुरीं कुटुंब ठेवावयासी अनुकुळ पडत नाहीं. भरतपुरी उमदाबेगम व वजिराची स्त्री आहे. तेही तुम्हांपाशी येणार. तुम्हांपाशी आलियावरी तुम्हापाशी जे कुटुंब आहे, ते व भरतपुरीहून येईल तेही उभयतां मथुरेहून आग्रियासी जाणार. तेथून फरक्काबादेस जाणार याजकरितां तुम्हांस लिहिलें आहे. तरी तुम्ही आपले पासून एक शहाणा मनुष्य पंचवीस राऊत मुजरद भरतपुरास पाठवून पावताकरून एखादा मुक्काम भरतपुरीं करून तिसरें रोजीं वजिराकडील कबिले आपलेपाशी आणून त्यांचा बहुत प्रकारें सन्मान करून त्यांस आपले समागमें आगऱ्यापर्यंत सांभाळून नेणें. तेथून ते फरक्काबादेचे मार्गे रवाना होतील. तुम्ही ढवलपुराहून दरमजल पुढें जावें. वजिराकडील कुटुंबास फरक्काबादची गोष्ट तिळमात्र त्यांस कळूं न देणें. त्यांजकडील कोणा गृहस्थासही मजकूर कळों न देणे. तेथें मथुरा शहरीं एक मुक्काम तुम्हीं जरूर करून वजिराकडील कुटुंब आपलेपाशीं आणून आगऱ्याशीं पावते करून पुढें तुम्ही कोठें न अटकतां जलद जाणें. जरकरितां हें पत्र मथुरेचें पुढें तुम्हांस पावलें तरी तुम्ही अथवा आगऱ्यासी एखादा मुक्काम करून वजिराकडील कुटुंब भेटीचा बहाणा करून आगऱ्यासी पावते करणें. एका मुक्कामाखेरीज जास्त मुक्काम न करणें. रवाना छ.३ साबान बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. मोर्तबसुद.

पैवस्त छ.६ साबान मुक्काम मथुरा सन ११७४.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 205 25-1-1765 A.D.

Sarkar Malharji's orders to Ahilyabai regarding the party of ladies of the Vazir - to be treated respectfully and hospitably: Ahilyabai to accompany them till they reach Agra advice regarding diplomatic conduct towards the two parties.

---

**अ. नं. २०६** **श्री मोरया**

(सदर संबंधात दुसरें पत्र) इ. स. १७६५

आशीर्वाद उपरि नबाब गाजुद्दिनखान याजकडील कुटुंब भरतपुरीं आलें आहे. आणावयास शहाणा माणूस पाठवून आणून आगऱ्यापावेतों बरोबर नेणें, म्हणोन अगोदर चिठ्ठी लिहिली आहे. त्याप्रमाणें तजवीज करून कुटुंब आग्राकडे नेणें. तेथें मुक्काम न करितां दरमजल पुढें जाणें. मुक्काम करण्याचे म्हणतील तरी न करणें धवलपूरचे मार्गे जाणें. तुम्ही आगरियास मुक्काम न करितां, दरमजल पुढें जाणें. फरक्काबादेकडील जाणेंचे वृत्त नबाबाकडील कोणास अगर तिकडील लोकास एकंदर कळवूं न देणें. हे आशीर्वाद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 206 1765 D. A.

Details as above. By no means stay at Agra, but proceed further.

---

**अ. नं. २०७** **श्री**

ता. २६ जानेवारी, इसवी सन १७६५

गंगाजलनिर्मळ मातोश्री अहिल्याबाई होळकर साहेब. स्नेहपूर्वक गंगाधर यशवंत आशीर्वाद उपरि येथील कुशल तागाइत छ.४ साबान यथास्थित असो विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लेखनार्थ अवगत जाला. हुंड्यांचा मजकूर लिहिला त्यास आपण लिहिलें त्यावरून जयपुराकडील ऐवजापैकीं हुंड्या थान सुमारें १० दहा दोन लक्ष एकूण पन्नास हजार. चार सांडस्वारांसमागमें पाठविलीं. तपशील

७५००० सुरतराम मेहता कित्ता थाने ५०००० हुंड्या ३ कित्ता थान २५००० हुंडी १
१७४००० भवानी शंकर कित्ता ७५००० हुंड्या थाने ४ कित्ता ७५००० थान १

.......... कित्ता २४००० थान १
२४९०००

एकूण हुंड्या थाने सुमार दहा दोन लक्ष एकूणपन्नास हजाराच्या इंदूर, उज्जेनच्या तेथें पावल्या रोजा एकवीस, आपण असतां लिहून घेतल्या त्या पाठविणें. म्हणून पत्र आलें त्याप्रमाणें पाठविल्या आहेत. पावतां काशीद रवाना करून स्वीकारून घ्याव्या. बाकीचे ऐवजाचीही आज संध्याकाळ पावेतों वाट होईल, त्याप्रमाणें आपल्याकडे लिहून पाठवूं. ऐवज उत्तमचाली घ्यावा. भिलाडा वगैरे बट्याचा न घ्यावा. येणेंप्रमाणें लिहावें. इकडील वृत्त नवल विशेष नाही. काल शुक्रवारी लढाई जाहली. तीन प्रहर झुंज जाहलें. आपल्याकडील फौजेची सरशी जहाली. पुढें होईल वृत्त लेखन करूं. गाजिदखानाच्या कबाल्याचा मजकूर आपण लिहिला होता त्याप्रमाणें निकाल काढून यजमानानीं आपणास पत्रें लिहिलीं आहेत त्यांवरून कळेल. मिती माघ शुद्ध ५ पंचमी लोभ असावा हे विनंती. पैवस्त तागाइत छ.७ साबान सुरूसनखमस ११७४.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 207 26-1-1765 A.D.

News-letter from Gangadhar Yeshwant (Chandrachud Minister) to Ahilyabai. In the fight of yesterday the Holkar Army was victorious. Jaipur Hundees of two lacs and forty-nine thousand are sent. Gajidkhan's home affairs are settled by the Subhedar.

---

**अ. नं. २०८** **श्री**

ता. ३० जानेवारी, इसवी सन १७६५

श्रीमंत मातोश्री बाईसाहेबांचे सेवेसीं. सेवक आत्माराम आप्पाजीराम आशीर्वाद विज्ञापनाः विशेष. आपण गेले तागाइत कृपापत्राचे अनुसरन (?) केले. धनी खावंद आहांत. तरी ऐसें न पाहिजे. सदैव पत्र पाठवून समाचार घेत जावा. येथील वर्तमान. श्रीमंत सुभेदार साहेबांनीं लिहिलें त्यावरून कळेल. राजकीय वर्तमानः अबदालीस शिखांनीं पराभवलें, बुडविला. सारांश, पळाला; परंतु लाहोरापलीकडे मार्गी मयत झाला, असें वर्तमान आले. तथ्यांश मागाहून लिहूं. बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंती सेवेसीं शिवाजी गोपाळ कृतानेक आशीर्वाद. श्रीमंत भाऊंनीं लिहिलें त्यावरून कळेल, हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 208 30-1-1765 A.D.

News-letter from Atmaram Appajiram to Ahilyabai. Defeat of

Abdali at the hands of Sikhs. He breathed his last in his march beyond Lahore, so runs the rumour.

---

अ. नं. २०९ **श्री**

ता. ३१ जानेवारी, इसवी सन १७६५

चिरंजीव अहिल्याबाई होळकर यांसी प्रती मल्हारजी होळकर आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करणें. विशेष तुम्हास दरमजल ग्वाल्हेरीस जावयाविषयीं अगोदर पत्रें लिहिलीं आहेत. त्याप्रमाणें कुच दरकुच ग्वाल्हेरपर्यंत जाणें आणि तेथें गेलियावरी पांचसात मुक्काम करून थोरल्या तोफेचे गोळे हजार पांचशे पावेतों व जंबुरियाचे गोळे होतील तितके जरूर करवावे. याशिवाय जंबुरेही शंभरपावेतों कारखाना लावून तयार करवावे. बाणाच्या पालेका शेरभर दारूमाय येवी पालेक उत्तम निवडक पाहून मिळतील त्या घेणें. येविषयीं हयगय नसावी. जातेसमयीं तुम्हांस जंबुरियाकरितां सांगितले आहे. त्याप्रमाणें गोळीचा सांचा करून जंबुरे जरूर करविणें. ग्वाल्हेरीपलीकडे तुम्ही जाल तेव्हां तोफखान्याचे खर्चाची बेगमी एक महिन्याची करून मग पुढें जाणें. छ.९ साबान बहुत काय लिहिणें. पैवस्त छ.१४ साबान गुरूसनखमस ११७४ मुक्काम आगर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 209 31-1-1765 A.D.

Subhedar Malharji's instructions to Ahilyabai regarding the manufacuring of cannon-balls etc.

---

अ. नं. २१० **श्री मोरया**

ता. ३१-१-१७६५

गंगाजलनिर्मल मातोश्री अहिल्याबाईसाहेब यांसी स्नेहपूर्वक गंगाधर यशवंत व अप्पाजीराम आशीर्वाद विनंती उपरि. आपण कांहीं मथुरेसी मुक्काम केले, करणार म्हणोन राजश्री सुभेदारांस कळलें. त्यावरून बहुत रोष केला कीं सांगितलें असतां यात्रा करीत फिरतात. चित्तास येतें तसें करतात. हें उत्तम नाहीं. म्हणून त्यावरून सेवेसीं विनंती लिहिली असे. तरी आपण पाणी पिणेस देखील मथुरेसी न राहतां दरमजल ग्वाल्हेरपर्यंत जावें. तेथें मुक्काम करून थोरले तोफखाना ठेवून त्याचे खर्चाची बेगमी एक माहची करून मग पुढें जाण्याचें करणें. परंतु चंमलअलीकडे एक घडी न राहणें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 210 31-1-1765 A.D.

Gangadhar Yeshwant and Appaji Rama (both Ministers to Subhedar Malharji Holkar) write to Ahilyabai warning her against staying at Mathura (setting at naught the instructions of the Subhedar). Straight march to Gwalior is desirable.

---

**अ. नं. २११** **श्री**

ता. ३१ जानेवारी, इसवी सन १७६५

चिरंजीव अहिल्याबाई यांसी प्रती मल्हारजी होळकर आशीर्वाद उपरि तुम्हांस जातेसमयीं सांगितलें कीं मथुरेसी अगर आगऱ्यासी कांहीं मुक्काम न करितां भारीभारी मजली करून ग्वाल्हेरपर्यंत झाडून जाणें. म्हणून ऐसे असता तुम्हीं मथुरेसी दोन तीन मुक्काम करणार ऐसें ऐकिलें. ऐसियासी जाते समयीं समक्ष आज्ञा केली असतां त्या गोष्टी सर्व एकीकडे ठेवून मथुरेसी मुक्काम केले हें उत्तम नसे. आम्ही सांगितले तें न करावे आणि आपल्याच चित्तास येईल तसें करणें असेल तरी सुखरूप तीर्थे करून असणें. सांप्रत पत्र लिहिलें आहे. तरी इतकियावरी पाणी पिण्यासी देखील मथुरेस न राहतां थोर थोर मजला करून चमल उतरून ग्वालेरीस जाणें. तेथें बनेल तर पांच चार मुक्काम करावे. त्यास्थलीं थोर तोफखाना ठेवून त्याचे गोळे व जंबुरियाचे गोळ्याची तजवीज होईल तितके करावें. परंतु ग्वाल्हेरी अलीकडे एक मुक्काम न करणें. मागाहून वरचेवर लिहूं त्याप्रमाणे वर्तणूक करणें. तोफखाना थोर ग्वाल्हेरीस ठेवून त्याची महिन्याभराची बेगमी खर्चाची करून देऊन मग पुढें तुम्ही जाणें. चौकी पहारा मार्गाचा जाबता करीत जावा. छ.९ साबान हे आशीर्वाद. मोर्तबसुद.

पैवस्त छ.१२ साबान खमससन ११७४ माघमास (ता.३-२-६५)

**सरकारी रेकॉर्ड**

No. 211 31-1-1765 A.D.

Subhedar Malharji's stern discipline. Asks Ahilyabai to march to Gwalior and look to the manufacturing of guns without stopping at Mathura even for a minute.

---

**अ. नं. २१२** **श्री मोरया**

ता. २ फेब्रुवारी, इसवी सन १७६५

गंगाजलनिर्मळ मातुश्री अहिल्याबाई साहेबांचे सेवेसीं. प्रीतिपूर्वक कृष्णराव गंगाधर अनेक आशीर्वाद विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करावयासी आज्ञा करीत असलें पाहिजे. विशेष आपण गेलियातागाइत पत्रीं सांभाळ न जाहला तरी सदैव पत्रीं सांभाळीत असावें. या उपरि आपण गेलियावर एक झुंज गोलागौलीची उत्तम झाली. शेदोनशें माणसें यवनांचीं ठार झाली. पांच चारशें जखमी जाहलीं. आपल्याकडील ही शेपन्नास जखमी चांगलीं माणसें जाहली. त्या उपरि लाहोराकडील खबर शिखांसी यवनाचे सरदार कूल यांसी युद्ध झाले. यवनाचे सरदार पराभव पावले. पैकीं दहा पांच हजार नेस्तनाबूत केले. यामुळें यवन लाहोराकडोन सुलतानचे सुमारें फिरोन अटकेकडे जावयाचा इरादा करितो. लाहोरास शिखांचा अमल असे. प्रस्तुत हें वर्तमान ऐकून चेतराम आला होता तो फिरून शहरांत गेला आहे. आणखी निश्चितार्थ होईल तो सेवेसीं लेखन होईल. रोजमरा शेवटास गेला नाहीं. सदाशिवभटास वस्त्रें दो चौ दिवसांत येथून स्वार होऊन येतील. सेवेसीं श्रुत होय हे विनंती. सौ. बालाबाईस अनेक आशीर्वाद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 212 2-2-1765 A.D.

News-letter of Krishnarao Gangadhar to Ahilyabai. A hand fight took place which about two hundred men fell from the enemy's camps double the number was wounded : the number to the wounded in our camp is about a hundred.

The Sikhs obtained a brilliant victory over the Yavanas.

---

**अ. नं. २१३** **श्री**

शके १६८६ माघ शुद्ध १४, ता.४-२-१७६५

राजश्री मकाजी गीते दिमत पागा. गोसावी यांस स्नेहांकित मल्हारजी होळकर रामराम सुरू सन खपससितैनमयावलफ. जगन्नाथ वाणी मेरठ कसब्यांत राहतो. त्यासी तुम्ही उपसर्ग देतां, म्हणून येथें चैतरामानें हुजूर विनंती केली. त्यावरून हल्लीं पत्र सादर केलें असे. तरी इतःपर चेतरामाकडील जगन्नाथ वाणी मेरठेंत राहतो, त्यांस तुम्ही मुजाहिम न होणें. जाणिजे छ.१३ साबान बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

No. 213 4-2-1765 A.D.

Subhedar Malharji admonishes Makaji Gite (in charge of Paga) against molesting a certain trader named Jugannath.

---

**अ. नं. २१४** **श्री**

ता.१० फेब्रुवारी, इसवी सन १७६५

गंगाजलनिर्मल मातोश्री अहिल्याबाई साहेब यांसी. स्नेहपूर्वक गंगाधर यशवंत आशीर्वाद विनंती. उपरि येथील क्षेम असो विशेष. जयपुराकडील हुंड्या अगोदर पाठविल्या त्या पावल्याच असतील. हल्लीं पाऊण लाखाच्या हुंड्या थानें दोन सेवेसीं रवाना केलीं आहेत. आपलेपाशीं आलियावरी उत्तर पाठविणें. हुंड्या पुढें इंदूरास रवाना करून ऐवज पाठवावा. सुस्ती न करितां जलद हस्तगत करवाव्या. याप्रमाणें सुभेदार साहेबांची आज्ञा आहे. लोभ असावा हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 214 10-2-1765 A.D.

Gangadhar Yeshwant (Chandrachud Minister) communicates his master's orders to Ahilyabai to cash the Jeypur Hundees of Rupees 75,000- without delay.

---

**अ. नं. २१५** **श्री मार्तंड**

ता.१० फेब्रुवारी, इसवी सन १७६५

चिरंजीव अहिल्याबाई यांसी प्रती मल्हारजी होळकर उपरि येथील कुशल तागाइत माघ वद्य ५ मुक्काम दिल्ली जाणून यथास्थित असो विशेष. राजश्री गोविंद शामराव यांनीं लिहून पाठविलें कीं किल्ल्यावर तोफा उतरावयाकरितां लिहून पाठविलें आहे. त्याप्रमाणें तोफांचा सरंजाम नाहीं त्याची आज्ञा काय म्हणोन त्यावरून येथोन लिहून पाठविलें कीं किल्ल्यावरील तोफा न उतरणें. आम्ही येथून तोफा थोर चार पाठविल्या आहेत. त्या शहरांत ठेवणें आणि तोफा तुम्ही ग्वालेरीस पाठवाल त्यासमयीं बैलांस चाराचंदी व गाडी रोजमुरियाची वगैरे नेमणूक देणें आणि येथून ग्वालेरीस सरंजाम करविला आहे.

त्याची सुमारी :

४००० थोरले तोफांचे गोळे, १०००० जंबुरियाचे गोळे, १५०० आणीदार गोळ्या

.....................................

१५५००

एकूण पंधरा हजार सुमारीं लिहून पाठविले आहेत. त्यास गोविंद शामराव लिहून पाठवितील त्याप्रमाणें ऐवजाची बेगमी करून देणें. इकडील वर्तमान तर छ.१८ साबानीं नजीबखां पुत्रासह डेरियासी भेटीस आला. त्याची आमची भेट जाहली. उपरांतिक जाटाची व गाजुदिखान याचे भेटीस गेले. तेही भेटले. पुढें जें होईल तें लिहून पाठवूं. तुम्ही ह्या लिहिण्याच्या प्रमाणावर मुक्काम करून राहणें. दरमजल जाणें. सलूख येथे स्थित ठरलिया उपरिच इकडील बंदोबस्त सत्वरच होईल. जाणिजे छ.१९ साबान बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. मोर्तबसुद.
पैवस्त छ.२५ साबान खमस माघमास.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 215 10-2-1765 A.D.

Subhedar Malharji informs Ahilyabai that orders are already passed for manufacturing cannon-balls at Gwalior. She should arrange for defraying the expenses.

---

## अ. नं. २१६ श्री मोरया

ता.१० फेब्रुवारी, इसवी सन १७६५

गंगाजलनिर्मळ अहिल्याबाई यांसी प्रती गंगाधर यशवंत आशीर्वाद विनंती उपरि येथील कुशल माघ वद्य ५ मुक्काम दिल्ली जाणून स्वस्तिक्षम असो विशेष. छ.१८ साबान वर्तमान नजीबखान आपल्या पुत्रासह येजमानाचे भेटीस आला. भेटी जाहल्या. याउपरांतीं श्रीमंत राजश्री सुभेदार व नजीबखान एका हत्तीवर बसून जाटाचे डेरियास गेले. त्याच्याशीं भेटी जाल्या. परंतु गाजुदिखानाची भेट झाली नाहीं. ती उदईक होईल. तुम्ही मुक्काम न करणें. सलूक जाहला म्हणून मुक्काम कराल तरी तुम्ही मुक्काम न करावा. यजमानाचे जेवणाची तारांबळ बहुत होत आहे. त्यास सौभाग्यवती बनीबाई यांसी राजश्री सुलतानजी लांबहाते यासमागमें पाठवावे आणि त्या समागमें सरलेखान मानकरी न पाठवावा. दोघी कुणबिनी मात्र समागमें ठेवून आणि त्यांची रवानगी करावी. बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंती.

हेच पत्रीं : कृष्णराव गंगाधर अनेक आशीर्वाद. लिहितार्थ परिसिजे सेवेसीं पत्र पाठविलें त्याचें उत्तर कृपेचें न आलें येणेंकरून चक्रित असों. सांभाळ करणार खाविंद आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 216 10-2-1765 A.D.

Gangadhar Yeshwant Chandrachud (Minister) sends news-letter to Ahilyabai : "Najibkhan is friendly : Gajiuddin not so: please arrange to send Saubhagyawati Banabai here. She will look to the comforts of meals etc. of Subhedar Malharji.

---

**अ. नं. २१७** **श्री**

ता.१५ फेब्रुवारी, इसवी सन १७६५

तीर्थरूप राजश्री सुभेदार वडिलांचे सेवेसीं. अपत्यें अहिल्याबाईंनें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग दंडवत विनंती येथील कुशल तागाइत माघ व.१० मुक्काम नजीक ग्वाल्हेर येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असो विशेष. शागीर्दपेशाचे रोजमुरियाचे खर्चाचा आकार करून यादी सेवेसीं पाठविल्या आहेत. त्यावरून सविस्तर ध्यानास येईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 217 15-2-1765 A.D.

Ahilyabai submits the budget of the Household Department to Subhedar Malharji from the Gwalior-camp.

---

**अ. नं. २१८** **श्री**

ता.२३-२-१७६५

चिरंजीव अहिल्याबाई यांसी प्रती मल्हारजी होळकर. उपरि विशेष. तुम्हीं पत्र पाठविले तें पोचलें. ग्वालेरीस तोफखाना ठेवावयाची सोय नव्हती. त्याजकरितां सिरोंजेस घेऊन जातों. तेथें तोफखाना ठेवूं म्हणून लिहिलें. ऐसियास तोफखाना सिरोंजीं ठेवून तेथें बैलास चारादाण्याची सोय उत्तम प्रकारें करून देऊन ताजूस तोफासुद्धां ठेवणें आणि तुम्ही इंदुरीं जाणें. तेथें गेलियावर सुलतानपुर, सेंधव्याचा बंदोबस्त जरूर करणें. इकडील मजकूर प्रस्तुत दिल्लीहून कूच जाहलें. अंतरवेदींतून बुंदेलखंडचे सुमारें येत असों. जाणिजे छ. रमजान बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 218 23-2-1765 A.D.

Subhedar Malharji instructs Ahilyabai to remove artillery to Sironj, and the to look to the affairs of Sultanpur and Sendhwa.

---

अ. नं. २१९ **श्री**

ता.२३-२-१७६५

चिरंजीव अहिल्याबाई यांसी प्रती मल्हारजी होळकर आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत जाणें. विशेष तुम्हा समागमें ताजू तोफखाना घेऊन आला आहे त्यास तोफखाना झाडून सिरोंजेसी येऊन तेथें बैलासी चारा पोटभर व चंदीची बेगमी करून देऊन मग तुम्ही पुढें जाणें. राजश्री चिमणाजी गोविंद मामलेदार यांस बैलांच्या चाऱ्याविषयीं व डागडुजी तोफखान्याचेकरितां ताकीद करून तोफांची झाडून तयारी करून ठेवणें. येविषयीं असावधता नसावी ते प्रांतीं लवकरच येतों. तिकडे आलियावरी तोफेचें प्रयोजन लागेल. जे समयीं पत्र जाईल ते समयीं ते घडीस स्वार होऊन जलद येऊन पावतील. पर्जन्य काळ याजस्तव दोर, दारे, खंड, कळ, कान, वगैरे सर्व सामान सांभाळून सिद्धता करून ठेवावी. बैल ताजे जरूर राखणें. तोफखान्याचे तयारीविषयीं येथून ताजूस लिहिलें आहे आणि तुम्हीही ताकीद करून बैलांची वगैरे तरतूद चांगली करविणें. जाणिजे छ.२ रमजान बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

पैवस्त छ.१३ रमजान खमस सन ११७४ मुक्काम थोरली नदी फाल्गुन मास.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 219 23-2-1765 A.D.

Subhedar Malharji's instructions to Ahilyabai regarding artillery in all its branches.

---

अ. नं. २२० **श्री मोरया**

ता. २४ फेब्रुवारी, इसवी सन १७६५

चिरंजीव अहिल्याबाई यांसी मल्हारजी होळकर आशीर्वाद. उपरि तुम्हांजवळ चाकरीकरितां आनंदराव लोहकरे यांच्या पागेचे बारगीर असामी १५ पाठविले आहेत. तरी त्यांची हजेरी गणती घेऊन पोटपाण्याचा समाचार घेत जाणें. या शिवाय आणखी

असामिया कारकुनासुद्धां पाठविल्या आहेत. तरी यांची हजिरी गणती घ्यावी हे आशीर्वाद मोर्तबसुद.

पैवस्त छ.३

**सरकारी रेकॉर्ड**

No. 220 24-2-1765 A.D.

Subhedar Malharji's instructions to Ahilyabai regarding the enlistment, roll call, rationing etc., of 15 Bargirs despatched in her service.

---

## अ. नं. २२१ श्री मोरया

ता.२५ फेब्रुवारी, इसवी सन १७६५

गंगाजलनिर्मल अहिल्याबाई यांसी स्नेहपूर्वक गंगाधर यशवंत आशीर्वाद विनंती उपरि येथील कुशल तागाईत फाल्गुन शुद्ध ५ पर्यंत मुक्काम नजीक दिल्ली यथास्थित असो विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लेखनार्थ अवगत झाला. जैपूरच्या हुंड्यांचा मजकूर लिहिला त्यास अगोदर सांडस्वारा समागमें हुंड्या दोन लक्ष एकूण पन्नास हजारांच्या पाठविल्या त्या सेवेसीं पावल्या. त्यामागून जोधा मिरधा याजकडील किसन कासिदा समागमें पाऊण लाखाच्या हुंड्या पाठविल्या त्या पावल्या असतील. उत्तर पाठवावें. वरकड येथील मजकूर तर नजीबखानाचे स्नेहाचा प्रकार नामजाद वजीर याचाही प्रसंगानुरूप बंदोबस्त करून दिला. मिती मजकुरीं येथून कूच झालें. अंतर्वेदीहून बुंदेलखंडाचे सुमारास येतात. सुजाउतदौला वगैरे मनसबेही मर्धी आहेत. उपयोगी दिसून येतील त्याप्रमाणें घडतील. वरकड मजकूर राजश्री सुभेदार साहेबीं लिहिला त्यावरून कळेल. अन्नछत्राच्या गांवाविषयीं लिहिलें त्यास होईल तितक्या प्रयत्नांत अंतर होणार नाहीं. लोभाची वृद्धी करावी हे विनंती. पैवस्त छ.१३ रमजान खमस ११७४ मुक्काम थोरली नदी फाल्गुन मास.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 221 25-2-1765 A.D.

News-letter form Gangadhar Yeshwant Chandrachud (Minister) to Ahilyabai : Hundees from Jaipur one after another amounting to Rupees three lacs and twenty four thousand in all. The Vazir has submitted: Subhedar's march from the United Provinces to Bundelkhand: Efforts to secure villageland for the feeding-house.

---

**अ. नं. २२२** **श्री**

ता. २५ फेब्रुवारी, इसवी सन १७६५

श्रीमंत गंगाजलनिर्मल मातोश्री बाईसाहेबांचे सेवेसीं आज्ञाधारक कृष्णराव गंगाधर आशीर्वाद विज्ञापना येथील कुशल तागाइत फाल्गुन शुद्ध पंचमीपर्यंत यथास्थित असे विशेष. येथील वर्तमान दोन तीन विनंतीपत्रीं लिहित गेलो. तीं पावलीं कीं न पावलीं असें दिसोन आलें. सांप्रत येथून कूच जाहलें. अंतर्वेदीतून सकुराबाद या सुमारें जातात तिकडे गेलियावरी सुजाउतदौला वगैरे मनसुबे आहेत पहावें. नजीबखानाकडील आपली कामें होणे त्यापैकीं कांहीं मनाजोगी होतील न होतील असें आहे. सर्वांस आपल्या विकल्यास उजर नाही. परंतु कत्द्यामाल नजर नाहीं. ऐशीं लक्षें सर्वांची असत. प्रस्तुत ये पातशहावजिराचा निश्चय करून लौकरीच अंतरर्वेदींतील महालांत बसवायास जात असतां नजीबखानाकडील बाकीसाकियाविषयीं शंका दिसते. जवाहिराचा मजकूर मुळमुळीत दिसतो. पारच्या रोहिल्याकडून मुलकाबाबद ऐवज मामलतीचा येणें तो जोर पडल्यास येईल. रूपरामाकडून ऐवज पुरता सरळ येतां दिसत नाहीं. तथापि सक्त तगादे केले असतां शिल्लक पोत्यातील जाहली. ऐसें वर्तमान आहे मुलखाचा बंदोबस्त जाल्यानंतर सुजाम दौला याचे कुमकीस जावे आणि फिरंगियास प्रयाग घेऊं न द्यावा ऐसा मनसबा असत. नंतर मग पारचे रोहिल्याकडील मामलतीचा जाबसाल समजून घ्यावा यास्तव येथून कूच करून लवकरच श्री भागीरथीतटास जातील. आम्ही येथून दोनतीन पत्रें लिहविली. पावून उत्तरें न आली अथवा पावलींच नाहीं, हें कृपापत्रीं लेखन करावयास आज्ञा करून आणि वडीलपणें कृपापत्रीं सांभाळीत जावें. सेवेसीं श्रुत होय, कृपा लोभ असो हे विनंती पैवस्त छ.१३ रमजान खमस ११७४ मुक्काम नदीपार (ता. ६ मार्च सन १७६५)

No. 222 25-2-1765 A.D.

News-letter from Krishnarao Gangadhar Chandrachud to Ahilyabai: we are on the way to Sakurabad: the affairs between the Padshah and Vazir : meagre of securing the dues from Najibkhan. Affairs of Suja-Ud-Dowlah. Possession Prayag etc. are all matters engaging the consideration of Subhedar Malharrao and councillors.

---

**अ. नं. २२३** **श्री**

ता. २८ फेब्रुवारी, इसवी सन १७६५

चिरंजीव अहिल्याबाई यांस प्रती मल्हारजी होळकर आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणोन तुम्ही आपलें लिहित जाणें. विशेष इकडे पाठवून द्यावयाकरितां अगोदर एक दोन

पत्रें पाठविलीं होतीं. त्यासमागमें अवघ्यांचा यावयाचा विचार होता, म्हणून ऐकिलें. ऐसियास आमचे मर्जी प्रकार तुम्हांस विदित आहे. ऐसे असतां आज्ञेशिवाय येणें कामास येईल कीं काय ? अतःपर आमचे मर्जीची दरकार आहे तर रा. बहिरो अनंत व गोविंद शामराज यांजबरोबर त्यांची (बनाबाई) रवानगी करून तुम्ही तोफखान्यासह सिरोंजेस जाणे. चिरंजीव मालबास वगैरे कोणी येऊं लागले तर कामास येणार नाहीं. लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें. अबदाली सरहद्दीअलीकडे आला. सुजाउदौला वगैरे झाडून रोहिले गिलचे दिल्लीस येणार. पुढें मनसबा कसा काय आढळेल तसा केला जाईल. तुम्ही एक घडीचा विलंब न करितां सिरोंजेस जाणें. मर्धी कोठें न उतरणें. लिहिल्याप्रमाणें रवानगी वाटेश्वरचे मार्गे करणें. छ.७ रमजान मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 223 28-2-1765 A.D.

Subhedar Malharji's stern discipline: instructs to send only Banabai. Ahilyabai should proceed to Sironj. None (even grandson Malba) should accompany Banabai.

---

**अ. नं. २२४**

## श्री मोरया

ता. २ मार्च, इसवी सन १७६५

गंगाजलनिर्मल मातोश्री अहिल्याबाई साहेबांचे सेवेसीं. आज्ञांकित कृष्णराव गंगाधर अनेक आशीर्वाद विज्ञापना उपरि. येथील कुशल जाणून स्वकीय लेखनाज्ञा करीत गेलें पाहिजे. साहेबांकडून अजूरदा काशिदाबरोबर पत्रोत्तरीं बहुत आनंद जाहला. इकडील वर्तमान ही नजीबखान जाट यांच्या भेटी परस्पर सौरसयुक्त करून जाटास मार्गस्थ केलें व नजीबखान- आपले उद्योगास लागतील. पुढें कुच दरकुच सकुराबादेस व फुफुंद, विटावे, कडा, वगैरे महालांचा बंदोबस्त करावयासी जात असत. तदोत्तर रोहिले पलीकडे व महमदखान पठाणी यांनीं आपले मुलुखांत अंमल केला. त्याचा जाबसाल व सुजाउदौलाची कुमक वगैरे कामें आहेत. त्यांत उपयोगी कर्तव्य तिकडे जातील. सदैव कृपापत्रीं लिहित जावे. वरकड वर्तमान श्रीमंत सुभेदार साहेबीं लिहिलें आहे. त्याजवरून कळेल. सेवेसीं श्रृत होय हे विज्ञापना. पैवस्त छ.९ रमजान खमस ११७४.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 224 2-3-1765 A.D.

News-letter from Krishnarao Gangadhar Chandrachud to Ahilyabai :

Reconciliation between Najibkhan and the Jat : Subhedar's march to Sakurabad. Fupund, Vitave etc. Usurpation of territory by the Rohillas and Pathans will meet with its due. Diplomatic meeting with SujauDowlah etc. are matters engaging the attention of Subhedar Malharrao and his Councillors.

---

**अ. नं. २२५** **श्री**

ता. ४ मार्च, इसवी सन १७६५

चिरंजीव अहिल्याबाई यांसी प्रती मल्हारजी होळकर आशीर्वाद. येथील वर्तमान अगोदर लिहून पाठविले आहे त्या वरून कळेल. असो; तूर्त येथील मजकूर, दिल्लीहून आमचे कूच होऊन छ.११ रमजानी अनूप शहरानजीक कर्णवास येथें आलों. यास्थळीं हुताशनी होईल. तदोत्तरी उपयोगी मनसुबा दिसेल तसा केला जाईल. गिलच्याचे भानगडीत नजीबखान आहे. अबदाली सरहद्दीअलीकडे आला म्हणोन बोलवा आहे. त्यांजकडे नजीबखानास रवाना केले. तहरहाची तरतूद करणे तें कर्तव्यात येईल. ठीक खबर येईतो गंगातीरीं मुक्काम होतील. दुसरें, काशिदासमागमें पत्रें पाठविलीं त्याप्रमाणे रवानगीचे तजविजींत असाल. त्यास मार्गाचे ठीक नाही. भरंवशाचे पथक नाही. जर रवानगी केली नसल्यास तूर्त कोणासही इकडे न पाठविणें. तुम्ही अवघी ग्वाल्हेर येथेंच मुक्काम करून असावें. आम्हीही लौकरच ते प्रांतीं येतों. गोहदकराकडील एक गढी तुम्ही तोफा लावून खालीं केली, म्हणून काशीदानें सांगितले. त्यास तुम्ही तोफेचे गोळे व जंबुरियाचे गोळे याचा कारखाना लावून सरंजाम पोक्त करवणें. ऐंदा आम्हास गोहदकराचें पारिपत्य जरूर कर्तव्य आहे. जर रवानगी केली तर भरवंशाची सोबत, तुमची निशा पडली तरच पाठवावे. नाही तर तेथेंच असावें. छ.११ रमजान हे आशीर्वाद. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 225 4-3-1765 A.D.

News-letter and instructions to Ahilyabai from Subhedar Malharji Holkar Najikhan is sent as envoy to Abdali: Roads unsafe: Banabai should not be sent: All should stay at Gwalior : Cannon-balls should be manufactured in great number : Campaign against Gohad is intended in the near future.

---

अ. नं. २२६ **श्री**

ता. ४ मार्च, इसवी सन १७६५

पुरवणी : चिरंजीव अहिल्याबाईस आशीर्वाद. उपरि गोहदकराकडील गढीचा जमाव अटोकाट पुर्ता मनास आणोन मग तोफखाना पाठवीत जाणें. शहास सर्वथा, गुंतत न जाणें. दबाबानें जितकें काम होईल तेथवर करीत जाणें. तोफखाना आपल्यापासून कोणाच्या भरंवशावर सर्वथा लांब पाठवावयाची तजवीज न करीत जाणें. तोफखान्याची आब राहून आपला नक्ष साधे तो अर्थ करीत जाणें. छ.११ रमजान हे आशीर्वाद मोर्तबसुद : पैवस्त छ.२३ रमजान खमससितेन सन ११७४.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 226 4-3-1765 A.D.

Subhedar Malharji Holkar writes to Ahilyabai : Artillery arrangements should be looked after personally. Mere prestige should accomplish our purpose. Action should be one's last resource.

---

अ. नं. २२७ **श्री**

ता. १४ मार्च, इसवी सन १७६५

रा.आबाजी विष्णु कमाविसदार प्रगणे अंबाड यांस अहिल्याबाईंचे पत्र कीं : चिरंजीव रा त्रिंबकराव शिंदे चौंडीकर यांसी तुम्हाकडून देविले असेत रुपये १५२० पंधराशें वीस तरी सदरहू पंधराशें वीस शेरी नजराणा साल मजकुर ऐवजीं देऊन कबज घेणें. जाणिजे. छ.२१ रमजान बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 227 14-3-1765 A.D.

Ahilyabai orders the Kamavisdar Pargana Ambad to pay Rs. 1520/- to Trimbakrao Shinde Choundikar (related to Ahilyabai from her father's side) out of ''present etc.'' account of the current year. Shinde should pass a receipt thereof.

---

**अ. नं. २२८** **श्री**

ता. १४ मार्च, इसवी सन १७६५

चिरंजीव अहिल्याबाई यांस प्रती मल्हारजी होळकर आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें विशेष. किल्ले सेंधवे येथें कारखानियास खर्चास पूर्वी बेगमी केली होती त्याचा खर्च होऊन झाडा आला तो तुम्हांकडे पाठविला आहे. पुढील बेगमी जरूर केली पाहिजे आणि तुम्हीही माळवे प्रांतीं गेला याजकरितां हें पत्र लिहिलें आहे. तरी किल्ल्याचे कारखानियाचे खर्चास ऐवज पोख्त बेगमी करून देणें. फिरोन वारंवार त्याचा बोभाट न ये तें करणें. इंदुरीं गेलियावरी तेथून वरचेवरी माणसें सेंधव्यासी पाठवून खर्चाची बेगमी काम पाहून करून देऊन किल्ल्याचें काम जलद सिद्धीस नेणें. भूजेचें काम जाहलियावरी खंदकास काम चालविलें पाहिजे. याजकरितां वरचेवरी सेंधव्यासी माणसें पाठवून कामाची सावधानी करून खर्चाची तजवीज करून देत जाणें. येथून चिरंजीव संताजी होळकर यांसी पत्र लिहिले ते पत्र व खर्चाची वरात द्याल ते रुपये त्यांजकडे जलद रवाना करणें. ऐवजावांचून कारखानियाचें काम अटकून न राहे तो अर्थ करणें. रवाना छ.२१ रमजान बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. मोर्तबसुद पैवस्त छ.९ सवाल खमससितेन ११६५ फसली ११७४.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 228 14-3-1765 A.D.

The fort of Sendhwa is being built. Its various works demand, from time to time, payment of money. Subhedar Malharji presses the point on the attention of Ahilyabai.

---

**अ. नं. २२९** **श्री**

ता. १ एप्रिल, इसवी सन १७६५

राजश्री बाबाजी प्रल्हाद कमाविसदार प्रगणे सुलतानपुर गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मालेराव होळकर दंडवत सुरूसन खमससितेनमयावआलफ. सांप्रत खानदेश प्रांतीं मोगलाईतून फौज उतरावी म्हणोन कळलें. त्यावरून हे पत्र लिहिलें असे. तरी प्रगणे मजकुरचा वसूल तो तुम्ही घेतलाच असेल. आणखीही ताकीद करून ऐवज वसुलात ये तें करावें. प्रगणे मजकुरीं वाणी आहेत. तेथील मजबुती करून उत्तम प्रकारें रहाणें. खेडी आहेत त्यांचाही बंदोबस्त करणें. कोळी लोक तिकडे आहेत त्यांजकडून मिळी जमा करून फौजेवर धावडाव पाहून छापा घालणें. तुम्हांपाशीं शिबंदी आहे व राऊत

असे जमा करोन प्रगणे मजकुरचा बंदोबस्त यथास्थित राखणें. येविषयीं हयगय सर्वथा न करावी. बारूद शिसे प्रगणे मजकुरीं नाही त्यास दारू व शिसे रु.१००० एक हजार तुम्हांकडून खरीदी करविली असे. तरी सदरहू दारू व शिसे एक हजारांचे सामान पोक्त करून ठेवणें. फौज आलियावर पायर उत्तम प्रकारें करून लक्ष राखणें. जाणिजे छ.१० सवाल बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 229 — 1-4-1765 A.D.

Malerao Holkar writes to the Kamavisdar Pargana Sultanpur : In view of the march of the Mogul army in Khandesh he should adopt all possible precautionary measures in men, money and material.

---

**अ. नं. २३०** **श्री**

ता. १ जुलाई, इ. स. १७६५

रोजकीर्द सुभा मल्हारजी होळकर मोहरम छ.१२ राजश्री विष्णु महादेव गद्रे सावकार यांस पत्र कीं श्रीमंतांस पुणें मुक्कामीं तीन लाख रुपये देऊन उदेपुरच्या मामलतीकरितां माळव्यांत येणें म्हणून :

**सरकारी रेकॉर्ड**

No. 230 — 1-7-1765 A.D.

Vishnu Mahadeo Gadre (Banker) is asked to pay Rs. 3 lacs to the Peshwa in Poona, and then come to Malwa for the Mamalat of Udaipur.

---

**अ. नं. २३१** **श्री**

सुभा राजश्री मल्हारजी होळकर रोजकीर्द :

माहे मोहरम मुकाम + + +[१] दफाते पत्र ता. ८ जुलाई इ. स. १७६५

---

१.-२. मूळ पुस्तकाप्रमाणे शब्दाच्या जागी चिन्हे आहेत. पत्राचा मूळ कागद फाटला असावा.

राजश्री + + +[२] उदेपुरचे नजरे ऐवजी पंचवीस लक्षांपैकीं पेशजी सहा लक्ष देवविले होते. त्याशिवाय हल्लीं रु.१०५,९०९ संवत् १८२० पर्यंत बाकी निघाली. अलीकडे संवत १८२१ - २२ दोन सालें झाली, त्याऐवजीं चार लक्ष रुपये श्रीमंतांकडे पाठविणें म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 231 8-7-1765 A.D.

Subhedar Malharji Holkar writes : 6 lacs out of the Udaipur tribute were paid last year. 4 lacs should be sent to the Peshwa for the Samvat years 1821 and 1822 (1765-1766) A.D.

---

**अ. नं. २३२** **श्री**

ता. २६ जुलाई, इसवी सन १७६५

सुभा राजश्री मल्हारजी होळकर राजकीर्द सन ११७५ सफर छ.७ दफातेपत्र मिरजा अदीलबेग कमाविसदार प्रगणे देपालपूर यांस पत्र कीं मौजे आलंपुर प्रगणे मजकुर येथें तीर्थरूप सौभाग्यवती कैलासवासी बाईसाहेब गौतमाबाई यानीं जिरायती जमीन बागांस घेऊन बाग करून विहीर खणून उस्तवारी केली. सांप्रत बाग बुडित झाला, म्हणोन हुजूर विदित झालें. त्यावरून तुम्हांस पत्र सादर केले असे. तरी माळी व बैल बागांस देऊन बागाची उस्तवारी करणें म्हणोन पत्र पाठविलें. हुजूर आलमपुरचे जिरायत शंभर बिघे सुदामत खाजगीकडे चालत आले. त्याप्रमाणें खाजगीकडे जिरायत चालतें करून त्याऐवजी माळीयासी मुशाहिरा व बागास खर्च लावून उस्तवारी होय तें करणें. आंब्याची लावणी, फुलें, झाडें वगैरे लावून उस्तवारी करणें. म्हणोन पत्र कलम १ पोखरगीरबाबा बागाची देखरेख तुम्ही करणें म्हणोन पत्र लिहिलें असे. कलम २.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 232 26-7-1765 A.D.

The Kamavisdar of Pargana Depalpur is ordered to allot 100 bighas of land from Khasgi for the purpose of creating a new garden in the place of the old one made by the late Shreemant Saubhagyawati Gautamabai Saheb at Alampur. (consort Subhedar Malharji). Pokagir Baba is advised to take care of the garden.

---

**अ. नं. २३३** **श्री**

ता. ६ आक्टोबर, इसवी सन १७६५

राजश्री रामचंद्र महादेव कमाविसदार परगणे झाबवे अखंडित लक्ष्मी आलंकृत स्नेहांकित अहिल्याबाई होळकर दंडवत उपरि तुम्हास झाबवे येथील जप्तीस सनद देऊन पाठविले होते. त्यास लष्करांतून श्रीमंत तीर्थरूप सुभेदारांनीं राजश्री गोविंदराव बुळे यांजकडून महालची जप्ती मोकळी केली. त्यावरून महालची जप्ती मोकळी करून तुम्हांस पत्र सादर केलें असे तरी परगणे मजकुरीं बुळ्यांकडील मामलेदार अंमलाची दखलगिरी करील तरी तुम्ही त्यासीं खलेल न करितां अंमल सुरळीत देणें. जो वसूल घेतला असेल त्यापैकीं शिबंदी व स्वाराची चंदीरोजमुरा घेऊन बाकी ऐवज निघेल तो देणें आणि तुम्हीं उठोन येणें. छ.२० रविलाखर ऊर्फ आश्विनमास.

**दरखी अमीन विभूते यांचे दप्तर**

No. 233 6-10-1765 A.D.

Devi Ahilyabai Holkar orders the Kamavisdar of Pargana. Zabwa to hand over the Pargana back to Govindrao Bulye in obedience to the orders of Subhedar Malharji Holkar.

---

**अ. नं. २३४** **श्री**

ता. ६ आक्टोबर, इ. स. १७६५

राजश्री राघो अनंत कमाविसदार जप्ती कोठडे (चिखलदे) स्नेहांकित अहिल्याबाई होळकर दंडवत उपरि. राजश्री गोविंदराव बुळे यांजकडील महालचे जप्तीस सनद देऊन पाठविले होते. त्यास लष्करांतून तीर्थरूप सुभेदारांनीं बुळयाकडील महालची जप्ती मोकळी केली. त्यावरून हल्लीं येथूनही जप्ती मोकळी करून पत्र सादर केले असे. तरी प्रगणे मजकुरी बुळ्याकडील मामलेदार अमलाची दखलगिरी करतील त्यास तुम्ही खलेल न करितां अंमल सुरळीत देणें. त्याजकडोन जो वसूल घेतला असेल त्यापैकीं शिबंदी स्वारानिस्बत खर्च चंदी रोजमुरा घेऊन बाकी ऐवज निघेल तो देणें व तुम्ही उठोन येणें.

जाणिजे छ.२० रविलाखर मोर्तबसुद.

**दरखी अमीन विभूते यांचे दप्तर**

No. 234 6-10-1765 A.D.

The Kamavisdar of Kothadi is ordered as above.

---

**अ. नं. २३५** **श्री**

रोजकीर्द मल्हारजी होळकर ता. ६ नोव्हेंबर, इसवी सन १७६५

चिरंजीव अहिल्याबाईंस व चि. राजश्री मालेराव यांस पत्र कीं गोविंदराव बुळे यांच्या सरंजामाची जप्ती मोकळी करावयास अगोदर पत्रें दिलीं होतीं, फिरून मोकळी न करणें म्हणून लिहिलें होतें. त्यास हल्लीं त्यांनीं बोलीप्रमाणें राऊत आणावयाचें कबूल केलें. त्यावरून हें पत्र लिहिलें असे तरी मशारनिल्हेकडील सरंजामावर जप्तीवाले पाठविले असतील त्यास उठंत्री देऊन बोलावून घेणें. ऐवज घेतला असेल तोही परतोन देणें म्हणोन पत्र : मुक्काम नजीक मेवाड.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 235 6-11-1765 A.D.

Subhedar Malharji Holkar's instructions to Ahilyabai and Malerao (Daughter-in-law and grandson) to the effect that Govindrao Buley's Saranjam be released: the former orders are revoked.

---

**अ. नं. २३६** **श्री**

ता. १० नोव्हेंबर, इ. स. १७६५

रोजकीर्द छ.२५ जमादिलावल मुक्काम नजीक ओडशे :

चिरंजीव मालेराव यांस बोलविल्याची पत्रें लिहिलीं व जासूद भाऊ व गंगाजी यांस रोजमुरा देणें म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 236 10-11-1765 A.D.

Malerao is sent for by the Subhedar (in camp near Odshe).

---

**अ. नं. २३७** **श्री**

ता. १६ नोव्हेंबर, इ. स. १७६५

रोजकीर्द सुभा राजश्री मल्हारजी होळकर सन ११६६ जमादिलाखर मुक्काम बुढे प्रांत मेवाड छ.२. परगणे बुढे प्रांत मेवाड येथील अर्धे उत्पन्न सरंजाम खर्च निस्बत राजश्री नारायणजी बारगळ यांजकडे होते ते चालू ठेवणेंबाबत पत्र.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 237 16-11-1765 A.D.

Half of the revenue of Pargana Budha (Mewar) is to be continued to Narayanji Bargal for the maintenance of his army.

---

**अ. नं. २३८** **श्री**

ता. १७ नोव्हेंबर, इ. स. १७६५

राजश्री मल्हारजी होळकर गोसावी यांसी. सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य. स्नेहांकित माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहित असलें पाहिजे. विशेष. केशरीसिंग राऊळ कस्बे सारंगखेडे परगणे सुलतानपूर यांनीं विदित केलें कीं आपली भावजई फत्तेसिंग राऊळाची स्त्री गृहकलहामुळें मालबाजवळ फिर्याद गेली. त्यास न्याय मनास न आणितां सरदारांनीं आपले राऊळकीचे वतन जप्त केलें आहे म्हणून. तरी याचा इन्साफ न पाहतां परगणे मजकुरचे अंमलदाराही मसलत जप्त केले असेंल यांजकरिता पत्र लिहिलें असे. तरी आपण येविशींची ताकीद करून इन्साफ करावा आणि वतनास वारीस असतां जप्त करावें ऐसें नाही, सुदामत मनास आणून वाजवी असेल तसें चालवावें व निवाडा करावा जाणिजे. छ.२२ जमादिलावल बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.
(शिक्का) मोहर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 238 17-11-1765 A.D.

Malharji Holkar is instructed by Peshwa Madhavrao Ballal to make fresh inquiries to the case of Kesarisigh Rawal of Kasba Sarangkhed (Pargana Sultanpur) and see that justice is made. Malerao had confiscated the Rawalship under his own authority.

---

**अ. नं. २३९** **श्री**

मार्गशीर्ष शुद्ध ११, शके १६८७, ता. २३ नोव्हेंबर, इ. स. १७६५

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>खंडोजी सुत मल्हारजी होळकर |

दस्तक सरकार राजश्री मालेराव होळकर तागायत कमाविसदारान व ठाणेदारान महाराज लोक महलानिहाय सुरू सन सीतसितैनमयावअलफ. राजश्री न्याहालकर्ण मंडलोई कस्बे इंदूर हे श्री गंगाप्रदक्षिणेस यात्रा सुद्धां जात आहेत. त्या समागमें पडताळे सुमारे ५० माणसें असामी ५०० डोली सुमार १० ऐसीं जात आहेत. त्यांस मार्गी कोणेविसीं मुजाहिम न होय. रात्रीं राहतील तेथें चौकी पाहारा देऊन आपलाली हद्द पार करून देणें.

जाणिजे. छ.९ जमादिलाखर. मोर्तबसुद.

**राजवाडे खंड ६, लेखांक ६२४**

No. 239 23-11-1765 A.D.

Sarkar Malerao Holkar orders arrangements of comfort for Nyahalkarna Mandloi in the way of his pilgrimage.

---

**अ. नं. २४०** **श्री**

रोजकीर्द सुभा मल्हारजी होळकर इ. स. १७६५.

चिरंजीव अहिल्याबाईस पत्र कीं राजश्री कृष्णाजी तानदेव यांजकडून इंदूर परगण्याची मामलत दूर करून राजश्री त्रिंबक राजदेव यांस देण्याबद्दल ब्याहडे खर्च रु.१८,७५० मंजूर करणें. म्हणोन.

कृष्णाजी तानदेव यांच्या हाताखालीं सरंजामी सरदार राजश्री भागवत यांची पायगा देऊन, भिल्लांनीं दंगा मांडला आहे तिकडे त्यांस पाठवणें म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 240 1765 A.D.

Subhedar Malharji Holkar writes to Ahilyabai; Trimbak Rajadeva is given Mamalat of Indore Pargana. Krishnaji Tandeo is to relinquish it: He, with the assistance of the Paga of Bhagwat, should quell the Bhill disturbance.

---

**अ. नं. २४१** **श्री**

इ. स. १७६५

श्रीमंत राजश्री मल्हारराव होळकर सुभेदार व राजश्री वासुदेव संभाजी गोसावी यांसी महाल वसूल : वेदमूर्ती राजश्री नरहरभट तत्सत् पैठणकर सन ११७५ कारणें कबज लिहून दिले ऐसीजे. मौजे करकुले परगणे अंबाडे येथील मोकासा आपला त्याऐवजीं साल मजकुरीं गुजारत यवन सरकार रू.५० पन्नास आपण भरून पावलों हें कबज लिहून दिल्हें. सही. विद्यमान राजाराम रघुनाथ गुमास्ते देशपांडे. लिहिल्याप्रमाणें ५० भरून पावले.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 241 1765 A.D.

Narhar Bhatt acknowledges the receipt, (from the Mahal revenues) of Rupees fifty in lieu of his Mokasa rights of the village names Karkule.

---

**अ. नं. २४२** **श्री**

इ. स. १७६५

(मल्हारजी होळकर यांजकडून अहिल्याबाईंस पत्र)

आशीर्वाद विशेष. उपरि जेजुरीकराकडील ऐवजाच्या हुंड्या सुतरस्वारासमवेत पाठविल्या त्या तेथें पावलियावरी हुंड्यांच्या नकला करून घेऊन हुंड्या इंदुरीं जलद रवाना कराव्या हे आशीर्वाद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 242 1765 A.D.

Subhedar Malharji instructs Ahilyabai to remit to Indore the Hundees received from Jejuree after first copying the same.

---

**अ. नं. २४३** **श्री**

माहिती इ. स. १७१४ ते १७६५

(सदरहू माहिती मालकम साहेबांस दिली गेली ती सरकारी रेकॉर्डांतून कर्नल ल्युअर्ड यांनीं संशोधन केली.)

यादी, पेशवाईचे राज्यकारभाराचे अधिकारास मूळ पुरुष, बाळाजी विश्वनाथ यांजला छत्रपती राजे सातारकर यांनीं पंतप्रधानकीची वस्त्रें अलंकार बहुमान देऊन अधिकार देऊन ठेविलें :

ते सुरूसन खमसअशरमयाआलफ १११५ फसली सन ११२४ संवत् १७७० साली (म्हणजे इ. स. १७१३,१४) राज्यकारभार करण्यास ठेविलें.

नंतर हिंदुस्तान मुलूख सर करण्यास्तव बरोबरीचे सरदारांस खर्चाकरितां दोन्ही सरदारांस सोळा लक्ष एकसष्ट हजार रुपयाचे मुलूख खर्चास दिले. (पुढील पेशव्यांनीं) ११,४१,००० श्रीमंतांनीं होळकर सरकारांस अकरा लक्ष ऐकेचाळीस हजार रुपयाचे १३ तेरा महाल लावून दिले. ते तपशीलवार येणेंप्रमाणें:

| | | | |
|---|---|---|---|
| २००००० | आंबाड १ | १००००० | १३ वा महाल / खेडी |
| ४०००० | देपूर २ | २५०० | वाफगांव |
| २०००० | कोरहाळे ३ | ६००० | आळे |
| ४५००० | उत्राण ४ | २००० | लोणी |
| ६०००० | थालनेर ५ | २२०० | बीवी |
| २५००० | वेरूळ ६ | १५०० | लाखणगांव |
| १००००० | चांदवड ७ | २००० | मनचर |
| ३०००० | गाळणा ८ | १००० | काटापूर |
| ४०००० | शेवगांव ९ | २५००० | सिऊर |
| ५०००० | आडावद १० | ८००० | धोधलगांव |
| १२५००० | सुलतानपूर ११ | ७००० | मांडवण |
| ५०००० | रावेरनिम्मे १२ | २५०० | कोरेगांव |
| | | १५०० | निंबगांव |
| | | ५००० | आडगांव |
| | | १५०० | बडझिरे |
| | | ५०० | पाडे |
| | | ६००० | न्याहळोद |
| | | ४००० | मांडल |
| | | ५००० | कापडणे |
| | | ३००० | मुंगठी |
| | | ४५०० | वडजाई |
| | | ७००० | जांबगांव |
| | | १००० | निंब, बारगळांचे |
| | | ७०० | बुळे, घाटगांव |
| | | ८४०० | (नांव लागणें) |
| | | ............. | |
| | | १००००० | |

रु.११४१०० महाल सुमारी १३ सदरहू रुपयांचे हिंदुस्थान मुलूख सर करणेस्तव श्रीमंत बाजीराव पेशवे व रघुनाथरावांनी दिलें.

५२०००० श्रीमंतांनीं शिंदे. सरकारचे खर्चास महाल ८ आठ ऐदलाबाद, यावल, पेडगांव, पैठण वगैरे, शेवगांव, लाऊर, सिंधखेडे, गो. वगैरे.

...............

१६६१०००

सदरहू दोन्ही सरदारांस सोळा लक्ष एकसष्ट हजारांचे महाल २१ एकवीस, फौजेचे सरंजामाचे खर्चास दिले.

१५९६००० महालानिहाय फुटगांव व सरंजामी श्री. तुकोजीराव होळकर हे मोठे सुभेदार मल्हारजी होळकरांबरोबर प्रथम स्वारीचे लढाईत होते ते पंधरा लोकांचे फौजेचे खर्चास माळवे प्रांतांतील दिले. महाल १५ पंधरा.

...............

३२५७०००

येणेंप्रमाणें असे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 243 1765 A.D.

List of Mahals and villages granted to the Holkars by the Peshwa Government from time to time till 1765 A.D.

---

**अ. नं. २४४** **श्री**

मि।। माघ शुद्ध १५, ता. २५-१-१७६६

(राघोबादादांचे धोंडोरामास पत्र)

बादशहाचा शुक्का आला कीं जलद येऊन पोहचावे. बादशाहीचा बंदोबस्त करावा म्हणोन. याचअन्वयें राजश्री मल्हारजी होळकरांची वगैरे राजकारणें पत्रें वरचेवर येत आहेत. याकरितां उत्तरप्रांते जाण्याची बहुत त्वरा आहे. यास्तव एक दिवस महिन्याच्या जागा जाऊं लागला आहे. करितां चिरंजीवाची रवानगी दक्षिणेस करून खासास्वारी भोसले सुद्धां दरकूच जात आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 244 25-1-1766 A.D.

Raghoba Dada Peshwa writes to Dhondo Rama : The Delhi Emperor asks his help : Malharji Holkar writes in the same strain : great need of marching towards the North etc.

---

अ. नं. २४५ **श्री**

ता. १-२-१७६६

रोजकीर्द सुभा राजश्री मल्हारजी होळकर माहे साबान मुक्काम बरडा छ.२७ सन ११७५ सितेनमया आप्पाजी मोरेश्वर कमाविसदार परगणे कोरहाळे यांस पत्र कीं नारो बाळाजी यानीं विदित केलें कीं, मौजे लिंबगांव तालुके मजकुर हा गांव पूर्वी पासून आपल्याकडे मख्त्यानें चालत आला त्या प्रमाणें ऐवज सन सलासपावेतों खाजगीकडे भरून फडशा करून अलीकडे अर्बासलासेन दोन सालें मामलेदाराकडे भरून त्याच्या कबजा आणिल्या. हल्लीं सालापासून पुढें आज्ञा होईल त्याप्रमाणें ऐवज पावतां करून सुदामत गांवचा मख्ता आम्हांकडे निरुपद्रव चालवावा. मख्त्याप्रमाणें ऐवज आज्ञेप्रमाणें पावतां करूं म्हणोन नारो बाळाजी यांनीं विदित केलें. ऐसियासी मौजे मजकुरचा मख्ता सुदामतप्रमाणें मशारनिल्हेंकडेस करार करून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरी तुम्ही मौजे मजकुरीं काडीमात्र तोशीस न देणें. कराराप्रमाणें ऐवज खाजगीकडे चांदवडीं राजश्री अंताजी त्रिंबक यांजकडे भरविला आहे. त्याप्रमाणें दरसाल देतील. तुम्हीं मुजाहिम न होणें म्हणून पत्र मामलेदारास पत्रें : समक्ष बाळाजी माणकेश्वर निघराडे १ कलम रा. अंताजी त्रिंबक कमाविसदार प्रगणे चांदवड यांजला पत्र कीं मौजे लिंबगांव तालुके कोरहाळे या गांवचा मख्ता ठेरावून रा. नारो बाळाजी यांजकडे दिला आहे. तेथील ऐवज तुम्हांपाशी भरावयासी मशारनिल्हेस हुजुरीहून आज्ञा केली आहे आणि तुम्हांस हे पत्र सादर केले असे. तरी तुम्ही मौजे मजकुरीं काडीमात्र तोशीस न देणें. कराराप्रमाणें ऐवज खाजगीकडे चांदवडीं राजश्री अंताजी त्रिंबक यांजकडे भरविला आहे त्याप्रमाणें दरसाल देतील. तुम्ही मुजाहिम न होणें म्हणून मामलेदारास पत्र समक्ष बाळाजी माणकेश्वर. कलम १

रा. अंताजी त्रिंबक कमाविसदार यांस वरील मजकुराचें पत्र व मख्ता रु.२५०० पंचवीसशें करार आहे. दो हप्त्यानें घेत जावे. कलम १

राजश्री नारो बाळाजीपासून कबुलायत पंचवीसशें रुपयांची सरकारांत सनसितेन पासून ११७५ दरसाल, खरीफ व रब्बी दो हप्त्यानें चांदवडीशिक्याचे देत जाणें, म्हणोन पत्र. कलम १

चिरंजीव अहिल्याबाई यांस पत्र कीं खाजगीकडील खरीदी जवाहिरामुळें खर्चास रु. ५००० पांच हजार देऊन पावती घेणें म्हणोन. पत्रक १

**सरकारी रेकॉर्ड**

No. 245 1-2-1766 A.D.

Mauza Limbgaon is given on contract to Naro Ballaji. The amount is to be paid in Khasgi Department at Chandwad.

Ahilyabai is instructed to pay Rs. 5,000/- for purchased jewellery. The amount is to be defrayed from the Khasgi.

---

**अ. नं. २४६** **श्री**

ता. ११-२-१७६६

मालेराव रोजकीर्द मुक्काम मर्दाना जिल्हा नेमाड. शिवराम मल्हार यांस पत्र कीं : प्रगणे सुंदरशी येथील राजश्री पिराजी पिसे यांजकडील खेड्याची जप्ती तीर्थरूप राजश्री सुभेदारांनीं करविली होती सांप्रत तीर्थरूपांनीं जप्ती मोकळी करून आम्हांस लिहिलें तरी तुम्हास पत्र सादर केलें असे. तरी पिसे मजकुरास खेडियाचा साल मजकुरचा वसूल घेऊन मग पुढें त्याकडील कमाविसदाराचे स्वाधीन करून अंमल त्यांजकडेस देऊन तुम्ही उठोन येणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 246 11-2-1766 A.D.

Malerao Holkar (in camp at Mardana) writes to Shivaram Malhar: Subhedar Malharji had attached the village of Pirajee Pise in Sundarsi Pargana; they should now be restored, in obedience to his present orders.

---

**अ. नं. २४७** **श्री**

ता. १८-२-१७६६
रोजकीर्द रा.सुभा मल्हारजी होळकर, मुक्काम झांसी.
रमजान छ.८ सन ११६६.

झांशीनजीक मुक्कामीं आल्यावर मागें चिरगांवकर बेइमानीस आला. सबब माघारे जाऊन नवी नजर ठरवून वसूल केली रु. १०,०००

तोफखाना खर्च रु. ३०,०००

..................

४०,०००

**सरकारी रेकॉर्ड**

No. 247 18-2-1766 A.D.

Chirgaonkar (Thakur) is fined Rs. 10,000/- for treachery, and he is to pay Rs. 30,000/- ammunition expenditure.

---

**अ. नं. २४८** **श्री**

रमजान, ता. ११ मार्च, इसवी सन १७६६

रोजकीर्द सुभा मल्हारजी होळकर

राजश्री गोविंद कृष्ण यांस पत्र कीं, चिरंजीव तुकोजी होळकर यांजकडे पथकास खर्चास रुपये ३५००० पस्तीस हजार संस्थान उदेपूर ऐवजी मशारनिल्हेस पावते करून पावती घेणें. ता. राजाराम रणछोड.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 248 11-3-1766 A.D.

Orders from Subhedar Malharji to Govind Krishna: Rs. 35,000/- should be paid from Udaipur accounts, to Tukoji Holkar for his military establishment. Tukoji should sign the receipt.

---

**अ. नं. २४९** **श्री**

रोजकीर्द ११६६, ता. २१ मार्च, इसवी सन १७६६

सुभा राजश्री मल्हारजी होळकर रोजकीर्द

माहे सव्वाल छ.९ रोज मुक्काम ग्वालियर

चिरंजीव अहिल्याबाईस पत्र कीं, गोहदकराकडील एक दोन गढ्या मातबर

घ्यावयाच्या होत्या तेथें तोफा लावून ठाणें खालीं करून घेऊन राजश्री सामराज यांचा अंमल पेशजीप्रमाणें चालत आला. सांप्रत मोहीम जाटाची आहे. लोकांस खावयास द्यावें लागतें याजकरितां खेतसी करमसी याजपासोन लष्करांत रुपये २,००,००० दोन लक्ष घेऊन हें पत्र तुम्हांस हुंडीदाखल लिहिले असे. तरी पत्र पावतांच सदरहू दोन लक्ष रुपये सावकार मजकुर याजला देऊन पावती घेणें. चिठ्ठी जे समयीं पावाल तेच क्षणीं ऐवजाची भरती करून देणें येविषयीं हयगय न करणें. तुम्हांस आमची आगत्य असली तरी ऐवजाची सरबराह होऊन सावकार मजकुरास ऐवज क्षेपनिक्षेप पावता होय ते गोष्ट करणें. हरकुबाईंनीं भले लोकांत पंगत बसली होती ते समयीं सांगितले व वैद्य यांनीं चांदणींत सांगितले.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 249 21-3-1766 A.D.

Subhedar Malharji writes of the military campaign he has opened against the Gohadkar and the Jat. He borrowed Rupees two lacs from Khetsi Karamsi. He asks Ahilyabai to pay the amount of the sowkar in Indore without delay.

---

**अ. नं. २५०** **श्री**

रोजकीर्द ११६६, ता. ३१ मार्च, इसवी सन १७६६

सुभा राजश्री मल्हारजी होळकर रोजकीर्द
माहे सवाल मुक्काम कुतवा

चिरंजीव तुकोजी होळकराचे स्त्रीची ऋतुशांती झाली. सबब पैठणी, सणगे शेले सुमारे तीन पाठवून देणें आणि आंख लिहून पाठविणें. म्हणून चिरंजीव अहिल्याबाईस पत्र लिहिलें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 250 31-3-1766 A.D.

Subhedar Malharji writes a letter to Ahilyabai asking her to send some garments as gift to the wife of Tukojee Holkar on the occasion of consummation of marriage.

---

अ. नं. २५१ **श्री**

ता. १७ मे, इसवी सन १७६६

चिरंजीव सौभाग्यवती उदाबाई वाघमारे यांस प्रती मल्हारजी होळकर आशीर्वाद उपरि, प्रांत राजापूर ऊर्फ वेरूळ सरकार दौलताबाद सुभे खुदस्ते बुनियाद येथील देह सुमार बीतपसील.

१ मौजे बरेगांव १ मौजे देवपुडी १ मौजे देमेगांव १ मौजे सनवा

एकूण चार गांव सरकारातून तुम्हास आदंण दिले असेत. खेरीज मुकासा व राहदारी व हक्कदार व इनामदार करून बाकी अंमल जहागीर सरदेशमुखी व बाबती दरोबस्त सन सबासितैनचे अव्वल सालापासून करार करून दिले असेत तरी तुम्ही आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरा सदरहू चार गांव आंदण अनुभवीत जाणें. सुाासीत सितैनमयावअलफ. मिती वैशाख शुद्ध ९ शके १६८८ व्ययनाम संवत्सरे रवाना छ.७ जिल्हेज बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 251 17-5-1766 A.D.

Subhedar Malharji's hereditary gift of dowry to his daughter Udabai Waghmare-four villages, namely Baregaon, Devapudi, Demegaon and Sanawa (of Prant Verul)

---

अ. नं. २५२ **श्री**

ता. २० मे, इसवी सन १७६६

राजश्री गोपाळ बल्लाळ कमाविसदार प्रगणे सावेर अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मालेराव होळकर दंडवत सुरूसन सबासितैनमयावअलफ. तीर्थरूप सुभेदारांचे शरीरास समाधान नव्हतें. शेवटी वैशाख शुद्ध ११ मंगळवारीं कैलासवासी जाहले. ईश्वर सत्ता. महाल प्रगणे मजकुरीची कमाविस सुदामतप्रमाणें तुम्हांकडे करार असे. तरी तुम्ही आपल्या मामलती दुरस्त राहून लावणी आबादी करणें आणि मागील बाकीचा ऐवज गाडीमाणसाद्वारें तीर्थरूप मातोश्री आईपासीं पावता करावा. त्यांचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करावी. सरकारांत नेमणुकीचा आकार पोंहचविणे व इमानेंइतबारें वागावें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 252 20-5-1766 A.D.

Malerao Holkar intimates the sad news of the death of Subhedar Malharrao to the Kamavisdar Pargana Sawer. The death took place on Tuesday the 11th day of the bright half of Vaishakh. The Kamavisdar is asked to remit former payment, and remain all vigilant in his Pargana.

---

**अ. नं. २५३** **श्री**

इ. स. १७६६

राजश्रियाविराजित राजमान्य राजेश्री विठ्ठलराव शिवदेव उमदेतुलमुल्क बहुत स्वामींचे सेवेसीं पोष्य माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीये लिहित जाणें विशेष. मल्हारजी होळकर यांस वैशाख शुद्ध ११ एकादशी रोजीं देवआज्ञा झाल्याचे वर्तमान येथे आलें. श्रवण होऊन चित्तास फार खेद झाला. मातब्बर सरदार मोठे दाबाचे होते. ईश्वर इच्छेस उपाय नाही. त्यांचा भावी पदार्थ तसाच होता. परंतु तीर्थस्वरूप दादांचे जाणें हिंदुस्थानांत होऊन परस्पर भेटीं होऊन मल्हाररावांचा काळ झाला. हा त्यांचा सुकृतांशच. मातब्बर सरदार जुन्यापैकीं तेवढे होते. शिंद्यांची सरदारी मोडीस आली. होळकर तिकडे होता तेणेंकरून वचक होता.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 253 1766 A.D.

Peshwa Madhavrao I, expresses his grief at the sad news of the death of Subhedar Malharji. The Peswa remarks on the great work and worth of the Subhedar.

---

**अ. नं. २५४** **श्री**

ता. २ जून, इसवी सन १७६६

(मल्हारजींच्या पश्चात् पुणें दरबारानें दिलेली सनद)

रोजकीर्द राजमंडळ स्वारी सुरूसन सीतसितैन
मयावअलफ. छ.२३ जिल्हेज.

दफाते पत्रांचे पोटीं. मालजी होळकर यांजकडे छत्रीचे खर्चाकरितां इनाम दिल्याबद्दल सनद बार आहे. छत्री मौजे मल्हारनगर ऊर्फ अलमपूर परगणे बेरछा आहे तेथें सदावर्ताचे वगैरे खर्चाबद्दल इनाम गांव.

१७,५०१ परगणे बेरछापैकीं गांवें ११
७,००० परगणे दतियापैकीं गांव ३
३,००० परगणे भांडेरपैकीं गांव १
................
२७५०१

नूतन इनाम दरोबस्त कुलबाब कुलकानू म्हणोन सनद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 254 2-6-1766 A.D.

Grant of Sanad from the Poona Durbar to Maljee Holkar. 15 villages with annual revenue of Rs. 27,501/- are allotted to the expenses of the Chhatri of the Malharji Holkar at Alampur otherwise named Malhar Nagar.

---

**अ. नं. २५५** **श्री**

ता.२३-९-१७६६

रोजकीर्द सबासितैनमयावअलफ.

राजश्री मालेराव होळकर यांचे नांवें सनद कीं, तुम्हांकडील मागील हिशेब स्वारीचा व बाबती सरदेशमुखी प्रांत माळवा व स्वदेशचे गांवचे इजारे याचा खेरीज बुंदी. सनखमस व सीतसितेन दुसाला हिशेब, कारकीर्द कैलासवासी मल्हारजी होळकर सरकारचा फडशा जाहला. तुम्हांकडे कांहीं लांझा राहिला नाही. तरी कै.मल्हारजी होळकरांकडील सरंजाम महाल, खेडी सुदामत प्रमाणें बरहुकुम सरदारीचा बंदोबस्त करून फौज सरंजामाची सेवा एकनिष्ठेनें करीत जाणें, म्हणोन मशारनिल्हेचे नांवें सनद रवानगी.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 255 23-9-1766 A.D.

Sanad is passed in the name of Malerao Holkar, stating that all old accounts relating military matters as well as tributes etc. of the times of the late Subhedar Malharji Holkar are passed: Nothing remains due

except matters relating Bundi. Malerao is granted full and free possession of all the Saranjam etc., of Malharji.

---

**अ. नं. २५६** **श्री**

संवत् १८२३, शके १६८८ व्ययनाम संवत्सरे, इ. स. १७६७

श्रीमंत महाराज राजश्री मालेराव होळकर यांस प्रती आश्रित मयाराम वल्लद दयाराम कुटी वास्तव्य श्री गया. आशीर्वाद. उपरि महाराजांनीं श्रीमंत महाराज कैलासवासी सुभेदार यांचे गयावर्जनास राजश्री नारायणराव होळकर, वेदमूर्ती रा. वैजनाथभट वास्तव्य श्री काशी हे उभयतां आपले समागमें गयावर्जनानिमित्य आले. यांस श्री गयेस नेऊन श्रीमंतांचे गयावर्जन यथाविधि व श्राद्धआदि शुद्धश्राद्धपर्यंत सुफळ करून देऊं. यांसी आपण दक्षिणा आम्हांस प्रमाण करून ३,००० तीन हजार दक्षिणा घेऊं. याखेरीज अन्यथा करणार नाहीं. संतोषेकरून सर्व कर्तव्यें करून उभयतांस तुम्हांपाशीं घेवून येऊं व तुमची आज्ञा घेऊन आपले स्थळास जाऊं. बहुत काय लिहिणें. मिती शके १६८८ व्ययनाम संवत्सरे संवत् १८२३.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 256 1767 A.D.

Maharaja Malerao Holkar arranges to perform the Shraddha rites of the late Subhedar Malharji at Gaya.

---

# देवी श्री अहिल्याबाईंची कारकीर्द

## इ. स. १७६६–१७९५

अ. नं. २५७ श्री

कारकीर्द देवी श्री अहिल्याबाईसाहेब :

कैफियत श्रीमंत बाईसाहेबांचे अंमलांत महेश्वरीं वस्ती होती तिचा तपशील (महेश्वर येथील विठ्ठलदास कानगो यांचे दप्तरांत उपलब्ध झालेली.)

१ महेश्वर नदीचे पार इंदूरचे रस्त्यावर वस्ती होती ती येणेंप्रमाणें.

१ मुसलमान लोकांची इदगाह व यृक्षिणीचे बागाचे रस्त्यावर. त्याचेसमोर चांभार लोक राहत होते.

१ गोविंदराम ब्राह्मण याचे बागेजवळ लष्कर फिरंगीचें पडलें होतें; ते चाकर सरकारचे होते.

१ मल्हारगंज : मंडलेश्वरचे रस्त्यावर हल्लीं आबादी आहे. तेथें पेस्तर मिठाची खरेदी विक्री होत होती. (कटती, भरती)

१ दक्षिण दिशेकडे चौखंडी तमाम आबाद होती.

१ किल्ल्यापासून श्री भवानीमातेपर्यंत वस्ती होती; व पश्चिमेकडे खाईपावेतों वस्ती होती.

१ सरकारी पागा राहत होत्या त्या; हैबतराव, फणसे, बाळामलक, गीदे रामसिंग भागवत, अशा सहा जागीं पागा होत्या.

No. 257

Memo of habitation, general condition, and of Pagas at Maheshwar in the time of Devi Ahilyabai :

Shoe-makers and menders quarters, Mahomedan Mosque, European military the service of the Holkars; Haibatrao, Phanse, Bala Malak, Gide, Ramsing and Bhagwat kept their Pagas. The whole city presented an appearance of health, habitation, and happiness.

---

अ. नं. २५८ श्री

ता. १३ जुलाई, इसवी सन १७६६

मिर्झा आदिलबेग कमाविसदार प्रगणे रामपुरा अज अहिल्याबाई होळकर दुवा, आशीर्वाद सुरूसनसवासितेनमयावआलफ. प्रगणे मजकुरीं येथील गांव सौभाग्यवती बनाबाई. कैलासवासी यांचे तीर्थरूप राजश्री मोहनसिंग यांजकडे मौजे आल्हेड देह एक तीर्थरूप सुभेदार कैलासवासी यांनीं करून दिला आहे. त्याप्रमाणें तुम्ही न चालवितां म्हणून हल्लीं पत्र सादर

केले आहे. तरी प्रगणे मजकुरचा गांव मोहनसिंगाकडे वडिलांनीं करून दिला आहे, त्याप्रमाणें चालविणें. दिक्कत न करणें. जाणिजे छ.५ माहे सफर जादा काय लिहिणें. मोर्तबसुद.

जहागीर हिस्ट्रीत दर्ज असलेलें ताकीदपत्र.

**चंद्रचूड दप्तर, पत्र क्र. १०४**

सौ. मा. द्वारकाबाई आणि सौ. मा. बनाबाई यांनीं सहगमन केले.

No. 258 13-7-1766 A.D.

Ahilyabai orders the Kamavisdar Rampura to uphold the gift of Mauza Alhed to Mohansing the father of Banabai (mother-in-law). The grant was made by the late Subhedar Malharji Holkar.

Note :

Saubhagyawati Dwarkabai and Saubhagyawati Banabai went Sati with Subhedar Malharji Holkar. (Chandrachud Duftar. Letter No. 104.)

---

**अ. नं. २५९** **श्री**

ता. २२ जानेवारी, इसवी सन १७६७

राजश्री कमाविसदार वर्तमानभावी तालुके चोळी प्रगणे महेश्वर यांस मालेराव होळकर यांचे पत्र : सबासितेनमयावआलफ वेदमूर्ती शेषंभट बिन लक्ष्मणभट उंबरणीकर गोत्र अगस्ती सूत्र आश्वलायन, वस्ती औरंगाबाद यानीं इंदूर मुक्कामीं येऊन विदित केलें कीं, अभीष्टचिंतनार्थ सरकारांतून वर्षासन करून दिले पाहिजे. म्हणून मनास आणितां यांचें चालविणें श्रेयस्कर. हे ब्राह्मण विद्यापात्र, स्नानसंध्याशील, जाणून सरकारांतून नूतन वर्षासन रुपये २०० करार करून ही सनद सादर केली असे. तरी तालुके मजकुरपैकीं दोनशें रुपये मशारनिल्हेस दरसाल पावते करून पावती घेत जाणें. नूतन पत्राचा अक्षेप न घेणें. या पत्राची प्रत लिहून घेऊन अस्सल पत्र वेदमूर्तीस भोगवटियास देणें. जाणिजे छ.२१ साबान बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 259 22-1-1767 A.D.

Malerao Holkar orders the Kamavisdar Taluka Cholee to pay Rs. 200/- annually to Sheshumbhatt a learned and pious Bramhin resident of Aurangabad. to pray for the welfare of the State and the Sovereign.

---

अ. नं. २६०　　　　　　　　　　श्री

ता. २६ फेब्रुवारी, इसवी सन १७६७

राजश्री सदाशिव गोपाळ कमाविसदार प्रगणे टोंक व रामपुरा गोसावी यांस स्नेहांकित मालेराव होळकर दंडवत सुरूसन सबासितेनमयावअलफ : राजश्री मनीराम नागनाथ यानीं एक लक्ष रुपयांची वरात लष्करांतून तुम्हांवर केली होती. त्यासी वरातीचा ऐवज पावला नाहीं, म्हणोन मशारनिल्हेनीं सांगितले. त्यास तुम्हांस अगोदर ऐवजाकरितां तावीज दिली असतां अद्याप ऐवज पावला नाहीं याचे कारण काय ? तरी सदर वरातेप्रमाणें ऐवज मशारनिल्हेस पावतां करून अतःपर दिक्कत न करणें. येविषयींचा बोभाटा फिरोन येतां नये. जाणिजे छ २६ रमजान बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 260　　　　　　　　　　26-2-1767 A.D.

The Kamavisdar of Tonk and Rampura is commanded to explain why Hundee of one Lac of Rupees sent by Maniram Naganath is not paid.

---

अ. नं. २६१　　　　　　　　　　श्री

ता. १ मार्च, इसवी सन १७६७

राजश्री बाबाजी प्रल्हाद कमाविसदार प्रगणे सुलतानपूर, गोसावीः सुभेदार मालेराव होळकर दंडवत सुरूसन सबासितेनमयावअलफः हुजूरीहून उंटे नफरी १२ बारा खजिना आणावयासी पाठविली सबब मार्गी येतां व जातांना वाटेत खर्चास रु.६९ एकूणसत्तर तुम्हांकडून देविले असे. तरी सदरहू रुपये प्रगणे मजकुर ऐवजीं मुजरा असेत. जाणिजे छ.रमजान बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 261　　　　　　　　　　1-3-1767 A.D.

The Kamavisdar of Pargana Sultanpur is informed that the amount of Rs. 69/- spent by him for 12 camels carrying Government Treasury, is credited to the accounts of the Pargana.

---

अ. नं. २६२ **श्री मार्तंड**

ता. ६ मार्च, इसवी सन १७६७

(रोजकीर्द सुरूसन १६६७ संवत् १८२३)

श्रीमंत मातोश्री अहिल्याबाई व मालेराव होळकर यांनीं सनद धर्मार्थ दिली त्याजबद्दल.

१ वेदमूर्ती राजश्री साहेबराम अमृतराम वैद्य गोत्र वत्स शाखा माध्यंदिनी सूत्र कात्यायन वास्तव्य कपित्थल कुरुक्षेत्र यांस छ.५ सवाल फाल्गुन शुद्ध ७ संवत् १८२३ रोजीं मौजे वासवाडा प्रगणे लाखेरी प्रांत हाडोती वंशपरंपरे इनाम धर्मार्थ दिला.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 262 6-3-1767 A.D.

Mauza Wasavada (Pargana Lakheri) is granted hereditarily to Sahebram Amritram Vaidya resident of Kapithal Kurukshetra, by Ahilyabai aud Malerao Holkar.

---

अ. नं. २६३ **श्री**

ता. १२ मार्च, इसवी सन १७६७

राजश्री आनंदराव नरहर कमाविसदार प्रगणे देवळे यांस राजश्री मालेराव होळकरांकडून पत्र प्रगणे मजकुर पैकीं देणें वाजवी म्हसके शिलेदार यांस समजाविस ऐवजी रु.५००० पैकीं धर्मादाय पोतदारी दरसदे रु.२५० वजा करून घेऊन बाकी रु.४७५० तुम्हांकडून देविले आहेत. तरी चार हजार सातशें पन्नास रुपये म्हसके मजकुरास पावते करून कबज घेणें जाणिजे छ.१० सवाल बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 263 12-3-1767 A.D.

The Kamavisdar of Pargana Devale is commanded by Malerao Holkar to pay Rs. 5,000/- to Mhaske Shiledar for the latter's secret service. Rupees two hundred and fifty are to be deducted, according to the custom, for charitable purposes.

---

अ. नं. २६४ **श्री**

ता. ३१ मार्च, इसवी सन १७६७

राजश्री ब्रम्हगिरी महादेव मुक्काम चांदवड गोसावी यांसी. स्नेहांकित अहिल्याबाई होळकर देशमुख प्रगणे मजकूर सुरूसन सबासितैनमयावअलफ. चिरंजीव मालबाचा काळ फाल्गुन वद्य १२ द्वादशीं शुक्रवारीं झाला. ईश्वरें मोठाच क्षोभ केला. त्यास त्याच्या उत्तरकार्यास खेतसी करमसी याजपासून रुपये २५,००० पंचवीस हजार येथें घेऊन तुम्हांवर हे चिठ्ठी केली असे तरी सदरहू चिठ्ठीप्रमाणें ऐवज देखतपत्र शिवाय हुंडणावळ रु.१५०० दीड हजार एकूण साडेसव्वीस हजार पत्रदर्शनीं मशारनिल्हेस देविले. त्यास देऊन कबज घेणें. ऐवज बिना दिक्कत देणें एक घडीची ढील न करणें. मिती चैत्र शुद्ध २ मुक्काम इंदूर शके १६८९ जाणिजे छ.१ माहे जिल्काद बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 264 31-3-1767 A.D.

Death of Malerao Holkar on Falgun Vadya 12, (27 th March 1767).

Bramhagiri Mahadeo of Chandwad is ordered to Pay Rs. 26,500/- to Khetsy Karamsey; Rupees 25,000 were spent on the funeral ceremony of Malerao.

---

अ. नं. २६५ **श्री**

ता. १६ एप्रिल, इसवी सन १७६७

राजश्री बाबाजी प्रल्हाद कमाविसदार प्रगणें सुलतानपुर यांचे नांवें राजश्री मालेराव होळकर यांजकडून पत्र कीं वेदमूर्ती सटवोनारायण केशोनारायण भट वास्तव्य शहादे यांनीं चांदवड मुक्कामीं विदित केले कीं, प्रगणे मजकुरीं दर गांवास रु.१ व सायरावर शेंकडा रुपये साडेबारा आहेत. साल गुदस्तपावेतों चालत आले. हल्लीं बाबाजी प्रल्हाद कमाविसदारांनीं नवीन सनदेचा आक्षेप घेतल्यानी नवीन सनद मिळावी. त्यावरून हे ब्राह्मण थोर चालविणें श्रेयस्कर जाणोन नेमणूक चालत आलेप्रमाणें चौकशी करून चालविणें. बोभाट येऊं देऊं नये. छ.१६ जिल्काद बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 265 16-4-1767 A.D.

Malerao Holkar writes to the Kamavisdar Pargana Sultanpaur that

the grant sanctioned to Satvo Narayan and Kesho Narayan Bhatt residents of Shahada should be continued after making proper inquiries.

---

**अ. नं. २६६** **श्री**

ता. १२ जून, इसवी सन १७६७

राजश्री चिमणाजी गोविंद कमाविसदार प्रगणे पाटण. गोसावी यांसी. स्नेहांकित मालेराव होळकर दंडवत सुरूसन सबासितैनमयावअलफ. जवाला मुंदीकर गुलाबराव पुरोहित यांजकडून गंगाजल कावडी ३० आल्या त्यासी मजूरी रुपये १८० एकशें ऐंशीं रुपये चिंतामणभाई यांस पावते करून पावती घेणें. जाणिजे. छ.११ साबान बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 266 12-6-1767 A.D.

Malerao Holkar orders the Kamavisdar Patan to Pay Rs. 180/- for 30 Kavadis of the Ganges-water received from Jawala Mundiker.

---

**अ. नं. २६७** **श्री**

ता. ३१ जुलाई, इसवी सन १७६७

राजश्री ब्रह्मगिरी महादेव गोसावी यांसी स्नेहांकित अहिल्याबाई होळकर देशमुख प्रगणे चांदवड दंडवत सुरूसन समानसितैनमयावअलफ. कसबे मजकुरीं आपली हवेली, देशमुखी व मोकदमीची आहे. त्या हवेलीच्या शेजारीं दुसरें घर कोठाराकरितां बांधले होते. ते हल्लीं वेदमूर्ती रा.चंदूभट कसबे मजकुरकर यांस दान दिले. याजकरितां दक्षणा रुपये ४९५० चार हजार नऊशें पन्नास तुम्हाकडून देविले असे. तरी सदरहू रुपये वेदमूर्ती भटजीस पत्रदर्शनीं देऊन पावल्याची पावती घेणें. जाणिजे छ.४ रविलावल बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 267 31-7-1767 A.D.

Ahilyabai-Deshmukh Pargana Chandwad-orders Bramhagiri Mahadeo to pay Rs. 4,950/- to Chandubhatt as Daxina for the charity of the store-house made to the said Bhatt.

---

अ. नं. २६८ **श्री**

ता. ८ सप्टेंबर, इसवी सन १७६७

कारकीर्द मा.अहिल्याबाई होळकर, सुभा राजश्री तुकोजी होळकर छ.१४ माहे रविलाखर उर्फ भाद्रपद मुकाम महेश्वर रोजकीर्द.

१ रा. कृष्णराव गोविंद कमाविसदार प्रगणे रामपुरा यांस कीं, लक्ष्मणसिंग चंद्रावत याचे बंदोबस्ताकरितां परगणे मजकुर वगैरे गांव जमीनी नेमून दिलें. त्याची याद अलाहिदा असे. त्याप्रमाणें समजोती करोन देणें. कोटेवाले, बुंदीकर, बांसवाडेकर, राजे यांची जामीन घेऊन कीं बशर्थ महाली दंगा कोणेविसीं न होय ऐसा करार ठरवून मग गांव त्यांजकडे सांगणे. जे गांव सरकारांतून दिले त्या गावीं त्यांनीं गढी न बांधावी. करार करून मग गांवें द्यावींत.

२ रा.लक्ष्मणसिंग चंद्रावत यांस पत्र कीं, तुम्हांकडील बंदोबस्ताकरिता राजश्री गोविंद कृष्ण यांस लिहिले आहे त्याप्रमाणें करून देतील.

३ यादी चंद्रावतास गांव दिले परगणे रामपुरा सुरूसन समानसितैन स.११७७ फसली.

| आकार रु. | गांवाचे नांव | | | देह सुमारी |
|---|---|---|---|---|
| १३४०० | तालुके आमद व हवेली पैकी देह ७ | | | ७ |
| ५००० | कस्बे मजकूर देह १ | १००० | मौजे दाता १ | |
| १५०० | वडकुवा १ | १२०० | मौजे आरण्यामाळी १ | |
| २५०० | पिंपल्यापूर्वीचा १ | १५०० | मौजे तलाऊ १ | |
| ७०० | शामली, ऐवजी. सकरिया खेडी १ | | | |
| | एकूण आकार तेरा हजार चारशें. | | | |
| १२००० | तालुके दातोलीपैकीं देह ९ | | | ९ |
| ४००० | कसबा १ | १००० | मौजे तुंबडा १ | |
| ६०० | खेतपाल्या १ | ८०० | मोकलपुरा १ | |
| १२०० | किसनगंज १ | ४०० | महाराजपुरा १ | |
| १२०० | पोखरदा ऐवजी भैरव-पर राती १ | २००० | मौजे पिंपल्यापुरोहित १ ऐ.काकडगांव | |
| ८०० | खेमपुरा १ | | | |
| | ............ १२००० | | | |
| १०००० | तालुके गरोठपैकीं. देह ४ | | | ४ |

२५०० धामण्याराय १ ३५०० पलासली बु।। १
२५०० आकली, मांगल्या १ १५०० शेमली सोंद्याची १

............
१००००

१५००० तालुके पठारपैकीं देह १० १०

| | | |
|---|---|---|
| १५०० पगारा बु।। १ | ७०० पगारा खुर्द १ | २००० पिंपलदा १ |
| ५००० पीलखेडी बुद्रूक १ | २००० पीलखेडी खुर्द १ | १००० भीमपुरा १ |
| १५०० बिसलवास १ | ३०० वनजारी १ | ५०० अमरगड १ |
| | | ५०० मोकमपुरा १ |

..........
५०४०० एकूण देह ३०

शिवाय भाटखेडी हाटेसिंग चंद्रावत. सदरची सनद नाहीं. सलूक न होय तेव्हां दिला. एकूण देह एकतीस ३१.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 268 8-9-1767 A.D.

List of villages granted to Laxmansing Chandrawat with their approximate revenue. The chiefs of Kota, Bundi and Banswada must guarantee the good conduct of Chandrawat. The latter was to build no forts in the villages.

---

**अ. नं. २६९** **श्री**

शिक्का गोल ता. ११ डिसेंबर, इसवी सन १७६७

राजा शाहू
हर्षनिधान
माधवराव बल्लाळ
मुख्य प्रधान

राजश्री अहिल्याबाई होळकर गोसावी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित माधवराव बल्लाळ पेशवे पंतप्रधान अनेक आशीर्वाद सुरूसन समानसितेनमयावअलफ. तीर्थस्वरूप राघोबादादा पेशवे फौजेची तयारी करून नजराणा घेण्याकरितां किल्ले महेश्वरास येत आहे म्हणून समजलें. त्यास विनंती आहे कीं माझे सासरे मल्हारराव होळकर यांनीं

एकनिष्ठपणें धन्याची सेवा करून सर्व आयुष्य मुलूख सर करण्यांत घालविलें. माझा नवरा खंडेराव होळकर यांनींही सरकारी कामगिरींत देह सोडला. चिरंजीव मालेराव होळकर मृत्यु पावले. मी खासगी व दौलत असे दोन्ही अधिकार आजपावेतों चालवून होळकरांचे नांव कायम ठेविले असून तुकोजीराव होळकर सरकारचाकरीचे उपयोगी समजून यांचे नांवें वस्त्रें यावी म्हणून विनंती करितां दादासाहेब पेशवे नजराण्याचें निमित्यानें नाशास प्रवृत्त होऊन येत आहे म्हणून आल्यावरून लिहिण्यांत येतें कीं,

महेश्वर वगैरे ही जागा खासगीची होळकरांचे कुटुंबांस इनाम जहागीर दिलेली असल्यानें तुमचा पूर्ण हक्क आहे. म्हणून तीर्थस्वरून दादासाहेबांस निक्षून ताकीद झाली आहे व तुकोजीराव होळकर यांचे नावें सनद व कपडे तयार होऊन येत आहे आतां काडीमात्राची अन्देशा न धरितां सुरळीतपणें चालत आल्याप्रमाणें चालविलें जातील. जाणिजे चंद्र १९ माहे रज्जब बहुत काय लिहिणें. (लेखनसीमा).

No. 269 11-12-1767 A.D.

Devi Ahilyabai's Appeal

Madhhaorao Ballal Peshwa confirms the Khasgi and Daulat of Holkars on Devi Ahilyabai: Sanad and Dress of Honour are sent in the name of Tukojee Holkar as the Devi recommends him for Government service.

---

## अ. नं. २७० श्री मार्तंड भैरव प्रसन्न

ता. ९ जानेवारी, इसवी सन १७६८

चकनामा शके १६८९ सर्वाजिन्नाम संवत्सरे पौष वद्य ५ पंचमी ते दिवशीं राजश्री तुकोजीबाबा बिन मल्हारजीबाबा होळकर सुभेदार यांसी मोकदम मौजे जेजुरी तालुके करेपठार प्रांत पुणें सुरूसन समानसितेनमयाअलफ सन ११७७ कारणें चकनामा लिहून दिला असे. ऐसाजे तुम्हीं वाडा आपल्यास मागितला यावरून तुम्हांस वाडा दिला. याची चतुःसीमा पुर्वेस गली टाकून राजश्री नाना पुरंधरे यांचा वाडा, दक्षिणेस गली टाकून राजश्री खंडो मल्हार अत्रे यांचा वाडा, पश्चिमेस वेदमूर्ती राजश्री जयदेव दत्तात्रय यांचा वाडा, उत्तरेस गली टाकून सखो मोरेश्वर बेलसरे जोशी कुलकर्णी मौजे मजकूर यांचा वाडा. जागा दिल्याची लांबी रुंदी पूर्वपश्चिम हात सुमारें ५० पन्नास व दक्षिण उत्तर हात सुमारें ५० पन्नास. हा वाडा तुम्हांस दिला याचे शेलापागोटेंबाबत पाटील कुलकर्णी यांचे दिले रुपये २०० दोनशें सदरी रुपये तुमचे उपाध्ये वेदमूर्ती राजश्री शंकराजी तानदेव खाडे जोशी कुलकर्णी मौजे मजकूर यांनीं दिले ते पावले असतां या वाडियांत तुम्ही वंशपरंपरेनें सुखरूप नांदणें. तुम्हांसी

कोणीही हरकत करील त्यास आपण वारूं. आपण अगर आपले वंशीचा कोणीही हरकत करील त्यास श्रींची शपथ आहे. हा चकनामा लिहून दिला. सही.

छ.१९ माहे साबान

निशाण नांगर.

बकलम सखो मोरेश्वर बेलसरे जोशी कुलकर्णी मौजे मजकूर.

साक्षी : १ निंबाजी बिन कोयमाली झगडे मौजे मजकूर.

१ रूपाजी बिन कान्होजी डोईफोडा गावडा मौजे मजकूर.

१ जाणोजी बिन तान्हाशहा तांबोळी मौजे मजकूर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 270 9-1-1768 A.D.

The agreement and boundaries of the Wada at Jejuree received by Subhedar Tukojee Holkar on a payment of Rupees two hundred to the Patil Kulkarni.

---

**अ. नं. २७१** **श्री**

ता. ५ फेब्रुवारी, इसवी सन १७६८

सुभा राजश्री तुकोजी होळकर छ.१५ रमजान माघमास मुक्काम महेश्वर.

नारो बाळाजीस पत्र कीं, तुम्हाकडील हिशेबाचा फडशा प्रगणे चांदवड येथील मुक्कामी सुरूसनआर्बासितेन सन ११७३ चे साली तीर्थस्वरूप कैलासवासी सुभेदार यांनी निर्गम करून दिला. ते समयीं तुम्हाकडे बाकी निघाली. खाजगीसुद्धां कुल रुपये ७५०५०० सात लक्ष पन्नास हजार पाचशें निघाले. त्यासी तुम्हीं सदरहू रुपयांचा भरणा करून सरकारांत येणेंप्रमाणें दिले तपशील.

२००००० वराता शिलेदार लोकांच्या नालबंदी ऐवजी आर्बासितेनात.

२००००० तुमचे घरची वस्तभाव निंबगांव पुणतांबियाचे हवेलींतील वगैरे सरकारांत आली. सोने व भांडीं, नक्त रुपये, जवाहीर, कापड, मुजरा दिले आहेत.

२१०१७० किल्ले नेणवे येथे रायसिंग घोडचढा राजे माधवसिंग याजकडील यांनीं किल्ले मजकुरास मोर्चे लाविले. लढाई दीड वर्षपावेतों झाली. यामुळें शिबंदी व जकिरा खर्च जाहला त्याबद्दल फाजील तुमचे निघाले त्या बमोजीब झडती किल्ले मजकुरची रुपये दोन लक्ष दहा हजार एकशें

सत्तर. ते फाजील सदरहू मजरा दिले.

९०३००-००-० रावराजे उमेदसिंग यांजकडे तुम्हीं रुपये एक लक्ष रुजू करून द्या. म्हणून चांदवडचे मुक्कामीं हिशेबाचा फडशा झाला ते समयीं करार केला होता. त्यास दिल्लीच्या मुक्कामीं सलासितेन रूजू करून दिले असे. ते मजरा असेत.

१४८८७-१३-९ किल्ले नेणवे येथें जकिरा तुमचे मार्फतीचा रुपये पंचेचाळीस हजार नऊशे बेचालीसचा ४५९४२ होता. पैकीं किल्ले मजकुरी सरकारी वजा रु. ३१०५४-२-३ होऊन बाकी तुमच्या जकिरा किल्ल्यांत निघाल्या. चौदा हजार आठशें सत्यांशीं रुपये पावणे चवदा आणे. हे दिल्लीच्या मुक्कामीं रुजू करून ऐवज मजरा दिले असे.

२००००-००-० रावराजे उमेदसिंग याजकडोन तुमची बाकी येणें त्यापैकीं दिले ते मजरा असे.

१५१४२-०२-३ तुम्ही महेश्वर येथील मुक्कामीं येऊन विनंती केली त्यावरून तुमची नादारी जाणोन सूट दिली असे.

..................

७५०५००-००-०

एकूण येणेंप्रमाणें सात लक्ष पन्नास हजार पांचशे रुपयांचा भरणा सरकारांत तुम्ही करून दिला त्याप्रमाणें पावले असेत. ताा खुद्द नारो बाळाजी.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 271 5-2-1768 A.D.

The Subha of Tukojee Holkar released Naro Balajee from the debt he owed to the Government : debt of Rupees 7,50,500/- in the times of the late Subhedar Malharji. The details of receipts are mentioned. Rupees Fifteen thousand was a deficit which he could not pay. He is released to that extent.

---

**अ. नं. २७२** **श्री**

रोजकीर्द छ.८ सवाल ११७७ फसली, ता. २७ फेब्रुवारी, इ. स. १७६८

श्री देवपुजेकडील कपिलागाईस दररोज पुळें १५० व वासरें यांस दररोज पुळें ७५ ह्याप्रमाणें घालणें म्हणोन :

**सरकारी रेकॉर्ड**

No. 272 27-2-1768 A.D.

Orders to feed the Kapila cow and calves in the service of the temple of worship with 150 and 75 hay-bundles daily.

---

**अ. नं. २७३** **श्रीराम**

ता. १९ आगस्ट, इसवी सन १७६८

श्रीमंत मातुश्री अहिल्याबाईसाहेब होळकर मोकदम मौजे नांदगांव प्रगणे गांडापूर साहेबांचे सेवेसीं. आज्ञांकित गोधाई पाटलीण व काळू पाटील व भवानी कारभारी वगैरे समस्त मंडळी मौजे मजकुर साहेबांचे सेवेसीं लिहून दिले ऐसीजे. करंडे वगैरे फौजेची धामधूम झाली ते समयी गांवची खराबी बहुत झाली. याजकरितां श्रीमंत राजश्री सुभेदार साहेबीं गावच्या हालावर नजर देऊन पांचसाला इस्तकबाला कर दिधला.

४५०० पहिले सालीं. ६५३५ दुसरें सालीं चढसमई प्रमाणें. ६८०६-४-० तिसरें सालीं. ८५०७-१२-० चौथे सालीं. १०००० पाचवे सालीं.

येणेंप्रमाणें इस्तक सालदरसाल करून साहेबांनीं दिला असतां राजश्री विठ्ठलपंत कमाविसदार मौजे मजकुरीं आहेत त्यांनीं दर बिघा रुपया दीड येतां रुपये दहा हजार घेत गेले. आम्हीही देत गेलों. त्यांनीं कौल पाळला नाहीं. याजवर इंदूरचे मुक्कामीं साहेबीं गावची नातवाणीवर नजर देऊन रुपये ६०० देवविले व राजश्री तात्यासाहेब देशीस समानचेसालीं स्वारीतून आल्यावर गांवची बहुत नातवाणी पाहून रुपये ३००० सूट दिधली व राजश्री जाधवराव चौथाईवाला यानींही गांवचा हाल पाहून सूट रुपये बाराशें देविले. ऐसें असतां मौजे मजकुरचा गणू पांड्या व तुकोजी सुडका हे कमाविसदार यांनीं हाती धरून गांवचा हालहवाल न पाहतां पंत मजकुरीं जुलमानीं रयत नागविली. गांवास सुटीचे ऐवजीपैकीं पैसा एक पावला नाहीं. याजमुळें तमाम रयत कष्टी झाली. कोणांत बळ राहिले नाही. अठरा असाम्या मोडून घरीं बसल्या. याप्रमाणें कलमें आम्ही सरकारांत लिहून दिधलीं. तरी हे कलमीं लिहिल्याप्रमाणें पंतमशारनिल्हेचे आंगीं लावून देऊं. या कलमाचा खुद्द निस्बत आपण शहानिशा करून देऊं. खोटी कलमें झालीं तर सरकारचे गुन्हेगार होऊन गुन्हेगारीही देऊं. हे लिहिलें. सही. सन ११७८ छ.६ माहे रविलावल बकलम. रघुनाथ शंकर पारनेरकर. निशाणी नांगर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 273 19-8-1768 A.D.

An appeal for justice and mercy to Ahilyabai by the residents of Mauza Nandgaon against the high-handedness of the Kamavisdar.

---

**अ. नं. २७४** **श्री**

ता. २९-१०-१७६८

राजश्री कमाविसदार वर्तमानभावी मौजे लाखनगांव तालुके पाबळ सरकार जुन्नर गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित तुकोजी होळकर दंडवत रामराम सुरूसनतिसासितेनमयाबअलफ कसबे पुणें येथील तुलसीबागांत राजश्री नारो आप्पाजी यांनीं श्री रामचन्द्रजींच्या मूर्तीची स्थापना केली आहे. त्याच्या पुजानैवेद्याच्या खर्चाकरितां साल मजकुरीं सरकारांतून वर्षासन मौजे मजकुर पासून सदरहू शंभर रुपये सालदरसाल श्रींचे पुजासाहित्यास राजश्री नारो आप्पाजी यांजकडे पावते करून पावती घेणें. प्रतिवर्षीं नूतन पत्राची प्रतिक्षा न करितां याची नक्कल लिहून घेऊन अस्सल पत्र मशारनिल्हे पंत मजकुरापाशीं भोगवटियास परतोन देणें. जाणिजे छ. १७ जमादिलावल बहुत काय लिहिणें मोर्तबसुद. शिक्का.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 274 29-10-1768 A.D.

The Kamavisdar of Mauza Lakhangaon is ordered to pay Rs. 100/- annually for dish and worship service of shree Ramachandra of the temple built by Naro Appajee in the Tulsi-garden of Kasba Poona.

---

**अ. नं. २७५** **श्री**

इसवी सन १७६८

राजश्री कुसाजी महिपतराव कमाविसदार परगणे तराणे गोसावी यांसी. स्नेहांकित अहिल्याबाई होळकर दंडवत सुरूसनतिसासितेनमयावअलफ परगणे मजकुर येथील साल मजकुराच्या ऐवजावर चिरंजीवांनीं परभारे वराता लष्करातून केलिया आम्हांकडे लिहून पाठवीत जाणें. येथून लिहून पाठवूं. त्याप्रमाणें वर्तणूक करणें. येथील चिठ्ठीखेरीज वरातेचा ऐवज दिलिया मुजरा पडणार नाहीं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 275 1768 A.D.

The Kamavisdar of Tarana Pargana is warned by Ahilyabai against making payments of notes sent by Tukojeerao Holkar, from the camp, without her sanction.

---

**अ. नं. २७६** **श्री**

ता. ३० एप्रिल, इसवी सन १७६९

सुभा राजश्री तुकोजीराव होळकर छ. २२ जिल्हेज तसासितेन. चैत्रमास मुक्काम महेश्वर सन ११७८ फसली. दफाते. कुसाजी महिपतराव कमाविसदार परगणे तराणे यांस पत्र कीं, परगणे मजकुरपैकीं खाजगीकडील गांव सुमारी तीनबद्दल. १ मौजे माकडोन, १ मौजे करंज व १ मौजे लसुरड्या. तीन गांव येथील अंमल पेस्तर सालपासून जिवाजी भगवान यांस हुजूरहून सांगितले असेत. तरी तुम्ही सदरहू गांवची देखरेख न करणें. तेथील अंमल मशारनिल्हे करतील. हुजूर. गोविंद रघुनाथ गानू.

१ सदरहूप्रमाणें पत्र जिवाजी भगवान यांस कीं अंमल करून लावणी, आबादी उत्तम प्रकारे करून देखरेख करणें. गोविंद रघुनाथ गानू. हुजूर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 276 30-4-1769 A.D.

Subhedar Tukojeerao Holkar orders the Kamavisdar of Pargana Tarana that the management of three villages (of the Pargana) under Khasgi is handed over to Jiwajee Bhagwan by Huzur.

---

**अ. नं. २७७** **श्री**

रोजकीर्द छ. ५, मुक्काम महेश्वर, ता. ५-६-१७६९

त्रिंबक बाबुराव कमाविसदार यांस तुम्ही कार्यकर्ते जाणून प्रगणे मजकुरची मामलत रसद ठरावून सांगितले असे, तरी इमानेइतबारे वर्तोन रैयत राजी राखून सरकार किफायत करणें.

१ जमीदारास पत्र कीं, मशारनिल्हेस रूजू राहून अंमल दस्तूर लिहून देणें.

१ नेमणुकीबद्दल यादी. महाल मजकुर मामलेदार वेतन, पालखी, शिबंदी, नाकेजात, ठाणेजात व भोजनखर्च, कुल रुपये ३००००

१ सरकार मजकुरीं मिल, भूमे, चोर वगैरे बंदोबस्त राखणें. १ सरकारचे जमीदार, फडणीस यांचेपासून काम घेणें. १ वेतनदार, देवस्थाने वर्षासने सालाबादप्रमाणें देणें.

१ भूमीगत माल येईल तो दाखल करणें. १ आफतफितूरी सूट शिरस्तेप्रमाणें दिली जाईल.

१ हिशोबाचे वेळीं चौकसी करून मुजरा देणें दिलें जाईल. वगैरे कलमें असेत. दस्तूर बाळाजी विठ्ठल कारकून.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 277 5-6-1769 A.D.

A general sketch depicting the conditions laid down by the Holkar Government to Kamavisdars from time to time. On such conditions Trimbak Baburao is appointed at Maheshwar.

---

**अ. नं. २७८** **श्री**

ता. १६ जून, इसवी सन १७६९

राजश्री वर्तमानभावी कमाविसदार प्रगणे आंबाड गोसावी. यांस स्नेहांकित अहिल्याबाई होळकर सुरूसन सबेनमयावअलफ. हरिभक्तपरायण अनंतरूपी बिन नागेश गोत्र काश्यप सूत्र कात्यायन शाखा वाजसनेय वास्तव्य श्री प्रतिष्ठान यांनीं कसबे महेश्वर रेवातीर येथील मुक्कामीं येऊन विदित केले कीं, क्षेत्र मजकुरीं श्री गोदातीरीं मठ बांधून आल्या ब्राह्मणांस अन्न द्यावे हा हेतू, त्याची उपजीविका चालली पाहिजे, याजकरितां सरकारांतून कांहीं वर्षासन करून द्यावें म्हणून त्याजवरून, मनांत आणितां हे ब्रम्हचारी थोर ब्राह्मण हरिभजनीं तत्पर यांचे चालविणें श्रेयस्कर जाणून प्रगणे मजकुरीं नूतन वर्षासन धान्य ज्वारी, बाजरी कैली, थोरगांवीं एक मण, लहानगावीं अर्धा मण, येणेंप्रमाणें साल मजकुरापासोन करार करून देऊन तुम्हांस हें पत्र सादर केलें असे. तरी सदरहू गावगन्ना लिहिल्याप्रमाणें धान्य ब्रम्हचारीबाबा यांजकडे दरसाल चालवीत जाणें. प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करितां या पत्राची प्रती लिहून घेऊन अस्सल पत्र मशारनिल्हेजवळ भोगवटियास परतोन माघारें देणें. छ. ११ सफर बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 278 16-6-1769 A.D.

Ahilyabai orders the Kamavisdar of Pargana Ambad: every big village of the Pargana to contribute one maund of Jwar-Bajaree: small village half a maund. The whole contribution to go to Anantrupee Nagesh

resident of Kshetra Paithan for feeding travelling Bramhins.

---

**अ. नं. २७९** **श्री**

ता. ११ आगस्ट, इसवी सन १७६९

कर्जखत अहिल्याबाई यांनीं दिनकरराव अनंत यांजपासून घेतलें त्याचा करार :

शके १६९१ रविलाखर आर्बीसन ११७० श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांजकडील दिवाणदेण्याबाबत तुम्हापासून घेतले कर्ज रुपये १२५००१ एकलक्ष पंचवीस हजार एक यांसी व्याज दरमहा दर सेकडा रुपया १ एकोत्र्याप्रमाणें आखर मार्गशीर्षमासी पुण्यास देऊं. मिती श्रावण शुद्ध ९ विरोधीनामसंवत्सरे. जाणिजे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 279 11-8-1769 A.D.

Bond passed by Ahilyabai to Dinkarrao Anant for the amount of Rs. 1,25,001/- borrowed for ''Diwan Dene'', at the rate of 1 percent per mensem. The amount will be returned in the month of Margashirsha at Poona.

---

**अ. नं. २८०** **श्री**

ता. ९ नोव्हेंबर, इसवी सन १७६९

राजश्री तुकोजी होळकर गोसावी यांसी सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद उपरि, येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जाणें विशेष. देणें चिरंजीव राजश्री महिपतराव त्रिंबक पुरंधरे यांस सालगुदस्तांप्रमाणें साल मजकुरीं रु. ५०० पांचशें देविले असत. पावते करून पावलियाचे कबज घेणें. जाणिजे छ ९ रजब सबैमयावअलफ बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

**पळसी रेकॉर्ड**

No. 280 9-11-1769 A.D.

Peshwa Madhaorao Ballal orders Subhedar Tukojeerao Holkar to pay Rs. 500/- to Mahipatrao Purandare as done last year.

---

**अ. नं. २८१** **श्री**

ता. १४-१२-१७६९

रोजकीर्द राजश्री तुकोजी होळकर छ. १५ साबान मार्गशीर्ष मुक्काम महेश्वरः दफातेः चिरंजीव सौभाग्यवती मुक्ताबाई फणसे यांस कीं तुझी महेश्वरचे मुक्कामीं विनंती केली कीं आम्ही तुमचे पोटीं जन्म घेतला. तुमच्या पाटीलकीची वृत्ती बहुत आहेत. त्यापैकीं आम्हांस एखादे गांवची पाटीलकीची वृत्ती द्यावी. म्हणोन त्यावरून मनास आणितां तुम्हांस दिल्या उचित जाणोन कसबे निफाड परगणे चांदवड येथील मोकदमी आपली तिसरा हिस्सा आहे. तो तुम्हांस आंदण देऊन हें आंदणपत्र करून दिलें असे. कसबे मजकुरचे महजर कैलासवासी तीर्थस्वरूप सुभेदार यांचें नांवचे आहेत ते तुम्हांस दिले असेत. मान, पान, वतन, हक्क, शिरस्तेप्रमाणें तिसरें हिश्याचे भोगवटे आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवीत जाणें. आमचे वंशीचा हरकत करेल तर कुलस्वामीची शपथ असे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 281 14-12-1769 A.D.

Gift of hereditary dowry by Ahilyabai to her daughter Saubhagyawati Muktabai Phanse, -one-third of the Mukadami of Kasba Niphad. Papers relating thereto are also handed over.

---

**अ. नं. २८२** **श्री**

इ. स. १७६९

**(पुणें रेकॉर्ड इसवी सन १७६९)**

गंगाजलनिर्मल अहिल्याबाई होळकर यांसी. स्नेहांकित माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणें. विशेष तुम्हाकडे सरकारचा ऐवज येणें... रुपये.

| | |
|---|---|
| ३७५९०३-१२-० | नेहमी परसाली प्रांत माळवा येथील बाबती सरदेशमुखीना मक्ता अंतस्थ व पोतदारी व वेतन सुभेदारी व स्वदेशचे महाल बंगाल मिळोन इसवी सन समानसितेन तागायत साल मजकुर सनसबैत दरसाल रुपये १२५३०१-४-० प्रमाणे तीसाला रु. |
| १५५००-०-० | मोकासबाब सरकार बिजागड साल मजकुर सनसबैनचा मक्ता बाबद गुदस्त. |

७२२७०२-२-० बा।। गंगाधर यशवंत.

४२५००-०-० चिंतो विठ्ठल, चिंतो अनंत व आबाजी महादेव मिळोन ऐवज येणें रु. ५०००० पैकीं वसूल रु. ७५०० बाकी रु.

....................

११५६६०५-१४-०

पैकीं वसूल भरणा झाला व निशा जाहली रू.

२५०००० गंगाधर यशवंत याजबद्दल ऐवज येणें त्याजपैकीं यादवराव रघुनाथ भागवत व दिनकर अनंत सिरखंडे यांचे विद्यमानें भरणा झाला त्याचे जाबसाल परत आहे.

३००००० निशा करून घेतली आहे व हुंडी.

| | | |
|---|---|---|
| हवाला | १००००० | यादवराव रघुनाथ भागवत फाल्गुन अखेरचे मुदती. |
| हवाला | १२५००० | व्यंकटराव कासी अंबाडचे ऐवजी दिनकर बाबुराव खरे व बाबुराव रघुनाथ देवस्थळी यांजपासून निमे निमे प्रमाणें. |
| | ७५००० | खेतसी करमसी इंदूरकर याचे दुकानीं हुंडी. |
| | ............... | |
| | ३००००० | |

..................

५५००००

तीन लाख रुपयांची शहानिशा सदरहू प्रमाणें करून घेतली आहे. परंतु याचा भरणा सरकारांत झाल्यावर जाब सादर होईल त्याप्रमाणें ऐवज मजरा पडेल.

बाकी रुपये ६०६६०५-१४-० सहा लक्ष सहा हजार सहाशें पांच चौदा आणे येणें त्यास ऐवज मुदतीप्रमाणें न आल्यास स्वदेशीं तुमचे सरंजामाचे महाल आहेत त्यांची जप्ती करून वसूल सरकारांत घ्यावा ऐसा पेशजीचा करार असतां अद्याप ऐवज आला नाही. याकरितां हे पत्र तुम्हास लिहिले आहे व अलाहिदा तपसीलवार अजमा पाठविला असे. तरी सदरहू ऐवज जलदीनें हुजूर पाठवून देणें. जलदीनें न आल्यास स्वदेशीं तुमचे सरंजामाचे महाल आहेत ते जप्त करून पेशजीचे कराराप्रमाणें वसूल घेतला जाईल. याखेरीज संस्थान बुंदी येथील इसवी सन तिसाखमसेन तागायत सनतिसासीतैन अकरासाला ऐवज तुम्हांकडे व शिद्यांकडे येणें आहे. त्यांस कांहीं दिवस अंमल नव्हता व संस्थानिकांनीं कराराप्रमाणें वसूल दिला नाहीं यामुळें तुम्ही ऐवज सरकारांत न दिला. त्यास संस्थानिक म्हणतात कीं तुम्हांकडे व शिंद्यांकडे ऐवज दिला आहे. ऐशास आप्पाजीराम सरकारचे वकील संस्थानास पाठविले आहेत त्यांचे व शिंद्यांचे रुजुवातीनें संस्थान मजकुरचा ऐवज तुम्हांकडे होईल तो हुजूर पाठवून देणें.

No. 282 1769 A.D.

Madhaorao Ballal Peshwa (Madhaorao I) sends account-sheet to the Holkar Government asking them to pay Rs. 6,00,080/- and odd 6,06,605/- their due. They are also asked to settle the joint-account of Bundi (Holkar & Shindia being the joint-parties).

---

अ. नं. २८३ **श्री**

ता. १४ फेब्रुवारी, इसवी सन १७७०

राजश्री दिनकर अनंत कमाविसदार प्रगणे चांदवड गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित अहिल्याबाई होळकर देशमुख प्रगणे चांदवड दंडवत सुरूसन सबैनमयावअलफ. श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांचा ऐवज देणें. त्यास तुमचे विद्यमानें द्यावा लागतो. याजकरितां देशाच्या महालाच्या मामलेदारांवर सरकारांतून वराता करून पाठविल्या आहेत. तर तुम्हीं वरातांप्रमाणें ऐवज कमाविसदारांपासून वसूल करून जमा करणें. येविषयीं मागाहून जलद लिहून पाठवूं त्याप्रमाणें करणें. हल्लीं वराता बि तपसील :

१०००० शिदो तुकदेव प्रगणे मांडवगण वगैरे खेडी स्वदेश
५००० गोविंद कृष्ण प्रगणे थालनेर
१०००० धोंडो बल्लाळ प्रगणे सुलतानपूर
१०००० व्यंकटराव काशी प्रगणे आंबाड
५००० सिद्धेश्वर विष्णु तालुके कोरहाळे
५००० त्रिंबक नारायण कमाविसदार तालुके देवपूर
५००० तुम्हीं प्रगणे मजकुर ऐवजी
१०००० महादाजी हरी प्रगणें शेवगांव
..............
६००००

एकूण साठ हजार रुपये सत्वर वसूल करणें. जाणिजे छ.१७ माहे सवाल बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 283 14-2-1770 A.D.

Ahilyabai sends a list of the names of Kamavisdears and their respective contributions to the Kamavisdar of Pargana Chandwad. The

whole amount is to be remitted to the Peshwa by the Chandwad Kamavisdar.

---

अ. नं. २८४ **श्री**

ता. २० फेब्रुवारी, इसवी सन १७७०

मु. महेश्वर रा. खंडो बाबूराव यांसी अहिल्याबाईंकडून पत्र कीं,

राजश्री नथो बाळाजी यानीं येऊन हुजूर विदीत केलें कीं, श्रीमंतांकडील दिवाण देणियांत पावणा लक्षाची वरात सरकार बिजागड येथे राजश्री तुकोजीबाबांनीं करून परभारें पुण्यास पाठविल्या. वरातेच्या ऐवजाकरितां राजश्री नाना फडणीस तगादा करितात. याची काय आज्ञा म्हणोन. त्यावरून हें पत्र तुम्हास लिहिलें असे, तर सरकार मजकुरचे रसदेचा करार ठरला तो ऐवज महेश्वरीं घेऊन दिवाणदेणियात दिला येविषयींचा गुंता तुम्हांकडे काय? श्रीमंतांकडील जाबसाल सरकारांतूनच केला जाईल. हुजूर नथो बाळाजी.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 284 20-2-1770 A.D.

Tukojeerao makes direct payment, out of Bijagarh revenue, to the Poona Court without reference to Ahilyabai. Ahilyabai states that the Sarkar will question the Poona Court in the matter.

---

अ. नं. २८५ **श्री**

ता. २८ फेब्रुवारी, इसवी सन १७७०

त्रिंबक राजदेव कमाविसदार प्रगणे इंदूर यांस अहिल्याबाईंचे पत्र कीं, चिरंजीव तुकबांनीं लष्करांतून नहेखान आरब याजला एक हजार रुपयांची वरात तुम्हांवर दिली आहे. त्यासी ते वरातीचा ऐवज सरकारचे आज्ञेशिवाय आरब मजकुरास न देणें. दिलिया मुजरा पडणार नाहीं. हुजूर रवानगी. रंगो भिकाजी कारकून.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 285 28-2-1770 A.D.

Ahilyabai orders the Kamavisdar of Pargana Indore that the note of

payment sent by Tukojeerao from the camp shall not be accepted without her orders.

---

अ. नं. २८६ **श्री**

ता. ९ जून, इसवी सन १७७०

मा. अहिल्याबाईंस. अर्ज पाटलीण मौजे चिचार तालुके राहुरी ज्येष्ठ वद्य १ कीं, मायलेकरांचा मेळ करून द्यावा. माझा अवघा जीव लागला आहे. रात्रंदिवस चिंता आहे. छ.३ रविलाखर ११७१

**सरकारी रेकॉर्ड**

No. 286 9-6-1770 A.D.

Application of the Patil (lady) Mauza Chichar to Ahilyabai to bring about the union of the mother and son.

---

अ. नं. २८७ **श्री**

ता. २२ जून, इसवी सन १७७०

छ.१७ सफर ११७० आर्बी. मुक्काम महेश्वर :

सौभाग्यवती रखमाबाई शिंदे चौंडीकर देशी जातात त्यांस पोहचवावयास कोतवाल, महालपालखी, दिली त्याचे भोयास रोजमुरा एक दीडमाही रा.गेहलासा कमाविसदार प्रगणे नागलवाडी याजकडोन रु.१०० शंभर देविले पाा हुजूर ता.गोपाल जिवाजी.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 287 22-6-1770 A.D.

Rupees one hundred were spent on conveyance etc., for Saubhagyawati Rakhmabai Shinde Choundhikar on way to her native place.

---

अ. नं. २८८ **श्री**

ता. १५ आक्टोबर, इसवी सन १७७०

गंगाभागीरथी अहिल्याबाई होळकर यांसी. प्रती सकवारबाई पवार धार येथें क्षेम असो विशेष. आपणाकडील कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. बहुत दिवस झाले. तुम्हांकडील वर्तमान कळत नाही. तर असें नसावें. सदैव पत्रीं संतोषवीत जावें. यानंतर माळव्यांत धारेस खिल्लारें आहेत त्यांजपैकीं बैल व टोणगे वगैरे लावण्यास आणविलीं आहेत. चार संत नाल महार कवायेकर आहे तर सेंधव्याचे घाटानें यांसी पार करून द्यावें व वाटेचे मार्गे करून द्यावें व वाटेने महसूल वगैरे उपद्रव न लागें तें करणें. आपणांकडील सविस्तर वर्तमान लिहीत जावें. बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंती. पैवस्त छ.२ सवाल मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 288 15-10-1770 A.D.

Sakwarbai Pawar of Dhar requests Ahilyabai to see that her bullocks and buffaloes pass the Sendhwa-Ghat safe and free.

---

**अ. नं. २८९** **श्री**

ता. २२ नोव्हेंबर, इसवी सन १७७०

रोजकीर्द मुक्काम महेश्वर छ.४ साबान ११७१ कारकीर्द अहिल्याबाईसाहेब होळकरः

परगणे देपाळपूर महालचा मक्ता सात वर्षे कराराचा राजश्री त्रिंबकराव अप्पाजीस रु. ७९९७२५ दिला. त्याचे करारांतील शर्थी.

१ रैयत राजी राखणें. १ आबादी करणें. १ नेमणुकी व खर्चाचा ठराव केला आहे. त्याप्रमाणें खर्च करणें. जास्त खर्च केल्यास मजरा मिळणार नाहीं. १ लष्कराची पायमल्ली झाल्यास चौकशी करून मजरा दिले जातील. १ आफतफितुरी मुलूखशिरस्तेप्रमाणें दिली जाईल. वगैरे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 289 22-11-1770 A.D.

Pargana Depalpur is given in contract of 7 years for Rs. 7,99,725/- to Trimbakrao Appaji on certain general broad conditions numbering five.

---

अ. नं. २९० श्री

ता. २३ डिसेंबर, इसवी सन १७७०

रामजी आघाडे मुक्काम इंदूर यांचे अहिल्याबाईंस पत्र पौष शुद्ध ४ छ.५ रमजान ११७१ अरबी कीं, मामलतीचा जाबसाल चितोड मुक्कामीं झाला. राणाजीचे राज्य छप्पन लाखांचे, पटाईत व खालसा मिळोन. पैकीं २/३ राण्यास व १/३ तीन सरदार मिळोन आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 290 23-12-1770 A.D.

News-letter to Ahilyabai: It was decided at Chitod that the Ranajee was to hold 2/3 rd, and three Sardars together to hold 1/3 rd, of the territory.

---

अ. नं. २९१ श्री

इ. स. १७७०

सुभा राजश्री तुकोजीराव होळकर. रोजकीर्द माहेरविलावल ऊर्फ
आषाढमास सुरूसन इहिदेसवेनमयावआलफ संवत् १८२६

राजश्री माधवराव रघुनाथ कमाविसदार परगणे नंदुरबार यांस पत्र कीं, परगणे मजकुर येथील गांवें साल मजकुरापासोन खाजगीकडे ठेविलीं असत तपशील :

| | |
|---|---|
| १ मौजे धामरे तालुके मजकुर | १ मौजे विखरण तालुके कारेट |
| १ मौजे बारद तालुके धामर | १ मौजे आमलथे तालुके चिकणे |
| १ मौजे दूखे तालुके चिकणे | १ मौजे तावखेड तालुके निंबगुण |
| १ मौजे धूकेद तालुके बेलदे | १ मौजे शिंदे तालुके निफाड |
| १ मौजे पाटण तालुके शिंदखेड | १ मौजे बाराके तालुके कोरट |
| १ मौजे ब्राहण तालुके चाकण | १ मौजे मथुराई तालुके नीझर |
| १ मौजे लोणखेड तालुके हवेली | १ मौजे कोठली तालुके निझर |
| १ मौजे वयावल तालुके कारट | १ मौजे समसेरपूर तालुके मैतेन |
| १ मौजे दाऊ तालुके मैतेन | १ (नांव लागत नाही.) |
| ... | ... |
| ९ | ९ |

.............
१८

एकूण अठरा गांवची लावणी, आबादी, उत्तम प्रकारें बंदोबस्त करणें. सदरहू गांवचा

तालुका अलाहिदा केला असे. तेथील कामकाज तहशील वगैरे निराळे ठेवीत जाणें. हुजूर ताा लक्षुमण जासूद व डालकर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 291 1770 A.D.

Subhedar Tukojirao orders the Kamavisdar of Pargana Nandurbar that 18 villages (mentioned in the order) are transferred to "Khasgi" Department. Their accounts shall be kept apart.

---

**अ. नं. २९२** **श्री**

इ. स. १७७०

शिलालेख. श्री क्षेत्र जेजुरी.

पेशव्यांच्या चौघड्याशेजारचा पूर्वेकडील कमानीवरचा

| | | |
|---|---|---|
| ओळी १० | १ श्री मार्तंड चरणीं तत्पर. | २ मल्हारजी सुत तुको : |
| | ३ जी होळकर निरंतरशः | ४ शके १६९२ वीकृतीनामः |
| | ५ संवछरे श्रावणशुधः | ५ प्रतिपदा सोमवार का : |
| | ७ रखाना कीला व तळेमाः | ८ रफत शामजी ना |
| | ९ रायण राजापूरकः | १० र परगणे दीगरज. |

इ. स. १७७० साली थोरले तुकोजीराव यांचे वेळचा हा लेख आहे.

No. 292 1770 A.D.

Inscription on the Jejuree temple.

---

**अ. नं. २९३** **श्री**

ता. ११ जानेवारी, इसवी सन १७७१

श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांचे सेवेसीं. आज्ञाधारक पांडुरंग शंकर आशीर्वाद विज्ञापना. येथील कुशल माघ शुद्ध ३ काळी नदीनजीक फरखाबाद. साहेबांच्या पुण्यप्रतापे करून सुखरूप असो विशेष. यानंतर पूर्वी सेवेसीं तीनचार पत्रें पाठविलीं. आज्ञा न झाली. पत्र पाठविल्यास सेवकास संतोष आहे. अन्य आशय किमपी न आणावा. देशीं गेलो तिकडून येतां दर्शनमात्र जाहले. निरूपायें इकडे आलो. इकडील मजकूर रोहिले पठाण यांजकडून महाल सोडवावे

म्हणोन निकाल जाल्या सेवेशीं विस्तार पत्रें येतील. संक्रमणाचे शर्करायुक्त पोहे स्वीकारावे. उत्तर पाठवावयाची आज्ञा व्हावी. बहुत काय लिहिणें. हे विज्ञप्ती. पैवस्त छ.२६ सवाल इहिदेसबेन मुक्काम महेश्वर ता. १२-२-१७७१.

**सरकारी रेकॉर्ड**

No.293 11-1-1771 A.D.

News-letter from Pandurang Shankar to Ahilyabai : Efforts are being made to re-take our territory from the Rohillas and the Pathans. He sends sweet rice-preparation for Makar-sankrant (not, the usual sweet Tils.)

---

**अ. नं. २९४** **श्री**

ता. २१ फेब्रुवारी, इसवी सन १७७१

श्रीमंत मातोश्री बाईसाहेबांचे सेवेसीं. आज्ञाधारक राघो रणछोड कृतानेक आशीर्वाद विनंती विज्ञापना. येथील कुशल छ.५ जिल्काद मुक्काम जावद येथें साहेबांचे प्रतापेंकरून सुखरूप असो विशेष. इकडील वर्तमान मौजे रेवासे प्रगणे जावरा येथील मुक्कामींहून सविस्तर सेवेसीं लिहून पाठविलें होतें त्याजवरून ध्यानास आलें असेल. आज्ञेप्रमाणें तोफेची रवानगी रामपूर प्रांतीं केली आणि मी कूच करून जिरणेस राजश्री गोविंद कृष्ण यांजकडेस आलो. भेटी झाली. मशारनिल्हेस बहुत संतोष झाला, कीं यासमयास धन्यानीं माझा उपर केला. असें कित्येक प्रकारें बोलले. तें भेटींत निवेदन करीन. येथें आल्यावर दुसरें दिवशीं जावदेस जावयाचा निश्चय केला. कीं तेथें मोर्चे लावून जागा हस्तगत करावी ऐसा करार ठरला. यावर जावदेस आलों. तों शहरांत सुरतराम मेहता, याचा भाऊ सरदारसिंग हजार बाराशें बरकंदाज व दोनशें तीनशें स्वारांनिशीं होता. मोर्चे चार रोज लाविले. उपरांतिक राणा रतनसिंग याजकडील भला माणूस केसरीसिंग मध्यस्ती पडून सरदारसिंगास सलूख राखून काढून दिलें आणि शहरांत ठाणें राजश्री गोविंदकृष्ण यांचे बसविले आहे व राणा अरीसिंगजीही काल येथें आले आहेत. पूर्वी श्रीमंतांचा व शिंद्यांचा पट्टा पावणेदोन लाखांचा करून दिला आहे. त्याप्रमाणें आपलाही राणा अरीसिंग यांजकडून करून घ्यावयाचा याकरितां जाबसाल लाविला आहे व सुरतराम याजला आपल्या सरकारच्या कर्जाविषयीं सांगून पाठविलें होतें त्यास त्याचा निरोप आला कीं, मजजवळ कांहीं नगदी ऐवज नाहीं. घोडी, उंट व हत्ती व कांहीं नगदी असे देईन आणि माझा फडशा करावा. त्यास त्याची आज्ञा काय ते करावी व मेहता मजकुर याजलाही आज्ञापत्र पाठवावें. म्हणजे जैसा निकाल होईल तैसा करून घेऊं. पत्राचे उत्तर सत्वर द्यावयाची आज्ञा करावी. वरकड येथील वर्तमान

जे होईल ते मागाहून सेवेसीं लिहून पाठवीन, हे विज्ञापना. पैवस्त छ.१८ जिल्काद इहिदेसबेन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 294 21-2-1771 A.D.

News-letter from Ragho Ranchhod to Ahilyabai. Rampura campaign. Kesarisingh brought about reconciliation The enemy agrees to pay not so much in cash but in jewellery etc., Ahilyabai's orders are solicited for future action.

---

**अ. नं. २९५** **श्री**

ता. २७ फेब्रुवारी, इसवी सन १७७१

श्रीमंत मातोश्री बाईसाहेब गोसावी यांसी आज्ञाधारक राघो रणछोड कृतानेक आशीर्वाद विनंती विज्ञापना कुशल छ.११ जिल्काद मुक्काम मौजे अचोल प्रगणे चितोडगड प्रांत मेवाड. महाराजांचे प्रतापेंकरून सुखरूप असों विशेष. साहेबाकडून छ ९ रोजीं आज्ञापत्र आलें कीं माळवे प्रांतीं गोसावी आले आहेत. हे परगण्यांत दंगा करतील याजकरितां बातमी राखून आपले परगण्यांत फिरो न देणें म्हणोन आज्ञा त्यास मी तर या प्रांतीं आलो आणि राजश्री कृष्णाजी तानदेव व शरीफभाई हे त्या प्रांतीं माघारे पाठविले हे वर्तमान सेवेसीं पूर्वीच मौजे रेवासचे मुक्कामींहून लिहिलें होते व दुसरेंही पत्र या प्रांतीं आल्यावर जावदेचे मुक्कामींहून सविस्तर लिहून पाठविले असे. त्याजवरून ध्यानास येईल. प्रस्तुत राणा अलसीजी व गोविंदकृष्ण व आम्हीं एकत्रच अहोत. राणाजीच्या चित्तांत कीं, पटाईतावर दबाव देऊन त्याजपासून कांहीं घ्यावे हा मजकूर आहे. सेवेसीं कळावे मागाहून सविस्तर लिहून पाठवूं हे विज्ञापना. पैवस्त छ २७ जिल्काद मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकार्ड**

No. 295 27-2-1771 A.D.

News-letter from Ragho Ranchhod to Ahilyabai : Krishnaji Tandeo and Sharifbhai are sent against the Gosawis roaming about in Malwa. Rana Alsijee: Govind Krishna and the writer are discussing measures against the Pataites.

---

अ. नं. २९६ **श्री**

ता. २८ फेब्रुवारी, इसवी सन १७७१

खेतसी करमसी याचे पत्र अहिल्याबाई साहेबांसः फौजेचे वर्तमान तर फौजा दिल्लीस दाखल झाल्या. जाबद येथें सुरतसिंगाचा भाऊ, सरदारसिंग होता. त्याजबरोबर राजश्री गोविंदराव यांची लढाई होत होती. त्यानंतर अळसी राणा आले. उपर सुरतसिंगाचा भाऊ सरदारसिंग पळून गेला. नंतर राजश्री आबाजी रणछोड यांचे ठाणें जाबद येथें बसलें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 296 28-2-1771 A.D.

Khetsey Karamsey (Banker) writes to Ahilyabai. The army has reached Delhi Sardarsingh, ruling at Jawad, is displaced by Abajee Ranchhod.

---

अ. नं. २९७ **श्री**

ता. १ एप्रिल, इसवी सन १७७१

राजश्री आप्पाजी गीते गोसावी यांसी. स्नेहांकित अहिल्याबाई होळकर इहिदेसबेन मयावअलफ. राजश्री राघो रणछोड उदेपूर प्रांतीं आहेत. त्यांजबरोबर तुम्हींही आहां म्हणोन कळले. त्यासी पंतमशारनिल्हेपाशीं राहून सरकारचे हरएक कामकाज करून पंत मशारनिल्हे सांगतील त्याप्रमाणें वर्तणूक करणें. जाणिजे. छ.१५ जिल्हेज बहुत काय लिहिणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 297 1-4-1771 A.D.

Ahilyabai orders Appajee Gite to assist Ragho Ranchhod in every Government undertaking. Both are in Udaipur.

---

अ. नं. २९८ **श्री**

ता. २८ एप्रिल, इसवी सन १७७१

राजश्री तुकोजी होळकर गोसावी यांसी. छ. सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य. स्नेहांकित माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल

जाणून स्वकिये कुशल लिहीत जाणें विशेष. मुकासा सरकार बिजागड व बाबती सरदेशमुखी प्रांत माळवा वगैरे येथील ऐवज तुम्हांकडे येणें त्यापैकीं सरकारात भरणा मार्फत यादवराव रघुनाथ भागवत... रुपये.

१०५७८४ जमा पोता १०००० छ. २३ रमजान. ५०००० छ. २४ जिल्हेज.

५०००० स्वारी कर्नाटक विद्यमान त्र्यंबकराव विश्वनाथ लष्करांत साहुकारापासून ऐवज घेऊन पुण्यास देवविले ते रुपये.

२०००० रघुनाथदास रामदास यांस वरात छ. ३ जिल्काद.

२०००० वरात छ. ४ जिल्काद. १०००० भिमाप्पा नाईक व १०००० वल्लभसुंदर.

१०००० तात्याप्पा नाईक बदामीकर यांस वरात छ. ७ जिल्काद.

..........

५००००

६४१६ पागा दिमत बालोजी पलाडे बेगमीपैकीं. २००० वरात छ. ७ जिल्काद. ४४१६ वरात छ. ५ जिल्हेज. एकूण ६४१६

१५००० आनंदराव भिकाजी यांस सुरापुराबद्दल वरात छ. ३० जिल्काद.

३६०० पागा दिमत नारायण नारायणजी बाबर बेगमीपैकीं वरात छ. जिल्हेज.

........

१८०८००

एकूण एक लक्ष ऐंशी हजार आठशें रुपये सदरहूप्रमाणें सरकारात जमा असेत जाणिजे. छ. १२ मोहरम सु।। इहिदैसबैनमयावअलफ यांसी तपशील.

१५५०० मुकासा सरकार बिजागड साल मजकुरीं ऐवज येणें तो.

१६५३०० बाबती सरदेशमुखी प्रांत माळवा वगैरे रु.

३०१-४-० सनसमानसीतैन पैकीं.

१०४५०१-४-० सनतीसासीतेन पैकीं.

८३६९७-८-० सनसबैन पैकीं.

................

१८०८००-०-०

पैकीं भरणा १८०८०० रुपये.

**पेशवे रेकॉर्ड पुणें, ता. २८ एप्रिल १७७१**

No. 298 28-4-1771 A.D.

"Poona Record" account of dues and receipts for Mukasa of Sarkar Bijagad and Babati Sardeshmukhi Prant Malwa-Rs. 1,80,800/-

अ. नं. २९९ श्री

ता. ७ जून, इसवी सन १७७१

राजश्री रामजी आघाडे पागा निस्बत सरकार गोसावी यांस स्नेहांकित अहिल्याबाई होळकर इसनेसबैनमयावअलफ. जब्बारखां वल्द महमदखां मोकदम मौजे कूकावल तालुके सारंगखेडी प्रगणे सुलतानपूर यानें हुजूर येऊन विदीत केलें कीं, मौजे कोठडी प्रगणे मजकुर येथील इनाम बिघे सुमारें २५० खेरीज जमा आहे. त्याच्या सनदा पातशाही पूर्वीपासून भोगवटा चालत असतां हल्लीं पंधरा वर्षे आमचा इनाम माधोसिंग गिरासे व चंद्रा पाटील मौजे कोठलीकर हे उभयतां जबरदस्तीनें खातात. येविर्सी प्रगणे मजकुरचे जमीदारांनीं वगैरे बहुत प्रकारें सांगितले परंतु आमचा इनाम आमचे हातास न ये सबब सरकारात विनंती करून आपल्या इनामपैकीं निम्मे जमीन बिघे सवाशें आपले खुश रजाबंदीनें सरकारांत देऊन बाकी निम्मे जमीन बिघे सवाशें राहिली ते आम्हाकडे चालविली जावी म्हणोन. त्याजवरून येविसीचे बंदोबस्ताविषयीं राजश्री दिनकर आनंत किल्लेदार प्रगणे मजकुर यांसी लिहिणें ते लिहिलें असे. तरी मशारनिल्हेची इनाम जमीन गिरासे मजकुर व पाटील उभयतां खातात. ते दरोबस्त खालसा करून पैकीं निम्मे मशारनिल्हेकडे चतुःसीमा मामलेदार व जमीदाराचे विद्यमानें करून देवणें व निम्मे जमिनीची कारकीर्द मामलेदाराकडून करवून सरकार हिशेबी जमा करविणें. पेशजी पंधरा वर्षे उभयतांनीं जमीन जबरदस्तीनें हाकून खादली त्याचा ऐवज जमीदारास वगैरे पुसोन दरोबस्त बेमुलाजा वसूल करून हुजूर पाठविणें. अथवा मामलेदाराकडे निशेंत आणून त्याची पावती घेऊन पाठविणें. येविसी दिरंग न लावणें. जाणिजे छ. २२ सफर बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 299 7-6-1771 A.D.

Ramajee Aghade (Paga Officer) is ordered by Ahilyabai to resume 125 Bighas of land to the Sarkar, and to restore 125 Bighas to Jabbarkhan Mahamadkhan. The land is at Mauza Kukawal. It is forcefully enjoyed for the last 15 years by Madhosing and Chandra Patil. The order is passed with the willing consent of the Khan.

---

अ. नं. ३०० श्री

ता. २४ सप्टेंबर, इसवी सन १७७१

राणा बडवाणी यांजकडून श्रीमंत पेशवे यांस विनंती : आम्हापासोन सेंधवे, नागलवाडी घेतलें. आणिकही जागा घेतल्या आणि आमचे घरचे हत्ती घेऊन आम्हास बुडवूं म्हणतात.

त्यास शरण जावें तर ते आमचेपाशीं चाकर होते. त्यास शरण जावत नाहीं. यास्तव तुम्हांस शरण आलो. तुम्ही बंदोबस्त करा व दोन खेडीं द्याल ती खाऊन राहूं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 300 24-9-1771 A.D.

The Rana of Barwani appeals to the Peshwa against certain acts of the Holkars who, he says, were formerly in the service of his state.

---

**अ. नं. ३०१** **श्री**

ता. २८ सप्टेंबर, इसवी सन १७७१

अहिल्याबाईंचे दिनकर अनंत कमाविसदार चांदवड यांस पत्र. चिरंजीव राजश्री यशवंतराव फणसे यांस देशीं रवाना केले आहेत. त्यांजबरोबर मेवाती व खानदेशी लोक दिले आहेत. त्यास रोजमुरा दिडमाह सदुसष्ट रुपये एकंदर इसम चौदाबद्दल देविलें असे. तरी सदरहू रुपये ज्याचे त्यास देऊन पावल्याचे कबज घेणें. जाणिजे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 301 28-9-1771 A.D.

Ahilyabai orders the Kamavisdar of Pargana Chandwad to pay Rupees sixty-seven to fourteen attendants on duty for a month and a half in the service of Yeshwantrao Phanse who has started for the Deccan.

---

**अ. नं. ३०२** **श्री**

ता. १३ आक्टोबर, इसवी सन १७७१

अहिल्याबाईंचे खंडेराव व्यंकटेश कमाविसदार प्रगणे कोरहाळे यांस पत्र. तुम्हाकडे साल मजकुरी तालुके मजकुरचे रसदेबद्दल ऐवज रु. ३०००१ तीस हजार एक ठरावून परभारें श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांचे दिवाणदेणीयाचे भरतीयास देविला असे. तरी सदरहू तीस हजार एक रुपये राजश्री यादवराव रघुनाथ भागवत यांचे विद्यमानें पुणियास पावते करून कबज घेणें जाणिजे. छ. ४ रजब बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 302 13-10-1771 A.D.

The Kamavisdar of Pargana Korhale is ordered by Ahilyabai to pay his dues of the year-Rs. 30,000/- to the Peshwa under the head of "Diwan Deni" through Yadavrao Bhagwat.

---

**अ. नं. ३०३** **श्री**

शके १६९३, संवत १८२७, इ. स. १७७१

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>मल्हारजी सुत तुकोजी होळकर |
|---|

राजश्री कमाविसदार वर्तमानभावी परगणे सबुराबाद गोसावी यांस स्नेहांकित तुकोजी होळकर दंडवत सुरूसन इहिदेसबैनमयावअलफ शके १६९३ खरनाम संवत्सरे वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामचंद्र पंडित बिन श्री पती पंडित उपनाम दशपुत्र गोत्र गौतम सूत्र अपस्तंभ, वास्तव्य श्री क्षेत्र काशी यांनीं बागपत मुक्कार्मी येऊन सांगितलें कीं, आम्हांस सरकारांतून विठूर येथील मालऐवजी वर्षासन रुपये ५०० पांचशें पूर्वीपासून चालत आहे. अलीकडे अंमल उठलेमुळें बंद झाले. त्यास कृपा करून दुसरें वर्षासन करून दिल्यास स्नानसंध्या करून अभीष्ट चिंतन करूं. म्हणोन मनास आणितां हे थोर ब्राह्मण शास्त्रसंपन्न चालविणें श्रेयस्कर जाणून विठुरीं वर्षासन होते त्याऐवजीं रुपये ४०० करार करून हे सनद सादर केली आहे. तरी प्रगणे मजकुरचे माल ऐवजी चारशें रुपये पंडितराय यांजकडे पावीत जाणें व कबज घेत जाणें. नूतन पत्राची प्रतिक्षा न करितां नक्कल घेऊन हे पत्र सनद भोगवटियास फिरून देणें. जाणिजे. छ. २५ बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 303 1771 A.D.

The Kamavisdar of Pargana Sakurabad is ordered by Tukojeerao Holkar to pay Rs. 400/- annually to Ramchandra Pandit Dashputre. The said pandit used to receive Rs. 500/- annually from the Bithur Pargana. The said Pargana was no longer under the Holkar Government.

---

**अ. नं. ३०४** **श्री**

ता. ८ फेब्रुवारी, इसवी सन १७७२

राजश्री बाबाजी शेळके मुक्काम चांदवड यांस पत्र अहिल्याबाईंकडून. राजश्री आप्पाजीराम (पळसीकर) यांजकडे मौजे धरणगांव वगैरे देह दोन प्रगणे मजकुर येथील सीस्तीपैकी गवतपुळें सुमारी ३२००० बत्तीस हजार पेशजीपासून सरकारांत नेमून दिल्याप्रमाणें सदरहू बत्तीस हजार गवत देहाय मजकुरचे सीस्तीपैकीं पंतमशारनिल्हे यांजकडेस देत जाणें दिक्कत न करणें. जाणिजे चंद्र ३ माहे जिल्काद बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 304 8-2-1772 A.D.

Babajee Shelke of Chandwad is ordered by Ahilyabai to supply Appaji Ram (Palshikar) 32,000 haybundles from two villages (mentioned) as done last year.

---

**अ. नं. ३०५** **श्री**

ता. ३१ मार्च, इसवी सन १७७२

श्रीमंत मातोश्री बाईसाहेब साहेबांचे सेवेसीं. आज्ञाधारक मल्हारराव गोविंद कृतानेक आशीर्वाद विज्ञापना. येथील कुशल फाल्गुन कृष्ण १३ पावेतों साहेबांचे कृपावलोकनें करून यथास्थित असों विशेष. साहेबीं आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. इंदूरचे कारखान्यास लोखंड शंभर मण पाठवून देणें म्हणोन आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें लोखंड तैयार करविलें आहे. तैयार जाहले म्हणजे छकडे भरून रवाना करितों. दुसरें वर्तमान कीं, मेवाडचा कांकड व बुंदीचा राणा या दोन्हीचे सरहदीमध्यें मेवाडी गढी होती. ती पूर्वी बुंदीकर (गतवर्षी) रावराजांनीं घेतली आहे याजकरिता सांप्रत अलसी राणाजी आपले जमयेतीनिशीं ते प्रांतीं आले आहेत कीं गढी माघारी घ्यावी. उपरांतिक तेथून एक भला माणूस व हजार पांचशें ऐसे बुंदीस रावराजाकडे पाठविले. एथून हेही आपला पोक्त सरंजाम घेऊन त्यास्थळीं गेले. उभयतांच्या भेटी जाहल्या. दोन चार दिवस सारस्यें करून शिष्टाचार करून परस्परें होते. राणाजीचे चित्तांत कीं, गढी याजपासून सोडवावी आणि यांचे मानस कीं गढी न सोडावी. ऐसीयास हुताशनीचें दुसरें दिवशीं प्रतिपदेस इकडे रजवाड्यांत रीत आहे कीं, शिकार खेळायची. याजकरितां राणाजीही स्वारी करून निघाले. रावराजेही तयार होऊन आज्ञा मागावयास आले. येऊन स्वारीमध्येच आज्ञा मागितली. राणाजी आज्ञा न देत याजकरितां यांनींही चित्तांत दगा विचारला. ऐसियास तेथील प्रसंग पाहून रावराजांनीं राणाजीवर सांग चालविली. ते कारगर झाली व समागमें एकदोघेजण आणखी होते त्यांनीं वार केले.

तेणेंकरून राणाजी कामास आले. आणि तेच दिवशीं प्रतिपदेस रावराजे उठोन दोन प्रहरीं रात्री बुंदीस येऊन दाखल जाहलें. येणेंप्रमाणें वर्तमान झालें. दुसरें शिंद्याची फौज तिकडून जैपूर प्रांतास आली. जैपूरापासोन बारा कोसावर आहेत. त्या प्रांतींही प्रतापसिंग नरूका याचा व राजाचा आपसांत कलह लागला आहे. दोनचार गढ्या प्रतापसिंगानें घेतल्या आहेत. याजकरितां जैपूराहून राजाचा वकील शिंद्याचे लष्करांत आले कीं प्रतापसिंगाचे पारिपत्य केले पाहिजे आणि गढ्या त्यानें घेतल्या आहेत त्या सोडविल्या पाहिजेत. या अर्थी सात लक्ष रुपये शिंद्यांस द्यावे असा करार करून वकील माघारे जैपूरास गेले. येणेंप्रमाणें वर्तमान आहे. वरकड पैकीं मजकूर व किल्ले हिंगळाजगड येथील बंदोबस्त यथास्थित असे विशेष. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ. ४ माहे मोहरम संवत् १८२८.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 305 31-3-1772 A.D.

News-letter from Malharrao Govind to Ahilyabai : Rajputana affairs. Mewad and Bundi dispute. Jeypore seeks help from Scindia. Malharrao Govind sends hundred maunds of Iron for Indore Factory.

---

**अ. नं. ३०६** **श्री**

रोजकीर्द छ. ३ व ६ रविलाबल ११७३ अर्बी ता. ५ जून, इसवी सन १७७२

कसबे इंदूर येथील टाकसाळेचें काम मनोहरदास सावकार प्रगणे मजकुर यांजकडे सांगण्याबद्दल म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 306 Order : 5-6-1772 A.D.

The work of the mint of Kasba Indore shall be given in charge of Manohardas Sowkar, a local resident.

---

**अ. नं. ३०७** **श्री**

ता. २० जून, इसवी सन १७७२

श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांचे सेवेसीं. आज्ञाधारक खेतसी करमसी कृतानेक जोहार विनंती. येथील वर्तमान ज्येष्ठ वद्य १० मुक्काम इंदूर जाणोन लिहिण्याची आज्ञा केली

पाहिजे, विशेष. साहेबांचे आज्ञेप्रमाणें लष्करास कासीद पाठविला होता, तेथून जाब घेऊन आला ते लाखोटे दोन सेवेसीं पाठविले आहेत. पावल्याचे उत्तर यावें. यानंतर आमचा घरचा कागद लष्करांतून ज्येष्ठ शुद्ध १५ मे चा आला त्यात वर्तमान लिहिलें कीं, श्रीमंत राजश्री रामचंद्र गणेश रुसून इकडे कूच करून नेवरीपावेतों आले होते. त्यांस श्रीमंत तुकोजी होळकर व राजश्री महादजी शिंदे हे दोघे एकचित्त होऊन रामचंद्र गणेश यांस समजाऊन घेऊन गेले. आतां तिघे सरदार एक जागीं आहेत. हे झाल्यावर राजश्री विसाजी कृष्ण बिनीवाले रुसून लष्करांतून निघाले. हे वर्तमान लिहिले होते व पुण्याचा कागद ज्येष्ठ शुद्ध १५ चा आला, त्यात वर्तमान जे पहिले आले तेच आहे. कांहीं अधिकोत्तर नाही व पेटारी एक बोरे साकरेचे व पेढे पाठविले आहेत व फण्या हस्तिदंताच्या चार पाठविल्या आहेत. ते पावल्याचें उत्तर पाठवावे. बहुत काय लिहूं व राजश्री मुकंदराव महादेव सागोर डिगठाणचा कमाविसदार उज्जनीहून लष्करास जात आहे. त्याजबरोबर उज्जेनचे सावकाराचा माल जात आहे. म्हणून आम्ही येथून बनातीचे तागे व कापड मिळून ओझीं सुमार ११ त्याजबरोबर पाठवितों. त्यास एक सरकारचें पत्र मुकुंदरावजीचें नावें लिहून पाठवावें कीं सरकारचे बोजे वाटेने सांभाळून लष्करांत रवाना होत आहेत. तर ते पावते करून जाब पाठविणें. हे विज्ञापना.

१ चिरंजीव जिवराव तेथून उदास होऊन कागद लिहितो तर साहेबांनीं त्याचें समाधान करून दिलासा द्यावा हे विनंती. वेदमूर्ती धोंड दिक्षित देपाळपूरचे जहागिरीचे गांव पहावयास आले होते. ते मजला भेटून आज गुरुवार नवमीस येथून स्वार होऊन महेश्वरास आले आहेत ते सविस्तर निवेदन करतील हे विज्ञप्ती. पैवस्त छ. ४ सफर मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 307 20-6-1772 A.D.

Khetsey Karamesy (Banker) writes from Indore to Ahilyabai : News-letter information : Ramchandra Ganesh, and Visajee Krishna (both Sardars sent by the Peshwa to co-operate with Holkar and Scindia) alternately abandon the camp. Holkar and Scindia try to bring about reconciliation: the banker sends some presents: sends woollen cloth to Ujjain, and requests Ahilyabai to order local officers to see that they are safely transported on the road.

---

**अ. नं. ३०८** **श्री**

ता. २७ आगस्ट, इ. स. १७७२

श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांचे सेवेसीं. आज्ञाधारक विठ्ठल गणेश कृतानेक आशीर्वाद

विनंती विज्ञापना कीं येथील कुशल श्रावण वद्य १४ गुरुवार मुक्काम पुणें जाणोन स्वकीयें कुशल लेखन आज्ञा झाली पाहिजे. इकडील मजकुर अजुरदारासमागमें सविस्तर लेखन केला आहे त्याजवरून ध्यानास येईल. प्रस्तुत बढवाणीचा जाबसाल गोपालशास्त्री यानीं सरकारांतून लाविला आहे कीं संस्थान सरकारांत ठेवल्याप्रमाणें राजश्री कृष्णराव बल्लाल यांचे विद्यमानें श्रीमंत नारायणराव यांसी बोलले राजश्री बापूकडेही कृष्णरावाचे विद्यमानें बोलले. त्याजवरून बापूनीं राजश्री शिवबाजीस जुनी माहिती सांगितली. सुभेदारांचे वेळेपासून आहेती. सबब बढवाणीचे संस्थान पूर्वीपासोन राजाचे म्हणोन बोलावून पुसले त्याजवरोन त्यांनीं  चाळीस वर्षांचे इस्तकबील वर्तमान सांगितलें कीं पूर्वीपासोन आमचे सरदारीतच चालत आले. राजाचा आमचा घरोबा याजमुळें सरकारातूनहीं चालविलें. अलीकडे खरगोण दिल्यापासून हे संस्थान खरगोणांतच ओढतें. याप्रमाणें बोलून कागदपत्राचीही माहितगिरी सरकारचे कारकुनास करून दिल्ही. ऐसियास बापू बोलले कीं श्रीमंतांस समजावून मनाईची चिठ्ठी सोय पडल्यास देवितो. शास्त्रीबोवांचा ऐवज कांहीं फसला असे निमित्ते गडबड करितात. मजलाही बापूसी भेटून वरवर बोलणे बोलतो. मागाहून जाहले वर्तमान लिहीन. येथें कासीद जोड्या दोन नेहमी असाव्या. वर्तमान वरचेवर लिहिलें पाहिजे, येथून अजूरदार पाठविला तर कागद जातात येतात त्याचा संशय असतो. अर्थी विनंती लिहिली आहे. ऐवजाची निकड राजश्री नानाकडून आधिक आहे तें पत्री लिहितां पुर्वत नाही. तरी जलद रवाना करावयास आज्ञा जाहली पाहिजे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ती. पैवस्त छ १४ जमादिलावर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 308 27-8-1772 A.D.

News-letter from Vithal Ganesh at Poona to Ahilyabai.

The Poona Court is making inquiries regarding the Barwani State-its position and possession: Nana's regular pressing for payment.

---

**अ. नं. ३०९** **श्री**

ता. १२ डिसेंबर, इसवी सन १७७२
रोजकीर्द मुक्काम महेश्वर छ. १६ रमजान सन ११७३

सरकार बिजागड महाल सरंजामाकरिता सुरूसन ११६४ त श्रीमंतांकडून सरकारांत आला. ते समयीं पांढरी गांव राजश्री कृष्णराव रामचंद्र भुसकुटे यांस कैलासवासी सुभेदारांनीं दिला तो बरकरार ठेवणें म्हणून कमाविसदार सरकार बिजागड यांस पत्र जारी करणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 309 12-12-1772 A.D.

Sarkar Bijagad came over to Holkar Government from the Peshwa for Saranjam. Pandharigaon to be, however, retained, with Bhuskutes as it was given to them by the late Subhedar Malharji.

---

**अ. नं. ३१०** **श्री**

ता. १८-१२-१७७२

श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांचे सेवेसीं. आज्ञाधारक खेतसी करमसी चरणावर मस्तक ठेवून दंडवत विनंती उपरि. येथील क्षेम तागाइत मार्गशीर्ष वद्य ८ पावेतों साहेबांचे कृपावलोकनें करून मुक्काम मजकुरीं सुखरूप असो विशेष, पुणियाहून पत्रें आलीं. त्यांमध्यें वर्तमान लिहिलें आहे कीं, श्रीमंत दादासाहेब तथा राजश्री नारायणराव हे उभयतां श्री सातारियास कूच करून गेले. मिती मार्गशीर्ष शुद्ध ११ दिवशीं ते साहेबांस कळावें. दुसरें वर्तमान लष्कर परत आलें. श्रीमंत तुकोजीराव बाबा व राजश्री विसाजीपंत व जाबतेखान रोहिला असे त्रिवर्ग मिळून मार्गशीर्ष शुद्ध ८ चे दिवशीं श्री जमनाजी उतरून दिल्लीकडे गेले आहेत. आपणांस कळावे. पादशहाजी तर दिल्ल्लींत आहेत. फौज बाहेर पडली आहे. दुसरें आपसांत बिघाड आहे. आपणांस कळावे. दुसरें राजश्री महादजी शिंदे हे मथुराजीहून कूच करून दिल्लीस गेले आहेत. पोहचल्याचें वर्तमान आले नाही. आल्यावर सर्व बाहेरचे सुद्धां समाचार लिहून पाठवून देईन. आजपर्यंत येणेंप्रमाणें वर्तमान आहे. उद्याचें परमेश्वर जाणें. पैवस्त छ. २२ रमजान.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 310 18-12-1772 A.D.

News-letter by Khetsey Karamsey to Ahilyabai : Dada Saheb and Narayanrao have gone to Satara (to receive the Honour-Dress). The army has returned from Delhi. Tukojeerao Baba, Visajeepant and Jabtekhan Rohilla have, three together, marched to Delhi. The Emperor is in the Capital: the army has come out. Things there are at sixes and sevens. Mahadajee Scindia has laft Mathura for Delhi.

---

**अ. नं. ३११** **श्री**

सुभा राजश्री तुकोजी होळकर रोजकीर्द, ता. इ. स. १७७२

छ.२० जमादिलाखर सुरूसन सलाससबैन. ऊर्फ भाद्रपदमास मुक्काम महेश्वर.

विसाजी रंगनाथ कमाविसदार परगणे इंदूर यांस कीं, कारकून मंडळीस रोजमुरा एक दीडमाही देणें. म्हणोन वराता.

२०० विनायक बाजीराव, ताा खासे 200 नारो गणेश, मुकुंद हरी.

२०० राघोरावजी, ताा नारो मल्हार

एकूण सहाशें रुपये परगणे मजकुर येथील साल मजकुर ऐवजी देऊन कबज घेणें. म्हणोन वराता तीन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 311 1772 A.D.

The Kamavisdar of Pargana Indore is ordered to make certain payments to officers (the amount being the pay for a month and a half.)

---

**अ. नं. ३१२** **श्री**

रोजकीर्द सुभा राजश्री तुकोजी होळकर इ. स. १७७२

विसाजी रंगनाथ कमाविसदार परगणे इंदूर यांस कीं, लष्करांतून चिरंजीव राजश्री तुकबांनीं चौंडीकर शिंदे यांसी नालबंदी ऐवजी वराता दिल्ह्या आहेत. बी तपशील.

| | | | |
|---|---|---|---|
| ३७८० | राणोजी शिंदे | ८९० | आप्पाजी शिंदे |
| १६४० | विठोजी शिंदे | ८९० | गोविंदराव शिंदे |

एकूण ७२०० सात हजार दोनशेंच्या. म्हणोन वगैरे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 312 1772 A.D.

Several amounts are sanctioned by Tukojeerao Holkar (in camp) to Chaundikar Shindes for Nalbandi. (The Shindes are related to Ahilyabai from her father's side). Nalbandi = Preparations of war.

---

**अ. नं. ३१३** **श्री**

ता. १५ एप्रिल, इसवी सन १७७३

रा. मोरो विनायक कमाविसदार शेवगांव यांस अहिल्याबाईंचें पत्र छ.२२ मोहरम सन ११७३ अरबी.

मौजे खांबपिंपरी परगणे मजकुर हा गांव म्हाळसाबाई शिंदे. चौंडीकर यांजकडे संसाराचे बेगमीकरितां खेरीज मोकासा, सरदेशमुखी बाबती, हक्कदार, इनामदार, उभामार्ग करून बाकी अंमल दरोबस्त करार करून दिला आहे. त्याच्या भोगवटिच्या सनदा पेशजी अलाहिदा करून दिल्या आहेत तरी मौजे मजकुर जल, तरु, पाषाण, निधी, निक्षेप आदि-करून चिरंजीव राजश्री गोविंदराव शिंदे पाटील चौंडीकर यांजकडे चालविणे. दिक्कत न करणे. ह्याचप्रमाणें मौजे खिरडी प्रगणे शेवगांव हा गांव लक्ष्मणराव शिंदे पाटील चौंडीकर ह्यांना द्रौपदीबाई शिंदे चौंडीकर यांचे संसाराचे बेगमीसाठीं दिला आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 313 15-4-1773 A.D.

The Kamavisdar of Shevgaon is ordered by Abilyabai : (1) Mauza Khambpimpari is assigned to Mhalsabai Shinde Choundikar for family maintenance. Govindrao Shinde Patil Choundikar will manage it. (ii) Mauza Khirdi is assigned to Draupadabai Shinde Chaundikar similarly-Laxmanrao Shinde Choundikar will manage it. (These Shindes were related to Ahilyabai by her father's side.)

---

**अ. नं. ३१४** **श्री**

ता. १२ मे, इसवी सन १७७३

रोजकीर्द ११८२ फसली. ११७३ आर्बी. मा. अहिल्याबाई.

महादजी थिटे केदूरकर यांजपासून कैलासवासी तीर्थरूप सुभेदार यांनीं घोडीं खरेदीकरितां कर्जाऊ ऐवज घेतला होता. त्यास थिटे मजकुर मृत्यू पावले. हल्लीं त्यांचा नातू राणोजी थिटा महेश्वरचे मुक्कामीं खत घेऊन आला. त्याचा फडशा करून देणें म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 314 12-5-1773 A.D.

Memo : By Ahilyabai. The late Subhedar Malharjee had borrowed money for purchasing horses from, and passed a bond to, Mahadajee Thete Kendurkar. The said Thete is no more. His grandson has produced the bond. His account should be settled.

---

अ. नं. ३१५ **श्री**

ता. १३ जानेवारी, इसवी सन १७७४

राजश्री खंडो सदाशिव कमाविसदार प्रगणे बरडावदा निस्बत राजश्री अप्पाजीराम यांस पत्र एकाच तारखेचे व एकाच मजकुराचे श्रीमंत मा. अहिल्याबाई व तुकोजीराव यांजकडून.

साल मजकुरीं सरकारांतून कर्जपट्टीचा ठराव केला पाहिजे याजकरितां हें पत्र सादर केलें असे. तरी तुम्ही पत्र पावेल ते घडीस स्वार होऊन जलद हुजूर येणें. एक क्षणाचा विलंब न करणें. जाणिजे. चंद्र २९ जिल्काद बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 315 13-1-1774 A.D.

The Kamavisdar of Pargana Bardawada is ordered to start for Maheshwar immediately to settle the contribution amount to be decided by the Government for current year.

---

अ. नं. ३१६ **श्री**

ता. १७ एप्रिल, इसवी सन १७७४

राजश्री इंद्रमल नारायण गोसावी यांस स्नेहांकित हरकुबाई होळकर दंडवत सुरूसन अर्बासबैनमयावआलफ. परगणे बरडावदा येथील कर्जपट्टीचे ऐवजाचा ठराव होऊन आम्हांस साहुकारी हवाला दिला. तरी तुम्हीं हे पत्र पावल्यादिवसापावेतों आपलेकडे वासलात जाहली असेल ते जमीदारांचे दस्तकानिसीं करून घेऊन तुम्ही उठोन येणें. हे पत्र पावतांच राजश्री अप्पाजीराम (पळसीकर) यांचा अमल दाखल करणें. रोकड, गल्ला, घेतला असेल तो वासलातीत करणें. याखेरीज पांघरूण, चिरगूट वस्तभाव कांहीं असेल ते माघारी देणें. दुसरें पत्राचा उजर न करणें. बहुत काय लिहिणें छ ५ सफर. मोहर हरकुबाईची.

**पळसी रेकॉर्ड**

No. 316 17-4-1774 A.D.

Harkubai Holkar orders Indramal Narayan : The debt-account is settled with Appajeeram Palshikar, you should, therefore, hand over the charge to his assignees or officers. Whatever-corn, coin or cloth that might have been received by you should now be returned.

---

**अ. नं. ३१७** **श्री**

ता. १९ जून, इसवी सन १७७४

रोजकीर्द छ. ९ रविलाखर ११७५ आर्बी ता.१९ जून इ. स. १७७४ मुक्काम महेश्वर.

रा. सदाशिव रामचंद्र व आबाजी महादेव शिंदे यांचा हर्षामर्श व लढा होता. तो निवारण होऊन श्रीमंतांचे कूच होऊन आगाडीची पिछाडी झाली.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 317 19-6-1774 A.D.

Sadashiv Ramchandra and Abajee Mahadeo Shinde were at sixes and sevens Ahilyabai brought about reconciliation, and the army has resumed march.

---

**अ. नं. ३१८** **श्री**

ता. ९ सप्टेंबर, इसवी सन १७७४

राजश्री चिंतो नारायण कमाविसदार प्रगणे चांदवड यांस स्नेहांकित तुकोजी होळकर देशमुख प्रगणे मजकुर. श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडे खर्चाकरितां सरकारांतून पंधराची वरात परगणे मजकुर ऐवजीं तुम्हांवर दिली असतां त्या ऐवजास नाना प्रकारच्या दिक्कती केल्या, करितां; म्हणून सरकारांत बोभाट आला यावरून तुम्हांस काय म्हणावे ? सांप्रत हें पत्र सादर केलें असे तरी अतःपर लटकी दिक्कत न करितां पहिले वरातेप्रमाणें ऐवज साल-मजकुर ऐवजीं श्रीमंतांकडील कारकून आले आहेत त्यांस देऊन पावती घेणें. पुनः बोभाट येऊं न देणें. जाणिजे छ २ रजब बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकार्ड**

No. 318 9-9-1774 A.D.

The Kamavisdar of Chandwad is taken to task by Tukojee for not honouring the note of payment in favour of Dadasaheb Pashwa. He is now asked to pay the amount to the clerks of the Peshwa.

---

**अ. नं. ३१९** **श्री**

ता. २०-९-१७७४

सुभा राजश्री तुकोजी होळकर छ.१३ रजब खमस ऊर्फ भाद्रपद मुक्काम इंदूर सन

११८४ दफाते : विष्णु महादेव गद्रे यांचें नांवें सनद कीं तुम्हीं सरकार पदरचे आणि सरकार चाकरीचे माणुस जाणून परगणे सेवगांव येथील मौजे दहीगांव वगैरे गांव दहा हजाराचे वसूली खेरीज हक्कदार, इनामदार, मोकासा, सरदेशमुखी व बाबी करून बाकी अंमलदरोबस्त सरकारातून तुम्हांस इनाम दिला असे. तरी तुम्हीं साल मजकुर पासून मौजे मजकुरीं अंमल करून अनुभव घेणें. म्हणून सनद.

ही सनद स्वारींत रुबरू रेवा दक्षणभाग प्रांत नेमाड येथें छ.६ जमादिलाखर ऊर्फ श्रावण शुद्ध ८ स दिली.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 319 20-9-1774 A.D.

Sanad is granted to Vishnu Mahadeo Gadre to the effect. "Taking into consideration your relations with, and services to, the Government, villages of ten thousand annual income are assigned to you in Pargana Sevgaon."

---

**अ. नं. ३२०** **श्री**

ता. २९ नोव्हेंबर, इसवी सन १७७४

अहिल्याबाईंचे चिंतो नारायण कमाविसदार चांदवड यांस पत्र छ २४ रमजान ११७५.

श्रीमंतांचे स्वारीसमागमें चिरंजीव तुकबा आहेत. देशीं चंदी वगैरे गल्ला लागेल याजकरिता तूर्त देशीं गल्ला सवंग आहे. तरी सरकार निरख चौकशी करून हंगामशिर घेणें. हरभरे रु.२००० व बाजरी ३००० व गहू १००० एकूण ६००० तुम्हांकडून देविले असें. सदरहू रुपये प्रगणे मजकुरचे हिशेबीं मुजरा दिले जातील.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 320 29-11-1774 A.D.

Ahilyabai writes to the Kamavisdar of Chandwad : Tukojirao is with the army of the Peshwa. The army will require grain. It is cheap on your side. Gram of Rs. 2,000/- Bajree of Rs. 3,000/-, and wheat of Rs. 1,000/0- should be purchased in their proper season.

---

**अ. नं. ३२१** **श्री**

ता.२१ डिसेंबर, इसवी सन १७७४

राजश्री राघो रणछोड गोसावी यांसी. स्नेहांकित तुकोजी होळकर दंडवत सुरूसन खमससबैनमयावअलफ. तुम्हांस तीर्थरूप मातुश्री बाईसाहेबांनीं पागासहवर्तमान मेवाड प्रांतीं पाठविलें. त्यास आडीच मास झालें. पुन्हा पत्र देखील न पाठविलें याजवरून तुम्हास काय म्हणावे? अशीच सावधानी कराल कीं काय? अस्तु. अतःपर तेथील वर्तमान कसें असेंल ते तपशीलवार लिहून पाठविणें. दुसरें श्रीमंत राजश्री दादासाहेबांचे मसलतीचा प्रकार तरी इंदुरीं करार केला होता, त्याप्रमाणें पुरंदराकडील कारभारी यांनीं अंमलात आणलें. परंतु श्रीमंतांचे मर्जीस न आलें त्यामुळें एकाएकी कूच करून माळव्यांत येऊन पावले. आम्हांसही मुलखाचे संरक्षणार्थ येणें प्राप्त जाणून शिंदे व आम्हीही आलों मागून पुरंदराकडील फौजा येतात. त्यामुळें श्रीमंत तो दरमजलीनें झाशीचे सुमारें चालले. आमचा व शिंद्यांचा मुक्काम सागोर निगवणीनजीक आहे. पुढील प्रकार उपयोगी पाहू तसा केला जाईल. पुरंदराकडील फौज कदाचित् येऊन पावली तर तुम्हांसही दरोबस्त जमियतसुद्धा यावें लागेल. याजकरितां आगाऊ हें पत्र तुम्हास लिहिलें असे. तरी तुम्ही आपले जागा सावधानी कुल रावताची करून नाल, मुख, तंग, तोबरा करून सिद्ध असणें. दुसरें पत्र येतांच रात्रीचा दिवस करून येऊन पोहचावें लागेल. सारांश, सुस्ती न करितां फार सावधानींत रहाणें. जाणिजे. छ १७ सवाल बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 321 21-12-1774 A.D.

Subhedar Tukojirao takes Ragho Ranchhod to task for not writing a single line during two months and a half after his being despacthed to Mewad. Breach between Dadasaheb Peshwa and the Poona Court. The former comes up to Malwa; Probability of the Poona armies pursuing him. In that case Ragho Ranchhod must be all ready and well-equipped. He is so warned.

---

**अ. नं. ३२२** **श्री**

ता. २३ डिसेंबर, इसवी सन १७७४

दुसरें पत्र ता. २३ डिसेंबर इ. स. १७७४ दोन दिवसांनीच रवाना झालें कीं अगोदर पत्र पाठविलें त्याप्रमाणें तयारी केली असेलच. प्रस्तुत पुरंदराकडील फौज सज्ज होऊन रा. हरीपंत फडके आले. याप्रसंगीं जमियतीचें काम येऊन पडलें. कोण रंग

कसा पडतो याची शाश्वती नाही. तरी तुम्ही हे पत्र पावतांच राऊताची जमियत घेऊन आम्हापाशी येऊन सामील होणें. रात्रीचा दिवस करून येणें. कोणीही राऊत तेथें राहूं नये. छ.१९ सवाल मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 322 — 23-12-1774 A.D.

More or less supplementary to the above. Ragho Ranchhod is asked to start immediately as the Poona army led by Phadke has already come.

---

**अ. नं. ३२३** — **श्री**

ता. ५ जानेवारी, इसवी सन १७७५

श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांच्या सेवेसीं. आज्ञाधारक राघो रणछोड कृतानेक आशीर्वाद विज्ञापना छ.२ जिल्काद मुक्काम निंबाहेडा येथें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. बनड्याचे मुक्कामींहून श्रीमंत बाबांनीं पत्रें पाठविलीं कीं दरोबस्त पागा घेऊन रात्रीचा दिवस करून जलद येऊन पोहचणें. त्यावरून रांगड्यांची लकब तो करून मकाजी गीते यांजला तेथें ठेवून, गढीचें काम सोडून दरोबस्त पागा घेऊन मर्दानियास आलो. तों साहेबांकडून कासीद पत्र घेऊन आला त्यांत तों आज्ञा इकडील बंदोबस्त करावयाची आणि त्यांनीं तर जलदी बोलाविलें. त्यास आम्ही मनसुबा कोणता करावा, हें साहेबांनीं पत्र पावतांच लिहून पाठवावें. त्यांसारखी वर्तणूक करून रहावें तर, त्यांनीं निक्षून ताकीद केली आहे. तें पत्र बजिन्स सेवेसीं पाठविलें आहे. साहेबांची मर्जी फिरून पाठवावयाची असली तर तशी आज्ञा करावी. फिरून माघारा जाऊं. श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 323 — 5-1-1775 A.D.

Ragho Ranchhod writes to Ahilyabai about the fix he finds himself in; in obedience to the letter of Tukojeerao he had marched upto Mardana: he is there ordered by Ahilyabai to look to the affairs already assigned to him; he now solicits her orders under these circumstances.

---

अ. नं. ३२४ **श्री**

ता. १ फेब्रुवारी, इसवी सन १७७५

कमाविसदार निंबाहेडा यांस अहिल्याबाईंकडून पत्र. तुम्हीं आपल्याकडील जमियत व गीते मशारनिल्हे व सरकारातील पागा पाठविल्या आहेत. त्या एकत्र करून रांगड्यांचे पारिपत्य उत्तम प्रकारें करून सिंगेश्वर गढी वगैरे गढ्या घ्यावयाच्या त्या घेऊन बंदोबस्त यथास्थित करणें. रांगड्यांचा मजकूर तो काय ? पागा वगैरे जमाव करून त्याची बातमी राखून धाव, डाव, पाहून जरब चांगली देणें. तुम्ही तेथें माहितगार असें असोन वारंवार लिहितां हें काय? अतःपर त्यांचे पारिपत्यांत कसर न ठेवितां ज्यांत मागेपुढें बखेडा न राहे तें करणें. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 324 1-2-1775 A.D.

The Kamavisdar of Nimbaheda is ordered to take every step possible to capture Singeshwar-fortress. "He is well-acquainted with local matter; he is expected to take initiative in such matters."

---

अ. नं. ३२५ **श्री**

ता. १० मार्च, इसवी सन १७७५

रा.त्रिंबक बाबुराव कमाविसदार सरकार बिजागड यांस पत्र मातोश्री अहिल्याबाई होळकर यांजकडून : सरकारांत गवत आणायाकरितां गाडे आणविले होते. त्यासी श्रीमंतांची स्वारी महेश्वर अकबरपूर येथील मार्गे गेली. त्यासमयीं धामधुमीमुळें किरसानापासून दो गाडियाचे बैल सर ८ नेले ते बैल सरकारांतून किरसानास द्यावेसे झाले. त्यावरून बैल सर ८ दर ८ प्रमाणें एकूण रुपये ६४ चौसष्ट तुम्हांकडून देविले असे. तरी सदरहू चौसष्ट रुपये प्रगणे मजकुरपैकीं किरसानास बैलाबाबद मुजरा देणें. त्याप्रमाणें हिशेबी मुजरा दिले जातील आणि किरसानाच्या पावत्या घेणें. जाणिजे. छ.७ मोहरम. बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 325 10-3-1775 A.D.

The Kamavisdar of Sarkar Bijyagad is ordered by Ahilyabai to pay Rs. 64/- for 8 bullocks to their proper owners. "The said bullocks were engaged by the Peshwa on his way by Maheshwar. Akbarpur etc., and

were not paid for. Our Government has decided to pay the amount."

---

**अ. नं. ३२६** **श्री**

ता. २९ मार्च, इसवी सन १७७५

मकाजी गीते यांचे मातोश्री अहिल्याबाईंस पत्र.छ.२६ मोहरम.

विशेष : दखनी लोकांचा भरवसा रतिमात्र न धरावा असें रांगडे म्हणतात. आम्ही चितोडास गेलो होतो. तेथें भीमसिंग, दुर्जनसिंग व संध्यागीर गोसावी हे म्हणो लागले कीं आम्हांस कित्येका गोष्टींनीं श्री. मा. (=मातोश्री) बाईसाहेबांचा भरवसा आहे. आम्ही कांहीं त्यास रतिमात्र अंतर करणार नाहीं. त्याहीं आम्हांस वचनप्रमाण केलें असें बोलून त्रिवर्गाहि सदाशिवावर हात ठेवला. त्यास आपलें पत्र त्रिवर्गांस लिहून पाठविलें पाहिजे कीं तुम्ही कोणे गोष्टीचा चित्तांत संशय न धरावा. पहिलेपासून जें वचन प्रमाण आहे तेंच आहे. आतांही शिमगी पुनवेस गेलों होतो. आतांही तेंच भाषण आहे कीं अंतर करणार नाही पण पत्र पाठवून दिलें पाहिजे म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 326 29-3-1775 A.D.

Makajee Gite writes to Ahilyabai : "Bhimsing, Durjansing and Sandhyagir Gosavi had met at Chitod and they expressed their implicit faith in you. They have now repeated their faith again. Please, therefore, write to them conforming your former word.

---

**अ. नं. ३२७** **श्री**

ता. २६ नोव्हेंबर, इसवी सन १७७५

राजश्री खंडो बाबुराव कमाविसदार परगणे इंदूर स्नेहांकित अहिल्याबाई होळकर दंडवत सुरूसन सीतसबैन मयावअलफ-पेमल्या वगैरे भिल्लांच्या रांडा पोरे धरून कसबे मजकुरीं आणून अटक केला. त्यांचे रखवालीकरितां जदीदशिबंदी आसामी २० सरकारांतून करार केला रु.५० दरमहाचा. तरी तुम्ही वीस माणसें भिल्लांच्या रांडा पोरे महाल मजकुरीं राहतील तों पावेतों, ठेवून सदरहू ऐवज दरमहाचे दरमहा देऊन पावत्या घेणे. सरकार हिशेबीं मजरा पडतील. भिल्लांचीं माणसें कैदेंत आहेत त्यांची हजेरी घेऊन दरमाणसी शेरभर कैली

ज्वारी राहतील तोपावेतों देणें. हिशेब मनास आणून मजरा पडेल. जाणिजे छ.२ सवाल बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 327 26-11-1775 A.D.

The Kamavisdar of Indore is ordered by Ahilyabai- "Bhills are put into jail. Twenty police men are engaged. Pay them Rs. 50/- per mensum. The Bhils should be daily fed on one seer of Jawari per soul.

---

**अ. नं. ३२८** **श्री**

इ. स. १७७५

अहिल्याबाईंचे पत्र आप्पाजीराम पळसीकरास चंद्र १८ जिल्काद. तुम्ही पत्र पाठविलें ते पावले. आम्ही महेश्वरीं येणार याजकरितां किल्ले सेंधवे येथें राजश्री संताजी होळकर यांसी लिहून मार्गाचा बंदोबस्त करावा म्हणून लिहिलें ते कळलें. ऐसियासी चिरंजीव राजश्री संताजी होळकर व राजश्री मणीराम नागनाथ कमाविसदार प्रगणे थालनेर यांस लिहून पाठविलें असे. तुम्हीं थालनेरी आलियावरी मशारनिल्हे घाटांची खबरदारी घेतील. रवाना चंद्र १८ जिल्काद बहुत काय लिहिणें. हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 328 1775 A.D.

Ahilyabai writes to Appajee Ram Palshikar : Santajee Holkar of Sendhwa and Maniram Naganath of Thalner will take care of the ghats and the roads when Palshikar will be on his way to Maheshwar.

---

**अ. नं. ३२९** **श्री**

इ. स. १७७५

इंदूर उदेपुरा. राजश्री वाघमारे जावई यांचे वाड्यांतील बावडीवर

शिलालेख

संमत १८३१ सन ११८२ माह शुद ३ राजश्री बाबुरावजी वाघमारे श्रीमंत

सुभेदार साहेब मल्हारजी होळकर के जवाई. १ बावडी बधाई तीसकु रुपये लगे ५२०० अंके पांच हजार दोसौ. मजूरी कीसी कीं रखी नही दामेदाम भर दिये. कारीगर बुलदेवजी.

No. 329

Well built by Baburao Waghmare on 14-12-1775 A.D. at a cost of Rupees 5200/-

---

**अ. नं. ३३०** **श्री**

ता. ६ जानेवारी, इसवी सन १७७६

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसी स्नेहांकित तुकोजीराव होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीये लिहित जाणें विशेष. प्रस्तूत आपल्याकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी सविस्तरीं लिहीत जावें. देशीं यावयाकरितां आपण पांचसात पत्रें पाठविलीं ऐसियास तजवीज करून फौज रवाना केली. आपल्या लक्षात अंतर केलें नाहीं. अतःपर स्वार होऊन यावें तर मुहूर्तामुळें आठ चार रोज गुंता अधिक जाला. पौष वद्य १० सह ११ भौमवारीं मुहूर्त निश्चय केला आहे. राजश्री महादजी शिंदे यांजकडेही आम्ही आपले गृहस्थास पाठवून त्यांनीही क्षेपनिक्षेप निघावें ऐसें करारांत आणलें. त्याप्रमाणें स्वार होऊन येतों. इकडील गडबडीमुळें आजपर्यंत दिवस गेले. नाहींतर पूर्वीच भेटी जाहली असती. तूर्त काम पुरते करून यावें ऐसा काळच नाही. तिकडे फौजेच्या रवानग्या जाल्यावर दिवसगत लागणार नाहीं. समय साधणें यांत सर्व आहे. मसलतीची काळजी इत्यादि विचार पाहतां एक आम्ही आपल्या लक्षास जपून स्वामीसेवेसीं अनुरक्त राहिलों. तूर्त आपल्या लिहिल्याप्रमाणें अविलंब येतों. वडिलांनीं सेवा एकनिष्ठेनें केली आणि आपला स्नेह वृद्धिंगत केला. त्याप्रमाणें कायावाग्मनपूर्वक दुसरा अर्थ जाणत नाहीं. या राज्याचा मोठे मेहनतीनें जथ पडून देवब्राह्मणाचा प्रतिपाळ जाहला आहे. ये कालीं सर्व प्रकारें संरक्षण होऊन यथोचित घडणें येविसी भरवंसा आपल्यास सर्व आहे. सर्वदा पत्र पाठवून संतोषवीत असावें. छ १४ जिल्काद बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती. मोर्तबसुद.

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>मल्हारजी सुत तुकोजी होळकर |

**सरकारी रेकॉर्ड**

No. 330 6-1-1776 A.D.

Tukojeerao Holkar writes to Balajipant Nana (Nana Fadnis) :

"Starting for the Deccan as desired; have sent word to Mahadajee Scindia; both will try to start immediately. This State has grown on the good-will of the master, and service on the side of the Holkars-service in the form of protection of Gods and Brahmins."

---

**अ. नं. ३३१** **श्री**

ता. २ मार्च, इसवी सन १७७६

अहिल्याबाईंकडून त्रिंबक बाबुराव कमाविसदार सरकार बिजागड यांस : चिरंजीव राजश्री धोंडिबा फणशे याचे लग्नामुळें दारूबागशाही वगैरे सामान आणावयास बरहाणपुराहून राजश्री व्यंकाजी बाबुराव यांस खर्चाकरितां तुम्हांपासून रुपये १६ घेतले. त्यास सदरहू रुपये १६ तुम्हांस सरकारांतून मुजरा पडतील.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 331 2-3-1776 A.D.

The Kamavisdar of Sarkar Bigyagad is informed by Ahilyabai that the amount of Rs. 16/- spent by him to fetch fire-works from Burhanpur (in the marriage ceremony of Dhondiba Phanse) will be paid by the Government.

---

**अ. नं. ३३२** **श्री**

ता. ३१ मार्च, इसवी सन १७७६

अहिल्याबाई होळकर यांजकडून पत्र. त्रिंबक बाबुराव कमाविसदार सरकार बिजागड यांस. हुजरात पागेकडील कल्लु निसबत सरीफ हवालदार देशीं जाताना कस्बे भिकणगांव येथें राहिले होते. त्याचे सारे रुपये चोरीस गेले तेव्हा त्याने गांवकरी यांजपासून रुपये पांचशें अठ्याण्णवाची निशा करून घेतल्यानंतर रयत हुजूर आली. मशारनिल्हेही देशींहून आला. उभयतांचा मजकूर मनास आणून व रयतीवर नजर देऊन निम्मे रुपये २९८ माघारे देवासे ठरलें. त्यापैकीं खत घेतले होते, तें माघारे देवविलें. बाकी मशारनिल्हेचे नांवेंबद्दल मुशाहिरे ऐवजी खर्ची लिहून रुपये २६५ तुम्हांकडून देविले आहेत. तरी सदरहू रुपये सरकार मजकुर ऐवजी कसबे मजकुरचे रयतीस देऊन कबज घेणे आणि कल्लूचे नांवेंबद्दल मुशाहिरे ऐवजीं खर्ची लिहिणें. सरकारांतून मुजरा दिले जातील. छ.१० सफर. बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 332 31-3-1776 A.D.

Ahilyabai writes to the Kamavisdar of Sarkar Bijyagad that half of the amount exacted from the village Bhikangaon by Kallu-an employee of the Paga will be returned as an act of mercy. The original amount was exacted by Kallu from the village in compensation for his amount stolen by some one on the way.

---

**अ. नं. ३३३** **श्री**

ता. ६ जून, इसवी सन १७७६

ताकीदपत्र अहिल्याबाई यांजकडून मामलेदार चांदवड यांस. ती. सुभेदारांनीं कोणकोणत्या प्रकारें आणून रयतेचे संगोपन केले. अतःपर गैरवाजवी उपसर्ग लागूं नये. रयतेची दिलभरी करून हरएक प्रकारें गौर करीत जाणें. फिरून बोभाट आलिया उपयोगी पडणार नाहीं व परिणाम लागणार नाहीं. जाणिजे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 333 6-6-1776 A.D.

The Mamlatdar of Chandwad is reminded of the very kind and courteous treatment offered by the Subhedar to his subjects. The Mamlatdar is warned to follow in his foot-steps.

---

**अ. नं. ३३४** **श्री**

ता. १० जून, इ. स. १७७६

अहिल्याबाईंचे तुकोजीरावांस पत्र छ. २२ रविलाखर सवासबैन मयावअलफ. चिरंजीव राजश्री तुकबास आशीर्वाद विशेष. कर्जपट्टी सरंजामे यांजकडून घेणें त्यापैकीं तुळसाजी वाघ व गोविंदरावजी बुळे व सुलतानजी लांभाते व मानाजी लांभाते व ढमढेरे यांचा निर्गम येथें करून घेतला. बाकीचा ऐवज फणसे, वाघमारे, भागवत, महाडिक, राजोळे, खटके, वगैरे यांजकडून येणें त्यांसी निकट करून ऐवज घेऊन इकडेस रवानगी करावी, म्हणून लिहिलें. ऐसियासी इकडे जाबसाल उरकणें त्याची कलमें :

१ यशवंतराव फणशांकडील दुसाला ऐवज लिहिला त्यास पेशजी कर्जपट्टीचा ठराव होऊन त्याचे समजाविशींत ऐवज देविला, बजिन्नस त्याजपाशी पत्रक आहे. तेथें आल्यावर समजून घेणें. कलम

१ वाघमारे यांजकडील दुसाला जाबसाल राहिला आहे. तेही देशीं येत आहेत. बोलतील.

१ गंगाजी भागवताकडीलही दुसाला जाबसाल घेणें. तेही देशीं येतात. जाबसाल करणें तैसा करतील.

१ व्यंकटराव नलगे चिरंजीव राजश्री बापू होळकर यांजकडून आले. देशीं येत आहेत तेथें बोलवतील.

१ मानाजी लांभाते तिकडेच आहेत.

१ नारायणजी बारगळ देशींच आहेत.

....

६

बाकी महाडिक, राजोळे, खटके, वगैरे राहिले त्यांजला ताकीद करावयाची ती केली आहे. जाबसाल ठरेल तैसा मागाहून लिहून पाठवूं.

एकूण कलमें जहागीरीबद्दल आहेत. मनन केल्यावर कळेल.

१ दाहक पट्टीच्या कामाकरितां कारकून पाठविले आहेत. त्यांजला ताकीद करून माळवे प्रांतीं रवाना करावे म्हणून लिहिलें. त्यास कारकून येथें आल्यावर त्यांजला ठेवून घेऊन मुजरद काशीद जोडीबराबर तुम्हांकडे पत्रें लिहून पाठवूं, म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 334 10-6-1776 A.D.

Ahilyabai's detailed reply to Tukojirao Holkar when the latter insisted that the Saranjami Sardars should be advised to participate in "Diwan Deni" extra though it was over and above their proper dues.

---

**अ. नं. ३३५** **श्री**

ता. १० जून, इ. स. १७७६

अहिल्याबाई यांजकडून तुकोजी होळकरांस पत्र. पुणें सरकारचे दिवाण देणें शिंद्यांनीं दिल्यावर मग आम्ही देऊं या सबबीवर तुम्हांस टाळता आलें असतें पण तोही अर्थ न पाहिला. ऐवज दिला तो काय समजोन दिला हें नकळे. असो. पहिल्यापासोन

कै. ती. सुभेदार श्रीमंतांच्या दौलतीस आणि आपले नक्षास कोणे प्रकारे जपत होते हें ध्यानांत धरून त्या धोरणाप्रमाणें पुढें घडावें हें लक्षांत धरणें उचित आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 335 10-6-1776 A.D.

Ahilyabai writes to Tukojee Rao Holkar : You could have, all decently and conveniently, delayed payment of Diwan Dene after Scindia had paid it. You should always follow the policy of the late Subhedar Malharjee in upholding the interests of the master, and preserving one's own prestige.

---

**अ. नं. ३३६** **श्री**

ता. २० जून, इसवी सन १७७६

शके १६९८ दुर्मखनामसंवत्सरे श्रावण शुद्ध ५ ते दिवशीं राजश्री गोविंद रघुनाथ गोत्र काश्यप सूत्र हिरण्यकेशी शाखा तैतिरीय उपनाम गानू पाटील मौजे चलबस्ते तालुके संगमेश्वर प्रांत राजापूर, यांनीं कसबे महेश्वर प्रांत नेमाड येथील मुक्कामीं विनंती केली कीं आम्ही कुटुंबवत्सल पुरातन या राज्यातील सेवक सरकारची सेवा बहुत दिवस केली यास्तव कृपाळू होऊन एक गांव आम्हांस खर्चाचे बेगमीस इनाम करून दिला पाहिजे. त्याजवरून मनास आणितां मशारनिल्हे पुरातन सेवक सेवा एकनिष्ठपणें फार दिवस केली. यांचे चालविणें आवश्यक जाणोन मौजे बांगरदा प्रगणे सावेर हा गांव खेरीज हक्कदार व इनामदार करून, बाकी अंमल दरोबस्त थलमोड व थलभरीत, कुलबाब, सुद्धां पंत मशारनिल्हे यांस संसाराचे बेगमीस साल मजकुरापासोन इनाम करून देऊन ही सनद सादर केली असे. तरी मौजे मजकुर खेरीज हक्कदार इनामदार करून बाकी अंमल दरोबस्त थलमोड व थलभरीत कुलबाब सुद्धां मशारनिल्हेस दुमाला करून देऊन चालविणें. प्रतिवर्षी नवीन पत्राचा अक्षेप न करितां या पत्राची प्रती लिहून घेऊन हें अस्सल पत्र पंत मशारनिल्हेस भोगवटीयास परतोन माघारे देणें. पत्रें शिक्क्याचीं येणेंप्रमाणें.

१ वर्तमान भावी कमाविसदार प्रगणे सावेर.

१ पंत मशारनिल्हेस नांवें पत्र.

१ जमीदार प्रगणे सावेर यांस पत्र.

१ मौजे मजकुरचे मोकदमास सदरहू अन्वयें.

....

एकूण चार पत्रें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 336 20-6-1776 A.D.

Sanad granting the village Bangarda to Govind Raghunath Ganu for family-maintenance.

---

**अ. नं. ३३७** **श्री**

ता. २९ जून, इसवी सन १७७६

सुभा राजश्री तुकोजी होळकर रोजकीर्द पैकीं : मगनीराम नागनाथ कमाविसदार सेवगांव यांस कीं, मौजे वडेल प्रमाणें मजकुर हा गांव सरकारांतून भवानी रणछोड यांजकडे इनाम करून दिला. तेथील बाबती सरदेशमुखी रुपये २०० सालिना सरकारांत घ्यावयाचा करार करून बाकी अंमल खेरीज मोकासा मशारनिल्हेकडे दिला असतां, ऐवज जास्ती येतो वास्तव तुम्ही दिक्कत करितां म्हणोन विदित झाले. त्यावरून तुम्हांस लिहिलें जातें कीं, सरकारातून दोनशें रुपये घेणेंचा करार करून सनद करून दिली : त्याप्रमाणें ऐवज सरकारांत घेत जाणें. जास्ती उपसर्ग देऊं नये. उपयोगी पडणार नाही. जाणिजे. छ. १२ जमादिलावल बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद :

**सरकारी रेकॉर्ड**

No. 337 29-6-1776 A.D.

The Kamavisdar of Pargana Sevgaon is ordered by Tukojeerao Holkar that Bhawani Shankar should not be pressed to pay more than the amount settled by Government (Rs. 200/-) as Sardeshmukhee for Mouza Vadel: the plea of surplus amount shall not be justifiable.

---

**अ. नं. ३३८** **श्री**

ता. १८ जुलाई, इसवी सन १७७६

चिरंजीव राजश्री तुकबास प्रती अहिल्याबाई होळकर आशीर्वाद उपरि येथील कुशल. जाणोन स्वकीये लिहित जाणें विशेष. तुम्हांकडोन राजश्री आप्पाजीराम व पाराशर दादाजी आले त्यांनीं तिकडील साद्यंत निवेदन केले. त्यातील अर्थ आम्ही देशीं आल्यावर स्वरूपायोग्य कोणती गोष्ट घडून न आली. पुढेंही एखादी मसलत केल्याखेरीज निरोप

न द्यावा हें कारभारी यांचे मानस आणि आपल्या स्वरूपास उचित तें करणें. त्याअर्थी मोहीम कबूल करण्यांत चांगले. मोहिमेस जमियत पैशाखेरीज होत नाही. पैशाचा पाहतां स्वदेशाच्या महालच्या रसदा घेऊन श्रीमंतांकडील भरणा केला. फौजेस ऐवज पाहिजे. त्याची तजवीज कैसी करावी हे ध्यानास आणून जास्त ऐवजाचा उपराळा होऊन प्रसंगास उपयोगी ते करावे म्हणून बोलणें. ऐसियास देशीं गेल्यावर एक एक अवडंबर येत गेलीं. तुम्ही प्रसंगीं असोन पडेल, कांहीं न घडावें हें उत्तम नाही. कैलासवासी तीर्थरूप सुभेदारांची रीत कोठेही न्यूनता ध्यानास येतांच सांगितल्याची प्रतीक्षा न करितां बंदोबस्त करीत होते. याजमुळें कोणाचाही जाबसाल सहसा होऊं न पावला. त्या धोरणास जपून कर्तव्य तें करावें उचित, परन्तु याची सावधानी अगोदर असावी तो प्रकार राहिला नाहीं. बरसात येऊन पोंहचल्यावर योजना केली. इकडील सरंजाम तोफा वगैरे बरसातींत कैसा पावाल तथापि तयारी होतच आहे. ऐवजाचा मजकुर तर पेशजी इंदूरचे मुक्कामीं समजाविशीकरितां सावकारापासोन ऐवज घेऊन त्या ऐवजीं महाल लावून दिले. त्या ऐवजाची फेड होई तोंपावेतों महालीं वरात करूं नये ऐसें असतां तुम्ही गुजराथ प्रांतींहून आल्यावर दुसरें समजाविशींचा राडा पडला. ऐवज पाहिजे तेव्हां निम्मे ऐवज साहुकारास देऊन निम्मे सरकारांत घेऊन फडशा केला. गुदस्तां तोतियाचे मसलतीमुळें फौज ठेवावी लागली. त्याजकरितां ऐवज पाठवावयाअन्वयें पत्रें निकडीचीं आलीं तेव्हांही तिगस्ताप्रमाणें तोड काढून यादी करून पाठविल्या. याप्रमाणें विष्णु महादेव याजकडील महालाचा ऐवज दरोबस्त त्याचे कर्जांत दिला. मणीराम नागनाथ याजकडील निम्मे ऐवज रदकर्ज देऊन निम्मे सरकारांत घेतला. राजश्री गोविंद रघुनाथ यांचे विद्यमानें सावकाराचा ऐवज देणें त्याजला महाल लावून दिले. त्यापैकीं चांदवड, नंदुरबार येथील रसद लावून सावकाराकडे एक रुपया न देतां दरोबस्त ऐवज घेतला. घोडीं पोषणार्थ प्रगणे थालनेरपैकीं साडेसत्तावीस हजार रुपये देविले होते. सावकार वाट पाहतच राहिले. अशा रीतीचा कारभार जाहल्यास ज्यानें पुढें होऊन ऐवज दिला, त्याचा परिणाम काय ? जो करार ठरण्यांत आला त्याप्रमाणें सर्वांसही राखावे. तरीच दौलतीत चार माणसें राहून उपयोगी पडतात. अधिक उणा प्रकार केल्यास एकवेळ झीज खाईल दुसऱ्यांदा उभा राहणार नाही. हे समजलें असोन डोळेझाक करून साल मजकुरींही ऐवज दोही महालांचा दुसाला घेतला. त्याचा मोबदला दुसरें ठिकाणीं लावून द्यावा हे तुमचे गांवीच नाही. याप्रमाणें सर्वांपासून ऐवज घेतल्यास तुम्हास अवघड पडणार नाहीं. तेहीं न केलें. असो. जितकें लिहावें तितका विस्तार मात्र आहे. दोन दोन महिने कासीद जाऊन बसले, त्याचा जाबसाल देखील येत नाही. तेव्हां लिहून साध्य काय ? कर्तव्य ते करीतच आहां. त्यांतही सारासार विचार पाहून दौलतीस चांगले परिणामीं नीट तें करावें. घडल्या गोष्टीवर दृष्टी देऊन अंगावेगळें टाकल्यास ठीक होणार नाहीं. याजकरितां साल मजकुरचे रसदेचा अजमास झाडा करून अलाहिदा पाठविला आहे तो मनन करून त्याप्रमाणें ऐवज घेऊन व्यवस्था केल्यास कोणासही

जड पडावयाचें नाहीं. सरंजामी याकडील कर्जपट्टी व महाली दहकपट्टी वगैरे ऐवज घेणें तो ऐवज निकडीचे प्रसंगास येऊन उपयोगी पडेल, हे कळतच असे सरंजामी यापासोन चाकरी घेणें नसल्यास कर्जपट्टीचा ऐवज, त्याचा अर्थ न पाहतां, निकड करून घेतल्यास चिंता नाही. चाकरी घ्यावयाची उमेद त्या अर्थी त्यांचे मनोगतच राखून कर्तव्य तें करावें लागेल. तैसाच दहकपट्टीचाही जाबसाल देशीं घेतली त्या भरंवशावर माळवे प्रांतीं घेऊ म्हणाल तर वसूल होणार नाहीं. उलटे जहागिरीच्या मात्र ऐवजास खामी पडेल. ऐसे समजोन कारकून ठेवून घेतले. पुढें हंगामशीर पाहून कर्तव्य तें केले जाईल. छ.१ जमादिलाखर बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 338 18-7-1776 A.D.

Tukojirao Holkar informs Ahilyabai, through ministers, of the sad plight he reduced to in the Deccan. Ahilyabai reminds him of the policy of the late Subhedar Malharji, and enumerates Tukojee's errors year after year in financial matters, and the awkward situation of those who stood guarantee. All other methods suggested by Tukojirao for collection of money are skillfully refuted by Ahilyabai on one or another reasonable ground.

---

**अ. नं. ३३९** **श्री**

रोजकीर्द मुक्काम महेश्वर छ.११ जमादिलाखर, ता. २८ जुलाई, इसवी सन १७७६

सारांश, रांगड्यांची समजुती पडे, आपला मतलब साधे आणि केल्या करारात पुढें अंतर न पडे, असा विचार करून श्रीमंतांकडील जाबसाल उगवून पुन्हा कोणत्या कलमाचा लढा न राहे असें पक्के करून उगवून लिहिणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 339 28-7-1776 A.D.

Instructions by Ahilyabai to the Poona ambassador : See that the Rangades are pacified, our object is accomplished and the old agreement is kept intact. With these objects in view, submit the whole matter to the Peshwa.

---

**अ. नं. ३४०** **श्री**

ता. २२-८-१७७६

रोजकीर्द सुभा राजश्री तुकोजीराव होळकर. मगनीराम नागनाथ कमाविसदार सेवगांव यांस की. वे.मू.राजश्री प्रल्हादभट बिन गंगाधरभट बडवे श्री पंढरपूर यांसी वर्षासन सरकारांतून सालिना रुपये २०० प्रमाणें सुरूसन खमसवैन व सीतसवैन दुसाला रुपये ४०० चारशें तुम्हांकडून देवविले असे. तरी सदरहू रुपये परगणे मजकुर पैकी साल मजकुर ऐवजी मशारनिल्हेस देऊन कबज घेणें. म्हणोन वरात पाठविली. त।। विठोबा पंढरपुर.कलम.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 340 22-8-1776 A.D.

The Kamavisdar of Pargana Sevgaon is ordered to pay Rs. 400/- (the amount for 2 years) to Pralhad Bhatt Badwe of Pandharpur, out of the revenue of the said Pargana.

---

**अ. नं. ३४१** **श्री**

दफाते रोजकीर्द सन ११८६, अधिक भाद्रपद, ता.२६-८-१७७६

कसबे महेश्वर येथील टाकसाळ व इंदूरचे टाकसाळेचा ऐवज रुपया चांगला पडतो. त्यास सराफ, सावकार, वगैरे बट्टा घेतात म्हणुन विदित झालें. त्यावरून हें पत्र सादर केलें असे. तरी तुम्ही येविर्सी ताकीद करून सांगणें. इतकियावर कोणीही ही हल्लीं शिक्क्यावर बट्टा घेतल्यास त्याजपासोन गुन्हेगारी घेणें. मागती बोभाट आलिया उपयोगी पडणार नाही. म्हणोन पत्रें. १ खंडो बाबुराव कमाविसदार परगणे इंदूर. १ त्रिंबक बाबुराव कमाविसदार सरकार बिजागड यांस. एकूण पत्रें २ हुजूर रा. गोविंद रघुनाथ गानू.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 341 26-8-1776 A.D.

Orders are issued to the Kamavisdars of Pargana Indore and Sarkar Bijagarh.

Rupees coined at Maheshwar and Indore are fair and fine. It is complained that Sahukars, Brokers and others accept the coin at discount. It is hereby ordered that persons charging discount on the coins will be prosecuted by the State.

---

अ. नं. ३४२ **श्री**

ता. १९-११-१७७६

अहिल्याबाई यांजकडून त्रिंबकपंत यांस पत्र चिरंजीव तुकबांनीं पांच चारवेळ खर्चाचे ओढींचा मजकुर लिहिला होता यास्तव तुम्हांकडोन तीन लक्ष रुपये चिरंजीवाकडे देविले आहेत. त्याचे खत मनोती सुद्धां तीन लक्ष पंधरा हजाराचे व सदरहू ऐवजाची वरात राजश्री मल्हार गोविंद किल्लेदार प्रगणे रामपुरा यांजवर पेस्तर साल ऐवजी दिली. ऐसीं दोन्ही पत्रें रा. अप्पाजीराम व पाराशर दादाजी यासमागमें पाठविलीं आहेत. लिहिल्याप्रमाणें चिरंजीवाकडे देणें. छ.७ सवाल बहुत काय लिहिणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 342 19-11-1776 A.D.

Payment of three Lacs to Tukojeerao through Rampura officer.

---

अ. नं. ३४३ **श्री**

इ. स. १७७६

रोजकीर्द सुभा राजश्री तुकोजी होळकर छ.१३ मोहरम मुक्काम महेश्वर माघमास सबासबेनः

पागे व लेकावळे यांजबद्दल

| पागे : | लेकावळे : |
|---|---|
| १ राघो रणछोड | १ रणछोड होळकर |
| २ तान्हाजी दिघे | २ भारमल होळकर |
| ३ तुलाजी शिंदे | ३ नवलाजी होळकर |
| ४ रामसिंग | ४ सटवाजी होळकर |
| ५ सजनाजी भगोरे | ५ येसूजी होळकर |
| ६ नथोजी कारले | ६ भवानी होळकर |
| ७ अंबोजी रायेले | ७ निंबाजी होळकर |
| ८ कालू सराफ | ८ तुकोजी होळकर |
| ९ रामाजी अघाडे | ९ खुशाल होळकर |
| १० रोडाजी होळकर | १० भिकाजी होळकर |
| | ११ धनसिंग होळकर |
| | १२ दूधबक्ष होळकर |

येणेंप्रमाणें असे :

**सरकारी रेकॉर्ड**

No. 343 1776 A.D.

List of Pagas and illegitimate offspring of the Holkars.

---

अ. नं. ३४४ श्री

रोजकीर्द, सुभा राजश्री तुकोजी होळकर, इ. स. १७७६

१ राघो बल्लाळ मुक्काम इंदूर यांस कीं संगमरवरी दगड सुनेलीस पाठवावे लागतात. यास्तव छकडे २ तोफखान्यापैकीं देविले आहेत. त्याजला चंदी ओंगण व रोजमरा नेमणूक मामलेदारावर करून पाठविली आहे. छकड्यांची रवानगी सत्वर करणें. म्हणोनः

२ खंडो अनंत सुनेलकर यांस कीं, मूर्ती करणें त्याचा नकाशा करून पाठवावा त्याप्रमाणें करून पाठवितों म्हणोन लिहिलें. ऐसियास चित्रकूट पर्वती सरकारांतून मंदिर बांधले व श्री रामजीच्या मूर्तीची स्थापना करायची यास्तव मूर्ती सुरेखशा असणें म्हणोन ः

**सरकारी रेकॉर्ड**

No. 344 1776 A.D.

Information about the idol of Shree Ramjee installed in the temple build on the Chitrakuta Hill.

---

अ. नं. ३४५ श्री

**कागजात सनदे कुंभेर**

सन ११०० शाह आलम
बादशा गाजी जंगखा
बहादूर इतेखार दौला
महंमद सुलेमां.

बइसम राहदारां व चौकीदारा व गुजरनाना बरायेतिवारी छत्री खंडेराव मरेठे के बइल्लत महसूल राहदारी वगैरा मे मुजाहमन होना वगैरे (फारसीमे परवाना)....... इ. स. १७७६ साल का परवाना है.

No. 345 Chhatri of Khanderao Maharaja Holkar.

Public Notice : No excise-charge etc. should be levied in connection with the Chhatri of Khanderao Maharaja Holkar.

---

अ. नं. ३४६

श्री

इ. स. १७७६-७७

यादी जहागीर होळकर व शिंदे यांजकडे महाल दिले ते येणेंप्रमाणें. हिंदुस्थान मुलूख सरकरूम सुरूसन सबासितेनमयावअलफ सुमारी फसली सन ११८६ अरबी सन ११७७ चे साली दिले.

| | होळकर | | | शिंदे |
|---|---|---|---|---|
| २००००० | परगणे | इंदूर १ | ३००००० | उज्जेन महाल १ |
| १००००० | ” | तराणे २ | ३००००० | खाचरोद महाल २ |
| १२५००० | ” | देपालपूर ३ | ३००००० | नवलाइ महाल ३ |
| ७५००० | ” | पिढावाकोठडी ४ | १००००० | रतलाम ४ |
| ३००००० | ” | रामपुरा ५ | ३४०००० | आमझरें ५ |
| ७०००० | ” | देवळे महालसुद्धां ६ | ३००००० | मंदसोर ६ |
| ४०००० | ” | महेश्वर ७ | १००००० | कयामपूर उज्जेनीजवळ ७ |
| ६०००० | ” | गांगरूणी ८ | ५०००० | उन्हेल ८ |
| २५००० | ” | कायथे ९ | ५४००० | पान बिहार ९ |
| १००००० | ” | मल्हारगड १० | ३६०००० | बडोद वगैरे महाल १० |
| २००००० | ” | महतपूर ११ | १५४००० | शहाजापुर ११ |
| ७५००० | ” | जावरा १२ | ८००००० | राजगड खिलचीपूर १२ |
| ३०००० | ” | पिंपळोदे १३ | ५४००० | नेवरी भवरासा १३ |
| ३०००० | ” | बेटमे १४ | ३७००० | झालोर बडोदे १४ |
| २००० | ” | काटकुट १५ | ६४००० | सोनकच १५ |
| १०००० | ” | नेमावर १६ | ४०००० | टोके १६ |
| ७००० | ” | हासलपूर १७ | ३४००० | धरगांव १७ |
| २००० | ” | आंबे १८ | ८००० | वाघबारे १८ |
| ५००० | ” | सुंदरसी १९ | १२००० | नेमावर १९ |
| ३०००० | ” | आबेर २० | २२००० | निमेमोराहसोद २० |
| १५००० | ” | संधारा २१ | ६०००० | पाटणकेशवराय २१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०००० | ” | रायपूर २२ | १५००० | गांगली २२ |
| ५००० | ” | करहाई २३ | ४२००० | दाऊद २३ |
| ६५००० | ” | पाटण २४ | ४०००० | सागोर दिगठाण २४ |
| ३००० | ” | पाटणकेशवराय २५ | १५००० | पुनासे सिकरी २५ |
| १५०००० | ” | सिरोंज २६ | १००००० | पावागड २६ |
| ७५००० | ” | सावेर २७ | ४०००० | बडवाय २७ |
| ६०००० | ” | झाबवे महालसुद्धां २८ | १००००० | आजमेर २८ |
| ३५००० | ” | कोठडा २९ | ............. | |
| ५००० | ” | लवाणी ३० | २८००००० | |
| १०००० | ” | टोकरामपुरा ३१ | | |
| ............... | | | | |
| २०,००००० | | | | |

सदरहू जहागीर महाल, मुलुख सरकरून आले ते वेळेस दिले. होळकराकडे आकार रु.२०,००००० वीस लक्ष व शिंदे यांजकडे आकार रु.२८,००००० अठ्ठावीस लक्ष एकूण दोन्ही सरदारांस जहागीर अठ्ठेचाळीस लक्ष असे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 346 1776-1777 A.D.

The complete list of the Parganas granted to Holkar and Scindia (old as well as new) after the recent campaign of Northern India.

---

**अ. नं. ३४७** **श्री**

इ. स. १७७६

यादी : राजश्री गोविंदराव बुळे, हिंदुस्थानचे स्वारींतून आल्यादिवसापासोन कराराप्रमाणें स्वारांनिशी चाकरीस न आले. मागील सातासाला स्वारींतील व अलीकडील आर्बासैबन पासोन सीतसबैन पावेतों तीन सालाचे, दहासाला हिशेब येणें. याजकरितां हुजूर यावयाकरितां पत्रें बहुत गेलीं. तेव्हां भागूबाई व राणूबाई लांभाते आली. त्यांचें बोलणें जाहल्यावर त्यांनीं यावें तेहीं न घडलें. तेव्हां सरकारांतून महालची जप्ती करून सदाशिवराम निसबत कोकरे व कली निसबत सरीफ यांजला पाठविले. ऐसा करार होऊन सनदा तैयार झाल्या तेव्हां भागूबाई बुळे यांनीं महिन्याचा करार करून सरकारांत कागद लिहून देऊन जप्ती तहकूब करून राणूबाईस जाबदेस पाठविलें. मशारनिल्हेस महेश्वरीं घेऊन आल्यावर सरदारीचे बंदोबस्ता विषयींचे जाबसाल येणेंप्रमाणें. सुरूसन

सबासबैनमयावअलफ. सन ११८६ छ.१९ माहे रविलाखर मुक्काम महेश्वर कलम येणें प्रमाणें :

१ मागील हिशेब राजश्री कृष्णाजी मुरार यांचे दिवाणगिरी पासून सु.सबासितैन तागाइत सलाससबैन पावेतों सातसाला येणे तो सरकारांतून आणविला त्याचा जाबसाल मशारनिल्हेनीं केला कीं, राजश्री महिपतराव मुरार व व्यंकोजी गोपाळ निसबत गोविंद बाजीराव फडणीस जाबदेहून महेश्वरास येतांना नेवलीचे घाटींत लुटले गेले तेव्हा हिशेबही गेला. मागील सावकाराचें कर्ज देणें त्याचा बंदोबस्त सरकारांतून ठेरावून घ्यावा. त्याप्रमाणें निकाल काढून चाकरी करूं. येविसीं भवती न भवतीचे जाबसाल उघड जाहले. शेवटीं सरदारीचा बंदोबस्त राखणें, तेव्हां कर्जाचा निकाल काढावासा ठरला तेव्हां त्यांजकडून सावकाराचे देण्याची याद आणविली त्याची बेरीज बरहुकुमयाद रुपये ५१८८८५ पैकीं वजा रुपये –

१३६६४२ महाल संबंधीं मामलेदारांकडील फाजील देणें रु.१२००० बाकी ऐवज महाली तोड काढून फडशा करावा.

१४१०७५ मागील कर्ज देणें.

...............

२७७७१७

बाकी २४११६८ रुपये.

पैकीं वसूल पावला त्याचा तपशील यादीस असे. बेरीज रुपये ९८८८३

पैकीं महालचे फाजील ऐवजांत वजा केले. सबब रु. १२०००

बाकी वसूल ८६८८३ रुपये.

बाकी देणें १५४२८५ रुपये.

२१००० मगनीराम नागनाथ व दलपतगीर गोसावी. २६४०३ आप्पाजी उदाराम कुकडेश्वरकर, ४०० रामनारायण शालीग्राम, १०९६२ रामेश्वर नाईक, १०००० खेतसी करमसी, १५००० सदाशिव रघुनाथ, ४४८११ तिमाजी नाईक, २२००० कुबेर सेठ, १७२२ ठाणे जाहुर, १०७ जेतकर्ण, १८८० संपतवाणी.

एकूण एक लक्ष चोपन्न हजार दोनशें पंचायशीं.

पैकीं कुबेर सेठ दुलभ सेठ सावकार याजला परगणे पाटण ऐवजीं खत करून देविलें त्याजला ताकीद करून ऐवज देववावा. सबब वजा रु.२२००० बाकी निव्वळ देणें रु.१३२२८५ एकलक्ष बत्तीस हजार दोनशें पंचाऐंशीं. तीन साल अलीकडील हिशेब पाहून त्यांत बाकी जे निघेल ते वजा घालून बाकी ऐवज राहील त्याचा तोड पाडून द्यावा. पांच सालांत फडशा करावा. याप्रमाणें करार.

१ अलीकडील हिशेब तीनसाला आनंदराव बजाजी परभू यांचे दिवाणगिरीपासून सरकारातून आणविला. हिशेब दो महिन्यांत दाखविण्याचा करार. कलम

१ पुढील बंदोबस्ताविशीं विनंती मशारनिल्हेनीं केली त्याजवरून सरकारांतून तोड येणेप्रमाणें मशारनिल्हेकडे पागेच्या सरंजामास महाल त्याची जमा आकार, सालिना. रु. १९५८००

| | |
|---|---|
| ८०००० | परगणे पाटण, नजीक राजगड |
| ७७००० | परगणे झाबवे, थांदले, पेटलावदसुद्धां. |
| ३०००० | परगणे कोठडे, चिलखदेसह. |
| ४००० | ठाणे जाहूर. |
| २००० | मोकासा उत्राण. |
| ६०० | लवाणीनजीक मांडव. |
| ७०० | तळेण. |
| १५०० | तालुके दही पलवाडा. |
| .............. | |
| १९५८०० | |

पैकीं वजा महाल मजकुर वगैरे.

३७५ बाबती. ३७७५ शेरी नजराणा. ३५०५० महाल मजकुर. झाबुवे, पाटण, कोठडे, उत्राण, तळेन, लवाणी, दहीपलवाडा, जाहूर यांचा आकार ३५०५०

एकूण रु. ३९२००

बाकी रुपये १५५६६००

पैकीं स्वार ठेवावे आसामी ३०० दर आसामीस रु.४०० प्रमाणें. आकार. बाकी कर्जदारास देत जावे. रु. ३६६००

ह्याप्रमाणे करार करून दिला असे.

**पेशवे रेकॉर्डवरून उतारा :**

पुरवणी : तीन सालांत हिशेबाचा फडशा होऊन सरकारचा ऐवज बाकी राहील तो कर्जाचे भरण्यांत वजा करून निखालस देणें राहील. त्याऐवजीं छत्तीस हजार सहाशें सावकारास देत जावे. पांच सालांत कर्जाचा फडशा जाल्यावर पेशजी प्रमाणें स्वार आणून चाकरी करीत जावी. याप्रमाणें करार.

१ मशारनिल्हेकडील पागा खेरीज करून सालिना खर्चाचा आजमास मनांत आणून, रु.३०९०५ कोठी, हत्ती २, सूत्रखाना, बद्दलमुशाहिरे. कारकून, जामदार, कोठवळे, देवपूजेचे ब्राह्मण, मशालची, वगैरे इतमामाप्रमाणें खर्चास वरील रक्कम तीस हजार नउशें पांच ठेवण्यांत आली आहे. म्हणोन.

No. 347 1776 A.D.

Sardar Bulye was in straitened financial position. Arrangements are made for his relief, and renovation of the estate in detail by the Holkar Government.

---

**अ. नं. ३४८** **श्री**

इ. स. १७७६-७७

| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>मल्हारजी सुत तुकोजी होळकर |
|---|

राजश्री आप्पाजीराम गोसावी यांसी स्नेहांकित तुकोजी होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जावें. विशेष प्रस्तुत तुमचे शरीरी समाधान नाही म्हणून परस्परें ऐकिलें त्यावरून राजश्री रामाजी त्रिंबक कारकून पाठविले आहेत. सविस्तरें सांगतील तरी आपले शरीर प्रकृतीची भावना कशी काय ते लिहून पाठविणें, आमचे विचारें चांगला मुलगा पाहून दत्त पुत्र जरूर घ्यावा. येविसीं अनमान न करावा. दत्त पुत्र लाभदायक होऊन पुत्रोत्पत्ती जालियास अती उत्तमच आहे संशय न घेतां लिहिलेप्रमाणें करावे. औषध उपाय चांगला करून प्रकृती चांगली होय तें करणें. हगवण राहिली म्हणजे चिंता नाहीं. श्री बरेच करील. कोणेविसीं घाबरे न व्हावे. चंद्र २७ रविलाखर बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुदः

**पळसी रेकार्ड**

No. 348 1776-1777 A.D.

Tukojeerao Holkar inquries about the health of Appajee Ram Palshikar : advises him to adopt a son.

---

**अ. नं. ३४९** **श्री**

ता. ६ जानेवारी, इसवी सन १७७७

करार श्रीमंत मातोश्री बाईसाहेबांचे सेवेसीं. बालकें गंगाजी भागवत लिहून देतों ऐसाजे की, मौजे बडीबाका परगणे जावरे हा गांव आमचे वाटणीचा व मौजे मुंडला परगणे मजकुरचाही गांव राजश्री भिकाजी खटके यांजकडील या दोन्ही गांवचा कजिया

लागला. येविसीं महाराजांनीं इंदुरींहून पत्रें राजश्री खंडोपंत बरडावदेकर यांस व राजश्री गोविंदराव महाडिक यांस लिहिलीं कीं उभयतांचा कजिया मनास आणून वाजवी असेल तें निवडून कजिया तोडून टाकणें. त्याजवरून उभयतां जो निकाल करतील तो आम्हांस मान्य असे. पांच जण पाटील मौजे नवेनगरकर कुसला पाटील व बाजी खेडकर, राजसिंग पाटील व खटक्याकडील मौजे खोजनखेडकर हिरा पाटील व मौजे पिंपळेकर पीथा पाटील, हे जे ठराव करतील ते आम्हास मान्य आसे. यात जो जवदिगर करील तो महाराजांचा गुन्हेगार समजला जाईल. हें लिहून दिलें. सही. मिती मार्गशीर्ष वद्य १२ शके १६९८ दुर्मुखनाम संवत्छरे इंदुवासर संवत् १८३३ हस्ताक्षर सखाराम विठ्ठल निसबत गंगाजी भागवत :

साक्ष :

१ जमीदार दवलतसिंग.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 349 6-1-1777 A.D.

Agreement paper by Gangajee Bhagwat to Ahilyabai : Please appoint 5 Judges (named in the paper). Their decision on the dispute between Bhikajee Khatke and myself will be respected by me.

---

**अ. नं. ३५०** **श्री**

ता. २९ जानेवारी, इसवी सन १७७७

अहिल्याबाईंचे महादजी शिंदे ह्यांस पत्र छ १९ जिल्हेज ११७७ अर्बी. तुम्ही लिहिल्यावरून दुतर्फाचा जिम्मा आम्ही आपल्याकडे घेतला आहे. त्याप्रमाणें निभावून घ्यावें. त्यांचे (उदेपूर) राज्यांतील बंदोबस्ताचा अर्थ, चिरंजीव तुकबा व तुम्हीं देशींहून आल्यावर घडून घ्यावा आणि आपल्याकडील कराराप्रमाणें गुंता उरकोन घ्यावा.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 350 29-1-1777 A.D.

Ahilyabai, writes to Mahadajee Scindia : Agreeing with your letter we accept the responsibility of both the parties. The Udaipur affairs should be settled according to our former agreement after you both (yourself and Tukojirao) return from the Deccan.

---

**अ. नं. ३५१** **श्री**

ता. १९ जुलाई, इसवी सन १७७७

गंगाजलनिर्मळ मातुश्री अहिल्याबाई होळकर यांसी स्नेहांकित बाळाजी जनार्दन आशीर्वाद. विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जावें विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावले. लिहिलें सविस्तर कळलें. आम्हांकडील कारभाराचे जाबसाल बहुत बोलतात. त्यांचीं उत्तरे, तसेंच करीत जावें. अंतःकरणाचें बोलणें राजश्री शिवाजी गोपाळ यांजजवळ बोलत जावें. हे येथें लिहितील. येथून लिहिणें तें त्यांस लिंहू, म्हणोन लिहिले तें कळलें. फार उत्तम आहे. हल्ली आपल्या लिहिण्याचे भाव सर्व मशारनिल्हेनीं सांगितलें. त्यावरून साद्यंत ध्यानांत आलें. खातरजमा झाली, कोणेंविसीं संशय राहिला नाहीं. इकडून सांगणें तें मशारनिल्हेजवळ सांगितलें आहे. हे लिहितील त्यावरून कळेल. पहिलेपासून घरोबा आहे तोच आहे. दुसरा प्रकार नाहीं. वरचेवर लिहीत जावें. सरकार उपयोगी लक्ष एकरूप असावें. आपणाकडील खातरजमा हे राजश्री तुकबास वरचेवर लिहीत जाऊन श्रीमंतांकडील बंदोबस्त ज्यांत पुढें पेंच न पडे असें करावे. बहुत लिहिणें लोभ असों दिजे हे विनंती. रवाना छ १३ जमादिलाखर.

**सरकारी रेकार्ड**

ह्याच अर्थाचे एक पत्र राजश्री सखाराम भगवंत (बोकील) यांचे मातोश्री अहिल्याबाईंस आलेलें आहे.

No. 351 19-7-1777 A.D.

Balajee Janardan (Nana Fadnis) writes a very courteous letter to Ahilyabai expressive of his regard and confidence. Shivajee Gopal is the confidante on both the sides. The Devi is exhorted to remain keen on the interests of the Sarkar.

A letter similar in tone and matter is addressed by Sakharam Bapuji Bokil to Ahilyabai.

---

**अ. नं. ३५२** **श्री**

ता. २२-१०-१७७७

गंगाजलनिर्मळ सकुबाई (पळसीकर) यांसी प्रती : अहिल्याबाई होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणें विशेष. तुम्हीं पत्र पाठविले ते पावून लेखनार्थ अवगत जाला. घरगुती वगैरे सविस्तरेवृत्त चिरंजीव राजश्री रामराव यानें साहेबांस लिहिले आहे त्यावरून ध्यानीं आलेच असेल. आजपर्यंत साहेबीं सांभाळ केला.

पुढेंही करणार साहेबच आहे, म्हणून लिहिलें. ऐसियासी मशारनिल्हेचें पत्र अगोदर आलें होतें व हल्लीं तुमचे लिहिल्यावरूनही सविस्तरें ध्यानास आलें. पुढें तुम्हीं वडीलपणाचे रीतिनें ज्याचें त्याजपरी सर्वांस राखून आपले घरचे चालीप्रमाणें चालावें. मशारनिल्हे तुमचे आज्ञेंत राहून सरकारचाकरी आदीकरून बाहेरील प्रकारास जपावें हे उचित. तूर्त त्यांचेही पाऊल असेंच आहे. याचप्रमाणें सर्वकाळ असावें येविसीं येथूनही ल्याहावयाचे ते लिहिलें आहे आणि तुमचीही ताकीद असावी. सर्वदा पत्र पाठवून कुशलार्थ लेखन करीत जाणें रवाना चंद्र १९ रमजान बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**पळसी दप्तर**

No. 352 22-10-1777 A.D.

Sakhubai Palshikar is advised by Ahilyabai to follow the ancestral line of conduct towards family members and dependents. The adopted son is on the right path and he should be advised to serve the Sarkar as his forefathers did.

---

**अ. नं. ३५३** **श्री**

ता. २७ आक्टोबर, इसवी सन १७७७

तुकोजी होळकर यांचे अहिल्याबाईंस पत्र मिती आश्विन वद्य ११ शके १६९९ मुक्काम पुरंधर. मोठे निकडीस येऊन वरात केली आहे, तरी कोणेविषयीं संशय न घेतां ऐवज लवकर प्रविष्ट केला पाहिजे.

**सरकारी रेकार्ड**

No. 353 27-10-1777 A.D.

Tukojeerao requests Ahilyabai to honour his note as he stood in very hard circumstances.

---

**अ. नं. ३५४** **श्री**

इ. स. १७७७

यादी महालनिहाय व फुटगांव सरंजामास सुभा राजश्री श्रीमंत तुकोजीराव होळकर सुरूसन सबासबैन मयावअलफ. तेरीज एकंदर सरंजाम याचे विल्हेवार येणेंप्रमाणें: सरदारांकडे चाकरीबद्दल येणेंप्रमाणें. सन ११८६ महाल दिले बरोबरचे सरदार लोकांस सरंजामाचे

खर्चाबद्दल.

१ निसबत राजश्री गोविंदराव बुळे सरदार

७५००० परगणे पाटण, ८५००० परगणे झाबवा, ३६००० परगणे चिखलदे

..................

१,९५,००० महाल ३

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | निसबत | वाघ सरदार. प्रगणे महतपूर व प्रगणे उत्राणपैकी गांव | उत्पन्न रु. | ३,००००० |
| १ | निसबत | माधवराव वाघ सरदार. परगणे बेटमा | '' | ३०००० |
| १ | '' | नारायणजी बारगळ सरदार. परगणे बुढे ७५००० (नारायणगड) व परगणे करहई ६००० व मौजे निंबळ-रायपूरपैकीं १५००० एकूण | उत्पन्न रु. | ९६००० |
| १ | '' | लांभाते. परगणे जिरापूर, ३००००, परगणे माचलपूर ३००००, | '' | ६०००० |
| १ | '' | यशवंतराव फणसे, परगणे तराणे सरदार | '' | १,१५००० |
| १ | '' | बाबुराव वाघमारे, प्रगणे सावेर सरदार | '' | १,०४००० |
| १ | '' | आप्पाजीराम, प्रगणे बरडावद सरदार | '' | ३०००० |
| १ | '' | नारो गणेश, परगणे पंचपहाड सरदार | '' | ५०००० |
| १ | '' | भागवत व खटके, परगणे जावरे सरदार | '' | ६०००० |
| १ | '' | गोविंदराव महाडिक, परगणे पिंपळोदा | '' | ४००० |
| १ | '' | खंडोजी नलगे, परगणे रायपूर | '' | १६००० |
| १ | '' | ढमढेरे परगणे अंबर ४००००, परगणे अडावद ६००००, व मौजे दही ६०००० गांवसे | '' | १,६०००० |
| १ | '' | भागवत, तालुके बागदरा | '' | १५००० |
| १ | '' | राजोळे, माधवराव परगणे हासलपूर १२०००, परगणे जांब ३५००, परगणे हरसोले ७५००, व प्रगणे बुढेपैकीं हिस्सा रु.१०००० एकूण | '' | ३३००० |
| १ | '' | पीसे, वडगांव वगैरे | '' | ५००० |

....

१६

येणेंप्रमाणें सरंजामी सरदार, जहागिरदारांस खर्चास असे. ठराव सन ११८६ फसली साल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 354 1777 A.D.

List of Sardars, and Jagirdars of the Holkar State with their individual Saranjam in 1777 A.D.

---

**अ. नं. ३५५** **श्री**

ता. २३ मे, इसवी सन १७७८

अहिल्याबाई होळकर यांजकडून पत्र. खंडो बाबुराव कमाविसदार परगणे इंदूर यांस.

श्रीमंत सौभाग्यवती आनंदीबाई यांची स्वारी छ २३ रविलाखरीं कसबे मजकुर दाखल झाली. शुक्रवारीं सिमरोळचा मुक्काम नेमला म्हणून लिहिलें ते कळलें. ऐसियास श्रीमंत सौभाग्यवतीच्या स्वारीचे सेवेंत तुम्ही राहून सेवाचाकरीत अंतर न करणें. आटाशिधा शाकभाजी पानपत्रावळ गवत लाकडें वगैरे सरंजाम देऊन, स्वारशिबंदी बरोबर मागतील त्यासी महालची शिबंदी किती ? सरदारासमागमें पोक्त जमियत असली पाहिजे. त्याहीवर शिबंदी बाहेर निघाल्यास रांगडे लोक बखेडा करतील, असें समजावून सांगणें. जाणिजे. छ २५ रा खरब. बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 355 23-5-1778 A.D.

Ahilyabai writes to the Kamavisdar of Indore to pay respectful and hospitable attention to the needs and demands of Shreemant Saubhagyawati Anandibai (consort : Raghoba Dada Peshwa). A hint is also given that the military attendents should not be considerable, even though demanded; the party should be given to understand Rangades may, at any moment, break out if the military be not on the spot.

---

**अ. नं. ३५६** **श्री**

ता. १३ जून, इसवी सन १७७८

अहिल्याबाईंचे पत्र त्रिंबक बाबुराव कमाविसदार, सरकार बिजागड यांस. स्नेहांकित अहिल्याबाई होळकर दंडवत विशेष. सरकार मजकुर येथील मामलत तुम्हांकडून दूर करून राजश्री पांडुरंग नारायण यांजकडे पेस्तर सालच्या अव्वल सालपासून सांगितली आहे. त्यांच्या

सनदा अलाहिदा आहेत. तरी तुम्ही महालीं दखलगिरी न करितां तेथील अंमल मशारनिल्हे करतील. ठाणें मजकुरी जकीरा, दास्तान जो जिन्नस असेल तो व ठाणें मशारनिल्हेचे स्वाधीन करून कबजे घेऊन महाली बाकी व खादतगाई वगैरे असेल ते जमीदार यांचे विद्यमानें रुजू करून देणें. जाणिजे छ.१७ जमादिलावल. बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 356 13-6-1778 A.D.

Trimbak Baburao Kamavisdar of Sarkar Bijyagad is ordered by Ahilyabai to hand over the charge to Pandurang Narayan, with certain minute instructions of administration.

---

**अ. नं. ३५७** **श्री**

ता. २१ जून, इसवी सन १७७८

चिरंजीव राजश्री तुकबास प्रती अहिल्याबाई होळकर आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणें विशेष. अप्पाजीराम मृत्यू पावले याचें वर्तमान ऐकोन चित्तास परम श्रम झाले. ईश्वरगतीस उपाय कोणाचाही नाहीं. मशारनिल्हे येथें आले होते तेसमयीं त्यांजला दत्तपुत्र घ्यावयाविसीं समक्ष सांगितले होते आणि तेही त्याच तजविजींत होते; परंतु अवसर न फावल्यामुळें तेही गोष्ट तैसीच राहिली. त्यास ते पूर्वीपासोन आपल्या पदरचे, पुढें संस्थान चालले पाहिजे याजकरितां तुम्हांस लिहिले असे तर त्यांचे गोत्र पुरुषाचे लहान मूल उत्तम चांगले असेल ते त्यांजकडून आणवून दत्तविधान करवून संस्थान पूर्ववत्प्रमाणें चालेल तें करावे. रवाना चंद्र १६ जमादिलावल. बहुत काय लिहिणें हा आशीर्वाद. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 357 21-6-1778 A.D.

Ahilyabai writes to Tukojeerao Holkar that she was grieved to hear the sad news of the death of Appaji Rama Palshikar. A child should be adopted in the family, and the old arrangement should be continued.

---

**अ. नं. ३५८** **श्री**

ता. २६ जून, इसवी सन १७७८

अहिल्याबाईंकडून तुकोजी होळकर यांस पत्र : आशीर्वाद उपरि प्रगणे रामपुरा येथील रसद साडेचार लाख रुपये, खेरीज हुंडी देतात. त्याप्रमाणें जुने मामलेदारांनीं कबूल केल्यास त्यांजकडे मामलत बहाल ठेवून ऐवज पाठवावा. त्याजला अनुकूल न पडल्यास दुसरें मामलेदार सिद्ध आहेत. म्हणोन लिहिलें. रामपुरा महाल थोर, चार रुपये रसद अधिक देऊं म्हणतात. त्याजवर दृष्टी देऊन, घालमेल केल्यास सरकारची नुकसानीच होईल. साल मजकुरीं येथील इंदोर चलनी ऐवज चार लाख एक्क्याण्णव हजार, खेरीज फुरोई आहे. या शिवाय इंदूर चलनाचा बट्टा वगैरे मिळोन महाली कच्चा आकार कमवेश सहा लक्ष पावेतों येईल. इतका रुपया दुसरा अनमाहित मामलेदार जाऊन आकार करील, हें घडणार नाही असें जाणोन राजश्री मल्हार गोविन्द यांसी रसदेचा जाबसाल साडेचार लाख रुपये बमय हुंडीचें राहून मामलत त्यांजकडेच करार करून सांगितली. साडेचार पैकीं कांहीं फाजिलांत ऐवज द्यावा हे त्याच्या रदबदली फार आहे आणि आपल्यास तर ऐवजाची निकड. तथापि थोडे बहूत ऐकावेंही लागेल. नव्या जुन्यासीं अंतरही फार आहे. पेशजी सुरसन खमससवैन पावेतों महेश्वर मुक्कामीं हिशेबांचे फडशे जाहले ते समयी चार लाख रुपये हिशेबाचे रुईने तोडले. त्यांनीं तितकेही कबूल केलें व मर्जी रक्षून गेले. विष्णु महादेव यांजकडील प्रगणे आंबाड येथील हिशेबाचा फडशा केला. जीं कलमें द्यावयाचीं दिली. कांहीं समजूत न पडे अशी कलमें राहिली. त्यांचे कागदपत्र समजाविल्यावर देणें तर द्यावे असे जाबसाल उतरून दिलें. मशारनिल्हेस तुम्हापासोन दुसरियाने फडशा करून घेणेची घाई झाली. तत्रापि ते कार्यार्थी खरे. तुम्ही तरी विचार पहावयाचा ते न करितां भिडेस पडून रेटेल तसे कागदपत्र करून दिलें. सावकारी हिशेब व्याजास व्याज लावून तो करून खत लिहून दिलें. एकाची वाट पडली तेव्हां सर्वानींही याप्रमाणेच खते करून घ्यावी आणि आपणही द्यावी असें प्राप्त जाहलें. दौलतीस सर्वानीं जपावें. ज्यांचे माथा ओझें आहे त्यांनीं भीड धरून ज्यानें जसें म्हणावें तसें कागद करून द्यावे. यांत परिणाम उत्तम नाही. इंदूरचे मुक्कामीं बट्याचा जाबसाल केल्यामुळें सरकारची नुकसान झाली. कैक बुडाले. दिवाळें निघालें. तो प्रकार रामपुरा मामलत सांगितल्यावर करतील याजकरितां जुनेच बहाल ठेविलें. किल्ले हिंगलाजगड येथील अर्थ पाहतां जागा बाकी शिबंदीची नेमणुक पक्की त्याप्रमाणेंच असतां सरकारचे फडणिसास धाक लागत नाहीं. बंदोबस्तही खातरजमेचा न दिसे. मामलेदारांचा दाखला तेथें न ठेवितां सरकारातूनच बंदोबस्त करावासा झाला. मामलेदारांनीं महालाचा जाबसाल करणें, किल्ल्यासी संबंध नाहीं. रवाना छ.१ जमादिलाखर हे आशीर्वाद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 358 26-6-1778 A.D.

Tukojirao's intention to increase income-without regard to the past, and the individual concerned. Ahilyabai opposes the policy with

sound and practical arguments. Case of Rampura is discussed in the letter.

---

अ. नं. ३५९ श्री

ता. १४ आगस्ट, इसवी सन १७७८

सुभा राजश्री तुकोजी होळकर छ.२० रजब
श्रावणमास मुक्काम महेश्वर दफाते पत्र.

मौजे भातखंडे बुजुग प्रगणे उतराण येथील कुलकर्ण्यांचा कजिया होता. त्याची पंचाईत होऊन इनसाफाचे रुईने समजुती करून पत्रें दिली. ती बीतपशील.

१ शिक्क्याचें पत्र वर्तमानभावी कमाविसदार प्रगणे उत्राण यांचे नांवें कीं, मौजे भातखंडी बुद्रुक येथील कुलकर्ण्यांचा कजिया त्यामुळें मौजे मजकुरचे भागवत व बाबाजी व दाजी पाटील यानीं महेश्वरचे मुक्कामीं येऊन फिर्याद केली कीं, कुलकर्णी आमचें निमे असतां लक्ष्मण जिवाजी दरोबस्त वतनावर भोगवटा घेतो. म्हणोन कुलकर्णी मजकुरास तलब करून आणिलें. उभयतांचा इनसाफ पंचाईतीचे रुईनें जुने कागद पाहून मनास आणितां पाटील मजकुराचे वतन निमे ठरलें. त्याचे कागदपत्र उभयतांस करून देविले. त्याप्रमाणें उभयतां वर्ततील. फिरोन बोभाट येऊं न देणें. या पत्राची प्रती करून अस्सल पत्र भोगवटियास देणें म्हणोन पत्र. १ सदरहू अन्वयें मोर्तबाचे पत्र गोपाळराव हरी पारोळकर यांचे नांवें. एकूण दोन्ही पत्रें. पाटील कुळकर्णी मौजे मजकुर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 359 14-8-1778 A.D.

Government's decision with the aid of a Panchayat in the dispute over Kulkarani of Mauza Bhatkheda and consequent orders.

---

अ. नं. ३६० श्री

ता. ७-१०-१७७८

अहिल्याबाईंचे खंडो बाबुराव कमाविसदार इंदूर यांस पत्र. रा.आनंदराव यादव कारकुन निसबत सरकार याजसमागमें श्री रामपंचायतनाच्या मूर्ती चित्रकूटी स्थापनेकरितां व बाण एक श्री काशीस स्थापावयानिमित्य पाठविला आहे. त्यासी मशारनिल्हे तुम्हांपासीं आल्यावर रात्रौ चौकीपाहरियाचा जाबता करून समागमें माणसे देऊन तराण्यापावेतों सुरक्षित पोहचवून मशारनिल्हेचे हातचे उत्तर हुजूर पाठविणें. छ.१५ मोर्तबसुद.

No. 360 7-10-1778 A.D.

Ahilyabai orders the Kamavisdar of Indore to give every facility to Anandrao Yadav carrying idols to Chitrakut, and a Bana to Benares.

---

अ. नं. ३६१ श्री

इ. स. १७७८

इस्तकबील परगणे कुंभेर बीदानंद मौजे सेत व कांकरसोली, तमरेमय आकरीनिमक बराये मशारीफ छत्री राजश्री खंडेराव होलकर अजी सरकार. बमुजिब सनद साबीक मुकरर व माफशुद वायदके हरसे मवाजियात मयअकर मरकुम बदस्तूर व मुवाफिक मामूलकदीम चालू रहने बाबद. फारसी सनद का तर्जुमा इ. स. १७७८ अगनसुदी १३ के जये इ. स. १८०४

| |
|---|
| शाहआलम बादशाह रणजीतसिंह<br>बहादुर माहराज नोरनाल |

No. 361 1778 A.D.

Order of the Emperor Shah Alam in 1778 A.D. that grant of villages and salt-pan allotted to the expenses of the Chhatri of Khanderao Maharaja Holkar shall be upheld.

---

अ. नं. ३६२ श्री

ता. १ डिसेंबर, इसवी सन १७७८

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>मल्हारजीसुत तुकोजी होळकर |

राजश्री कमाविसदार वर्तमान, भावीपद, नेमावर पंच महाल प्रांत नेमाड यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित तुकोजीराव होळकर दंडवत सुा तिसासबैन मयावआलफ. तपोनिधी महंमद हिरदेपुरी दुधाधारी गुरु महंत ब्रम्हपुरी गोसावी मठ श्री नर्मदा उत्तरतीर अर्धकोट तीर्थापासीं श्री सिद्धेश्वर महादेव सन्निध कसबे नेमावर पद मजकुर पंच-

महाल यांनीं कसबे पुणें प्रांत मजकुर येथील मुक्कामीं विदित केलें कीं आम्ही श्री सिद्धेश्वरपासीं असतां तेथील पूजा नैवेद्य व नंदादीप व अन्नसत्र, सदावर्त व रेवातीरीं घाट-कारखान्याकडील मरामत खर्चाकरितां नेमावर पंचमहालपैकीं गांवे बीतपशील : १ मौजे मुरझाल, १ करवंद, १ गिरधरिया, १ अकावल्या व १ मचगांव, व १ सुभानखेडी. एकूण ६ सहा गांवें दरोबस्त पैकीं हक्कदार, इनामदार खेरीज करून मोकासा बाबती सरदेशमुखी कुलबाब श्री कडे इनाम कैलासवासी सुभेदार यांनीं करार करून दिले. त्याप्रमाणें आपला अंमल होता तोंपर्यंत चाललें. अलीकडे पंचमहाल श्रीमंतानीं खालशांत ठेवला तेव्हां गंगाधरपंत तात्यांनीं श्रीमंतांस विनंती करून त्यांजकडून ही चालविलें. दरम्यान श्रीमंत राजश्री दादासाहेब व हरीपंत फडके फौजेसुद्धां आले होते तेव्हां पेंढारियांचे गर्दीत सुभेदारांची सनद फाटली गेली. प्रस्तुत पंचमहाल आपलेकडे आल्यानें आबाजी इंगळे यानीं आपले सनदेची दिक्कत केली. यास्तव कृपा करून श्रीमंतांच्या सनदा पाहून आपले नांवच्या सनदा भोगवटियासी करून देऊन गांवें चालविली पाहिजेत म्हणेन. त्यावरून मनास आणितां श्री कडील पूजा नैवेद्य, नंदादीप, अन्नसत्र, सदावर्त व घाटमरमत खर्चास चालत आल्याप्रमाणें गोसावीबाबाकडे चालविणें. प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करितां या पत्राची प्रती लिहून घेऊन अस्सलपत्र गोसावी मजकुर यांजकडे भोगवटियास माघारे देणें. जाणिजे.छ.११ सवाल बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**चॅरिटेबल डि. फा. नं. ७५**

श्री मोर्तबसुद.

No. 362 1-12-1778 A.D.

Tukojeerao Holkar renews the Sanad granting 6 villages (mentioned in the Sanad) to Mahant Hiradepuree for the worship, light, dish etc., of Shree Siddheshwar at Nemawar, in continuation of old grants of the late Subhedar Malharrao Holkar and the Peshwa Government.

---

**अ. नं. ३६३** **श्री**

ता. १४ डिसेंबर, इसवी सन १७७८

सुभा राजश्री तुकोजी होळकर मुक्काम महेश्वर
प्रांत माळवा माहे जिल्काद ऊर्फ मार्गशीर्ष छ. २४ जिल्काद

चौंडीकर शिंदे यांनीं कसबे महेश्वर प्रांत नेमाड येथील मुक्कामीं येऊन विनंती केली की, आम्ही सेवक पुरातन एकनिष्ठ सेवा करीत आलों. यास्तव आमच्या संसाराचे बेगमीस दरएक जागा नेमून दिली पाहिजे. म्हणून, त्याजवरून मनास आणितां हे एकनिष्ठ सेवक

यांचे चालविणें आवश्यक जाणून यांच्या संसाराच्या बेगमीकरितां प्रगणे इंदूर, मजकुर येथील गांव सरकारांतून साल मजकुर पासोन हक्कदार, इनामदार, खेरीजकरून बाकी अमल जल, तरू, काष्ठ, पाषाण, निधी, निक्षेप आदिकरून शिंदे मजकुर यांस इनाम करार करून देऊन नांवाच्या सनदा लिहून दिल्या कीं, मौजे मजकुर येथील हक्कदार व इनामदार खेरीज बाकी अमल दरोबस्त तुम्ही आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभव घेणें. म्हणून पत्रें शिक्क्याची नांवनिशिवार देह बीतपशील :

१ मौजे पानेड निसबत त्रिंबकराव व व्यंकटराव बिन विठोजी पाटील शिंदे.

१ मौजे हातोना निसबत राणोजीबिन महादजी पाटील शिंदे.

१ मौजे अजनोदा निसबत आप्पाजी बिन येसाजी व लक्ष्मणराव बिन सुभानजी पाटील शिंदे.

१ मौजे कराडिया निसबत गोविंदराव बिन बाणाजी पाटील शिंदे.

--

४ एकूण चौगांवचीं चार पत्रें वेगळाली करून दिलीं. येणेप्रमाणें पत्रें चार. मजकुर एकच असे.

**सरकारी रेकार्ड**

No. 363 14-12-1778 A.D.

Subhedar Tukojeerao Holkar passes Sanad granting 4 villages hereditarily to five members of the Choudikar Shinde family. (Ahilyabai was born in this family) Four separate letters for the villages are recorded.

---

**अ. नं. ३६४** **श्री**

ता. २९ जानेवारी, इसवी सन १७७९

राजश्री खंडो बाबूराव कमाविसदार परगणे इंदूर यांस : स्नेहांकित अहिल्याबाई होळकर दंडवत विशेष. मौजे पेडवी परगणे मजकुर हा गांव राजश्री त्रिंबकजी इंगळे यांजकडे मकत्यानें आहे. त्याजविसीं तुम्हांस चिरंजीव राजश्री तुकोबानें पत्र लिहिलें असतां तुम्ही येथील पत्रांचा उजूर केला म्हणून हुजूर विदित झालें. त्यावरून हें पत्र तुम्हांस सादर केलें आहे. तरी मौजे मजकुराविशीं चिरंजीवांनीं तुम्हांस लिहिलें आहे. त्याप्रमाणें वर्तणूक करणें. कोणेविशीं दिक्कत करून बोभाट येऊ न देणें. जाणिजे. छ.१० मोहरम बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकार्ड**

No. 364 29-1-1779 A.D.

The Kamavisdar of Indore is taken to task by Ahilyabai for disregarding the orders of Tukojeerao in connection with Mauza Pedwa, given on contract to Trimbakjee Ingle.

---

**अ. नं. ३६५** **श्री**

ता. १-२-७९

खंडो बाबुराव कमाविसदार यांस तुकोजी होळकर यांचे पत्र. छ. १३ मोहरम माघ मास.

माणकचंद वाणी ओसवाल कसबे इंदूर यानें हुजूर विदित केलें कीं माझे कन्येची सगाई नाथू वाणी यांसी जाली. त्यास नाथूमजकूर पिन्नसाचे रोगानें बहुतच हैराण. याजकरितां त्याऐवजीं सगाई रुपये घेतले असतील ते त्याचे त्यास देणें व वधू दुसरें जागा द्यावयाकरितां एक पत्र; त्यावरून हें पत्र सादर केले असे. तरी नाथूमजकूर यांस सगाईमुळें खर्च बसला असेल चौघाचे साक्षीनसी मनास आणून वाजवी ऐवज लागला असेल तो व वस्तभाव नगनगोठ असतील ते माणकचंद मजकुर याजकडोन देवून नाथू मजकुराची फारकती यांस देववणें. म्हणोन पत्र.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 365 1-2-1779 A.D.

The Kamavisdar of Indore is ordered by Tukojeerao Holkar to revoke the bethroal of the daughter of Manakchand Wani with Nathu Wani as the latter is reported to suffer from an incurable disease; and Manikchand shall return, after proper Government inquiry, ornaments, garments etc., received by him.

---

**अ. नं. ३६६** **श्री**

ता. ८ मे, इसवी सन १७७९

रामराव आप्पाजी पळसीकरांस तुकोजीराव होळकर यांजकडून पत्र कीं, कुंजबिहारी निसबत राम नारायण शालिग्राम यांजकडे रदकर्ज बद्दल रुपये २५७५० पावणे सव्वीस हजार तुम्हांकडून देविले असेत. तरी सदरहू रुपये तुम्हांकडे कर्जपट्टीचा ऐवज ठरला आहे त्यापैकीं सनसमानीन आषाढ शुद्ध १ प्रतिपदेस पावते करून पावती घेणें. ऐवज दौलताबादप्रमाणें देणें.

रवाना छ.२१ रविलाखर सुरूसन तिसासबैन मयावअलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद (शिक्का)

**पळसी रेकॉर्ड**

No. 366 8-5-1779 A.D.

Transfer of debt-payment among Ramrao Appajee, Tukojee Holkar and Kunjabiharee who is in service of Ramanarayan Shaligram.

---

**अ. नं. ३६७** **श्री**

ता. २ जुलाई, इ. स. १७७९

नरहर मुरार कमाविसदार संस्थान कोटे यांस अहिल्याबाई होळकर यांजकडून पत्र मुक्काम महेश्वर. चिरंजीव तुकबानीं देशीं राजश्री महादाजी शिंदे यांचे विद्यमानें सावकाराचा ऐवज घेतला. त्याचे वसुलानिमित्य शिंदे यांजकडून राजश्री शिवाजी नारायण येथें आले आहेत. त्यांजकडे ऐवजाचा भरणा जाहला पाहिजे यास्तव हे पत्र सादर केले असे. तरी संस्थान मजकुर ऐवजी तूर्त रुपये १००००० एक लक्षाच्या हुंड्या इंदूरच्या पत्र पावतांच पाठवून देणें. एक घडीचा दिरंग व लावणें म्हणोन पत्र पाठविलें. हुजूर खंडो महादेव निसबत मामलेदार.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 367 2-7-1779 A.D.

Kamavisdar of Sansthan Kote is ordered by Ahilyabai to remit to her notes of one lac of rupees from the income of the Sansthan as the said amount is to be paid to the agent of Mahadajee Scindia. The agent is sent to Maheshwar to recover the amount paid to Tukojeerao by Scindia through a banker in the Deccan.

---

**अ. नं. ३६८** **श्री**

ता. १५ जुलाई, इसवी सन १७७९

राजश्री नारो गणेश गोत्र गार्ग्य सूत्र अश्वलायन शाखा शाकल उपनाम गाडगीळ देसाई मौजे अणसुरे कसबे मिठगांवणे तालुके विजयदुर्ग प्रांत राजापूर, गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य. तुकोजी होळकर देशमुख परगणे चांदवड सुरूसन समानीन मयावअलफ.

तुम्ही कसबे महेश्वर प्रांत नेमाड रेवा उत्तरतीर येथील मुक्कामीं येऊन विदित केले की मौजे मजकुरीं पांथस्थ ब्राह्मण वगैरे जातात येतात. त्यांजला अन्न द्यावे लागते. यास्तव कृपा करून कांहीं सरकारांतून नूतन वर्षासन करून दिले पाहिजे म्हणोन त्यावरून मनास आणितां पांथस्थ ब्राह्मण वगैरे यांजला अन्न द्यावयाचे धर्मकार्य जाणून मौजे सिवडी परगणे मजकुर येथील माल ऐवजी सालिना वर्षासन रुपये १०० शंभर साल मजकुरापासोन करार करून देऊन हे सनद लिहून दिली असे. साल मजकुरापासोन पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें साल दरसाल रु.१०० घेत जाऊन मार्गस्थ ब्राह्मण वगैरे येतील जातील त्यांजला सिधासाहित्य देत जाणें. मिती श्रावण अधिक शुद्ध ३ शके १७०१ विकारीनाम संवत्सरे छ.१ माहे रजब बहुत काय लिहिणें. हे विनंती. मोर्तब.

श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर
मल्हारजी सुत तुकोजी होळकर

**सरदार खाजगीवाले यांचें दप्तर**

No. 368 15-7-1779 A.D.

Tukojeerao Holkar Deshmukh Pargana Chandwad passes a Sanad to Naro Ganesh Gadgil granting him hereditarily an annual sum of Rs. 100/- from the income of Mauza Siwadi to supply food to Bramhins passing through his village Mauza Anasura.

---

**अ. नं. ३६९** **श्री**

ता. १५-७-१७७९

गणेशराम गुमास्ते मौजे सिवडी परगणे चांदवड यांस अहिल्याबाई होळकर यांजकडून ताकीदपत्र. राजश्री नारो गणेश गाडगीळ मौजे अणसुरे तालुके विजयदुर्ग प्रांत राजापुर यांजला मौजे मजकुर येथील मालऐवजीं सालिना वर्षासन रुपये १०० शंभर करून देऊन सनदा अलाहिदा करून दिल्या असत. तरी सदरहू रुपये दरसाल मशारनिल्हेस पाववीत जाणें. जाणिजे छ.१ रजब बहुत काय लिहिणें. मोर्तब.

**खाजगीवाले गानू यांचे दप्तर**

No. 369 15-7-1779 A.D.

Orders are passed to the agent at Siwadi by Ahilyabai conveying the purport of the above Sanad.

---

अ. नं. ३७० श्री

ता. १७ आगस्ट, इसवी सन १७७९

श्रीमंत मातोश्री अहिल्याबाई होळकर साहेबांचे सेवेसी मुचलका सरकार. विद्यमान देसाई व कानुगो प्रगणे सुलतानपूर सन ११७७ तागायत सन ११७९ तीन सालच्या जमेचा कागद आम्ही सरकारांत लिहून दिला आहे. यांत तफावत तजावत राखून लिहून दिला असेल तर आपण सरकारचे गुन्हेगार. हें लिहिले सही छ ४ माहे साबान विद्यमान राघो गोविंद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 370 17-8-1779 A.D.

The Desai and Kango of Pargana Sultanpur submit, on this day, the accountsheet of 3 years to Ahilyabai, guaranteeing its veracity that they may be straightly prosecuted if found otherwise.

---

अ. नं. ३७१ श्री

ता. १२ एप्रिल, इसवी सन १७८०

चिरंजीव सौभाग्यवती रखमाबाई होळकर यांसी प्रती अहिल्याबाई होळकर आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहिणें. विशेष परगणे सुलतानपुरी राजश्री आबाजी विष्णु यांचे तर्फेने मामलतीचे कामावर राजश्री कृष्णाजी हरी केतकर आले. त्यांनीं राजश्री मल्हारराव पवार फत्तेपुरकर यांसी क्षुल्लक गोष्टीवरून कलह वाढविला. तुम्ही सुलतानपुरीं आल्यावर आपलेपरी समजावून तेथून पागा वगैरे सरंजाम फत्तेपुरीं पाठवून खटपट करविली. तशांत जमीदारानीं मध्यें पडून सलुकाचा जाबसाल लावून गंगाजलनिर्मल जानकीबाई पवार यांजला सुलतानपुरीं घेऊन आले. मागून दुसरें दिवशीं माधवराव बल्लाळ यांनीं जाऊन गांवची तसनस करून दोन तोफा वस्तभाव वगैरे घेऊन आले, म्हणोन ऐकिलें. ऐसियासी कैलासवासी तीर्थरूप सुभेदार यांचा उदाजी पवारांचा घरोबा पहिलेपासून चालत आला. अलिकडेही आजपरियंत दुसरी गोष्ट घडली नाहीं. प्रस्तुत मामलेदारानीं दुरंदेशा न करितां कलह वाढवून आपलेपरी तुम्हांस समजाविलें. तुम्ही आदिपश्चात विचार पाहून ज्याचे त्याजपरी समजुती पाहून कलह तोडून टाकावा ते न करितां लटका दुराग्रह धरून ऐसा प्रकार केला हें चांगलें नाहीं. अगोदर मामलेदाराचें ऐकून भाऊपणियांत पाणी घालून जाबसाल चढीस लावणें अयोग्य. तशांत सलुक्याचा मजकूर ठरवून जानकीबाई तुम्हाजवळ आली असतां मागून माधवराव बल्लाळ याजला पाठवून दोन तोफा आणून गांवची तसनस

केली. यात सरकार किफायतीचे अथवा नक्षाची जात मोजावी ऐसा प्रकार नाही अस्तु. जे घडले तें अतःपर तरी विचार करून आपले रीतीस चांगले दिसोन त्यासी रहस्य होय तें केले पाहिजे याजकरितां हें पत्र लिहिले असे. तरी तुम्ही अतःपर मामलेदाराचें सांगितल्यावर न जाता जानकीबाई पवार तेथें आली आहे. त्यांचे समाधान करून तोफा दोन व आणखी वस्तभाव गुरेंढोरें तुम्हाकडे व मामलेदाराकडे आलीं असतील ते ते ठिकाणीं धाडून दरोबस्त सुतळीच्या तोडिया सुद्धां माघारें देऊन सरहस्यानीं मार्गस्थ त्यांजला करणे. त्यांचा आपला घरोबा. त्यांसी तोडून तोफा घेणें ऐसें कारण नाहीं. आपले घरीं तोफांस कमी काय आहे? तितकियांचे स्वरूप राखिलें म्हणजे त्यांत सर्व आहे. समजून त्यांच्या तोफा वगैरे जिन्नस परत माघारे देऊन पुन्हा कलह न राहे तें करणे. रवाना छ ६ रविलाखर सुरूसनसमानीन मयावआलफ बहुत काय लिहिणें, हे आशीर्वाद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 371 12-4-1780 A.D.

Ahilyabai takes Saubhagyawati Rukhamabai Holkar (consort of Tukojeerao Holkar) to task for quarrelling, on the word of the Kamavisdar, with Jankibai Pawar. Rukhamabai is reminded of former cordial relations existing between Holkars and Pawars; and is asked to return everything taken from the Pawars. She is exhorted to continue friendly relation in the future.

---

**अ. नं. ३७२** **श्री**

ता. १३-४-१७८०

अहिल्याबाई होळकर यांचे पांडुरंग नारायण कमाविसदार
सरकार बिजागड यांस पत्र छ.७ रविलाखर ११८० आर्बी

स्वारी (अहिल्याबाई होळकर) श्री ओंकारेश्वर यात्रेस गेलीं व परत तिकडून येतांना मर्दानियाचे मुक्कामी अठ्ठावन रुपयांचे जिन्नस घेतले. हा ऐवज तुम्हांकडून देविला तो खर्ची लिहिणें म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 372 13-4-1780 A.D.

Ahilyabai's pilgrimage to Omkareshwar. Purchased articles of Rs. 58/- at Mardana on her way back.

---

**अ. नं. ३७३** **श्री**

इ. स. १७८०

तीर्थस्वरूप मातोश्री बाईसाहेब वडिलांचे सेवेसी. वडिलांचे आशीर्वादेकरून यथास्थित असो विशेष. चिरंजीव राजश्री मल्हाररायाचें लग्न वडिलांचे पायाजवळच व्हावें असा हेत, याजमुळें इतके दिवस राहिलें. मध्यें नाना प्रकारचे बखेडे होत गेले. याजमुळें योग न घडला. लग्नाचे दिवस जात चालले. मूल दिवसानुदिवस थोर होत जातें. यंदा माघ मासीं लग्न वडिलांपासीं येऊन व्हावीं. त्यास इंग्रजांच्या शहामुळें श्रीमंतांपासी गुंतून राहिलो. त्यांचीही आज्ञा कीं यंदा लग्न देशींच उरकून घेणें. पुढें मसलत कशी पडेल ऐसे संकट जाणून माघ शुद्ध पक्षीं लग्नाचा निश्चय करून सेवेसी विनंतीपत्र लिहून तीर्थस्वरूप राजश्री महादजी बाबा, दादा व जिवाजी बाबुराव सेवेसी पाठविले आहेत. विनंती करतील ते मान्य करून वडिली लग्नसिद्धी आपले हातें केली पाहिजे. सर्व करणें वडिलांस आम्ही विनंती मात्र लिहिली. यास्तव कृपा करून अगत्यरूप आलें पाहिजे. दुसरें, राजश्री सुलतानबांसही शरीरेंकरून समाधान नाहीं. याजमुळें त्यांचाही आग्रह कीं लौकर करावें. याउपरि दुसरें लग्न व्हावयाचा अर्थ समजलाच आहे. एक मूल वडिलांचे आहे. त्याचे सर्व प्रकारें वडिलीं घेऊन करावें. कळावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 373 1780 A.D.

Tukojeerao requests Ahilyabai to come to the Deccan-side for the marriage-ceremony of his son Malharrao. He had a keen desire to perform the ceremony at Maheshwar; but campaigns inteneded etc., prevent him from leaving the camp.

---

**अ. नं. ३७४** **श्री**

ता. १२-७-१७८०

पुणें दरबारातील होळकर वकिलाचे नाना फडणिसांस पत्र. आषाढ शुद्ध ११ शके १७०२

१ फौजेतील लोक खराब बहुत झाले असून शिंदे, होळकरांचे यशकीर्तीच वर्णन करितात.

१ इंग्रजांचा उत्कर्ष पाहून अहिल्याबाई पेशव्यांस वेळींच त्यांचा मोड करण्यास सुचविते.

१ अहिल्याबाई बोलत होती जे इंग्रजांनीं चहूकडून प्रसार करण्याचा मनसबा केला

आहे तरी ह्या समयास श्रीमंतांनीं शिलेदारांचा व हुजरातीचा भरणा पुष्कळ करावा आणि इंग्रज जागजाग कोठे दोन तीन पलटणे अशी तोड काढली आहे. अशांत जागजागां फौज पाठवून म्हणजे मागल्यास दहशत पडेल, पुढें कोणी येऊं पावणार नाहीं. नबाब, भोसले सारे जमा होऊन इंग्रजांचें पारिपत्य करावें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 374 12-7-1780 A.D.

News-letter from the Holkar Vakil at Poona to Nana Fadnis- Ahilyabai warns the Poona Court against the rise and progress of the English company.

---

**अ. नं. ३७५** **श्री**

ता. ५ सप्टेंबर, इसवी सन १७८०

श्रीमंत महाराज मातोश्री बाईसाहेब साहेबांचे सेवेसी मुचलका बंदेगान हिंमतखान वल्द आजमतखान साकिन कसबे इंदूर कुर्निसात अर्ज विनंती कीं मजकडे राजश्री बापूजी होळकर यांचे लष्करचा वगैरे शहर संबंधी आरोप आला म्हणोन साहेबी शिक्षा करून आज्ञा केली कीं, अतःपर कांहीं ऐकिलें तर कार्यास येणार नाही. येविसीं आज्ञेप्रमाणें सरकारांत मुचलका लिहून दिधला ऐसाजे कीं मागें अन्याय जाहला तो माफ केला. पुढें मजपासून कांहीं लबाडी, लाताडी, फितवा, फातडा, चाहाडी, चुगली झाली तर साहेबीं माझा मुलाहिजा न करितां हात-पाय तोडावे आणि शिक्षा करावी. येणेंप्रमाणें मुचलका अर्ज लिहून दिला सही. हे अर्जदास्त. मिती भाद्रपद शुद्ध ७ शके १७०२ शार्वरी नामसंवत्सरे. मुक्काम महेश्वर.

निशाणी कटियार बकलम
गोपाळ नारायण कारकून
निस्बत
सरकार मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 375 5-9-1780 A.D.

An agreement of apology is passed by Bandegan Himmatkhan to Ahilyabai : I am already punished by the Sarkar for my misconduct in

the army of Bapujee Holkar. I give a written agreement that my hands and feet should be mutilated in case a similar offence-falsehood, false report etc., be committed by me in the future.

---

अ. नं. ३७६ **श्री**

ता. १०-९-१७८०

माधवराव लक्ष्मण वकील होळकर निसबत हैद्राबाद यांजकडून अहिल्याबाई होळकर यांस पत्र. सेवेसीं माधवराव लक्ष्मण विज्ञापना ऐसीजे येथील वर्तमान छ ७ रमजान मुक्काम हैद्राबाद येथें यथास्थित असे विशेष. हैदरनायकाकडील बातमी आलीजे. माहे साबानांत इंग्रजाशीं एक लढाई मातब्बर झाली. त्यात हैदरनायकाकडील घोडीं व माणसें तीनचार हजार कामास आली. परंतु इंग्रजाकडील सहा हजार माणसें जाया झालीं. त्यांत हजार दोन हजार आंगरेज व गाडदी कापून काहडले. एक सरदार इंग्रजाकडील जिवंत धरून आणला. तो किल्ल्यावर कैदेत ठेविला आहे. इंग्रेजास जख फार दिली. त्यामुळें मागती बिनापट्टणच्या किल्ल्यांत गेले. हैदरनाईक बाहेर सोळा कोसांवर मुक्काम करून आहे. या समयांत त्याजला ईश्वरें धैर्य दिल्लें आहे आज तीन वर्षे झाली. इंग्रजांशीं लढाया घेऊन मागती मजबूत आहे. अद्याप कोणाकडील कुमुक इच्छीत नाही. याजमुळें या नबाबासही आंदेशा फार आहे कीं, इंग्रजांची लढाई फत्ते झाली तर मग तो अतिबली होईल. एक श्रीमंतांचे राज्याशी जो सलूका आहे, तो कायम आहे. कलम १

२ दुसरें नागपुराहून बातमी आली. जे अमृतराव दादासाहेबांचे पुत्र तेथें आले परंतु राजश्री मुधोजी भोसले यांनीं अद्याप त्यांजला भेटीस बोलाविलें नाही. बाहेर एका बागेंत उतरले आहेत. त्यांचा मनसुबा काय आहे, हें समजत नाही. पुरा मजकुर कळल्यावर लिहीन.

३ हैदर नायकाचाही आग्रह हाच आहे कीं, आवघे सरकार एकत्र होऊन इंग्रजांस शरण जातील तर सुखे जावोत. परंतु आम्ही सलुक करीतच नाहीं.

४ मिस्टर चापमन कलकत्याहून एक सरदार तेथें सलुकाचा पैगाम घेऊन आला आहे. त्याचें मानस कीं, श्रीमंत पंतप्रधान यांचा आमचा सलूखा व्हावा. त्यांत एक हैदर नाईक वेगळा करून वरकडाशी सलुखा झाला तर करूं. हैदर नाईकाशीं सलुखा लावणें ऐसा हुकूम आमचे खावंदाचा नाहीं. हे असे मजकुर तेथून येथें येत असतात.

५ श्रीमंतांकडील मानस कीं, जेव्हां हैदर नाईक सलुखावर कायम होईल तेव्हां तह सिद्धीस जाईल. तोंपावेतों बोलून अंमलांत येत नाही असें म्हणतात. कलम. याप्रमाणें वर्तमान आहे बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 376 10-9-1780 A.D.

The Holkar ambassador at the Hyderabad Court writes news-letter to Ahilyabai :

(1) The war between Hyder and the Company.

(2) Amritrao Peshwa has gone to Nagpore. The Bhonsale Raja has not yet given him an interview.

(3) Hyder's Staunch resoultion against making submissive peace with the Company.

(4) Mr. Chapman's (of Calcutta) presence in the Poona Court.

(5) The Peshwa is resolved to have initiative of peace-terms from Hyder.

---

**अ. नं. ३७७** **श्री**

ता. १५ सप्टेंबर, इसवी सन १७८०

राजश्री कमाविसदार वर्तमान भावी मौजे खजराणा महाल खाजगी. प्रगणे इंदूर यांसी स्नेहांकित अहिल्याबाई होळकर दंडवत, राम राम. इहिदे समानीन मयावआलफ. तारशा फकीर मदारी आवलिया यांजकडे मौजे मजकुरचा पीर नाहरसयद याची मुजावरी घेत आला व मौजे मजकुरपैकीं इनामी जमीन बिघे पंधरा १५ पेशजीपासून चालत आली. परंतु वहिवाटीस सनदपत्र सरकारातून करून दिलें पाहिजे, म्हणोन हुजूर विदित केले. त्यावरून मनास आणितां आवलिया फकिर याचे चालविणें दौलतीस श्रेयस्कर जाणून इनामी जमीन बिघे पंधरा सुमारी देण्याचे ठरून हें पत्र तुम्हास सादर केले असे तरी पेशजीपासून चालत आल्याप्रमाणें यांजकडे चालवीत जाऊन प्रतिवर्षी नवीन पत्रांचा आक्षेप न घेतां शिष्यपरंपरा चालवीत जाऊन या सनदेची नक्कल लिहून घेऊन अस्सल पत्र फकीरबाबास भोगवटियास परतोन देणें. जाणिजे छ. १५ रमजान मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 377 15-9-1780 A.D.

The Kamavisdar of Mauza Khajrana (Khasgi Department) is ordered by Ahilyabai to continue the gift of 15 Bighas of land to Tarasha Fakir for the upkeep etc., of Peer Nahar Sayad as before. A Sanad is passed to that effect.

---

**अ. नं. ३७८** **श्री**

ता. ३० डिसेंबर इसवी सन १७८०

राजश्री महादजी शिंदे गोसावी यांसी सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित अहिल्याबाई होळकर विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत असावें, विशेष संस्थान कोटे येथील मामलतीचा जाबसाल हल्लीं इंदोरचे मुक्कामीं चिरंजीव राजश्री तुकबापाशी बोलून ऐवज घेणें ठरला. पैकीं राजश्री मणीराम नागनाथ याचे रदकर्जी चिरंजीवांनीं वरात करून दिली आहे. त्या ऐवजी गंगाजळनिर्मळ हरकाबाईकडे रुपये १०००० दहा हजार घ्यावयाचा करार करून राजा जालमसिंग झाले यांचे नांवें वरात अलाहिदा लिहून देऊन हें पत्र आपल्यास लिहिलें असे तरी राजा मशारनिल्हेस ताकीद करून वरातीप्रमाणें ऐवज झाडियानिसीं पावता होय, ते करावे. रवाना छ.३ मोहरम सुरूसन इहिदे समानीन मयावअलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 378 30-12-1780 A.D.

The Mamlat of Sansthan Kote is settled. Out of the amount a note is sent to Raja Zalimsingh. Ahilyabai requests Mahadajee Scindia to see that the Raja makes the requisite payment.

---

**अ. नं. ३७९** **श्री**

रोजकीर्द मुक्काम महेश्वर छ. ९ मोहरम ११८१. ता. ५-१-१७८१

राजश्री महादजी शिंदे उज्जनीहून भेटीकरितां आले. (महेश्वरीं) त्यांजकडे मेजवानीमुळें खरीदी बकरी बुद १६ मार्फत नानजी भारूड.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 379 5-1-1781 A.D.

Mahadajee Scindia came from Ujjain to Maheshwar to pay a visit. 16 goats were purchased for his feast.

---

**अ. नं. ३८०** **श्री**

रोजकीर्द छ.१४ सफर ११८१, ता.८ फेब्रुवारी, इसवी सन १७८१

शिंदे व तुम्ही (होळकर) एके भावें चालून मानपान शिक्का, रोखा, कानू कायदे, वगैरे रीत परस्परें कैलासवासी उभयतां सुभेदार (मल्हारजी होळकर व राणोजी शिंदे) यांजपासून चालत आल्याप्रमाणें राखावें. उभयपक्षी भाऊपणांत परेज न पडतां सरकार चाकरी घडे तें करणे म्हणोन पेशवे दरबारांतून सूचना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 380 8-2-1781 A.D.

A friendly note is sent emphasizing cordial and friendly relations in all state matters between the two ruling families (Holkar and Scindia). The Poona Durbar will be pleased to see the continuation of the same in the future, as existed formerly.

---

**अ. नं. ३८१** **श्री**

ता. १७ मे, इसवी सन १७८१

राजेश्री राजे जालमसिंग झाले संस्थान कोटे. स्नेहांकित अहिल्याबाई होळकर विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत जावें. विशेष राजश्री बलवंतसिंग खेची यांजकडून सरकारचा ऐवज येणें, त्या ऐवजी त्यांनीं कांहीं ऐवजाची तरतूद करून कोटेकर सावकारापाशीं अमानत ठेवून त्याच्या चिठ्ठ्या आणून दिल्या, तो ऐवज तुम्ही परभारें सावकारापासोन जबरदस्तीनें घेतला म्हणोन विदित झाले. ऐसियासी सावकारापासी सरकारचा ऐवज अमानत असतां तुम्हांस घ्यावयाचे प्रयोजन काय? सावकारी जाबसालांत गैररीतीची गोष्ट करणें ठीक नाही, यास्तव हें पत्र लिहिलें असे. तरी पत्रदर्शनीं सावकाराजवळून ऐवज घेतला असेल तो झाडियानिशीं त्याचे स्वाधीन करणें. ऐवज उज्जैनीस उतरून घ्यावा लागतो. दिवसगतीवर टाकणें चांगले नाही समजून पुन्हा बोभाट न ये तें करणें. जाणिजे. छ.३ जमादिलाखर, ज्येष्ठ मास बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद :

**सरकारी रेकॉर्ड**

No. 381 17-5-1781 A.D.

Raje Zalamsing Zale of Kota is taken to task by Ahilyabai for forcibly depriving a banker of the deposit placed with him by Balwantsingh Khechi. Khechi was a debtor of the Holkar Government.

---

**अ. नं. ३८२** **श्री**

ता. ४ जून, इसवी सन १७८१

कमाविसदार मर्दाना यांजकडून महेश्वरचे कामगारास पत्र.

साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल कार्तिक वद्य १० मुक्काम रेवातीर नजीक मर्दाना यथास्थित असो विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. लेखार्थ अवगत जाहला. राजश्री शंकराजीपंत नांदुरकर यांचा मजकुर लिहिला त्यास कैलासवासी श्रीमंत गंगाधरपंत तात्या समानसितेनसालीं नांदूर प्रगणे चांदवडचे मुक्कामीं आले त्यासमयीं आम्ही त्याजसमागमेंच होतों. त्यास खळोजी धुमाळ यांजकडे दास्तानचा गल्ला नांदुरीं होता. त्यापैकीं शंकराजीपंत यांचे विद्यमानें सटवाजी गायकवाड यांचे पागेकडे चंदी केली बारूळे चौसरीमापें जिन्नस बाजरी दररोजा ४।। प्रमाणें छ.४ ताा छ.११ जमादिलाखरपावेतों आठ रोजा गल्ला सात खंडी, बारा मण देविला. तो गल्ला गायकवाड मजकूर यांजकडे पावला. त्याची पावती येथें घेतली असे. हा गल्ला मातोश्रीकडून हिशेबी मजरा देवाल हे विज्ञापना. ज्येष्ठ शुद्ध १३ शके १७०३.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 382 4-6-1781 A.D.

The Kamavisdar of Mardana requests the Maheshwar Officer to secure Government sanction for the corn supplied to Satwaji Gaikwad's Paga from the Nandur store-house.

---

**अ. नं. ३८३** **श्री**

ता. ८ जुलाई, इसवी सन १७८१

राजश्री आबाजी विष्णु कमाविसदार प्रगणे रामपुरा यांस अहिल्याबाई होळकर यांजकडून ताकीदपत्र. सनइसनेसमानमयावअलफः मौजे खजुरी प्रगणे मजकुर हा गांव पूर्वीपासोन कैलासवासी अप्पाजीराम यांजकडे होता. अलीकडे मौजे मजकुरची जप्ती सरकारांत केली होती. परंतु मशारनिल्हे पुरातन पदरचे त्यांजकडील गांव त्यांचे पुत्र राजश्री रामराव अप्पाजी यांजकडे चालवावा ऐसा करार करून हें पत्र सादर केले असे तरी मौजे मजकुरी तुम्ही दखलगिरी न करितां साल मजकुरपासून मशारनिल्हेकडील कारकून येतील त्याचे स्वाधीन करणें; आणि कामकाज लागल्यास हरएकविषयीं उपराळा करीत जाणें; जाणिजे छ.१५ रजब बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 383 8-7-1781 A.D.

Kamavisdar of Pargana Rampura is ordered by Ahilyabai to hand over the possession of Mauza Khajuree to Ramrao Appajee Palshikar. The said village was resumed by Government in the times of the late Appajeerama.

---

**अ. नं. ३८४** **श्री**

ता. १८-९-१७८१

तुकोजी होळकर यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. वडिलांचे सेवेसीं दंडवत विज्ञापना. राजश्री अमृतराव वाघ पंचाईत नेमून दिली असतां तेथें आला आहे, त्यास ताकीद करून पाठवून देणें म्हणोन आज्ञा; त्यास आज्ञेप्रमाणें वाघ मशारनिल्हे यांस ताकीद करून वडिलांकडे पाठविले असे. ते पंचाईत मतें ठरेल त्याप्रमाणें जाबसाल परस्परें निर्गमांत यावे. मिती ज्येष्ठ वद्य १४ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. मुक्काम महेश्वर पैवस्त छ.२७ रमजान.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 384 18-9-1781 A.D.

Tukojeerao Holkar writes to Ahilyabai : "You were pleased to write that Amritrao Wagh should be sent back to you who had come to us though an arbitration was appointed there." He is sent back.

---

**अ. नं. ३८५** **श्री**

ता. ७ डिसेंबर, इसवी सन १७८१

तीर्थस्वरूप मातोश्री बाईसाहेब वडिलांचे सेवेसीं. अपत्ये सौभाग्यवती रखमाबाई होळकर चरणांवर मस्तक ठेवून दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिणेस आज्ञा केली पाहिजे. विशेष. चिरंजीव राजश्री मल्हाररावाचे लग्नाचा निश्चय माघमासी शुद्ध १० गुरुवारचा जाहला असे. शरीरसंबंध राजश्री खंडोजी लाभांते यांसी जाहला आहे. हें वर्तमान वडिलांस सविस्तर कळावे यास्तव जिवाजी बाबुराव सेवेसीं पाठविले आहेत. विनंती करतील ते सर्व ध्यानांत आणोन लग्नास अविलंबें यावें म्हणजे माझे मनोरथ सर्व कृतार्थ होतील. न्यूनाचें पूर्ण करणे वडिलांकडे आहे. हें फळ आपल्या आशीर्वादाचे आहे. याजकरितां आपणच येऊन लग्न सिद्धीस न्यावें. मिती मार्गशीर्ष वद्य ६.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 385 7-12-1781 A.D.

Subhagyawati Rakhmabai Holkar sends invitation letter of marriage of her son Malharrao, to Ahilyabai. The bride is daughter of Khandojee Lambate.

---

**अ. नं. ३८६** **श्री**

ता. ८ डिसेंबर, इसवी सन १७८१

तीर्थरूप मातोश्री बाईसाहेब वडिलांचे सेवेसीं. अपत्ये मल्हारराव यानें चरणीं मस्तक ठेवून साष्टांग दंडवत विज्ञापना. येथील कुशल जाणून स्वकीये लिहित आज्ञा केली पाहिजे विशेष. बहुत दिवस झाले वडिलांकडून पत्र येऊन परामर्ष न झाला. ऐसें नसावें, सदैव पत्रीं आज्ञा करावी. माझे पहिलेपासून चित्तांत कीं महेश्वरीं लग्न व्हावें व समारंभ आपण करावा हे बहुत. प्रस्तुत वाफगांवीं ठरून तीर्थरूप सुभेदार साहेबांनीं आपल्याकडे तीर्थस्वरूप दादासाहेबांस इकडे येण्याचे सूचनेस पाठविलें आहे. तरी वडिलीं माझ्या लग्नाकरितां आगत्य यावयाचें केलें पाहिजे. येणेंकरून माझें समाधान होईल. माझा हेतू पूर्ण करणें वडिलांकडे आहे. आगत्य यावें. मिती मार्गशीर्ष कृष्ण ७ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 386 8-12-1781 A.D.

Malharrao Holkar the bride-groom sends an invitation-letter of his marriage to Ahilyabai, and requests her to be present at Wafgaon where the ceremony is to be celebratad.

---

**अ. नं. ३८७** **श्री**

सुभा राजश्री तुकोजीराव होळकर रोजकीर्द, ता. १-२-१७८२

सदाशिव रघुनाथ कमाविसदार परगणे रावेर यांसी कीं परगणे मजकुर पैकीं देह ६ सहा येणेंप्रमाणें : १ मौजे खानापुर, १ उटखेड, १ वाघाडे, १ अहिरवाडी, १ जयायखेड, १ अजनाड. एकूण सहा सरकारांतून खाजगीकडे ठेवून तेथील काम साल मजकुर पासून गंगाधर बल्लाळ यांजकडे सांगून हें पत्र सादर केलें असे. तरी मशारनिल्हेचे हातें काम घेत जाणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 387 1-2-1782 A.D.

The Kamavisdar of Pargana Raver is ordered to note that 6 villages (mentioned in the order) are transferred to Khasgi Department, and that they are to be managed by Gangadhar Ballal.

---

**अ. नं. ३८८** **श्री**

ता. ३ फेब्रुवारी, इसवी सन १७८२

राजश्री राणा उमेदसिंग संस्थान आबास बडवाणी, गोसावी स्नेहांकित अहिल्याबाई होळकर विनंती उपरि. येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत जावें. विशेष. संस्थान मजकुरीं कित्येक बखेडे होऊन प्रांताची खराबी होती. त्याचा बंदोबस्त राखून आपले मातोश्रींचे आज्ञेप्रमाणें चालावें. ते करीत नाहीत यास्तव हे पत्र लिहिलें असे. तरी अतःपर बेसावध न राहतां संस्थान मजकुरचा बंदोबस्त राखून आपले मातोश्रींचे आज्ञेत राहात जाणें. रवाना छ.१९ सफर सनइसनेसमानीनमयावआलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड हुजूर फडणीसी**

No. 388 3-2-1782 A.D.

Rana Umedsing of Barwani is reprimanded by Ahilyabai for the disturbed condition of the principality. He is exhorted to obey his mother.

---

**अ. नं. ३८९** **श्री**

ता. २१ मार्च, इसवी सन १७८२

सुभा राजश्री तुकोजी होळकर रोजकीर्द मुक्काम महेश्वर छ.६ ऊर्फ चैत्र मास.

आबाजी विष्णु कमाविसदार थालनेर यांसी कीं, मौजे वजावल व मौजे मानेरानदे व मामचे वगैरे खाजगीकडील गांव तेथें तुम्ही नवीन पट्टीचा ऐवज मागतां म्हणोन हुजूर विदित झाले. ऐसियासी खाजगीकडील गांव यांसी पट्टी द्यावयाची रीत नाही. नवीन कराल ते सिद्धीस कसें जाईल. तरी अतःपर खाजगीकडील गांवांस पट्टीचे ऐवजाविशीं मुजाहिम न होणें. म्हणोन पत्र हुजूर निस्बत हरकाबाई.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 389 21-3-1782 A.D.

Tukojeerao Holkar takes the Kamavisdar of Thalner to task for levying charge on certain Khasgi villages-an innovation as it was.

---

**अ. नं. ३९०** **श्री सरस्वत्यैनमः**

ता. १४ मे, इसवी सन १७८२

बातमीदाराकडील वृत्त :

नजीब कुलीखानाचा सलूख जाहला. त्याचा दिवाण जयसिंगराव खत्री येथे आला. बोलणें शिष्टाचार. दोन परगणे त्यास द्यावे त्यानें चाकरी करावी. याप्रमाणें ठरलें आहे. आपली जमियत नजबकुलीखांचे शहावर नंदराम हळधाचे तैनातीस होती ती आली. येथें चारियांचा तोटा; याकरिता हिंडोणकडे रवाना करितो. तिकडे अंमल तर हमदानीनें केला आहे. सोय तर नाहीं. धर्मदास भवानीपाशीं जातील चारियाची सोय होइल. खर्च भारी शिबंदी चढती. सावकाराचे भर घालून. नित्यकृत्य कठीण. उठोन यावें तर टोंक राहत नाही असा प्रकार आहे. याची आज्ञा करणें ते करावी त्याप्रमाणें वर्तणूक केली जाईल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 390 14-5-1782 A.D.

News-letter from Tonk : Peace is concluded with Najibkulikhan. Our army has returned. There is scarcity of grass here. Expenses are daily increasing. In case I leave this place, Tonk will no longer be ours.

---

**अ. नं. ३९१** **श्री**

चैत्र शके १७०४, इ. स. १७८२

श्रीमंत राजश्री मल्हारराव होळकर यांचे लग्नाबद्दल कर्जपट्टी लावली त्याचा जाबसाल राजश्री त्रिंबक विनायक व केसोपंत कुंटे यांचे मार्फतीनें वाफगांवचे मुक्कामीं ठराव जाहला. सुरूसन इसनेसमानीन मयावअलफ. सन ११९१ माहे रविलाखर चैत्र. राजश्री बळवंतराव गोविंद वाकडे यांजला देविले रुपये १५००० पंधरा हजार फडशा केला. वरात पत्र व चिठ्ठी वाफगांवींच आहे. ऐवज भरणा बर्डावदपैकीं चतुर्भूज याजपासून घेतले.

**संस्थान पळसी रेकार्ड**

No. 391 1782 A.D.

A note on "Marriage payment" (at the marriage of Malharrao) was drawn up. The writer says he paid Rs. 15,000/- as his part. He borrowed the amount from Chatrubhuj of Bardawad.

---

**अ. नं. ३९२** **श्री**

ता. १८ मे, इसवी सन १७८२

गंगाजलनिर्मळ अहिल्याबाई होळकर यांसी स्नेहांकित बाळाजी जर्नादन (नाना फडणीस) आशीर्वाद विनंती. उपरि येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असावे. विशेष. आपण पत्र पाठविलें ते प्रविष्ट जाहलें. श्री. बाजीराव बरवे यांजविषयीं आपलेकडील पत्रें आली त्याजवरून मशारनिल्हेस आणावयाकरितां रा. विसाजी काशी कारकून पाठविले असतां हल्लीं त्याचे येण्यास ओढ असा भाव आपले पत्रांत दिसोन आला व कलमबंदीचे यादीची नक्कल आली. त्यांत पाहतां श्री. कै. नानासाहेबांचे कारकीर्दीप्रमाणे चालवावें. निसबतीचे कारकुनाच्या असाम्या चालवाव्या वगैरे मजकुर कळला. अशास इतक्यांचे प्रयोजनच नाही. पहिलें आपण लिहिलें त्यावरून त्यास आणविलें. त्यांनीं निखालसपणें यावें. स्वस्थतेची सोई करून देऊं. ती घेऊन वांकडी वर्तणूक न करितां स्वस्थ स्नानसंध्या करून असावें. हे अनकूल न पडे आणि तेथें आपल्याजवळ रहावे असे असलिल्यास सरकारची घोडीं वगैरे त्याजपाशी असेल तें विसाजी काशी यांजबरोबर पाठवून द्यावें. त्यातील त्यांनीं कांहीं ठेऊं नये. ह्याप्रमाणें मशारनिल्हेस आपणाजवळ बंदोबस्तानें ठेवावें. रवाना छ.२५ जमादिलावल. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती. पैवस्त मुक्काम महेश्वर छ.५ ज.खर. ऊर्फ अधिक शुद्ध ७ इसनेसमानीन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 392 18-5-1782 A.D.

Balajee Janardan (Nana Fadnis) writes to Ahilyabai that he was in receipt of the latter's letter regarding Bajirao Barve. Nana promises every protection and facility to Barve: Nana gives him an alternative too, to stay with Ahilyabai under certain provisions.

---

**अ. नं. ३९३** **श्री**

ता. २६ जून, इसवी सन १७८२

बाबुराव वाघमारे यांजकडोन मातोश्री अहिल्याबाईंस पत्र.

येथील कुशल ज्येष्ठ वद्य ११ जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. घरांत शरीरास समाधान नव्हते. शौचास व ज्वराचा उपद्रव झाला होता. दीड महिना श्री नाथांचे देवालयापाशीं राहिलो परंतु शौचाचा व ज्वरांत कांहीं अंतर न पडे. वायुचा उपद्रव झाला. पोट फुगले. हे वर्तमान वाफगांवीं राजश्री तुकोबांस कळलें. तेव्हां त्यांनीं येथें येऊन वाफगांवीं घेऊन गेले. तेथें नेल्यानंतर वीस दिवस औषध उपाय बहुत केले. परंतु कांहीं गुणास नाहीं सबब खडकीस आले. येथें आल्यास सात दिवस जाले. औषध उपाय नित्य करीत आहों. परंतु दिवसेंदिवस क्षीणता जाली. पोट तिळतुल्य उतरत नाही. नाना प्रकारच्या मात्रा व काढे वैद्यउपाय उदंड केले. शब्दही उमटत नाही. पथ्यपाणी गिळावयास कठीण पडतें. असें ईश्वरें संकटांत घातलें आहे. दुसरें, भैरव गज हत्ती तेथें आहे. तो श्री ओंकारेश्वरास वाहावा म्हणोन सांगितले आणि संकल्प आपले हातीं सोडला. आपणास पत्र लिहिलें आहे कीं मातुश्रींस विनंतीपत्र लिहून हत्ती ओंकारेश्वरास पोहचता करावा; याजकरितां वडिलीं आगत्यरूप हत्ती ओंकारेश्वरीं पाठवून द्यावा, ह्या संकटातून परमेश्वर पार पाडून पाय दृष्टीस पडतील तो सुदीन आम्हास आवार सर्व प्रकारें वडिलांचे पाय आहेत. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना. पैवस्त छ ७ साबान सन ११९२ मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकार्ड**

No. 393 26-6-1782 A.D.

Baburao Waghmare informs Ahilyabai of the serious illness of his wife. Bhairao Elephant is to be presented to Onkareshwar God. Ahilyabai is requested to see to it.

---

**अ. नं. ३९४** **श्री**

ता. २६ आगस्ट, इसवी सन १७८२

श्रीमंत मातोश्री बाईसाहेब साहेबांचे सेवेसीं. आज्ञाधारक खंडो जगदेव अनेक आशीर्वाद विनंती येथील क्षेम तागाइत श्रावण वद्य ३ साहेबांच्या कृपादृष्टीकरून यथास्थित असो. विशेष. येथील वर्तमान आषाढ वद्य १० चे साहेबांकडून हलकारे जोडी याजबरोबर सविस्तर सेवेशीं विनंती लिहिली ते प्रविष्ट होईल. सांप्रत वर्तमान आयुध्येमध्यें बेगमेवर चौक्या सात लाखाकरितां बसविल्या होत्या, त्याचा दारमदार होऊन रुपये द्यावेसे केलें, याजकरितां चौक्या नबाबांनीं उठविल्या. आतां आयुध्येंत अम्मळ चैन झाले आहे. बेगमेकडील खोजे दोघे कैदेत होते. आज पांच सात दिवस झाले, त्यांस अयोध्येंत बेगमेकडे पाठविलें. रुपयाची भरती झालिया, कैदेतून मुक्त होतील. थोरले बेगमेकडे बहुत प्रयत्न

करून पाहिला. परंतु कांहींच दिलें नाही. इसमाल खोजा अंतरवेदीचा मामलेदार कोयेल सिंकदरानजीक गेला होता. नबाबांनीं व फिरंग्यांनीं व हैदरबेग खानांनीं बहुताप्रकारें खातरजमेचीं पत्रें पाठवितात. परंतु याचा विश्वास धरीत नाहीं. नबाबांनीं करार करून पाठविलें कीं तुम्ही आपले मामलतीवर कायम राहणें. हुजूर न यावे. त्यावरून गंगापार छावणी इसमाल याची होती तेथें फिरोन आला आहे. येथोन नबाबांनीं तिघेजण मातब्बर शिरपाव देऊन पाठविले आहेत. याउपरि मामलत कबूल करितो किंवा कसे हें पाहावे. नबाबांपाशीं फौजेचा बळ किती हें साहेबास पूर्वी लिहिलेच आहे. एक प्रालब्ध दररोज चालतें. आपले घरची शुद्ध नाहीं. चाकर कोण, मुलखातून काय येतें, फिरंगी काय घेतात, बळेंच राजा होऊन वर्तणूक करितात. जें करणें हैदरबेग खान करीत आहे. फिरंगीयासीं मिळोन त्याचें घर भरतात. नबाब नांवाचा मात्र आहे. कलकत्याकडील वर्तमान मद्रास येथील खबर आहे कीं, टामसग्राम फिरंगी दोन कोटच्या टीपा घेऊन हैदर नाईकाकडे गेला आहे. हे रुपये देऊन मद्रासकडील मार्ग चालता करावा. जो मुलुख तुम्हीं घेतला तो घ्यावा. परंतु मद्रास व कलकत्यास उपद्रव न द्यावा. तुमचा आमचा सलुख राहवा ऐसे किती एक प्रकारें हैदर नाइकास लिहिलें आहें. परंतु सलूख करितां दिसत नाहीं. इस्टीन फिरंगियांनीं कर्नल गाडर यांस लिहून पाठविलें आहे कीं, श्रीमंत स्वामींस सलूख करून मंदराज येथें जाणें, इंद्रसेन फिरंगी (अंडरसन) राजश्री पाटीलबाबापासीं आहे त्यास कलकत्याहून आज्ञा आली कीं ज्या स्थलीं कर्नल गाडर आहेत तेथें जाऊन राहणें आणि त्यास मंदराजकडे पाठवून देणें. याप्रमाणें आज्ञा आली आहे. नागपुरकर भोसले यांस बहुत प्रकारें सलूख राखितात. पूर्वी चाळीस लाख रुपये दिले होते सांप्रत सत्तर लाख रुपये देऊन आणि सलूख करावे हा मनोदय असे. फिरंगीयासी फौजेचा बळ फार असें नाही. दबावून मुलूख खातात. दिल्लीकडील वर्तमान अफराशहांखान व लतापत व ननेकुलीखान व गोसावी हे सर्व मिलाफी आहेत. मिर्जा सफीखान ननेबखान याची बहीण हे उभयतां एक आहेत. अफराशहासी सलूख नाही. आपसांत फितूर आहे. महमदबेग अमदा व ननेबखान याच्या तर्फेने ढवलपूरचा मामलेदार यानें हिंमतबहादर गोसावी यांजकडे मुलूख होता तो महमदखानानें घेतला. गोसावीची जहागीर बंद करून जप्ती केली. याजवरून गोसावी यानीं पातशहापाशीं अर्ज करून हुकूम घेऊन दिल्लीहून निघाले हें वर्तमान आहे. उभयतांची लढाई होणार. गोसावी यांचे कुमकेस आफराशाहा वगैरे रवाना होणार. अद्याप दिल्लीहून निघाले नाहीं. जाबतेखान याचे वर्तमान तर गोसगडीं आहे. फौजही ठेवीत आहेत. पथरगडाकडे येण्याचा इरादा आहे. आयुध्या व नैमिशारण्य येथील आज्ञा आली कीं त्यास नबाबाचा व फिरंगीयाचा परवानें घेऊन आम्ही आपल्यापासी ठेविले आहे. आज्ञा जालिया काम चालूं लागेल. कारेगर व सरंजाम वगैरे सर्व बंदोबस्त करून ठेविला. हुकुम यावा. हे मार्गप्रतिक्षा करीत आहे. सेवकापासून सेवा घडून ये ते करणार साहेब समर्थ आहेत. माझा प्रतिपाळ साहेबाखेरीज होणार नाही. चरणासीं धरून एकनिष्ठें आभिष्टचिंतन करीत बसलों आहे. प्रतिपाळास आज्ञा होय हे विज्ञापना.

पैवस्त मुक्काम महेश्वर छ २५ सवाल फसली सन ११९२.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 394 26-8-1782 A.D.

Khando Jugdeo (Holkar Ambassador at the Oudh Court) informs Ahilyabai of the court affairs. Begums, the Nawab, the East India Company and HyderAli.

---

**अ. नं. ३९५** **श्री**

ता. १२ सप्टेंबर, इसवी सन १७८२

आबाजी विष्णु कमाविसदार यांचे अहिल्याबाईंस पत्र श्रावण वद्य १३ मुक्काम जेनाद प्रगणे रामपुरा. दातोली घेतल्याचें वर्तमान सेवेसीं पूर्वी लिहिलेंच आहे. दोन्ही गढ्या पाडोन मनासा, पडदा येथें दोनशें स्वार व तीनशें प्यादे ठेवून बंदोबस्त करून मौजे पडद्यास लोखंडाचे आगर, वस्ती भारी, चंद्रावताचे दहशतीमुळें, गांव उजाड होऊं लागला तेव्हां तेथें गढी बांधावयास लावून येथें आलों. उदईक रामपुरियास जाऊं. गरोठकडे सोद्यांनीं व भानपुरीं भिल्लांनीं उपद्रव दिला आहे. दोन्हींचे पारिपत्य करावें लागतें. महालचे लावणीचाही बंदोबस्त करीत असूं. परन्तु लोक नादार, साल मजकुरीं पर्जन्य मागसलेला, त्यांत दंगे अनेक प्रकारचे आहेत. साहेब चाकरीस अंतर होणार नाही. सविस्तर सदाशिव यादव यांस लिहिलें आहे. ते सेवेसी निवेदन करतील. आज्ञेप्रमाणें वर्तणूक केली जाईल. बहुत काय लिहिणें. कृपा करावी हे विज्ञापना.

**सरकारी रेकार्ड**

No. 395 12-9-1782 A.D.

Abajee Vishnu, Kamavisdar informs Ahilyabai of the disturbed condition of the Mahal due to the highhandedness of the Chandrawats, the scarcity of rain, the raids of Bhills and Sondhias. He solicits her orders as to the way to quell the disturbances.

---

**अ. नं. ३९६** **श्री**

ता. १५ सप्टेंबर, इसवी सन १७८२

श्रीमंत गंगाजळनिर्मळ मातोश्री बाईसाहबांचे सेवेसीं आज्ञाधारक गेहलासा कमाविसदार परगणे नागलवाडीनजीक सेंधवा. चरणावर मस्तक ठेवून साष्टांग दंडवत विनंती विज्ञापना ऐसिजे, येथील कुशल जाणून स्वकिये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. आज्ञापत्र पाठविलें तें पावलें, लिहिलें कीं, राजश्री संताजी होळकर याजला तुम्हीं एक पत्र लिहून पाठविणें कीं, पेंढारी लोक जेथे होते तेथेंच मागती पाठवून द्यावे. त्यास आम्हीं त्यांजला लिहिलें तों दरबार महाराजांस विदित आहे. आमचें लिहिलियाचे व सांगितल्याचे ते मान्य करीत नाही आणि मी तो आज्ञांकित महाराजांचा आहे. त्यांजला ताकीद महाराजांचीच जाहली पाहिजे. बहुत काय लिहिणें, हे विज्ञापना.

**सरकारी रेकार्ड**

No. 396 15-9-1782 A.D.

The Kamavisdar of Pargana Nagalwadi writes to Ahilyabai that his letter to Santajee Holkar regarding the disposal of the Pendharis has passed unnoticed. Ahilyabai should now take the initiative.

---

**अ. नं. ३९७** **श्री**

ता. १७ सप्टेंबर, इसवी सन १७८२

आबाजी विष्णु यांजकडून, मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. भाद्रपद शुद्ध ५ मुक्काम रामपुरा येथे महाराजांचे कृपाकटाक्षेंकरोन यथास्थित असो विशेष. येथोन महालचे व दातोलीचे गढी घेतल्याचें वर्तमान विनंतीपत्रानें सेवेसीं कळविलेच आहे. मनासा, पडदा, येथें दोनशें स्वार व दोनशें माणूस ठेवून तिकडील बंदोबस्त करून श्रावण वद्य १४ शुक्रवारीं ठाण्यांत आलो. येथें आलियावर शुद्ध १ रविवार रोजीं अंत्र्यांळाचें राउतानें रत्नागिराचे उंट सुमारी तीनचारशें घेऊन गेले. रा. व्यंकोजी बाबुराव दोन तीनशें स्वारांसह त्यांचेमागें गेले आहेत. कथोलीकर राउतानेंही सोंदेगिरी चालविली आहे. मंदोसर, चंदवासे टप्प्यांत चर्मन्वतींत नाव नवीन घालोन कजिया करावयास उभे राहिले. ऐसा चहूंकडून महालीं बखेडा चालू आहे. सविस्तर रा. सदाशिव यादव सेवेसीं श्रुत करतील. आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक केली जाईल. पडद्या गावीं गढी बांधावयाचें काम लाविलें आहे. चौधरीयाचा मजकुर सर्व महाराजांचे ध्यानांतच आहे. जेणेंकरून महालचा बंदोबस्त होऊन सरकारचा पैसा येई व पुढें बखेडा न वाढे ऐसा दुरंदेश बंदोबस्त करणार खावंद समर्थ आहेत. श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकार्ड**

No. 397 17-9-1782 A.D.

Abajee Vishnu from Rampura writes to Ahilyabai in respect of the disturbed condition of Mahal Rampura. He seeks her orders as to the ways and means to restore peace, and collect revenue.

---

**अ. नं. ३९८** **श्री**

ता. २३ आक्टोबर, इसवी सन १७८२

श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांचे सेवेसीं आज्ञाधारक यशवंतराव गंगाधर (चंद्रचूड) कृतानेक आशीर्वाद विज्ञापना. येथील वर्तमान छ.१५ जिल्कादपावेतों मुक्काम पुणें. साहेबांचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे विशेष. साहेबीं तीर्थस्वरूप राजश्री मामांची रवानगी इकडे केली व पत्रें श्रीमंत नाना व तात्या यांशीं स्पष्ट भाव दर्शवून लिहिली ती आणि मजला व रा. बाबुराव वैद्य आदिकरून पत्रें पाठविली तीं शिरसावेदिलीं. उभयतां श्रीमंत नाना व तात्या यांची मातुलाची भेटी बोलणें निवळ जाहले. पत्रें दिली. आपणांकडील वर्तमान बहुत आगत्यवादें उभयतांनीं पृथक् पृथक् आपलेपरी पुसिलें. ते आज्ञेप्रमाणें विनंती केली तें श्रवण करून उभयतांनींही आपले ठिकाणीं लोभाचे अर्थ व आपले स्वरूप जतन व्हावें हेच भाव बोलण्यांत आणून आमची खातरजमा केली. प्रस्तुतचा प्रसंग सरकारावर संकटें कशीं आहेत. राज्य निरद्रव्य जहालें. श्रीमंत स्वामींचे पुण्येंकरून व धैर्यकरून एक एक दिवस ढकलितों. अशासमयीं मातुश्री दुरंदेशीं सर्व समजतात आणि राज्याची काळजी आम्हांपेक्षां अधिकोत्तर त्यांस आहे. घरांतील क्षुल्लक गोष्टी पुढें न आणितां सरकारलक्षास जपून चालतात हे सर्व श्रीमंतांच्या ध्यानांत आहे. त्यांचे लिहिल्यावरून व राजश्री पाटीलबाबांचे लिहिल्याप्रमाणें राजश्री तुकोजीबाबा देशीं भागी होऊन आले, त्यांसी समेट धरून वचनीं सहसंगीं गुंतो लागले. त्यांनीही हा काळपावेतों वाकडेपणा कोठें दाखविले नाही तेव्हां त्यांची पुस्तपन्हा पाहणें प्राप्त. श्रीमंतांच्या दोन्ही दौलती दोन पक्ष हे शाबूत तरी शत्रू सारे दाबाखालीं राहून राज्यास उपयोग. यामुळें कांहीं मातुश्रीस अधिक उणें लिहावे लागतें, हे गोष्ट त्यांसही समजावयाजोगी आहे. याकाळीं श्रीमंतांसही वडिलांप्रमाणें मातोश्रीबाई आहेत आणि लक्षही तसेच धरितात. तेव्हां रागे भरावयास रुसावयास आणखी आप्त मनुष्यें इतर कोण आहेत? आम्ही समयास उचित तें सुचवितों, लिहितों याची विकृती चित्तांत न मानितां ज्यांत दौलतीचें कल्याण आणि सरकारास उपयोगी तेच जपत असावें. वरकड त्यांचे भाव वडिलपणा स्वरूपांत कमी करावयाचें नाही. हे निशा असावी. आम्ही जेथें गुंतलों त्याचा निर्वाह आणि आपलें स्वरूप राखुन सर्वांवर दाब अशी हातवटी मातुश्री सर्व रक्षतील. जवळ चार माणसें आहेत तेही जुनीपानी. खावंद सर्वांस जाणतात तेही मातुश्रींस प्रसंगीं उचित पक्ष सुचवून आपल्याकडे

कोणेविशीं दोष देणार नाहींत. मुळीं खावंदापाशीं वाकडी चाल नाही तेव्हां पदरची माणसें वावगी वर्तणूक करतील हे कसें घडेल? या उपरांतिक तुम्ही मातुश्रींस लिहून सरकार आज्ञेचे लक्ष धरून पल्ल्यावर नजर ठेवून बरोबरीची दौलत पेचांत आली, बुडावयास बाकी राहिली नाहीं. दुरंदेशींतें दौलत राखून जतन केल्यास सर्वांचीं स्वरूपें राहतील. असे संकल्पविकल्पाचे दिवस चिरकाळ राहणार नाहींत. सर्व गोष्टी घडतील. दौलत पेंचात आली तर सांभाळणें अवघड पडेल. हे अवघे मजकुर मातोश्रींस सुचवून चढी न चढतां याउपरि उपसंहार करणें हेच उचित व उत्तम. ऐसीं बोलणीं उभयतांनीं निःपक्षपात रुजू मार्गाची आज्ञा केली ती विनंती लिहिली आहे. श्रीमंत राजश्री पाटीलबाबांकडे याचा इतल्ला करून ते व आपण उभयतांनीं श्रीमंतांचें वचनीं विश्वास ठेवावा. लिहिल्याप्रमाणें, निदर्शनास येई तो अर्थ करणार खावंद समर्थ आहेत. आम्ही श्रीमंतांचें पायासन्निध असों आणखीही प्रसंगोंचित विनंती करणें तें करीतच येथील आसों. येथील मर्जीचा भाव वरचेवर लिहून पाठवूं. सारांश, श्रीमंत नाना व तात्या यांची ममता महाराजांचे ठिकाणीं यथापूर्वक आहे. उभयतां सर्वज्ञ आहेत. कोणतेही प्रकारें आपले घरची ऐक्यता असून, दोन्ही दौलती शाबूत उभयतां खावंदाचे मनोगत संरक्षण होऊन असाव्या हेच विवंचना रात्रंदिवस आहे. आपल्याकडे सरकारचे कारकून बोलावयास आले आहेत व आणखीही कोणी येतील त्यांसी बोलणें ते एकवेळ कागदपत्रीं लिहिण्यांत आले, त्याप्रमाणेंच सरकारलक्षांत पक्केपणा असावा आणि श्रीमंतांची मर्जी रक्षावी यांतच परिणाम शुद्ध आहे. पत्रार्थ ध्यानास आणून उत्तराची आज्ञा केली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ.१ जिल्हेज सन ११९२ मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 398 23-10-1782 A.D.

Yeshwant Gangadhar Chandrachud (Holkar ambassador at the Poona Court) writes to Ahilyabai about the interview he had with Nana Fadnis and Phadke, and the latter's desire to see that both Holkar and Scindia should be agreeable to each other and do service to the Peshwa.

---

**अ. नं. ३९९** **श्री**

ता. २१-१२-१७८२

राजश्री बाळाजीपंत नाना फडणीस, यांसी अहिल्याबाईंकडून पत्र. आपण छ.१५ मोहरमचें पत्र पाठविलें ते पावून बहुत संतोष झाला. माळवे प्रांताचे महालपैकीं खर्च जाऊन बाकीचा ऐवज राजश्री तुकोजी होळकर यांजकडे पाठवावयाच्या अन्वयें वारंवार

लिहित गेलों व केसो भिकाजी कारकून यांजला पाठविले त्याशीं बोलणे होऊन महालचे ऐवजास बयान लावून याद पाठविली. त्यास श्रीमंतांस मसलत त्या अर्थी आपले दौलतीचा उपयोग किती असावा असा विषय मनात आणून बयान लागणार नाही. तूर्त सावकार, मामलेदार यांचे देणेपैकीं ऐवज कोणास न देतां पाठवून द्यावा, म्हणोन विस्तारेंकरून लिहिलें. ऐसियास माळव्यांतील महालची वहिवाट जशी जाहिली त्याप्रमाणें कच्चा मजकुर आपल्यास लिहित गेलो. करणें एक आणि लिहिणें एक अशी रीत पहिल्यापासून नसतां आपले लिहिण्यांत बयान लावून लिहितों ऐसें येऊन ऐवज पाठवावा याचअन्वयें पत्रें येतात. त्यास आपलेकडील कारकून येथें आहेत त्यांजलाही कोणता अर्थ माहित नाहीं असें नाहीं. तेव्हां वारंवार लिहावेसें काय? सावकार व मामलेदारांस देण्यांत ऐवज येथूनच देविला असें नाही. तत्रापि दिला ऐवज माघारे घ्यावा अशीच रीत ठरल्यास तेही तेथेंच आहेत. रवाना छ ११ जमादिलावर बहुत काय लिहिणें लोभ कीजे ही विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 399 21-12-1782 A.D.

Ahilyabai's reply to Nana Fadanvis : All accounts have, until now, been submitted to the Poona Government. You state that all the collections should now be submitted to the Peshwa for the campaign, without paying a farthing to Mamlatdars and bankers. If such be the declared policy, the payees are all present there.

---

**अ. नं. ४००** **श्री**

ता. २५ डिसेंबर, इसवी सन १७८२

पत्रव्यवहार राजश्री हरी बल्लाळ फडके पुणें व मातुश्री अहिल्याबाई होळकर

गंगाजळनिर्मळ मातुश्री अहिल्याबाई यांस. स्नेहांकित हरी बल्लाळ आशीर्वाद विनंती उपरि. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे विशेषः आपणाकडून प्रस्तूत पत्र येऊन कुशलार्थ कळत नाहीं. त्यास ही गोष्ट भाऊपणास उचित नाही. आपले दौलतीचे कल्याण असावे हीच इच्छा; व मसलत सांगू ती आपले कल्याणाचीच सांगू येविशीं संशय न धरावा. खातरजमा असावी. येविशींचे अर्थ राजश्री माधवराव मुरार याजवळ बोलिलो आहों. ते लिहितील त्यावरून कळेल. उत्तर लौकर पाठवावें. रवाना छ.१९ मोहरम बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे ही विनंती. पैवस्त छ.५ रविलाखर सन ११९२

मुक्काम महेश्वर.

No. 400 25-12-1782 A.D.

Haripant Phadke assures Ahilyabai of his friendship and goodwill. Madhaorao Murar will write in the matter.

---

**अ. नं. ४०१** **श्री**

**उत्तर**

राजश्री हरीपंत गोसावी यांसी. दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत असावें विशेष. आपल्याकडोन छ १९ मोहरमचें पत्र आले तें पावून बहुत संतोष जाहला. आपलेपणानें आपण लिहिलें त्यास सरकारचे माणसासमागमें कामकाजामुळें श्रीमंतांची अथवा नानांची पत्रें येतात. त्याजसमागमें त्याचींच उत्तरें जातात. याखेरीज येथून पत्रें जेव्हां पाठवितों त्याजबरोबर आपल्यासहीं पत्र पाठवीतच असतों त्यावरून चिरंजीव राजश्री तुकोबा देशीं आहेत त्यांचे सांगितलेवरून सविस्तरें कळतच असेल. आपली स्थिती आपले हातें कोणाचेही कल्याण घडावे हेंच, त्यांत येथील पहिल्यापासून आगत्य आणि भाऊ म्हणवितां त्याअर्थी खातरजमा पेशजीपासून आहेच; व हल्लीं आपले पत्रावरून अधिकोत्तर झाली. भाऊपणीयाचे रीतिस चालेल तेथवर अंतर न करावें हेच विहीत आहे. कैलासवासी तीर्थरूप सुभेदारांपासून येथील लक्ष दवलतीची वहिवाट चालत आली. त्याअन्वयें चालून सरकारचाकरी घडून श्रीमंतांचा व नानांचा संतोष असावा आणि राजश्री महादजी शिंदे यांचा भाऊपणा वडिलांपासून चालत आला त्यांत अंतर नसावे. याहून दुसरें नाहीं हें आपलेही ध्यानांतच आहे व आगत्यवादाने दौलतीचे कल्याणाची इच्छा त्याअर्थी विस्तारें लिहावेंसे काय? चांगला सल्ला असेल तो सांगायला हवा हें उचित आहे. सर्वदा पत्रद्वारें संतोषवित असावें कळावें ही विनंती.

**होळकर सरकारचे रेकॉर्ड**

No. 401

In reply Ahilyabai assures Phadke of the "will to serve" and goodwill towards the Peshwa and Nana from the times of the late Subhedar. All disinterested counsel is welcome.

---

**अ. नं. ४०२** **श्री**

इ. स. १७८२

गंगाजलनिर्मळ अहिल्याबाई होळकर यांसी. प्रती सकुबाई शिंदे क्षेमालिंगन विनंती उपरि येथील कुशल छ.१० रमजान पर्यंत यथास्थित आसो विशेष. चिरंजीव सौभाग्यवती बायजाबाई भोसले सरदेसाई प्रांत कुडाळ व महालानिहाय यांची कन्या चिरंजीव राजश्री जानराव धारराव निंबाळकर यांसी दिली. त्यास चिरंजीव निंबाळकर संस्थान हैदरनाइक यांचे उपद्रवामुळें येथें आले. पांच सात वर्षें आम्हांपाशीं आहेत. पुढें खर्चवेच चालावा लागतो. याअर्थी आपणापाशीं पाठवावयाचा विचार केला आहे. त्यास जैसी सौभाग्यवती मुक्ताबाई यांचे चालविणें आपणास आवश्यक, तसेच सौभाग्यवती बायजाबाईचे चालविणें हे ही लेक आपलीच आहे. मायेचा विषय जाणोन आपणास पत्र लिहिलें आहे. आम्हांपासीं चिरंजीव असावे किंवा आपणांपासीं असावे या अर्थी दसरियास आपणापाशीं येतील. आपण बंदोबस्त आपल्या विचारास येईल तैसा करावा येविषयीं विनंती राजश्री व्यंकाजी रामचंद्र करतील. येथोन सिधोजी माधव पाठविले आहेत. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असावा हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 402 1782 A.D.

Sakubai Shinde requests Ahilyabai to take Nimbalkar under her protection and guardianship. The latter has quitted his territory for the last five or six years owing to apprehensions of Hyder Naik.

---

**अ. नं. ४०३** **श्री**

ता. २ फेब्रुवारी, इसवी सन १७८३

अहिल्याबाई होळकर यांस. माधवराव लक्ष्मण हैदराबाद यांजकडून घोसाच्या पुत्रानें नबाबासीं एकनिष्ठेंत अंतर केल्यामुळें फौज पुढें रवाना केली होती. मागाहून खासास्वारी दरकूच क्षेत्र राजेश्वरपर्यंत आले. येथून निर्मळ तीस कोस आहे. भोसल्याकडील फौज येणार. श्रीमंतांकडूनही फौज नबाबाचे कुमकीस रवाना झाली आहे. सत्वर येऊन पोचती. बंदोबस्त थोडकेच दिवसांत होईल म्हणोन लिहिलें. ऐशियासीं घोशानें एकनिष्ठपणें सेवा केली या वरून नबाबानींहीं लोभ करून वाढवावयाची कमी केली नाहीं. त्याचे पुत्रानें रीत सोडून चाल धरली तदनुसार फळही पावतील. ज्यापासून वाढले त्यासीं अवक्रिया केल्यानें परिणाम लागत नाहीं. राजेश्री मुधोजी भोसले सेनाधुरंधर यांजकडील फौज रवाना झाली ते येऊन पोंहचलीच असेल. श्रीमंतांचे लक्षास नबाबाचे जपणें अंतःकरणपूर्वक कसे आहे. त्या अर्थी

श्रीमंतांनीं नबाबाचे कुमकीस फौज रवाना केली उचित आहे. सांप्रत मुक्काम कोणे ठिकाणीं आहे त्यांजकडून कांहीं मार्गावर येऊन जाबसाल करावयाची रीत आहे किंवा निगृह जशी त्याची चाल असेल तसा बंदोबस्त करणें. नबाबास आगाधही नाहीं घडेल तसें वर्तमान वरचेवर लिहीत जाणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 403 2-2-1783 A.D.

News-letter from Madhaorao Laxman of Hyderabad to Ahilyabai and her reply :

The Peshwa has sent army in aid of the Nawab. Ahilyabai approves of the measure.

---

**अ. नं. ४०४** **श्री**

ता. २-२-१७८३

अहिल्याबाई यांजकडोन पत्र. माधवराव लक्ष्मण हैदराबाद यांस. छ.२९ सफर ११८३ आर्बी. तुम्ही प्रेमपुरःस्सर येथें श्री मार्तंडापाशीं चौघड्याविशीं दोनतीन वेळां लिहिलें. त्यास ही गोष्ट घडणें, घडविणें इच्छा सर्व त्याची आहे. अशी कामें लिहिल्यानें अथवा सांगितल्यानें घडतात असें नाही. देवास पाहिजेसा होईल त्यादिवशीं कसा करून घेईल हें कळणार देखील नाहीं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 404 2-2-1783 A.D.

Madhaorao Laxman of Hyderabad is gently warned by Ahilyabai not to repeat his request for providing “music instruments before God” at Hyderabad.

---

**अ. नं. ४०५** **श्री**

ता. ६ फेब्रुवारी, इसवी सन १७८३

श्री गेहनाबाई पवार यांचे अहिल्याबाईंस पत्र. वि. वि. कै. खंडेराव पवार राजश्री महादजी शिंदे यांजबरोबर गुजराथ प्रांतीं गेले. तेथोन उज्जेनीस जातांना राजश्री रंगराव महादेव ओढेकर यांहीं खंडेराव यांशीं धारेहून जाऊन घेऊन आले. उपरांतिक लग्नाचा करार करून

लोणिवाडियास जाऊन लग्न करून धारेस आणलें. मग रंगराव यांस बुद्धि आठविली. मग मेजवानी करून त्यांत विष घातलें. धारेस खितपणी पडून कवड्यास आले. येतां मृत्यु पावले. मग रंगराव याही सरकारांत आठ लक्ष रुपये भरून कारभार दौलतीचा करून कवड्यास आम्हांजवळ आले. उपरांतिक आम्हांसीं जाबसाल केला कीं, आठ लक्ष रुपये आम्हीं भरले. आम्ही उत्तर केलें कीं फार उत्तम केलें. दुसरें दिवस आम्हांस सांगून पाठविले कीं, तुमचे वाडियांत माल जमा आहे. तुम्ही निपुत्रिक म्हणून आम्ही जबरदस्ती करून घेऊं. काय करणें तें करावें. +++ पुणें सरकारातून मनाई द्यावी असें ठरले. ४-८ दिवस पत्रांस लागले. +++ मागें रंगरावही वाडियास खणत्या लावून मालमत्ता काढून नेली +++ तरी आपणही (म्हणजे अहिल्याबाई) राजश्री महादजी शिंदे यांस पत्र लिहून द्यावें कीं, ब्राह्मणांनीं पवार सरदार आपले बरोबरीचे त्यांचे घरास खणत्या लावून मालमत्ता काढून घेऊन गेले, मग आपली आब्रु काय?

**सरकारी रेकॉर्ड**

No. 405 6-2-1783 A.D.

Gehanabai Pawar writes to Ahilyabai about the high-handed conduct of Rangarao Odhekar, and requests her to use her influence with Scindia in favour of the Pawars.

---

**अ. नं. ४०६** **श्री**

ता. २४ फेब्रुवारी, इसवी सन १७८३

श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांचे सेवेसीं. आज्ञाधारक चिमाजी बुळे दंडवत वि.वि.येथील कुशल छ.२१ माहे रविलावल मुक्काम नजीक झाबवे. महाराजांचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. पेशजी राजश्री विठोजी डाहणे यांस साहेबांकडे पाठविले. त्यास साहेबीं आज्ञा केली कीं, इंदुरींहून नन्नेखानवाली तोफेची रवानगी करण्यास परवानगी दिली आहे. तर तुम्ही सरंजाम आणून तोफ घेऊन जाणें. त्याजवरून डाहणे पाठविले. मशारनिल्हे समागमें बैल व जमियत देऊन इंदुरास पाठविलें आहे. याचे पूर्वी काशिदाबरोबर विनंतीपत्र पाठविलें आहे. त्याजवरून ध्यानास येईल. इंदुरींहून राजश्री विठोजी डाहणे खावंदाकडे येतील. याचेसमागमें तोफेची वगैरे आज्ञा कर्तव्य ते करावी. रांगड्याकडून हरीभट खावंदाकडे आले आहेत म्हणोन परस्परें ऐकिले. त्यास खाविंदानें त्या लबाडाचे सांगितल्यावर न जावें. सर्व प्रकारें हरामखोर आहेत. यास्तव त्याजला बरेवजेनें ताकीद करून बिदा करावें. रांगडे पुरते हरामखोर, याप्रसंगीं कच्चा जाबसाल न झाल्यानें स्थळ आपले हातचे गेले. यास्तव तोफेविशीं खावंदांनीं विलंब केल्यास सर्व कार्याचा प्रसंग

विलग पडेल. याजकरितां महाराजांनीं तोफेची आज्ञा द्यावी. तोफेचे रखवालीविशीं संशय किमपी न ठेवावा. सरंजाम पुरकस आहे. तोफेबरोबर राजश्री तानू होळकर याजला पाठवावें म्हणजे कार्यास विलंब नाहीं. साहित्याविशीं मशारनिल्हे विनंती करतील ते मान्य करोन रवानगी करावी. महाराजांस श्रुत होय हे विज्ञापना पैवस्त. छ.२३ रविलावल. सन ११९२ मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 406 24-2-1783 A.D.

Chimaji Bulye writes to Ahilyabai to send artillery with Vithojee Dahane. Hari Bhatt has come as ambassador from the Rangades. Ahilyabai should be cautious regarding his message.

---

**अ. नं. ४०७** **श्री**

ता. १० मार्च, इसवी सन १७८३

बातमीदाराचे पत्र महेश्वर दरबारीं छ.६ रविलाखर ११९२ फसली.

श्रीमंतांशीं हैदरनायकानें निखालसता बहुत रक्षिली होती, त्याचेमागें टिपूमिया, त्याचा पुत्र याची पुस्तपन्हा करावी. मातब्बर फौज पाठवावी. त्यास येथें पैक्याशिवाय सर्व मसाला तयार आहे. त्यानें हिम्मत वाढवून ऐवजाची पोक्त सरबरा केल्यास उभयपक्षीं उपयोग घडेल. वरकड पाटीलबाबाकडून तह होणार त्यास बिदनूर, सोंदे घेतले त्यामुळें चढी लागून वांकडे घेतील किंवा काय ते पाहावे. हैदरनायकाचे दैव भिन्न; पुत्राचें प्रारब्ध वेगळें. निभाव कसा होतो तें पाहावें. हैदर नायकानें इंग्रजांचा वेग जातीवर सांभाळून आपल्या राज्यास असुदगी मोठी दिली होती. याउपरिं हावभरी होऊन पाऊल वाकडें इकडे टाकलें तरी श्रीमंतांचे दैव शिकंदर आहे. दैवानेंच शत्रू आपापले जागा विरत असतात.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 407 10-3-1783 A.D.

News-writer says that Hyder was on good terms with the Marathas. The latter, therefore, should continue the same relations with Tippu (Hyder's son) and etc.

---

**अ. नं. ४०८** **श्री**

श्रीमंत मातुश्री अहिल्याबाई होळकर यांनीं श्रीमंत पंतप्रधान व छत्रपती यांस पत्र

लिहिण्याचे पद्धतीविषयीं मायने ठरविले त्याचे नमुने खालीलप्रमाणें:

१ पंतप्रधानांस लिहिण्याचा नमुना :

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसीं. विनंती सेवक अहिल्याबाई होळकर कृतानेक विज्ञापना. येथील क्षेम जाणोन स्वकीय लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष.

२ छत्रपती महाराजांचा नमुना :

श्रीमंत महाराज राजश्री छत्रपती स्वामींचे सेवेसीं. आज्ञाधारक अहिल्याबाई होळकर कृतानेक विज्ञापना. येथील क्षेम स्वामींचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असो विशेष.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 408

Ahilyabai's two distinctive forms of addressing letters to the Peshwa and the Chhatrapati are given above.

---

**अ. नं. ४०९** **श्री**

ता. १० मार्च, इसवी सन १७८३

अहिल्याबाईंस पत्र रा. यशवंत गंगाधर चंद्रचूड यांजकडून फाल्गुन शु.८ शके १७०४.

आज्ञाधारक यशवंतराव गंगाधर कृतानेक आशीर्वाद विज्ञापना. श्रीमंत राजश्री रावसाहेब यांच्या लग्नास आहेर राजश्री बापूजी आनंदराव याजबराबर पाठविला आहे. हे जिन्नस पाहून तेथील प्रसंगोचित कांहीं अधिक लागल्यास तुम्हीं तेथें खरीद करून घेणें म्हणोन पत्रीं आज्ञा, त्याजप्रमाणें येथील सोईप्रमाणें पोषाख वगैरेबद्दल ऐवज तिलोकसी पदमसीचा गुमास्ता मनोहर कोठारी दुकान शुक्रवार पेठ कसबे पुणें याजपासून घेत रुपये ७३५ सातशें पस्तीस घेऊन काम चालविलें. त्याची याद तपशीलवार बापूजी आनंदराव याजबरोबर सेवेसीं पाठविली. त्याजवरून ध्यानास येईल. साहेबीं साहुकार मजकुराचे दुकानीं महेश्वरीं गुमास्ता गिरधारीलाल यांजकडेस सदरहू ऐवज सातशें पस्तीस महेश्वर चलनीं देवावयाची आज्ञाकरून कबज घेऊन पाठविणेची आज्ञा झाली पाहिजे. मि.फाल्गुन शु.८ शुभकृत संवत्सर श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 409 10-3-1783 A.D.

Yeshwant Gangadhar Chandrachud writes to Ahilyabai : Articles to be presented to the Peshwa on the occasion of his marriage-ceremony were duly received. In obedience to your instructions, additional

purchases worth Rs. 735/- were made here. The money should be paid at the Maheshwar shop of Tiloksey Padamsey.

---

**अ. नं. ४१०** **श्री**

ता. ३ मे, इसवी सन १७८३

होळकर वकिलाकडून बातमीपत्र अहिल्याबाईंस. साहेबांच्या सेवेसी कृतानेक विज्ञापना ऐसीजे. पत्रीं आज्ञा कीं, तुम्ही फौजेसुद्धां जयपुरीं राजापाशीं असोन परगणे टोंकचा अद्याप बंदोबस्त पक्केपणीं झाला नाही. गढीबंद रांगडे अंमल सुरळीत द्यावयास दिक्कत करितात म्हणोन. ऐसियास परगणे मजकुरचे भोमे दहावीस वर्षांपासून जमलेत आणि राज्यांत कोणी सभ्य मनुष्य असा नाही. राज्याचे नफानुकसानीचा ज्याजला दर्द; तशांत राजा स्वारीस निघाला. आम्ही आपल्या तर्फेनें रदबदली करावयास चूक केलीं नाही. तटही जाबसालाचा घातला. परंतु राजाच्यानें कांहीं होऊं न शकलें, असाच प्रकार पाहिला. एवढें स्वारीचें काम झाल्यावर जयपुरास जाऊन सारी दुरस्ती करून देईन. स्वारीही झाली, जयपुरींही आले. आम्ही रदबदली करणें ते केली. कांहीं होईना. मौजे लाटा व मायनी व छायेन हे तीन गांव नवे जहागीर करून दिलेत. वरकड भोमे मगरूर आहेत. आम्ही एखादी जोरजरबीची गोष्ट बोलतों त्याजवर उलटी आम्हास ताकीद करितात. तूर्त कांहीं न बोलणें असा येथील प्रकार आहे. सविस्तर वारंवार विनंती पत्रीं लिहितच गेलों आहों. ईसर, देवळे, उन हरेकर, चारचार पांचपांच हजार माणसांचे ठाकूर आणिक रांगडे आहेत. तेही गढीबंद. आपण कांहीं जोर करावा तर, एकतर राज्याची हे व्यवस्था, हजार पाचशें जमावानें त्याचे पारिपत्य होते ऐसें नाहीं. हजारो जमियत पाहिजे. हजारों खर्च खादला पाहिजे. ते प्रस्तुत प्रतिकूल. याजकरितां जसे दिसोन आले त्याप्रमाणें वहिवाटीत आणणेंच प्राप्त. आपल्या फौजा मातब्बर झाल्याखेरीज अंमल सुरळीत होत नाही. सेवेसीं श्रुत होय. लोभ कीजे बहुत काय लिहिणें हे विज्ञापना. पैवस्त छ.१ जमादिलाखर सन ११९२ मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 410 3-5-1783 A.D.

The Jeypore ambassador writes to Ahilyabai in reply to her letter that it is impossible to check the Rangadas met en masse, unless we are backed up by a large army.

---

**अ. नं. ४११** **श्री**

ता. ११ मे, इसवी सन १७८३

बातमीदार यांजकडून अहिल्याबाईंस. मुक्काम कपडसंगम. पुण्याहून छ. ६ रोजीं तुकोजीबाबा वाफगांवीं दाखल झाले. मागाहून छ.८ रोजीं नारोपंत नाना व पाराजीपंत हेही आले. श्रीमंतांची आज्ञा घेऊन चांदवडीं यावे आणि तेथून आपले भेटीस यावें. उपरांत हिंदुस्थानांत जावे. सर्व विचार तुकोजीबाबा व कारभारी वगैरे यांचा कीं आपली भेट घेऊन पुढें जावें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 411 11-5-1783 A.D.

News-letter to Ahilyabai. Tukojeerao has come to Wafgaon. Naropant and Parajeepant have also followed. They all wish to pay their respects to Your Highness, and then proceed towards the North.

---

**अ. नं. ४१२** **श्री**

ता. ८ जून, इसवी सन १७८३

बातमीदार निसबत सरकार होळकर शके १७०४ ज्येष्ठ शुद्ध ८.

राजेश्री चिमाजी बुळे झाबवेवाल्या पाळेगारावर गेले होते. त्यांजवर छापा घातला. शेदोनशें माणूस उभयपक्षीं ठार व जखमी जाहले. परंतु त्यांनीं जागा सोडली नाहीं. इंदुरींहून थोरली तोफही नेली होती. तोफेने जेर केलें. झाबवे सोडून गेले. बुळे मशारनिल्हे यांनीं झाबवे हस्तगत केलें म्हणून वर्तमान आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 413 8-6-1783 A.D.

News-letter : Chimajee Bulye attacked the Zabwewalla. The enemy retreated. Bulye took possession of Zabwe.

---

**अ. नं. ४१३** **श्री**

ता. २१-१०-१७८३

क्षेत्र गयाहून मोहनीराज मुरार, याचें अहिल्याबाईंस पत्र. आश्विन वद्य ११ श्री क्षेत्र

गया येथें धर्मकृत्य कायानुसंधानीं महाराजांचे आज्ञे श्री इच्छे आनंदरूप असो विशेष. कारखाना, सभामंडप, दासाधर व गरभी आसार जुडाई झाली. प्रस्तुत खाणीवर दगड-पथ्थर पडले आहे. बरसातीमुळें भारबदारीचे अजाईमुळें राहिली. कांहीं दिवसांत भारबदारी चालेल. देशकाल, वर्तमान धर्म कृत्यास सत्वरसिद्धी घडावी हा हेत. सभामंडप उत्तम, मजबूत, प्रकार म्हणोन आज्ञा तथापी राजश्री शिवाजी गोपाल क्षेत्राचे यात्रेनिमित्य यावे याविचारें इच्छा असे. पूर्वी श्रावणमासीं पत्रें निवेदलीं ती पावलींच असतील. सर्व वृत्त अवगत झाले असेल, सर्व चिंता महाराजांस असे. बहुत काय लिहिणें. हे विज्ञप्ति संवत् १८३९.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 413 21-10-1783 A.D.

Mohaniraj Murar writes to Ahilyabai from Gaya that the building of the temple is all in good progress etc.

---

**अ. नं. ४१४** **श्री**

रोजकीर्द मुक्काम महेश्वर, ता. १६-४-१७८४

यादी : श्री औंढा नागनाथाचे पूजनाचें काम सरकारांतून वेदशास्त्रसंपन्न विठ्ठलभट बिन त्रिंबकभट उपनाम भोपी वास्तव्य क्षेत्र आमरपत हे क्षेत्र मजकुरीं सरकारचे तीर्थ-पुरोहित यांजकडे सांगून बारमाही नेमणूक पूजा साहित्य वगैरे येणेंप्रमाणें सुरूसन आर्बासमानीन मयावअलफ शके १७०६ मुक्काम महेश्वर. ठराव करून दिल्याप्रमाणें जिन्नसाची यादी :

१८ पूजासाहित्य, चंदन, धान्यपूजा, गुगूळ, खारीक, सुपारी, कापूर, विड्याची पानें, येणेंप्रमाणें सामान.

४१ नैवेद्य श्री देवास व ब्राह्मण असामी २ मिळोन. कणीक, तांदूळ, दाळ, तूप, मीठ, किरकोळ साहित्य हिंग, जिरे आदिकरून आकार.

१० नंदादीपास तेल बारमाही.

१२ दक्षिणा देवास व ब्राह्मणास मिळोन दरमहा रुपया १ प्रमाणें.

.....

८१

एकूण एक्क्याऐंशीं रुपयांची नेमणूक करून देणें. प्रगणे आंबाड येथील महाल ऐवजी सनद करून देणें. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 414 16-4-1784 A.D.

The worship of Shree Avadha Nagnath is assigned to Vithalbhatt on an annual payment of Rs. 81/- Details are mentioned.

---

अ. नं. ४१५ **श्री**

ता. १ जून, इसवी सन १७८४

श्रीमंत मातुश्री साहेबांचे सेवेसी विनंती सेवक यशवंतराव गंगाधर कृतानेक आशीर्वाद विज्ञापना, येथील कुशल छ.१२ जमादिलाखर पावेतों साहेबांचे कृपेकरून यथास्थित असो विशेष साहेबी छ.३० रविलाखरची पत्रें सेवकास व श्रीमंत रा.नाना श्रीमंत सुभेदार व रा.नारो गणेश ऐसी चार पत्रें व सुभेदारांस खर्चास पदमसी तिलोकसी याचे दुकानची हुंडी लष्कर चलनची रुपये एक लक्षाची १००००० फाल्गुन शुद्ध २ पासोन पंचवीस रोज मुदतीची ऐसी पावली. आज्ञा कीं राजश्री बाळाजीपंत नानांचे विचारें हुंडी चिरंजीवाकडे लष्करांत रवाना करावी. म्हणोन त्याजवरून श्रीमंत नाना यांस पत्र देऊन हुंडीविशीं विनंती केली. त्याजवरून त्यांनीं हुंडी व पत्र श्रीमंत सुभेदारांचे व नारो गणेश यांचे, ऐसी पत्रें घेऊन राजश्री हरीपंत तात्यांचें विचारे लष्करांत रवाना करून आपल्यास जाब दिला. तो घेऊन सेवेसीं पाठविला आहे. पावेल. मागाहून लष्करचा पक्का जाब आला म्हणजे पुनरपि सेवेसीं पाठवून देऊं. टिपूचे मसलतीस गुदस्तांपासून खर्च काय बसला आहे व पुढेंही दरमाह चालला आहे. मसलतीचें ओझे भार सर्व सुभेदारांवर आहे. फौजेचा खर्च भारी. त्यात महागाई याजकरितां त्यांचे खर्चाची सावधानी तुम्हांकडे आहे म्हणोन आपल्यास लिहावयास सांगितलें त्याजवरून लिहिलें आहे. साल मजकुर खर्चाची योजना असावी म्हणोन पेशजी सेवेसीं विनंती लिहिली होती. हल्लीहीं नानांची योजना खर्चाविषयीं आज्ञा वारंवार आपणासही पत्रें येतच आहेत. आपणही यावतशक्य कमी न करितां आजपर्यंत मसलतीचे यश समग्र घेतलें. सांप्रतचा प्रसंग शेवटाखाली आला आहे. अखेरपर्यंत हरतरेनें गोष्ट निर्गमांत येईल. सलूखाचे बोलणें चालणें लागून साठ लक्ष खंडणी रुपये द्यावयाचा करार जाहला. परंतु निशा पत्रीं पक्की होणें यास्तव प्रतीक्षा आहे. निशेची खातरजमा पटली तर फौजा माघारे फिरतील. टिपूचा स्वभाव खल छदमाचा. त्यामुळें सलूखाची पक्की गोष्ट बोलवत नाहीं. निदर्शनांत आल्याप्रमाणें सेवेसीं लिहिण्यांत येईल. छावणींत कदाचित राहणें पडलें तरी आपल्यास कुमक केल्यावांचून व्हावयाचें नाही. सलूख होऊन यजमानाचें येणें घडेल तत्रापि फौजेचा गवगवा समजाविशीचा वारला पाहिजे येविशीं काळजी आपल्यासच आहे. येवढा प्रसंग संपादन जाल्यानें समग्र यश अविच्छिन्न आपल्या पदरीं पडतें. याच भावें श्रीमंत नानांचें बोलणें वारंवार पडते. त्या वरून शेवटीं विनंती लिहितों. आपण सूज्ञ आहेत. प्रसंगोपात जपून कर्तव्य तें करीतच आहेत. तत्रापि सूचनार्थ लिहिलें असे. योजना तरी आपण करीतच आहांत. त्याहींमध्यें या उत्तरीं चिठ्ठी-चपाटी लष्करांत खर्चाविशीं तरदूद करून पाठविणें ती मजला कळवून रवाना व्हावी.

आपण आगाऊ तरतूद करून पाठवितील ती स्वारीच्या भरण्यांत जाऊन फिरून समजाविशींचा प्रसंग आल्यास निभावणें पडेल. यास्तव अगोदर सूचना जाली म्हणजे जसा प्रसंग दृष्टींत येईल तद्नुरूप साहेबांस विनंती लिहून प्रसंग संपादावयास गोडीस पडेल. आपण दुरंदेशी आहात. करणें तें समजूनच करतील. उत्तराची आज्ञा व्हावी सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 415 1-6-1784 A.D.

Yeshwant Gangadhar (Holkar ambassador at Poona) writes to Ahilyabai that Nana Fadnis is often inquiring as to the ways and means you use to defray the expenses of the campaign carried against Tippu. Nana puts the whole responsibility on the shoulders of Tukojeerao Holkar.

The ambassador requests Ahilyabai to send her amounts to him first, and through him to the Poona Court.

---

**अ. नं. ४१६** **श्री**

ता. २८ आक्टोबर, इ. स. १७८४

रोजकीर्द. सुभा राजश्री तुकोजीराव होळकर छ १३ जिल्हेज, मुक्काम महेश्वर खंडो बाबुराव कमाविसदार परगणे इंदूर यांचे नांवें पत्र कीं टिळागिर गोसावी मोकाती देहाय प्रगणे इंदूर यांसीं कीं, वेदमूर्ती वासुदेव भट बिन हरिश्चंद्र भट कसबे मजकुर यानी हुजूर विदीत केलें कीं कै. सौ. गौतमाबाई यांचा काळ जाहला ते समयीं मौजे पिंपळ्याराव परगणे इंदूर येथें जमीन बिघे सुमारी तीस दान देऊन त्यांची दानपत्रें करून दिलीं. त्याप्रमाणें आजपर्यंत भोगवटा चालत आहे. त्या जमिनीचे नजीक नाला आहे. तेथें मुडकी बांधून आबादी केली असता हल्ली टिळागिर गोसावी यानें पत्राचा उजर केला. येविसीं पत्र दिलें पाहिजे म्हणोन. त्यावरून हे पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरी भटजीकडील जमीन तीस बिघे पेशजीपासून चालत आल्याप्रमाणें त्यांची त्यांजकडें चालविणें. भटजीनें आपले जमिनींत आंबे वगैरे झाडें लाविली असतील. त्यांजला कोणचेही प्रकारें दिक्कत न करणें. पूर्वी मख्त्याखेरीज जमीन अज्जीबाद आहे. त्याअन्वयें वहिवाट चालविणें, म्हणोन पत्र.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 416 28-10-1784 A.D.

Orders are passed to the Kamavisdar of Indore that the gift of land

granted in charity (on the death of the late Saubhagyawati Goutamabai) to Vasudeo Bhatt, Harischand Bhatt should be upheld : he should not be hampered in his efforts for agricutural improvements with the aid of neighbouring waters.

---

**अ. नं. ४१७** **श्री**

ता. १० नोव्हेंबर, इसवी सन १७८४

(रोजकीर्द राजश्री तुकोजी होळकर मुक्काम महेश्वर दफाते सन ११९४)

अंबोजी इंगळे दिमत पागा यांसी कीं तुम्ही पत्र पाठविले ते पावले. त्याची उत्तरें येणेंप्रमाणें.

१ कैलासवासी रावसाहेब खंडेराव होळकर यांचे छत्रीनजीक गांव मौजे सेत (सरदगांव,) व मौजे गांगरसोली परगणे बारूढ तालुका भरतपूर हे कमान अडचा हजारांचे जमेचे आहेत. याजविषयीं साहेबांचे पत्र राजश्री माधव रावजीस आलें होतें. त्याजवरून नबाब अफरात साहेबाकडून दोहीं गांवांच्या सनदा करून घेतल्या. तेथील अंमल कोणाकडे द्यावा, याची आज्ञा होईल त्याप्रमाणें देऊं म्हणोन लिहिलें. त्यासीं छत्रीचे कारखान्यावर राजश्री व्यंकोजी गिरधर कारकून व पेमजी माधव खिजमतगार यांजकडे दोन्ही गांवचा अंमल द्यावयाचे ठरावून खाजगीकडून सनद अलाहिदा पाठविली आहे. त्याप्रमाणें त्यांजकडे अंमल देऊन पुढें कामकाज लागल्यास उपर राखीत जाणें. कलम

**सरकारी रेकॉर्ड**

No. 417 10-11-1784 A.D.

Tukojeerao Holkar writes to Ambojee Ingle that Maujas Saradgaon and Gangar-solee (near the Chhatree of the late Khanderao Holkar) are assigned to Vyankojee Girdhar and Pemjee Madhao by Khasgi Sanad.

---

**अ. नं. ४१८** **श्री**

ता. ११ नोव्हेंबर, इसवी सन १७८४

राजश्री रामराव अप्पाजी गोसावी यांसी स्नेहांकित तुकोजी होळकर दंडवत विनंती उपरि. मौजे भटगांव प्रगणे उत्राण हा गांव तुम्हांकडे आहे, त्याजबद्दल सालमजकुरीं

सरकारांतून कर्जपट्टीचा ठराव करून रु.१५४३ पंधराशें त्रेचाळीस करार करून हा ऐवज नारोकृष्ण भिडे यांचे रदकर्जी देविला असे. तरी सदरहू ऐवज मशारनिल्हेस देऊन कबज घेणें. रवाना छ.२७ (शिक्का) जिल्हेज बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**पळसीकर रेकॉर्ड.**

No. 418 11-11-1784 A.D.

Ramrao Appajee (Palshikar) is asked to pay Rs. 1,543/- to Naro Krishna Bhide for the "debt payment portion" declared on his village named Bhatgaon.

---

**अ. नं. ४१९** **श्री**

ता. १७ डिसेंबर, इसवी सन १७८४

श्रीमंत महाराज बाईसाहेबांचे सेवेसीं. आज्ञाधारक देशमुख व देशपांडे प्रगणे आंबाड विज्ञापना ऐसीजे. प्रगणे मजकुरची आमलत रा. सिद्धेश्वर विष्णु कमाविसदार यांजकडे आहे. त्यांचे विद्यमानें हिशेब सन ११८३-८४ दुसाला मामलेदारानीं सरकारांतून पुरसीस केली त्यावरून साहेबीं लिहून दिलें आहे. प्रगणे मजकुरीं दुसालापट्टीपटियांत नबाब, भोसले व त्रिंबकराव मामा वगैरे यांच्या खर्चाच्या पट्ट्या व खर्चवेच आमचे मार्फतीनें मामलेदारांच्या लिहिल्याप्रमाणें करार आहे. यात तफावत निघाला तर सरकारचे गुन्हेगार. हे विज्ञापना. छ ४ सफर.

सह्या देशमुख, देशपांडे, प्रगणे मजकूर.

**सरकारी रेकार्ड**

No. 419 17-12-1784 A.D.

The Deshmukhs and Deshpandes certify that the account-sheets for the year 1183, 1184 (Fasli) submitted by the Kamavisdar are, to their knowledge, true. The extra amounts of expenditure incurred in connection with Nabab, Bhonsale and Trimbakrao were done so with our knowledge and consent.

---

**अ. नं. ४२०** **श्री**

ता. २९ एप्रिल, इसवी सन १७८५

तपोनिधी टिळागीर गोसावी मोकाती देहायप्रगणे इंदूर गोसावी यांसी. स्नेहांकित अहिल्याबाई होळकर नमो नारायण. वेदमूर्ती राजश्री वासुदेवभट बिन हरिश्चंद्रभट कसबे मजकुर यानी हुजूर विदीत केलें कीं, कैलासवासी श्रीमंत सौभाग्यवती गौतमाबाई यांचा काळ जाला ते समयीं मौजे पिंपळ्याराव परगणे इंदूर येथील जमीन बिघे सुमारें ३० दान देऊन दानपत्रें करून दिलीं. त्याप्रमाणें भोगवटा चालत आला. जमीन नाल्यानजीक आहे. तेथें मुडकी बांधून आंब्याची वगैरे झाडें लावून आम्ही आपले तर्फेने मुरलीधर मोकाती यांजकडे वहिवाटीस देऊन शंभर रुपये दरसाल घेत आलों असतां हल्ली टिळागीर गोसावी यांनीं दिक्कत केली येविशीं ताकीद जाहली पाहिजे म्हणोन. त्यावरून साल मजकुरीं मागील वहिवाटीप्रमाणें शंभर रुपये देऊन पेस्तर सालचे आवलीपासोन सदरहू ३० बिघे जमीन आव्वल, दुयम, सोयम, प्रतीची सनदेप्रमाणें यांची यांजकडे चतुःसीमापूर्वक दुमाला करून देऊन चालविणें. जाणिजे छ १७ जमादिलावल बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 420 29-4-1785 A.D.

Tilagir Gosavi is ordered to uphold the grant of Vasudeo Bhatt continued for a long time, though a technical change has taken place in the grant.

---

**अ. नं. ४२१** **श्री**

ता. १७ जून, इसवी सन १७८५

श्रीमंत महाराज मातुश्री बाईसाहेब साहेबांचे सेवेसीं. आज्ञाधारक भागोजी गवरी चरणावर मस्तक ठेवून साष्टांग दण्डवत विज्ञापना कीं, मजकडे श्रीमंत कै. मालेरावबाबा यांचे खिदमतगारीचे काम होते. त्यांचा काळ झाल्यावर मी इंदूरचे मुकामींहून न पुसतां गेलो. तेव्हांपासून आजपर्यंत बाहेरच फिरतो. ऐसे अंतर पडलें याजमुळें साहेबापाशीं येणें घडलें नाही. प्रस्तुत कोट्याहून परभारें धरमपुरीचें मार्गे देशी जात होतों. साहेबीं तेथून धरून आणून शासन केलें. मागती कृपावंत होऊन मुक्तताही केली. आतां फंदफितूर करूं तर सरकारचे गुन्हेगार. हें लिहून दिलें असे. शके १७०७ विश्वावसु संवत्सर ज्येष्ठ शुद्ध १० मुक्काम महेश्वर. हस्ताक्षर देवराव शामराव कारकून.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 421 17-6-1785 A.D.

Bhagoji Gavaree (in the service of the late Malerao Baba) gives a bond

to Ahilyabai that he was rightly punished by her for leaving the State without her permission and that he would, thenceforward remain loyal to her.

---

**अ. नं. ४२२** **श्री**

ता. ११ आक्टोबर, इसवी सन १७८५

| |
|---|
| श्री राजा शाहू नरपती हर्षनिधान<br>माधवराव नारायण मुख्य प्रधान |

दस्तक सरकार राजश्री पंतप्रधान ताा कमाविसदारान व चौकीदारान व राहदारान व बाजेलोक व मोकदमान देहाय सुरूसन सीतसमानीनमयावअलफ. रामराव अप्पाजी दिम्मत राजश्री तुकोजी होळकर यांची मातुश्री वेणुबाई यांस आणावयाकरितां सरकारातून पागा व कारकून व पालखी व हुजरे विजापूर येथें पाठविले आहेत. तरी वेणुबाईस घेऊन पळसी वनकुटे येथें जातील त्यास मार्गी कोणेविशीं मुजाहिम न होणें. रात्रीस राहतील तेथें चौकीपाहरा करून आपलाले हद्दपार करून देणें. जाणिजे छ ७ जिल्हेज आज्ञाप्रमाण (लेखनसीमा)
**पळसी रेकॉर्ड**

No. 422 11-10-1785 A.D.

The Peshwa Government orders all the officers and people concerned : Venubai mother of Ramrao Appajee in the service of Tukojeerao Holkar) will be travelling from Bijapur to Palshi under Government arrangements. Officers etc. on the way should look after her comforts, and should “watch and ward” on the road during nights.

---

**अ. नं. ४२३** **श्री**

ता. २१ आक्टोबर, इसवी सन १७८५

अहिल्याबाई होळकर यांचे रामराव अप्पाजीस पत्र.

राजश्री पांडुरंग कोकजी यांजकडून अंतर पडल्यामुळें तुम्ही मशारनिल्हेस कैद केलें, म्हणून विदीत झालें. ऐसियास कोकजी महादेव पूर्वीपासून पदरचे त्यांनीं तुमचे वडिलांची सेवा एकनिष्ठपणें केली आणि यांनीं तसाच लोभ करून चालविलें. अलीकडे त्यांचे

पुत्रापासून अन्तर पडलें त्याचे फळही पावलें. याउपरि जिकरच करणें ठीक नाही. यास्तव हें पत्र लेखन केलें आहे तरी अतःपर तुम्ही मशारनिल्हेस पुढें त्यांनीं आपले रीतीनें चालावे येविशीं बंदोबस्त करून मुक्तता करणें. येविशींचा फिरोन बोभाट येऊं न देणें. रवाना चंद्र १७ जिल्हेजः मोर्तबसुद. सनसीतसमानेन मयावअलफ.

**पळसी व सरकारी रेकॉर्ड**

No. 423 21-10-1785 A.D.

Ahilyabai Holkar writes to Ramrao Appaji Palshikar that the latter should bear in mind that the late Kokajee Mahadeo had served his late father with all his heart. Kokaji's son swerved from his path of duty and he has sufficiently suffered. He should now be released.

---

**अ. नं. ४२४** **श्री**

शके १७०६, विक्रम संवत् १८४१, इ. स. १७८५

श्रीमंत महाराज मातुश्री अहिल्याबाई साहेबांचे सेवेसीं. आज्ञाधारक बाळाजी लक्ष्मण आशीर्वादः विज्ञापना. मुक्काम श्री क्षेत्र काशी येथें यथास्थित असो विशेष. या क्षेत्रीं श्री मनकर्णिकेचे घाटाचे व तारकेश्वराचे काम चालत आलें आहे. (पुढील भाग जळाला) आणखी घाट पंचगंगा वगैरे आहेत परंतु हे काम बहुत सुंदर आपल्या नांवाप्रमाणें जालें. मनकर्णिका काशी पुराणांत उत्कर्षत असतां येथील काम ईश्वरानें आपल्याकडून करवून यश आपल्यास आलें. हे मोठी पुण्याची गोष्ट झाली. (२) मनकर्णिकेच्या घाटांवर आपल्याकडील चौघडा एक व घड्याळ असल्यास उत्तम होईल. कोंच वगैरे इकडील प्रांत आहेत, तेथें नेमणूक करून द्यावी म्हणजे चालेल. इतर खर्च दौलतसंबंधीं होतात, त्यास हाही खर्च श्रेष्ठ समजून आज्ञा व्हावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ.१ रविलावल सन ११८९ हिजरी. मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 424 25.10.1785 A.D.

Balajee Laxman, after praising the excellent work of Mankarnika Ghat and Tarkeshwar, requests Ahilyabai to sanction music and watch on the Ghat out of the revenues of Kaunch or any other neighbouring mahal.

---

अ. नं. ४२५ **श्री**

ता. २५ आक्टोबर, इसवी सन १७८५

श्रीमंत महाराज मातुश्री अहिल्याबाईसाहेब मुक्काम महेश्वर साहेबांचे सेवेसीं आज्ञांकित अप्पाजी जाखदेव व दादो मैराळ कृतानेक आशीर्वाद विज्ञापना येथील क्षेम छ.७ जिल्हेज मुक्काम पुणें येथें महाराजांचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असो विशेष इकडील मजकूर नागपुरीं राजश्री रघोजी बाबा भोसले सैनासाहेबसुभा यानीं श्रावण वद्य ९ प्रातःकाळचे प्रहरदिवसां आपले घरीं पूजाआर्चा करोन पुष्पें वाहून घरांत गेले. त्यांच्यामागून खंडोजीबाबा भोसले सेनासाहब बहादूर यानीं स्नान करून देवघरांत जाऊन पुष्प बेल वाहत होते तों पोटांत कळ निघाली. राजश्री व्यंकटराव भोसले धाकटे भाऊ जवळ होते. त्यांनीं पलंगावर निजविलें तो डोळ्यास अंधारी येऊ लागली. भ्रांत पडली, शरीराचा दाह झाला. त्यावर चार सहा घटका होते. नंतर खंडोजीबाबाचा काळ जाहला, म्हणोन नागपुरींहून पत्र सरकारांत छ.५ रोजीं आले. मशारनिल्हेस त्यांच्या घरांतील प्रयोग जाला, तेणेंकरून नाश जाहला, म्हणोन लोक बोलतात.

२ राजश्री महादाजीपंत बेहरे खानदेशांत भिल्लांनीं कंजरगड घेऊन प्रांतांत दंगा मांडला होता म्हणोन मशारनिल्हेस सरकारआज्ञेवरून फौजसुद्धां गडानजीक चालिसगांव परगण्यांत भिल्लांचे पारिपत्य करणेंस्तव मुक्काम करून होते. यांच्या लष्करची रसद मारावयास गडावरून पांचसातशें भिल्ल उतरून त्यांची यांची लढाई लागली तों बेहरे-मशारनिल्हेस बातमी समजली. मग यानीं जलदी करून कासी बल्लाळ, गाडद्याकडील यांचे चिरंजीव बळवंतराव समागमें आहेत. त्यांजला सांगोन पांच सातशें गाडदी तयार करोन चोरमार्गानें कंजरगढचे मार्गास जाऊन श्रृंगारबावडी कायम केली. वरती बालेकिल्ल्यावर शे दोनशें भिल्ल होते त्यांनीं दगडधोंडा करून टाकला, तेणेंकरून दहापांच माणूस जखमी झाले. रात्रीं भिल्ल चोरवाटेनें पळून गेले नंतर राजश्री महादजीपंतांनीं छ.४ जिल्कादी कंजरगड सर केला म्हणोन सरकारांत पत्र आलें. तें पाहून जासूद जोडीस पागोटी व दहा रुपये इनाम दिले. सिंव्हस्थाकरितां कार्तिक मासीं श्रीमंत रा. पंतप्रधान यांची स्वारी श्री त्र्यंबकेश्वरास जाणार म्हणोन वर्तमान आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना पैवस्त छ.२१ जिल्हेज मुक्काम महेश्वर ता.२५-१०-१७८५

**सरकारी हुजूर फडणीसी रेकॉर्ड**

No. 425 25th October 1785 A.D.

Appajee Jakhadeo informs Ahilyabai of :

(1) The sudden death of Khandoji Baba Bhonsle of Nagpur.

(2) The capture of Kanjargad by Mahadajeepant Behare.

**अ. नं. ४२६** **श्री**

ता. २५ जानेवारी, इसवी सन १७८६

तीर्थरूप मातुश्री बाईसाहेब वडिलांचे सेवेसीं. अपत्यें तुकबाचें चरणीं मस्तक ठेवून साष्टांग दंडवत विज्ञापना येथील कुशल जाणोन स्वकीय लिहावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आम्ही सन इहिदेसमानीनांत (इसवी सन १७८०) गुजराथचे स्वारीहून इंदुरीं आलो. ते समयीं इमारतीकडे वगैरे कारखानियांत खर्च रुपये २४७१ दोन हजार चारशें एकाहत्तर मामलेदार रा. खंडो बाबुराव यांजकडील जाले. त्याची वरात येथून करून दिली आहे : त्याप्रमाणें सदरहू रुपयेचे खर्चाची यादी मामलेदारापाशीं आहे ते पाहून प्रगणे मजकुरचे हिशेबी मुजरा द्यावयास आज्ञा करावी. मिती पौष वद्य १० सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकार्ड**

No. 426 25-1-1786 A.D.

Tukojeerao Holkar requests sanction of Rs. 2,471/- spent on buildings in 1780 A.D. by the then Mamledar of Indore.

---

**अ. नं. ४२७** **श्री**

ता. २२ फेब्रुवारी, इसवी सन १७८६

राजश्री तिलोकसी पदमसी सावकार कसबे इंदूर यांस स्नेहांकित तुकोजी होळकर रामराम सितेनसमानीनमयावआलफ. तुम्हांकडे सरकारातून पागा वगैरे कारखान्याकडील समजाविशीमुळें व रोजमुराकरितां कर्जाऊ ऐवज येणेप्रमाणें:।।

१००००१ ऐन. २००० मनोती दरसदे रुपये २ प्रमाणें एकूण १०२००१ एकूण एक लक्ष दोन हजार एक रुपया करार ठरला. याऐवजीं सरकारांतून वराता होतील त्याप्रमाणें ऐवज आदा करून कबज घेणें. त्या मितीपासून व्याज दरमहा दरसदे एकोत्र्याप्रमाणें भोगले मितीचें दिले जाईल. या ऐवजी महालीं पेस्तरसालऐवजीं वराता लावून दिल्या आहेत. त्या मितीपासोन सरकारचें व्याज मजरा घेतले जाईल. मिती माघ वद्य ९ शके १७०७ विश्वावसुनाम संवत्छरे जाणिजे छ २२ रविलाखर बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रकॉर्ड**

No. 427 22-2-1786 A.D.

Tukojeerao Holkar passes a bond of Rs. 1,02001/- to Tiloksey Padamsey at the rate of 24 per cent. The debt is incurred for paying the army etc.

---

**अ. नं. ४२८** **श्री**

ता. २६ आगस्ट, इसवी सन १७८६

अंबाजी इंगळे यांजकडून, अहिल्याबाईंस पत्र. मुक्काम मथुरा श्रावण शुद्ध ८.

इकडील वर्तमान. छावणी मथुरेवरच आहे. जयपूर प्रांतीं रायाजी पाटलासमागमें फौज देऊन पाठविले आहे. पानपताकडेस धारराव शिंदे आहेत. चातुर्मास झाल्यावर फिरोन स्वारी जयपुराकडेस जाणार आहे म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 428 26-8-1786 A.D.

News-letter from Ambajee Ingle :

(A) Camp is at Mathura.
(B) Rayajee Patil is in Jaipur.
(C) Dharrao Shinde is near Panpat.
(D) The army will proceed towards Jeypore after the rainy season is over.

---

**अ. नं. ४२९** **श्री**

ता. २४ आक्टोबर, इसवी सन १७८६

श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांचे सेवेसीं आज्ञाधारक बाबुराव विश्वनाथ वैद्य आशीर्वाद विज्ञापना. आपणाकडून बहुत दिवस पत्र येऊन सांभाळ होत नाहीं तरी असे नसावें. यानंतर राजश्री हरीपंत जोग यानीं रा.चिमाजी बुळे यांजकडील परगणे झाबवे येथील मामलत रसद देऊन केली. ऐवज फिटे तो मामलतीची घालमेल करूं नये. याप्रमाणें करार असता ऐवजाचा फडशा न करितां मामलतीची घालमेल केली. नंतर मशारनिल्हे महेश्वरीं आपणापासी आले. सविस्तर निवेदन केले. त्यावरून आपण बुळे यांस फडशा करणेबद्दल ताकीद केली. त्यावरून कांहीं ऐवज दिला. बाकी येणें राहिले त्याचा फडशा अद्याप करोन देत नाहीं. मामलत तहगीर होऊन एक वर्ष जाले पदरचा पैसा खात बसले आहेत. येविशीं पेशजी विनंतीपत्रें लिहिलींच आहेत तरी कृपा करून निर्मगांत येईतों अर्थ जाहला पाहिजे. महेश्वरीं बुळे यांजकडील ऐवजाचे फडशाकरितां खर्च खात बसले ऐसियास आपण निक्षून ताकीद बुळे यांस केली म्हणजे ऐवज येईल त्यांत लाभ हाच मोठा कीं, आपण एखादें लहानसहान पाहून काम सांगावे चाकरी दृष्टीस पडावी म्हणजे मोठेंही काम आपणच कृपा करून सांगतील. येविषयीं आमचीही विनंती आहे. येविषयींचा त्रास नसावा. सर्व प्रकारें भरंवसा साहेबांचा आहे.

दुसरें कोण काळजी करणार ? लोभांत अंतर नसावे. कृपायुक्तपत्रीं सांभाळ होत जावा. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त मुक्काम महेश्वर छ १ मोहरम

**सरकारी रेकॉर्ड**

No. 429 24-10-1786 A.D.

Baburao Vishwanath Vaidya writes to Ahilyabai Holkar that Haripant Jog is not fully paid by Chimaji Bulye for his Mamalat transaction. The said Jog is staying at present at Maheshwar with a hope to get his remnant. Ahilyabai is requested to utilize his talents.

---

**अ. नं. ४३०** **श्री**

ता. २४-१०-१७८६

रा. अमृतराव डफाळ संस्थान जत, यांजकडून अहिल्याबाईंस पत्र.

यंदा हैदर नाईकाचा उपद्रव या प्रांतीं झाला आहे. अशांत श्रीमंतांची स्वारी दक्षिण प्रांतीं होणार. समागमें राजश्री तुकोजीबाबा होळकरही आहेत. त्यास या राज्याचा बचाव हवा, तरी रक्षण करणार आपण वडील समर्थ आहांत. हे संस्थान आपलें आहे आणि मी स्थापित वडिलांचा. राजश्री बापूजी विनंती करतील त्याप्रमाणें राजश्री बापूजी विनंती करतील त्याप्रमाणें राजश्री तुकोजीबाबांस पत्र देणार वडील आहांत.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 430 24-10-1786 A.D.

Amritrao Dafal of Jat (State) requests Ahilyabai to write to Tukojeerao about the protection of his State when the Maratha armies will descend into the South againt Haidar.

---

**अ. नं. ४३१** **श्री**

ता. ३१-१०-१७८६

राणी बखतकुंवर बडवाणीकर यांजकडून पत्र मातुश्री अहिल्याबाई होळकर यांस. पूर्वी आपण आज्ञा केली होती कीं राज्य डामडोल आहे, त्याचा बंदोबस्त करणें. त्यास कामांत चित्त घालून बंदोबस्त थोडाबहुत केला. पण कित्येकांचे वैरी झालों. खरे बोलल्यास वाईट

मानतात. याजकरितां आपले अभयपत्र आल्यास चित्त समाधान पावेल. आपल्या वचनाचा आधार सर्व प्रकारें धरून आहों. पूर्वी आपण आज्ञा केली कीं राज्य गळाठ्यांत आहे याची उस्तवारी करणें, तेव्हां आम्ही विनंती केली कीं, आमचे राज्य फितुरी आहे. फितुर झाल्यास आम्हांस आश्रय कोणाचा ? तेव्हां आपण वचन दिलें कीं आम्ही बसलो आहोंत. तुम्हांकडे कोण पाहिसा आहे ? तो प्रसंग आतां आला आहे. चिरंजीव तर सालस आहेत. परंतु कैफ आल्यावर चाकर त्यास बहकावितात. पूर्वी वचन दिल्हें त्याचे स्मरण धरून साहित्य करणार आपण समर्थ आहात.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 431 31-10-1786 A.D.

The Ranee of Barwani seeks protection as well as counsel of Ahilyabai in her present pitiable plight.

---

**अ. नं. ४३२** **श्री**

ता. ६ नोव्हेंबर, इसवी सन १७८६

अहिल्याबाईंचे पत्र रा. केसो गणेश कुंटे मुक्काम पुणें यांस. रा. गणपतराव विष्णु यांनीं आपले पदरचीं माणसे न दुखवितां त्यांचे त्यापरी संरक्षण करून ठेवावीं हे उचित आहे. कैलासवासी विष्णु महादेव यांनीं आपले पराक्रमानें सर्व मिळविलें, परंतु माणसें तोडली नाहीत. त्या अर्थी यानींही वडिलांचे हातची माणसें राखून ठेवलियांस उपयोग पडून स्वरूपच राखतील. याचा विचार त्यास न समजावासा नाहीं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 432 6-11-1786 A.D.

Ahilyabai Holkar writes to Keso Ganesh Kunte of Poona : The late Vishnu Mahadeo was a self-made man; and he severed none of his servants. His son will be wise to follow in the foot-steps of his able and illustrious father.

---

**अ. नं. ४३३** **श्री**

ता. ४ डिसेंबर, इसवी सन १७८६

श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांचे सेवेसीं. आज्ञाधारक रामराव अप्पाजी (पळसीकर) कृतानेक

आशीर्वाद विज्ञापना. येथील वर्तमान मार्गशीर्ष शुद्ध १४ मुक्काम मुर्डगी परगणे दगन नजीक तुंगभद्रा कोस तीन. साहेबांचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे विशेष. इकडील मजकुर. अलीकडे टिपूकडील संधान आपलेकडे आलें. कारकून वस्त्रें जवाहीर देऊन आले. इकडीलही गेले असें असतां दहा कोसांचा तफावत होता, तो टाकून दोन कोसांचे अंतर राहिलें. ते जागा केवल अडचणीची, काटें वन भारी याजमुळें बुणगें मागें डोंगरापलीकडे लावून सडे जीनबंदी करून रात्रभर सावधानीनें होते. छ.१० रोजीं छाप्याची खबर ऐकून सडे बुणगे थोरले बुणग्यांत पाठवून, भारी हुशारीनें राहिले. याप्रमाणे श्रीमंत राजश्री तात्यानींही केले. तहवरजंग व भोसले यांसी चिठ्ठ्या-निरोप गेले असतां, त्यांजकडून आळस जाला. पूर्वरात्रीसच छापा येऊन पोंहचला. प्रथम गाठ आपले लोकांशीं पडून एक घटका झटपट झाली. बाजूस तहवरजंग होते. त्यांजवर चाल केली. असावधानीमुळें गलबला जाला. जामदारखाना वगैरे तळावर टाकून निघणें प्राप्त झाले. याच प्रकारें त्यांचे बाजूस भोसल्यांचाही गलबला झाला. त्यांचे पाठीशीं राजश्री महादाजीपंत निमसावधानीमुळें झाबडल्यांत येऊन निघाले. एवंच, इकडील फौजांनीं रवारत खाल्ली, धीर न धरला. उभयतांचे नुकसान भारी. सर्वत्रांचा बदनक्ष, अशी गोष्ट सहजांत घडली. श्री मार्तंडाचे कृपेकरून व साहेबांचे आशीर्वादेकरून इकडील बचाव जाला. तूर्त एक दोन रोज गेल्यामेल्याचें समाधानाचें जाल्यावर पुढें काय विचार होणें तो होईल. सारी रात्र वनाची प्रार्थना होऊन, आठ कोसावर मुक्काम झाला. शत्रूनें हे कार्य संपादून कूच करून तुंगभद्रा पाठीसी देऊन येथून पांच कोसांवर मुक्काम केला आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ.३ रविलावल सुरूसन साबासमातीन मयावअलफ ११८७ अरबी.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 433 — 4-12-1786 A.D.

Ramrao Appajee Palshikar writes to Ahilyabai Holkar from camp Mudgi (in the campaign against Tippu); Tippu's attack fell heavily on the Bhonsale and the Mogul army. Holkar's and Peshwa's army suffered least as these were, all the while, alert and on watch. The enemy has crossed the Tungabhadra and camped ten miles further.

---

**अ. नं. ४३४** **श्री**

ता. ९-१२-१७८६

मुक्काम पंढरपूर येथून यशवंतराव फणसे यांजकडून अहिल्याबाईंस पत्र कार्तिक शुद्ध २

मंगळवार शुद्ध प्रतिपदेस लासलगावींहून स्वार होऊन येथें आलो. श्री देवदर्शन केले.

श्रीचा निरोप आजच घेऊन श्री नरसिंगपूर, जेजुरी देवदर्शन करून सत्वर लासलगांव, निफाडी येऊन वडिलांचे भेटीस आज्ञेप्रमाणे येऊं. श्रीचा प्रसाद बुक्का व गोपाळकाल्याच्या लाह्या, पायावरील बुक्का व श्री वैकुंठस्वामींनीं प्रसाद खडीसाखरेचा एका पुडीत घालून वडिलांकरितां पाठविला आहे. प्रविष्ट झाल्याचे आशीर्वादपत्र पाठवावे.

१ कर्नाटकी घोंगड्या पांढऱ्या दोन पाठविल्या आहेत. पावतील.

१ सौभाग्यवती रखमाबाई होळकर कार्तिकचे यात्रेस आल्या होत्या. भेट जहाली. लष्करांत सरंजामानासुद्धां जावे म्हणोन बोलल्या. ऐसियास पागा टोकेस कामगिरीस आहेत. त्यास मातोश्री बाईसाहेबांस लिहून पाठवूं. तिकडून सरंजाम आल्यास लष्करांत जाणें घडेल. येविशीं वडिलांचे उत्तर येईल तशी वर्तणूक घडेल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 434 9-12-1786 A.D.

Yeshwantrao Phanse writes to Ahilyabai from Pandharpur : He has been moving from Lasalgaon to Jejuri; desires to proceed to Niphad. Sends God's sweetmeats and a pair of white blankets to Ahilyabai; requests her orders as regards his joining the army as counselled by the consort of Tukojeerao.

---

**अ. नं. ४३५** **श्री**

ता. १० डिसेंबर, इसवी सन १७८६

शेख शरीफभाईचे अहिल्याबाईंस पत्र मुक्काम इंद्रगड. छ.१० रोजीं टिपूचा छापा आला होता. त्यास मोंगलाकडील व भोसले यांजकडील तसनस बहुत झाली. श्रीमंतांकडील व आपल्याकडील बहुत सावधानीनें निघाले. ज्या स्थळी मुक्काम होता ते जागा बहुत अडचणीची होती. परंतु आपले पुण्याईचे योगेंकरून सर्व निभाव झाला. धारणही चार पायलीची, महागाई बहुत नाहीं. जे दिवशीं छापा पडला ते दिवशीं बाबांनीं व नानांनीं पत्रें आपल्यास लिहिलीं होती. ते समयीं मी जवळच होतो. ती आपणास पावलीच असतील. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 435 10-12-1786 A.D.

Shaikh Sharifbhai writes to Ahilyabai Holkar from Indragad (camp at the time of the campaign against Tipu) : The Mogul and Bhonsle army

suffered heavily when attacked by Tipu. Our army and the Peshwa's have hardly suffered. Corn is not very dear. All these are blessings of the fruit of Your Highness austerities.

---

**अ. नं. ४३६** **श्री**

ता. १९-१२-१७८६

मालोजी लांबहाते यांजकडून कर्नाटक प्रांतांतून मुक्काम बदामीहून, मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. आपले पुण्यप्रतापेकरून एक सुतळीचा तोडाही न जातां, सर्वस्वी क्षेम राहिले. ईश्वरें आपले पुण्यसामर्थे लज्जा रक्षिली, लौकिक राखिला, धन्य आपुले पुण्यप्रताप कीं संपूर्ण आपल्या सैन्यास कांहीं उपसर्ग लागला नाहीं. ज्या दौलतीत धर्मध्वज फडत्कार करितो तेथें ईश्वर अपेश देणार नाहीं. आपले तपसामर्थ्य थोर आहे, तदनुसार आपले फौजेस उपसर्ग न झाला. यामुळें भोंसले व मोंगल दूषण ठेवितात कीं यांचा फितूर आहे. आमचा नाश झाला तो यांनीं करविला, असे म्हणोन कलहास प्रवर्तमान होतात; परंतु राजश्री तात्या सर्वांचे शांतवन करितात.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 436 19-12-1786 A.D.

Malojee Lambhate writes from Badami Camp (in the Karnatak) to Ahilyabai.

Every thing has gone well with us in the campaign. All that is the fruit of your religious austerities. We are misunderstood by the Bhonsales and Moguls.

Haripant Tatya is trying his best to remove the misunderstanding.

---

**अ. नं. ४३७** **श्री**

ता. १८-२-१७८७

अंबाजी इंगळे मुक्काम कामा प्रांत मेवाड यांचे पत्र अहिल्याबाई होळकर यांसी.

सविस्तर वर्तमान कारकून मजकुर निवेदन करील. येथें दक्षण्यावर इतबार काडीमात्र नाहीं. झाडून कारभार नोबतराय कायस्त करतात. दैव मोठें आहे तेणेंकरून सर्व निभाव होतो. फार काय लिहावें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 437 18-2-1787 A.D.

Ambojee Ingle writes to Ahilyabai from Mewad : The Marathas are at discount here. Nobatrai Kayastha is all in all here.

---

**अ. नं. ४३८** **श्री**

ता. १९ फेब्रुवारी, इसवी सन १७८७

नारो हरी यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. छ.२० रविलाखर सन ११८७ आर्बी. हल्लीं वर्तमान तरी श्रीमंत राजश्री पाटीलबाबांची सडी स्वारी दिल्लीनजीक पोंहचली. शहराबाहेर बागांत मुक्काम केला. दिल्लीपलीकडे शिखांनीं फारच उपद्रव केला. याकरितां शह देऊन आहेत. त्यांच्या मुकाबल्यास फौज सरंजामासुद्धां गेली. मेवात्यांत बराच दबाब बसविला. जेथें मेवाती आढळेल तेथेंच शिरच्छेद करीत. दिल्लीनजीक लागलीच बादशहाची भेट घेऊन दिल्लीनजीकच पांचपंचवीस कोशीं कांहीं दिवस राहणार.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 438 19-2-1787 A.D.

Naro Hari writes to Ahilyabai Holkar : Mahadajee Patil Baba has camped near Delhi. He has sent his army against the Sikhs. He has paid visit to the Emperor.

---

**अ. नं. ४३९** **श्री**

ता. २३ फेब्रुवारी, इसवी सन १७८७

महाराज कुंवर सर दिवाणबहादुर सेनापती अर्जुनसिंगजीदेव. संस्थान चरखारी यांजकडून मातुश्री अहिल्याबाई होळकर यांसी पौष शुद्ध ४. साहेबीं कृपा करून आज्ञापत्र पाठविलें ते सुसमयीं प्रविष्ट होऊन परम समाधान झालें. असेच निरंतर कृपापत्रीं सेवकाचा सांभाळ करीत असलें पाहिजे. यानंतर सवाई राजे बखतसिंगजी देव याविषयीं साहेबीं श्रीमंत राजश्री तुकोजीबाबा यांस पत्र पाठविलें ते पावलें. बजिन्स त्यांजकडे रवाना केलें आहे. हे राज्य साहेबांचे जाणून सांभाळीत असलें पाहिजे. सर्व प्रकारें भरंवसा साहेबांचा आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 439 23-2-1787 A.D.

The friendly relations of the Charkhari State with Ahilyabai Holkar are expressed by the General of the Army of that State. Her letter addressed to Tukojeerao in connection with Bakhatsingjee is referred to.

---

**अ. नं. ४४०** **श्री**

ता. ७ मार्च, इसवी सन १७८७

रामराव अप्पाजी कडून अहिल्याबाईंस पत्र. मुक्काम कनकगिरी कर्नाटक फाल्गुन वद्य ३. पांडुरंग कोकजी याची स्त्री येथे आली आहे. ते जामिनाचे तजविजींत आहे. त्याची मुक्तता करावी म्हणोन आज्ञा ऐसियास पांडुरंग कोकजी याचा मजकूर. माझा आग्रह आहे असा प्रकार नाहीं. आपण आज्ञा कराल ते मान्य, परंतु त्याची चाल आपल्यास लोपली नाहीं. अद्यापी त्याच्यानें उगीच राहवत नाही. त्याची स्त्री जामीन देत आहे. साहेबीं अशी आज्ञा आली पाहिजे कीं, पुन्हा बखेडा न करी असा पक्का बंदोबस्त करण्याची, म्हणजे सोडून देतों. आपले मर्जीबाहेर मला तरी काय कर्तव्य आहे?

१ राजकीय वर्तमान. सल्ला झाला. बदामी व नरगुंद दोन किल्ले त्या खालीं मुलूख दीड लक्षाचा दिला. खंडणीं कराराप्रमाणें चौसाला राहिली होती ते दिली. याप्रमाणें ठराव खंडणीचा. ऐवज येणें तो आठ चार रोजात येणार. आला म्हणजे वकिलाची माघारी रवानगी करून लौकरच मास पक्षांत देशीं जावयाचें करावें, असें जालें आहे. या मोहिमेस इकडील देश वाईट, हवा कठीण, छाप्याची नित्य दगदग. त्यात महामारीचा उपद्रव, त्यामुळें फार दिक. अतःपर लवकरच उलगडा पडेल. यावर भगवत सत्ता.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 440 7-3-1787 A.D.

Ramrao Appajee (Palshikar) writes to Ahilyabai Holkar :

(1) The wife of Pandurang Kokjee is trying to secure "security" for her husband. Your Highness must order them to pass a bond for peaceful conduct in the future. I shall be always obedient towards your Highness.

(2) Treaty is concluded with Tipu. Territory and tribute we have secured. The whole campaign was a great taxation from all points of view.

---

अ. नं. ४४१ श्री

ता. १४ मार्च, इसवी सन १७८७

आनंदीबाई वाघमारे मुक्काम खिडकी यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. फाल्गुन वद्य १०.

लष्करांतून आजमितीस चिरंजीवांचे पत्र आले त्यात मजकुर कीं सल्ल्याचा विचार ठरला आहे. ज्येष्ठमासीं फौजा देशीं येणार. राजश्री मल्हारराव मांडवगणास आले. लष्करांत मरीचा उपद्रव व उत्कर्ष जाहला आहे. सांप्रत शम आहे. तूर्त शत्रूच्या लष्करांत संहार होत आहे. चाळीस पन्नास हजार मनुष्य आपणाकडील, चार सैन्य मिळून जायबंदी जाहले, म्हणून पत्रीं लिहिलें आहे. आम्हांस सर्व प्रकारें आधार महाराजांचे पायांचा आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 441 14-3-1787 A.D.

Anandibai Waghmare writes to Ahilyabai : Cholera has been raging very high in the camp for some time. It has subsided a little now. Nearly forty to fifty thousand men suffered in the campaign against Tipu. They are talking of peace now-a-days.

---

अ. नं. ४४२ श्री

ता. १६ मार्च, इसवी सन १७८७

खंडो जगदेवराव, होळकर वकिलांचे अयोध्येहून अहिल्याबाईंस पत्र माघ वद्य ९.

नबाबाचे नायब हैदरबेगखान कलकत्यास जावयाची तयारी करीत होते तों कलकत्यास मुख्य लाट (कार्नवालीस) फिरंगी कर्नल नूतन आला आहे. त्याचें बोलावणें हैदरबेगास आले त्यावरून त्यांनीं तयारी केली. समागमें नग्द तीस लक्ष व जवाहीर तीस चाळीस लक्षांचे वगैरे प्रमाणें घेतलें. तेथील कामामुळें बछराज सावकार यांस समागमें घेऊन गेले. हैदरबेगसमागमें सर्व मुत्सद्दी फौज सुलतानपुरीं पाठविली होती. तेथून सर्वांस लखनौस बिदा केले आणि आपण सडे होऊन पुढें गेले. येथे सर्व लोकांचे चित्तांत कीं, हैदरबेगवर फिरंग्याची अवकृपा होईल, किंवा कृपा होऊन पूर्ववतप्रमाणें चालवतील हे न कळे. हैदरबेगही नगदी वगैरे सरंजामासह गेले आहेत. मार्गी जातां जो फिरंगी भेटला त्यास खूश करीत गेला. फिरंगी द्रव्येंकरून खुश होतात आणि युक्ती करून वर्तणूक करतात. हैदरबेग कलकत्यास गेले त्या दिवशीं मुख्य लाट कर्ण फिरंगी तीन कोस हैदरबेगास सामोरा येऊन थोर बहुमान करून घेऊन गेला. याप्रमाणें वर्तमान आहे. येथें कारभारी मुख्य टिकेनराय

राहिले आहेत. हापड फिरंगी येथें आहे. बादशहाजादा काशींत आहे. तेथें फिरंगी यांनीं खर्चास देऊन ठेवला आहे आणि म्हणतात आम्ही सर्व प्रकारें चाकरीस हाजर आहोत. आतां आपली एकदोन पलटणें तैनात केली. स्वारी शिकारी ऐषआराम करावा. कोठें जाऊं म्हणतील तर फिरंग्यांची आज्ञा पाहिजे.

नेपाल प्रांताच्या राजानें पहाडांत कित्येक जाग्यांस उपद्रव केला. शरयुपारचे मुलखांत बखेडा केल्यामुळें नबाबांनीं शिकारीचें मिस करून कूच करून शरयूचे पहाडाचे तळवटीं गेले. तेथून पहाडांत बुटालेपावेतों गेले. नेपाळ प्रांताचा राजा पळून गेला. बुटालेचा राजा भेटला, तोफा जिन्नस नजर केला. नबाबानें त्यांस खिल्लत वस्त्रें दिलीं. त्या प्रांतीं कांहीं दिवस शिकारीस होते. कांहीं व्याघ्र मारिले. चाळीस पन्नास हत्ती धरून आणिले. तेथून बंगल्यास आले. उभयतां बेगमांची भेट झाली.

१ जयपूरवाल्याकडोन मातब्बर मनुष्य येथें आला आहे कीं येथून मदत घ्यावी. मुख्यासी व फिरंग्यासी भेट झाली. खिल्लत वस्त्रें देऊन शिष्टाचार भाषणें केलीं. राजकारण लावून स्नेहाचें संधान ठेवलें आहे. जयसिंग मातबर शिख सरदार साहेबाशीं स्नेह असावा म्हणोन त्याचीं पत्रें आली आहेत. पाटीलबाबा मथुरेहून बारा कोस आहेत. बादशहा दिल्लीस आहे. जयपूरवाल्यांनीं कांहीं बदमामली केल्यामुळें बादशहास बरोबर घेऊन त्या प्रांते रोख द्यावा. खंडेराव हरी बुंदेलखंड प्रांतीं आहेत. तिकडून गुंता उरकून ग्वाल्हेर प्रांतीं आले. अनुपगीर गोसावी यानें मागती येथें येण्याविषयीं जाबसाल लाविला आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 442 16-3-1787 A.D.

News-letter from the Holkar Ambassador at Ayodhya :

Haider Baig has gone to Calcutta with men, money and jewellery. He was received very ceremoniously by the authorities there.

The heir-apparent of Delhi is, at present, in Benares under the protection of the Firangees.

The Nawab led an army against the Nepal king, and had an easy victory.

The Jeypore court is seeking aid of this State. Mahadajee Scindia is 24 miles away from Mathura. His general-Khanderao Hari-has gone from Bundelkhand to Gwalior.

---

**अ. नं. ४४३** **श्री**

ता. २० मार्च, इसवी सन १७८७

चिरंजीव कान्होजी होळकर यांस अहिल्याबाई होळकर आशीर्वाद सु.सबासमानेन मयावअलफ राघो रंगनाथ यांनीं हुजूर येऊन विदित केलें कीं मौजे बोराडी येथील पाटलाकडून सरकारची बाकी एकशें तेरा रुपये येणें. त्याचे खत बजिन्स लिहून दिलें. त्याप्रमाणें निकाल करून द्यावा तें न करितां खताचे ऐवज आमचे मुलांमाणसांपाशी मागतात. येविषयीं ताकीद झाली पाहिजे. म्हणोन त्यावरून हे पत्र तुम्हांस सादर केलें आहे. तरी तुम्ही येविषयीं मजकूर मनास आणून गावकरियांनीं सरकारचे ऐवजाचे खत लिहून दिलें असतां, तो ऐवज मशारनिल्हेच्या मुलामाणसापाशीं मागत असल्यास त्याजला निक्षून ताकीद करून, मुलांमाणसांशीं तगादा करणें योग्य नाहीं. येविषयींचा फिरोन बोभाट येऊं न देणें. मशारनिल्हेचीं मुलेमाणसें आटाळ्यासुद्धां जावरा येथें जातील त्यांजला जाऊं देणें. अडथळा न करणें. जाणिजे. छ.२९ जमादिलावल मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 443 20-3-1787 A.D.

Ahilyabai Holkar writes to Kanhojee Holkar : The Patil of Boradi village owes Rs. 113/- to the State. He has passed a bond. The money is being asked for from his family. It should not be so etc.,

---

**अ. नं. ४४४** **श्री**

ता. २३-३-१७८७

मालोजी लांबहाते मुक्काम कनकगिरीनजिक आठ कोस. फाल्गुन शुद्ध अहिल्याबाईंस पत्र. या मोहिमेस पंधरा महिने झाले. हिशेब दहामाहीचे देतात. आम्ही तर सर्वस्वी बुडालों. कर्जाचे पेंचात फार आलो. राजकीय वर्तमान तर टिपूचा सल्ला झाला. एक दोन दिवसांत येथून कूच करून मागें फिरतील. फौजांस तर इतलाखीस निरोप झाला. आपण श्री देव जेजुरीची यात्रा करून वाफगांवीं किंवा मांडवगणीं लवकरच जाणार.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 444 23-3-1787 A.D.

Malojee Lambhate writes to Ahilyabai from camp Kanakgiree.

The campaign had been in progress for fifteen months, and we are paid for ten months only. Peace is, at last, concluded with Tippu. The army is ordered to disperse. I shall go to Jejuree to pay my respects to God and thence to Wafgaon or Mandavgana.

---

**अ. नं. ४४५** **श्री**

ता. १३ एप्रिल, इसवी सन १७८७

तुळाजी शिंदेकडून अहिल्याबाईंस पत्र. चैत्र वद्य १० आम्ही टोकेहून तराण्यास आलों. रांगड्यानीं प्रांतमजकुरीं दंगा केला. नरहर सदाशिव व मामलेदारांचे बंधु मशारनिल्हेपाशीं आहेत. त्यास आज्ञा न द्यावी. मीही महाराजांचे सेवेसीं लवकरच येऊन पोहोचतों. त्यांचा आमचा जाबसाल समक्ष महाराजांचें रुबरू होईल. खामी पडली असेल तो जाबसाल महाराजांचें नजरेस येईल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 445 13-4-4787 A.D.

Tulajee Shinde writes to Ahilyabai : "I have come from Toke to Tarana. Narhar Sadashiv and the Mammlatdar's brother are both there. I would submit my case before you Highness in their presence. Truth will then appear in your Highness' presence.

---

**अ. नं. ४४६** **श्री**

ता. १५-४-१७८७

आबाजी विश्वनाथ मुकाम टोंक यांचें अहिल्याबाईंस पत्र.

रायाजी पाटील तो जयपुरचे शहास गुंतलें आहेत. पाटीलबाबांचा व जयपूरकरांचा अद्याप सलूक नाही. भानगड पडली आहे. येथील बंदोबस्त जो कर्तव्य तो साहेबांनीं सत्वर करावयास आज्ञा केली पाहिजे. जमियत थोडी असल्यानें परिणाम नाही. पोक्त ऐक्य आपल्यांत राही असा सरंजाम पाहिजे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 446 15-4-1787 A.D.

Abajee Vishwanath writes to Ahilyabai from Tonk : Patil Baba and the Jeypore Maharana have not yet concluded any treaty. Our Military arrangements are poor. They must be strengthened in order to be able to command permanent prestige.

---

अ. नं. ४४७ **श्री**

ता. १६-४-१७८७

रा.रामराव अप्पाजीस पत्र अहिल्याबाई होळकर यांजकडून विशेष : तुम्ही पत्र पाठविलें ते पावून लेखनार्थ अवगत जाहला. तिकडील सलूखाचें वगैरे वर्तमान विस्तारे लिहिले. ऐसियास सलूकाचा जाबसाल बोलणेंत आल्याप्रमाणें वहिवाटीत येऊन कूच माघारें झाले किंवा मुक्काम आहे तेथेंच आहे. आजपावेतों जाबसाल काय झाला हे सविस्तरें लेखन करणें. राजश्री पांडुरंग कोकजीकडील जामनीचा जाबसाल जाहला होता तो तुम्हांस लिहिलाच आहे. त्याउपरि कोणी येऊन बोललें नाहीं. पुढें आल्यानंतर लिहावयाचें ते लिहून पाठविलें जाईल. रवाना चंद्र २७ जमादिलाखर सुरूसन सबासमानेनमयावअलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 447 16-4-1787 A.D.

Ahilyabai Holkar writes to Ramrao Appaji :

News of treaty was in the air. I would like to know the fact in details. None has yet come forth as security for Pandurang Kokjee.

---

अ. नं. ४४८ **श्री**

ता. २९ एप्रिल, इसवी सन १७८७

राणेखान यांजकडून पत्र अहिल्याबाई होळकर यांस : वडिलीं पत्र पाठविलें ते प्रविष्ट झालें. लेखनार्थ अवगत झाला. पत्रीं कित्येक अर्थ लिहिला तो कळला. ऐसियासी आम्ही श्रीमंत महाराजांस विदित केलें, त्यावरून येथें दुसरा अर्थ नाही. वरकड कित्येक अर्थ सरकारचे पत्रीं लिहिलें आहे त्यावरून कळेल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 448 29-4-1787 A.D.

Ranekhan's reply to the confidential letter of Ahilyabai Holkar.

---

अ. नं. ४४९ **श्री**

ता. २५ मे, इसवी सन १७८७

रोजकीर्द राजश्री सुभा तुकोजी होळकर छ.११ साबान मुक्काम महेश्वर. राजश्री मल्हार सोयराजी कमाविसदार परगणे निंबाहेडा यांसी कीं, संस्थान उदेपूर येथे राणाजींचे व रावतभिमसिंग यांचे चित्त शुद्ध नाही म्हणून विदित झालें. त्यावरून राव मशारनिल्हे व झालीजीस व रावजीस पत्रें लिहून तुम्हांस त्यांजकडे जाऊन ज्यांचे त्याजपरी बोलून समजुती पडून निखालसता होय ते करणें म्हणोन पत्रें पाठविली आहेत. हल्लीं रा. काशीनाथ पंचोली आले. त्यांनीं सविस्तरें वर्तमान सांगितले. त्यास काल, देश, वर्तमान, एक प्रकारचें अशांत आपसांत वाकडे दाखवून राज्यांत बखेडा करून खराबी करून द्यावी हे उभयपक्षीं चांगलें नाहीं. आजपर्यंत रावतजींनीं कारभार केला तो राणाजीशीं निष्ठा ठेवून रामधर्मानेच केला. कदाचित कोठें अंतरही दिसोन आले असल्यास त्याजवर दृष्टी देऊन बखेडा वाढवून पदरचे माणूस तोडून राज्यास अपाय करावा, हे ठीक नाहीं. जेथें अंतर पडले असेल ते त्यांचे अंगीं लावून, पुढें मार्गानें चालावयाविशीं सांगितल्यास रावतजी न ऐकतां ओढ करतील हे घडणार नाही. तो प्रकार कांहीं न करितां मेहकुबसिंग भिंडरकर यांजला मायेत घेऊन कोटेकरांची जमियत आपल्यापाशीं आणून भिमसिंगास गांवांत येऊं न देतां बाहेरच उतरावयासीं सांगितले हे चांगले केले नाही. कोणे प्रकारें आपसांतील संशय तुटून बखेडा दूर होऊन राज्याचा बंदोबस्त असल्यास सर्वांस चांगले. याजकरितां हल्लींही राणाजींस व झालीजीस व रावजींस पत्रें लिहून हे पत्र तुम्हांस सादर केले असें. तरी तुम्ही पत्रदर्शनीं काशीनाथ पंचोली याजसमागमें उदेपुरास जाऊन महाराज दुर्जनसिंग यांचे विद्यमानें राणाजी व झालाजीची भेट घेऊन सरकारची पत्रें देऊन त्यांसीं बोलून त्यांचे मनातील संशय दूर करून निखालसता होय, तें करणें. कदाचित त्यांचे मनांत रावजींनीं कारभार नच करावा असे असल्यास राणाजींनीं आपले घरचे घरांत आणखी कोणाचे हाते काम घेत असल्यास रावजींकडून आग्रह होणार नाहीं परंतु दुसरियास आपले घरांत आणून विग्रह वाढवावा हे गोष्ट चांगली नाहीं. त्यांजकडील जाबसाल भिमसिंगजीशीं बोलावयाचे ते ऐकून घेऊन त्याप्रमाणें महाराज दुर्जनसिंग यांसी घेऊन त्यांसीं बोलण्यांत आणून ताळा पडे तें करणें. हा मजकूर महकुबसिंगासी समजून देणें. सारांश, उभयपक्षीं समजाऊन समजूत पडे तें करणें आणि घडेल तैसें सविस्तरें लिहून पाठविणें. म्हणोन पत्र मशारनिल्हे समागमें जाणेविशीं आबाजी देशमुख यांचे नावें पत्र :

**सरकारी रेकॉर्ड**

No. 449 25-5-1787 A.D.

The Kamavisdar of Pergana Nimbheda is ordered to bring about reconciliation between Rawatjee and Ranajee of Udaipur. Abajee Deshmukh is also ordered to company, and accomplish, the mission.

---

**अ. नं. ४५०** **श्री**

तारीख ९-२-१७८८

सीताराम भास्कर कमाविसदार काष्टी, चंदनपुरी व जांबगांव यांस पत्र तुकोजीबाबांकडून छ.१ जमादिलाखर. राजश्री देवाजी जाखदेव यांजला श्रीमंतांकडे वकिलीच्या कामास सरकारांतून ठेविलें आहेत. मशारनिल्हेस वेतन, रोजमुरा, जासूदसुद्धा नेमणुकीचा ऐवज दर साल ८०० मौजे जांबगांवपैकीं, रु.१२२५ मौजे काष्टी व चंदनपुरी, हरदु गांवपैकीं, एकूण २०२५ दोन हजार पंचवीस दरसाल तुम्हांकडून दिले जात जावे. बोभाट न ये.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 450 9-2-1788 A.D.

The Kamavisdar of Kashti and two other places is ordered to pay Rs. 2,025/- annually to Dewaji Jakhadeo who is appointed Holkar ambassador to the Poona Court.

---

**अ. नं. ४५१** **श्री**

ता. १४ मे, इसवी सन १७८८

केसो गणेश कुंटे पुणें यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. वैशाख वद्य ६ गुरुवार प्रातःकाळपर्यंत कृपावलोकनेंकरून यथास्थित असो विशेष. बहुत दिवस पत्र येऊन सेवकाचा सांभाळ झाला नाही. श्रीहून येतां भेटी घेऊन आलों. घरीं येतांच दुःखच दृष्टीस पडलें. प्रपंचाचा फलादेश दैवेंकरून असा दृष्टीस पडला. मनांत इच्छा कीं प्रपंच पुढिलांचे गळा घालून आपण मोकळें व्हावें, तीर्थसाधन करावें, ते ईश्वराचे विचारांत न आलें पुढें ईश्वरीं इच्छा जें घडवील तें खरे. चिरंजीव राजश्री बजाबा सैन्यासमागमें सेवेसीं पाठविला आहे. निर्वाह करणें सर्व साहेबांस आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ती. पैवस्त मुक्काम महेश्वर छ.७ रमजान ११९८.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 451 14-5-1788 A.D.

Keso Ganesh Kunte from Poona informs Ahilyabai of his domestic afflictions. He has sent his son with the army, and requests her to take him under her protection.

---

**अ. नं. ४५२** **श्री**

ता. १८ जून, इसवी सन १७८८

गंगाजलनिर्मळ मातोश्री अहिल्याबाई होळकर यांसी स्नेहपूर्वक महादजी शिंदे दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशललेखन करीत असावे विशेष. इसमाल्या व गुलामकदार एकत्र होऊन आगरियास आले. त्यांच्या पारिपत्याकरितां फौजा त्यांचे मुकाबल्यास आहेत व नवी फौज यमुनापार रवाना केली हे पेशजी लिहिण्यांत आलेंच आहे. यमुनापार मथुरेनजीक उतरून जावयाची फौज रवाना केली. त्यांनीं वृंदावनीं एक पलटण होते त्याजवर चालून जाऊन पारिपत्य करून दोन तोफा आणिल्या आणि तेथेंच घाट पाहून पार उतरले. पार दोन पलटणें रोहिल्यांची आली त्यासी लढाई करून पलटणें कापून काढलीं. ७ तोफा घेतल्या. पार फौज उतरली हे गुलामकादरास कळतांच इसमाल्या निघोन यमुनापार गेला. दोघांचे जुग फुटलें. एक इसमाल्या राहिला त्याजवर निकट पारिपत्य करावें हा निश्चिय करून पार फौज गेली होती ती बोलावून दोन्हीं एकजागीं करून ज्येष्ठ शुद्ध १५ बुधवारीं लढाई करून इसमाल्याचे पारिपत्य केलें. दहा बारा स्वारांनिशीं इसमाल्या पळोन आग्रा शहरांत गेला. त्याच्या शोधास लोक शहरांत गेले आहेत. श्री कृपेकरून हस्तगत होईल. इसमाल्याचा सरंजाम पाऊणशें ऐशीं तोफा व पंधरा पलटणें व दोन तीन हजार स्वार वगैरे सरंजाम होता. परंतु फौजेनें अरब्यावर घोडे चालून पलटणें स्वार कापून काढले, तोफा हत्ती, डेरे, दांडेसुद्धा लुटून फस्त केले. आपल्यास कळावें म्हणोन लिहिलें आहे. हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 452 18-6-1788 A.D.

Mahadajee Scindia informs Ahilyabai of the fight that took place between his men and Ismail Baig. The latter hid himself in the city of Agra after the fight.

---

**अ. नं. ४५३** **श्री**

ता. २६ जून, इसवी सन १७८८

श्रीमंत मातुश्री बाईसाहेब साहेबांचे सेवेसीं. सेवक सदाशिव बापूजी व भवानीशंकर यादव व बाळाजी लक्ष्मण कृतानेक विज्ञापना छ.२१ रमजानपर्यंत साहेबांचे कृपेकरून यथास्थित असो विशेष. श्रीमंत यजमानसाहेबांचीं पत्रें लष्करांतून आजच आली. इस्माईल बेग फौजेसुद्धां आगरियानजीक होता. त्यातला इकडील फौजेनें घेराघारी केलीच होती. ज्येष्ठ शुद्ध १५ बुधवारीं प्रातःकाळीं फौजेनें चाल करून तोंड लाविलें. दीडप्रहर पर्यंत गोळागोळी होऊन फौजेनें तोफांवर चाल करून त्यांचे पारिपत्य केलें. इस्माईल बेग पन्नास स्वारांनिशीं शहरांतून पळून गेला. त्याचे पिछाडी फौज गेली आहे. तोफा, घोडीं, उंट, डेरेदांडे, वगैरे सरंजाम

सुद्धां तळचा तळ लुटून घेतला. शत्रूचा पराजय जाहला. संतोषाचें वर्तमान साहेबांस श्रुत व्हावे यास्तव सेवेसीं विज्ञापिलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना पैवस्त छ.२३ रमजान सन ११९८ मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 453 26-6-1788 A.D.

Sadashiv Bapujee and others inform Ahilyabai of the defeat of Ismail Baig. Details are as given in the last number.

---

**अ. नं. ४५४** **श्री**

ता. ४ जुलाई, इसवी सन १७८८

तुकोजीराव होळकरांचे अहिल्याबाईंस पत्र. उदेपूरच्या प्राप्तीचा विषय समजलाच आहे. चालते मजलीनें ''शाकाय लवणाय '' होईल तसें करून ईश्वरावर भार ठेवून जाणें प्राप्त. म्हणोन वगैरे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 454 4-7-1788 A.D.

Tukojeerao Holkar writes to Ahilyabai rather in a despondent mood regarding gaining territory in the present distribution.

---

**अ. नं. ४५५** **श्री**

ता. ४ जुलाई, इसवी सन १७८८

रोजकीर्द सुभा तुकोजी होळकर छ.२८,२९ रमजान ज्येष्ठ मास दफाते पत्र.

सुलतानसिंग सहादु टाकेवाले यानें सालगुदस्तां मेवाडांत रांगड्यांचा जमावा करून धामधूम केली. सरकार महालाची व शिंद्यांकडील महालाचीं ठाणीं उठविलीं. त्याचे पारिपत्यास सरकारांतून फौज पाठवून पारिपत्य केले. मशारनिल्हेस पुत्रासहित पाडाव करून, धरून आणून ठाणें जांब येथे अटकेंत ठेविलें. त्यावरून उदेपूरकर संस्थानिकाकडील भिमसिंग चितोडकर यांचे तर्फेने वकील काशीनाथ पंचोली यानें दरम्यान पडोन मुक्ततेविषयीं सरकारांत विनंती केली. याजमुळें त्यांजकडून सरकारचा नजराणा

रु.एक लक्ष १००००० द्यावयाचे ठरलें. त्याऐवजीं त्यानें आपले पांच गांव लावून दिले. ऐवज फिटेतोंवर गांवाविशीं खटपट करूं नये, असा दस्ताऐवज सिंगमजकूर यानें लिहून दिला तो. कलम १

**सरकारी रेकॉर्ड**

No. 455 4-7-1788 A.D.

Sultansing had revolted against Holkar and Scindia in Mewar. He and his son were defeated and kept at Jamb in imprisonment. The Udaipur State intervened their relief. 5 villages were mortgaged for a lac of Rupees-their due.

---

**अ. नं. ४५६** **श्री**

ता. ६ जुलाई, इसवी सन १७८८

अपत्यें तुकबानें चरणीं मस्तक ठेवून साष्टांग दंडवत विज्ञापना. येथील कुशल जाणोन स्वकीये लिहावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. स्वारीसमागमें तोफखान्यास बैलांकरितां मी समक्ष विनंती केली. आपण आज्ञा केली जे रामपुरियाहून बैल येतील त्यांतून बैल देऊं. त्यास तूर्त आम्हांस दरमजल पुढें जाणें. आजपर्यंत मार्ग बिगारीनें चालविले. पुढें बिगारीचा बैल मिळावयाचा नाहीं. याजकरितां हे पत्र सेवेसीं लिहिलें असे. तरी वडिलीं इंदुरींहून बैल आहेत त्यापैकीं मर्जीस येईल ते देववावे. बैल ३०० पाहिजेत. त्यांत आपले विचारांत येतील तितके द्यावयासी आज्ञा करावी. मिती आषाढ शुद्ध ४ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ.२ सवाल सन ११९८ मुक्काम महेश्वर ः

**सरकारी रेकार्ड**

No. 456 6-7-1788 A.D.

Tukojirao asks for 300 bullocks from Indore for his Artillery on march.

---

**अ. नं. ४५७** **श्री**

ता. ८ जुलाई, इसवी सन १७८८

चिरंजीव सौभाग्यवती साळूबाई वाघ यांसी अहिल्याबाई होळकर आशीर्वाद. गंगाजळनिर्मळ लक्ष्मीबाई वाघ यांजकडून चिरंजीव अमृतराव वाघ यानें अमर्यादा करून

ऐवज १५००० पंधरा हजार घेऊन तुम्हांपासीं ठेविले ते हुजूर आणिले पाहिजेत. यास्तव सरकारांतून पागेचे स्वारांसमागमें हे पत्र तुम्हास लिहिले आहे तरी एक घडीचा विलंब न करितां रुपये पंधरा हजार स्वारांसमागमें पाठवावे. ढील केल्यास परिच्छिन्न उपयोगी पडणार नाहीं. जाणिजे. मोर्तबसुद.

**सरकारी रेकार्ड**

No. 457 8-7-1788 A.D.

Ahilyabai Holkar orders Saubhagyawati Salubai Wagh to produce Rs. 15,000/- in the Royal presence without delay. The amount was handed over to her by Amritrao Wagh. The latter's behaviour with his mother, in this matter, is intolerable.

---

**अ. नं. ४५८** **श्री**

ता. ८ जुलाई, इ. स. १७८८

अहिल्याबाईकडून पत्र खंडो बाबुराव कमाविसदार इंदूर यांस छ ४ सवाल सन ११९८ तुम्ही पत्र पाठविलें कीं श्रीमंत सुभेदार छ. २ सवाल रविवारीं कसबें इंदुरीं दाखल झाले. आम्हांस बोलावून जिनसा पाहिजे त्याची यादी लिहून देऊन तगादा लाविला आहे. येविषयीं आज्ञा जाली पाहिजे म्हणोन लिहिलें. ऐसियास तुमचें पत्र येतांच येथून चिरंजीव तुकबासह नारो गणेश यांजला पत्रें लिहून मुजरद जोडीबरोबर पाठविलीं आहेत. बहुत करून तुम्हांस उपसर्ग होणार नाही. कदाचित कार्याकारण जिन्नस द्यावासा जाल्यास चारपांच हजारांपर्यंत मात्र देऊन पावती घेणें. भलती तेही मागणार नाहींत आणि तुम्हीही न देणें. म्हणोन दस्तूर पत्र महादजी गंगाधर निसबत मामलेदार.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 458 8-7-1788 A.D.

The Kamavisdar of Indore is ordered by Ahilyabai in reply to his letter : Tukojee Baba and Naro Ganesh are written to by us. He and his men will not trouble you unnecessarily. Their demands will be neither extra-ordinary nor extravagant; in case they demand, see that the amount does not exceed four or five thousand.

---

**अ. नं. ४५९** **श्री**

ता. १० जुलाई, इसवी सन १७८८

मातुश्री साहेबांस अपत्यें तुकबानें चरणीं मस्तक ठेवून साष्टांग दंडवत विज्ञापना विशेष. आम्ही इंदुरींहून उदईक भृगुवारीं कूच करून पुढें जातो. पदमसी सावकार वडिलांकडे आला आहे तो अद्यापी आला नाहीं. त्याचे येण्यावाचून येथील देण्याघेण्याचे जाबसाल तटले आहेत. यास्तव वडिलीं सावकार मजकुराची रवानगी सत्वर करावी. नाहीतर आमच्या जाण्यास अवघड पडेल. तरी पत्रदर्शनीं त्यास मार्गस्थ करावे. आषाढ शुद्ध ८. श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 459 10-7-1788 A.D.

Tukojirao Holkar informs Ahilyabai that he would leave Indore on Friday "Padamsey (Banker) is with you at Maheshwar. Without seeing him and without making monetary arrangements, I shall not be in a position to proceed."

---

**अ. नं. ४६०** **श्री**

ता. १७ जुलाई, इसवी सन १७८८

तुकोजीकडून अहिल्याबाईंस पत्र. विशेष. वडिलीं पदमसी तिलोकसी सावकार यांजकडून ऐवज देवविला. त्यापैकीं कांहीं चंदी उचापतीस व कांहीं शागीर्दपेशा समजाविशीस देऊन, राहिला ऐवज तों झाडून सावकार मजकुर याचे मागील देणें त्याऐवजीं देऊन निर्गम केला. पुढें स्वारीस जाणें. समागमें फौज वगैरे खर्च भारी त्यांस पोटास दिल्याखेरीज निर्वाह होणार नाहीं. पदमसी येथून बोलून गेलें कीं, मातुश्रींची भेट घेऊन मागती सत्वर येतों. त्याकरितां दोन मुक्काम अधिक इंदुरीं केले. परंतु सावकाराचें येणें न जालें. ते येत तावत्कालपर्यंत मुक्काम करून राहवें तर मनसुब्याशीं नीट दिसेना. राजश्री अलीबहादुर यांची पत्रें नित्यानीं लौकर येण्याकरितां येत गेली. त्यातून इंदुरींहून कूच केलें. बहादुर उज्जेनीस दाखल जाले. त्यास उन्हेलचे सुमारीं यावयासी येथील पत्रें गेली त्याप्रमाणें येतील. आम्हीही त्याच रूखे जात असों. यास्तव हे पत्र सेवेसीं लिहिले आहे. तरी वडिलीं सावकार मशारनिल्हेस पत्र पावतांच इकडे यावयाची आज्ञा केली पाहिजें. मिती आषाढ शुद्ध ९ श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकार्ड**

No. 460 17-7-1788 A.D.

Tukojeerao writes to Ahilyabai : "The amount received from Padamsey (Banker) has been all apportioned to various past payments and future arrangements. He is now with you. Urgent letters from Ali Bahadur have been received here. I cannot leave this spot without seeing the said banker. Please send him early.

---

**अ. नं. ४६१** **श्री**

ता. १९ जुलाई, इसवी सन १७८८

काशीराव होळकरांचे अहिल्याबाईंस पत्र वडिलीं छ १० सवालचें आशीर्वाद पत्र पाठविलें ते पावले. बहुत संतोष जाला. शिलेदार पागा समागमें येतात त्यांचा बंदोबस्त करून रवानगी झालीच असेल. कांहीं गुंता असल्यास पांडुरंग शंकर बोलावून बंदोबस्त करून घेऊन सत्वरीच येतील. आम्ही दरकूच शहाजापूरपर्यंत आलों. तीर्थरूप राजश्री बाबांचे कूच होऊन उज्जेनचे सुमारें गेले. सावकाराची खात्री व्हावी याभावें पंत मशारनिल्हेनीं तीर्थस्वरूपजींस पत्रें लिहिलीं आहेत. त्याचें पत्र सावकारास आलें म्हणजे गुमास्तां बरोबर देईल. येथील बंदोबस्त होऊन पुढें जाणें घडून कोठें उणे न दिसें हें करणें वडिलांसच आहे. वरकड आपलें हित अनहित आणि लौकिकांत चांगलें तें घडत जाईल. लक्ष असावें. जें होणें तें सर्व वडिलांचा आशीर्वाद आहे. मिती आषाढ वद्य १ मंदवार सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ती. पैवस्त मुक्काम महेश्वर छ १८ सवाल सन ११९८.

**सरकारी रेकार्ड**

No. 461 19-7-1788 A.D.

Kashirao Holkar informs Ahilyabai of his arrival near Shahajapur, and that of his father (Tukojirao) near Ujjain. He hopes to receive the contingent of Shiledar and Paga at an early date.

---

**अ. नं. ४६२** **श्री**

ता. २१ जुलाई, इसवी सन १७८८

नारो गणेश यांचे अहिल्याबाईंस पत्र. राजश्री तुकोजीबाबांनीं सेवेसीं लिहिलें आहे त्यावरून ध्यानास येईल. वतनदारीचे अर्थ सर्व महाराजांचे ध्यानांत आहे. आपणाइतकें

समजण्याचें दुसरें ठिकाण नाही. सर्वाविसीं मायबाप आहेत. लेकरें आपली जाणोन रीतिप्रमाणें निर्वाह आपणच करणार समर्थ. हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 462 21-7-1788 A.D.

Naro Ganesh praises Ahilyabai for her disinterested regard for all. He seeks her favour just as a child does of a parent, in connectiion with his Vatan.

---

**अ. नं. ४६३** **श्री**

ता. २२ जुलाई, इसवी सन १७८८

सुभेदार तुकोजी यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. मौजे बरखेडा प्रगणे तालमंडावल येथें कर्णोजी राठोड गिराशा त्याचा उपद्रव उज्जेन, इंदूर पावेतों हे वडिलांसही विदित आहेच. तथापि त्यांचे पारिपत्य करावें न करावें हे आमचे मनीमानसीं देखील नव्हते, गांव पवारांचा. कांहीं कारण नव्हतें, परंतु त्यांनीच रस्ता चालतां स्वारीपुढें बेगारीविषयीं कटकट करून राजश्री नारो गणेश यांजकडील एक घोडीं होती ती ठार करून सबनिसाकडील कारकून आजारी पालखींत जात होता, तोही जखमी केला. याप्रमाणें अपराध त्यांजकडून जाल्यास मग क्षमा करणें ठीक नाही. याजकरितां गांवावर हल्ला करून ठाकराचा वाडा घेरून दरोबस्त माणसें कापून काढलीं. हल्ल्यामुळें गांवचा नाश फार जाला. वडिलांस कळावे. मिती आषाढ वद्य ४ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ २३ सवाल मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 463 22-7-1788 A.D.

Tukojeerao Holkar informs Ahilyabai how and why he was compelled, quite against his will, to attack mauza Barkheda owing to the aggressive conduct of Karnojee Rathod. The Village suffered immensely at his hand for the misconduct of the Rathod.

---

**अ. नं. ४६४** **श्री**

ता. २२ जुलाई, इसवी सन १७८८

तुकोजींकडून अहिल्याबाईंस आमची इंदुरींहून कूच झालियावर दरमजल चमलनदी उतरून उत्तरतीरीं सितामहू परगण्यांत मुक्काम केला. राजश्री अलीबहाद्दरही नदी दक्षिणतीरीं येऊन पावले. नदीस पाणी आले आहे. एक दोरोज उतरावयास लागतील. सितामहू आसपास त्यांची आमची गांठ पडेल. कोटेकरांचा वकील नरहर मुरार येथें येऊन पावले. त्याजकडील मामलतीचें बोलणें होत आहे. अद्यापी निश्चयांत गोष्ट नाही. ठरेल त्याप्रमाणें सेवेसीं लिहून पाठवूं. सरंजाम्यांपैकीं बारगळ, वाघमारे व उभयतां वाघ व बुळे, यातून अद्यापी एकही कोणी आले नाही. तरी वडिली सर्वांस ताकीद करून सरंजामानिशीं येतें करावे. मिती आषाढ वद्य ४ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ.२५ सवाल मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 464 22-7-1788 A.D.

Tukojeerao informs Ahilyabai that he has reached Sitamahu Pargana. Ali Bahadar has also come very near. The chief of Kote has sent his ambassador. Bargal, Waghmare, Wagh and Bulye have not yet arrived in the camp. Please see that they soon come.

---

**अ. नं. ४६५** **श्री**

## देवस्थान निसबत माहिती

(पुणें पेशवे रेकॉर्ड पैकीं सन १७८८ चे हिशेबीं लागू असलेला खर्च)

नवस खर्च श्री मार्तंड जेजुरी यांस. सन आर्बासबैनांत (इ.स. १७७२ त) नवस केला होता तो श्री मार्तंड व भैरव.

५०००० श्री मार्तंडापुढें.

५०००० बाळाजी नारायण व राघो नारायण पुरंदरे सासवडकर यांस.

............

१००००००

देवविले वराता छ.२७ जमादिलावल.

५७७५० पांडुरंग नारायण भुसकुटे यांनीं हवाला घेतला आहे. त्यापैकीं श्रावण शुद्ध प्रतिपदेस देवविले.

४२२५० आबाजी नाईक वानवरे यांनीं हवाला घेतला आहे. त्यापैकीं ज्येष्ठ शुद्ध

पौर्णिमेस देवविले.

............

१०००००

**पेशवे रेकॉर्ड**

No. 465 1788 A.D.

One lac of Rupees is spent to fulfil the vow before Shree Martand of Jejuree.

---

**अ. नं. ४६६** **श्री**

ता. १० आगस्ट, इसवी सन १७८८

तुळसाजी वाघ यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष. लष्करातून खिजमतगार आले त्यांस आम्ही सांगितलें कीं, तुम्ही आम्हास निकड परभारें लष्करांत जावें याविशीं करितां, त्यास तुम्हास मनाचिठ्ठी मातुश्री साहेबांची आणून देतों त्यास म्हणतात कीं, आम्ही मनाचिठ्ठी सुभेदारांशिवाय दुसरें कोणाची मानीत नाही. ऐसे धनी बहुत आहेत, आम्ही दुसरें कोणाचे ऐकत नाही. त्यास आम्ही लष्करांत गेलो नाही तो इतकी तसदी. त्यापेक्षां पुढें निभाव होणार नाही हे कळतच आहे. येविशींची विनंती समक्ष केलीच आहे. सरंजाम्यांपैकीं अद्याप कोणी गेले नाही. त्यांस निकड नाही. आम्ही फार लिहावें ऐसे नाही. सर्व काळजी वडिलांस आहे. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना. पैवस्त छ.७ मुक्काम महेश्वर जिल्काद सन ११९८.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 467 10-8-1788 A.D.

Tulsajee Wagh writes to Ahilyabai : he complains that many Saranjamis have not yet gone to the camp; they are no way pressed, while he himself is pressed, and that too with disrespect. He seeks her protection.

---

**अ. नं. ४६७** **श्री**

ता. १२ आगस्ट, इसवी सन १७८८

चिरंजीव राजश्री तुकबांस अहिल्याबाईंचा आशीर्वाद. तुम्हांकडून चिरंजीव राजश्री तुळसाजी वाघ यांजला बोलाऊ जिखमतगार आले त्यांनीं इंदुरीं मशारनिल्हेस अटकाविलें म्हणोन विदीत झाले. ऐसियासी खिजमतगार आलियाचे पूर्वीच येथून चिरंजीवास सत्वर जाण्याविशीं ताकीद करून रवानगी केली. महतपुरीं जाऊन तेथील बंदोबस्त करून जातो ते बोलून गेले. त्याप्रमाणें येतील. यास्तव हे पत्र लेखन केले आहे. तरी महालीं जाऊन दिवसगत न लावितां जलदीनेंच येऊन पोहचतील. रवाना छ ९ जिल्काद बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 467 12-8-1788 A.D.

Ahilyabai informs Tukojeerao that she had already ordered Tulsajee Wagh to start for the camp. He agreed. He would go to Mahatpur and thence to the camp.

---

**अ. नं. ४६८** **श्री**

ता. १३-११-१७८८

माधवराव लक्ष्मण मुक्काम हैद्राबादहून अहिल्याबाईंस पत्र. कार्तिक शुद्ध १३ विशेष. निजाममुल्लक यांनीं आपल्या शरीर प्रकृतिविषयीं विचारपूस केली व निजाम साहेब बोलले की, ''अहिल्याबाई शरीरेंकरून कुशल व पुढें सलामत असोत. त्या सरदारीचें भूषण आहेत. बरीच तारीफ केली. जे कीं या समयास श्रीमंतांचे दौलतीत एक प्रत्यक्ष अहिल्या जे देवलोकीं होऊन गेली त्यांचीच प्रतिमा हे बाई जाली, तेव्हां तेथें द्वैतार्थ कसला ? नित्यनेम व स्नानसंध्या हेच त्यांचें ध्येय, म्हणोन वगैरे.''

**सरकारी रेकॉर्ड**

No. 468 13-11-1788 A.D.

Madhavrao Laxman from Hyderabad (Deccan) informs Ahilyabai of the high regard and esteem the Nizam entertains for her.

---

**अ. नं. ४६९** **श्री**

ता. १८ नोव्हेंबर, इसवी सन १७८८

राजश्री मार्तंड खंडेराव कमाविसदार परगणे अंबाड. गोसावी यांसी स्नेहांकित अहिल्याबाई होळकर दंडवत सुरूसन तिसासमानीन मयावअलफ. रखमाजी वलद पथाजी पाटील रोडगे मोकदम मौजे बदलापूर प्रगणे मजकुर यांनीं हुजूर येऊन विदित केलें कीं, माझा चुलत भाऊ उखाजी वल्द गुणाजी रोडगे याचा काळ जाहला. त्याचे पोटीं पुत्रसंतान नाही. यास्तव त्याचे वेतनास व वस्तभाव वगैरेचा वारिसदार मी असतां, होनाजी अर्गडा कुणबी मौजे मजकुर त्याचा कांहीं वारसा पोहचत नाही. नरसिंगराव देशमुखाचे हिमाइतेनें उखाजी रोडगा याचे वस्तभाव तरवार, नगदी व मेंढरे वगैरे दरोबस्त नेली. ते समयीं मी दाहीदुराही देत असोन धटाईनें घेऊन गेला. येविषयीं ताकीद होऊन माझी वस्तभाव मजला देवविली पाहिजे म्हणोन. त्यावरून पत्र सादर केलें आहे तर तुम्हीं येविषयींचा मजकुर मनास आणोन उखाजी रोडा याचे वस्तभावाचा वारीसदार रखमाजी रोडगा असोन होनाजी अर्गडा यानें जबरदस्तीनें कैद मोडून वस्तभाव सुतळीच्या तोड्यासुद्धां त्याजकडून घेऊन याचे यांस देवविणें. येविशींचा फिरोन बोभाट येऊं नये. राजश्री सदाशिव पाटील याचे विद्यमानें फडशा करणें. जाणिजे छ १९ सफर बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 469 18-11-1788 A.D.

Tha Kamavisdar of Ambad is ordered by Ahilyabai to make inquiries, and see that Rakhamajee Rodage-the heir of the late Ukhajee Rodaga - gets the property of the latter. Honajee Urgada has illegally taken possession of the same; such has been the version of the case by Rakhamajee.

---

**अ. नं. ४७०** **श्री**

ता. १६-१२-१७८८

अहिल्याबाईंचे विनायक विठ्ठल यांस पत्र. हांशील दिल्यावर दिक्कत करावी हे रीत कोठेच नस्ता नवीन दिक्कत करावी हें चांगलें नाहीं. येविषयींचा फिरोन बोभाट येऊं न देणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 470 16-12-1788 A.D.

Ahilyabai reprimands Vinayak Vithal for unjust demands made after proper payment is received.

**अ. नं. ४७१** **श्री**

जानेवारी, इसवी सन १७८९

अहिल्याबाईंचे पत्र. सन ११९९ फसली. विशेष. राणाजीकडून वकील आला. त्याचे बोलणेंचा भाव राजश्री तुकोजीबाबांचे विद्यमानें जाबसाल ठरला कीं, चौंडावताकडे त्याचे पट्याशिवाय अलीकडे जागा दाबली आहे ते सोडून द्यावी. चितोडचा किल्ला खाली करून द्यावा. खंडणीचा ऐवज देणें ठरला याचा सर्व निकाल करून देऊन चाकरीस रूजू रहावे. याप्रमाणें ठरल्यांत आलें. त्याप्रमाणें राणाजींनीं हाड्यांची जमियत काढून दिली. पुढें रावतजीकडून कराराप्रमाणें वहिवाट घडावी ते कांहींच न घडता, सोमजी गांधी याजला दगा केला. याजमुळें संशय येऊन येविशींचा बंदोबस्त केला पाहिजे म्हणोन चिरंजीवाचे विद्यमानें ठराव झाल्यांत तुम्हाकडून जाबसाल कोणकोणते घडणें राहिले. ते कोणते त्याचे कारण काय? काय जमेची? सोडले किती ? राहिले किती ? व चितोड खाली करून द्यावें असें ठरलें असतां, तुम्ही न दिला किंवा तुम्ही देत असोन त्यांनीच आपले तर्फेने देविला ? सरकारचे ऐवज देण्याची तजवीज काय केली? त्यापैकीं दिले किती? व राहिले किती? सोमजीचा प्रकार घडला त्यांजकडे दोष कोणता? त्याचा मुद्दा पत्ता काय? हे सविस्तरें समजून त्याअन्वयें त्यासीं बोलून राज्यांतील बखेडा उठून तुम्ही त्यासीं सामधर्मीनें चालावे. त्यांनीं तुम्हांसी संशय धरूं नये. यात उभयतांपक्षीं चांगलें आणि राज्याचा बंदोबस्तही घडला पाहिजे. यास्तव हें पत्र तुम्हास लिहिलें आहे. तरी तुम्ही लिहिलेंअन्वयें मागें जाबसाल जसे घडले असतील तसे सारे व पुढें घडावयाचे वहिवाटींत येतील असे पक्के असतील ते लिहून पाठविणें. त्या अन्वयें वकिलाशीं बोलण्यांत आणिलें जाईल. लिहाल एक व कराल एक असें न करावे. जाणिजे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 471 January 1789 A.D.

Ahilyabai makes searching inquiries with her amabssador at Udaipur regarding the engagements between Ranajee and Rawatjee, as well as the events that took place after those engagements were entered into.

---

**अ. नं. ४७२** **श्री**

ता. १४-२-१७८९

| शाहआलम बादशाहगाजी माधवराव<br>नारायण बहादुर कै. नायबराजे माधवराव<br>सिंदे वकील मुतालिक, मुखत्यार |
|---|

श्री पंडित मुख्य प्रधान माधवराव नारायण वंचनात अमीन परगणे आउदीघ निसबत ठाकोर रणजीतसिंग को मालूक होवे. आगु परगणे मजकुर के मौजे सेत, राजश्री अहिल्याबाई

होलकर के तरफ है. तिसका आगरनोन तुमने बंद किया है ऐसा हुजूर जाहीर हुवा. आगे तुमको सरकार से ताकीद हुई है. सो अब परवाना वाचतेही आगर छोड देना. मुजाहिम न होना. फिर बोभाट हुजूर न आवे. जाणिजे माघ वद्य ५ संवत १८४५ तिसासमानीन.

No. 472 14-2-1789 A.D.

Madhavrao Narayan Peshwa orders Thakur Ranjitsing in the year 1789 A.D. that the salt-pan assigned to the expenses of the Chhatri of Khanderao Maharaja Holkar and now resumed by the Thakur, should be released.

---

**अ. नं. ४७३** **श्री**

ता. २९ मार्च, इसवी सन १७८९

चिमाजी बुळे यांचे मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. सरदारी कर्जदार झाली. याजमुळें स्वारीसमागमें चाकरीस जाणेचा योग घडला नाहीं. सांप्रत महाराजांस विनंती करून करार केला असे. तूर्त पुढील स्वारीस दोनशें स्वार सरनौबत यांजबरोबर पाठवितों त्याची सिद्धता आजपासून करून अखेर ज्येष्ठमासीं सरंजाम लष्करात दाखल करितों व मागाहून विजयादशमी करून जाऊं. न गेलो तर महाराजांचे विचारास येईल तें करावें. मिती चैत्र शुद्ध ३ शके १७११ सौम्यनाम संवत्सरे श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 473 29-3-1789 A.D.

Chimajee Bulye informs Ahilyabai of his distressed condition regarding debt. He, however, engages to send two hundred horses for the present. After the Dasara he will be better equipped for the campaign.

---

**अ. नं. ४७४** **श्री**

ता. २-४-१७८९

चि. धोंडिबा फणसे याचें अहिल्याबाईंस पत्र. मुक्काम तराण्याहून विशेष. महाराजांचे आज्ञापत्र सादर झाले. त्यांत आज्ञा कीं, मृगसीतळाई पडल्यानंतर यावयाचें करणें म्हणोन, त्यास मजला तो चरणाची सीतळाई सर्व काळ आहेच. तेथें मृगसीतळाईचा अवलंब नसावा. चातकन्यायें चरणाचा निजध्यास आहे. चरणरज सिरीं लागतील तो सुदीन आहे. विशेष काय लिहू? हे विज्ञापना. पैवस्त छ ८ साबान मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 474 2-4-1789 A.D.

Dhondiba Fanse writes from Tarana to Ahilyabai expressing his keen desire to see the latter.

---

**अ. नं. ४७५** **श्री**

ता. १५ एप्रिल, इसवी सन १७८९

निळो परशराम परगणे इंदूर यांस पत्र. अहिल्याबाईंकडून. तिसासमानीन, मयावअलफ विशेष. मौजे खजराणा प्रगणे मजकुर येथील नातरे लागतात. त्याचे पाटदामाचा ऐवज पहिल्यापासून खाजगींत जमा होतो. असें असतां सांप्रत तुम्ही तेथील पाटदामाविषयीं खटपट आरंभिली आहे म्हणून हुजूर विदित जाहलें. त्यास हें पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरी अतःपर तुम्ही मौजे मजकुरचे पाटदामचे ऐवजाविषयीं दिक्कत न करणें. जुनी रीत मोडून नवी रीत करतां येविषयीं फिरून बोभाट येऊं न देणें. छ.४ रजब बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 475 15-4-1789 A.D.

Nilo Parshram of Indore is reprimanded by Ahilyabai for the innovation he introduced at Khajrana. "Charges on widow re-marriages in the lower classes are paid, until now, in the Khasgi. You are trying to change the system. You should in no way interfere with the old practice."

---

**अ. नं. ४७६** **श्री**

ता. १६-४-१७८९

धोंडिबा फणसे यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. वडिलांचे आज्ञेप्रमाणें श्री अवंतिका येथें जाऊन यात्रा व सिद्धवटीं नागनारायणबळी होऊन वद्य पंचमी मंगळवारीं तिसरें प्रहरीं मुक्काम तराणे येथें दाखल झालों. याउपरि वडिलांचे चरणांचा निजध्यास लागला आहे. कृपा करून चरणाजवळ येण्याची आज्ञा झाली पाहिजे.बहुत काय लिहिणें हे विज्ञापना. याच मजकुरांचे पत्र सौ. मुक्ताबाईंकडून मातोश्रीस आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 476 16-4-1789 A.D.

Dhondiba Phanse writes to Ahilyabai that obedience to her orders he had performed the pilgrimage of Avantika. He had, also, performed the Naga Narayan Sacrifice at Siddhavata, and returned to Tarana. He expresses his keen desire to see Ahilyabai.

Saubhagyawati Muktabai writes in the same strain.

---

**अ. नं. ४७७** **श्री**

ता. २०-४-१७८९

नथ्याबा फणसेकडून अहिल्याबाईंस पत्र. मुक्काम तराणे. वडिलांचे आशीर्वादिकरून यथास्तित असो विशेष. आज्ञापत्र सादर झाल्यांत उष्णकाळाचे शरीर संरक्षण करून असावें म्हणोन. परंतु महाराजांचे चरणाचे ठायीं निजध्यास लागला आहें. तो पूर्ण करणार वडील आहेत. आमचें संरक्षण महाराजांचे पुण्य व चरणांचा प्रताप आहे. लेकरांनीं काय लिहावें. हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 477 20-4-1789 A.D.

Nathyaba Phanse writes to Ahilyabai expressing his keen desire to see Ahilyabai. Hot season, says he, matters very little with him.

---

**अ. नं. ४७८** **श्री**

ता. ६ मे, इसवी सन १७८९

रा. गोविंद रघुनाथ गानू यांजकडून पत्र. मातोश्री अहिल्याबाई होळकर यांसी.

वैशाख शुद्ध १२ मुक्काम पुणें. साहेबांचे कृपावलोकनेंकरून कुशलरूप असो विशेष. साहेबांची आज्ञा घेऊन निघालो तो वै. शु. १ स येथे येऊन श्रीमंत राजश्री नानांची व रा. हरीपंत तात्यांची भेट घेतली आणि आजच निघोन कोकणांत जातो. येथील सर्व सविस्तर मजकूर रा. महादजी बाबूराव यांस सांगितला आहे ते सेवेसीं श्रुत करतील. त्याजवरून ध्यानास येईल. श्रुत होय.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 478 6-5-1789 A.D.

Govind Raghunath Ganu writes from Poona to Ahilyabai that he had seen both Nana Phadnavis and Haripant Phadke in obedience to her orders. He was going thence into Konkan. Mahadajee Baburao will tell the whole tale to Her Highness. He is so instructed by me.

---

**अ. नं. ४७९** **श्री**

ता. १४ जून, इसवी सन १७८९

बापू होळकर मुक्काम गोवर्धन प्रांत अटवाडा यांचे अहिल्याबाईंचे नांवें. वैशाख शुद्ध ११ विशेष. इकडील वर्तमान तर तीर्थस्वरूप बाबांचा मुक्काम श्री मथुरेवर आहे. आमची नेमणूक इस्माईल बेगवर केली आहे. त्यास कूच करोन फौजेसुद्धां अलवरकडे गेलों. पुढें फौजा शिंद्यांकडील व आपल्याकडील मिळतील. खरें बळ साहेब आहेत. आम्हाविषयीं काळजी नसावी. वडिलीं आपल्याकडील हमेशा लिहीत असावें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 479 14-6-1789 A.D.

Bapu Holkar writes to Ahilyabai from Govardhan Camp (Prant Jatwada) : "I am ordered to proceed against Ismael Baig, and I start, therefore, for Alwar. My father is in camp at Mathura."

---

**अ. नं. ४८०** **श्री**

ता. २४ जून, इसवी सन १७८९

अली बहादूर यांचे पत्र मातोश्री अहिल्याबाईंस सांप्रत मुक्काम कोणे ठिकाणीं व पुढें मानसमनसुबा कोणता ते लिहावे; राजश्री तुकोजीबाबा तिकडे आले आहेत, त्यांच्या भेटी लौकरच होतील म्हणोन पत्रीं लिहिलें ते कळलें. ऐसियास हल्लीं मुक्काम मथुरा येथें आहे. तूर्त मसलतीचा विचार नाही. पुढें मसलतीची योजना झाल्यास आपणास लिहून पाठवूं. तुकोजीबाबा सुभेदार येथून पस्तीस, चाळीस कोसांवर आले आहेत. पुढें लौकरच येणार म्हणोन वर्तमान आहे. परंतु आपण त्यास लिहून भेटी लौकर होत आणि पूर्ववतप्रमाणें सिलसिला चाले तें करावें. आम्हाकडील फौज जैपूरचे रोखे अंतरवेदींत आहे. तेथें व पानीपतचे सुमारे कुंजपुरियाकडे होती. त्याजवर कांहीं शीख चालून आले होते. त्यांसीं लढाई होऊन शीख माघारे पळून गेले. कळावें छ.२९ लोभ कीजे हे विनंती. पैवस्त छ.१५ सवाल. महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 480 24-6-1789 A.D.

Ali Bahadar informs Ahilyabai that he has encamped at Mathura. His army was attacked by some Sikhs near Kunjapura. They fled away. He wishes very much that Tukojeerao would expedite matters as well as his march.

---

**अ. नं. ४८१** **श्री**

ता. २६ जून, इ. स. १७८९

बाळाजीपंत नानांस पत्र अहिल्याबाईंकडून विशेष रा.चिमणाजी गोविंद साहुकार यांजविशीं कोणी आपल्यास गैरवाका समजाविला कीं, यांनीं भिल्लांस आपले वाड्यांत थारा देऊन काढून दिलें. त्यावरून सरकारांनीं मशारनिल्हेचे घरावर स्वार, गाडदी पाठवून मशारनिल्हेस बहुत उपद्रव लाविला आहे. ऐसियास गांवकरी पांच असाम्या पाटील, कुळकर्णी पांडुरंग त्रिंबक व कुसाजी यादव यानीं गावात खूळ करून भिल्ल वगैरे जमा केले त्यांचे पारिपत्यास येथून पागा पाठविली. ही गडबड पाहून चिमणाजी गोविंद अगोदरच मुलामाणसासह बाहेर दुसरें गांवीं जाऊन राहिले. कजियाचे जाबसालांत पहिलेपासून नाहीत. मशारनिल्हेचीही चाल भिल्लाभामराचे खुळांत शिरावें ऐसी त्याजविशीं कोणी गैरवाका समजाविल्या. त्याजवर प्रमाण नाहीं. तरी मशारनिल्हेचे घरावरी चौकी पाठविली आहे त्याची मनाई पाठवून कोणेविशीं उपसर्ग न लागेल तें करावें. मशारनिल्हे पूर्ण प्रामाणिक. यांजकडून वावगी वर्तणूक घडणार नाहीं. तिलप्राय अपराध नाही. मनाई द्यावी. हे विनंती. अशाच अर्थाचे पत्र रा. हरीपंत फडक्यांचें नावें आहे :

**सरकारी रेकॉर्ड**

No. 481 26-6-1789 A.D.

Ahilyabai writes to Nana Fadnis testifying to the good conduct of Chimnajee Govind Sahukar. He is misrepresented in the court. Nana is asked to remove the police-watch kept on the house of the Sowkar. A similar note is also addressed to Haripant Phadke.

---

**अ. नं. ४८२** **श्री**

ता. ३० जून, इसवी सन १७८९

तुकोजी होळकरांकडून अहिल्याबाईंस पत्र. महाल आहे तेथें ४ खरे ४ लबाड असतच आहेत. एकास इष्ट तें दुसरियास अनिष्ट. त्यापक्षीं बोभाट येण्याचें अपूर्व नाहीं. वडिलीं– मजकूर समजून ज्याचे त्याजपरी तरतमा, अगर ताकीद करून मार्गस्थ करावें. चार माणसें पदरी आहेत, सरदारी मोठी आहे, अर्थ वडिलांचे ध्यानांत आहेत. आम्हांस वडिलांचे मर्जीशिवाय दुसरा अर्थ नाहीं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 482 30-6-1789 A.D.

Tukojeerao Holkar writes to Ahilyabai : Our State is big and vast-good and bad are intermixed. You will please discriminate, and keep each one in his proper place. As to myself I look to none higher than your goodself.

---

**अ. नं. ४८३** **श्री**

ता. ३ जुलाई, इसवी सन १७८९

केसो गणेश कुंटे पुणें यांजकडून अहिल्याबाईंस वि. श्रीमंत नाना यांसी साहेब पत्रें हरएक कामाविशीं पाठवितात. नानांचें बोलणें एकच पडतें, होळकरांकडील काम तितकें राजश्री हरीपंत तात्यास पुसल्याशिवाय करीत नाही. त्याजपक्षीं नानांस ज्यावेळीं साहेब पत्र लिहितील त्यावेळीं तात्यांसही लिहीत जावें म्हणजे जाबसालास ठीक पडेल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 483 3-7-1789 A.D.

Keso Ganesh Kunte from Poona writes to Ahilyabai : Whenever letters are addressed by you to Nana Fadnis, he takes care to consult Haripant Phadke. Please, therefore, arrange to send letters to Haripant as well, whenever you have to address Nana in the future.

---

**अ. नं. ४८४** **श्री**

ता. १५ जुलाई, इसवी सन १७८९

बापूजी आनंदराव मुक्काम लाखेरीहून पत्र अहिल्याबाई होळकर यांस आषाढ शु.९ विशेष. या प्रांतींचें वर्तमान कोटे बुंदी मारवाड सर्व रजवाडा श्री पुष्करजीस एकत्र

होणार असून आतून सर्व एक आहेत. रांगड्यांस जरब कांहीं बसली नाही. उमेदसिंगजी पुष्करचे नांवें स्वार होऊन गेले. कोटेवालेही जाणार. आपल्या फौजा खुशालगडापलीकडे. ++ वजीपूरचें वर्तमान आलें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 484 15-7-1789 A.D.

Bapujee Anandrao writes news to Ahilyabai from camp Lakheri : All the Rajputs-Kote, Bundee. Mewad etc. are to meet at Pushkar; none of them is awed down by us. Our armies have encamped near Khushalgad.

---

**अ. नं. ४८५** **श्री**

ता. २० जुलाई, इसवी सन १७८९

तुकोजी होळकर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस विज्ञप्ती. सोबत्याकडील अर्थ बोलण्यात कांहीं वाकडें नाहीं. महालची वाटणी घ्यावी म्हणतात परंतु गोहद प्रांतास बहुत खर्च घडून आला आहे. त्याची गोष्ट करूं नये. ग्वाल्हेर प्रांत तरी श्रीमंतांचा. एवंच चम्मल अलीकडे कांहीं बोलायचें नाहीं. पलीकडे जटवाडा वगैरे अंतर्वेद त्यातही कांहीं खासगीकडे इनाम जागा करून घेतली. त्यांत वाटणी नसावी. पातशहाचे खर्चास कांहीं मुलूख काढावा. इटावा आपला असावा याप्रमाणें वजावाट करून बाकी मुलूख राहिला तो उजाड आहे. त्याची वाटणी घ्यावी. ते घेऊन फल काय? कपर्दिकही मिळायची नाही. याप्रमाणें तिकडील बेत ऐकण्यांत येतात. दुसरें देशीं जातों हें म्हणणें कारवाईच आहे. आम्ही कबूल करितों किंवा कसे, हा भाव पहावा नाहीतर अत:पर नफ्याची गोष्ट कोठेही दिसण्यांत नाही. फुटका काठमोरा आमचे गळा घालावा. निभलें तरी अगोदर आम्ही सर्व केलेंच होतें. नाहींतर नासेल ते तुम्हांकडून. असे अर्थ आहेत. समजण्यांत आले तितके वडिलांस लेखन केलें आहे. वडिलीं मनन करून याचा विचार लिहून पाठवावा. मिती आषाढ वद्य १३ श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ ७ जिल्काद मुक्काम महेश्वर.

No. 485 20-7-1789 A.D.

Tukojeerao Holkar complains to Ahilyabai about the manner in which new acquisitions of territory are being distributed by Mahadajee. Scindia's property, his private expenses, apportions to Peshwa, and Padshah take up a "Lion's Share"; What remains is almost a desert. Please let me know the line I should follow.

---

अ. नं. ४८६ **श्री**

ता. २० जुलाई, इसवी सन १७८९

तुकोजी होळकरांकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष सोबत्याच्या भेटी होणें त्यास आम्ही डिगेपर्यंत आलों. त्यांनीं पुढें येऊन भेटी व्हाव्या असें घडावें. त्यास त्यांचे शरीरीं समाधान नाही. तेव्हां कसें घडावें? आपल्याकडे वडीलपण आणि त्यास गैरआराम तेव्हां मानमहत्त्वाचा विचार न करितां आधी जाऊन भेट आपणच घ्यावी हें विहित; परंतु लौकिकांत राजेरजवाडे जवळ, हिंदुस्थान प्रांत; त्यांत सरदार देशीहून आले, परंतु पुढें येणेंजाणें न जाहलें, असें चौहूकडून होईल हा अंदेशा आहे. मुहूर्तासही अवकाश पंधरा १५ दिवसांचा आहे. कसें घडेल तें पाहावें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 486 20-7-1789 A.D.

Tukojeerao writes to Ahilyabai that he had reached Degh with the intention of seeing "The companion" (Scindia). He is, however, reported to be unwell. Tukojeerao is placed on the horns of a dilemma regarding his future programme.

---

अ. नं. ४८७ **श्री**

ता. २० जुलाई, इसवी सन १७८९

तुकोजींचे पत्र मातोश्रींस स. वडिलांचे सेवेसीं विज्ञापना विशेष. राजश्री आबाजी रघुनाथ चिटणीस आले. बोलणें झाले. त्यातील भाव स्थूलमानें सर्व सरळपणाचे आहेत. वडिलांपासोन ज्या रीती चालत आल्या आहेत त्याप्रमाणें आतांही उभयपक्षीं चालावें. आम्ही इतके दिवस या प्रांतीं एकले होतों. याउपरि आपणावेगळें आम्हासही कांहीं कर्तव्य नाहीं. महालची वाटणीही आपली आपण घ्यावी. व्यवस्था भेटीनंतर होईल. दुसरें, आम्हास इकडे येऊन बहुत दिवस झाले. सांप्रत देवानें अडविलें आहे. यास्तव इकडील बंदोबस्त आपले गळ्या लावून देवदर्शनाकरितां देशीं जावें असा मानस आहे. परंतु आपली समक्षता झाल्यावर जसे आपले विचारें ठरणें तसें ठरेल. जयपूर प्रांतांत पुढें फौजा रवाना करून आपणही उभयतां सरदारानीं पाठीवर कांहीं अंतरानें असावें. असा भाव चिटणीसाचे बोलण्यांत आला. परंतु निश्चय भेटीनंतर होणे तो होईल. भेटीस तूर्त मुहूर्त नाही. श्रावण शुद्ध १० दशमी एक मुहूर्त आहे. त्यास अवकाश आहे आणि कूच करून पुढें जावे तरी आमचे शरीरीं समाधान नाहीं. यास्तव नारो गणेश यांनीं पुढें जाऊन समाचार घेऊन यावे असें ठरविले

आहे. उदईक नारोपंत व आबाजी रघुनाथ येथून कूच करून जातील. तेथें गेल्यानंतर जे समजण्यांत येईल ते वडिलांस सूचना करूं. वडिलांकडून जशी आज्ञा येईल त्या प्रमाणें होईल. विचार वडिलांकडून वरचेवर लिहिण्यांत येत असावे. नाही तरी दोन दिवस लष्करपावेतों डाक बसवावी. दिनचर्येचा मजकूर कळत जाईल. मिती आषाढ वद्य १३ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ ७ जिल्काद सन ११९९ मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 487 20-7-1789 A.D.

Tukojeerao Holkar writes to Ahilyabai that Abajee Raghunath Chitnis was deputed to him by Scindia. The latter expressed a desire for meeting. Illness of Tukojeerao prevented him. He, therefore, deputed Naro Ganesh (his Minister) along with Chitnis.

---

**अ. नं. ४८८** **श्री**

ता. २१ जुलाई, इसवी सन १७८९

यशवंतराव फणसे यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष सांप्रत वडिलांकारणें चंदेरीचा धोतरजोडा गंगाजमनीकाठीं साहजापुराहून रंगवून आणून पाठविला आहे. सोवळ्यांत देवपूजेचे समयीं पांघरावयाचे उपयोगी आहे. प्रविष्ट होईल. सदैव आशीर्वाद-पत्र पाठवून संतोषवीत जावे हे विज्ञापना. पैवस्त छ २९ सवाल सन ११९९ मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 488 21-7-1789 A.D.

Yeshwantrao Phanse sends a present of a pair of Dhotis of Chanderi and dyed at Sahajapur to Ahilyabai, to be used as a sacred cloth at the time of worship.

---

**अ. नं. ४८९** **श्री**

ता. २१ जुलाई, इसवी सन १७८९

तुकोजीराव होळकर यांचे पत्र मातोश्री अहिल्याबाईंचे नांवें. शिंदे यांजकडील जाबसाल मागील रीतीभातीप्रमाणें चालावे असा सरळपणा तरी दाखवितात. परंतु परस्परें

ऐकण्यांत येतें कीं, नवा मुलूख जाटाकडील यमुना उभयतीर व अंतरवेद पादशाही मुलूख सुटला त्यापैकीं निम्मे पादशहास जाऊन कांहीं त्यांनीं पादशाही मोगल व गोसावी व जायदाद वगैरे यांस दिला. तो वजाई होऊन बाकी राहिला त्यापैकीं ढवलपूर खासगत दहा लक्षाची जागा इनाम घेतली. ते वजा करून बाकीची वाटणी करावी असा त्यांचा बेत दिसतो, त्यास असें करीन म्हटल्यास मुलूख राहिला किती? आहे तो उजाड. तेथें अंमल होऊन पैसा यावा हे कळतच आहे. ढवलपूर इनाम करून घेतलें. त्याचे वाटणीचे कसे म्हणतात त्याचा जाबसाल अद्याप रुजू झाला नाहीं. परंतु याप्रमाणेंच बोलतील असें दिसतें. ते असें म्हणूं लागले तर आपलेकडून उत्तर समर्पक झालें पाहिजे. येविषयींचा अर्थ वडिलीं मनन करून लिहिला पाहिजे. त्याप्रमाणें घडेल.

**सरकारी रेकार्ड**

No. 489 21-7-1789 A.D.

Tukojeerao Holkar writes to Ahilyabai, complaining against the distribution of territory proposed by Mahadajee Scindia. Dhavalpur-worth ten lacs is taken up wholly by Scindia. The territory offered to us is almost a desert. Tukojeerao, therefore, seeks Ahilyabai's counsel in the matter.

---

**अ. नं. ४९०** **श्री**

ता. २५ जुलाई, इसवी सन १७८९

तुकोजीरावांकडून अहिल्याबाईंस पत्र. काल श्रावणवद्य ५ रा. नारो गणेश, शिंदे यांजकडेस गेले होते. तेथें मुलखाचे वाटणीचा मजकूर काढिला. त्यातील तात्पर्य चमेलीचे उत्तर तीरापासोन जटवाडा अंतर्वेद पानिपतपावेतों मुलखाची बेरीज धरून त्यात पातशाही खालसा व जायदाद व जाटांस कांहीं जागा दिली आहे. सदरची वजावाट होऊन बाकी पस्तीसा लक्षाची जागा सामाईक श्रीमंत, होळकर, शिंदे, मिळोन राहती. त्याचा अर्थ पाहतां कागदोपत्रीं बेरीज मात्र आहे. परंतु तूर्त हातास कांहीं लागू उपयोग घडावा असे दिसण्यांत येत नाही. मुलूख बहुत करून उजाडच आहे. वांटणी होईल हा भ्रम होता. वांटणी घेऊन फळ नाही. यास्तव उपेक्षेचें उत्तर करावें, तर सरळपणांत वाकडें दिसतें याचा विचार जाला पाहिजे. तरी वडिलांस लिहिलें. आज्ञा व्हावी. मिती श्रावण वद्य ६ श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ.२ जिल्काद मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 490 25-7-1789 A.D.

Tukojeerao Holkar informs Ahilyabai that in the distribution of the newly acquired territory Scindia passes us a land worth its value in name only. It is all a desert. He seeks Ahilyabai's advice in giving a reply to Scindia.

---

**अ. नं. ४९१** **श्री**

ता. २६ जुलाई, इसवी सन १७८९

वासुदेवभट खोचे मुक्काम देवघर व्यंकटेश याचें अहिल्याबाईंस पत्र. आपले स्वर्गाचे धनी स्वर्गलोकपावेतों उभे राहिले. करोडो ब्राह्मण संतर्पणें झाली आणि आतां निरंतरही होतात. घाट देवालयें निरंतर कारखाने चालतात म्हणोन वगैरे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 491 26-7-1789 A.D.

Vasudeobhatt Khoche of Devaghar Vyankatesh praises Ahilyabai for her religious and public works that are going on unceasingly.

---

**अ. नं. ४९२** **श्री**

ता. २६ जुलाई, इसवी सन १७८९

तुकोजीराव होळकरांकडून पत्र अहिल्याबाईंस. जोधपूरकर, जयपूरकर, यांचे वकील येथें वर्षभर बसले आहेत. शिंदे याजकडील वांकडे, सबब आमचे हातें सुधरावे हा भाव. देशीहून आलो तेव्हां, श्रीमंत निरोपाचे वेळेस कारभाऱ्यांचेहीं बोलणे कीं, मनसब्याचे समेटींत उभयतां राज्यासी समेटच करावी. चहूंकडे तोडूं नये. याच अन्वयें हा कालपर्यंत पत्राचे उत्तरांतही लिहिलें येत आहे. येथील प्रकार अद्यापीवर त्याचे विरूद्धाचा डौल दिसतो. मग आमची त्यांची भेट झाल्यावर मनसब्याची बोलणीं होतील. त्यात आटपावें काय? करावें काय? हे समजेल ते वडिलांस लिहूं. परंतु उभयतां राजांचे मानस आमचे विद्यमानें शिंद्याकडील सलुक करावा. येविषयीं सूचना अगोदर लिहिलीच आहे. काम मोठें आहे. आज्ञा केली पाहिजे. श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 492 26-7-1789 A.D.

Tukojeerao writes to Ahilyabai : Ambassadors from Jodhpur and Jaipur have arrived here, seeking his intervention on their behalf with Scindia. The Poona Court desires amicable settlement. Scindia, however, has his own plans mostly not favourable. I seek your counsel in the matter.

---

**अ. नं. ४९३** **श्री**

ता. २९ जुलाई, इसवी सन १७८९

सुबराव घोरपडे मुक्काम जांब ह्यांचे अहिल्याबाईंस पत्र. राजश्री परशुरामपंत भाऊंनीं आमची कांहीं बाकी राहू दिली नाही. रा. तुकोजीराव होळकरांस हे कळविले परंतु उपयोगास आलें नाहीं. कृपा करून ह्याविषयीं, पेशवे, नाना व महादजी शिंदे ह्यांना लिहितील.

तुमचे पुण्याची सत्कीर्ती ऐकून देवगण संतुष्ट झाले. तेथें मनुष्यांचा विचार तो काय? मराठ्यांत असे कोणी मागेही झाले नाही व पुढेंहीं व्हावयाचे नाहीं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 493 29-7-1789 A.D.

Subarao Ghorpade from Jamb requests Ahilyabai to intercede on his behalf with the Peshwa, Fadnis and Mahadajee Scindia. “your personality is unique, having neither a precedent nor a prospective one.”

---

**अ. नं. ४९४** **श्री**

ता. ९ आगस्ट, इसवी सन १७८९

राणेखानभाईचें अहिल्याबाईंस पत्र. विशेष. आपलीं पत्रें दोन पावली. आज्ञा कीं, राजश्री महादजी शिंदे यांचे शरीरास समाधान नाही म्हणून परस्परें वर्तमान ऐकिले. परंतु त्यांचे अथवा तुमचे पत्र येऊन तथ्य समजावें हें घडलें नाहीं. त्याजमुळें चिंता लागली आहे. आरोग्यपत्र आल्याखेरीज चैन पडणार नाहीं. यास्तव मुजरद जोडी पाठवून हे पत्र लेखन केलें तरी औषध सेवन करून पथ्यपाण्यास जपून वरचेवर वर्तमान लिहीत जावे. म्हणोन साहेबांनीं लिहिलें ते सर्व विदित झालें. ऐसीयास श्रीमंत बाबासाहेबांचे शरीरास समाधान नव्हतें. हल्लीं आरोग्य आहे. राजश्री हिम्मत बहादुर गोसावी यानें कांहीं कुभाव

चिंतून कोणी रांड डाकीन घातली. तेही ठाई पडून तिचेंही पारिपत्य केलें. हल्लीं श्रीमंतांस आराम चांगला आहे. श्रीमंत सुभेदारांच्या भेटी छ ८ रोज शुक्रवारीं जाल्या. आम्हांपासोन दो कोसाचे अंतरानें सुभेदार साहेब उतरले आहेत. प्रस्तूत दोन महिने छावणीचे दिवस आहेत. पुढें मसलत ठरून वर्तणूक होईल तसें मागाहून विदित करीन. आम्ही साहेबांचे पदरचे अहोत. साहेब चाकरीस अंतर होणार नाहीं. हिंमतबहादरानें कुभाव चिंतल्यामुळें रा.अलीबहादर यांचे कैदेत आहे. येविषयीं पुण्यास श्रीमंतांस लिहिलें आहे. साहेबांस कळावे. बहुत काय लिहिणें हे विज्ञप्ती. पैवस्त छ २० जिल्हेज. मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 494 9-8-1789 A.D.

Ranekhanbhai writes to Ahilyabai in reply to her letters inquiring about the health of Mahadajee Scindia : Scindia is now in better health. Her Highness' instructions regarding medicine and diet will be observed. Himmat Bahadur acted maliciously. He is now imprisoned by Ali Bahadur. Tukojeerao has encamped at a distance of 4 miles. Future plans will be discussed and duly informed to Her Highness."

---

**अ. नं. ४९५** **श्री**

ता. ११ आगस्ट, इसवी सन १७८९

नारो गणेश यांचे पत्र मातोश्री अहिल्याबाईंस. विशेष डिगचे मुक्कामीं राजश्री आबाजी चिटणीस आले. त्यांचे बोलण्याचे भाव साहेबांस निवेदन केले होते. त्याजवर माझी रवानगी मथुरेस झाली. येथें येऊन पाटीलबाबांची भेट घेतली. उज्जेनहून निघाल्यापासूनचे वर्तमान स्वमुखें पाटीलबाबांनीं सांगितलें व तुम्ही आला हें चांगलें झालें. इतके दिवस आम्ही जे संपादन करावयाचे तें केलें आहे. यांत तुम्हासीं वाकडे होऊन काय मिळवावयाचें आहे. वडील ज्या रीतिनें चालत आले त्याप्रमाणें उभयपक्षीं चालावें. मुलखाची वाटणी घ्यावी. संशय धरूं नये. याप्रमाणें सरळपणाचे भावार्थ जातीनेच बोलले. श्रावणशुद्ध १० भेटीचा मुहूर्त ठरविला. याप्रमाणे वृंदावनापुढें मुक्काम केला. आजमितीस उभयतां सरदारांच्या भेटी झाल्या. उभयतांचेही शरीरीं स्वास्थ्य नाहीं. तथापि दोन अडीच कोस तिकडून ते आले. हेही तितकेच गेले. राजश्री शिवाजी विठ्ठल व नारो शंकर यांचे नातू गोपाळराव त्रिंबक व उभयतां पवारांकडील कारभारी व काशीचा राजा इतकेच भेटीस, पाटीलबाबांसमागमेंच आले होते. भेटी परस्परें संतोषाने झाल्या. पुढें निदर्शनास तें मागाहून सेवेसीं लेखन करीन. बोलणें सरळ आहे. परंतु चाल नाहीं. याजकरितां भय वाटतें. वाटणी घ्यावी अशा निश्चयाचे बोलणें आहे. भरंवसा

नाही. गोसावी याजवर जारणमारणाचा प्रयोगाचा दोष आला व हाल ते अलीबहादुराचे कैदेत आहे. हाती देत नाही याजमुळें वांकडे पडलें आहे आणि भेटीस बहादूर आले नाहीत. मुलूख उजाड. लाखाचा महाल त्यांत दहा हजारही उत्पन्न नाहीं ऐसे आहे. कळावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ १९ जिल्काद मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकार्ड**

No. 495 11-8-1789 A.D.

Naro Ganesh writes to Ahilyabai that he saw Scindia "He is very lucid in speech; asks us to take the territory assined. It is, however, a desert Tukojeerao has seen him. Both have met cordially. Both are, now, in indifferent health."

---

**अ. नं. ४९६** **श्री**

ता. २० आगस्ट, इसवी सन १७८९

कृपाळसिंग मुक्काम मथुरा वृंदावन, याचे पत्र मातोश्री अहिल्याबाईंचे नांवें. श्रावण वद्य १४ विशेष. इकडील वर्तमान तरगुदस्तां मेवाड प्रांतीं श्रीमंत यजमानसाहेब होते. त्याकाळीं हिंदुस्थान प्रांतीं फौजेची अवाई पडून राजेरजवाडे, तुरुक भयभीत होते; हडोतीहून निघोन जयपूर प्रांतीं आले. त्याकाळीं बहुतच भ्रम होता आणि पाटीलबाबांकडून हरघडी पत्रें व कारकून येत होते कीं आपण जलदी यावें. आपले मनोदयानुरूप घडून पुढें मसलत आपलें आमचे विचारें होईल. असे एकपणाचे विचारें पत्रें येत होती. त्याकालीं पाटीलबाबांची मर्जी यांचे भेटीच्या अंतर्भूत होती. परंतु कारभारीयास वावडें होतें. त्यातही यजमानसाहेबांचा जाण्याचा निश्चय पक्काच. तेव्हां पुढील अंदेशे बचावाचे बांधून कूच करून जाटाचे मुलखांत आलों. तेथून जमेध गांव जाटाचे तेथें आलों. तेथें राजश्री पाटीलबाबाकडील आबा चिटणीस आले. भेटी यजमानसाहेबांच्या झाल्या. कारभाऱ्यासह तेथें तरी पाटीलबाबांनीं सामोरे यावे. मथुरा सोळा कोस तेथें ही मसलत ठरली कीं, आबा व नाना यांनीं मथुरेस जाऊन खातरजमेची चिठ्ठी आली म्हणजे कूच करावे. असे ठरून कूच करून उभयतां गेले. नानांचे पाटलांचे बोलणें होऊन यजमान साहेबांस पत्र आले, कूच केले. थेट मथुरेपर्यंत आले. कोणीही सामोरे आले नाही. मथुरा वृंदावनामध्यें मुक्काम नेमून देऊन तेथें भेटी व्हाव्या असें ठरलें. पाटीलबाबांकडून तंबू वगैरे सामान येऊन भेट व्हावी. तेव्हां यजमानसाहेबीं असे पाहून पाटीलबाबांची स्वारी तिकडून आली, यांची इकडून आली तेव्हां जमिनीवर पालख्या उतरून जमिनीवरच बसून अधिकारी भले लोकांच्या भेटी जाहल्या. पाटीलबाबा आपले लष्करांत गेले. हे आपल्या लष्करांत आले. परंतु ज्या रीतिनें पहिला बेत होता त्याच रीतिनें श्रावण

शु. १० स जाहल्या. तद्नंतर आपले बोलणें बोलोन मतलब साधून कूच करावे तर आधींच वैषम्य होतेंच. तूर्त सन्निध आले. त्यापक्षीं मायावी माया घालून अलीबहादूरचे सरदाराप्रमाणें यांस राखावें असा त्यांचा मनोदय. हिंदुस्थान प्रांतींचे वकील वगैरे काम लागले तर त्यांजकडे जातात. बरे कोणी मसलतदार तरी चौघे मराठे, मुत्सदी तेही नाहींत. एक ब्राह्मण आहे तो रंग पाहून वर्तणूक करितो. ''गंगा गये गंगादास, मथुरा गये मथुरादास''. असें नाहीं कीं, छाती चालवून त्याचा लौकिक राखून मसलत करावी हे किमपी नाहीं. केवळ धन्यानींच छाती चालवावी. कारभारी अथवा पैका तेही नाहीं. पूर्वी श्रीमंत कैलासवासी सुभेदारसाहेबांसच हिंदुस्थान प्रांतीं धनी जाणत होते. पेशवे आदिकरून कोणी पुसत नव्हता. हल्लीं याप्रकारचे वर्तमान आहे. पूर्वी पाटीलबाबांची पत्रें येत होती, तेव्हांच कूच करून आले असते तर मतलब सांभाळून अटकपर्यंत जाऊन फत्ते केली असती. आतां हें चलन पाहून सर्वांसच संशय उत्पन्न झाला कीं, येथे दैवत नाहीं. जे आहे ते पाटीलबाबाच. अलीबहादरांनीं दोन कामें चांगलीं केली. गुलाम कादर धरिला व हिंमतबहादूर पाटीलबाबांचा चोर पाठीस घातला. हे आश्चर्य जाहले. तेणें नक्ष होऊन सर्वांत लौकिक जाहला कीं हेही प्रस्थ आहे. सरकारांत अलीबहादूर याचे लिहिणें व पाटीलबाबांचें गेलें परंतु ज्या गोष्टीची इरे धरली ती गोष्ट शेवटास नेईल असे वाटतें. हिंदुस्थान प्रांतीं नावाजेल असे छाती करून कामें करावी. ते कोणते दौलतींत राहिलेंच नाही. हल्लीं राजश्री आबाजी विनायक वानवळे यास कारभारी मिळोन दहा लाख रुपये कर्ज द्यावेसे ठरवून त्यास शिरपाव दिला. मोत्याची माळा, शिरपेंच, हत्ती, पोषाख वांटणीप्रमाणें मुलूख येईल तो दहा लक्षाचे पोटीं लावून द्यावा. याप्रमाणें करार ठरावून वस्त्रें बहुमान दिला. तो सावकार पाटीलबाबांचा असून पाटीलबाबांनींच त्यास पढविलें असेल असें वाटतें. असो. पहिल्या रीति पाहून हल्लीच्या रीतिनें बहुत चित्तांत खेद होत आहे. तो पत्रीं कोठवर लिहूं? ज्यापाशीं आहें त्याची बढती दौलत होऊन सर्वांत नक्षा राहून आनंदाचे दिवसांत शेवट लागावा असें चित्त आहे. रात्र आहे. मसलतीचें मानानी शेवट गोड दिसत नाही. आपले पुण्यप्रतापेंकरूनच यश येईल. हेतू हा पावोन आपल्या चरणापाशीं सर्व सोडून यावें असें वाटतें. यापूर्वीच लिहावें परंतु निवडलें नव्हते, भ्रम होता, आतां पाऊल समजलें त्याजवरून सुचनेस विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना, पैवस्त छ २१ जिल्हेज सन ११९९ मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 496 20-8-1789 A.D.

Kripalsing from Mathura writes to Ahilyabai depicting the pitiful plight the Holkar Government is reduced to. Men, money and material have become scarce. Former reputation is at discount. Mahadajee is all in all. Ali Bahadur has also made himself famous here. Reverse is the case with the

Holkars, The writer feels for the change, and has but one hope-that of Ahilyabai.

---

**अ. नं. ४९७** **श्री**

ता. ४ सप्टेंबर, इसवी सन १७८९

तुकोजीरावांचे अहिल्याबाईंस पत्र. विशेष. आम्ही येथें आल्यावर सोबत्याकडून वाटणीचे प्रकरणीं जे जे जाबसाल बोलण्यांत आले ते सविस्तर तीनचार पत्रांत सेवेसी लेखन केले आहेत. ध्यानांत आले असेलच. प्रथम बोलणें कीं, एक करोड, अठ्ठेचाळीस लक्ष जमा, त्यात जायदाद सत्तर लाख व बेचाळीस लक्ष खालसा पातशाही, ऐवज वजा होऊन बाकी पस्तीस लाख राहिले. यांची वाटणी घ्यावी. या नंतर बोलले. पैकीं थोडक्यासाठीं आपण लिप्त कशास व्हावे? मुलूख मेळविला आहे. दरोबस्त श्रीमंतांस द्यावा आणि आपण उभयतांनीं नवी जागा सोडवून ते निम्मेनिम घ्यावी. हल्लीं मागती बोलणें आहे कीं, आपला हिस्सा आपण घ्यावा. त्यास हिश्शाचा प्रकार पस्तीस लाख आणि पानीपत वगैरे सात लाखाची जागा जोरतलबीनें मोजावयाची नाही. सत्तावीस अठ्ठावीस लाख कच्चे पक्के राहतात. त्याचा हिस्सा आपला आजमासे पांच, सात लाखाचा होईल असा प्रकार आहे. पांच-सात लाखाची बेरीज कागदोपत्रीं दिसावयास मात्र. हाती लागतां आखरसालपावेतों दीड लाख लागतील. याचें कसें? हिस्सा घेऊन फळ नाहीं. घेत नाहीं असें उत्तर करावें तरी वाकडें दिसते. यास्तव वडिलीं ध्यानास आणून येविषयींची आज्ञा लेखन करणें ते सत्वर करावी. मिती भाद्रपद शुद्ध १५ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ २५ जिल्हेज सन ११९९ मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 497 4-9-1789 A.D.

Tukojeerao writes to Ahilyabai of the proposals made by Scindia regarding territorial distribution. Scindia is changing from time-making proposals and counter-proposals. What is offered is in mere name. Nothing substantial; what is Her Highness' counsel ?

---

**अ. नं. ४९८** **श्री**

ता. २० सप्टेंबर, इसवी सन १७८९

मातुश्री अहिल्याबाईंस पंच सावकारांचा अर्ज. आज्ञाधारक शेठ नानाभाई, पदमसी तिलोकसी, गंगाराम केवलराम, लालजी सेवकराम, भगोती मगन, माणकचंद हिराचंद वगैरे

सावकारपंच कसबे इंदूर. विनंती कीं मोकमसिंग बजाज कसबे मजकुर लोकांचे देण्याचे तगाद्यामुळें उज्जेनीस गेला होता. उपरांतिक सरकारचें आज्ञापत्र आलें कीं अगोदर छत्रीपुरा येथील ऐवज देणें. तरी कोणी इसमाचें देणेंघेणेचा ऐवज दामाशाही करून वाटून घ्यावा अशी रीत आहे. त्यास विनंती कीं प्रथम छत्रीपुरा येथील ऐवज द्यावा हें काय? सर्व लेकरें महाराजांस सारखीच आहेत. तरी दामाशाहीप्रमाणें सर्वांनीं वाटून घेणेबद्दल कमाविसदारांस लिहिलें पाहिजे. नाहींतर आम्ही अवघेच महेश्वरीं महाराजांचे पायापाशी येऊं व जशी आज्ञा करतील तशी वर्तणूक करूं. हे विज्ञापना. पैवस्त छ २ मोहरम मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 498 20-9-1789 A.D.

The Panch Sowkars of Indore applied to Ahilyabai as follows : "Mokamsing of the Kasba has gone to Ujjain. You ordered that the Chhatripura Sowkars should first be repaid. We beg to bring the usual usage to your notice-viz-the assets of the debtor should be proportionately distributed among all the debtors. Please either issue orders accordingly or permit us to appear before Your Highness personally."

---

**अ. नं. ४९९** **श्री**

इ. स. १७८९

यादी. नेमणूक सरकारातून श्री क्षेत्र करवीर ऊर्फ कोल्हापूर येथें श्री महालक्ष्मीस नैवेद्य व ब्राह्मणभोजनामुळें साहित्य बारमाही येणेंप्रमाणें. सुरूसन तिसेनमयावआलफ. फसली सन ११९९ मुक्काम महेश्वर.

२७५-०-० एकूण आकार पावणे दोनशें. एकादशीचे भोग वजा होऊन.
श्रीचा नैवद्य १ व बाकी असाम्या ६ एकूण ७

२३४ भोजन खर्चाकडे जिन्नस. कणीक, तांदूळ, तुरीची डाळ, दाल, हरभरा, तूप, गूळ, मीठ, हिंग, जिरे, हळद, सुंठ, सरपण वगैरे यादी ठरावून दिल्याप्रमाणें.

३५ तैवज खर्च पानसुपारीबद्दल, २-६-० भोजन दक्षणा दरअसामीस एक शिवराई पैसा, एकूण बारमाही खर्च रु.३२-१०-०

.......
२६९

६ श्री महालक्ष्मीकडे पूजा साहित्य, हळदीकुंकू, रु. १ व

चोळी, पातळ रु. ५ सालिना

......

२७५

येणेंप्रमाणें नेमणूक असे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 499 1789 A.D.

An annual payment of Rs. 275/- for the worship, and dish of Shree Mahalaxmee of Kolhapur, and of Brahmins is sanctioned in details.

---

**अ. नं. ५००** **श्री**

ता. ३० सप्टेंबर, इसवी सन १७८९

धोंडिबा फणसे यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष महाराजांची आज्ञा घेऊन स्वार झालो ते दोन प्रहरीं रात्रीं मुक्काम जांबेस सर्व सरंजामासुद्धां आनंदरूप पावलो. आज प्रातःकाळीं कूच करून मुक्काम मजकुरीं प्रहरदिवसा पावलों. श्री देवीचें दर्शन घेतलें. पुढें सायंकाळीं निवाडा करून सांगणार. जशी आज्ञा करतील तद्नुसार सेवेसीं विनंतीपत्र लिहूं. सौभाग्यवती मैनाबाईचे आरोग्याबद्दल आपण व तीर्थरूपजीनें लिहिलें त्याजवरून समाधान जालें. आपण आम्हांविषयीं चिंता न करावी.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 500 30-9-1789 A.D.

Dhondiba Phanse informs Ahilyabai of his safe arrival at Jamb and of having paid his respects to the Goddess the next day. The orders will be declared in the evening. They will be immediately reported to your Highness.

---

**अ. नं. ५०१** **श्री**

ता. १० आक्टोबर, इ. स. १७८९

व्यंकटराव कृष्ण, होळकर वकील नागपूर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. भाद्रपद वद्य ११ विशेष : महाराज खाविंद ५० वर्षे पालन केले. पुढें उमेद आहे कीं ईश्वर आपणांस सलामत ठेवो. वंशपरंपरा सेवा घडावी. महाराजानीं आज्ञापत्र तूर्त पाठविलें कीं श्रीमंत राजश्री

मल्हाररावांचे मानस स्वगृही स्थिर न होतां कांहीं योजना इतर स्थळीची करितात. त्यास तुम्ही एकंदर हे गोष्ट घडूं न देतां तेथील मुख्याशीं व ज्याचे मार्फतीनें बोलणें असेल त्याजला समजोन सांगणे पूर्वी नागपुरीच हे गोष्ट देवजी खलतकर यांचे विद्यमानें राजश्री रघोजी भोसले सेनासाहेब यांजकडे आली. यांजला आश्चर्य वाटून सविस्तर वर्तणूकीची रीतभात त्यांजपासोन समजोन घेतली. नंतर भवानीपंत मुनशी प्राचीन याजला विचारलें. त्यांनीं म्हटले कीं पूर्वीचा सिलसिला तरी आहेच. खंडेराव होळकर कैलासवासी येथें आले. त्यांनीं याचप्रमाणें रुसून येऊन अंमलात आणिले. बाबासाहेबांनीं दोन लक्ष रुपये दिले. आतांही चिंता नाही. परंतु श्रीमंत तुकोजीबाबा सुभेदार यांजला वाईट वाटेल. कदाचित रुसून आले तरी बहुमान करून ठेवून, त्यांचे कोणी आल्यास वाटे लावावे हे वर्तमान मजला समजलें. तेव्हां मुख्यासीच बोललों कीं आपण या गोष्टीस रुकार दिला म्हणोन ऐकतो. त्यांनीं उत्तर दिलें कीं, आल्यासी उपाय काय? आम्हास सर्व दृष्ट मायावर आहे. तुम्ही खातरजमा देणें. पुण्यासी आल्याचें पुर्वीच हे जाले. आलीकडे तर गर्दीच झाली. चिंता नाही. महाराजांचे पुण्य समर्थ तेथें न्यून कीं ऐसें घडावे? परंतु दैव. कदाचित अशी गोष्ट मी असताना येथून तिकडून बोलण्याप्रमाणें घडेल; तरी माझें स्वरूप कोणतें राहातें? सांप्रतकाळीं सर्वदान व स्नेह आपले कडीलच. असें जाल्यास मी हजेरीगणतीस रोजमुरियाची रदबदली करावी, तेव्हां महत्त्व मोठें राहील – प्रस्तुत श्रीमंतांचे वकिलाबरोबर गणतेंत आहे व भोसलेही म्हणतात कीं काम पडेल तेव्हां हा गृहस्थ उपयोगी पडेल. याजकरितां मीही जपून आहे. सूचना सेवेसीं लिहिली नाहीं. याचे कारण कीं, साहेबजादे आहेत. पायबंद समजल्यास माझा परिणाम काय? म्हणून महाराजांचे सेवेसीं व सुभेदारांचे सेवेत लिहिलें नाहीं. श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 501 10-10-1789 A.D.

Vyankatrao Krishna - Holkar ambassador at Nagpur - informs Ahilyabai that Court's intention regarding the rumoured arrival of Malharrao at Nagpur.

---

**अ. नं. ५०२** **श्री**

ता. ११ आक्टोबर, इसवी सन १७८९

रा. माधवराव कृष्ण भुसकुटे यांजकडून पत्र मातोश्री अहिल्याबाईस. विशेष. मुक्काम बरहाणपूर येथें साहेबांचे कृपावलोकनें करून यथास्थित असे. राजश्री मल्हारराव पवार उदाजी पवाराचे नातू दोन वर्ष म्हणत होते कीं येथील मामलत साल मजकुरीं झाल्यावर शहरीं येऊं, याप्रमाणें बोलत होतें. तो श्री देवीच्या नवरात्रांत उत्सवांत आमंत्रण केले. ते कथेस

येऊन भेट झाली. घटकाभर बसले होते. पानसुपारीं दिली, उपरांत उठोन गेले. फिरोन आश्विन वद्य २ सोमवारीं प्रातःकाळीं निरोप पाठविला कीं भेटीस येतो. म्हणून मातब्बर जाणोन, यावे म्हणोन सांगून पाठविलें. त्यावरून तीस, चाळीस माणसानिशीं आले. भेट झाली. बोलणें होत होतीं. विडे देणें झालें. दगा करतील हें माहित असते तर बंदोबस्ती केली असती. तो अकस्मात त्यांजकडील पठाण पुढें येऊन सुरा काढून चालविला तेव्हां दगा असे समजले. सुरीची जखम बोटांस हाताचे हलकीच लागली. इतक्यांत त्यांच्या लोकांनीं तरवारी उपसोन उठोन तक्याजवळ आले. दोन प्रहरचा समय. कचेरींत माणसें फारशी नव्हतीं. दहा पांच माणसें होती तो एकच तरवारीची मिठी पडली. त्यात साहेबांच्या कृपेनें ईश्वरें वाट दिली. कचेरीचे खोलींत जाऊन दुसरें दरवाजानें घरांत निघोन गेलो. दोन भले माणूस पाडाव झाले आहेत. पवार निघोन चालल्यावर आपले लोक सांभाळून पाठलाग केला. तो आठ दहा माणसें त्यांची ठार केली. साता स्वारांनिशीं पळोन गेले. त्यांच्या पाठलागास स्वार लागले. परंतु रात्र पडली. ज्वारींत निघोन गेले म्हणोन गांठ पडली नाहीं. दोन स्वारांची गांठ पडली ते मात्र मारले गेले. त्यांचा भाचा व उदाजी पवाराची राख, बिराडीं होती ते सापडले आहेत. चिरगुट पांघरून त्यांचे तक्तावर राहिलें आहे. याचा विचार पुढें काय करावें ही चिंता लागली आहे. त्यास महाराजांची आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. पवारांनीं दगा केला होता. परंतु महाराजांचे पुण्यप्रतापेंकरून क्षेम आहे. महाराजांस निवेदन व्हावें म्हणोन लिहिलें आहे. हे विज्ञापना. पैवस्त छ २३ मोहरम सन ११९९ मुक्काम मंडलेश्वर.

**सरकारी रेकार्ड**

No. 502 11-10-1789 A.D.

Madhavrao Krishna Bhuskute informs Ahilyabai of the treacherous conduct of Malharrao Pawar regarding himself, and the fight that took place between his party and that of the Pawar. He seeks her counsel regarding the future conduct. in the affair.

---

**अ. नं. ५०३** **श्री**

ता. १२ आक्टोबर, इसवी सन १७८९

नारो गणेश यांचे अहिल्याबाईंस पत्र. मुक्काम मथुरा आश्विन वद्य ८ विशेषः वाटणीचें बोलणे जसजसें होत गेले तितके पर्याय साहेबांस लेखन केले. अलीकडे मजकूर पस्तीस लाखाची वाटणी घ्यावी. त्यांत मेरठ वगैरे महाल श्रीमंतांकडील पूर्वीपासून, त्याची वाटणी नाही. तेव्हां अकरा लाखाचे महाल पस्तिसांत अजी वजा घालून बाकी

चोवीस लक्ष कमकसर राहिलें. त्याचा हिस्सा आजमासें पांच लाख कागदी बेरीज येईल. त्यांत उत्पन्न दीड दोन लाख कमजास्त जाले तर जाले. डोंगर पोखरून उंदीर काढल्यासारखें होतें. असा हा प्रकार न करावा आणि तूर्त जे बेरीज राहिली आहे ते उभयतांनीं वाटून घ्यावी. श्रीमंतांचा हिस्सा दोन्हीकडेही पडला. पुढें समजून घ्यावयास येईल. याचा विचार पाहतां नफा तर दैवाधीन, परंतु तोटा आल्यास आपले घर आपल्यास दिसत आहे. नवीन एक लिगाड मागे लावून घ्यावें. दुसरें बरोबरीनें फौज चाकरी सर्व असलें पाहिजे. अशी अडचण या जाबसालांत दिसो लागली. तेव्हां एक विचार ह्या प्रसंगानुरूप ध्यानास आला. साहेबांनीं ध्यानांत आणावा. ढवलपूर वारी वगैरे त्यांनीं इनाम म्हणोन आपल्याकडे जागा साडेचार लाखांची घेतली आहे. तिची वाटणी मागितल्यास देतीलही, ऐशी किंवा नव्वद हजाराचा विषय, परंतु इनामासुद्धां वाटणी घेतली असे होते. दूरदेशीनें पाहतां भाऊपणांत नीट दिसत नाहीं. गोड ठेवणेंही प्राप्त आहे. तेही कोठें व्यंग दाखवीत नाहीत. फार मर्जी ठेवतात. आगत स्वागतास फार जपतात. तेव्हां आपण कसें न जपावें? इनामाची वाटणी आम्ही घेऊं असें बोलणें हलके दिसोन चालीस विरुद्ध, याकरतां तिकडे इनामाची जागा आहे ते त्यांची त्यांजकडे आहे. आपल्याकडेही पांच लाखाची जागा लावून घ्यावी. त्यात गणमुक्तेश्वर, हामड हे दोन महाल पूर्वीचे इनामी दोन लाखाचे आहेतच. ते लावून घ्यावे. तीन लाखाची बेरीज आणिक घ्यावी. सदरहू अज्जी वजा होउन बाकीची वाटणी शिरस्त्याप्रमाणें घ्यावी. ते बेरीज चार लाखाची होईल. एकूण इनाम व वाटणी मिळून नऊ लाख होतात. मुलुख खराब तनख्याप्रमाणें जमा बसत नाही. तिजाई बसली म्हणजे फार आहे. त्यांत यंदा त्यांजकडेही वसूल गेला आहे. हा विचार सुचला तो लेखन केला आहे. आज्ञा कर्तव्य ते करावी नित्य नवा मनसबा, नवाविचार यांस कांहीं उपाय नाही. अलीकडे आजच्या बोलण्याचें भावरा सुभेदारांनीं लिहिलें आहेत. श्रुत होईल. उत्तरें लिहीत जावीं. येथें विचार पुसावयास जागा नाही. हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 503 12-10-1789 A.D.

Naro Ganesh writes to Ahilyabai about the way in which distribution of conquered territory is changing from day to day. He suggests that the Subhedar should ask for a territory yielding nine lacs, at least.

---

**अ. नं. ५०४** **श्री**

ता. १५-१०-१७८९

खंडो बाबुराव इंदूर यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. विशेष : चेना वाणी याचा पुत्र मोती हा आपले मामीशीं चुकला. येविशींचा बोभाट आल्यावर कृष्णाजी धोंडदेव कोतवाल यांनीं आम्हांस सांगितल्यावर वाणी मजकुर यांस बोलावून त्यांनीं मुद्दा कबूल केल्यावर रु.१२० कोतवाल याचे विद्यमानें मोती वाणी पासून दंडाबद्दल घेऊन जमा केले. त्या गोष्टीस आठ नऊ महिने होत आले. प्रस्तूत वाणी मजकुराचे जातीत वर्तमान कळल्यावर त्यांनीं निषेध करून जातीबाहेर टाकिले. मामीसी बदकर्म केले म्हणून जात म्हणती कीं पंगत कर मग जातींत घेऊं. त्यावरून वाणी मजकुर मखनकुंवरचे विद्यमानें श्रीमंत सौभाग्यवती रखमाबाई मासाहेबांजवळ फिर्याद झाला. त्यांनीं मुत्सद्दीयास ताकीद करून सांगितलें कीं, ध्यानास आणून वाटे लावणें. मखनकुंवर वगैरे म्हणतात कीं, गोष्ट मिथ्या आहे. त्यास आठ महिने गोष्ट मिथ्या झाली नाहीं; जातीनें जेवणावळ मागितल्यावर आतां फितूर करून परत रुपये मागतात. आज्ञा आल्यास रुपये श्रीमंत राणीसाहेबांस रुपये देऊं. त्यांची तशी ताकीद नाही. परंतु सन्निध राहतात. गुदस्तां रुपये जमा झाले. ते रुपये माघारें मागतात म्हणोन लिहिणें प्राप्त झालें. शहरांत घेण्यादेण्याचे कजिये बहुत आणि त्याचे खटके उरकीन म्हटल्यास सोय नाहीं. या शहराच्या लोकांची वस्ती कौलाची आहे. उज्जेन, देवास, धार, ममई, वगैरे जागचे लोक साहेबांच्या आश्रयाचे वस्तीस येऊन राहिले आहेत. तालेवार कोणी पळून येऊन राहणार नाहीं. मातब्बर थोडे व नादार बहुत आहेत. त्यांचे कज्जे सारासार विचार पाहून ज्याचे त्यापरी समजूत पाडून कांहीं ध्यानांत आणावे, कांहीं न आणावे तेव्हां आजपावेतों निभाव लोकांचा सांभाळ साहेबीं केला. येथील रैयत सालस गैरसालस हें सर्व साहेबांचे ध्यानांत आहे. येविषयीं आज्ञा कर्तव्य ती करावी. श्रुत होय हे विज्ञप्ती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 504 15-10-1789 A.D.

The Kamavisdar of Indore submits the case of Motee Wani to Ahilyabai for decision. The said Moti had confessed his grave sin against his maternal aunt, and had paid the fine ordered. His caste-people asked for caste-dinner, and now the amount is asked for back. The Kamavisdar then explains his position as he has to work among people who have all resorted to that place from distant and various quarters, who bear questionable character, and have stayed there on Royal guarantee.

---

**अ. नं. ५०५** **श्री**

ता. २० आक्टोबर, इसवी सन १७८९

तुकोजीबाबांचें पत्र मातोश्री अहिल्याबाईंस. विशेष वाटणीचा मजकूर सोबत्याकडील इनामी ढवलपूर वगैरे साडेचौदा लक्षाची जागा त्याप्रमाणें हल्लीं मुलखाची वजावट होऊन बाकीस महाल अखेर पस्तीस लाखाचे राहिले. त्यापैकीं आपले पांच लाखाचे इनामी जागा द्यावी. बाकी राहिले त्यांत मेरठ वगैरे श्रीमंतांकडील महाल ते श्रीमंतांकडे द्यावे. राहिले त्याची वाटणी करावी असे बोलण्यांत येऊन आपल्याकडेस पांच लाख इनामी व वाटणीचे चार लाख एकूण नऊ लाखाचे महाल यावे असें ठरलें. अंतरवेदीत गणमुत्तेश्वर व हाडे, हे दोन्ही महाल आपले पूर्वीचेच इनामी ते पांचाचे पेटियांत लावून घेतले. बाकी तीन लक्षांत त्यांनीं दोरेजा वगैरे महाल नेमले आहेत. परंतु हल्लीं तेथील सायर पातशाहाचे खालशांत आहे. ते खेरीज करून महाल घ्यावे असे बोलणें सांप्रत आहे. त्यास महालाचा अंमल एकीकडे व सायर दुसऱ्याकडे तेव्हां बनेल कसे? जिकडे महाल तिकडे सायर, हें आमचे बोलणें आहे. निश्चयांत येईल ते मागाहून लिहून पाठवूं. गोसावी झांशीस ठेवावे, त्यांत अलीबहादराचा पक्ष सबळ ठरला. आम्ही इतके श्रम साहस करून स्वराज्यांत ज्यांत उपयोग असे अर्थ घडविले ते व्यर्थ गेले. असा उच्चार राजश्री महादजीबाबा शिंदे वारंवार करितात. बहुत उदास होऊन इकडील मनसुब्यासही तरहा होउन कूच करून देशीं जावें हा विचार बोलण्यांत आहेत. चिरंजीव राजश्री काशीराव जयपूरच्या रूखावर आहे. त्यांसही बोलावून घ्यावे. पानीपताच्या सुमारें दोन्हीकडील कांहीं फौजा जाऊन ते तोंड राखावे म्हणजे इकडील मुलूख मागे पडून आबाद होईल. याप्रमाणें करावें म्हणून आम्हासी बोलतात. उदासपणाखालीं दुश्चिंत होऊन कूच केले तर करतील असाच रंग दिसतो. यांनीं कूच केले तरी आपण कसें करावें? कूच न करावें तरी भाऊपणा तुटतो. केलें तरी श्रीमंतांचे सरदारावर कूच केलें. विचार न केला तर दुतर्फी अडचण आहे. याचा विचार वडिलीं लेखन करावा. मिती कार्तिकशुद्ध २ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ १२ सफर. मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 505 20-10-1789 A.D.

Tukojirao informs Ahilyabai of the decision made by Scindia regarding distribution of the terrotory. Doreja and other Mahals are offered to us, but their Sayer is to go to the Emperor, This is unthinkable. Revenue and Sayer must go and in hand.

Scindia often talks in despondent tone of going to the Deccan. I seek your counsel regarding my company with Scindia in his march in the South.

अ. नं. ५०६ **श्री**

ता. २० आक्टोबर, इसवी सन १७८९

नारो गणेश यांचे पत्र मातोश्री अहिल्याबाईंस कार्तिक शुद्ध २ मुक्काम मथुरा साहेबांचे कृपेकरून यथास्थित असो विशेष. महालचे वाटणीचा मजकूर जसा बोलण्यांत आला तसा अगोदर साहेबांस विस्तारें लेखन केला आहे, ध्यानांत आला असेल. सांप्रत खुर्ज्या (दुर्जा,) वगैरे महाल घ्यावे. सायेर पातशाही खालशांतील आहे ते ठेवावे असा अर्थ बोलण्यांत आहे. एका मेण्यांत दोन सुरया असें होतें. त्याअर्थी जें असणें तें आपले सत्तेखाली असावें. सायरसुद्धां महाल घ्यावे असें आपले बोलणें आहे. निश्चयांत येईल तैसें सेवेसीं मागाहून लिहीन. सांप्रत गोसाव्याचे मजकुरावर बहूत उदासीन मर्जी रा. पाटीलबाबांची आहे. श्रमसाहस इतके केले त्याचे सार्थक श्रीमंतानीं गोसाव्याचे प्रकरणी बरें केलें. यांत आमचा तालुक हिंदुस्थान प्रांतीं कांहीं राहिला कीं काय? आज हें झालें उद्या आणिक कोणी जाईल. तो समजाऊन सांगेल तसें ऐकून त्याचे मुद्याप्रमाणें आम्हास लिहू लागले तर आम्ही मामलेदार झालों. आजपर्यंत ऐसियापरी केली केले तेच मान्य श्रीमंतांनीं केले. उभयतां सरदारांनीं आप्त केले तो आप्त, शत्रुत्व ज्यासी तो शत्रू, असें मागून घडत आलें असतां आता ही गोष्ट नवीन होते. यांत इकडे राहणे पुरवत नाहीं, कूच करून ग्वाल्हेरीस कांहीं मुक्काम करून पुढें देशीं जावे असा निग्रह बोलण्यांत आहे. रजवाडियांचा मनसुबा आहे तो दोन दिवस राहिला. तिकडे राजश्री बाबा आहेत. त्यांस बोलावून घ्यावे म्हणोन सांगितलें. पाणिपतच्या मोहरियावर उभयतांकडील फौज जावी ते तोंड राखिले म्हणजे हा मुलूख पोटीं पडेल : अंमल निर्वेध चालेल अगर जसे होणार असेल तसे हो, परंतु देशीं जावे ही गोष्ट करणें प्राप्त आहे, तेव्हां बोलल्याप्रमाणें घडविल्यांत आपण कसें करावें? यांजबरोबर कूच न केले तरी माझे बऱ्या वाईटाचे सोबती नाहींत. तूर्त भाऊपणा राहत नाहीं, कूच करावें तरी श्रीमंतांपाशींही गुंतले आहेत, त्यास कसें पडेल? संकटाची गोष्ट आहे. अगोदर येविषयीं विनंती लिहिली आहे व आताही राजश्री तुकोजीबाबा यांनीं लेखन केलें आहे. साहेबीं मनन करून विचार कर्तव्यत्वाची आज्ञा यावी, कूच त्यांनीं केले तरी याशींही कूच करावें, ऐसे आहे. यांच्या बरोबर गेले तेव्हां भाऊपणा राहतो, लालूच करून राहिले तर भाऊपणा तुटतो, तूर्त आपल्याकडून गोड ठेविले, परंतु त्यांजकडील नित्य नवा बूट काढून बोलणें बोलतात, महाल देणार सायर देत नाही. आपले यजमानाच्या मनांत येत नाहीं ऐसें आहे. श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ १२ सफर मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 506 20-10-1789 A.D.

Naro Ganesh writes to Ahilyabai from Mathura : Scindia's proposals regarding Khurja and other Mahals is just like keeping two daggers in one cover-unthinkable !

Scindia is very much grieved at the decision of the Poona Court regarding the Gosawi. His word, he says, was all along honoured until now. All that is past now ! He is thinking of moving to the Deccan.

He suggests that both of us (Holkar and Scindia) should guard Panipat which will keep our possessions free and fearless.

The writer seeks Ahilyabai's counsel regarding Holkar's keeping company with Scindia in his march southward. He says Tukojeerao Baba is placed on the horns of a dilemma.

---

**अ. नं. ५०७** **श्री**

ता. २५ आक्टोबर, इसवी सन १७८९

तुकोजीरावांचें पत्र अहिल्याबाईंस. विशेष. गोसाव्यामुळें राजश्री महादजीबाबा व राजश्री अलीबहादर यांचें आपसांत जाबसाल पडले व आम्ही त्यांत बोलत गेलो. तो मजकूर अगोदर वडिलांस लेखन केला आहे. अल्प गोष्टीचें जघन्य करूं नये. अलीबहादूर व आपण दोन नाही. आपले मदतीस श्रीमंतानीं पाठविलें त्यासी असा प्रकार दाखविणें आपले थोरपणास योग्य नाहीं. त्यास लेकरूं म्हणतील. आपल्याकडे प्रौढपणा. त्याअर्थी आपल्यास उचित काय तें समजावे. आपसाची फूट मनसुबियास चांगली नाही. याअन्वयें महादजीबाबा यासही बोलावयाचे तें बोललों. परंतु ती गोष्ट रुचीस न पडतां सर्व सोडून देशीं जावें असें बोलतात. विचार पाहतां इतका निग्रह दाखवावा असा दोषही अलीबहादूर यांजकडे दिसत नाही. गोसावी जबरदस्तीनें यांजपासून त्यांजकडे गेला. पुढें वचन देणें तेंही यांच्या इतल्यानेंच दिले व वचन दिल्यावर आमचे स्वाधीन करा म्हणून सांगूं लागले ही गोष्ट अलीबहादुरानें ऐकिली नाही. यामुळें हा उद्योग आहे. देशीं येतों येविषयीचीं पत्रें शिंदे यांनीं पुण्यास पाठविलीं आम्ही लिहितों याप्रमाणें आपणही पत्रें श्रीमंतांस लिहावीं. असें आम्हासही एक दोन वेळां बोलले, अंदेशा करून आम्ही टाळाही दिला. परंतु वारंवार म्हणूं लागलें न लिहावीं तर फाट दिसतो. संशय पडतो यास्तव भिडेमुळें यांच्या सांगितल्याअन्वयें श्रीमंतांस व राजश्री बाळाजीपंत नाना व राजश्री हरीपंत तात्यांत पत्रें लिहून वडिलांकडे पाठविली आहेत. राजश्री केशो गणेश यांजलाही पत्र लिहिले आहे. मशारनिल्हेकडे पत्रें पाठवावी आणि इकडील आशय जों लिहिणें तोही लिहावा. मिती कार्तिक शुद्ध ७ श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ.१ सवाल सन ११९९ मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 507 25-10-1789 A.D.

Tukojeerao informs Ahilyabai of the despondent mood of Mahadajee.

The Poona decision in the case of Ali Bahadur has upset Scindia, He has written to the Poona Court of his intended start to the South. Tukojeerao was also induced to write to the Poona Court in the same strain. He requests Ahilyabai to write to the Poona Court as she may think proper.

---

अ. नं. ५०८ **श्री**

ता. ३० आक्टोबर, इसवी सन १७८९

माधवराव लक्ष्मण वकील हैद्राबाद यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र श्रावण वद्य ७ विशेष येथील प्रसंग पाहतां मोंगलाईचा कारभार बहुत लोभी झाला आहे. तशांत मशीरूल मुल्क नबाबाकडील कारभारी आहेत. त्यांची मर्जी परिछिन्न लोकांस कोणेही प्रकारें दोष लावून किफायत करून दाखविणें. हेंच मानस यांचें आहे, मग न्याय अथवा चौकशीचें कारण थोडेंच आहे?

**सरकारी रेकॉर्ड**

No. 508 30-10-1789 A.D.

The Holkar's ambassador at Hyderabad writes to Ahilyabai that the minister at Hydarabad is intent on one and one object only-amassing forture-by means, fair or foul.

---

अ. नं. ५०९ **श्री**

ता. ३० आक्टोबर, इसवी सन १७८९

मेघःशाम जिवाजी मुक्काम गंगातीर यांचें मातोश्री अहिल्याबाईंस पत्र विशेष. नेत्र गेले. शरीर अशक्त झालें. यामुळें साहेबांची आज्ञा घेऊन श्री गंगातीरीं आलों. दिवसेंदिवस शरीराची अवस्था कठीणच आहे. माझे वडिलांनीं महाराजांचे ओटीस घातलें आणि ते श्री गंगातीरीं राहिले. आजपर्यंत पालिग्रहण केले. पुढें धनीच करतील म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 509 30-10-1789 A.D.

Meghashyam Jiwajee from the banks of the Ganges writes to Ahilyabai that he has become blind and weak. He looks up to her for his maintenance and welfare.

---

**अ. नं. ५१०** **श्री**

ता. ३० आक्टोबर, इसवी सन १७८९

राजाराम गंगाधर, होळकर वकील श्रीनगर यांजकडून पत्र मातोश्री अहिल्याबाईंस भाद्रपद शुद्ध ८ चे. विशेष महाराजांचे पत्र राजश्री गंगाधरपंत बावांस आले. मौजे दडियतप्रगणे महोबा गांव तपोनिधी कैलासवासी गंगाभारती यांजकडे महाराजांचे दैविक सरकारांतून दिला आहे. त्यास सनदेची आज्ञा झाली आहे. येथें स्वामीचे पत्रावरून बहूत बोललों परंतु येथील उत्तर हेच कीं, सरकारची सनद पाठविली त्यावरून विनंतींत लिहिलें आहे. येथील दरबार मोठें खोटें आहे. लबाडी कोठवर लिहावी? नानाप्रकारचे या गांवाकरितां बखेडे होतात. त्यास महाराजांनीं सनद करून पाठविल्यास गांव चालेल. नाही तर दिक्कत पडेल. आपले पत्रावरून वर्षभर मी चालवितो. हे बुंधेले आहेत. बोलण्याचा प्रमाण नाहीं. श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 510 30-10-1789 A.D.

The Holkar ambassador at Shreenagar writes to Ahilyabai : "Mauza Dadiyat (Pargana Mahoba) has already been granted to the late Taponidhee Gangabharatee. The local government asks for a Sanad. Please arrange to send it early. The Bundelas not a trustworthy people."

---

**अ. नं. ५११** **श्री**

ता. १६ नोव्हेंबर, इसवी सन १७८९

तुकोजीरावांचे अहिल्याबाईंस पत्र. विशेष. कुंभेरीस कैलासवासी खंडेराव यांचे छत्रीचा कारखाना चालत आहे. त्यास कारखान्याचा बंदोबस्त कोणे प्रकारचा, काम कसें चालतें, दगड कसे प्रकारचा, बागाची व्यवस्था वगैरे व्यवस्थेसंबंधी आज्ञा. ऐसियास. कारखाना चालत आहे. परंतु तिकडील धोंडा चांगला नाहीं. तथापि दगड चांगले पाहून लावण्याची कारकून खिजमतगारास दिली आहे. बागही दंग्यामुळे बेमरामत आहे. नीट करण्याची व्यवस्था केली आहे आणि जमीन नवीन जाटापासून घेऊन बागेस देण्याची ठरविलें आहें. छत्रींत मूर्तीची स्थापना झाली पाहिजे. त्यास इकडेसच करविल्या तर चांगल्या होतील. तरी वडिलीं मूर्ती तेथूनच (महेश्वराहून) करून पाठविल्यास उत्तम आहे. काम पहावयास वडिलांकडून जासूद आला तो पाहून गेला आहे. तो सविस्तरें सांगेल. आम्ही वरचेवर पाहतच आहों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 511 16-11-1789 A.D.

Tukojeerao Holkar writes to Ahilyabai : "In reply to your inquiries regarding the erection of the Chhatri of the late Khanderao Maharaja I have to say that the work is proceeding. We are in search of a better kind of stone. The garden was all in ruins. It is being replanted. New land has been acquired from the Jat for the purpose. Statues should be made at Maheshwar under your supervision.

---

**अ. नं. ५१२** **श्री**

ता. १९-११-१७८९

नारायण गोविंद मुक्काम गोविंदगड ह्यांचे पत्र. मातोश्री अहिल्याबाईंचे नांवें मार्गशीर्ष शुद्ध ३ विशेष. महाराजानीं उभयतां कोटेवाले व बुंदीवाले ह्यांस निक्षून ताकीदपत्रें पाठवावीं कीं, आपसांत विरोध न वाढवा. नाहींतरीं हे रांगडे आहेत. यांचा इतबार नाहीं. तिगस्ताप्रमाणें (सन १७८६-८७) होईलसें दिसतें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 512 19-11-1789 A.D.

Narayan Govind writes to Ahilyabai from camp Govindgad : I request Your Highness to order a strong commanding letter to the Ranas of Kota and Bundee to the effect that they must try to settle their disputes peaceably. Things, otherwise, may take turn as they did in 1786-87.

---

**अ. नं. ५१३** **श्री**

नोव्हेंबर, इ. स. १७८९

माधवराव लक्ष्मण वकील हैदराबाद यांचे पत्र मुकुंदराव आबांचे नावें : कार्तिक वद्य विशेष. अखबारींत कोठें कोठें वर्तमान हेही लिहिलें कीं, महाराज अहिल्याबाईसाहेब होळकर यांनीं बहुतां प्रकारें तिघा सरदारांस तुकोजी, महादजी, अलीबहादुर बहुता प्रकारें निक्षून लिहिलें कीं, हें उत्तम नाही. तिघांतून एकाचा दाब कमी झाला तर सर्वत्रांचा झाला असें जाणावें. परमुलखांत अशी मसलत कदापी न करावी. असें करतां जिकडे या मसलतीचा

दोष लागेल त्याचा परिणाम उत्तम होणार नाही, असें लिहिलें आहे. हे वर्तमान नबाबसाहेबानें ऐकोन महाराज बाईसाहेबांची फार तारीफ केली व सेवकास आज्ञा केली जे तुम्ही अहिल्याबाईंस पत्रें लिहोन सत्वर उत्तर येत असें करावें. ते कैलासवासी मल्हारराव होळकर यांचीच प्रतिमा आहे. त्यांजला शिंदे, होळकर व अलीबहादूर हे तिघेही एकरूप असावे. एकासी एकानीं चित्तांत दुसरा भाव धरून श्रीमंतांचे दौलतीस अपाय न करावा, हे अगत्य आहे. बायको असतां पुरुषापेक्षां त्या मजला दूरदर्शी फार दिसोन आल्या. कदाचित शिंदे, बहादूर यांजकडे किंमतीचा आग्रहही असला तर याप्रसंगीं उघड दाखवून शत्रू जे तिकडे आहेत त्यांजला जागा न व्हावी हें बाई तो करतील, परंतु आमचे तर्फेनें तुम्हीं लिहोन उत्तर आणून दाखवावें म्हणोन विस्तार लिहिला आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 513 November, 1789 A.D.

The Holkar ambassador at Hyderabad (Deccan) writes to Ahilyabai that the Nawab was highly pleased with the news that you tried to bring about reconciliation among Scindia, Ali Bahadar and Tukojeerao. The Nawab asked me to write this to you, highly as he appreciates your meritorious acts in general.

---

**अ. नं. ५१४** **श्री**

ता. २० नोव्हेंबर, इसवी सन १७८९

होळकर वकील हैद्राबादकराकडून पत्र मातोश्री अहिल्याबाईं होळकर यांसी. माहे गुदस्तां मथुरेकडील अखबार आली. त्यांत बहुत बखेडियाचें वर्तमान आहे. अलीबहादर यांनीं उमरावगीर गोसावी हिंमतबहादर याचा पक्ष धरून शिंदे बहादूर यांनीं फार आग्रह केला आहे. श्रीमंत सुभेदार साहेबांचा तेथप्रसंगी जवळ असतां त्यांचे सांगणें अलीबहादूर व शिंदे हे उभयतां मान्य करीत नाहीत. पुण्याहून मदारुकमाह याजला वर्तमान कळत असोन हेही जाबसाल लिहितात. याजवरून यांचे चित्तांत मागती त्या प्रांतीं सरदारा-सरदारांत कलह येऊन दौलतीचे नाश व्हावे असे उघड अर्थ तिकडील अखबारवाले नबाबसाहेबांस लिहितात. त्याजवरून हेही कल्पना बहुत करतात. श्रीमंतांचे दौलतीतील तिघेही सरदार प्रतापी आहेत. ते आपसामध्यें कलह वाढवून तिकडील राजेरजवाडे मुखलीफ आहेत. त्यांजमध्यें आपला दाब कमी करून घेतील तेव्हा श्रीमंतांचे दौलतीचा लौकिक कमी झाल्यास मग पैसा मिळणें व आब राहून देशास येणें दुर्घट आहे. आंदेशा बहुत प्राप्त झाला. हेही बोलतात कीं, सांप्रत नर्मदातीरीं अहिल्याबाई होळकर

आहेत त्यांजला तिघाही सरदारांचें संरक्षण करणें अगत्य आहे. यावरून त्यांनीं कैसा बंदोबस्त केला असेल हे कळत नाही. म्हणून सेवकास बोलावून आज्ञा करीत होते. त्यानंतर एक आज्ञा आणखीन केली जे श्रीमंतांचे दौलतींत प्रस्तूत शिंदे, होळकर, हे दोघे सरदार धीराचे आहेत. येथून पुण्याहून मदासलमाहा तो लिहितच असतील परंतु अलीबहादूर केवळ सरकारचा तोरा आहे. त्यांचा अपमान न व्हावा. हें याजला कर्तव्य असेल तेव्हां हे दोघे सरदार आपआपल्यांत मनोमय मलीन करून अजुरदा जाहले तोही बदनक्ष आहे. त्यात शिंदे बहादूर तूर्त पादशाही तोरा त्यांचे स्वाधीन आहे. जमियत, तोफखाना, त्यांजपाशी जारी आहे. त्या प्रांतांतील तीन चार किल्ले त्यांजकडे अंमल काबील आहेत. अंग्रेज फिरंगी कलकत्याचे सूत्र त्यांजपाशीं कायम आहे. ऐसा सरंजाम होळकर किंवा अलीबहादूर यांनीं जमा करून साहित्य असेल तर कल्पना करावी. यांत यश आपयश देणें ईश्वरी. कैलासवासी सुभेदार मल्हारराव होळकर व जयाजी शिंदे यांनीं दोस्ताना काबीज करून खजाना मिळवून दोघेही एकचित्तें खाविंदापाशीं येत होते. तेव्हां खाविंदांसही अगत्य उभयतांचे एकरूप ठेवणें जरूर होतें. हल्ली असा बखेडा झाला तर मग यांत श्रीमंतांचे दौलतीस अपाय दिसतो किंवा उभयतां सरदारांपैकीं एकजण जाया झाले तर सर्व प्रकारे संकट आहे. असे अंदेशेकरून सेवकाशीं बोलले. त्याजवरून सेवेसीं विनंती लिहिली आहे. एकवेळ महाराजांचे उत्तर यावे आणि तें नबाबास वाचून दाखवावे म्हणजे यांची कांक्षा सर्व दूर होईल. पुढील वर्तमान. लष्करांतून पत्र तीन महिने आलें नाहीं. पत्रें पाठवितों उत्तर येत नाहीं. बहुत काय लिहिणें, हे विज्ञप्ती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 514 20-11-1789 A.D.

The Holkar ambassador of Hyderabad writes to Ahilyabai : “The Nizam was grieved to hear the news of disputes amongst Holkar, Scindia and Ali Bahadur. The Nizam looks up to you for amendments.”

---

**अ. नं. ५१५** **श्री**

ता. २९ नोव्हेंबर, इसवी सन १७८९

तुकोजीरावांचे पत्र मातोश्री अहिल्याबाईंस विशेष. ताजू होळकराची पागा तुम्हाबरोबर आहे. पागेंत ताजूकडून मदारी होता तो इंदुरीं आल्यावर मृत्यु पावला त्याची स्त्री व मेहुणा पागेंत आहेत व हल्लीं येथून चिरंजीव हमीर होळकर यानें नूरमहमद याजला पाठविलें आहे. पूर्ववत् पागेचा बंदोबस्त राहून चिरंजीवाचे नांवें वहिवाट चाले ते करणें म्हणोन

लिहिलें. त्यास ताजूची पागा ताजूचे नांवें आजपर्यंत वोढतच होती. हल्ली चिरंजीव हमीर होळकर याचे नांवें पागा करार करून मदारीचा मेहुणा येथें आहे त्याचे हातें पागेची वहिवाट होत आहे. नूरमहमद पाठविले म्हणोन वडिलीं लिहिलें, त्यास नूरमहंमद येथें आला नाही. मदारीच्या मेहुण्याचे हातें काम घ्यावें. त्याप्रमाणें काम चालत आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 515 29-11-1789 A.D.

Tukojeerao writes to Ahilyabai : "The Paga referred to by your letter is now registered in the name of Hamir Holkar, and the authority is vested in the hands of he brother-in-law of the late Madari."

---

**अ. नं. ५१६** **श्री**

ता. ८ डिसेंबर, इसवी सन १७८९

तुकोजी होळकरांचे भिकाजी उद्धवास पत्र. तू चिरंजीव मल्हाररावास बिघडवून त्याबरोबर लूटमार करीत फिरत आहेस. नगरसूल ठाण्याच्या कमाविसदारापासून व लोकांकडून सर्व कांहीं नेलेस. ज्याचे त्यास परत देऊन त्याच्या पावत्या मला दाखीव. हें न केल्यास तुजला धरून आणून हात पाय तोडून तुझी मुलें माणसें घाण्यांत घातली जातील.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 516 8-12-1789 A.D.

"Tukojeerao reprimands Bhikajee Uddhva in unmistakable terms : "You have spoilt my son Malharrao. Both of you together have despoiled the Kamavisdar and residents of Nagarsul Thana. You must return the spoils to their proper owners and submit receipts. Otherwise you and your family will have to meet dire punishment."

---

**अ. नं. ५१७** **श्री**

इ. स. १७८९

रावत सामतसिंग संस्थान देवळे, प्रतापगड यांचे मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. मार्गशीर्ष वद्य ११ विशेष. श्रीमंत पाटीलबाबा मेवाड प्रांतीं आले. राणाजीचा व रावत भिमसिंगजीचा मिलाफ करून दिला. पांच रुपये मेवाड प्रांतीं ठरले. हें आपणास विदितच आहे. चितोडावर

राणाजीचा अंमल झाला तमाम आपले रजपुतांवर वर्गणी घालून आम्हावरही संस्थान देवळे येथून दोन रुपये द्यावे असें आम्हाकडील वकिलास परिछिन्न बोलले. ऐसियास संस्थान देवळे हा महाल आपला आहे. येथील मर्यादा आजपर्यंत खावंदाचे नांवावर कोणी तोडली नाही. हल्लीं रावतजीच्या म्हटल्यावरून येथें उपसर्ग द्यावा असे पाटीलबाबांचे मानस परिछिन्न आहे. आम्ही तो एक आपणांस जाणतो. आपण धनी आहेत. यास्तव एक पत्र पाटीलबाबांस लिहिलें पाहिजे कीं महाल संस्थान देवळे सरकार होळकरांचा असतां त्यास कोणाच्या म्हटल्यावरून नादी लागून महालची ++[१] न करावी व एक पत्र रावत भिमसिंगास निक्षून दिलें पाहिजे कीं संस्थान देवळे यांस मनमानें तशा लबाड्या करून उपद्रव द्यावा असे तुमचे मानस त्यास +++[२] हा महाल सरकारचा असोन तुम्ही उपद्रव कोणेविशीं देणार? अतःपर संस्थानिकाकडे खोटी नजर केली तर परिछिन्न कामी पडणार नाहीं. दूरंदशेनें जें करणें तें करावें म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 517 1789 A.D.

Rawat Samatsing of Sansthan Dewale writes to Ahilyabai Holkar : "Mahadajee Scindia came to Mewar and brought about reconciliation between Ranajee and Rawat Bhimsingjee. All the Rajput States have individually been taxed for the payment; so has Dewale been. Dewle acknowledges the authority of the Holkar State: Scindia, should, therefore, be made acquainted with the fact by Ahilyabai.

---

**अ. नं. ५१८** **श्री**

ता. १८ डिसेंबर, इसवी सन १७८९

तुकोजीराव होळकर यांचे मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष. चिरंजीव मल्हारराव यांस घेऊन जावें म्हणून वडिलांकडून एकदोन वेळ आज्ञा जाली. त्यावरून चिरंजीवाची रवानगी करण्याकरितां वडिलांस एकदोन वेळ पत्रें पाठविली आहेत. सांप्रत चिरंजीवानें चार लबाड आपणापाशीं मेळवून त्यांचे सांगितलेवरून मनास येईल तशी वर्तणूक करीत आहे. नगरसुलीं स्वार पाठवून तेथून कारकून आणिला आहे. त्याजपाशीं ऐवज मागतो. मौजे अडगांव प्रगणे नाशिक येथें स्वार पाठविले आहेत. मौजे धवले वगैरे गांवखेड्यांस

---

१. ++ : मूळ पुस्तकात शब्द पूर्ण नाही.

२. +++ : मूळ पुस्तकात हा शब्द आला नाही.

दोन्ही बाबतीत मूळ कागदपत्राचा भाग जळला असावा.

दंगा आहेच. याप्रमाणें वर्तणूक वडिलांचे श्रवणांत आहे. परंतु दटावल्यास याचे वडील काय म्हणतील, हा संकोच धरून क्षमा होती. हे क्षमा कार्याची नाही. आपण सर्वांस वडील. आम्हांसुद्धां शिक्षा करावयाचा अधिकार आपल्याकडे आहे. याची उपेक्षा केल्यास दिवसेंदिवस जास्त बिघडते. तेव्हां सुधरायास आपल्यासच बळ पडेल. एखादीकडे उठून गेले तर उपहास आपलाच. ह्या गोष्टी सर्व वडिलांचे ध्यानांत आहेच. वडिलीं हयगय न करितां राग लोभ जसा करणें असेल तसा करून चार लबाड जवळ आहेत ते दूर करून एखादा पोक्त माणूस जवळ ठेऊन त्यास इकडे रवाना करावें. आपण चिरंजीवास दटावल्यास आम्हास तिळप्राय वांकडें वाटायचे नाही. हे गोष्ट शपथपूर्वक समजावी. मिती पौष शु.२ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ.२१ रविलाखर मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 518 18-12-1789 A.D.

Tukojeerao enumerates to Ahilyabai the various misdeeds of his son Malharrao and requests her to punish him as she may think fit. "He is surrounded by bad company. The company should be removed." Tukojeerao assures her that he would not at all be offended by her punishing of Malharrao.

---

**अ. नं. ५१९** **श्री**

ता. १९ डिसेंबर, इसवी सन १७८९

गणेश नारायण मुक्काम मथुरा यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष. इकडील वर्तमान. दिल्ली प्रांतीं इस्माईल बेगनें बदमामली केली आहे. जयपूर, मारवाड, कोटे, वगैरे रांगडे एकत्र झाले. इस्माईल बेगला पुढें करून मागें आपण आहेत. दिल्लीजवळ रेवाडी तीस कोस आहे. तेथून कूच करून दाद्रीस वीस कोसांवर आला आहे. येथून राजश्री काशीराव होळकरांबरोबर पागा वगैरे फौज देऊन पुढें आठ कोसांवर आहे. फौज कोणी जात नाही. खायावाचून उठोन जातात. पागेचीही तीच अवस्था आहे. शरीफभाई येथें खर्चाचे बेगमीस आले आहेत. त्यांजलाही सतरा दिवस झाले आहेत. कांहीं रुपयाची तोड पडत नाही. श्रीमंतांसही विनंती करतात, उत्तर होत आहे, कीं मजकडे काय आहे? अमात्याकडे जाऊन जें मागणे तें मागावे. इकडून उत्तर होतें कीं, धनी जसी आज्ञा करतील तसें करावें. वाटणीपैकीं महाल आले आहेत त्यांचाही बंदोबस्त नाही. आपसांत नीट नाही. यामुळें यजमान साहेबांकडे कोणी जात नाही. दरबार कचेरीही मानसिकच आहे. अमात्यांचे घरी रात्रंदिवस कचेरी आहे. राजश्री पाराजीपंताचे व कारभारी यांचेंहीं सूत नाही. तेही आपले घरीं बसून आहेत. आठ पंधरा दिवसांत

एक वेळ येऊन मुजरा करून जातात. बोलणीही कांहीं नाही. राजश्री महादजी शिंदे यांचे आर्जव फार अमात्यांनीं केलें. पुढेंही करीतच आहेत. त्यामुळें येथें मनमानें तसा कारभार आहे. राजश्री अलीबहादर व सुभेदार यांचें एकचित्त आहे. परंतु कारभाऱ्याचे एक चित्त नाहीं. अलीबहाद्दराचे म्हणणे कीं, इस्माईल बेग यावर आपण उभयतां जाऊं. त्याचे पारिपत्य करून त्याकडे पंचवीस लाखाचा मुलूख आहे तो हस्तगत करावा, असें बोलतात. परंतु कारभाऱ्याचें मानस कीं, येथून कोठें न जावें. शिंदे जिकडे जातील तिकडे त्याचे मागें जावे. शिंदे यांनीं फिरंगी एक कंपू आणविला आहे तोही आठ पंधरा दिवसांत येईल. राजश्री अंबोजी इंगळे याजलाही ताकीद झाली कीं, तुम्ही आमचे कारभारांत येऊ नये. त्यास तेही कांहीं येत नाही. राजश्री राणेखान याचें पाटीलबाबांचे चित्त शुद्ध नाहीं. महाराजांनीं पत्र राणेखान याजला दिलें. ते त्यास पोहचतें केलें. येथील साकल्य वर्तमान यजमान साहेब व कारभारी यांचे सांगीने येथें येऊन काय लौकिक मिळविला आणि शिंद्याच्या घरचे जहागीरदार होऊन राहिले आहेत. शिंदे जशी चाकरी सांगतील त्याप्रमाणें करावी असा प्रकार आहे. देशीं होते तेंव्हा शिंदे यांस वचक होता कीं होळकर आल्यावर काय करतील हें न कळे. प्रत्यक्ष आल्यावर कांहींच कारभार झाला नाही. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 519 19-12-1789 A.D.

Ganesh Narayan from Mathura informs Ahilyabai of the disordered state of affairs in the Holkar camp. Money has grown scarce.

Ali Bahadur advises Tukojeerao to march against Ismail Baig who holds territory worth 25 lacs. Tukojeerao does not approve of the suggetion. Tukojeerao has reduced himself to a secondary position under Scindia.

---

**अ. नं. ५२०** **श्री**

इ. स. १७८९

राजश्री बाळाजीपंत नाना यांस अहिल्याबाईंकडून पत्र. विशेष. कैलासवासी कृष्णाजी पवार यांनीं विद्यमान असतां आपले बंधूचा पुत्र राजश्री तुकोजी पवार यांस दत्तक घेतलें आहे. त्यांचे नांवें सरदारीचा बंदोबस्त होऊन वहिवाट चालली पाहिजे. यास्तव राजश्री बाळाजी खंडेराव त्यांचे तर्फेनें बोलावयास आले आहेत. सविस्तरें माहिती करतील. त्या अन्वयें अगत्यवाद धरून बंदोबस्त करून द्यावा. पूर्वीपासोन श्रीमंतांचे पदरचे. सरकार चाकरी करीत आले. त्याअर्थीं पुढेंहीं बंदोबस्त करून देऊन चालविणें आपल्याकडे आहे. हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

पुरवणी ताजा कलम पत्र : 'वरील मजकुराचे पत्र' यशवंत गंगाधरांस कीं पवारांसंबंधीं राजश्री बाळाजीपंत नाना व हरीपंतांसीं बोलून यांचे कार्याचा बंदोबस्त करवून देणें म्हणोन पत्र.

No. 520 1789 A.D.

Ahilyabai writes to Nana Fadnis that he should do his best to comply with the request made by Balajee Khanderao on behalf of Tukojee Pawar adopted by the late Krishnajee Pawar.

A similar note was sent to the Holkar ambassador at Poona to see Nana and Haripant on behalf of Pawar.

---

**अ. नं. ५२१** **श्री**

इ. स. १७८९

चिरंजीव सौभाग्यवती पार्वतीबाई वाघ यांसी अहिल्याबाईंचा आशीर्वाद. परगणे महतपूर येथील गावगन्नाचे पाटील सरकारांत आले होते. त्यांचे समजुतीस मामलेदार, फडणीस, मुजुमदार, जमीदार आले. सर्वांचे ऐकून पुढें वहिवाट करणें. कलमबंदीवार याद अलाहिदा ठरवून देऊन चिरंजीव तुळसाजी वाघ याचे नांवें पत्र लिहून हें पत्र तुम्हांस लेखन केले असे. तरी मामलतीसंबंधीं जाबसालांत ओढ न करितां जाबसालास मामलेदाराकडे पाठवून देत जाणें. याद ठरावून दिली आहे. सर्वांचीं खातरजमा करून बंदोबस्त करणें. पुन्हां बोभाट न ये तें करणे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 521 1789 A.D.

Parwatibai Wagh is advised by Ahilyabai to follow the lines of administrative work chalked out by the latter. Ahilyabai had heard both the parties had come to that decision. Her son is also advised similarly.

---

**अ. नं. ५२२** **श्री**

ता. ७ जानेवारी, इसवी सन १७९०

तुकोजी होळकरांकडून चिरंजीव मल्हारराव होळकर यांस पत्र छ २० रविलाखर. विशेष. येथे कामाचा प्रसंग. तुम्ही जवळ असावे, यास्तव तीर्थस्वरूप बाईसाहेबांची आज्ञा

घेऊन इकडे यावयाचे करावे म्हणोन तुम्हांस पेशजी एकदोन वेळ लिहिलें आहे व हल्लींही हें पत्र लिहिलें आहे. तरी याउपरि कोणताही अंदेशा न करतां मातुश्री साहेबांची आज्ञा घेऊन सत्वर येणें. तुमचे रवानगीविषयीं येथूनही मातोश्रींस लेखन केलें आहे. तुम्ही येथें आला म्हणजे फौज देऊन पुढें तुमची रवानगी करावयाची आहे. याकरितां अविलंबे यावयाचें करणें.

**सरकारी रेकार्ड**

No. 522 7-1-1790 A.D.

Tukojeerao Holkar writes to his son Malharrao to start immediately and see him in the camp. After his arrival he will be sent on an expedition.

---

**अ. नं. ५२३** **श्री**

जानेवारी, इसवी सन १७९०

पाराशर दादाजी मुक्काम मथुरा, यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष. ''सर्वांनी मिळून दौलतीचे स्वरूप राखून सरकारचाकरी घडून फौज ताजी राहे तें करणें, यात सर्वांस चांगले.'' उचित तसें करून घडेल ते लेखन करीत जाणें म्हणोन आज्ञा. ऐसियास येथील प्रकार तर फौजेचा खर्च भारी. दौलतीत पैका नाहीं. याअर्थी गुदस्तां गुलाम कादराचे मसलतीस हात लावावा म्हणजे यश येऊन मसलतही आटपेल, परंतु न घडली. मेवाडांत दिवसगत लागले. श्रावणमासीं येथें येणें झालें. भावानीं एकमतें सल्ला मसलत करावी तेंही घडत नाही. इनाम वाटणी मिळोन नऊ लाख तनख्याची जागा देऊन उतराई जाहले. त्यांत दोन लाख रसद ठरली. इतकाच ऐवज. पुढें राजेरजवाडे वगैरे मसलतीत तिघे सरदार एक होऊन हंगाम आहे तो व्हावें, तेही तूर्त दिसत नाही. इस्माईल बेग दादी, केली आहे. उभयतां राजांकडे अनुसंधान आहे. दिल्लीसही यावे याअर्थें बादशहाची पत्रें येतात. यास्तव दिल्लीस फौज पाठवावी असें पाटीलबाबा म्हणतात त्यावरून राजश्री काशीरावांची रवानगी केली. ते आठ कोसांवर आहेत. त्यांबरोबर पागा शिलेदार द्यावे ते पोटाचे बेगमीबद्दल म्हणतात. ते घडत नाहीं याजमुळें जाणें दिवसगतीवर आहे. सर्वांनीं मिळोन चांगलें तें दौलतीस करणें अशी आज्ञा. त्यास मी तर चाकर लोभ करीन. चाकरी घेतल्यास करावी इतकेच मजकडे आहे. तोही प्रकार कोणाचा लोभांत घडत नाही. एक खावंदाचे लक्ष राखून आहे. परिणामाची गोष्ट सुचते ते सांगावी. करणें न करणें हा अखत्यार त्यांचेकडे. सारांश, हंगामशीर दिवसांत मसलत घडावी. मग दैवानुसार मिळणें तेही तूर्त भावाकडून अवकाश. दरमहा चढती. रुपयाचा ठिकाणा नाहीं. श्री सत्तेनेंच परिणाम लागेल. तो खरा.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 523 January, 1790 A.D.

Parashar Dadajee writes from camp Mathura to Ahilyabai : Gulam Kadar and Mewar affairs have failed. Distribution of territory is a grand force. The Emperor is insistent in his invitations. Kashirao is sent, but his men are without money and material. The three Sardars, if united. have a grand field before them in Rajputana, Money is getting scarcer day by day.

---

**अ. नं. ५२४** **श्री**

ता. ३ फेब्रुवारी, इसवी सन १७९०

सौ. रखमाबाई यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें ते पावलें. चिरंजीव मल्हारराव यानें श्री जेजुरीचे यात्रेस जावयाकरिता पांचचार वेळां निरोप पाठविले आणि समक्षही हटकिलें. तूर्त जाऊं नये, पुढें सोईनें पाठऊं, तेव्हां जाणें. त्याचे मानस तूर्तच जावें असे आहे. येविषयींचा विचार कसा करावा हें मनन करून सविस्तरें लिहून पाठविणें, म्हणोन आज्ञा. ऐसियास तो जाईल, वेडेचार करून महालमुलखाची खराबी करील. याजकरितां, वडिलीं त्याजला चार गोष्टी पटवून सांगोन सर्वात्मना जाऊं देऊं नये. श्रीचे दर्शनास बहुत दिवस झाले नाहींत. देशींहून इकडे येतां सर्वत्र दर्शन घेऊन आलो. तत्राप चारपांच वर्षे झाली. जावेच असाही अर्थ नाही. कोठें वडिलानीं जाऊं देऊं नये येविसी वडिलांस लष्करची पत्रें बहुत वेळां आली आहेत व येतच आहेत. त्याअन्वयें आम्हास व सर्वांस आली. याजकरितां साफ जाऊं देऊं नये इतका मात्र आम्हास विचार सुचतो. आपण वडील आहांत जो विचार कराल तो पोक्त सोईचा होईल. त्यांत आम्हीं वडिलांस विस्तारेंकरून लिहावें तें काय? येविसींची विनंती वडिलांशीं समक्ष केली आहे. यास्तव जाऊं देऊं नये हे उत्तम. मिती माघ वद्य ४ सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ती. पैवस्त छ २१ जमादिलावल ११९९ मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 524 3-2-1790 A.D.

Saubhagyawati Rakhanmabai Holkar requests (in letter) Ahilyabai not to permit Malhararao Holkar to go on pilgrimage to Jejuree. "Four or five years back we had all been there. His father shares the same opinion with me. I am afraid my son will only spoil our territory by mischievous conduct. You will, however, do what is best under the circumstances."

---

**अ. नं. ५२५** **श्री**

ता. ८ फेब्रुवारी, इसवी सन १७९०

तुकोजीराव होळकर यांजकडून पत्र मातोश्री अहिल्याबाईस. विशेष. चिरंजीव राजश्री काशीराव याची रवानगी केली त्याची एक महाबेगमी जाली. तिजलाच मोठा प्रयास पडला. यासी महिना उलटला तिकडील बेगमी झाली. शीख व रोहिले यांजकडील बातमी दंग्याचीच तेव्हां त्या मसलतीस किती अवकाश पडेल याचें शाश्वत नाहीं. तोपर्यंत जमाव तेथेंच असावा. त्याचे खर्चाची बेहबुधी जाल्यावांचून लोक टिकावयाचे नाहींत. याजकरितां तिकडील जरूरीचे शिवाय येथें लोक राहिले आहेत त्यासी रोजमुरा व चंदी पाहिजे. कर्ज घ्यावें तरी मागील ऐवज ज्याचा देणें तोच त्यासी पावला नाही तेव्हां पुढें द्यावयासी विचार करतात. तत्रापि निकडीमुळें भीड घालून नवे कर्ज मागावें तरी ऐवज लावून मागतात. माळव्याचा प्रकार वडिलीं दोनचार वेळां लिहिल्यावरून समजण्यांत आला आहे. देशचे महालांचा मजकुर तरी साल मजकुरचे खर्चाची गुंत उरकेल. याजमुळें ऐवज सावकारास लावून देण्यास जागा दिसत नाहीं. यामुळें घोर पडला आहे. सर्व अर्थ वडिलांचे ध्यानांत आहे. तरतुदीची सोय याचा विचार करून वडिलांकडून कांहीं पुस्तपन्हा झाल्यावाचून अर्थाची स्थिती राहावयाची नाहीं. देशचे महालचा ऐवज आम्ही घेतला आहे. तत्रापि ओढीस कसें करणें. तिकडील मामलेदार बोलावून आणावे. त्यांचे देणे फाजील कसे काय असेल तेंही ध्यानांत आणून पुढें दिलभरी करून खातरजमा करावी आणि तूर्त कांहीं त्याजपासोन घ्यावयाचे ठरवावे. येथून वराता सावकाराच्या मामलेदारांवर करून त्या पटून ऐवज सावकारांस पावे असें करावें. कदाचित कोणी मामलेदार आपलीच ओढ करूं लागल्यास वडिलांचे विचारास येईल तशी तरतूद करावी. याशिवाय अवंतर तरतूद वडिलांकडून घडेल तितकी करून ज्यांत इकडील ओढीस उपयोग घडेल असें करणें वडिलांकडे आहे. मिती माघ वद्य १० सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना : पैवस्त छ १३ जमादिलावर मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 525 8-2-1790 A.D.

Tukojeerao Holkar writes to Ahilyabai : "with great efforts, provision for one month was secured for the army of Kashirao. The month is passed. The Sikhs and Rohillas are up in arms. We have to meet them. Old debts are in arrears. No hopes for procuring money.

---

**अ. नं. ५२६** **श्री**

ता. २७ फेब्रुवारी, इसवी सन १७९०

काशीराव होळकर यांजकडून अहिल्याबाईंस पत्र मुक्काम श्री कुरुक्षेत्राहून. इकडील वर्तमान. आम्हीं या प्रांतीं आलों. जागचे जागचे शीख येऊन भेटले व सहारणपुराचे सुमारें जीरणवाले याचे जमियती सुद्धां रोहिल्यांनीं जमाव केला होता. ते आपले फौजेचे शहानें मागे सरून पहाडांत गेलें. सांप्रत इकडे मसलत विशेष नाहीं. वडिलांचे पुण्यप्रतापें सर्व गोष्टी यथास्थित घडतील. पुढें वर्तमान होईल त्याप्रमाणें सेवेसीं लिहून पाठवीन. श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ.६ रजब मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 526 27-2-1790 A.D.

Kashirao Holkar from Kurukshetra writes to Ahilyabai : Sikhs from different places have come and seen us. The Rohillas stood before us near Saharanpur but after a while they fled away.

---

**अ. नं. ५२७** **श्री**

ता. २ मार्च, इसवी सन १७९०

अहिल्याबाईंकडून तुकोजीरावांस पत्र विशेष. तुमचे पत्र चिरंजीव काशीराव यांसी परवानगीबद्दल व खर्चाबद्दल प्रश्न असे मजकुरांचे पावले. ऐसियासी तेथें फाजलाचा महालचे जमेचा आजमास पाहून त्याची स्थित राहून, आपल्यास चार रुपये मिळतील अशा अन्वयें वराता परभारें करणे. इकडे मामलेदारांची पत्रें आल्यास तिकडील ओढीताडीचे प्रकार समजावून सांगितल्यानें त्यांचेही रदबदलींस लष्करांत येणें घडणार नाही. तेथेंही बोलावयास बाज पडणार नाहीं आणि मामलतही सोडणार नाहीं. कदाचित कोणी वरात फिरवली तरी तुम्हांसही आवघड वाटणार नाहीं. यास्तव तेथूनच विचार पाहून सोईनें व्यवस्था केल्यास अवघड काय आहे? रवाना छ.१५ जमादिलाखर बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 527 2-3-1790 A.D.

Ahilyabai writes to Tukojirao. In reply to your letter about money matters, my advice is that it is advantageous for you to take the matter in hand, and have direct communications with the Mamlatdars.

---

**अ. नं. ५२८** **श्री**

ता. ३१ मार्च, इसवी सन १७९०

नारो गणेश यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. विशेष. इकडील मजकूर प्रसंगानुरूप सविस्तर श्रीमंत रा. तुकोजीरावांनीं लिहिला आहे त्यावरून कळेल व कारकूनही वर्तमान सांगावयास सेवेसीं पाठविला आहे तो आज्ञेप्रमाणें निवेदन करील. आजपावेतों कर्ज मिळालें तेथवर घ्यावयासीं अंतर पडलें नाही. वानवळे याचेंही घेतले ते समयीं बहुत अडचण पडली. लोक उठोन जाऊं लागले तेव्हां यजमानाच्या मर्जीनुरुप घेतलें. पुढें आपली आज्ञा आल्यावर त्यांचा व्यवहारही तोडला. हल्लींचे जसे मिळेल तसे घेण्यांत येईल. पुढें वाकडे त्यांचेही कर्ज सहा लक्ष शिवाय कापड ५०००० चे घेतले, परंतु दौलत थोर, खर्च भारी, वावगा खर्च एक रुपयाही होत नाहीं. काय करावें. कसा श्री ईश्वर मार्तंड निर्वाह करील, किंवा महाराजांचे पुण्येंकरून होणें तसा होईल. स्वतंत्र मनसबा करावा तर जागाही नाही. सोबतींत राहणें तेव्हां चाकरीस बरोबरीनें राहिलें पाहिजे. मसलत तूर्त उभी राहिली. मिर्जा इस्माईल बेगास श्रीमंतांकडून कमकसर पंचवीस लाखाची जहागीर दिली. चाकर सरकारचा असतां बदमामली करून उभयतां राजे यांस मिळून सर्व रांगडे व मशारनिल्हे फौजेचा जमाव नारनोळ येथें करतात. याजवर यावें असें दिसतें. परंतु कूचच होऊन पुढें आला नाहीं. इकडीलही राजश्री बापू होळकर रवाना झाले. पाटीलबाबाकडील अंबोजीं इंगळे कंपू एक, तोफासुद्धां आणखी फौज बक्षी असे रवाना केले. मोकाबल्यास जातात. रावराजा माचोडीवालाही अनुकूळ आहे. समयास काय करील नकळे. रांगडे यांचा भरवसा नाहीं. परंतु तूर्त त्यांच्या रोखे फौजा रवाना झाल्या. कामी पहाडपर्यंत गेल्या. ते नारनोलावरच आहेत. पत्यालाकडे काशीराव, बाळोजी इंगळे शहास गुंतले आहेत. त्यांस माघारें बोलाविलें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 528 31-3-1790 A.D.

Naro Ganesh writes to Ahilyabai : Expenses are daily to be met, and debt is nowhere to be found. Mirza Ismail Baig has got Jagir worth 25 lacs from the Sarkar and he is disloyal. Bapu Holkar and Ambojee Ingle are sent against him. Kashirao and Balojee Ingle had already proceeded against the Sikhs but they are now ordered back.

---

**अ. नं. ५२९** **श्री**

ता. १ एप्रिल, इसवी सन १७९०

अहिल्याबाईंचे तुकोजीरावांस पत्र. विशेष चि. राजश्री मल्हारराव याची चाल नीट नाहीं. याजकरितां इकडे रवानगी करावी अथवा तेथें बसांत राहे ऐसे तऱ्हेंनें ठेवावा म्हणोन विस्तारपूर्वक लिहिलें. ऐसियास चिरंजीवास लेकुरपणाचे रीतिनें दटावून सांगावें आणि त्यानें ऐकावें हे गोष्ट तेथूनच राहिली नाहीं. तुम्हांपासोन उठोन चिरंजीव सौभाग्यवती रखमाबाईपासोन हातोदचे मुकामीहून एका घोड्यानिशीं आला. तेव्हांही बंदोबस्त न घडला. त्यानें येथें आल्यावर आनंदराव होळकर येऊन जाईपर्यंत कोठे कांहीं अंतर पडूं दिलें नाहीं. पुढें चाल वाकडी दिसो लागल्यापासोन घेऊन जाण्यास लिहावयास कमी केलें नाहीं. परंतु कोणास पाठवून घेऊन जावे हें न घडले. अलीकडे जमियत करून बाहेर जाऊन राहिल्यावर केवळ अटकण्यांतूनच गेला. रीतिभातीनें सांगावयाचे तितके सांगितलें. नच ऐके तेव्हां दबावूनही सांगोन पाहिले. बोलण्याचे शाश्वत नाहीं. निग्रह केल्यानें न जाणो कसें कसें घडेल याजकरितां विचार पडत गेला. तत्रापि सोमाजी लांभाते व बुळे बारगळ वगैरे सर्वांस त्याजला बोध करून आणावयासी सांगितलें. परंतु कोणीही जाऊन बंदोबस्त करावा असेंही घडेना, तेव्हां यातील अर्थ पाहतां धन्याचे मूल रीतिनें ऐकावे हे त्याचे गांवींच नाही. दटावून सांगावें तर अंगावर येतो. हात चालवावा तर जन्माचा बट्टा. त्याचा हात चालल्यास जिवास मुकावें. मागें घेतल्यास नाकारेपण इतके प्रकार मनांत आणून कोणीही पुढें होऊन मनीं घेईनात. कदाचित कोणी हिय्या करून धरून आणल्यास पराकाष्ठा वर्ष सहा महिने निदान दोन वर्षे बंदोबस्तीत ठेवाल, पुढें जे दिवशीं तो सुटेल तेव्हां प्राणाचाच ग्राहक. धाकुटपणींच शेख नखमासीयींने कजिया सारवानासी केला होता. तो दंश चित्तात ठेवून सौ. रखमाबाई येथें आल्यावर त्याजला धरून बेआब केलें. तेव्हां त्यासीच वांकडे घडल्यानंतर परिणाम कसा लागेल? आप्तविषयीं अथवा चाकरीचा पेशा त्याच्यानें एखादी गोष्ट डोकीवर घेऊन घडत नाही. असें पाहून जाबता केला. श्री जेजुरीस जाण्याविसीं फारच आग्रह धरिला. निरोप न दिला तरी उठोन जातो ऐसें पाहिले. तेव्हां पायावर हात ठेऊन घेऊन कोणास उपद्रव न देता यात्रा करून येणें, म्हणजे समागमें सरंजाम देऊन लष्करांत रवानगी करूं ऐसे बोलणें जालें. त्याने कबूल करून रेवा दक्षिणतीरीं गेल्यावर खरगोणापासूनच उपद्रवास प्रारंभ केला. घोडीं बैल जें सापडले तें नेलें. खरगोण परगणियांतील भिलांचा गांव होता, त्यासी खटखट करून गोळी चालली. दहावीस माणूस त्याचे मारले. गांव जाळला. याजकडीलही एक दोन घोडीं पडली. माणसेंही जाया झाली. तेथून बऱ्हाणपुरचे मार्गे रावेरपासून कांहीं घेऊन थालनेर, सुलतानपूर, नंदुरबाराकडे आला. सोईनें पांच रुपये घ्यावे तेंही नाही. माणसाची बेआब करून, दहशतीनें स्वदेश, खानदेशचे महाल घाबरे जाले. तरी जरबेचा माणूस पाठवून, दबाब पडून ऐसी योजना करणें. याउपर तुम्हांस जो विचार कर्तव्य तो करणें. हे आशीर्वाद.

**सरकारी रेकार्ड**

No. 529 | 1-4-1790 A.D.

In reply to Tukojeerao's letter regarding the treatment of his son Ahilyabai writes.

"Every effort-soft as well as strict-from myself has failed. Sardars dare not approach him for fear of his vengeance. He was permitted, after he had sworn, to go to Jejuree; but the moment he crossed the Narbada he commenced his mischievous conduct in every Mahal he visited. I am helpless; You do what you think fit."

---

**अ. नं. ५३०** **श्री**

ता. ९ एप्रिल, इसवी सन १७९०

यशवंतराव गंगाधर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष. साहेबीं चिरंजीव मल्हाररावांबद्दल लिहिलें कीं, मल्हारराव जेजुरी यात्रेचे नांव करून, खानदेशांत गेल्यावर चार माणसें जमा करून बखेडा आरंभिला आहे. तरी अवघड न पडतां बंदोबस्त करून सरकारची मदत घेऊन व्यवस्था करणें म्हणोन सेवकास व केसो गणेश यांस आज्ञा. त्याजवरून आज्ञेप्रमाणें श्रीमंत नानांस व हरीपंत तात्यांस विनंती केली. त्यांनीं सांगितले कीं, इतके स्तोम तुम्ही महेश्वरीं कां वाढू दिलें? तेथील तेथेंच बंदोबस्त करावयाचा होता. आम्ही कांहीं सरकारांतून बंदोबस्त करीत नाहीं. तुमचे घरचा बंदोबस्त तुमचे तुम्ही करावा. सरकारचे महालची नुकसानी झाल्यास भरून घेतली जाईल. तरी कोणी शहाणा माणूस पाठवून त्यांनीं मामलेदारास अनुकूल करून बंदोबस्त करावा. कारण येथें अशा गोष्टीचा किस्सा सांगावयास आपलें स्वरूप रहात नाहीं. तरी सरकारचा कारकून, पागा पाठवून बंदोबस्त होणें योग्य आहें. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 530 9-4-1790 A.D.

Yeshwantrao Gangadhar writes to Ahilyabai that in obedience to Her Highness' orders he spoke about Malharrao's mischievous conduct to Nana Fadnis and Haripant Phadke. They said "You manage your affairs, we won't move in the matter."

---

**अ. नं. ५३१** **श्री**

ता. ११ एप्रिल, इसवी सन १७९०

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके राजशके ११६ पौष वद्य ११ इंदुवासरे. क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपती स्वामी यांनीं पुण्यशील अहिल्याबाई होळकर यांस आज्ञा केली ऐसीजे. तुम्हांकडोन स्वामींचे सेवेसी विनंतीपत्र येऊन वर्तमान निवेदन होत नाही. तरी ऐसे नसावे. निरंतर साकल्य लिहून पाठवीत जावे. सांप्रत स्वामींनीं तुम्हाकरितां मकरसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त एसू चव्हाण, बाळोजी सावंत, शेटी बाळोजी थोरात यांजबरोबर पाठविले आहेत. घेऊन पावल्याचे पत्र पाठविणें. जाणिजे बहुत काय लिहिणें मोर्तब पैवस्त २५ रजब. मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 531 11-4-1790 A.D.

"Shree Raja Shiv Chhatrapati is pleased to send sugar-coated tils to meritorious Ahilyabai Holkar with Chavhan, Sawant and Sheti Balajee Thorat. A letter of receipt of the same will be appreciated."

---

**अ. नं. ५३२** **श्री**

ता. १५ एप्रिल, इसवी सन १७९०

रामराव अप्पाजी यांजकडून मातोश्री अहिल्याबाई होळकर यांस पत्र नजिक पतियालाः विशेष. पटियाला नजिक चौकोसांवर मुक्काम झाला, तो आपल्याकडील कांहीं लोक, पेंढारी, पुढें गेले, तो यांशीं शिखांची गांठ पडलीं. हे वर्तमान येथें समजतांच फौज तैयार करून आपल्याकडून शेखसरीफ व राजश्री बाळोजी इंगळे आपली फौज, पलटणे घेऊन त्यांचे तोंडावर गेलें यांची त्यांची गोळागोळी चार घटका होऊन शेवटीं आपले लोकांनीं फारच निकट केली. ते मागें सरून सैफाबादे लगत गेले. त्या आश्रयानें लढाई घेऊं लागले. आपले लोकांनीं कांहीं शीख ठार व जखमी केले. वीस पंचवीस घोडीं पाडाव करून आणलीं. इकडीलही दहावीस माणसें जखमी, ठार जाहली. पुढें दुसरें दिवशीं लगट करून शिखांचे पुरतेपणीं पारिपत्य झाले. तेच दिवशीं महादजीबाबांची पत्रें आलीं कीं, इस्माईल बेगचे पारिपत्य करावें, यास्तव पत्र पावतांच मागें फिरून यावयाचें करणें. त्यापक्षीं दोन कामे तशीच राहून दिल्लीचे सुमारें आलो. इकडून रेवाडीचे आगें आम्ही जाऊन (इंगळेसह) शह देऊं. अलवरकडून राजश्री बापूजी होळकर व अंबोजी इंगळे त्या तोंडावर, दरम्यान मेवातचा जिल्हा व दिल्लीची सरहद्द. या रानांत राजश्री जिवाजी बल्लाळांचा कंपू. याप्रमाणें आहेत.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 532 15-4-1790 A.D.

Ramrao Appajee writes from Patiala to Ahilyabai : "Our army faced the Sikhs on a spot 8 miles distant from Patiala. After a fight of two days the Sikhs were routed. Letters from Scindia desired that we should proceed against Ismail. We, therefore, turned towards Delhi. We are trying to encompass Delhi from all sides.

---

**अ. नं. ५३३** **श्री**

ता. १६ एप्रिल, इसवी सन १७९०

सौ. रखमाबाई होळकर यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. विशेष. चि.रा.मल्हारराव येथून श्री चे दर्शनाचे निमित्यकरून खानदेश प्रांतीं गेल्यावरी मनस्वी बखेडा आरंभिला. लष्करांत दोनचार वेळां लिहिलें असतां तिकडून कोणाची रवानगी होऊन बंदोबस्त घडावा हें न झालें. चार माणसें जमा होऊन चढीस लागला. येथील कोणास पाठविणेविशीं लष्करची पत्रें आली. त्यावरून बुळे, बारगळ, लांभाते, सर्वांस सांगितलें, परंतु त्यांचे बोलणें कीं, त्यांचेकडे धनीपण, कोण समय कसा. इतकेही असोन कावेदाव्यानें काबूत ठेवून आणल्यास एकदोन वर्षे बंदोबस्त ठेवाल. मग मागील दंश ठेवून प्राण घेण्याचे प्रकार घडतील. घरच्यापैकीच कोणास पाठवावे तर सारेच लष्करांत, यास्तव याविशींचा मजकूर मनन करून उत्तर पाठवावे. म्हणोन आज्ञा. ऐसियास त्याची चाल चांगली नाही. एकला गेल्यास मनस्वी फंद करील, महाल बुडवील येविशीं विनंती वडिलांस केली. शेवटी त्याचे गुणदोष मनास आणतां लेकुरपणांवर दृष्टी देऊन श्रींचे दर्शनास वाटे लावले. आतांही त्याचा बंदोबस्त करण्यास कोणतीही गोष्ट अशक्य नाही. ज्यास आज्ञा कराल तो घेऊन येईल. तो मागील दंश ठेऊन प्राणासी गांठ घालील या विचाराचे आतांच कारण नाही. त्याचे खंबीराचे वडिलांचे ध्यानांत आहे. चि.बाळा बापू दूर राहिले. घरचे जिव्हाळ्याचेच पाहिजे तर चि.रा.संतोजी होळकर वडिलांजवळ आहेत. त्यांजला बोलावून आणोन सांगितल्यावर त्यांच्यानें नाहीं असें म्हणवणार नाहीं आणि त्याजसमागमें बुळे, बारगळ, लांभाते वगैरे मंडळी देऊन रवानगी करावी म्हणजे सारेंच चांगलें होईल. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 533 16-4-1790 A.D.

Saubhagyawati Rakhamabai Holkar writes to Ahilyabai in reply to her letter : "Please arrange to send Santajee Holkar along with Bulye, Bargal, Lambhate and others to bring Malharrao back to Maheshwar. Your

word will be respected by all."

---

**अ. नं. ५३४** **श्री**

ता. २७ एप्रिल, इसवी सन १७९०

गणपतराव बापूजी हिंगणे मुक्काम संस्थान बुंदी यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंचे नांवें पत्र. विशेष. पूर्वी विनंतीपत्रें पाठविली ती पावलीच असतील. जयपूरच्या दंग्याचे सालपासून मुक्काम मजकुरींच बसलो आहे. सरदारांकडे जाणें जाहले नाही. तीन वर्षे गांवचा हाशील बुडतो. संस्थानिकाचीही सुदृष्टी नाहीं. त्यास धन्याचे कृपेकरून व प्रतापेंकरून बाह्यरंग राखून कालवंचना करितों. त्यास संस्थानिक धन्याचे पायाशीं निष्ठा विशेष दाखवितात. त्यांस कृपा करून सरकारचा खलिता साहित्यपत्र रावराजे बिशनसिंगजी यास देवविणार धनी समर्थ आहे. साहित्यपत्राचा मजकूर राजश्री मुकुंदरावजी निवेदन करतील. त्याप्रमाणें साहित्यपत्र देवविलें पाहिजे. चरणदर्शनाचे ठाई हेत फार आहे. पत्रोत्तरीं गौरविणार खाविंद समर्थ आहेत. श्रुत होय हे विज्ञापना पैवस्त छ.१२ मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 534 27-4-1790 A.D.

Hingane from Bundee requests Ahilyabai to intervene on his behalf with Raoraje Bishansingjee.

---

**अ. नं. ५३५** **श्री**

ता. ५ मे, इसवी सन १७९०

मल्हारराव होळकर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र विशेष. वडीलसाहेबांनीं पत्र पाठविलें तें पावलें. मजकुर कीं, खानदेश प्रांतीं खूप धूम मांडली आहे. मौजे शिरपूरचे पाटीलकीविषयीं बखेडा घातला म्हणोन लिहिलें. त्यावरून मौजे मजकुरचे पाटीलकीचे मेहजराची नक्कल शिवराम जमादार यासमागमें पाठविली आहे. शिवराम निसबत बारगळ याने सांगितलें कीं शिरपूर व घाटाऊ येथील पाटीलकी मातुश्री मावशीबाईंची आहे. मावशीबाईंपाशीं मेहजर आहे. त्यास मातुश्रीकडील पाटीलकी असली तरी घरांतच आहे. शिवरामानें करार केला कीं मेहजराची नक्कल पाठवितो. ऐसें असल्यास मातुश्री मावशीबाई

यांचे नावें मेहजर निघाल्यास आम्ही मेहजर करून घेतला आहे. हाच वडीलसाहेबांचे चरणापाशीं पाठवून देऊं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ.२७ साबान मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 535 5-5-1790 A.D.

Malharrao replies to Ahilyabai in a letter that he has not acted in a mischievous manner as was supposed. The Patilship of Mauza Shirpur belongs to Mawashibai Saheb, and he simply tried to recover it for her.

---

**अ. नं. ५३६** **श्री सरस्वत्यनमः**

ता. १६ मे, इसवी सन १७९०

भगवंतराव जगताप मुक्काम भिलाडा, यांचे मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष. आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें कीं, राणाजीचे व रावतजी भीमसिंगजींचे जाबसाल चिरंजीव राजश्री तुकबाचे विद्यमानें ठरले. त्यापैकीं घडले कोणते व राहिले कोणते? हें समजले पाहिजे. रावतजीकडून येथें वकील आहे त्याजलाही येविषयीं वृत्त विचारले. त्याचे बोलण्यांत भाव कीं रावजीचा कदीम पट्टा आहे. त्याखेरीज अलीकडे राणा अलसीजी यानीं जास्ती गावें दिले होते ते रावतजीनें सोडून दिले. त्यात अंमल राणाजीचा. त्याचे तर्फेचे कामदार वहिवाट करितात. चितोड खाली करून द्यावा असें ठरलें होतें. त्याप्रमाणें रावतजींनीं भेटी झाल्यावर चितोडच्या कुंज्या राणाजीपुढें आणून ठेविल्या. तेव्हां राणाजीनें उत्तर केलें कीं, तुम्हापासी असो द्याव्या. तुमचे इतका इतबारी कोण आहे? असे बोलून ठेविल्या. नंतर खंडणीचा ऐवजविषयीं रुजू राहून चाकरी करावी. येविषयीं सर्वांप्रमाणें आम्हीही हजर आहो. असे बोलण्याचें भाव आहेत. तथ्य समजलें पाहिजे यास्तव रावतजीस पत्र लिहून पाठविलें आहे आणि तुम्हासही लेखन केलें असे तरी तुम्ही येविषयीं वर्तमान माहितगारीनें सविस्तर लिहून पाठविणें. पट्याशिवाय चौंडावताकडे जागा किती, कोठें, त्यापैकीं किती माघारी दिली, आज राहिली किती, याचें कारण काय? व किल्ला रावतजी देत असोन राणाजीनें घेतला नाही किंवा रावतजींनी द्यावयाचा अनमान केला. खंडणीचा ऐवज देणेचे तजविजींत कांहीं दिक्कत पडत गेली, किंवा सर्वांप्रमाणें यानेंही ऐवज दिला. याची वहिवाट जसी घडली असेल तशी लिहून पाठविणें. सोमजीचे प्रकारावरून राणाजीचे मनात संशय येऊन फौजबंदी करितात. त्यास घरचे बंदोबस्तामुळें फौजबंदी करावी तेव्हां बाहेरील मनसुब्यास काय करावें? त्याजला इतके जड पडावयाचें नाही. पदरच्या माणसांवर इतका निग्रह करून बखेडा वाढविल्यानें लौकिकांत नीट दिसणार नाही. फौजेच्या पेचांत येऊन

आपले हातें आपल्या मुलखाची खराबी करावी यात चांगलें नाही. येविषयीं तुम्ही राणाजीस बोलून त्यांची खातरजमा करून बखेडा न होय तें करणे. सरकारांतून पहिल्यापासोन राणाजींसी दुसरा अर्थ घडला नाही. ज्यांत राणाजीचे वरचस्व राहून बखेडा तुटोन बंदोबस्त होई तेच करणें अवश्यक आणि राणाजींनीं यासच जपावे हे उचित व रावतजीसही निषेधपूर्वक लिहावयाचें तें लिहिलें, म्हणोन पत्रीं आज्ञा. ऐसियास श्रीमंत सुभेदार यांचे विद्यमानें जाबसाल ठरले, त्यापैकीं एकही जाब रावतजीनें अंमलात आणला नाहीं. पट्याखेरीज रावतजीकडील गांव आहेत त्यापैकीं दोन गांव सोडले होते. पुन्हा सोमजीस मारल्यावर मागती घेतली. चितोड खालीं करून द्यावा असें ठरलें होते तोंडीं मात्र बोलत गेलें कीं, आम्ही सर्व सोडतों. परंतु अंमलात एकही आणलें नाहीं. खंडणीचा असाच घोळ आज उद्या चिठ्यापानडे करून देतों असे बोलत मात्र गेलें. परंतु एकही जाब उगवला नाहीं. शेवटीं अकस्मात हे कर्म करून उठोन गेले. पट्याशिवाय चौंडावताकडे किती गांव याची याद अलाहिदा पाठविली आहे त्यावरून ध्यानास येईल. सोमजी मारल्यावर राणाजीस भय प्राप्त झालें म्हणोन जीवरक्षणास फौज ठेविली आणि पत्रें सर्व ठिकाणीं लिहिलीं. त्यास आज्ञेप्रमाणें राणाजीस बोललों त्यांस त्यांचा अर्थ महाराजांशिवाय दुसरा नाही. श्रीमंत सुभेदार यांजपाशीं करीना ठरला आहे त्याप्रमाणें वर्तणूक करावी. चितोड खाली करून द्यावा म्हणजे सर्वांस समाधान होईल. रावतजी चितोडास गेल्यावर मुलकांत दंगा आरंभिला. खैरोद्याचें ठाणें बळकावून, चंद्रावतास काय, कोठें बढवाण कराना येथें, थारा देऊन तोही गांव मारूं लागला. चितोडाहून धीरतसिंग राजावत बेगुवाला कुंवर व काकडेवाला ऐसे मिळोन दोन हजार जमावनिशीं येऊन रात्रीं पोहचला. सिंदीसादक जमादार मारला व कांहीं बाद हरला. त्याचा खंड पंधरा हजार रुपये केला. हे वर्तमान हुजूर दिवाणजीपाशीं आलें त्यावरून दिवाणजी फौज नारामगर यास होती ती व सीवदास याचेबरोबर खासा रिसाला देऊन त्याचे फौजेवर बिदा केले. समागमें आम्हासही दिले. फौजेचा कूच होऊन मौजे सनावद येथें येऊन मुक्काम झाला. पाटलाची सहा कोसाची छेटी होती त्याची फौज मागती चितोडास गेली. दिवाणजीकडील फौजेनें कानोड घेतली. ठाणें बसविलें. मग अलोट देवगडकडे आले. येथून जे गांव खालशाचे होते त्यापैकीं दो-चौ जागास ठाणें बसविले. देवगडवाले, आलोटवाले यांचे सूत्र लागलें. पत्रेंहीं आली. त्यांवरून सरकारचे कामदार सवाई राम मुनशी व आपल्याकडील कारकून असे पाठविले. त्यांजकडील वकील आले. त्यांनीं जाबसाल केला कीं, आम्ही श्रीमंत सुभेदार यांचे केल्याकरीन्यासह हाजर अहो. येणेंप्रमाणें इमानप्रमाण करून माघरा मुनसी व कारकून समागमें वकील घेऊन गेले. देवगडाहून गोकुलदासजी व आमचेहून रावत प्रतापसिंग चौंडावत यांस घेऊन यावे असे ठरावून गेले आहेत. पुढें वर्तमान होईंल ते सेवेसीं लिहून पाठवूं. पत्राचे उत्तरास बहुत दिवस लागले. उदेपुरीहून दिवाणजीकडून ताकीद आली तेव्हां महाराजांस उत्तरें पाठविली. सर्व जाबसाल, यश महाराजांस आहे. ज्याप्रमाणें आज्ञा त्याप्रमाणें वर्तणूक होईल. श्रुत होय हे विज्ञापना. वरकड वर्तमान शिवरामपंतांचे पत्रीं लिहिलें आहेत ते निवेदन करतील. हे विज्ञप्ती पैवस्त छ.१ रमजान मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 536 16-5-1790 A.D.

Bhagwantrao Jagtap writes to Ahilyabai in reply to her inquiries : "The Rawatjee has fulfilled none of the articles of the treaty. Chitod is not released. Somajee is killed. I reminded him of the terms of the treaty. He rose in revolt. Army was sent against him. Kanode, Alot and Deogad are captured.

---

**अ. नं. ५३७** **श्री**

ता. १० जून, इसवी सन १७९०

नारो यशवंत मुक्काम भुरागड नजीक संस्थान बांदे यांचे मातोश्री अहिल्याबाईंस पत्र विशेष. राजश्री बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद बुंदेले कालपी जवळ सात कोसांवर उरईस आहेत. इतके दिवस परस्परें बंधुत्वात द्वैत होते. सांप्रत ऐक्य झाले. सरदारांशीं व त्यांशीं चित्त शुद्ध केवळ नाही. याची कारणें अनेक आहेत. सारांश, त्यांजकडील दोष दिसण्यांत नाही. हे सरदार आहेत फौजबंद. यामुळें जें करतील तें खरें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 537 10-6-1790 A.D.

Naro Yeshwant writes to Ahilyabai from camp Bhuragad near Banda. Balajee Govind and his brother Gangadhar Govind have encamped at Urai near Kalpee. They are now united, but are not friendly with the Sardars.

---

**अ. नं. ५३८** **श्री**

ता. १४ जून, इसवी सन १७९०

गंगाजलनिर्मळ अहिल्याबाई होळकर यांसी स्नेहांकित बाळाजी जनार्दन आशीर्वाद विनंती उपरि. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष : टिपूचा व इंग्रजांचा तह होता त्यात किरीट रामराजा इंग्रजांचे पेट्यांतील. त्याशीं टिपूने लढाई सुरूं केली. इंग्रजांचे टिपूचे वांकड पडलें. यामुळें इंग्रज दोन वर्षे सरंजाम करीत आहेत. इंग्रज उघडे झाले आणि कलकत्याहून सरकारांत व नबाबास पत्रें लिहिली कीं, टिपूचा आमचा बिघाड झाला. आम्हीं आपले सरकारमसलतीवर मुतवजे केले. आपणास इत्तला असावा

याप्रमाणें पत्रें आली व त्यांचे वकील सरकारांत व नबाबाकडे आहेत त्यांसही त्यांची पत्रें आली. त्यावरून मालीट वकील सरकारांत आहे त्याने बोलणें लाविलें कीं, आम्ही टिपूवर मोहीम करितों. तुम्ही सामील असावें. त्यावरून दोनचार महिने भवती न भवती चालली. नबाबाकडे किनवी वकील आहे. तो त्यांशीं बोलू लागला कीं, तुम्ही मसलतीस शरीक असावें. याचा इतल्ला नबाबांनीं येथें लिहिला आणि लिहिलें कीं श्रीमंतांची आमची भेट व्हावी. भेटीनंतर कित्येक मसलतीच्या गोष्टी बोलण्यांत येतील. त्याचे उत्तर सिंहस्थाचें साल श्रीमंतांची प्रथम स्वारी याजकरितां मुहूर्त नाही. बाद बरसात. घडणें तसें घडेल. त्याप्रमाणे लिहिलें. नबाबाजवळ वकील आहे त्यानें नबाबाशीं बोलून त्यांस डेरेदाखल केलें. सरकारांत मालीटाचें बोलणें चाललेच होतें. त्यास सरकार व नबाब व इंग्रज त्रिवर्ग मिळोन टिपूवर मसलत करावी. त्यांत किल्ले कोट मुलूक वगैरे जे जे मिळेल तें त्रिवर्गानीं बराबर वाटून घ्यावे व तह करणें झाल्यास त्रिवर्गाचे विचारानें करावा. याप्रमाणें वगैरे कलमें ठरोन तहनामा ठरला. मसलत करावयाचा करार झाला. राजश्री परशरामपंत भाऊ यांजबरोबर पंचवीस हजार फौज व सात हजार गारद व दहा तोफा याप्रमाणें सरंजाम देऊन रवानगी केली. पुढें बरसात. पोक्त सरंजाम पाठवावा लागेल. सरकारांत ओढ हें आपणांस ठाऊक आहेच. मसलत करावयाचा नक्षा ठरला त्यापक्षीं मसलत करणें प्राप्त. टिपूचा तह राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांचे दरम्यान ठरला होता. त्यांत टिपूकडून कराराप्रमाणें अंमलात आलें नाहीं. कित्तूर सरकारचे महाल सरकारांत आले ते त्यानें माघारे घेतले. ते सोडले नाही. खंडणीचा पैका चौसाला राहिला. तोही पाठविला नाहीं. त्यापक्षीं करार कोठे राहिले? हा इतल्ला आपणांस विदित असावा म्हणोन लिहिलें असे. छ.३० रमजान बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंती. पैवस्त छ.११ सवाल मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 538 14-6-1790 A.D.

Balajee Janardan (Nana Fadnis) informs Ahilyabai of the tripartite treaty amongst the East India Comany, The Nawab and the Poona Court to go against Tipu. He further informs Ahilyabai that the treaty made with Tipu by Tukojeerao is not observed. A hint is given that Holkars will have to be ready with men and money.

---

**अ. नं. ५३९** **श्री**

ता. २५ जून, इसवी सन १७९०

नारो विश्वनाथ मुक्काम मथुरा यांचे अहिल्याबाईस पत्र विशेष. महाराजांपासून आज्ञा

मागून स्वार झालों ते मुक्काम मजकुरीं सुखरूप पोहचलों. श्रीमंत सुभेदारांची भेट झाली. साहेबांचे आज्ञेप्रमाणें यांसी बोलावयाचें तें बोललों. दोनचार रोज रात्रीस दोन दोन प्रहर बसून बोलावयाचे भाव बोललों. यांजकडील जाबसाल एक धन्याच्या पायाची निःकेवळ झाले. कल्पना काडीमात्र राहिली नाही. एका दोरोजा मी आज्ञा मागून सेवेसीं येतो. इकडील जाबसाल झाडून साहेबांकडेसच झाले. येथें कोणी कारभारसंबंधी राहिला नाही. परंतु खर्चास पाहिजे. मी सेवेसीं येईतोपावेतों थोडीबहुत तजवीज केल्यानें उत्तम आहे आणि मजलाही ढील न होतां मोठमोठ्या मजली करून पोहचतों. बहुत काय लिहिणें हे विनंती. पैवस्त छ.२९ सवाल. मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 539 25-6-1790 A.D.

Naro Vishwanath writes from Mathura to Ahilyabai : In obedience to you I have spoken freely and frequently to Subhedar Tukojeerao. There is none able enough to manage affairs here. Money is the cry of the day. I leave this place very soon."

---

**अ. नं. ५४०** **श्री**

ता. २६ जून, इसवी सन १७९०

पाराशर दादाजी यांचें अहिल्याबाईंस पत्र विशेष. मुलखी मिळकत व्हावी ते सोबत्याचे स्वाधीन. शहास तर गुंतणें प्राप्त याची आब राखणें महाराजांकडे. सारांश. ''दौलत मोठी सर्वांनीं मिळून जपावी. दौलत कायम त्यांत अवघ्यांचे कल्याण. सर्वांनीं आपआपलें सामर्थ्यानुरूप जपावें'' म्हणोन आज्ञा.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 540 26-6-1790 A.D.

Parashar Dadajee writes to Ahilyabai in reply to her letter. Acquisition of territory is dependent on the sweet will of our companion (Scindia) "To preserve past prestige and possession is the duty of every one" is your Highness'counsel deserving or obedience.

---

**अ. नं. ५४१** **श्री**

ता. २७ जून, इसवी सन १७९०

चिंतामण मोरेश्वर कमाविसदार पिढावे यांचें अहिल्याबाईंस पत्र. विशेष महालची लावणी करून लोकांस कमाईस लावून अखेर आषाढ सेवेसीं हिशेब घेऊन येतो. हिशेब घेऊन आल्यावर समक्ष सर्व महालचे वर्तमान श्रुत करीन. माझे वडिलांचा साठ वर्षे निर्वाह केला. त्यामागें आमचा सर्वस्वी निर्वाह करणार धनी समर्थ आहेत.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 541 27-6-1790 A.D.

The Kamavisdar of Pidhawa informs Ahilyabai that he will see her with account sheets very early. "The State has supported my father for sixty years". The same should continue in the future."

---

**अ. नं. ५४२** **श्री**

ता. १३ जुलाई, इसवी सन १७९०

तुकोजीराव होळकरांकडून काशीराव होळकरांस पत्र. विशेष. जें होणें ते मातुश्रींच्या विचारे होईल व तुम्हीही विनंती करणें कीं, आमची निष्ठा वडिलांचे चरणीं आहे. वडील येविषयींचा विचार करून निश्चयांत आणतील तेच होईल. वडिलांचे मर्जीखेरीज कोणतीही गोष्ट नाही. त्यापक्षीं संशय त्यांनीं चित्तांत आणूच नये. येविषयीं विनंती करणें. आपले घरचा विचार दुसरियास पुसावयाचे प्रयोजन नाही. मातुश्री विचारवंत. त्यांचे देखल्यांत केल्यांत आहे तें वरकडांचे ऐकल्यांत नाही. दौलत मार्तंडाचे प्रसादाची व वडिलांचे आशीर्वादाची आहे. वडिलांसारखे संरक्षक ते पुण्यवान आहेत. त्यापक्षीं कोणतेही संकट न पडतां व बहुत आयास न लागतां मातुश्री चित्तावर धरतील ते दिवशीं बंदोबस्त होईल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 542 13-7-1790 A.D.

Tukojeerao Holkar writes to Kashirao that he should resign his all to the will Ahilyabai. Her heart and her experience are very large. We should lookup to her, and of to her alone for all our welfare.

---

**अ. नं. ५४३** **श्री**

ता. १४ जुलाई, इसवी सन १७९०

हरीपंत फडक्यांचें अहिल्याबाईंस पत्र छ १६ जिल्हेज. विशेष लोकमत असें आहे कीं, आपले घरचे रोजगार म्हणजे वतन असें लोकमत झालें आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 543 14-7-1790 A.D.

Haripant Phadke compliments Ahilyabai for her patriarchal rule in-as-much-as it has become a common belief that service under Her Highness is a hereditary gift.

---

**अ. नं. ५४४** **श्री**

ता. १७ जुलाई, इसवी सन १७९०

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांस. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित अहिल्याबाई होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत असलें पाहिजे. विशेष. आपण छ ३० रमजानचें पत्र पाठविलें ते छ १५ सवालीं पावून लेखनार्थ अवगत झाला. टिपूचा व इंग्रंजांचा तह होता त्यांत किरीट रामराजा इंग्रजांचे गोट्यांतील. त्याशीं टिपूनें लढाई सुरू केली त्यामुळें इंग्रजांचे त्याचे वाकडें पडलें. याजकरितां इंग्रज दोन वर्षे सरंजाम करीत आहेत म्हणोन विस्तारें आलें. ऐसियास. टिपूचा व इंग्रजांचा तह असतां इंग्रजांचे पेट्यांतील किरीट रामराजा याशीं लढाई सुरू केली तेव्हां इंग्रजांस किरीट राजाचा पक्ष करणें प्राप्त. तेपक्षीं बिघाड अर्थातच आला. तथापि टिपूशीं बिघाड करणें तेव्हां श्रीमंत व नबाब अनुकूल करून घेतल्याखेरीज मसलत शेवटास जाणार नाही ऐसे समजून दोहीकडे बोलणें लाविले. त्यांतून नबाबाकडून श्रीमंतांचे भेटीचा संदर्भ आला. परंतु सिंहस्थामुळें प्रथमस्वारी महकूब केली. हे गोष्ट उचित आहे. नबाबांनीं सरकारांत इतल्ला देऊन डेरेदाखल जाले. त्याचा व सरकारचा दुसरा अर्थ नाही तेव्हां त्यांनीं जे केलें त्यास आपणही अनुकूल असावें. त्यांत इंग्रजाचेंही बोलणें सरकारांत होऊन तहनामा ठरला. टिपूकडोनही सरकारचे तहाप्रमाणें अंमलात न आलें. तेव्हां मसलत करावयाचा निश्चिय ठरविला. उत्तम आहे. चि. राजश्री तुकबाचे विद्यमानें टिपूचा तह ठरला असतां त्यांजकडून कराराप्रमाणें अंमलात न आले येविषयीं चिरंजीवास लिहिलेंच असेल व हल्लींही मसलतीचा विचार ठरला हेही वर्तमान चिरंजीवाकडे व राजश्री महादजी शिंदे यांस लिहिलेंच असेल. सारांश, सरकारचे करण्यास चांगले स्नेहाचे रीतीस विरुद्ध न दिसे, वचनाची प्रमाणिकता राहून ज्यात सरकार किफायत तेच आपण करतील. रवाना छ ४ जिल्काद बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 544 17-7-1790 A.D.

Ahilyabai acknowledges receipt of Nana's letter dated 14-6-1790. In reply she writes that similar letters must have already been despatched to Tukojeerao Holkar and Mahadajee Scindia. She expresses her confidence that the interests of the Sarkar will be upheld as well, as relations of friendship and adherence to past treaties.

---

**अ. नं. ५४५** **श्री**

ता. ११ आगस्ट, इसवी सन १७९०

तुकोजीराव होळकरांकडून अहिल्याबाईंस पत्र. विशेष. राजश्री येसो अंबाजी पूर्वीपासोन पदरचे. उपजीवका सांप्रत नाही. मुलें माणसें अंबाडीं आहेत. त्यांचा कालक्षेप चालला पाहिजे. वडिली परगणे अंबाडे येथील मामलेदारास लिहून दोन तीन गांवचें ठाणेदारीचें काम मशारनिल्हेस सांगितल्यास कालक्षेप चालेल, अशी योजना करून देविली पाहिजे. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 545 11-8-1790 A.D.

Tukojeerao Holkar requests Ahilyabai to bestow Thanedarship of two or three villages through the Mamlatdar of Ambad on Ambajee who is an old hereditary protege of the Sarkar, and who has no occupation at present.

---

**अ. नं. ५४६** **श्री**

ता. १३ आगस्ट, इसवी सन १७९०

खंडो बाबुराव यांजकडून मातोश्री अहिल्याबाई यांस पत्र. विशेष. साहेबीं आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. पत्रीं आज्ञा कीं, चिरंजीव राजश्री तुकोबा मोहिमसीर, सरकारांत ऐवजाची ओढ, फौजेच्या खर्चाकरिता चिरंजीवांनीं रा. बळवंतराव गोविंद वाकडे यांजपासून कर्जाऊ ऐवज घेऊन देशच्या महालांवर वराता करून दिल्या आणि त्या भरण्यांत परगणे मजकुरची रसद दोन लक्ष रुपये धरले आहेत. लष्करांत मामलेदारांची बोलणी लागली त्यांत दोन लक्ष रुपये रसद द्यावी. महालचा मक्ता आहे त्याप्रमाणें देऊन रयत राजी राखावी

याप्रमाणें बोलण्यांत येऊन पत्रें इकडे पाठविली त्याअन्वयें करावे, परंतु तुम्ही पूर्वीपासून सरकारच्या पदरचे ठरल्यांत आल्याप्रमाणें तिन्ही जाबसाल तुम्हांकडून घडल्यास मामलत तुमची तुम्हांकडे ठेवावी. इंदुरींहून रा. त्रिंबक बाबुराव यांची दोन वेळां पत्रें आली व रा. महादाजी गंगाधर यांनीं तीनही जाबसाल कबूल करून बारावे दिवशीं तुमचा जाब आणून द्यावा असे करारांत आणिले. त्यावरून हें पत्र तुम्हांस सादर केले असे. तर सदरहू तीनही जाबसाल बारावें दिवशीं देऊन पोहचें, असें करणें व रयत राजी राखून मक्त्याप्रमाणें जमा द्यावी म्हणून पत्रीं आज्ञा, त्यास साहेबांचे आज्ञेप्रमाणें तीनही कलमें मान्य आहेत. आज्ञेस किमपी उजर करणार नाही. पहिल्यापासूनही हेच रीत आमची कीं ''*स्वामी कार्ये गतः प्राण अंते तिष्ठती माधवः*'' हा अर्थ पूर्वीपासून आमच्या वर्तुणुकीची रीत साहेब पुरतेपणीं जाणतात. प्राण गेला तर सुखानें जावो, परंतु आज्ञा मान्य करणें प्राप्त झालें, याअर्थी साहेबीहि कृपाच करीत आले आणि पुढेंहि साहेब कृपा करतील हा भरंवसा आहे. तीनही कलमें आमच्या केल्यानें होतील त्याचे दुर्घट नाहीं, परंतु प्राणाची गोष्ट दुर्घट आहे. तो देखील साहेबांच्या चरणारविंदीं अर्पण आहे. आमची परीक्षा सहस्त्र वेळीं साहेबीं घेतली आहे. तेथें विस्तारें काय लिहावें? साहेबांच्या मर्जीस येईल त्याप्रमाणें सर्व गोष्टी मान्य आहेत, परंतु अब्रु साहेबीं रक्षण करावी. येविषयीं दोहरा आहे तो साहेबांस विदितच आहे. तो दोहरा साहेब वारंवार आम्हापासून म्हणवीत असतात. याअर्थी आम्ही जाणतों कीं, आमचे देहांत प्राण आहेत तोंपावेतों साहेब आमचे संरक्षण करतील. साहेबांचे चरणारविंदीं आमचा जन्मच गेला, आतां साहेब अंतर कसे देतील? आणि आमचा निश्चय आज्ञा मान्य करणेचा, याअर्थीं श्रावण शु.१० च्या मुहूर्तें येथून निघून चरणापाशीं आलोंच जाणावें. साहेबीं पत्रीं आज्ञा महादाजीपंतांस केली कीं, बारावें रोजीं जाब आणून द्यावा. त्यास त्यांनीं कासीद वायद्याचा रवाना केला. परंतु प्रजन्यकाल, नदी नाले भारी, यामुळें कासीद नववें दिवशीं दाखल झाला. तत्क्षणींच उत्तर देऊन कासीद सेवेसीं रवाना केला. आतांही कासीदास इनाम देऊं केले आणि सांगितलें कीं, सहावें सातवें रोजीं जरूर पोहचणें. यावर नदीनाले, पर्जन्यकाल आहे, अटकाव झाल्यास त्याचाही उपाय नाही. साहेब सर्व जाणत आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ १६ जिल्हेज सन १२०० मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 546 13-8-1790 A.D.

Khando Baburao writes to Ahilyabai that he fully subscribes to the three conditabtions laid down for the Mamlat of Indore. The agreement is sent with a messenger. The days are rainy: the road is interspersed by rivers and rivulets. Delay, it is prayed, be excused.

**अ. नं. ५४७** **श्री**

ता. २२ आगस्ट, इसवी सन १७९०

महादाजी कोन्हेर ठाणे सिंदखेड यांचे पत्र श्रावण शुद्ध १३ चे अहिल्याबाईंस विशेष. या प्रांतीं राजश्री आनंदराव होळकर येणार म्हणोन ऐकतो. त्यास महाराजांनीं पत्र पाठवावें म्हणजे प्रांत मजकुरास कोणे गोष्टीचा उपद्रव होणार नाही. पेशजी श्रीमंत राजश्री मल्हारराव होळकर यांची स्वारी मालपुरास आली होती. महाराजांचे पत्र होते तेणेंकरून उपद्रव न झाला म्हणोन हल्लींही पत्र कृपा करून पाठवावें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 547 22-8-1790 A.D.

Mahadajee Konher from Sindkhed requests Ahilyabai to favour the Thana with a protection-note addressed to Anandrao Holkar who was expected to pass by it. Her Highness' previous note protected the place at the time of Malharrao Holkar's visit.

---

**अ. नं. ५४८** **श्री**

ता. २८ आगस्ट, इ. स. १७९०

गंगाजळनिर्मळ अहिल्याबाई होळकर यांसी स्नेहांकित हरी बल्लाळ आशीर्वाद विनंती उपरि. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे. विशेष. गणपतराव आबा गद्रे यांजकडे प्रगणे रामपुरा येथील मामलत आपण सांगितली. पहिले फाजील असतां आपण रसद मागीतली त्याप्रमाणें देऊन मामलेदार महाली पाठविला. महालचा मक्ता ठराऊन दिला असतां कृष्णाजी सदाशिव चांदोरकर यानीं २५००० पंचवीस हजार जास्ती कबूल केलेमुळें मामलत काढून चांदोरकर यांस सांगितली. रसदेचा ऐवज तसाच राहिला. याची वाट जाली नाहीं. पहिला लढा चांदोरकरांकडे गणतराव यांचा. जाबसाल नाहीं आणि त्यांनीं चढ कबूल केली म्हणून त्यास मामलत सांगितली, इतकेंही असोन याचे ऐवजाचा फडशा नाहीं म्हणोन कळलें. त्यास ही सारीच गोष्ट अपूर्व वाटली. कशी म्हणाल तर कैलासवासी विष्णुपंतबाबा आपले पदरचे त्यांचे पुत्र गणपतराव त्यांजकडे मामलत सांगितली फिरोन काढिली तेव्हां यांस वडील कोण? वडील आपण, याचा बंदोबस्त आपण करून द्यावा. दुसरीकडून वांकडें पडूं लागलें तर आपण नीट करून द्यावें असे असतां मामलत काढली; पैका दिला नाही हीच गोष्ट आश्चर्याची. याची फिर्याद कोणाजवळ सांगावी? आम्हांजवळ गणपतराव फार श्रमीं जालें कीं, बाई वडील असतां अशी गोष्ट जाली. त्यांस आम्ही बहुत प्रकारें समाधान करून सांगितलें कीं बाईस वडील म्हणतां त्याअर्थी ''बाई तुमचे वाईट करणार नाहींत.

ज्यांत हीत तीच गोष्ट करतील. मी बाईंस पत्र लिहितों तुमचा पैका देववितो.'' त्यावरून आपणास लिहिलें आहे. त्यास गणपतराव आपले कुटुंबातील. यांची मामलत काढली. हिंदुस्थानांत लौकिक जाहला हा आपला कीं यांचा? जेव्हां विष्णुपंतबाबांचे पाठीमागें आपण वडील तेव्हां वाईट आपणास म्हणतील यांस वाईट कोणी म्हणणार नाहीं येविषयीं रा. दादाजी यांजवळ बोललो आहो. ते आपणांस लिहितील, आपले घरचा रोजगार म्हणजे वेतन असें लौकिकांत आहे. त्यांत हे तर पिढीजाद वतनदार तेव्हां ह्यांचे वाईट आपण कसें करतील? यांचे पैक्याचा फडशा करावा. हे आपल्याखेरीज नाहींत. हे चित्तांत पूर्णपणे असावें. येविशीं श्रीमंत नानांनीं आपणास लिहिलें आहे. त्यांस पैक्याची ओढ आहे. ज्यांत यांचा चांगला लौकिक. लोक आपणास म्हणतात कीं बाई वडीलपणें समाचार घेऊन चालवितात. उत्तर यावें रवाना छ १६ जिल्हेज बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती. पैवस्त छ १ मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 548 28-8-1790 A.D.

Haripant Phadke appeals to Ahilyabai on behalf of Ganpatrao Gadre who had to relinquish the Mamlat of Rampura in favour of Chandorkar for no fault on his part.

---

**अ. नं. ५४९** **श्री**

ता. १० सप्टेंबर, इसवी सन १७९०

बापू होळकर यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. विशेष. मारवाड प्रांतींचीं ठाणीं सुटलीं. तेथें त्यांजकडील व आपलेकडील कारकून जावे त्यास त्यांनीं गोपाळ रघुनाथ निसबत शिंदे सांगून पाठविलें कीं, मारवाड आमचे वाटणीचें आहे तेथें तुम्हाकडील कारकून जाणार नाहीं. आम्हीच आपलें पाहून घेऊं, त्यावर आम्ही त्यांजला सांगून पाठविले कीं, मारवाड तुमचे वाटणीचें तसेच जयपूर आमचे वाटणीचें. तेथें तुम्ही कारकून पाठवावयाचे कारण काय? त्याचें उत्तर त्यांनीं केलें कीं, जयपुरात आमचा वाटा नाही हें खरें, परंतु श्रीमंतांचा हिस्सा समजोन घेणेंकरितां कारकून पाठविला असे. त्याचें उत्तर आल्यावर आम्हासही उदंड सुचले. परंतु येथें याशीं बोलून फळ काय? सविस्तर वर्तमान तीर्थस्वरूपांस कळविलें आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 549 10-9-1790 A.D.

Bapu Holkar to Ahilyabai : Marwad is conquered; it is now a possession of both (Holkar and Scindia). Scindia's men objected to our

sending our men, saying Marwad was their individual share; we turned the tables by quoting Jeypore case. In short, it is waste of words and nothing more. The whole case is submitted to Tukojeerao.

---

**अ. नं. ५५०** **श्री**

ता. १७ सप्टेंबर, इसवी सन १७९०

माधवराव लक्ष्मण वकील हैद्राबाद. यांजकडून मातोश्री अहिल्याबाई होळकर यांस पत्र. विशेष. प्रस्तुत शिंदे बहादूर यांचे लिहिणें ते नबाबास बहुत मान्य आहे. कारण जे सर्व बादशाही हुकूम, शिक्का, मोहर, शिंदेबहादर यांचे स्वाधीन आहे. तेव्हां थोडक्या बाबतीकरितां नाहक विषमता पाटीलबाबांचे चित्तांत न यावी हा विचार ध्यानांत ठेऊन जें तें (शिंदे) लिहितात तें यांजला मान्य करणें प्राप्त आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 550 17-9-1790 A.D.

The Hyderabad ambassador informs Ahilyabai of the great influence Scindia wields at that court in as much as the latter holds the Imperial seal in his hands and proclaims all Imperial orders.

---

**अ. नं. ५५१** **श्री**

ता. २७ सप्टेंबर, इसवी सन १७९०

बाळाजी लक्ष्मण कमाविसदार चांदवड यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. भाद्रपद वद्य ४ विशेष. काल बुधवारीं प्रातःकाळीं श्रीमंत बाबा मल्हारराव होळकर व आनंदराव होळकर यांच्यात मुठभीड लढाई झाली. पुढें न कळे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 551 27-9-1790 A.D.

The Kamavisdar of Chandwad informs Ahilyabai of the hand-to hand-fight that took place between Malharrao and Anandrao Holkar.

---

**अ. नं. ५५२** **श्री**

ता. ७ आक्टोबर, इसवी सन १७९०

यशवंतराव गंगाधर यांजकडून पत्र मातोश्री अहिल्याबाई होळकर यांस. विशेष. गणपतराव आबा गद्रे यांजपाशीं साहेबीं ऐवज मागितला व तितका त्यांनीं दिल्यावरून त्याजवर कृपा करून परगणे रामपुऱ्याची मामलत सांगितली. त्याजवर मर्जीप्रमाणें त्यांनीं मक्ताही ठरवून घेतला, असे असतां साहेबीं मामलत काढून घेतली. याजबद्दल श्रीमंत नानांनीं व हरीपंत तात्यांनीं आपल्यास लिहावयास सांगितलें कीं, त्यांचे मर्जीस आले तें खरें. यांचे ऐवजाचा तर निकाल करून द्यावा. यावर इतकी अवकृपा करावी असें नाही, वडिलांपासून हे पदरचे आहेत. म्हणोन लिहावयास सांगून त्यांनीं ही पत्रें सेवेसीं लिहिली आहेत, त्याजवरून सर्व ध्यानांत येईल. आबा वडिलांपासोन साहेबांचे यांजवर सर्व प्रकारें कृपा करून ऐवजाचा निकाल होऊन येईल तो अर्थ करणार खावंद सर्वज्ञ आहेत. सेवकानें लिहावें असें नाही. यांचे ऐवजाची व्यवस्था आणि घोडीं उपाशी मरतात यांची सोय इतकी गोष्ट साहेबानीं कृपा करून देववावी. मामलतीचा विषय आपण कृपावंत होतील ते दिवशीं करून द्यावयास अगाध काय आहे? सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ १४ रविलाखर सन १२०० मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 552 7-10-1790 A.D.

Yeshwant Gangadhar to Ahilyabai : He pleads the cause of Ganpatrao Gadre and says that Nana Fadnis and Haripant Phadke also join in his request. Gadre's men and horses are starving. His amount should be returned to him.

---

**अ. नं. ५५३** **श्री**

ता. १० आक्टोबर, इ. स. १७९०

बापू होळकर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र विशेष. पाटणावर व मेडत्यावर एकूण दोन लढाया मातब्बर झाल्या. मधी सागर व गांवखेडी. गढ्यांची वाटणी जागजागीं घेतली. त्यात कोठें आम्हांस दाखला न देतां दरोबस्त वस्तभाव वगैरे तुम्ही नेली. ते समयीं आम्ही वाटणीचा जाबसाल बोलत गेलों, त्याचे उत्तर तुम्ही करीत गेला कीं, वस्तभाव मथुरेस पाठऊं. वाटणीचा वगैरे जाबसाल होणें तो तेथील तेथें होऊन येईल. याप्रमाणें तोंडानें बोलत गेलो. परंतु एक महिना जाबसाल उगवून झाला. त्यास लढाईत आम्ही बरोबरीनें उभे राहून घोडीं माणसें मारावी आणि लूट आवघी तुम्ही न्यावी असे होऊं लागले. तेव्हां आमचेपुढें यावयाचे कारण काय? मथुरेस पाटीलबाबांस लिहून पाठविलें. ते तीर्थस्वरूपांशीं बोलून

तीर्थस्वरूपाचें पत्र आम्हांस येईल तेव्हां कूच करून येऊं म्हणोन याप्रमाणें त्यांशीं बोलावे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 553 10-10-1790 A.D.

Bapu Holkar to Ahilyabai : Two brilliant victories have been achieved at Patan and Medatha. Whatever was obtained was not partitioned. It was said that all this would be done at Mathura. This dispute is reported to Mahadajee Scindia. I am awaiting his reply.

---

**अ. नं. ५५४** **श्री**

ता. १९ आक्टोबर, इसवी सन १७९०

गंगाजळनिर्मळ अहिल्याबाई होळकर यांसी स्नेहांकित बाळाजी जनार्दन (नाना फडणीस) आशीर्वाद विनंती. उपरि येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावें. विशेष. आपण छ १७ जिल्हेजचें पत्र पाठविलें ते पावलें. दोन्ही दौलतीची ऐक्यता असल्यानें सरकार चाकरी घडते, शत्रूवर जरब राहून, लौकिकांत व मागील रीतीभातीस चांगलें, हें समजोन राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांचे इकडे येणें घडावे, येविसीं त्यांस व आपणांस किती पत्रें पाठविली. त्यावरून राजश्री अलीबहादुर सुद्धां सुभेदारांची रवानगी केली ते सोबतियास सामील जाले. वाटणीचे जाबसाल वगैरे पूर्वीपासोन रीति चालत आल्या त्याप्रमाणें चालतील. येविसीं सोबत्याचीं पत्रेंही आली व रा. आबाजी रघुनाथ चिटणीस यांनींही खातरजमा केली. परंतु त्याप्रमाणें अंमलात न आलें. राजश्री काशीराव होळकर यांची रवानगी इस्माईल बेगावर केली. कामकाजही जालें. इस्माईल बेगाची लूट आली त्याची वाटणी व्हावी ते न जाली. इकडे आल्यावर उस्तवारी होईल, असें होतें. परंतु तें न घडतां भाऊपणांत अंतर दाखवितात. यामुळें तुकोजीबाबांची पत्रें बहुत उदासपणें घेतात. कारभारी सोबत्याचे मायेंत शिरले, येविशीं परभारें परभारें आपलेकडेही पत्रें देऊन वर्तमान कळले असेल. इकडे वारंवार पत्रें येतात. त्यांतील भाव आपणास समजावे याअर्थी लिहिलें आहे. आपण मनन करून ज्यांत दौलतीचा आबताब राहील असें उत्तर यावें. सर्व भरंवसा आपला आहे म्हणोन व देशच्या मामलतीचा मजकूर लिहिला तो सविस्तर कळला व राजश्री यशवंत गंगाधर यांचे पत्रीं कारभारी प्रकरणीं व देशचे मामलती प्रकरणीं मजकूर लिहिला तो सर्व कळला. त्यास सुभेदार येथून गेल्यावर रा. पाटीलबाबांची भेट झाल्यापासून आजपर्यंत जें होत गेलें तें सविस्तर लिहून वरचेवर पत्रें येत गेली व त्यांचीं उत्तरेंही येथून उभयतांनी एकविचारें चालून सरकार कामें करावी म्हणोन व वाटणीच्या वगैरे चाली पूर्वीपासून चालत आल्याप्रमाणें उभयपक्षीं चालावें याप्रमाणेंच गेली. इस्माईल बेगचे लुटीची वाटणी

दिली नाही येविषयीं सुभेदारांची पत्रें आली होती. हल्लीं आपणास लिहिले पर्याय त्यांत कारभारीयाचे ठीक नाहीं येविसीं येथेंही लिहिलें होतें. त्याचे उत्तर ज्यांत सरदारीचे स्वरूप राहील असें करावें, आपणही सुभेदारांस व नारो गणेश यांस वडीलपणे लिहावें कीं, उभयतां विरूद्ध असू नये. चांगलें चालावें, या अन्वयें लिहावें. कारभारियाने एकनिष्ठेनें चालावे हे चांगले. देशच्या मामलत प्रकरणीं लिहिले त्यास सुभेदारानीं लिहिलेंप्रमाणें आपण वहिवाट करावी. ज्याकडेस तफावत निघेल त्यांची चौकशी करावी. आपण वहिवाट करून खर्चाची सरबराई करावी. हे आपणांस उचित आहे. रा छ १० सफर बहुत काय लिहिणें लोभ असे दीजे हे विनंती. पैवस्त छ २४ सफर मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 554 19-10-1790 A.D.

Balajee Janardan (Nana Fadnis) writes to Ahilyabai in reply to her letters : He admits all her statements and says he has replied in proper quarters; he now advises Ahilyabai to use her own influence to bring about reconciliation between Tukojeerao and his Karbhari.

---

**अ. नं. ५५५** **श्री**

ता. ३०-१०-१७९०

तुकोजीराव होळकर यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. विशेष. चिरंजीव धोंडिबा फणसे यांसी समाधान वाटत नाही, येविषयीचें वर्तमान वडिलांचे लिहिण्यांत व आणखीन कोणाचे लिहिण्यांत न आलें. परस्परें मात्र ऐकिलें त्यावरून चिंता प्राप्त झाली म्हणोन अगोदर सेवेसीं लिहिलें आहे व हल्लींही लेखन केलें असे तरी चिरंजीवास समाधान नसल्यास वडिलीं औषधोपचार इत्यादि दैवी, मानवी उपाय करून लौकर आरोग्य होय तें करून संतोषाचे वृत्त इकडे लिहावयाची आज्ञा केली पाहिजे. मिती आश्विन वद्य ७ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ ११ रविलावल मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 555 30-10-1790 A.D.

Tukojeerao inquires with Ahilyabai about the health of Dhondiba Phanse (her grandson).

---

अ. नं. ५५६ श्री

ता. ३१-१०-१७९०

यशवंतराव गंगाधर पुणें यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. विशेष. येथून लष्करांत ज्याचे त्यापरी निषेध करून उभयतांनीं एक विचारें राहून ज्यात दौलतीचे स्वरूप आणि सरकार चाकरी घडे व भाऊपणांत यथास्थित ऐशा अन्वयें पत्रें पाठविली होती. परंतु हे न घडतां त्यांनीं दिवाणगिरीचें निशाण मनाकरून त्यावर चौकी बसविली. पंचपहाडीं जप्ती पाठविली हें वृत्त तुम्हास व बाळाजीपंत नानांस कळावे म्हणोन विस्तारें मजकूर लिहिला तो सर्व ध्यानास येऊन आज्ञेप्रमाणें नानांस पत्रें देऊन लिहिल्याअन्वयें विनंती केली, उत्तरें द्यावयास ८-४ दिवस लागतील. श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ ७ रविलावल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 556 31-10-1790 A.D.

Yeshwant Gangadhar from Poona to Ahilyabai: Letters to bring about reconciliation are sent from here to the camp, but to no avail. The Diwangiri flag is kept under watch and ward. Nana's reply will shortly reach to you.

---

अ. नं. ५५७ श्री

ता. ५-११-१७९०

आनंदराव होळकरांचे अहिल्याबाईंस पत्र. छ २६ माहेरम सन १२०० फसलीस माझी व मल्हाररावांची लढाई जाली, पुढें काय आज्ञा. अधिक आगळीक गोष्ट करून बंदोबस्त केल्यास महाराज रागें भरतील.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 557 5-11-1790 A.D.

Anandrao Holkar informs Ahilyabai of the fight that ensued between himself and Malharrao. He awaits her orders for the future conduct.

---

अ. नं. ५५८ श्री

ता. ५ नोव्हेंबर, इसवी सन १७९०

बापू होळकरांकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष. मेडत्यावर लढाई जाल्यावर मजकूर होत गेला त्याप्रमाणें वडिलांस लिहीत गेलो. सोबत्याकडील कारभारी येथें आहेत. त्यांजकडे राजाचे वकील येऊन सल्ल्याचें बोलणें परभारें लागलें आहे. इतर कोणास ते पुसत नाही. सल्ला अगर जाबसाल ठरणें तो उभयतांचे विचारें ठरावा हे पूर्वीपासून चाल चालत आली असतां अलीकडे रीतिभातीची एकही गोष्ट न ठेवितां जो जाबसाल करणें तो तेच करितात. कारभारीस मुख्य आज्ञा येती त्याप्रमाणें वर्तणूक करितात. दोन लढाया मोडून भगवंताने यश दिलें. आता राजाकडून वकील येऊन सल्ल्याचें बोलणें लागलें तेव्हां वाजवी जाबसाल विल्हेस लावावे तें न करितां नाना प्रकारचे अटीचे जाबसाल घालितात तेव्हां निश्चियांत गोष्ट कशी येती? प्रस्तुत राजापाशीं जोधपुरी व नागोरी मिळून पायदळसुद्धां पन्नास हजार फौजेचा जमाव आहे. अवघे रजपुतांचे बोलणें राजाशीं हेंच आहे कीं, एक वेळ लढाई घेऊन मग करणें ते करावें. राजाचें मानस सोईनें जाबसाल जाल्यास करावा. जाबसाल नच ठरल्यास लढाई करावी. मेडत्यावर दहावीस हजार राठोड वगैरे जमा झाले होते. त्यांत लढाईचे अगोदर कांहीं गेले बाकी दहा-पांच हजार राहिले होते. त्यांनीं तोफांचा मार चुकवून फौजेवर चालून घेतलें. तेव्हां कोणतीही बाकी ठेविली नव्हती. परंतु ते समयीं श्री मार्तंडानेच यश दिले. आतां तर अधिक जमाव जाला आहे आणि त्यांचे जिवावरच येऊन बेतलीं तेव्हां तेही मरणास उदीत झाले. जिकर करावयास कमी करणार नाहींत. मग यश अपयश भगवंतास्वाधीन आहे. मागेंही असे प्रसंग घडत आले. परंतु हे संस्थान रक्षूनच जे गोष्ट होणें ती होत आली. आतांचा प्रकारच वेगळा जाला आहे. राजापासीं पायदळ पन्नास हजार जमावाजमव होऊन पुढें दिवसेंदिवस जमेत मिळतच आहेत. मेणे व गव्हर हेही डोंगराचे आश्रयाने जमा होत आहेत. ते किती आहेत याचा सुमार लागत नाही. कहींतून घोडीं, उंट वगैरे काढून नेतात, उपद्रव देतात. रसद भिलाडेहून मागवावी लागती. सोबत जाप्ता पेंढारी, सरंजामी पाठविले तेव्हां रसद आली. महर्गता होऊन पावणेतीन पायलीची धारण जाली आहे. पुढें अवघड पडेल. सोबत्याकडील कारभारी फौजेसुद्धां मेडत्यापासोन तीन कोसांवर पुढें आहे. तेथील सावकार व रयत नागवून मनमानेसा पैका घेतात. पाटणचे लढाईपासोन जी लूट आली तीही त्यांनीं घेतली. तरी तूर्तचे काळीं त्यांना अवघड काय? वाटणीचा मजकूर वडिलांस कळविला त्यावरून ध्यानास आलेच असेल. अलीबहादराकडील फौज होती ती माघारी त्यांनीं बोलावून घेतली. पुष्करापावेतों गेली. सोबत्याकडील कारभारी मेडत्याहून कूच करून गेले व आम्ही मागें राहिलों. राजाचे मानस जाबसाल करणें तो होळकरांचे विद्यमानें करावा. सोबत्याचे मतें आपला आपणच जाबसाल उगवावा. मथुरेहून आल्यापासून आजपावेतों रसदेचा पैका खाऊन लढाया घेऊन माणसें मारविलीं परंतु हे गोष्ट त्यांचे ध्यानींही नाही. महाल सुटेल तो त्यांनींच घ्यावा. लूट मिळेल ती ही घ्यावी. तेव्हां येथें राहून लाभ काय? जास्त लेकरानीं काय लिहावें?

**सरकारी रेकॉर्ड**

No. 558 5-11-1790 A.D.

Bapu Holkar to Ahilyabai : We together won two victories; the old practice of equal division of booty is given up; and everything is being managed by Scindia alone. We are thus put in a very straitened and awkward position.

---

अ. नं. ५५९ **श्री**

ता. १७-११-१७९०

तुकोजीराव होळकरांकडून बाळाजीपंत नानांस पत्र विशेष. चिरंजीव रा. मल्हारराव होळकर यांनीं महेश्वरीहून जाऊन खानदेश व देशचे महाली बखेडा केला आहे. यास्तव चिरंजीवाकडे कोणी पाठवून ज्यात त्यांचे येणें इकडे होय अशी योजना घडण्यांत यावी. येविषयीं अगोदर एकदोनवेळां आपणांस लिहिलें आहे. परंतु ते गोष्ट न घडतां चिरंजीवानें आपणास लिहून महाल तोडून घेऊन अलाहिदा सरकारचाकरी करावी असा बेत आरंभिला आहे. आपणाकडून रुकार जाला म्हणोन ऐकण्यांत आले. ऐसियासीं आम्ही मोहीमवर. सदर समयीं चिरंजीवानें एखादे काम करून स्वरूप दाखवावे ते गोष्ट एकीकडे राहून मूर्खत्वे घरचेच महालांत बखेडा करून तेथील ऐवज वसूलांत आणून जमेत धरून राजश्री आनंदराव होळकर येथून आणणेकरितां पाठविले आहेत, त्यांसी एक लढाई घेऊन पुन्हा मुस्तेद आहेत. या वेळेस त्याजला सरकारांतून जरब बसवून चार माणसें लहान सहान समीप आहेत त्यांचे पारिपत्य होऊन चिरंजीवाचे येणें इकडे जाल्यास उत्तम आहे. याजकरितां हे पत्र आपणास लेखन केलें असे. तरी आपण चिरंजीवाकडे कोणी शहाणा माणूस पाठवून जरबेची पत्रें जाऊन त्यांजकडून कोणी बोलायासी आले असतील त्याजला शिक्षायुक्त सांगणें ते सांगोन जेणेंकरून आनंदरावसमागमें त्याचें येणें होय तो अर्थ केला पाहिजे. सारांश, बखेडा अतिशय लांबून नुकसानीचा अर्थ घडला आहे याचा बंदोबस्त आपल्या केल्यानें सहजांत घडेल. रवाना छ ९ रविलावल बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती. मोर्तबसुद.

| |
|---|
| श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर<br>मल्हारजी सुत तुकोजी होळकर |

**सरकारी रेकॉर्ड**

No. 559 17-11-1790 A.D.

Tukojeerao Holkar writes to Nana Fadnavis to use his influence over

Malharrao (Tukojeerao's son) who has been going astray for a long time.

---

**अ. नं. ५६०** **श्री**

ता. २५ नोव्हेंबर, इसवी सन १७९०

काशीराव होळकर यांजकडून पत्र मातोश्री अहिल्याबाईंस. विशेष. वडिलीं छ ८ रविलावलचें पत्र पाठविले ते छ १६ रोजीं पावलें. चिरंजीव धोंडिबा फणसे याचे शरीरास रोगाचा उद्भव दोन तीन वर्षे जाहला परंतु त्याने समजूं न देतां उभाउभीच दिवस काढले. चार पांच महिने केवळ निजून राहिला. औषधी उपाय दैवी मानवी करावयाचे ते केले परंतु गुणावह न होतां कार्तिक शुद्ध ९ इंदुवारीं निधन पावले. उभयतां स्त्रियांनीं सहगमन केलें. हे ऐकून चित्तास बहुत खेद जाहला. ईश्वरें चिरंजीवांवर क्षोभ केला. कांहीं उचित न केले. वडिलांस दुःखाचे पर्वतच जाले. याचा विसर पडेल असें नाही परंतु वडिलीं धैर्य करून चित्ताचे शांतवन करून तीर्थस्वरूप मातोश्री ताईचें समाधान वारंवार होत असावे. मिती कार्तिक वद्य ४ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ १ रविलाखर मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 560 25-11-1790 A.D.

Kashirao Holkar writes a condolence letter to Ahilyabai on the death of Dhondiba Phanse.

---

**अ. नं. ५६१** **श्री**

ता. २७-११-१७९०

शेख शरीफभाईचे मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. मुक्काम कृष्णगडाहून. विशेष. महाराजांकडून अलीकडे पत्र येऊन सांभाळ होत नाही तर बहुत चिंता लागली आहे. त्यास हमेशा पत्र पाठवून संतोषवित असलें पाहिजें. दुसरें राजश्री धोंडिबा यांजला देवआज्ञा झाली म्हणोन ऐकिलें. त्यास बहुत खेद वाटला. त्यास पूर्वीचेही दुःख व त्यात आणखीही जाले. ईश्वरगतीस उपाय काय? देव जैसे ठेवील तैसे राहणें प्राप्त. आपण खेद न करावा. शरीरही चाललें पाहिजें. आपण धैर्यवानच आहांत. मी लिहावें ऐसा अर्थ नाहीं. दुसरें वर्तमानः मेडत्याहून कूच करून माघारी मुक्काम मजकुरीं आलों. पुढें जे वर्तमान होईल ते सेवेसीं लिहून पाठवीन. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 561 27-11-1790 A.D.

Shariffbhai's letter of condolence to Ahilyabai: says that from Medhta he has come to Krishnagad.

---

**अ. नं. ५६२** **श्री**

ता. २८-११-१७९०

मल्हारराव होळकरांकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. कार्तिक वद्य ७ मुक्काम प्रांत चांदवड येथें वडिलांचे आशीर्वादिकरून सुखरूप असो विशेष. चिरंजीव धोंडिबा फणसे यांचे शरीर रोगग्रस्त दोन-तीन वर्षांपासून होते. अलीकडे चार महिने केवळ निजून राहिले. औषध उपाय केले गुण कांहीं न होतां कार्तिक शुद्ध ९ इंदुवारीं तृतीय प्रहरीं निधन पावले. उभयतां स्त्रियांनीं सहगमन केलें. चिरंजीव सौ. आनंदीचेही शरीर रोगग्रस्त होते. औषध उपायाकरितां ठेऊन उपाय करावयाचे तितके केले. परंतु औषध लागू न होतां तेच दिवशीं प्रथम प्रहर रात्रीं तिचाही काळ जाहला. एकेच दिवशीं दुःखाचे पर्वतपात जाले म्हणोन लिहिलें. त्यास परमेश्वरें बहुत क्षोम केला. ईश्वरगतीस उपाय नाही. वडिलीं कोणेविशीं खेद करूं नये. खेद केल्यानें काय उपाय? वडिलांस म्या लेकरानें लिहावें असें नाही. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ २९ रविलावल मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 562 28-11-1790 A.D.

Malharrao's condolence letter is addressed to Devi Ahilyabai to the same effect (Dhondiba Phanse's death).

---

**अ. नं. ५६३** **श्री**

ता. ८ डिसेंबर, इसवी सन १७९०

यशवंतराव गंगाधर (चंद्रचूड) यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. धोंडिबा फणसे याचा काळ जाहला. स्त्रियांनीं सहगमन केलें म्हणोन इकडे वर्तमान आलें त्याजवरून चित्तास बहुत खेद जाला आहे. ईश्वरें मोठी अनुचित गोष्ट केली. आपले दुःखास पारच नाहीं.

साहेबांस विश्रांती मोठी होती. परंतु भगवतसत्तेस उपाय नाही. या दुःखाचा परिहार कोणीही करावा ऐसें नाहीं. आपण सर्वज्ञ आहात. विवेक करून खेदाचे शांतवन आपण करतील तरच होईल. यांस विवेकाखेरीज दुसरा उपाय नाहीं, येविषयीं आम्ही सेवकानीं लिहावे ऐसें नाहीं. चिरंजीव सौभाग्यवती मुक्ताबाई ताईचे व यशवंतराव दादाचेही बहुत प्रकारें समाधान करून खेदाचे शांतवन करावे. आपण विवेकवंत व धैर्यवंत आहेत. हा लोक तर क्षणभंगुर आहे व साहेबांच्या नित्य श्रवणांत आहे. चित्रकेतु प्रमुख मोठमोठे सार्वभौम त्यांनींहीं विवेक करून केले. एतदविषयीं उपाय तर नाहीच. आपण सर्वांचे छत्र आहात. आपल्या छायेंत कोट्यवधी लोक (जीव) विश्रांती पावतात. तितक्यांचे नेत्र आपल्या पायाकडे आहेत. आपण धैर्यावलंबन केल्यानें सर्वांस धैर्य पुरेल. येविषयीं विनंती विशेष लिहिल्यानें विस्तार दिसतो. जाल्या गोष्टीस उपाय नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ १५ रविलाखर मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकार्ड**

No. 563 8-12-1790 A.D.

Yeshwant Gangadhar's letter of condolence is addressed to Ahilyabai (Regarding Dhondiba Phanse's death.) The former was the ambassador of the Holkar Government in the Poona Court.

---

**अ. नं. ५६४** **श्री**

ता. ८ डिसेंबर, इसवी सन १७९०

माधवराव लक्ष्मण वकील हैद्राबाद यांजकडून नबाबांचा संदेश, अहिल्याबाईंस विशेष. नबाब संतोष पावून बोलले. सुभेदारासही त्यांनीं (अहिल्याबाईंनीं) लिहिले असेल. तेव्हां त्यांनीं सिलसिला जारी केला. तुकोजीराव सुभेदार अहिल्याबाईंच्या आज्ञेविरहित कोणी मजकूर राजकारणी लहानथोर बाईंच्या इतल्ल्याखेरीज करीत नसतात हें उचित आहे. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 564 8-12-1790 A.D.

The Hyderabad ambassador informs Ahilyabai how delighted the Nizam was at the receipt of her letter. He praised Tukojeerao for his implicit obedience to your goodself.

---

**अ. नं. ५६५** **श्री**

ता. ९ डिसेंबर, इसवी सन १७९०

तुकोजीराव होळकर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष आम्हांस थंडीवारियाच्या जागा मानून दुःखाचा परिहार करून दौलतीस व इहपर लोकांस उचित तें करावें. अविवेक करून तेच गोष्ट ध्यानांत आणल्यास आगोदरच शरीर अशक्त त्यांत खेदाचा अवलंब. येणेंकरून फार विलग पडेल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 565 9-12-1790 A.D.

Tukojeerao's letter of condolence to Ahilyabai, and advice to take care of herself as she is the protection to all and sundry.

---

**अ. नं. ५६६** **श्री**

ता. १२ डिसेंबर, इसवी सन १७९०

तुकोजीबाबांचे मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष. मौजे माथण्या परगणे पिढावे हा गांव वेदमूर्ती बाळाराम जोशी यांजकडे इनाम आहे. तेथील भुम्यानीं खलेल करून गावांत वस्ती होऊ न देतां सुरळीत अंमल देत नाहीत. याविषयीं मामलेदारास एकदोन वेळां लिहिले असून गांवाचा बंदोबस्त न होतां भुम्याचे करण्यासच अनुसरतात. यास्तव याचा बंदोबस्त जाला पाहिजे. जोशी मशारनिल्हे स्वारीसमागमें आहेत. गांवचे कामास माहितगार रा. केशो माधव मामलेदाराकडील कारकून त्याचे येणें येथें घडून गांवचा बंदोबस्त व्हावा याजकरितां वडिलांस लिहिले असे. तरी वडिलीं मामलेदारास ताकीद करून कारकून मशारनिल्हेस इकडे यावयाकरितां आज्ञा करावी. म्हणजे जोशी व पंत मशारनिल्हे या उभयतांचे विचारें गावचा बंदोबस्त करून द्यावयास येईल. मिती मार्गशीर्ष शुद्ध ७ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ २५ जमादिलावल सन १२००.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 566 12-12-1790 A.D.

Tukojeerao to Ahilyabai : Mauza Mathanya (Pargana Pidhawa) is granted Inam to Balaram Joshi who is with us in camp. The Bhumiyas have become turbulent. Please ask the Mamlatdar to send Keso

Madhao here. We shall then be able to set things aright after our consultation.

---

**अ. नं. ५६७** **श्री**

ता. १४ डिसेंबर, इसवी सन १७९०

सेनासाहेब सुभा रघोजी भोसले यांजकडून मातोश्री अहिल्याबाई होळकर यांस पत्र. विशेष. धोंडोजी फणसे यांसी देवआज्ञा जाली म्हणोन परस्परें वर्तमान ऐकले. त्याजवरून बहूत खेद जाहला तो पत्रीं कोठवर लिहावा. आपणासही वृद्धापअवस्थेत केवळ दुःखाचे पर्वत जाले. ईश्वरें गोष्ट मोठी अनुचित केली. वरकड हा मृत्युलोक आहे. ईश्वरइच्छेस उपाय कोणाचाच नाही. त्यास आपण विवेकी आहांत तेव्हां विवेक करून चित्ताचे शांतवन करावें. या गोष्टीस विवेकच मुख्य प्राधान्य आहे. आपण सर्वज्ञ आहांत तो येथून विस्तार काय लिहावा? रवाना छ ५ रविलाखर बहुत काय लिहिणें हे विनंती. पैवस्त छ २७ रविलाखर. मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 567 14-12-1790 A.D.

Senasaheb Subha Raghojee Bhonsale's letter of condolence to Ahilyabai (regarding Dhondiba Phanse's death.)

---

**अ. नं. ५६८** **श्री रामजी**

ता. २१-१२-१७९०

शाहआलम बादशाहगाजी माधोराव<br>नारायण बहादुर सलतनत नायब<br>राजाधिराज माधवराव शिंदे वकील मुतालिक,<br>मुखत्यार उम्रतुलउमरा, अलीजाह

(मोहर फारसी)

श्री महाराज वीरेंद्र श्री सवाई रणजीतसिंघजी बहादुरजंग. बंचनात. परगणे कुंभेरके आमलान हाल व इस्तकबाल अज राजश्री खंडेराव होलकरकी छत्री मुसार खर्च मौजे सेत,

गांगरसोली व तमरेरमे आगर नोनका तालुके मजकुरके मुकरर है सो मौजे मजकुर छत्री खर्च के चले जावे. तकरार न करतें हुकूम हाजूर परवानगी महंतजी मिती पोष सुदी ५ संमत १८४६.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 568 21-12-1790 A.D.

Order of the Delhi Durbar in 1790 A.D. that villages and salt-pan assigned to the Chhatree of Khanderao Maharaja Holkar should be upheld in the future as before.

---

**अ. नं. ५६९** **श्री**

ता. २२ डिसेंबर, इसवी सन १७९०

राजश्री तुकोजी होळकर सुभेदार गोसावी यांसी. सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित बालाजी जनार्दन आशीर्वाद विनंती येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असावे विशेष. आपण छ ६ रविलावलचें पत्र पाठविले तें पावलें. आपण पुण्याहून श्रीमंतांचे आज्ञा घेऊन हिंदुस्थानांत स्वारीस गेला त्यापासून मेवाडांत आपले मुक्काम होते. तेथें पाटीलबुवांची भेट झाली. त्यांची व रा. आबा चिटणीस याचें विद्यमानें ठराव झाला व अलीकडे मेडत्याचे लढाईत रा. बापूजी होळकर यांनीं कामकाज केलें व लूट इसमाईल याची व मेडत्याची आली. त्याचा हिस्सा देत नाहीत व हल्ली नवा अंमल बसला त्याची वाटणी देत नाहींत म्हणोन वगैरे बहुत विस्तार लिहिलें. तें सर्व कळलें. आपण पत्रें पाठविली त्यापूर्वीच पाटीलबुवांनीं आपले पत्राचा उल्लेख लिहिला. त्यांत बहूत तरहा लिहिल्या आहेत व पूर्वी कै. मल्हारजी होळकर सुभेदार झाशीस मसलतीवर होते ते समयीं शिंद्यास कुमकेस बोलाविलें. मसलत शेवटास गेली. मुलखाची वाटणी होऊं लागली. तेव्हां समाईक बेरजेंत तोफखान्याची वगैरे मसलतसंबंधे जास्ती खर्च लागला. त्याची बेरीज अज्जी वजा करून बाकी वाटण्या केल्या. हा दाखला लिहिला आहे. त्यास याची माहितगारी आपणास असेल त्यापक्षीं जसे पूर्वीपासून चालत असेल त्याअन्वयें आपलें त्यांचे विचारें आतांही घडावे. आपण व त्यांनीं हिंदुस्थानांत बहुत मसलती व कामें केलीं आहेत व त्याची माहितगिरी उभयपक्षीं आहे. त्यापक्षी आपण व ते मिळोन विचार ठरवून तोड पाडावी व प्रस्तुत उभयतां राजांची मसलत प्राप्त आहे व पाटीलबुवाही जोधपूरचे रोखें गेले व आपणास लिहिलें आहे. या दिवसांत आपली व त्यांची फूट बाहेर दिसों नये. सरकार काम बिघडते. शत्रू शेर होतात. एकी असल्याने सर्वांवर दाब राहून काम होते. हे उभयपक्षीं मनांत असल्याने उत्तम आहे. रवाना छ १५ रविलाखर बहुत काय लिहिणें. लोभ असो

दीजे हे विनंती. पैवस्त. भगवंत राजाराम शिरस्तेदार संस्थान महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 569 22-12-1790 A.D.

Balajee Janardan (Nana Fadnis) to Subhedar Tukojeerao Holkar : You complain of unequal distribution of money and territory. Scindia quotes former usage, specially the Zanshi expedition. It is better that matters be settled amicably, and both of you be united in the Rajputana expedition.

---

**अ. नं. ५७०** **श्री**

ता. २४ डिसेंबर, इसवी सन १७९०

बाळाजी जनार्दन यांचे अहिल्याबाईंस पत्र. विशेष. राजश्री यशवंतराव फणसे यांचे पुत्र धोंडिबा फणसे यांचे शरीरीं समाधान बहुत दिवस नव्हतें. त्यास औषध उपाय आपण फारच केले. परंतु गुणास न येतां कार्तिक शुद्ध ९ स देवआज्ञा जाल्याचे वर्तमान कळलें. त्यास वाईट गोष्ट जाली. आपल्यास वृद्धापकाळीं दुःख प्राप्त जाहलें. ईश्वरी इच्छा प्रमाण तेथें मनुष्याचा उपाय नाही. नाईलाज गोष्ट त्यास आपण हें दुःख क्षणक्षणा स्मरोन उदासीनता बहुत धरिली आहे, ती धरूं नये. या गोष्टींस विवेकाशिवाय दुसरा उपायच नाहीं. त्याजकरितां आपण चित्ताचे शांतवन करावे. रवाना छ १७ रविलाखर बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंती. पैवस्त छ ३ जमादिलावल मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 570 24-12-1790 A.D.

Balajee Janardan's (Nana Fadnis) letter of condolence to Ahilyabai on the death of Dhondiba Phanse,

---

**अ. नं. ५७१** **श्री**

ता. २४ डिसेंबर, इसवी सन १७९०

बाळाजीपंत नानांस पत्र तुकोजीराव होळकरांकडून. चिरंजीव मल्हारराव होळकर देशीं जाऊन महाली बखेडा करून मनमानें रुपये मामलेदारापासोन घेतले. येविषयीं दोनचार पत्रें

लिहिलीं होती कीं चिरंजीवाचा बंदोबस्त युक्तीने करावा. न ऐकेल तर शिक्षा करून करावा. तें न घडलें. याजकरितां राजश्री आनंदराव होळकर याजला त्यास आणावयास पाठविलें. त्याजबरोबर न येतां लढाई घेऊन आपलेपासीं कारकून पाठवून मुद्दा सांगून पाठविला कीं रा. काशीराव, बापूजी व भिकाजी होळकर यांची सोय केली आणि माझे कांहीं करीत नाहीत. याजकरितां मजला हजार रावतानिशीं सरकारांत ठेवावें. त्याजवरून राजश्री यशवंतराव गंगाधर यांजला आपण बोलावून सांगितले कीं, उगीच आपसांत लढून शिबंदीखर्च वाढवावा, त्यापक्षीं एखादी सोय काढावी हे बरे म्हणोन मशारनिल्हेनी लिहिलें. त्यास सर्व चिरंजीवांची सरंजाम देऊन अथवा नेमणूक करून दिली आणि याची न केली असें नाही. घरोघर संसार आहेत. मुलेही आहेत. स्वरूपानें वाजवी वस्त्रपात्र दरमहा खर्चांस सर्वांस सारखेच होते. मनसुब्यामुळें फौज पाठविणें लागली तेव्हा चिरंजीव काशीराव याची रवानगी केली. मागाहून आणखीन फौज पाठविणें जरूर पडून चि. बापूची रवानगी केली. तो असता तर त्याजबरोबरही फौज देऊन पाठविले असते. तें न होतां उठोन महेश्वरीं गेला. तेथून श्री जेजुरीचे निमित्य करून महालीं जाऊन बखेडा केला. हे चांगले कीं काय? स्वतंत्र सरंजाम लाऊन देईन म्हटल्यास मग दौलतींत राहील काय? सरदारी कशावर चालावी? सरदारींत ऐवज किती तो भ्रम कांहीं आपल्यास लोपला नाहीं. स्वारीमुळें फौज आहे तीस खर्च काय पाहिजे. देशीं दोन वर्षे आफत त्यात दंगा त्यामुळे एक पैसा आला नाहीं. माळवे प्रांतीं रामपुरा वगैरे महालीं बखेडे तेथील बंदोबस्तास शिबंदी खर्च. कांहीं महेश्वरीं खर्च, कर्ज करून आजपावेतों लोटितों. पुढें कर्जही मिळत नाहीं ही अवस्था, त्यांत चिरंजीवानें बखेडा आरंभिला. म्हणोन आनंदराव समजविण्यास पाठविला त्यासी लढाईस तैयार जाहला यामुळें त्यानेंही शिबंदी ठेविली. एकूण जिकडे तिकडे खर्चाची गांठ. याकरितां आपण चिरंजीवास समजाविण्यास कोणी मातब्बर माणूस पाठवून त्याजला चांगले कायल करून आनंदरावाबरोबर इकडे येते करावे. त्याचे चाकरी करावयाचे दिवस. घरांत बखेडे करितो, येथें येऊन चाकरी करून दाखवीना. आपण समीप असोन घरचा बखेडा लहानसा न मोडे. तेव्हां या गोष्टीचा बंदोबस्त कोणी करावा? आम्ही दूरदेशीं. यास्तव विस्तारें आपल्यास लिहिलें आहे. सविस्तर रा. यशवंतराव गंगाधर बोलतील. रवाना छ २४ रविलाखर बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 571 24-12-1790 A. D

Tukojeerao Holkar to Nana Fadnavis : my son Malharrao approached you with a request to be furnished with army, and complained that he alone of our house was left unprovided. Our means do not permit separate provision. Expenses have already exceeded our income. I request you. therefore, to send him here to work with us all together.

---

**अ. नं. ५७२** **श्री**

इ. स. १७९०

माधवराव लक्ष्मण वकील, हैद्राबाद. यांचे मार्फत. (निजामाचे अहिल्याबाईंबद्दल मत.)

नबाबसाहेबांनीं श्रीमंत महाराज मातोश्री बाईसाहेबांस दिल्लीचा खरिता करून मोठी मोहर करून पाठविली. या पत्रांत ज्याप्रमाणें मातोश्रींस लिहितात त्याप्रमाणें नबाबसाहेबांनीं आलकाव लिहिला आहे.

१ ''अहिल्याबाई होळकर यांचे प्रतिमेस बायकांत किंवा दौलतवंतांत कोणी योग्यतेस नाही. कैलासवासी मल्हारराव होळकर यांची कमाई या बाईंनीं नेक जागीं खर्च करून आपला देह ईश्वरार्पण केला. ही उपमा त्यांची त्यासच.'' या लेकरावर (धोंडीबा) पुढें औलादी नांव राहते तें ईश्वरास कर्तव्य नव्हतें असें घडोन आलें. त्याचे दुःख परिहार केल्यानें होणार नाही. तथापि स्नेह व घरोबा व दोस्तीच्या मार्गे आम्ही एक पत्र लिहून देतों ते त्यास प्रविष्ट करून उत्तर आणावें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 572 1790 A.D.

The Nizam addressed a condolence-letter to Ahilyabai through her Hyderabad Vakil. The opening address is just like a son's to his mother, He praises her virtues, and moans for the loss of Dhondiba Phanse.

---

**अ. नं. ५७३** **श्री**

इसवी सन १७९०

मल्हाररावांचे मातोश्री अहिल्याबाईंस पत्र विशेषः वडील आहांत. मज लेकरापासोन यद्यपि अंतर पडलें तर आपण वडिलांनीं आपले हातें प्राण घ्यावा, परंतु माझा शत्रू रखमाबाई, यांजपासोन प्राण न घेवावा. इतकियावर वडिलांची मर्जी. यद्यपि रखमाबाईंच्या चित्तांत असले तर मजवर हल्ला करून दरोबस्त लोक ठेऊन द्यावे. आपण वडिलांनीं उभयपक्षीं बोलूं नये. आपल्या आशीर्वादिकरून ईश्वर ज्याला यश देईल त्याजला देवो. आपला हात माझे मस्तकीं असल्यावर मजला कुत्र्यांचे मोतीनें न मारवावे. सारांश, वडिलांच्या चरणाशीं माझी निष्ठा असली तर कोणाच्यानेही कांहीं व्हावयाचे नाही. आपल्या चित्तांत मजला मारवावयाचे असल्यास लौकिक होईल अशा ठिकाणीं मारवावें, म्हणजे पोटीं आलेचे सार्थक. जोपर्यंत महाराजांचा लोभ पहिल्यापासोन आहे तोच

शेवटपर्यंत राहील तोपर्यंत माझी जगणूक आहे, नाही तर तैसेच मजला वडिलांनीं उत्तर पाठवावे आणि नावेचीही परवानगी द्यावी. विस्तारें मजकूर लिहिला म्हणोन वडिलांनीं रागास न यावे, विनंती अक्षरशहा वाचून मर्जीस आल्यास उत्तर द्यावें. इतक्यावर वडिलांची मर्जी. हे विज्ञप्ती. पैवस्त छ २५ मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 573 — 1790 A.D.

Malharrao Holkar informs Ahilyabai (by letter) of his loyalty to her. Rakahmabai, he says, is my enemy. He would willingly suffer any punishment at Ahilyabai's hands.

---

**अ. नं. ५७४** — **श्री**

इसवी सन १७९०

शिलालेख (ओळी ४) श्री क्षेत्र जेजुरी
श्री मल्हारी गौतमेश्वराच्या देवळावरील.

१ श्री शके १७१२ साधारणनामः २ संवछरे आश्वीन शुद्ध दशमी

३ श्री मल्हार गौतमेश्वर चरणीः ४ मल्हारजी सुत तुकोजी होळकर.

(इ. स. १७९० सालांतील पहिले तुकोजीराव होळकर यांचेवेळचा लेख आहे.)

No. 574 — 1790 A.D.

(1) The fort and tank were built by Tukojeerao Holkar in 1770 A.D.

(2) The Malhari-Gautameshwar temple was built by Tukojirao Holkar in 1790 A.D.

---

**अ. नं. ५७५** — **श्री**

शिलालेख (ओळी ९)
श्री क्षेत्र पंढरपूर.

१ श्री देवी करुणा कटाक्ष पः २ रमःमंत्र तुकोजी मल्हा ३ रजी होळकरःस

४ इन्दुरपुराधीशस्तक्षयोः ५ माहानः काशीनाथ सु.६ तःसुलखनपटुं ७ र्वस्त गोत्र तस्थां गोः ८ रघुनानकश्चिरे तरैः ९ गोविप्र संरक्षकः

श्री अहिल्याबाईसाहेब यांनीं बांधलेल्या वाड्याशेजारच्या राममंदिरांतील पायरीखालचा.

No. 575

The temple of Shreeram was built at Pandharpur by Tukojeerao Holkar.

---

**अ. नं. ५७६** **श्री**

इसवी सन १७९०

अहिल्याबाई होळकर यांजकडून तुळसाजी वाघ यांस पत्र. विशेष. परगणे महतपूर येथील गांवगन्नाचे पाटील यानी सरकारांत येऊन आपले वर्तमान निवेदन केले. त्यावरून महालीहून मामलेदार व फडणीस, मुजुमदार, जमीदार यांजला हुजूर बोलावून आणून, दोहीकडील मजकूर समजून, पुढें वहिवाट करणें त्याची याद कलमबंदीवार अलाहिदा ठरवून देऊन, हें पत्र तुम्हास लेखन केले असें. तरी तुम्ही पाटलांवर कोणेविशीचे लटके आरोप न ठेवितां, त्यांची खातरजमा करून, सरकारांतून कलमबंदीवार याद ठरवून दिली आहे त्याअन्वयें बंदोबस्त करून देऊन, हरएकविशीं उचितार्थ गौर करीत जाणें. पुन्हा यांजकडील बोभाट कोणेविशीं न ये तें करणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 576 1790 A.D.

Ahilyabai to Tulsajee Wagh : Patils of Pargana Mahidpur lodged complaints before the Sarkar. Mamledar, Phadnis and other officers were summoned. After hearing both the parties, rules were laid down for the future conduct of affairs. You are to follow the rules; and see that co-operation with the Patils is upheld in everyway possible.

---

**अ. नं. ५७७** **श्री**

जानेवारी, इसवी सन १७९१

रोजकीर्द दफाते पत्र. अहिल्याबाई होळकर निंबाहेडा परगणा येथील जहागिरीबद्दल

पत्रें. मल्हार सोयराजी कमाविसदाराचे नांवें. परगणे निंबाहेडापैकीं मौजे लाजोन हा गांव सरकारांतून चिरंजीव राजश्री राणोजी शिंदे चौंडीकर यांजकडे सरंजामांत आहे. तेथील ठाणें रांगड्यांनीं सन ११८८ चे सालांत घेतले होते. तेव्हां सरकारांतून फौज जाऊन रांगड्यांकडून ते ठाणें घेतल्यापासून आजपर्यंत सरकारातच आहे. त्यास हल्ली ठाणें त्यांचे त्यास द्यावयाचे ठरलें आहे. यावरून हे पत्र तुम्हांस सादर केले असे तर तुम्ही मौजे मजकुरचें ठाणें चिरंजीवाचे स्वाधीन करून पावती घेणें. म्हणून.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 577 January, 1791 A.D.

The Kamavisdar of Nimbheda is orderd to hand over Mauza Lajon to Ranojee Scindia Choundikar which was, uptil now, held by the Sarkar.

---

**अ. नं. ५७८** **श्री**

ता. १९ जानेवारी, इसवी सन १७९१

तुकोजीराव यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. परगणे पिंपलोदा येथील ऐवजापैकीं महाडिकाकडील पागेच्या खर्चाचा व सावकाराचे रदकर्जाची व्यवस्था येथून करून दिली. तो मजकूर वडिलांस पेशजी लेखन केला आहे. नेमणुकीप्रमाणें वहिवाट झाली पाहिजे. यांजकरितां लष्करांत पागेच्या खर्चाची बेगमी तिलोकसी पदमसी यांजकडून करून महालाचा ऐवज महाडिकाचे नेमणुकीचा सावकाराचे रदकर्जी व्यवस्था येथून करून दिली. हीं कामें त्याचे गळा घालून गुमास्तां जालमसिंग गेला असतां गोविंदराव महाडिक परभारें महालीं कारकून पाठवून जमीदाराकडून ऐवज घेऊन जातात. यामुळें सावकारास ऐवज पावत नाहीं. अशानें सरकारचाकरी घडणार नाही. यास्तव वडिलांस हे पत्र लेखन केले असे. तरी वडिलीं गोविंदराव महाडिकास ताकीद करून परभारे महालचा ऐवज न नेतां चाकरी सोडून स्वस्थ बसले आहेत त्यास चाकरीस जाणें म्हणून आज्ञा केली पाहिजे. मिती पौष शुद्ध ९ सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ती. पैवस्त छ १४ जमादिलावल सन १२०० मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 578 19-1-1791 A.D.

Tukojeerao to Ahilyabai : Govindrao Mahadik is absent from camp, and is collecting revenue from the Jamedar which is rightfully owned by Tiloksey Padmaji. Please order him to be present on duty and let Tiloksey collect his own due.

---

अ. नं. ५७९ **श्री**

ता. २०-१-१७९१

श्रीमंत माधवराव नारायण प्रधानांकडून तुकोजीरावांस पत्र. विशेष. तुम्ही कार्तिक शुद्ध ७ मीचें विनंतीपत्र पाठविलें ते प्रविष्ठ जाहले. येथून आज्ञा घेऊन हिंदुस्थानांत स्वारीस गेल्यापासून आजतागाईत जें जें वृत्त जाहले व पुढें सिंध्याकडील व चिरंजीव अलीबहादरकडील फौजा गेल्या होत्या त्यावर राठोडाशी लढाई. त्यांत कामकाज कोणाचें कसें झालें त्याचा तपशील व तुम्ही मेवाडांत होतां ते समयीं तुम्हासी वाटणीचे करारमदार केलें त्याप्रमाणें अंमलात न आलें त्याचा, पुढील नवा मुलूख लुटला, त्याचे व लूट आली याचे वाटणीचा मजकूर लिहिला तो सविस्तर विदित झाला. ऐसियासी. तुम्ही मजकूर लिहिला याच अन्वयें तपशील लिहून रा. महादजी शिंदे यांनीं विनंतीपत्रें पाठविलीं. त्यांत पूर्वी कै. मल्हारजी होळकर झांशीचे मसलतीवर होते त्यासमयीं शिंद्यांस कुमकेस बोलाविले होते. त्यासमयीं मसलत झाल्यावर वाटणीचा प्रसंग पडला तेव्हां एकंदर बेरजेत तोफखान्याचा खर्च वजा करून बाकीची वाटणी शिरस्तेप्रमाणें झाली. त्यास याची माहितगारी तुम्हास आहेच व आपणही हिंदुस्थानांत मसलती बहुत केल्या व ते समयींच्या चाली वाटणीच्या झाल्या असतील त्याची माहितगिरी परस्परें असेलच. तरी त्यांचे तुमचे विचारें एक तोड ठरावून उभयतांही चालावे यात फाट दिसणार नाही व आब राहतो. यांजकरितां तुम्ही व ते मिळोन करणें ते करावें. परस्परें विरुद्ध न दाखवितां सरकार काम उभयतां एकविचारें करावे. यात राजेरजवाडे यांजवर दाब राहून काम होते. तुम्हांस मागील माहितगारी आहेच. समजून करणें ते करावें. जाणिजे छ १५ जमादिलावल सुरसनइहिदे तिसेन मयावआलफ. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 579 20-1-1791 A.D.

Madhaorao Narayan (Peshwa Madhavrao II) to Tukojeerao Holkar : Your letter of complaint against Scindhia, and his letter of former precedents have been submitted. You are well acquainted with past precedents. It is wise and prudent that both of you should act in union and in conformity with past precedents. Please note the Zanshi expedition and the consequent distribution.

---

अ. नं. ५८० **श्री**

ता. २४ जानेवारी, इसवी सन १७९१

माधवराव लक्ष्मण वकील हैद्राबाद यांचे पत्र मातोश्री अहिल्याबाईंचे नांवें विशेष.

पाटीलबाबांचा मुक्काम तूर्त किल्ले आजमेर, येथील व जोतपूरचे राजाचे मुलखाकरितां, स्वतः आपले जमियतीनिशीं, सोबती कोणी आले न आले हे चित्तांत न आणतां, त्या प्रांतांत जाऊन दाखल जाले. पुढेंही यश आले तर एकटे जातीनिशीं, श्रीमंत पंतप्रधान यांचे प्रतापेंकरून, फकीर गुरुजीचे आशीर्वादेंकरून घेऊन, मग सोबती आपल्या आपण उभयतां आले तर श्रीमंतांचे आज्ञेप्रमाणें द्वामनुष्यानें मसलतीनें येतील तर आपल्यास दोन्हीकडील सावधानी करावी लागेल. कारण कीं हिंमत बहादूर अब्रूचा व जिवाचा ग्राहक असतां तो अलीबहादरानें पांचा हजार फौजेनिशीं वाढवून बरोबर घेऊन सुभेदार साहेबांस साह्य करून जेव्हां आम्हाकडे येतील तेव्हां आमचे चित्ताची स्थिरता कशी होईल, हें उघड दिसत आहे. तेव्हां आले न आले हे दोन्ही एकरूप, या मजकुरावरून नबाबांसही अंदेशा प्राप्त झाला की, जर असेच घडोन आले तर तूर्त कठीण आहे. श्रीमंतांचे दौलतीत बखेडा होईल. यांत राजेरजवाडे जे जेर झाले ते शेर होतील. महादजीबाबा आग्रही व स्वामीकार्यावर जिवावर उदार होऊन तिकडे गेलें तेव्हां यात खावंदांचे प्रतापेंकरून होणार ते होईल. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 580 24-1-1791 A.D.

The Holkar's Hyderabad ambassador to Ahilyabai : Mahadjee Scindia has proceeded singly in Rajputana. All the Maratha Sardars are not united. This state of affairs has made the Nawab uneasy.

---

**अ. नं. ५८१** **श्री**

ता. २७ जानेवारी, इसवी सन १७९१

तुकोजीरावांकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र विशेष. येथें तोफखान्याकडे इंग्रेज पोलाद पाहिजे. याजकरितां सेवेसीं विनंती लिहिली असे. तरी वडिलीं चार मण इंग्रेज पोलाद व दोन मण दुसरें पोलाद येणेंप्रमाणें सहा मण खरेदी करून रवानगी करावी. या प्रांतीं मिळत नाहीं यास्तव जलदी येऊन पोहचे तो अर्थ करावा. मिती पौष वद्य ८ सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ २८ जमादिलावल. इहिदेतिसेनमयाअलफ.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 581 27-1-1791 A.D.

Tukojeerao requests Ahilyabai to send him six maunds of steel for the artillery.

---

अ. नं. ५८२ श्री

ता. ३१ जानेवारी, इसवी सन १७९१

तुकोजीराव होळकरांचे अहिल्याबाईंस पत्र मुक्काम बुढा विशेष. सेवेसी लिहिलें आहे त्याप्रमाणें तोफांची रवानगी वडील करतील. तोफांस येण्यास दिवसगत लागलिया अगोदर वडिलीं शिसे खरेदी करून ठेविलें आहे ते व बाण राजश्री गणेश नारायण यांजसमागमें देऊन लवकर पाठऊन द्यावे. यांस दिवसगत नसावें. मिती पौष वद्य २ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ २६ जमादिलावल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 582 31-1-1791 A.D.

Tukojeerao requests Ahilyabai to send him artillery; "if it be not ready now, please send us lead and arrows with Ganesh Narayan without delay."

---

अ. नं. ५८३ श्री

पौष वद्य, ता. ४ फेब्रुवारी, इसवी सन १७९१

सौभाग्यवती रखमाबाई होळकर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र : पौष वद्य १ वडिलीं आशीर्वाद पत्र पाठविलें तें पावलें. प्रगणे देपालपूर येथें वरात करून वसुलास खासबरदार पाठविले आहेत. त्यास साल मजकुरीं रसदेचे ऐवजाचा भरणा होऊन चुकला. याजकरितां खासबरदारास बोलावून घेणें म्हणोन आज्ञा. ऐसियासी येविषयीं राजश्री मुकुंदराव हरी व बाळाजी कृष्ण यांजला लिहिलें आहे. ते वडिलांस विनंती करतील. मी वडिलांचे आज्ञेखेरीज नाहीं. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 583 4-2-1791 A.D.

Saubhagyawati Rakhmabai Holkar to Ahilyabai : You were pleased to order that Khasbardars sent by me to Depalpur for revenue-collection should be recalled. Your orders are honoured. Mukundrao Hari and Balaji Krishna are deputed to submit my statement.

---

अ. नं. ५८४ श्री

ता. ५ फेब्रुवारी, इसवी सन १७९१

निजामाचें दुखवट्याचे पत्र माधवराव लक्ष्मण वकिलाचे मार्फत : धोंडिबा फणसे वारल्यानंतर : अहिल्याबाईंविषयीं मत. 'आज या समयास अहिल्याबाई होळकर ह्यांचे प्रतिमेस बायकांत किंवा दौलतवंतांत कोणी योग्यतेस नाही. कैलासवासी मल्हारराव होळकरांची कमाई ह्या बाईनीं नेकनामींत खर्च करून आपला देह ईश्वरार्पण केला. ही उपमा त्यांची त्यांसच द्यावी.'

**सरकारी रेकॉर्ड**

No. 584 — 5 February 1791 A.D.

The Nizam speaks in high eulogistic terms his appreciation of Devi Ahilyabai's character - "He finds none equal to her who has devoted her purse and person to the service of God."

---

**अ. नं. ५८५** — **श्री**

ता. ६ फेब्रुवारी, इसवी सन १७९१

तुकोजीराव होळकरांकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष. वडिलांकडून पत्र आलें तें पावलें. तुमची पत्रें आली होती ती मनन करून पुणियास रवाना केलीं आहेत. उत्तरें आल्यावर पाठविलीं जातील. राजाच्या तुमच्या भेटी होऊन कोणता विचार ठरला तो लिहिणें, म्हणून पत्रीं आज्ञा. त्यांस वडिलांनीं पुण्याकडे पत्राची रवानगी केली, उत्तम केले. प्रस्तुत शिंदे उज्जेनीस आले, ते पुढें देशींही जातील. त्यांच्या चाली सर्व वडिलांचे ख्यालांत आहेत. पेशजी त्यांनीं नालस्त्या लिहावयास कमी केलें नाही व आणखीही लिहावयास कमी करतील असें नाही. जातीनें देशीं गेल्यावर कोणतेही गोष्टीस चुकणार नाहीं. येविषयींचा धरबंद अगोदर झाला पाहिजे. यास्तव वडिलीं राजश्री बाळाजीपंत नाना यास लिहावयाचे तें लिहून धरबंद करावा. मिती माघ शुद्ध ३ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 585 — 6-2-1791 A.D.

Tukojeerao requests Ahilyabai to write to Nana Fadnis regarding the unfathomable conduct of Mahadjee Shinde who has been spreading calumny about himself.

---

अ. नं. ५८६ **श्री**

ता. १२ फेब्रुवारी, इसवी सन १७९१

तुकोजीराव होळकरांकडून अहिल्याबाईंस पत्र. विशेष. वडिलांकडून छ ३० जवलचें पत्र आलें ते छ ६ दिलावली प्रातःकाळीं पावलें. टोक परगण्यातील गढीबंदांचें पारिपत्य करून कोटेवाल्यास वगैरे जरब देऊन त्यांजकडून ऐवज येणें तो उगवून निंबाहेडास यावयाचें करणें. उतावळी करून आल्यानें ऐवज उगवणार नाहीं. खर्चाची अडचण पडेल असें न करणें. म्हणोन पत्रीं आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणेच घेऊं. राजश्री यशवंतराव गंगाधर यांचीं पत्रें आली ती बजीन्स पाठविलीं आहेत म्हणोन लिहिण्यांत आले. परंतु पत्रें येथें आलीं नाहींत. याउपरि रवानगी करावी. मिती माघ शु. ९ सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 586 12-2-1791 A.D.

Tukojeerao assures Ahilyabai that he would collect revenue of Kota and then go to Nimbheda as directed by Her Highness.

---

अ. नं. ५८७ **श्री**

ता. १३-२-१७९१

पुणें. यशवंतराव गंगाधर यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. विशेष. इकडील पत्रांची उत्तरें बारीक अर्थ परिस्फूट न होतां उगवून यावीं. घरोप्याचे रीतीने श्रीमंत नाना आपल्या लक्षास जपून बारीक मोठी गोष्ट सुचवितात व कागदपत्र ही दाखवितात, देतात, याची पडतपोशी असावी येविषयीं लष्करांत सूचना झाली पाहिजे. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 587 13-2-1791 A.D.

Yeshwantrao Gangadhar (Holkar ambassador at the Poona Court) to Ahilyabai. Nana Fadnavis displays great solicitude and interest for our welfare; please ask our camp to note the same.

---

**अ. नं. ५८८** **श्री**

ता. २०-२-१७९१

आनंदराव होळकर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष. श्रीमंत राजश्री बाबाचे कूच (मल्हारराव) चांदवडाहून होऊन श्री जेजुरीस नीटमार्गे जाऊन देवदर्शन करून सत्वर माघारा लष्करांत जावें असे करारांत लिहिलें व साहेबांचे लिहिल्याप्रमाणें करार होता. मग त्यांचे मर्जीस काय आलें न कळे. उपरांतिक पौष शुद्ध १३ निरोप घेऊन आम्ही आपला सरंजाम दरोबस्त रघुजी होळकर याजसमागमें देऊन सडे घरास गेलो. आपलें पत्र वाटमार्गी निमोणचे मुक्कामीं पावलें. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 588 20-2-1791 A.D.

Anandrao Holkar to Ahilyabai : Malharrao gave a written agreement that after the pilgrimage of Jejuri he would directly join the camp. He seems, however, to have changed his mind. I handed over the charge of the army to Raghujee Holkar, and went home.

---

**अ. नं. ५८९** **श्री**

ता. ५ मार्च, इसवी सन १७९१

अहिल्याबाईंचे पत्र मुकुंदराव हरी यांस. तोफेचे तैयारीविषयीं समक्ष आज्ञा केली असतां अद्याप तयारी जाली नाही. तोफा जलद पाठवून देण्याविषयीं चि.राजश्री तुकबाची पत्रें वारंवार येतात. याकरितां हे पत्र तुम्हास लिहिलें आहे. तर इतःपर पत्र पावतांच रात्रीचा दिवस करून तोफेची सिद्धता सत्वर करणें. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 589 5-3-1791 A.D.

Ahilyabai to Mukundrao Hari : Tukojeerao is pressing hard for artillery. Make men work hard and see that the artillery is despatched quickly.

---

**अ. नं. ५९०** **श्री**

ता. ६ मार्च, इसवी सन १७९१

रा. विनायक बाजी मुक्काम पुणें यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस, (त्याचे संदेशाचे उत्तर.) विशेष. ''मनःपूर्वक दौलतीचे स्वरूप कै. सुभेदारांचे वेळेस होतें त्याप्रमाणें आपण मनःपूर्वक राखावें म्हणजे राहिल्याचे स्वरूप नाहीतर मजला अगोदर निरोप 'श्री' स जाण्याचा द्यावा, मग जसे कर्तव्य तसें करावें. स्वरूपास उणें केल्यास सोसणार नाहीं.'' याप्रमाणें आपल्या आज्ञेप्रमाणें बोललो. नानांनीं आज्ञा केली. ''बाईंचें करणें फार चांगले, आमची खातरजमा आहे. अलीकडे ऐकतो बाई व सुभेदार एकचित्तें आहेत. तेणेंकरून फार संतोष झाला. बाईंनीं मनापासून चित्तावर धरलें तर श्री पंतप्रधान यांची सेवा कै. सुभेदारांनीं केली त्याप्रमाणें सेवाही करतील व दौलतीचे बंदोबस्तहि करतील. हे आमची खातरजमा आहे. सोबत्याविषयींचा मजकूर तर श्रीमंत पंतप्रधान थोरले बाजीराव साहेब यांजपासोन उभयतां सरदाऱ्या बरोबरीनें राखीत आले त्यांत अंतर होणार नाही. वडील सरदारी तुमची, परंतु तुम्ही मात्र जागे व्हावें मागें चाकरी केली आतां कशी करतों याचा विचार करावा. तुमच्या घरचा बंदोबस्त, उभयतां एक झाले असतां, न होय तेव्हां हें चांगलें नव्हें. म्हणोन. पैवस्त ता.१४ मार्च इसवी सन १७९१ मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 590      6-3-1791 A.D.

Vinayak Bajee from Poona to Ahilyabai : "I submitted your message to Nana. He complimented you on your ability. Seniority of office in Northern India is yours. See, says Nana, how you are, of late, fulfilling the same."

---

**अ. नं. ५९१**      **श्री**

ता. ७ मार्च, इसवी सन १७९१

रोजकीर्द छ १ रजब सन १२०० फसली. (ह्या महिन्यांत मातोश्री अहिल्याबाई होळकर खालील ठिकाणी स्वतः गेल्या.)

१ विष्णुपुरी नजीक ओंकारमांधाता छ १ रजब ता. ७-३-१७९१

२ श्री ओंकारेश्वर नजीक सनावद. छ २ रजब, ता. ८-३-१७९१

३ भोगांव प्रगणे कान्हापूर नर्मदा दक्षिणतीर छ ३ रजब, ता. ९-३-१७९१

४ मर्दाना, लगत मंडलेश्वर. छ ४ रजब, ता. १०-३-१७९१

५ परत, मुक्काम महेश्वरीं छ ७ रजब, ता. १३ माहे मार्च इसवी सन १७९१.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 591      7-3-1791 A.D.

A week's programme of Ahilyabai's pilgrimage from Maheshwar to

Vishnupuri, Onkareshwar and back.

---

**अ. नं. ५९२** **श्री**

ता. ७ मार्च, इसवी सन १७९१

रघोजी भोसले सेनासाहेब सुभा यांस मातोश्री अहिल्याबाईंकडून पत्र. विशेष. आपण छ ९ जमादिलाखरचें पत्र पाठविले. ते छ २९ मीनहूस प्रविष्ट जाहलें. राजश्री परसोजी भोसले यांचे लग्नाचा निश्चिय माघ वद्य २ शरीरसंबंध रा. कृष्णाजी मोहिते यांचे कन्येशीं केला आहे. तरी आपण समारंभास येऊन मंडप शोभिवंत करावा म्हणोन लिहिलें. उत्तम असे. रवाना छ १ रजब मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 592 7-3-1791 A.D.

Ahilyabai to Raghojee Bhosale Sena Subbha : acknowledges receipt of the invitation for the marriage ceremony of Parsojee Bhosale.

---

**अ. नं. ५९३** **श्री**

मार्च, इसवी सन १७९१

माधवराव लक्ष्मण वकील हैद्राबाद यांजकडून, मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष. मुक्काम लष्कर नबाब बंदगान अलीखान, पानगड येथें यथास्थित असो विशेष. पाटीलबाबा शिंदेबहादर यानीं एक साधनप्रसंग पाहून अधिकोत्तर केलें हें येथें माहे मजकुरीं दिल्लीहून अखबारी आल्या त्यांजवरोन नबाब साहेबांस समजले. त्याजवरोन हेही आपले मनांत अंदेशा करून लौकिकांत बोलत नाही. कित्येक पातशाही तोरा त्यांनीं आपले स्वाधीन ठेऊन जिकडे सूत्र चालवितात तो योग अनुकूल होतो, ऐसे मजकूर. एक श्रीमंत पंतप्रधान यांचेच नोकर म्हणवीत असतां त्यांजला सर्वत्रांनीं साह्य व्हावें ऐसे विचार नव्हते. पातशहा तर धृतराष्ट्र आहेत. त्यांचे नांव जतन केल्यानें ते पृथ्वीपती असतां तेजहीन झाले, म्हणून शिंदेबहादुर यांजवर कृपा करितात. तेव्हां जैसा मुखत्यारीचा कारभार हे करितात तो त्यांजला मान्य केलाच पाहिजे. एक तो कलकत्तेकर इंग्रजास सामील करून तेथील सूत्र आपले हातीं ठेविलें. त्यांचे राज्यकारभार सुजायतदौला वजीर यांस सर्व अर्जवांत आहेत. मग इस्माईल बेग वगैरे यांचा मजकूर कळतच आहे. दुसरें, अली-गोरपातशहा आलम धृतराष्ट्र आहेत. यांचीं एक बहीण तैमूरशहा दुराणी याची बेगम आहे. तेव्हां त्या अगत्यावरून यांनीं त्या दुराणी पातशहा

गिलच्याकडे अंतर्सूत्र पातशहाचे मर्जीप्रमाणें खतखतूत जारी करून त्याजला आपल्या ममतेंत आणून जोतपूरकर राठोडवाले नगरकरराजे याला त्या गिलच्याची फौज कुमक घेऊन श्रीमंतांकडील सरदारावर इभ्रत त्या गिलच्याची दहशत पूर्वीपासून भाऊगर्दी पासोन आहे. तेव्हां दुराणी गिलच्याच्या कुमकेस आल्यावर हे सरदार सहजांत हिंन्दुस्थान सोडोन दक्षिणेत जातील. आपण पातशाही मनसबदार राजेरजवाडे मिळोन इस्माईल बेग व हिंमतबहादुर यांजला नाबूद करून पातशाही संस्थानचा बंदोबस्त करावा हे योजना करून लाखों रुपये त्याजला स्वारीखर्च कबूल करून आणीत होते आणि तो येतही होता. परन्तु त्याचे मुलखांत ईश्वरी कर्तव्य, लढाई उपस्थित जाल्यामुळें तो तिकडे अटकोन राहिला. शेवटीं त्याचे संस्थान त्याजला जतन करून, मागती कायम राहिलो हेंच अपूर्व जालें. मग यांची कुमक त्यांनीं करावी हा मजकूर सर्व राहिलासा पाहून पाटीलबाबांनीं गुप्तभेद करून आपल्याला कुल राजकारण साधून घेऊन जाहीरदारींत आणलें कीं, पातशाहीचा बंदोबस्त यथास्थित राहिला तेव्हां यांचे साह्येकरून राजेरजवाडे यांचा पक्ष सोडोन उलटी ताकीदपत्रें लिहून पाठवावी. कळते. शिंदे व होळकर या सरदारांसी रुजू राहतील ऐसे अंमलात यावें म्हणोन दुराणीकडेस येलची आले त्यांनीं खिल्लत व जवाहीर घेऊन आले तेही पातशाहास वर्तमान अर्ज करून जोतपुरीं गेले. हे विज्ञापना. पैवस्त छ ४ साबान सन १२००.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 593 March, 1791 A.D.

The Holkar ambassador at Hyderabad informs Ahilyabai that Scindia was trying hard to persuade Durani Padshah to come over in India. With his assistance Scindia intended to plan a campaign in Rajputana. But the plan failed.

---

**अ. नं. ५९४** **श्री**

ता. १९ मार्च, इसवी सन १७९१

तुकोजीराव होळकरांकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. राजश्री आनंदराव होळकर यांचे कनिष्ठ बंधू महितपराव होळकर पागेसुद्धा चिरंजीव काशीराव याजबरोबर येथून रवाना केले, ते सांप्रत तेथें आहेत. त्यांजपासून चाकरी घडून सरकारी उपयोग घडावा अशी चाल त्यांची नाही. आनंदराव यांस हुजरात पागेचे काम सांगून वाढविलें. त्यांनीं कामगिरीस पाठविल्यास काम बजाऊन आणावें ते गोष्टी कांहींच न करितां लाखो रुपयाच्या पेचांत आणून बखेडा वाढविला, तो अद्याप आटोपत नाही. अशी त्याची रीत. त्याच अन्वयें त्यांचे बंधू आहेत. तेथें राहून वडिलांपाशीं अनेक प्रकारें आपले ग्लानीचे अर्ज

करून गांवखेडे लाऊन घ्यावें, असे यत्नास आळस करणार नाहीं. यास्तव त्यांचें ज्येष्ठाचे आचरणावर नजर देऊन ते वडिलांपाशीं तापत्रय निवेदन करूं लागल्यास त्यांचे ऐकूं नये. गावखेडे एकरूप देऊं नये. मिती फाल्गुन शुद्ध १४ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 594 19-3-1791 A.D.

Tukojeerao Holkar to Ahilyabai : Anandrao Holkar and his brother Mahipatrao are both quite incompetent for the military service. The latter is likely to solicit the favour of some villages in Inam. Please do not accede to his request.

---

**अ. नं. ५९५** **श्री**

ता. २२ मार्च, इसवी सन १७९१

माधवराव लक्ष्मण वकील हैद्राबाद यांजकडून अहिल्याबाईंस निजामसाहेबाचा संदेश. ''मल्हाररावानें निजामशाही प्रांत लुटला त्याबद्दल'' आम्हास खातर श्री अहिल्याबाई होळकर व तुकोजी होळकर यांची जाणोन क्षमा करितों.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 595 22-3-1791 A.D.

The Holkar ambassador at Hyderabad informs Ahilyabai that though Malharrao has played mischief in the Nizam's territory, the Nizam has forgiven him, on account of his high regard for your goodself and Tukojeerao.

---

**अ. नं. ५९६** **श्री**

ता. २३ मार्च, इसवी सन १७९१

रोजकीर्द दफातेवरून छ १८ रजब सन १२०० फसली.

१ काशीराव होळकर सावेरीस आले, सायंकाळपावेतों इंदुरीं दाखल होऊन बुधवारीं अस्तमानीं महेश्वरीं वडिलांपाशीं (अहिल्याबाईंजवळ) पोहचावे असा बेत आहे.

२ काशीराव, बायकोचे मरणानंतर सहा महिन्यानीं अहिल्याबाईंकडे आले व इसवी सन १७९१ चे आखेरपावेतों अहिल्याबाईंजवळ होते.

३ काशीराव होळकरांचे हंगोजी हरगुंडे ह्यांचे मुलीशीं छ १४ जमादिलाखर सन

१२०० फसली नंतर लग्न झालें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 596 23-3-1791 A.D.

Kashirao's second marriage with the daughter of Hangojee Hargunde was celebrated in 1791 A.D.

---

**अ. नं. ५९७** **श्री**

ता. ३० मार्च, इसवी सन १७९१

तुकोजीरावांचे अहिल्याबाईस पत्र. विशेष. सोनव्याचे गढीचें पारिपत्य होऊन ठाणें बसलें हे वर्तमान सेवेसीं पूर्वी लिहिलेंच आहे. अलीकडे रोहिल्याच्या गढ्यांपैकीं आणिक दोनतीन गढ्यांचे रजपूत येऊन भेटून गेले. त्यांनीं ठाणीं खाली करून दिलीं. राहिली तींहीं जातील. चार पांच गढ्या पाडल्या. बाकीच्याही पाडावयाच्या आहेत. गढीबंदांकडून बाकीचा ऐवज येणें त्याचाही तगादा सध्या होत आहे. निदर्शनास येईल तें खरें. मिती फाल्गुन वद्य ११ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 597 30-3-1791 A.D.

Tukojeerao to Ahilyabai : The fort of Sonawa is captured. A couple of the forts of the Rohillas shares the same fate. Pressure of demand is urged upon some fort-holders for the arrears due.

---

**अ. नं. ५९८** **श्री**

ता. ३१ मार्च, इसवी सन १७९१

काशीनाथ अप्पाजी मुक्काम माहूरगड यांचे मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. तापतिलीच्या आजारामुळें श्रमांत आहे. महाराजांनीं बापूजी आनंदराव यांसी आज्ञा केली कीं, निरगुडीच्या पाल्यांत विटांचा शेख गोमूत्र विटास शिंपून करणें. त्याअन्वयें करीत असतों. आराम झाल्यावर सेवेसीं येऊन पोचतो.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 598 31-3-1791 A.D.

Kashinath Appajee from Mahurgad writes to Ahilyabai that he is

using the medicine advised by Her Highness.

---

**अ. नं. ५९९** **श्री**

ता. १६-४-१७९१

माधवराव लक्ष्मण हैदराबाद वकील यांचे मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष. हिंदुस्थान, दक्षिण, सर्वत्र तीर्थी व बारा जोतिर्लिंगांत महाराजांनीं थोडे बहुत घाट, देऊळ, हरएक कामें केली. मल्लिकार्जुनाजवळ कांहीं न ऐकिलें. तेथेंही एक दोन कामें घडोन यावी मोठी किंवा अल्प, हे आज्ञा आलियापुढें त्याचा नक्षा सेवेसीं पाठवीन. आज्ञा नसल्यास कळेल कीं महाराजांचे मर्जीत तेथें काम करावयाचें नसेल, म्हणून आजपावेतों कांहीं काम न झाले. मोठ्या श्रमाची यात्रा परंतु महाराजांचे आशीर्वादें कुटुंबसहित घडली. हा धर्म महाराजांचे प्रतापाचा आहे मल्लिकार्जुनास ज्योतिर्लिंगांत फार कैवल्यांत जाऊन तेथेंच आनंदात आहे. वर्षांत दोनतीन महिने पूजा होतात. मग नऊ महिने एक ब्राह्मण वतनी आहे. तो राहून ब्रम्हचर्याचें वृत करून एक नैवेद्य करून मलिकार्जुनास व त्या देवीस दाखवून मग आपण भक्षितो. मल्लिकार्जुन पूजा जंगमाची आहे. सालिना ५०००० पन्नास हजार रुपये देवांचे पूजेंत व यात्रेत दक्षणा येते. ती कर्तुळकर पठाणाकडे जाते. तेथून शंभर कोस श्री व्यंकटेश दैवत शेषाचे फणीवर आहे. एकच पर्वत आहे. क्षेत्र मनरथ येथें पूर्वी एक घाट तैयार झाला. त्याच घाटावर शिवालयाचे देऊन तैयार करावयास एक कारकून राजश्री गोपाळ नारायण आले. त्याबरोबर सरकारचें आज्ञापत्र व नबाबास थैली किनखापाची त्यांत पत्र पाठविलें तें या महिन्यांत १२ बारा रजबीं पाऊन त्यातील एक नक्षा देवळाचा लिहिला आहे. त्याचा उपराळा या दरबारांतून करवितो.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 599 16-4-1791 A.D.

The Holkar ambassador at Hyderabad writes to Ahilyabai : One Ghat is already built at Kshetra Manrath. Your Highness has sent a clerk with the purpose of erecting a Shiva temple on the Ghat. I shall try to enlist the active sympathies of this Durbar in that work. He gives full information about Malikarjuna Jyotirling also.

---

**अ. नं. ६००** **श्री**

ता. २१ जुलाई, इसवी सन १७९१

तुकोजीराव होळकरांचें काशीरावांस पत्र. फौजेचे पगारासंबंधीं मजकुर मातुश्रींस बोलण्यांत आणून मर्जीचे भाव कसे आहेत. ऐवजाची तरतूद कशी करतात हे समजून उमगून लिहून पाठविणें. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 600 21-7-1791 A.D.

Tukojeerao Holkar writes to his son Kashirao that he should introduce the topic of "pay to the army" to Ahilyabai and let him know in details her wishes.

---

**अ. नं. ६०१** **श्री**

ता. २१ जुलाई, इसवी सन १७९१

तुकोजीरावांकडून चि. काशीराव होळकर यांस विशेष. अलीकडे मजकुर रामपुरा आषाढ वद्य १३ सोमवारीं खालीं होऊन सरकारचे ठाणें कायम जाल्याचें वर्तमान ती. मातोश्री बाईसाहेबांस रोजगुदस्त लिहिलें आहे, त्याजवरून समजेल. येथें रहावयास कारण हेंच होतें. परंतु गुंता उरकला. अतःपर राजासी भाऊबंद व रजपूत बदलून आहेत. त्यांचे पारिपत्य करून मामलतीचा पैका द्यावा व राज्याचा बंदोबस्त करून द्यावा असें अगोदर तहसंबंधीं बोलण्यांत आहे. त्याप्रमाणें घडण्यांत यावें येविषयींची योजना होत आहे. फौज तोफखाना पाठवून लवकरच तजवीज केली जाईल. अशा प्रसंगीं लोकांचा गवगवा न व्हावा, लौकिकांत व्यंग न दिसावे यांजकरितां आगाऊ ऐवजाची तजवीज होऊन यावी. याअर्थी ती. मातोश्री साहेबांस लगट पाचचार पत्रें पाठविली व तुम्हांस लिहिण्यांत आलें. परंतु एकही उत्तर उगऊन न आलें. यास्तव हल्लीं मातोश्री साहेबांस तपशिली लिहिलें असे. तें तुम्ही मनन करून मजकूर बोलण्यांत आणून मर्जीचे भाव कसे आहेत, ऐवजाची तरतूद कशी करतात, हें समजून उगवून लिहून पाठविणें. मिती आषाढ वद्य ६ छ ९ जिल्काद सन १२०१ फसली. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 601 21-7-1791 A.D.

Tukojeerao Holkar to his son Kashirao. Rampura is brought under our rule. The Rajajee is soliciting our help and we must give it. But all that means money. Please open the topic to Her Highness and let me know her wishes.

---

अ. नं. ६०२ श्री

ता. ३० आगस्ट, इसवी सन १७९१

यशवंतराव गंगाधर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष. पेशजी साहेबी रामपुरा खुर्द जयपूरचे राजाकडून सरकारांत घेतल्याचीं पत्रें श्रीमंतांस व श्रीमंत नानांस व राजश्री हरीपंत तात्यांस आलीं होतीं. ती आज्ञेप्रमाणें देऊन श्रीमंतांस संतोष झाल्याचे सविस्तर पेशजी साहेबांस लिहिले आहे. त्याजवरून श्रवणांत आलें असेल. जाब द्यावयाची आज्ञा झाली होती त्याप्रमाणें जाब श्रीमंतांचा व श्रीमंत नानांचा असे दोन्ही तयार करून सेवेसीं पाठविले आहेत. प्रविष्ट होतील त्याजवरून ध्यानास येईल. रा. हरीपंत तात्यांचें पत्र तात्यांकडे लष्करांत रवाना केले. त्याचाही जाब आलेवर मागाहून पाठऊन देऊं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 602 30-8-1791 A.D.

Yeshwantrao Gangadhar - The Poona Ambassador of Ahilyabai : Your letters conveying the news of conquest of Rampura from the Jeypore Ruler were submitted to the Peshwa, Nana and Haripant. The Peshwa expressed his delight at the news.

---

अ. नं. ६०३ श्री

ता. २३ सप्टेंबर, इ. स. १७९१

मातोश्री अहिल्याबाई यांजकडून यशवंतराव गंगाधर यांस पत्र. विशेष. चिरंजीव राजश्री मल्हारराव पुण्यास येऊन दाखल झाल्याचें पत्र तुम्ही राजश्री सिवाजी गोपाळ याजला लिहिलें होतें, तेंच त्यांनीं इकडे पाठविलें. त्यावरून सविस्तर कळलें. चिरंजीवांनीं लहान माणसाचे नादी लागून बखेडे करावयास कमी केलें नाही परंतु राजश्री बाळाजीपंत नानांनीं तजविजीनें फोडफाड करून कांहीं जरबेनें व कांहीं कारस्तानें त्यांचे संरक्षण करून मसलत समेटून चिरंजीवास आपल्यापाशीं घेऊन गेले. ही गोष्ट फार चांगली, त्यांनीं आपले करण्यास उचित ते केली. अतःपर त्याजपाशीं त्याचे सलगीचें एकही माणूस कामाचे नाही. येथें एका माणसानिशीं येऊन प्रसर मनस्वीपणें करून या थरास आणिलें. याजकरितां त्याचे बोलण्याचा अथवा त्याजपाशीं माणसें असतील त्यांचा विश्वास न धरितां बंदोबस्त घडावा. तुमचे स्वाधीन करूं लागल्यास तुमच्यानें निक्षून बोलून जाबत्यांत ठेवणार नाही. तोहि राहणार नाही. आपले जिम्मेस केल्यावर तो आपले चालीने चालू लागल्यास तुम्हाकडे येविषयींचा शब्द येईल. राजश्री नानांचे करणें बहुत समंजसपणाचें व दूरदर्शीपणाचें तेव्हां ते अशी गोष्टच

करणार नाहीत. तथापि सूचना असावी. यास्तव हें पत्र लेखन केले असे. तरी तुम्ही चिरंजीवास आपले स्वाधीन करून न घेतां त्याची माणसें असतील ते दूर करून सरकारांतून चांगली खातरजमेची विश्वासू माणसें असतील ते ठेऊन खर्च तोडून बंदोबस्तीत सोईनें सरकारांतच ठेवावे. त्याचे सलगीचे एकही माणूस जवळ न राहे तें करणें. हें पत्र न दाखवितां जबानी बोलून पत्र विसर्जन करणें. रवाना छ २४ मोहरम सन १२०१ फसली.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 603 23-9-1791 A.D.

Ahilyabai to Yeshwant Gangadhar : She expresses her satisfaction at the way in which Nana has brought Malharrao round. She, however, cautions Yeshwantrao not to take charge of Malharrao, and asks him to request Nana to keep him under Government control with proper men and money. A hint is thrown that the letter should be destroyed.

---

**अ. नं. ६०४** **श्री**

ता. २५ सप्टेंबर, इसवी सन १७९१

तुकोजीराव होळकर यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. विशेष. इकडे महेश्वरींहून आल्यास चाळीस महिने होत आले. प्रस्तुत मलईंत आहे. बोलण्याच्या तडजोडींत पाराशर दादाजी व रामराव अप्पाजी आहेत. तेही कारस्थानीस कमी करीत नाहींत. परंतु आडचण सर्वतोपरी, यांस कोणाचा उपाय चालत नाहीं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 604 25-9-1791 A.D.

Tukojeerao informs Ahilyabai of the pitiable plight he finds himself in, all round. His ministers are trying their best.

---

**अ. नं. ६०५** **श्री**

ता. २१ आक्टोबर, इसवी सन १७९१

रामराव अप्पाजीकडून अहिल्याबाईंस पत्र. विशेष. साहेबीं पत्र आल्यांत आज्ञा कीं, वाटणी संबंधानें मजकूर येथून चि. रा. तुकबास लिहावयाचे तें लिहिलेंच आहे. तुम्ही तेथील

प्रसंगास जपून मागील रीतभात वडिलांपासोन चालत आहेत त्यात अंतर न दिसे ते करीत जाऊन घडेल तसे चिरंजीवाकडे व इकडे (अहिल्याबाईंस) लिहून पाठवीत जाणें म्हणोन आज्ञा. त्यास वाटणीचे वगैरे रीतिभातीचे जाबसाल येथें राजश्री महादजीबाबा शिंदे यांचे कारभारी यांशीं बोलत गेलो. त्यांचे म्हणणे पडत गेलें, आम्ही सेवक लोक आम्हांस यजमानाची आज्ञा येईल तें केलें पाहिजे.'' त्यावरून हा मजकूर येथून राजश्री तुकोजी बाबांकडे लिहीत गेलों. त्यांनीही सोबत्याकडे कोणास बोलावयास पाठवीत गेले. परंतु त्यांजकडून कोणतीही गोष्ट आपले मतलबाची घडून आली नाही. यामुळें तेव्हांच तुटकपणें बोलावें असें होतें. येविशीं दूरंदेशीचे विचार करून हिंदुस्थानांत आपसांत कमी न दिसावें व राठोडांची गुरमी विराल्यावर तेही वाटेवर येऊन घरचा जाबसाल सुलटून देतील. चिंता नाही. याभावें आजपर्यंत ओढाताण न करितां दम धरूनच होतो. सांप्रत लढाई मारल्यापासोन राठोड बजीद होऊन आपला द्यावयास होऊन वकील पाठविले.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 605 | 21-10-1791 A.D.

Ramrao Appajee to Ahilyabai : We were silent, for a while, on the question of distribution of territory. The Rajputana invasion was looming large before our eyes. The Rajputs are defeated, and are soliciting peace.

---

**अ. नं. ६०६** **श्री**

ता. २४ आक्टोबर, इसवी सन १७९१

तुकोजीराव होळकरांकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष. अलीकडे राजश्री अलीबहादर याचे कूच झाल्याचे व राजश्री महादजी शिंदे यांजकडील कारभारी येथें येऊन बोलणें झालें. त्याजबद्दल पुरवणीपत्रीं वर्तमान अलाहिदा लेखन केले आहे. तें मनन करून उत्तराची आज्ञा करावी. आज्ञेप्रमाणें वर्तणूक घडेल. शिंदे व बहादर यांचे नीट न पडल्यामुळें बहादूरचे कूच झाले. आम्ही त्याजविषयीं बोललों आहोंत. या मजकुराची संकलित पत्रें परभारें पुण्यास राजश्री अप्पाजी जाखदेव यांजकडे गेलीं आहेत. वडिलांनींही याविषयीं ल्याहावयाचे तें ल्याहावें. पुण्याची पत्रें अप्पाजी जाखदेव या पत्यावर आहेत. परंतु त्याचे जाब लवकर निघणार नाहींत. यास्तव वडिलांचा जिकडे सिलसिला चालत असेल तिकडे अथवा वडिलांची मर्जी असेल तिकडे लिहून पत्रांचीं उत्तरे लवकर येत ते झालें पाहिजे.

**सरकारी रेकार्ड**

No. 606 | 24-10-1791 A.D.

Tukojeerao Holkar to Ahilyabai : "Ali Bahadur could not pull on with Scindia, so he has left the camp. You will please write to Poona in the matter as you may deem fit. I have already addressed letters to the Poona Durbar through Appaji Jakhadeo."

---

अ. नं. ६०७ **श्री**

आक्टोबर, इसवी सन १७९१

लक्ष्मण नरहर (सबनीस) यांजकडून अहिल्याबाईंस पत्र विशेष. तीर्थरूप कै. सबनिसांचा काळ झाल्यानंतर आनंदराव बाळाजी सोबत पत्रें सेवेसीं पाठविली होती. तीर्थरूपांनीं महाराजांचे पायाचा आश्रय करून सेवा केली त्याचें सार्थक होऊन ते गेले. आम्हांस महाराजांचे पदरीं घातले आहे. महाराजांचे अन्नाचे पिंड आहे. याचें पालन करणार महाराज समर्थ आहेत. आम्हांस आपल्याशिवाय आधार नाहीं. सेवकाविशीं रा. महिपतरावजी विनंती करतील ती मनन करून सेवकास अभयपत्र यावें. वडिलांनीं साठ वर्षे आपली सेवा करून आम्हांस महाराजांचा आश्रय करून ठेविला आहे. येविशीं सेवकानें विस्तारें विनंती काय लिहावी? माझीही वृद्धावस्था झाली. निर्वाह करणार महाराज आहेत. याउपरि सेवकाची उपेक्षा केल्यानें प्राण वांचणें कठीण असे. कुटुंब घेऊन महाराजांपाशीं यावें असें मानस. येविसीं कृपा होऊन आज्ञापत्र पाठविण्यास आज्ञा केली पाहिजे. बहुत काय लिहिणें श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ २ रविलावल सन १२०१ फसली मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 607 October 1791 A.D.

Laxman Narhar to Ahilyabai : "My father served the Sarkar for Sixty years, and expired. I am now getting old, and desire to be near your Highness, with my family. I await your orders."

---

अ. नं. ६०८ **श्री**

ता. ५-१२-१७९१

सौ.रखमाबाई होळकर यांजकडून चि. काशीरावांस. विशेष. यशवंतराव फणसे यांस वाखा होऊन अष्टमीस देवआज्ञा जाली. मुक्ताबाई व दोघी कनिष्ठ स्त्रियांनीं सहगमन केलें. ईश्वरें मोठा अनर्थ केला. आपण यावयाचें करावें म्हणोन लिहिलें. ऐसियासी आम्ही ऐकतांच

यावे तो मधी अस्पर्शाचा गुंता जाहला. उदईक मंगळवारीं निघोन लवकरच येऊन पोहचतों. ती. मा. बाईसाहेबांवर दुःखाचे पर्वत झाले. तुम्ही वडिलांचें शांतवन करावे. वर्तमान ऐकल्यापासून कंबर बसून गेली. उपाय नाहीं. रा छ ८ रविलाखर बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. श्री मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 608 5-12-1791 A.D.

Saubhagyawati Rakhamabai to Kashirao (her son). We are grieved to hear the sad news of the death of Yeshwantrao Phanse. I start to see Ahilyabai for condolence visit.

---

**अ. नं. ६०९** **श्री**

डिसेंबर, इसवी सन १७९१

तुकोजीराव होळकर यांजकडून काशीराव होळकरांसः विशेष. तुम्ही पाठविलेलें पत्र पावले. यशवंतराव फणसे निधन पावले. मुक्ताबाई व नूतन दोघी स्त्रियांनीं सहगमन केलें. तीर्थरूप मातोश्री बाईसाहेब शोकसमुद्रांत निमग्न झाल्या आहेत. आपलें येणें होऊन शांतवन जाहल्यावांचून वृत्तीवर येतीलसे दिसत नाहीं म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐसियासीं वर्तमान येतांच चित्तास खेद जाल्याचा विस्तार कोठवर लिहावा. फारच आनुचित झालें. मातोश्री साहेबांस धोंडीबाचें दुःख विसरावें तो हें. ते विचारवंत म्हणोन त्यांनीं चित्ताचें शांतवन करून मुलीवर व जावयावर दृष्टी ठेविली होती. त्याचा प्रकार असा झाला, तेव्हां मातोश्रींचे शांतवन होते कसे आणि ऐकतील असा माणूस तरी कोण आहे? याजकरितां आम्हीच तेथें यावयाचा निश्चय केला आहे. इकडील अर्थ राहो अथवा बुडो. आम्हास त्यांजपेक्षा कोणतेही अधिक नाही. याउपरि लौकरच यावयाचें होत आहे. तोपर्यंत त्यांचें शांतवन होऊन त्या वृत्तीवर राहिल्या पाहिजेत. यास्तव तुम्ही तीर्थरूप मातुश्री समान मावशींस पुढें करून मातोश्रींचे पायांवर डोकी ठेऊन लेकुरपणें विनंती करून स्नान, भोजन करीत तें करणें. दुःखामुळें तुमचे कोणाचे ऐकणार नाहींत, तरी तुम्ही त्यांजपाशींच नेहमी बसून, जेव्हां ते अन्नसंस्कार करतील तेव्हां तुम्ही करणें. सारांश, आम्ही येऊन पोहचूं तों पावेतों कसेही करून त्यांजला कांहीं वृत्तीवर येत ती गोष्ट करणें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 609 December, 1791 A.D.

Tukojeerao Holkar to Kashirao (his son). I was very much grieved

to hear the sad news of the death of Yeshwantrao Phanse and of his three wives who went Sati. One of these was Ahilyabai's daughter. Ahilyabai's grief must know no bounds. Please keep company with her, and try to persuade her to take food etc.

---

**अ. नं. ६१०** **श्री**

ता. १६ डिसेंबर, इसवी सन १७९१

तुकोजीराव होळकरांचे अहिल्याबाईंस पत्र. विशेष. वडिलीं कोणतीही गोष्ट मनांत आणूं नये, माझी शपथ आहे, वडिलीं मी येतों तोंपावेतों दुसरी तिसरी कोणतीही गोष्ट मनांत आणूं नये. आणाल तर माझी शपथ. मी लौकरच येतों. मी पायाशीं येऊन पोहचतोंपावेतों वडिलीं कोठें जाण्याचा अथवा दुसरा तिसरा विचार, कांहीं एक करतील तर वडिलांस कैलासवासी तीर्थरूप सुभेदारांच्या पायाची व माझे गळ्याची शपथ आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 610 16-12-1791 A.D.

Tukojirao to Ahilyabai : "Please keep yourself calm. I am soon coming. The death of the daughter ought not to make you swerve."

---

**अ. नं. ६११** **श्री**

ता. १८ डिसेंबर, इसवी सन १७९१

नथ्याबाचे व मुलीचें दुःख वारंवार चित्तांत आणून उदासवृत्ती होऊन बहुत श्रमी होतात म्हणोन ऐकिलें. ऐसियासीं ईश्वरइच्छेकरून जाहली गोष्ट ते येत नाहीं. त्यासाठी सर्वदा श्रमी होत असावे हें ठीक नाहीं. अगोदरच शरीर अशक्त. त्यात वारंवार तेच ध्यानांत आणिल्यास चित्त व्यग्र होऊन शरीर प्रतिकूल होईल. वडिलांचे ध्यानांत सर्व गोष्टी असोन शांतवन न करणें अविहित. आमचेही चित्तांत वडिलांपाशीं यावयाचें फार आहे. परंतु इकडे मसलतीचे दिवस. याजमुळे विचार पडतो. तत्रापि कांहींसी सोय पडल्यास यावयाचे करून वडिलांस दुःखामुळे चैन नाही याजकरितां अंतःकरणास बहुत उदासीनता प्राप्त झाली. यास्तव वडिलीं वारंवार त्या गोष्टी ध्यानांत न आणितां चित्ताचे शांतवन करून उत्तराची आज्ञा करावी. मिती मार्गशीर्ष शुद्ध १२ श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ २५ रविलाखर सन १२०१ मुक्काम

महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 611 18-12-1791 A.D.

Tukojeerao repeats the same condolence, and says that plans of campaigns may prevent him from coming to see Her Highness in spite of his strong wishes.

---

**अ. नं. ६१२** **श्री**

ता. १९ डिसेंबर, इसवी सन १७९१

गंगाजळनिर्मळ अहिल्याबाई होळकर यांसी बाळाजी जनार्दन आशीर्वाद विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत असलें पाहिजे विशेष. यशवंतराव फणसे यांस देवआज्ञा जाहली. सौभाग्यवती मुक्ताबाई व धाकट्या दोघी स्त्रियांनीं सहगमन केल्याचे वर्तमान राजश्री यशवंतराव गंगाधर यानीं सांगितलें त्याजवरून कळलें. त्यास वाईट गोष्ट जाहली. वृद्धापकालीं आपल्यास बहूत दुःख जाहलें. ईश्वर इच्छा प्रमाण. यांस विवेकांवाचून दुसरा उपाय नाही. याजकरितां आपण विवेक करून चित्ताचे शांतवन करावें. आपण विवेकी आहांत. होणारास उपाय नाहीं. रा छ २२ रविलाखर बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंती.

२ ह्याच मजकुराचें शांतवनाचें पत्र श्रीमंत राजश्री माधवराव नारायण प्रधान ह्यांचे छ २४ रविलाखरचे आलें.

३ ह्याशिवाय शांतवनपर पत्रें. वकील मंडळी, नागपूर, हैद्राबाद, पुणें, जयपूर वगैरेचीं आली असून.

४ सेनासाहेब सुभा रघोजी भोसले यांचे शांतवनपर पत्र आलेलें आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 612 19-12-1791 A.D.

1 The Peshwa addresses a letter of condolence to Ahilyabai on the death of her son-in-law who is followed by his wives on funeral pile.

2 Nana Fadnavis writes to Ahilyabai : "You are gifted with calm discretion. Please be calm."

3 Sena Saheb Subha Raghoji Bhonsale participates in the grief.

4 Ambassadors from Nagpur, Hyderabad, Poona, and Jeypore sent condolence letters.

---

**अ. नं. ६१३** **श्री**

ता. २४ डिसेंबर, इसवी सन १७९१

तुकोजीराव होळकरांकडून अहिल्याबाईंस पत्र. विशेष. वडिलांचे पाय एकवेळ येऊन पाहवे असा हेतू आहे. त्याअन्वयें लवकरच यावयाचा बेत धरून वडिलांस विनंतीपत्र दोन तीन पाठविलीं तीं पावलींच असतील. इकडील गुंता उरकला म्हणजे चिरंजीवाची येथें ठेवावयाची योजना करून लौकर येत असों. वडिलीं माझे विनंतीस मान्य करून थोडें बहुत अन्न भक्षिलें पाहिजे. येविशीं वडील उदासीनतेमुळें निग्रह करतील तरी माझी शपत आहे. आमचे येण्यास गुंता. (जयपुरांकडील भेटीचा) तो शुद्ध ५ स उरकेल. नंतर यावयाचें करितो. मिती मार्गशीर्ष वद्य १४ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ १९

**सरकारी रेकॉर्ड**

No. 613 24-12-1791 A.D.

Tukojeerao writes to Ahilyabai that as soon as the Jeypore affair is over he will be coming near Her Highness.

---

**अ. नं. ६१४** **श्री**

इ. स. १७९१

यादी दक्षिण प्रांत व खानदेश प्रांत येथील उत्पन्न पाटीलक्या व देशमुख्या व जहागिरी, राउळक्या वगैरे बाबी गुजारत शिवराम पाटील हुजूरवतन संबंधी तपशील.

| | |
|---|---|
| २७००-००-० | श्री पंढरपूरचे भाड्याबद्दल रु.१२०० व जहागीर गांवबद्दल रु.१५००. |
| २२००-००-० | श्री जेजुरी येथील श्री खंडेरायाचे उत्पन्न. भाड्याबद्दल ५००, देवाचा बाग ६००, खंडेरायाची पूजा रु. ११०० एकूण २२००. |
| ४००-००-० | पुणें येथील सरकारी बाग आहे त्याचे दरसाल, चारशें, पाचशेंपर्यंत. |
| २५०-००-० | पुणें येथील वाड्याचे भाड्याबद्दल. |
| १२५-००-० | खडकीवर छावणी आहे ती जमीन आपली. परंतु ती जमीन कुणब्यास लावून देतात व त्याठिकाणी सवाई मल्हारराव व लाख्या बारगीर या उभयतांस देवआज्ञा झाली. |
| २०२५-००-० | प्रगणे सुपे येथील गावडकीचे. |
| ६०-००-० | होळमुरुम बिघे ६० दर बिघा रु.१ प्रमाणें इनाम वतन. |
| ५००-००-० | मौजे मारवाडी प्रगणे पालगांव पंढरीचे पलीकडे आहे तेथील पाटीलकी. |
| ६२५-००-० | मौजे वाफगांव येथील गुजारत खंडपाटील, देशमुखी, पाटीलकी निम्मे. |

१३१-०८-० '' बिबवी येथील गुजारत सखाराम रामचंद्र पाटीलकी निम्मे.
२५०-००-० मौजे डामोग्राम येथील इनाम.
७५-००-० मौजे तलवड येथील पाटीलकी.
१५-००-० मौजे बाबूलगांव इनाम.
२७-००-० मौजे दिलखेड येथील पाटीलकी निमे व मोकदमी.
५०-००-० मौजे कादरी चंदनपुर येथील मोकदमी निमे विद्यमान रामदासभाई.
७५-००-० मौजे प्रकाशे मोकासा.
६२५-००-० मौजे अडगांव व वडझरे व पांडे देह ३ येथील दखलगिरी आपाजी त्रिंबक.
६७५-००-० मौजे न्याहळोद येथील निम्मे पाटीलकी सखाराम गुमास्ता.
२६१-००-० मौजे कापडणे निमे पाटीलकी विद्यमान आनंदराव राजाराम कारकून.
२४०-०२-० '' मांडल परगणे डांगरी येथील पाटीलकी निम्मे गुजारत श्रीपतराव.
३०-००-० '' मुकटी येथील पाटीलकी.
४०-००-० मौजे वडजाई येथील हिश्शाबद्दल.
७०-००-० '' पिपरी इनामी वसूल.
१०-००-० '' निमखेड इनाम बिघे.
४५०-००-० '' थालनेर येथील निम्मे मोकदमी गुजारत कारले पाटीलकी.
१०-१०-० मौजे कुरखेडी येथील इनाम.
१४५-००-० मेंढराचे खिल्लारची चुकोती.
१०००-००-० मौजे करवंदबारी येथील रावलकी निम्मे उत्पन्नाबद्दल.
६६-१०-६ '' कोरेगांव येथील पाटीलकी गुजारत शामराव कारकून.
८९८-०१-० '' मजकूर येथील पाटीलकी गुजारत माधवराव त्रिंबक कारकून निमे.
१४८-१४-० '' लोणी एकजात श्रीगोंदे पाटीलकी निमे गुजारत बापू साजवणे.
१४३-१४-० '' कसबे आळे येथील पाटीलकीचा तिसरा हिस्सा विद्यमान भिकाजी जाधव.
८०७-०५-३ कसबे मांडवगण येथील पाटीलकी. यादवराव यशवंत गुमास्ते कारकून.
२६१-१५-९ '' कोरहाळे बमयवाडासुद्धा मोकदमी निमे गुजारत भवानी जयराम.
४०७-०६-० मौजे अस्तगाव येथील पाटीलकी व देशमुखी व आवटकी दरोबस्त.
३१-१३-६ '' रूई येथील मोकदमी चौथाई गुजारत खंडोजी जाधव.
३९-०८-० मौजे निघोज येथील मोकदमी हिस्से तीन विद्यमान खंडबा जाधव.
१०६-०२-६ '' कलवेड येथील देशमुखी गुजारत कचले धोंडोजी देह तीन, निम्मे पाटीलकी.
३०-००-० मौजे दातली येथील देशमुखी.
४३-०४-० '' पारनेर परगणे अंबाड येथील पाटीलकी दरोबस्त गु. विठुजी.

| | |
|---|---|
| २०००-००-० | कसबे गाळणा येथील देशमुखी दरोबस्त. |
| ७२५-००-० | सरकार संगमनेर येथील ३६० गांवची गाउडकी सरकारची आहे. |
| ३२०००-००-० | कसबे वाफगांव वगैरे देह ९ येथील आकार. |
| ३५०००-००-० | कसबे चांदवड प्रांतीचे नवगांव येथील जहागिरी. दरगावी इनाम चाहूर २. |
| ८०००-००-० | '' चांदवड येथील पाटीलकीबद्दल उत्पन्न. |
| २०००-००-० | मौजे चिंचुदी येथील पाटीलकी गुजारत हिराजी जगताप. |
| ४०००-००-० | '' नगरसूल येथील पाटीलक्या दरोबस्त, सखाराम पाटील. |
| ३०००-००-० | मौजे पेठ येवले येथील पाटीलकी दरोबस्त निमे नाइक, निमे सरकार. |
| १५०-००-० | कसबे जामगांव येथील पाटीलकीचे उत्पन्न. |

येणेंप्रमाणें असे.

No. 614 1791 A.D.

A list of the various hereditary Vatans held by the Holkar Sarkar in Khandesh and the Deccan.

---

## अ. नं. ६१५ श्री मार्तंड भैरव प्रसन्न

ता. २ जानेवारी, इसवी सन १७९२

निफाडहून नीलकंठराव तुकदेव चिटणीस यांजकडून मातोश्री अहिल्याबाईस विशेष. आम्ही श्रीमंत सुभेदार व खंडेराव बाबा, मालेराव बाबा कैलासवासी झाल्यादारभ्य इन्दुरीहून घरी बसलो. आपणापाशींहि न आलों. मातुश्री चा वृद्धापकाळ यामुळें राहिलों तों आमचे स्त्रीस देवआज्ञा झाली. मुलें लहान. हें ईश्वरें वाईट केलें. असो. श्रीमंत रा. तुकोजीरावही नेत होते ते न गेलों. दरख चिटणिसीचा चालू करावयास दहा हजार नजर द्यावे, म्हणत होते. आमचें जाणें न झालें. आतां चिरंजीव रा. मैराळराव बापू आपल्या जवळ आहेत. फार उत्तम आहे. आम्हांपासून रुसून गुजराथेंत जात होते. तो उंबरण्याचे तळावर चि. रा. मल्हाररावबाबांची भेट झाली. आमची पागा व पालखी सरंजाम घरी पोहचविला. चिरंजीवास पांच सात घोडीं बसावयास याप्रमाणें सडे ठेविलें. इकडे दाजिबा विंचुरीं आले. त्याही आम्हांस व मातुश्रीस धरून नेलें. त्याजला परभारी सरकारी पत्रें आली. मग सोडले. याप्रमाणें श्रीनें दोष श्रीमंत शाहू छत्रपती व कैलासवासी सुभेदार साहेबांपासून न लागला तो दैवास आणिला. ही लज्जा आपणास असावी. पूर्वी श्रीमंत सुभेदार, राजश्री गंगाधरपंत तात्याही दरमहा रुपये २२५ रोजमुरा व नालबंदी, घरबेगमीस रुपये ४००० व पालखीस रुपये ६०० सरंजाम व सणगे दसरियास व पाडवा आंख रुपये १२०० दर पोशाखास सणगे साडेतीन प्रमाणें देऊन सवा

चौदाशें लोकानिशीं चाकरी घेत होते. आतां आपण वडीलधनी आहांत. कळेल त्या रीतीनें मुलास रीतीस लावून सन्निध ठेवणें. याची लज्जा सर्व आपणास असावी. चिरंजीव ओटींत आहे. अपराध क्षमा करून पावन करावे बहुत काय लिहिणें लोभ वृद्धी करीत असावी हे विज्ञप्ती. पैवस्त छ.२१ जमादिलाखर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 615 2-1-1792 A.D.

Nilkanthrao Chitnis from Niphad narrates to Ahilyabai his past happy history and the present plight he is reduced to. Requests Ahilyabai to take his son under her protection.

---

**अ. नं. ६१६** **श्री**

ता. २ जानेवारी, इसवी सन १७९२

मल्हार सोयराजी मुक्काम निंबाहेडा यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंचे नांवें. विशेष. राजश्री राणेखानभाईस देवआज्ञा झाली. त्याचा ताबूत करून घुसोड्याचे बागांत ठेवला आहे. चाळीस दिवस झाल्यावर ताबूत देपूरचे बागेत पाठविणार आहेत. भाईस देवआज्ञा झाली त्याचे दुसरें दिवशीं आसपास चौक्या बसविल्या आणि सावकारांत सांगून पाठविलें कीं, रा. राणेखानभाईचें देणेंघेणें असेल ते आणोन सरकारांत दाखवणें. मागेपुढें देणेंघेणें सरकारांतून चौकशी केल्यावर निघाल्यास मुलाजा होणार नाहीं. अशी ताकीद सावकारांस दिली त्यावरोन सावकारांत दोन लक्षाचा माल ठिकाणीं लागला म्हणोन वर्तमान आहे. चौक्या त्यांचे डेरियासभोवतीं आहेत.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 616 2-1-1792 A.D.

Malhar Soyarajee of Nimbheda to Ahilyabai : Sends news of the death of Ranekhan Bhai. The Government have notified that debtors as well as creditors of the deceased should submit their accounts.

---

**अ. नं. ६१७** **श्री**

ता. ९ जानेवारी, इसवी सन १७९२

तुकोजीराव होळकरांकडून चि. काशीरावास पत्र विशेष. शुद्ध १५ सोमवारीं जयपूर राजाची स्वारी आपले डेरियास येऊन बोलणीं चालणीं रहस्याची, विचाराची होऊन शिष्टाचार यथायुक्त जाहला. राजे पांच घटकापर्यंत होते. ज्यांत उभयतांचा संतोष ते गोष्ट घडून, उभयपक्षीं संतोष पाऊन राजे आपल्या डेरियास गेले. याउपर फौजेसुद्धां चिरंजीवास ठेवणें किंवा कसें तें लिहून येईल तसे ठरेल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 617 9-1-1792 A.D.

Tukojeerao to his son Kashirao : Reports the happy meeting between himself and the Jeypore Raja. He awaits further communications regarding his son's future progress.

---

**अ. नं. ६१८** **श्री**

जानेवारी, इसवी सन १७९२

काशीराव होळकरांकडून तुकोजीराव यांस पत्र. विशेष. रुपये ५०००० पन्नास हजाराची हुंडी पाठविली ती पाराशर दादाजीस न दाखवितां परभारे भरपाई करून ऐवज अमानत ठेवला हे वर्तमान येथें मातोश्री साहेबांस कळल्यावर बहुत रागें भरल्या कीं, आधीचे कारभारियास असेंच भिवून जड केला. तेव्हां तो न मानतां हिसके देऊं लागला. आतां कारभारियाशी चोरून काम करणे चांगलें नाही. धनीपणाचा हुकूम ठेऊन जें करणें तें करीत जावे म्हणजे माणूस दबत राहून ओढ करूं पावत नाही. जी गोष्ट ऐकायाची ती ऐकावी न ऐकावयाची ती ऐकूं नये. या उपरि करणें ते आपल्या अखत्यारानें होत जावें म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 618 January, 1792 A.D.

Kashirao Holkar to Tukojeerao : Says that Ahilyabai was displeased at the latter's conduct in concealing the promissory note of Rs. 50,000/- from Parashar Dadajee. Line of proper conduct between Master and Minister is incidentally chalked out.

---

**अ. नं. ६१९** **श्री**

ता. १ फेब्रुवारी, इसवी सन १७९२

तुकोजीराव होळकरांकडून अहिल्याबाईंस पत्र. विशेष. चिरंजीव मल्हारराव पुण्यांत आहे. याजमुळें इंदुरीहून बोलण्यांत येतें म्हणोन ऐकिण्यांत आहे व शिंदे देशीं जाणार ते गेलियावर उगेच उमज उठतील. यास्तव यांचे जाण्याअगोदर त्याजला इकडे आणलें पाहिजे. यास्तव येथून राजश्री यशवंतराव गंगाधर यांस पत्रें आपले जमियतीनें तो सुद्धा यावयाचा नाही. श्री मतांकडील जमियत मागून घेऊन बळकटीनें रवानगी करण्याविसीं लिहून वडिलांकडे रवानगी केली ते पत्रें पावली असतील आणि पुढें वडिलीं रवानगी केली असेल. त्याच अन्वयें वडिलांची पत्रें मशारनिल्हेस व धन्यास आलिया राजश्री बाळाजीपंत नाना यांस जाऊन श्रीमंतांची जमियत ऐवज दिल्याखेरीज येणार नाही. येविसीं अगोदर त्यांस लिहिण्यांत आलेच आहे. पुन्हांहि पांच रुपये द्यावयाचे करून रवानगी करण्याविसीं लिहिण्यांत यावे. राजश्री नानांची कायम मिजासी असावी येविसींहि त्यांजला दर्शविण्यांत वरचेवर येऊन तिकडील बंदोबस्त अगोदर केला पाहिजे. वडिलांचे केल्यानें सर्व घडेल. मिती माघ शुद्ध ९ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 619 1-2-1792 A.D.

Tukojeerao Holkar to Ahilyabai : Please write to Nana that men from the Peshwa's military should accompany Malharrao on his way to Maheshwar. Payment will be made by us.

---

**अ. नं. ६२०** **श्री**

ता. ९ फेब्रुवारी, इसवी सन १७९२

मकाजी गीते मुक्काम उदेपूर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. प्रस्तुत येथील चरित्र पाहिले तो सर्व प्रकारें धणीपण व मरदुमी ते सर्व पाटीलबाबांची आहे. त्यासी होळकर सुभेदार कांहीं पदार्थ नाही. त्यास पूर्वीचे खत श्रीमंत कै. सुभेदार यांच्या हातचे रुपये पंधरा लक्षाचें आहे. तें बजिन्स श्रीमंत सुभेदारांपाशीं आहे. पत्राचे उत्तर लौकर यावें म्हणजे कार्यास लागू व आज्ञा कराल तर तेंही करून दाखवूं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 620 9-2-1792 A.D.

Makajee Gite from Udaipur informs Ahilyabai of the high influence Shinde wields. The late Subhedar held a bond of 15 lacs paid to Scindia. He awaits her orders.

---

**अ. नं. ६२१** **श्री**

ता. १२ फेब्रुवारी, इसवी सन १७९२

तुकोजीराव होळकर यांजकडून अहिल्याबाईंस पत्र विशेष. म्हाळोजी पिंगळे स्वारीत चि. रा. काशीराव याजबरोबर गेले होते. मारवाड प्रांतीं मेडत्यानजीक राठोडाशी लढाई झाली. तेथें पिंगळे मशारनिल्हेनीं मोठे हिमतीनें लढून सरकारचाकरीवर कामास आले. यास्तव यांचे बंधु रा. शहाजी पिंगळे व पुत्र विठोजी पिंगळे यांचे चालविणें उचित समजून यांजला हरएक महालपैकीं एक गांव संसाराचे बेगमीस द्यावयाचे निश्चयांत आणोन, उभयतांची रवानगी चिरंजीव काशीराव याजसमागमें वडिलांकडे करून हें पत्र लेखन केलें असे. तरी वडिलीं हर एक महालपैकीं एक गांव यांचे संसाराचे बेगमीस करार करून देऊन सनदा करून देविल्या पाहिजेत. मिती माघ वद्य ४ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 621 12-2-1792 A.D.

Tukojeerao to Ahilyabai : Mhalojee Pingle met a hero's death on the field. It is but proper that the Sarkar should make provision for his brother and son. A proposal of awarding one village in each mahal is submitted.

---

**अ. नं. ६२२** **श्री**

ता. १८ फेब्रुवारी, इसवी सन १७९२

तुकोजीराव होळकर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. राजश्री नारो गणेश यांचे समागमेंमुळें चाल वेगळी पडत गेली याजमुळें, वडिलांचे मनांत अनेक प्रकारचे कल्प येत गेले. ते दूर होऊन वडिलांचा हुकूम असावा याविषयीं अंतःकरणांत येत गेले. परंतु देशीं राहणे जाहलें त्यामुळें गोष्ट न घडली व महेश्वरीं आल्यावर दूर्निमित्य वडिलांकडे नसावें अशा विचारें वडिलांपाशीं विचार देखील न करितां इकडे आल्यावर इतिकर्तव्यता करावयाची होती ते केली. महालखेडीं बायकामुलें इत्यादि सर्वत्र वडिलांचे आज्ञेत राहून, वडील पोटास देतील ते भक्षून आज्ञेप्रमाणे वर्तावें. वडिलांच्या छायेखाली आयुष्य घालून असावें अशी इच्छा आहे. त्याप्रमाणें सर्वांस आज्ञा सक्तीने वर्तवून निभावणें वडिलांकडे आहे. वडील निभावतील तसे निभेल. दुसरा अर्थ किमपि नाही. श्रीमंतांचे दरबार साधन राखणे, सोबती प्रबळ आहे त्याचा वार आपलेवर न चालतां ते मार्गानें चालून दौलतीचें स्वरूप वाढविणें व घरचा बंदोबस्त करणें, हे तीन अर्थ वडिलांकडे आहेत. येविषयीं आम्हास लिहून आमचें उत्तर येईल तितकेच पुण्याकडे लिहावें, अथवा औदासिन्य धरून कशांतहीं मन न घालावें,

हे सर्वात्मना युक्त नाही. मर्जीस येईल तसा बंदोबस्त करून आम्हास आज्ञा लिहिणें तसें लेखन करीत असावें. नारो गणेश याचा कारभार निघाला तो पुन्हा बदलतो असा अर्थ नाहीं. येविसीं वडिलांची खंबीरता आहेच आणि इकडूनही दुसरें मनांत येईल असें नाहीं. याप्रकरणीं कोणीं बोलूं लागल्यास वडील कसें ऐकतात व आम्ही कसें ऐकूं, हे सर्वात्मना व्हावयाचें नाहीं. मिती माघ वद्य ११ सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ २ रजब.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 622 18-2-1792 A.D.

Tukojeerao to Ahilyabai : Expresses his repentance for the past, and solicits her guidance for the future, assuring his unconditional submission to her orders and will.

---

**अ. नं. ६२३** **श्री**

ता. १९ मार्च, इसवी सन १७९२

तुकोजीराव यांजकडून चि. काशीराव होळकर यांस विशेष. येथे तूर्त कामाकाजाचे दिवस. चि. विठोबा व यशवंतराव तेथें आहेत. त्यांतून एकजणानें येथें यावें. कोठें जाण्यायेण्यास उपयोग होऊन कामकाज आटपील, यांजकरितां लिहिले असे तरी तुम्हीं ती. मातुश्री बाईसाहेबांची मर्जी पाहून युक्तीनें त्यांचेविशीं विचारून चिरंजीव विठोबास पाठवून देणे म्हणोन,

**सरकारी रेकॉर्ड**

No. 623 19-3-1792 A.D.

Tukojeerao to Kashirao Holkar : Please arrange, with the permission of Ahilyabai, to send either Vithoba, or Yeshwantrao here. (both are Tukojee's sons.)

---

**अ. नं. ६२४** **श्री**

ता. १९ मार्च, इसवी सन १७९२

श्रीमंत पंतप्रधान पेशवे यांचें अहिल्याबाईंस पत्र. विशेष राजश्री सुभेदार तुकोजी होळकर व आपण एकवाक्यतेनें घर चालवावें व आपले दौलतीचा रीतीनें बंदोबस्त करून

सरकारचें लक्ष धरून पहिल्या चालीप्रमाणें चालावें म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 624 19-3-1792 A.D.

The Peshwa advises Ahilyabai on the utility of union between herself and Tukojeerao, (ii) Proper management at home, and (iii) diligent attention to the service of the Sarkar.

---

**अ. नं. ६२५** **श्री**

ता. २९ मार्च, इसवी सन १७९२

तुकोजीराव होळकर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र विशेष. रा. मुकुंद हरी यांचे हातें दिवाणगिरीचे 'निशाणाचे' काम घेऊं नये येविशीं एक दोन वेळां लिहिण्यांत आले, त्याचे उत्तर येथें कोणी योजून पाठविल्यास त्याचे हातें काम घेण्यांत येईल. तूर्त जवळ कोणी नाही. यास्तव काम घ्यावें लागतें, या भावें आले. त्यासी प्रस्तुत तेथें राजश्री गोविंद रघुनाथ गानू आले आहेत म्हणोन ऐकण्यांत आलें. त्यावरून विनंतीलेखन केली असे. तरी मुकुंद हरी यांस कामांत न घेतां मखलसीचे काम गोविंद रघुनाथ यांजकडे सांगितलें पाहिजें. पुढें वडिलांची आमची भेट होऊन कारभार ज्यांजकडे होईल त्याचे तर्फेचे कारकुनाचे हातें काम घ्यावयासी तूर्त अमानीदाखल मशारनिल्हेकडे काम सांगितलें पाहिजे. दुसरा कोणी योजावा तर योग्यता पाहिजे आणि यांजकडे खाजगीकडीलही काम आहे. त्यापक्षीं याचेंच हाते चार दिवस काम घेतल्यास चिंता नाहीं. याउपरि मुकुंद हरी याचे हातें काम घेणें ठीक नाहीं. याचा विचार वडिलांचे ध्यानांत आहेच. मिती चैत्र शुद्ध ७ सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 625 29-3-1792 A.D.

Correspondence between Tukojeerao and Ahilyabai on the point of selection between Mukund Hari and Ganu as officiating Karbhari.

---

**अ. नं. ६२६** **श्री**

ता. २९ मार्च, इसवी सन १७९२

तुकोजीराव होळकर यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. विशेष. वडिलीं ज्या कामांत मन घातलें त्या कामांत कोणाचीही बुद्धी चालून न्यूनाधिक्य निघेल असें नाहीं. वडिलांचे करण्यासीं व दुसरियाचे करण्यासीं महदंतर आहे. आज्ञेप्रमाणें इकडेही या उपरि महालचे फडशे होणें ते वडिलीं शिरस्ता घातला याचअन्वयें होतील. तिकडे स्वदेश खानदेशचीं खेडीं वगैरे राहिली आहेत. त्यांचेही फडशे करून द्यावे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 626 29-3-1792 A.D.

Tukojeerao expressess his entire satisfaction on the result achieved by Ahilyabai in settling accounts of Mahals. He requests her to complete the whole work, mentioning villages on the side of Khandesh, etc.

---

**अ. नं. ६२७** **श्री**

ता. २९ मार्च, इसवी सन १७९२

यशवंतराव गंगाधर पुणें यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. विशेष. यशवंतराव फणसे निधन पावलेवर सौभाग्यवती मुक्ताबाईनीं सहगमनसमयीं सांगितलें कीं, रेवा मूल नाळेसुद्धां सापडला आहे तो घेऊन संस्थान चालवावें. त्यावरून विचार पाहतां भाऊबंद जवळ असतां केवळ रेवाजीच अधिकारी करावा असे नाही. याजकरितां राणोजी फणसे याचा मूल अप्पाजी फणसे व रेवाजी असे दोघे विधानयुक्त दत्तक घेऊन अधिकारी केले हे वर्तमान राजश्री बाळाजीपंत नानांस श्रवण करणें म्हणोन आज्ञा. त्यावरून श्रीमंत राजश्री नानांस विनंती केली. त्यांनीं संतोष मानून उत्तम केलें म्हणून आपल्यास ल्याहावयास सांगितले आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 627 29-3-1792 A.D.

Yeshwant Gangadhar from Poona informs Ahilyabai that Nana Fadnavis was pleased to hear the arrangement made by Ahilyabai regarding the adoption in the Phanse family. The arrangement satisfied the desire of the deceased as well as lagal claims of the family.

---

**अ. नं. ६२८** **श्री**

ता. २ एप्रिल, इसवी सन १७९२

तुकोजीराव होळकर यांजकडून अहिल्याबाईंस पत्र. विशेष. राजश्री यशवंतराव गंगाधर यांचीं पत्रें आलेली बजिन्स पाठविलीं आहेत. त्यांनीं कासीदांची डाक बसवावयाकरितां लिहिलें व तुमचेहि लिहिणेंत होते, त्यावरून सेंधव्याचे मार्गे डाक बसवावयाची योजना केली आहे. सोबती ब्राह्मणपुरीहून परभारें बिडाकडे गेले. यात्रा करून चैत्रआखेर पुण्यास जातील असा बेत दिसतो, म्हणून पत्रीं आज्ञा. त्यास डाक बसवावयाची योजना वडिलीं केली, उत्तम आहे. सोबत्याकडील वर्तमान येत जाईल तसें लेखन करावयास आज्ञा होत असावी. राजश्री अलीबहादूर यांजकडे कागदोपत्रीं सिलसिला राखून आपला उपयोग त्यास, त्यांचा उपयोग आपल्यास, यास जपणें म्हणोन लिहिले. त्यास मशारनिल्हे समागमें असता त्यांसी स्नेह वाढविण्यास कमी केलें नाहीं व कागदोपत्रींहि सिलसिला आहे. उपयोगाचा अर्थ पाहतां तूर्त ते बुंदेलखंडांत व आम्ही इकडे, लांबणीचा प्रकार, तत्रापि प्रसंगीं उपयोगी पडावे असे राखून ठेविलें आहे. मिती चैत्र शुद्ध १० सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ १४ साबान चैत्रमास सन १२०१.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 628 2-4-1792 A.D.

Tukojeerao to Ahilyabai :

(1) Postal arrangement between Sendhwa and the camp as made by Ahilyabai is agreeable.

(2) I have kept good and friendly relations with Ali Bahadur.

---

**अ. नं. ६२९** **श्री**

ता. ११ एप्रिल, इसवी सन १७९२

भारमलदादा होळकरांचें अहिल्याबाईंस पत्र. विशेष. फिरंग्याचें वर्तमान तरी भोपाळचे सुमारें गेले. सौभाग्यवती राधाबाई बुळे (मुक्ताबाई फणसे यांची लेक) ह्यांचा मनोदय महाराजांकडे यावयाचा आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 629 11-4-1792 A.D.

Bharmal Dada Holkar to Ahilyabai : The Firangi army went in the direction of Bhopal.

Mrs. Radhabai Bule expresses a desire to see Ahilyabai.

---

**अ. नं. ६३०** **श्री**

ता. १४ एप्रिल, इसवी सन १७९२

नारायण गोविंद कमाविसदार संस्थान देवळे यांस अहिल्याबाईंकडून ताकीद पत्र. विशेष. संस्थान मजकूरबद्दल पत्र सादर केलें असे. तरी तुम्ही संस्थानिकांसीं बाकी व साल मजकुरसुद्धां ऐवजाची तजवीज करून त्याजकडील कामदार व तुम्ही उभयतां जाबसालाचे कागदपत्र दस्तऐवजी जे असतील ते दरोबस्त घेऊन पत्रदर्शनीं हुजूर येणें.

चिरंजीव तुकबांनीं तुम्हांस व संस्थानिकांस पांचचार वेळा लिहिलें असोन ऐवजाचा निकाल घडला नाही. ऐवजाचा निर्गम होऊन मागील हिशेबाचा फडशा झाला पाहिजे. तुम्ही आजचे उद्यांवर टाकून काळहरण केल्यास सरकारांतून वराता होतील, संस्थानिकांची व तुमची स्थिती राहणार नाहीं. याजकरितां लिहिल्याअन्वयें जल्द यावयाचें करणें. सटवाजी जासूद व नथो भवानी नाईक यांजला पाठविलें आहे. त्यास रोजमुरा एक रुपया देऊन पावती घेणें. जाणिजे छ २१ साबान बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 630 14-4-1792 A.D.

The Kamavisdar of Sansthan Deole is commanded by Ahilyabai to see her with all the account papers and with officer of the said Sansthan. Payment of arrears is urged.

---

**अ. नं. ६३१** **श्री**

ता. १ मे, इसवी सन १७९२

अहिल्याबाईंकडून सावकार तिलोकसी पदमसी यांस. श्री पंढरपूर येथें अन्नछत्राचे बेगमीकरितां तुम्हाकडून देविले रुपये ३००० तीन हजार. तरी सदरहू रुपये पुणियांत चांदवड शिक्का तुम्हांकडे आंबाड वगैरे वराता दिल्या आहेत, त्याऐवजीं रा. गोपाळ नारायण कारकून यांजकडे देऊन कबज घेणें. जाणिजे छ २ रमजान बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 631 1-5-1792 A.D.

Ahilyabai received Rs. 3,000 from Tiloksey Padamsi for providing the alms-house at Pandharpur.

---

**अ. नं. ६३२** **श्री**

ता. ८ मे, इसवी सन १७९२

यादी कासीदाची डाक लष्करपासोन महेश्वरपर्यंत आहे. त्याप्रमाणें महेश्वरपासोन पुणियापावेतों बसवावयाकरितां कासिद येणेंप्रमाणें सुाा इसनेतिसेन मयावतलफ.

कोस सुमार

४० महेश्वरपासोन थालनेरपर्यंत कोस.

४० थालनेरीहून चांदवडपर्यंत कोस.

३० चांदवडहून संगमनेरपर्यंत कोस.

४२ संगमनेरीहून पुणियापर्यंत कोस.

.....

१५२

यांसी कासीदजोड्या पांच कोसांवर जोडी एक १ प्रमाणें जोड्या ३४ यांस दरमहा रुपये.

२४० डाकचौकीच्या जोड्या ३० असाम्या ६० दर ४ प्रमाणें रुपये.

४८ सरबराईच्या जोड्या ४ असाम्या ८ दर ६ प्रमाणें.

......

२८८

दोनशें अठ्यांशी रुपयांची चिठ्ठी देणें.

पैवस्त छ २५ रमजान वैशाख मास मुक्काम महेश्वर.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 632 8-5-1792 A.D.

Postal arrangement between Maheshwar and Poona. Its cost and stages as ordered by Devi Ahilyabai.

---

**अ. नं. ६३३** **श्री**

ता. ११ मे, इसवी सन १७९२

अहिल्याबाईंकडून चि. रा. तुकोजी होळकरांस पत्र. विशेष. तुम्हाकडून पत्रें येत गेली कीं लोकानीं गवगवा आरंभिला आहे. पदमसी तिलोकसी सावकार याजकडील मागील सोडतीन लक्ष रुपये देणें हे स्वदेश खानदेशचे महाल ऐवजी लावून द्यावयाविशीं खुलासा लिहिले आहे. हा ऐवज पटल्याखेरीज पुढें सावकार ऐवज देत नाही आणि लोकांची तर निकड. यास्तव ऐवज सत्वर पटे ते झालें पाहिजे म्हणोन. त्याजवरोन तेथील अडचणीचा प्रकार जाणोन मशारनिल्हेस तुमचे लिहिल्याअन्वयें स्वदेश खानदेशचे महालीं साडेतीन लक्षांच्या वराता लावून दिल्या आहेत. परंतु ऐवज पटावयास चार दिवस अधिक उणे लागतील. तेथें भोइटे वगैरे लोकांनीं धरणीं बसविलीं. तेव्हां ऐवजाखेरीज तोड पडणार नाही. याजकरितां त्या ऐवजी सावकार मजकुर याजपासोन अनुपचंद गुमास्ते यांचे विद्यमानें हुंडी भाद्रपद वद्य ६ शके १७१३ विरोधीकृत नामसंवत्सरे या मितीपासोन एकतीस दिवसांचे मुदतीची लष्करचलणी ऐवजाची घेऊन पाठविली. मुदतीप्रमाणें ऐवज पटवून घेऊन पावल्याचें उत्तर पाठविणें म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 633 11-5-1792 A.D.

Ahilyabai to Tukojeerao : In reply to his urgent demand she sends Hundi to relieve him of his distressed position. The Sowkar is to recover the amount out of the revenue of Khandesh and Svadesh Mahals.

---

**अ. नं. ६३४** **श्री**

ता. ८ जुलाई, इसवी सन १७९२

अलीबहादर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष. आपण पत्र पाठविलें ते पावलें. बहूत संतोष झाला. असेच निरंतर पत्रीं संतोषवीत असावे. यानंतर आपण लिहिलें कीं राजश्री तुकोजीबाबा सुभेदार तिकडे आले आहेत. तुमच्या यांच्या भेटी लौकरच होतील. त्यास सुभेदार मथुरेस येऊन दाखल झाले. आमची त्यांची भेट झाली. कळावें रवाना छ ७ जिल्काद बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती. मोर्तबसुद.

श्री माधव चरणीं तत्पर
अलीबहादर निरंतर

**सरकारी रेकॉर्ड**

No. 634 8-7-1792 A.D.

Ali Bahadur acknowledges Ahilyabai's letter, and says that he saw Tukojeerao at Mathura.

---

**अ. नं. ६३५** **श्री**

ता. १६ जुलाई, इसवी सन १७९२

रामराव अप्पाजीकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र विशेष. राजश्री बापूजी होळकर व आम्ही लालसोटचे जिल्ह्यांत होतो तेथून दरकूच करून स्वारींत सामील होऊन भेटी जाल्याचें वृत्त पूर्वी सेवेसीं लिहिलेंच आहे. जयपुराहून रोडाराम खवास वगैरे कारभारी येऊन मामल्याचा आंख ठरावात आला. रामपुरा महाल रांगड्यांनीं दाबला होता. तो खालसा व्हावा या अर्थी देवासानजीक मुक्काम बहुत झाले. रांगड्यांचा कारभार बोलणें मनस्वी यामुळें लांबणीवर पडलें. शेवटी साहेबांचे पुण्यप्रभावेकरून ठाणें खालसा झालें. उपरांत खवास वगैरे ठाकूर लोक आले. त्यांजला निरोप द्यावयाचे निश्चयांत येऊन काल द्वादशीस वस्त्रें दिलीं. आज उद्या जातील. उपरांत घडेल तसे सेवेसी लिहून पाठऊं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 635 16-7-1792 A.D.

Ramrao Appajee to Ahilyabai : Rodaram Khawas and other officers from Jaypore waited on us in camp and settled the amount of tribute. Some Thakurs also paid their respects; they leave the camp today.

---

**अ. नं. ६३६** **श्री**

ता. १८ आगस्ट, इसवी सन १७९२

तुकोजीराव होळकर यांजकडून चि. काशीरावांस पत्र विशेष. जयपूरकर राजाने रोडजी खवास यांसी कैद करून मुखत्यारीचीं वस्त्रें दौलतराम हाळदे व खुशालीराम बोहरा यांसीं दिलीं. येविषयींचा तपशीलवार मजकूर तीर्थरुप मातुश्री बाईसाहेबांस लिहिला आहे. त्यावरून समजेल. हाळद्याची चाल प्रामाणिकतेची नाही आणि ज्याचेविषयीं तहनामा होता तोच कैद केला. तेव्हां निभावणी कळतच आहे. याअर्थी पुन्हा संधान करणें प्राप्त आहे. या संधीस राजश्री अलीबहादर गेले. फौज पैशावांचून फुटून निराळी राहिली आहे. त्याची समजूत करावयासी पैका पाहिजे. कदाचित दिवसगत लागले तरी रांगडे लबाडी करावयासी चुकणार नाही. असा चहूंकडून अडचणीचा प्रसंग आहे. याप्रसंगीं मातुश्रीकडून उपर झाला तर उत्तम. येविसीं तुम्ही बोलून उत्तर करतील तसें लिहिणें. रवाना छ २९ जिलेज बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 636 18-8-1792 A.D.

Tukojeerao to his son Kashirao. Rodaram Khawas is imprisoned by the Jaypore Rana : the new minister cannot be trusted to carry out former engagements. War appears imminent. Money is nowhere to be obtained. Please open the topic to Ahilyabai, and report in details.

---

**अ. नं. ६३७** **श्री**

ता. १३ आक्टोबर, इसवी सन १७९२

गंगाजलनिर्मळ मातुश्री अहिल्याबाई होळकर गोसावी यांसी सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत. स्नेहांकित अलीबहादूर रामराम विनंती उपरि. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. रा. बच्याजी नारायण फडके निसबत दप्तर हे लष्करांतून पुणियास कामगिरीस जात आहेत. त्यास आपलेकडील स्वारप्यादे देऊन सातपुडा पार करून बऱ्हाणपूरापावेतों पोहचाऊन द्यावें रवाना छ २६ मोहरम बहुत काय लिहिणे लोभ असावा हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 637 13-10 1792 A.D.

Ali Bahadur requests Ahilyabai to see that Mr. Bachhyajee Phadke of his office is provided with decent retinue and guard till he reaches Burhanpur.

---

**अ. नं. ६३८** **श्री**

ता. ९ नोव्हेंबर, इसवी सन १७९२

तुकोजीराव होळकर यांजकडून लक्ष्मण कृष्ण कमाविसदार सरकार बिजागड यांचे नावे पत्र :

परगणे भिकणगांव येथील पृथ्वीसिंग मंडलोई याचा काळ जाहला. पोटीं पुत्र संतान नाही. पुढें भावाचे मुल त्याचे स्त्रीचे ओटींत घेऊन बंदोबस्त केला पाहिजे. यास्तव मशारनिल्हेचा बंधू दौलतसिंगानें सरकारांत विनंती केली. तेव्हां पृथ्वीसिंगाचे स्त्रीनें येऊन बोलावें त्या अन्वये बंदोबस्त होईल ऐसे सरकारनें सांगितल्यानंतर तिचे पत्र आलें कीं एक वर्षभर बाहेर न पडण्याची रीत आहे. साहेबीं वतनाची जप्ती करविली आहे त्याजबद्दल सोडचिठ्ठी देविली पाहिजे म्हणोन. त्यास तुम्ही कोणी कामगार शहाणा विश्वासूक पोक्त

इतवारी असेल त्याजला मंडलोई मजकुराचे स्त्रीकडे पाठवून तिचा मनोदय जसा असेल तसे लिहून घेऊन हुजूर पाठवून देणें म्हणजे समजून बंदोबस्त कर्तव्य तो केला जाईल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 638 9-11-1792 A.D.

Tukojeerao Holkar writes to the Kamavisdar of Sarkar Bijyagarh : Prithwising Mandloi of Pargana Bhikangaon is dead. His widow's wishes must be ascertained on the point of adoption. Please depute some trustworhy person.

---

**अ. नं. ६३९** **श्री**

ता. २९ नोव्हेंबर, इसवी सन १७९२

अहिल्याबाईंकडून, चेनपूर येथील किल्लेदार काशीनाथ अप्पाजींचे नांवें. तुम्ही पत्र पाठविलें ते पावून लेखनार्थ अवगत जाहला. त्याचीं उत्तरें येणेंप्रमाणें :

१ प्रगणे मजकूर येथील साल मजकुरचे रसदे ऐवजी रुपये ५००० पांच हजार पाठविले आहेत. घेऊन उत्तराची आज्ञा केली पाहिजे म्हणोन. ऐसियासी पाठविलेले रुपये पांच हजार प्रविष्ट जाहले. पदमसी राजसी सावकार याचे जमा असेत.

१ एक फिरंगी व लछीराम परदेसी एकूण दोन असाम्या गांवगांव चौकशी करीत भारूडगडपर्यंत आले. त्यांजपाशीं याद चौकशीची होती ते पाठविली आहे. आज्ञा कर्तव्य ते करावी म्हणोन लिहिलें व यादीवरूनही समजलें. त्याजबरोबर दोघें माणसें देऊन कोठें माहितगारी होऊं न देतां व वाटेचा सुमार सापडूं न देतां अडचणीच्या वाटेनें रस्ता मिळवून देणें.

१ बऱ्हाणपुरचे वगैरे वर्तमान लिहिलें तें समजलें. पुढें नवलविशेष वर्तमान असेल तें लिहून कळवीत जाणें.

एकूण कलमें तीन मनन करून लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें. बाकीचा ऐवज सत्वर पाठविणें. दिवसगत लागल्यास वरात होईल. जाणिजे. छ १४ रविलाखर बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 639 29-11-1792 A.D.

Ahilyabai to the Killedar of Chainpur :

(i) Duly received Rs. 5,000/-

(ii) The Firange and Lachiram mentioned in your letter should be taken, guardedly away out of our territory by an unknown and unknowable road.

(iii) The balance should be remitted early.

---

**अ. नं. ६४०** **श्री**

ता. १२ डिसेंबर, इसवी सन १७९२

(फडणिसी हिशेबाचे कागद महेश्वरीं अहिल्याबाईंकडे गेल्यावर तेथें ते दरबाराकडून मंजूर होऊन त्यावर खाली लिहिलेप्रमाणें शेराहुकूम सापडतो.)

एकूण जमा सत्तर हजार एकशें एकूण पन्नास रुपये साडेसात आणे जमा. यापैकीं खर्च अठ्ठावन्न हजार चारशें दोन रुपये साडेपंधरा आणे. बाकी महाली एकोणावीस हजार नऊशें अठ्ठावीस रुपये चौदा आणे. फाजील मामलेदार मशारनिल्हे यांचे आठ हजार एकशें ब्याऐंशीं रुपये सव्वासहा आणे. करार मिती शके १७१४ परिधाननामसंवत्सरे मार्गशीर्ष वद्य १३ सु. स. ११८५ मुक्काम महेश्वर. जाणिजे. मोर्तबसुद.

| |
|---|
| श्री मन्मल्लारी चरणीं तत्पर<br>खंडेराव सुत मालेराव होळकर |

**सरकारी रेकॉर्ड**

No. 640 12-12-1792 A.D.

A sample of Account and Balance sheet as passed by Deiv Ahilyabai at Maheshwar. The paper bears the seal of her deceased son.

---

**अ. नं. ६४१** **श्री**

ता. १५ डिसेंबर, इसवी सन १७९२

तुकोजीराव यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र विशेष. पाइंटसाहेब (बाईड) याचे रवानगीचा मजकूर रा. यशवंतराव गंगाधर यानीं लिहिलेलें पत्र बजिनस पाठविलें असे. तूर्त साहेबांचे फौजेचा कूच होऊन करोली सुमारें गेले. राजा शहरांत दाखल जाहला तेव्हां पलटणे आणून उपयोग कोणता ? कार्याखेरीज जमाव केल्यानें ते एका दिवसाची तनखा

सोडणार नाहीं. ऐवजाची अडचण लोपली नाही. निःष्कारण फौजेचा भरणा करून आपल्यास रसायन लावून घ्यावे हे नीट नव्हे. याजकरितां पलटणे आणवावी न आणवावी याचा निश्चय करून उत्तर पाठविणें म्हणोन लेखन केले. त्यास सोबत्याचे फौजेनें दगा करून लौकिकाची हानी केली. याचा सूड घेतलेखेरीज लौकिकांत चांगले दिसणार नाही व उभें रहावयास जागाही असें केल्याने होईल; नाहीतर खावंदसुद्धां कोणी मानणार नाहीं. एक वेळ सूड घ्यावा तरी निर्वाह. याजकरितां सर्वोपरी अडचण तत्रापि मनसब्यावर कसेही करून करणें प्राप्त आहे. ही गोष्ट पोक्त जमाव झाल्यांवाचून कशी घडते? अगोदर घरचा जमाव जाला पाहिजे यास्तव वडिलीं मशारनिल्हेस लेखन करून पलटणे बोलावून घेतली पाहिजेत. मिती पौष शुद्ध २ श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ ५ जमादिलावल सलासतिसेन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 641 15-12-1792 A.D.

Tukojeerao Holkar to Ahilyabai : The compaion's (Scindia) army turned arms against us. We must revenge our honour. That means army. Please, therefore, summon our own military.

---

**अ. नं. ६४२** **श्री**

ता. १५ डिसेंबर, इसवी सन १७९२

तुकोजीराव होळकरांकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र विशेष. गंगापारचे रोहिल्याकडील पत्रें आली कीं, आपणांस फौजेचे प्रयोजन लागेल तरी पंधरावीस हजारपावेतों आमचे मंडळात फौज तयार आहे. अगत्य असल्यास जितकी फौज आपणांस ठेवणें तितक्यास एक महिन्याचा ऐवज येथें पावता होय, येविसीं बेगमी करून लेखन करावें म्हणजे जेथें आज्ञा होईल तेथें स्वार होऊन येऊं याप्रमाणें लिहिलें आहे. त्यावरून विचार पाहतां फौज तर जमविली पाहिजें. परंतु गोष्ट पैशाची. निदान पांच हजार लोक बोलविल्यास लाख रुपये तरी पाठविले पाहिजेत. याची तदबीर कोठें दिसेना. तेव्हां करावें काय? या अंदेशामुळें अद्यापि उत्तर दिले नाही. वडिलांची आज्ञा येईल त्याप्रमाणें लिहावें याविचारें रोहिल्याची माणसें आली आहेत. ते ठेऊन घेऊन वडिलांस हे पत्र लेखन केले असे. अर्थ मनन करून रोहिल्यास येणेविसीं लिहावे किंवा स्पष्ट उत्तर द्यावे याची आज्ञा लिहिणें ते लिहावी. त्याप्रमाणें करूं. तूर्त लाख रुपये पाहिजेत. सर्व जागा वडिलांचे ध्यानांत आहेत. आज्ञेप्रमाणें करूं, मि. पौ. शु. २ सेवेसीं श्रुत होय.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 642 15-12-1792 A.D.

Tukojeerao Holkar to Ahilyabai : The Rohillas on the other side of the Ganges propose to aid us with men. We want men 5,000; that means one lac of Rupees; please let me know your mind and arrangements.

---

**अ. नं. ६४३** **श्री**

ता. २३ डिसेंबर, इसवी सन १७९२

तुकोजीराव यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस : विशेष. राजश्री यशवंत गंगाधर यांची व वकिलाची पत्रें आली तेच बजिन्स पाठविलीं आहेत. पाइंट (बाईड) साहेबाचे मजकुराचें उत्तर व एक पलटणाचे येणेस ऐवज पाहिजे. त्याची याद कलमबंदीसुद्धां आली ती पाठविली आहे. मनन करून उत्तर पाठविणें. देशीहून फौज आल्यानंतर सत्वर रवानगी केली जाईल. याखेरीज इकडे फौज ठेवितों हे अवाई ऐकून पंढरपूर, फलटण वगैरे कितीएक खासे जातीनिसीं व कित्येकांचीं पत्रें आली आहेत. परंतु पैक्याची अडचण याकरितां विचार पडतो. पुढील मनसब्याचे संधान पाहून आपले घरचा अर्थ पाहून जसे कर्तव्य असेल तसें उगवून लिहिणें. म्हणजे करण्याचा, बोलण्याचा बेत धरावयास येईल म्हणोन पत्रीं आज्ञा. त्यास मनसब्याचें संधान पाहतां, सोबती सबल होऊन आपला पाय हिंदुस्थानांत नसावा येविषयींची साधनें त्यांची चालली आहे. इकडे असतां श्रीमंतांकडील वचक होता तोही देशीं गेल्यावर राहिला नाही. याचे मनांत इकडील वर्चस्व राखून उभयतांचा तह पाडावा ऐसें आहे. परंतु ते आपल्याकडून कांहीं जोर पडावा अशी वाट पाहतात. या इकडील गोष्ट गचावली तिची उगळणी न जाली तरी सोबती कोणतेही गोष्टीस चुकणार नाहीं. तेव्हां मागे सरून सर्वांस मुकावे असें अर्थात घडेलसें दिसतें. याजकरितां यावत वडिलांचा व आमचा जीव आहे तावत अर्थप्रमाणें वडिलांनीं लौकिक मेळविला तो जतन होईल ती गोष्ट करावी हेंच उचित आणि सांप्रत श्रीमंतांनीं याद ठरावून कारकून इकडेस रवाना करण्याची योजना केली आहे. कारकून येऊन यादबुद पाहिल्यावर वडिलांचे आमचे विचारें दोन कलमें कमी ज्यास्त, ज्यांत आपला उपयोग अशी काढावी लागतील. त्याप्रमाणें घडणें ते आपले जोराखेरीज घडणार नाहीत. जोराचा प्रकार एक पैशाची अडचणीमुळें अडीच महिने आम्हास चमलतीरीं येऊन जाहले असतां कोणीकडूनही घडत नाहीं. तेव्हां पुढें मोफत जमाव पडून सोबत्यास जरब द्यावी, असें मानस आहे. ते घडणें ईश्वराधीन आहे. तत्रापि औडंबर तरी आणले पाहिजे. ही गोष्ट न झाल्यास कोणतीही गोष्ट सोईची न होतां विलग पडले आहे आणि पडेल तेव्हां कसेही हो परंतु श्रीमंताकडून कोणी येऊन तहाचा जाबसाल ठरण्यांत येतोपावेतों कांहीं जमाव करून कांहीं औडंबर दाखविणें प्राप्त आहे. मसलतीचा प्रकार पाहतां असा. पैशाचा प्रकार पाहतां कोठें ठिकाण नाहीं आणि समय तर याप्रकारें प्राप्त जाहला त्याअर्थीं

वडिलीं वोढीत वोढ करून चारपांच पलटणे रवाना करावी. याविसीं रा. यशवंतराव गंगाधर यांसी लिहिलें होतें त्यावरून त्यांनीं पक्काई करून एक पलटणाची याद करून पाठविली आहे. त्याप्रमाणें पांच पलटणाचा ऐवज त्यांजकडे पाठवून तेथून आणवावी अथवा एक पलटणासुद्धां पाइंट साहेबास बोलावून इंदुरीं त्यांस तयारी करावयासी सांगून जसी तैयारी होईल तशी इकडे रवानगी हजेरी घेऊन करीत जावी. देशींहून फौज आणविली आहे तीही आल्यावर रवानगी करावी. फलटण देशचे लोक पंढरपूर वगैरेचे आले आहेत त्यांजला नुसता जाब न देतां मासपक्ष बोलण्याचा घोळ घालून ठेवावे. त्यांजपैकीं खातरजमेचे कोणी ठेवावेसे जाल्यास सरासरी सोळा, अठरा व माणूस पाहून वीसपर्यंत निदान बावीसपर्यंतही आहे. यांस एखादा कनिष्ठ राउताचा आंख घालून असे ठेवावे. केवळ त्यांजला स्पष्ट उत्तर देऊन मार्गस्थ करूं नये. इतके करण्यास पैसा पाहिजे याचा विचार लोपला नाही त्यापक्षी आम्ही ल्याहावे ते काय? सर्व वडिलांचे ध्यानांत आहे. वडिलांस जसी तजवीज दिसेल तशी योजना करावी. सारी भिस्त तूर्तचे काळी सावकारांवर आली आहे. याचा विचार अगोदर लिहिला आहे. त्याप्रमाणें यशवंतराव गंगाधर यांस लिहिले असेल. आणखीही लिहून त्यांजकडून सावकारासीं बोलावून योजना करावी, अथवा पदमसीची खातरजमा करून त्यास उभे करावें. सारांश, जसे ध्यानांत येईल तसे करणें विहित. वारंवार विनंती काय लिहावी. फलटण वगैरे देशचे लोक देखणे मात्र परंतु आवच पाहवा? याजपेक्षां पंढरपुराकडील बालेघाटचे सरदेचे हटकर, सेलार, धनगर, पाखरे, ढोणे, सेडगड व जाट वगैरे ते चांगले. त्यांजला ठेवल्यास माणूस घोडे चांगले आणि सालस. याकरितां फलटणचे न ठेवितां बालेघाटाकडील नीट ते ठेवावें. फलटणाकडील कांहीं अढळाचे चांगले असल्यास सोईचे वाटल्यास ठेवावे. बिना फौज नवी ठेवल्यावांचून कोणतेही ठीक नाही. येथें जुनी फौज आहे ते कांहीं उपयोगी नाही. पैशास मात्र जाट आहेत. फलटण वगैरे जागाचे लोक वडिलांचेही सर्व ध्यानांत आहे, उपयोगी ते करावें. मिती पौष शुद्ध १० दशमी श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ १२ जमादिलावल. सलासतिसेन १२०२.

**सरकारी रेकार्ड**

No. 643 23-12-1792 A.D.

Tukojeerao to Ahilyabai : He learns that a clerk from the Poona Durbar is soon to approach Ahilyabai with certain suggestions. He, therefore, proposes that he must undertake some campaign before the clerk's arrival. That means money; and the usual train of arguments follows :

He makes discrimination between men from Phaltan and those from Baleghat, and prefers the latter for military purposes.

---

अ. नं. ६४४ **श्री**

ता. २३ डिसेंबर, इसवी सन १७९२

यशवंतराव गंगाधर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष छ. ११ राखरचीं पत्रें सेवकास व श्रीमंत राजश्री नानांस पाठविली ती पावोन सविस्तर मजकूर ध्यानास आला. आज्ञेप्रमाणें श्रीमंत नानांस पत्र देऊन विनंती केली कीं भरोशाच्या माणसांच्या गती या प्रकारच्या जाल्या. याउपर परिणामास जपावें हेच चांगले म्हणोन महायात्रेस जावयाचा विचार करून श्रीमंत राजश्री यजमानसाहेबांस महेश्वरीं येण्याची पत्रें दोन चार गेली. आपला सल्ला घेण्याविषयीं आम्हास लिहिले म्हणोन साहेबांच्या लिहिल्याअन्वयें विनंती केली. त्याजवरून नानांनीं उत्तर केलें कीं, ''दादाजी, बाईंस दुःख फार मोठें झालें. हें खरें. या काळीं या दुःखासारखे दुसरें दुःख नाही. परंतु नाईलाजी गोष्ट. भगवतसत्तेस कोणाचाही इलाज नाही. उपाय नाही. हे बाईंस दुसरियानें सांगावें अथवा लिहावें आणि मग बाईंस उमजावें ऐसेंही नाही. त्यांच्या ध्यानांत सर्व गोष्टी आहेत. त्यासारखे समजदार, दुरंदेशी, श्रवण, मनन, किती जालें व पुढेंही चाललें आहे. ऐसे असोन खेदाचें शांतवन होत नाहीं. याजवरून आम्ही बहुत अंदेशात पडलो अहो.'' विनंती केली कीं आपण म्हणतां इतक्याही गोष्टी खऱ्या व त्यानींही परिणाम योजिला तोच मुख्य. या काळीं त्यांस याउपर दुसरें काय करावयाचें आहे? नानांचे म्हणणें, ''तुम्ही म्हणतां हें खरें, परंतु प्रस्तुत राज्याचा प्रकार कसा जाला आहे? बाईंचा दाब शत्रूवर किती. बाई कांहीं लहान नव्हत. श्रीमंतांची सगळी बाजू. आमचा सल्ला बाईनें जाण्याविसीं स्वप्नांत देखील येणार नाही. कैलासवासी मातुश्री गोपिकाबाईसाहेब कै. नारायणराव साहेबांचे वेळेस ऐसेच उदास होऊन यात्रेस जावयाचा उद्वेग केला होता. परंतु आमचे लिहिल्यावरून मान्य केलें. त्याप्रमाणेच बाई विवेकी आहेत. त्यांनीं सर्वथैव जावयाचें करूं नये म्हणोन. ऐशा अन्वयें बहुताप्रकारें बोलणीं होऊन आम्हास लिहावयास आज्ञा केली. त्याजवरून विज्ञापना लिहिली आहे. आपण विवेकी, समजदार, सूज्ञ, दूरदर्शी, पाहिले ऐकिले बहुत, तेथें सेवकांनीं विस्तारानें काय लिहावें? तरी साहेबीं दौलतीस चांगलें आणि सर्वांचे मनोरथ रहावे ऐसें केलें पाहिजे. श्रीनें एकसारखे दिवस सदाचरणेंकरून शेवटास नेले. तरी भलते गोष्टींची त्वरा नसावी. प्रस्तुत काळीं लक्षावधी जीवांचें अन्न आपले पदरी. इतक्यांस मोकलून गेल्यानें धर्मास इहपर कसें पडेल? लोकापवाद कसा दिसेल? हे सर्व साहेबांचे ध्यानांत आहे. श्रीमंतांची आज्ञा व नानांचें सांगणें वारंवार हेंच पडते. सलगीनें विनंती लिहिली आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 644 23-12-1792 A.D.

Yeshwant Gangadhar reports intended departure for purport to

Ahilyabai the substance of his conversation with Nana Fadnavis regarding Ahilyabai's intended departure for Benares.

---

**अ. नं. ६४५** **श्री**

ता. २९ डिसेंबर, इसवी सन १७९२

तुकोजीराव होळकर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र विशेष. सोबतियाकडील चालीचा मजकूर येथून लिहिला होता त्यांचें उत्तर वडिलीं लिहिलें कीं दोन्ही दौलतींची ऐक्यता राहून आयास न लागतां योजिला अर्थ सहजांत घडावा असेच प्रकार होत आले, आपसांत फूट दिसोन आल्यानें हलके पाहून पडून कोणतीही गोष्ट सिद्धीस जावया आयास लागेल. त्याअर्थीं त्यांनीं तुम्ही एक विचारें चालावे हे उभयपक्षीं चांगलें. दोन्ही दौलतींचे भाऊपण आजकालचे नाहींत. लोभावर दृष्टी देवून त्यांनीं तुम्हांसी वांकेली दाखवूं नये. तुम्हीही त्यांसी थोडक्या गोष्टीसाठी तोडूं नये. तुम्ही आपल्याकडून त्यांशीं बोलूनचालून ज्यांत आपल्याकडे शद्व न लागेल त्यास जपावें शेवटपर्यंत त्यांनीं ओढच केल्यास जसें पाहावे तसें करणे प्राप्त आहे म्हणून. ऐसियास दोन्ही दौलतीची ऐक्यता राहून मनसबा होत गेला तर दुसऱ्यावर जरब राहून आयास न लागतां योजिला अर्थ सहजांत घडेल. याच विचारें मथुरेनजीक मुक्कामीं कोणेविसीं आपलेतर्फे वांकडे नसावे या गोष्टीस जपून सोळा मास क्रमिले. त्यांनीं रीतिभातीस जपावें जें करणें तें इकडील विचारे करावें. तेवढ्यामुळें त्यांचे मनीं मानसीही नाही. तथापी बोलूनचालून ज्यांत आपल्याकडे शब्द न लागेल असेही करून पाहिले. तथापि बोलण्यांत यावे ते करण्यांत न यावें अशी चाल पडली. ते न सुटे तेव्हां सोबतीने राहून फल तें कोणे? असे समजोन त्यांचे आपले अंतर पाडलें. इकडील त्यांजकडील कोणताही प्रकार वडिलांस लोपला असें नाही. साद्यंत अगोदर लिहिण्यांत आलेंच आहे. अलीकडे त्यांची पत्रें पुणेंकरास गेलीं त्यांतील भाव राजश्री बाळाजीपंत नाना रा. यशवंतराव गंगाधर यांसी बोलले तो मजकूर मशारनिल्हेनीं पत्रीं लिहिला आहे. ते पत्र वडिलांकडून इकडेस आलें त्याजवरून समजलें असेल. सांप्रत आम्ही येथून त्यांजकडें पत्रें पाठविली होती. उत्तर आले तेंच बजिनस नक्कल करून पाठविले आहे. त्यावरून अर्थ मनन करून पुढें विचार कोणता कसा करावा येविषयींचा सल्ला वडिलांचे ध्यानांत आणून लेखन करावे. त्याप्रमाणें वर्तन करूं. उत्तरे मोघम येतात तशी न येतां कर्तव्यार्थ ध्यानास आणून आज्ञा लिहिली पाहिजे. मिती पौष वद्य सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 645 29-12-1792 A.D.

Tukojeerao Holkar to Ahilyabai : Acknowledges her sound advice,

and his own conduct according thereto. He now seeks advice in particulars, and not in general terms, regarding relation with Mahadjee Scindia.

---

**अ. नं. ६४६** **श्री**

इ. स. १७९२

यशवंतराव गंगाधर यांजकडून अहिल्याबाईंस. श्रीमंत नानाजी ममतायुक्त व दूरदर्शिनें जितके प्रकार लिहिले तितके खरेच आहेत. कैलासवासी सुभेदारांनीं श्रमसाहस करून दौलत मेळवून सरकार चाकरीस कसे जपत गेले येविषयींची माहितिगारी नानांस आहे. पुढेंही दौलतीचे स्वरूप राहून सरकार चाकरी घडावी, परिणाम नीट व्हावा हीच इच्छा आहे. बहुत खातरजमेचीं उत्तरें नानांनीं केली, पुढेंही तुमचेविषयीं तिळप्राय दुसरा विचार नाहीं. पुढेंही कोणे प्रकारें व्यंग पडूं न देतां होईल तितका उपराळाच करूं. तुम्ही व शिंदे श्रीमंतांचे बरोबरीचे सरदार. तुमचे व्यंग ते सरकारचे व्यंग. येविषयींचा अर्थ पूर्णपणें बाईचे ध्यानांत आहे. बाईसारखी सावध व दूरदर्शी बाईच. श्रीमंतांचे सरकारांत वाघ व बकरी एक ठिकाणीं पाणी पितात. जे होणें ते मागील रीति पाहूनच होईल. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 646 1792 A.D.

Yeshwant Gangadhar to Ahilyabai : Writes a very courteous letter expressing Nana's high regard for the Holkar House, Nana pays compliments to Ahilyabai's foresight and discretion etc, at the same time throws a hint of Nana that precedents will be respected.

---

**अ. नं. ६४७** **श्री**

इसवी सन १७९२

तुकोजीराव होळकर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. चिरंजीव मल्हाररावाचा मजकूर लिहिला तो कळला. आपले मूल आणि इतराकडे जाऊन उपहास व्हावा यांस लौकिकांत नीट नाहीं. याकरिता वडिलीं त्याजला इकडे पाठविण्याचें न करितां तेथेंच यथास्थित बंदोबस्तांत ठेवावा. जवळ कोणी लबाडलाताड चाकर असतील ते हाकून देऊन आपली माणसें ठेवून नेहमी अटकेंत असावे. रखवालीस माणसें इतबारी ठेऊन परवानगी वाचून कांहीं होऊ नये, असें करावें. इतक्याही बंदोबस्तास नच ऐके तरी शृंखला बंधन करून सेंधव्यास न पाठवितां तेथेंच मजबूत स्थळी ठेवावा. अशी ज्याची चाल त्याची ममता धरून फायदा नाही. मजकडील संशय तिळप्राय न धरावा. अनमान कोणताही कराल

तर माझी शपथ आहे. असें वडिलांचे करण्यास लौकिकास जपण्यास मी येथून लिहावें असें नाही. सर्व आपल्या ध्यानांत आहे. हत्यारें त्याजजवळ असतील ते पूर्वीच घेऊन युक्तीनें लिहिल्याप्रमाणें बंदोबस्त करावा. त्याच्या दैवास आपण काय करतील? आम्ही काय करावें? सर्व प्रकारें लिहिणें घोकणें शिपाईगिरीचे इल्म सर्व सांगून कांहीं उपयोग न जाहला. तेव्हां त्याचे दैवच तसें. येविसीं मुलाजा न करावा.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 647 1792 A.D.

Tukojeerao to Ahilyabai : Asks her to keep Malharrao under her care and watch. He places his implicit faith in her treatment. All instructions in letters and arms have, until now, availed nothing.

---

**अ. नं. ६४८** **श्री**

ता. ७ जानेवारी, इसवी सन १७९३

मल्हारराव होळकरांचे मातुश्री अहिल्याबाईंस पत्र. वडिलीं आशीर्वाद पत्र पाठविलें ते पावलें. त्यांत आज्ञा कीं, माझे स्वदस्तूरचें पत्र पाठविणें. त्यास माझे स्वदस्तूराचे पत्र पेशजीं तीन खंडू मंडलिकबराबर रवाना केलीं. सांप्रत त्यांत खातरजमेचा अर्थ काय राहिला? तीर्थरूपजीचे पत्राचा अक्षेप केला त्यास पहिलेपासून महाराजांचे चरणीं दृढ लक्ष ठेऊन धणी मायबाप आपण आहेत, मी तीर्थरूपजींची खातरजमा करावी ही माझी योग्यता नाही. मी सहस्त्र अन्यायी, अपराधी महाराजांचा आहे. आपले पोटीं जन्म घेतला आहे. माझे शरीर ज्या कारणीं लागेल त्या ठिकाणीं घालावें. चाकरी करून दाखविण्यांत अंतर होणार नाही. पहिले अज्ञान अवस्थेंत चूक झाली ते जाहली. अतःपर मजला जेथें ठेवाल तेथें राहीन अथवा चाकरी सांगाल ते करीन. महाराज प्रत्यक्ष केवळ सांबरूपी आहेत. मजला आपले चरणाचें दर्शन झाले म्हणजे मजला कोणे गोष्टीची अपेक्षा नाहीं. सर्वही लज्जा महाराजांस आहे. ये अर्थी श्लोक.

*जननि शिशूशी ताडी तेधवां तें रडे हो । पुनरपि जननीच्या आश्रयें तें दडे हो ।।*
*हसुनि जननि त्यातें उचली घे कडे हो । यदि जननि उपेक्षी तें महा साकडें हो ।।*

वडिलांस श्रुत होय मिती पौष वद्य १० हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 648 7-1-1793 A.D.

Malharrao Holkar (Tukojee's son) to Ahilyabai : I am your child;

forgive me my past sins committed in youth; I earnestly long to see you and serve you in any way you may order.

---

अ. नं. ६४९ **श्री**

ता. १२ फेब्रुवारी, इसवी सन १७९३

विनायक बाजीराव यांजकडून अहिल्याबाईंस पत्र : मुक्काम पुणें येथे क्षेम असो विशेष. मजबरोबर पत्रें साहेबीं श्रीमंत रा. नानांस व रा. दादाजीस व रा.शिवबाजीस दिलीं होतीं व मी पुण्यास आलो तेच दिवशीं साहेबांची पत्रें आणिक आली. दुसरें दिवशीं श्रीमंत सुभेदार तुकोजीबाबा यांचे पत्रांतही साहेबांचें पत्र आले त्याचे मनन चि. दादाजी व रा. बाजीजी यांनीं करून चि. दादाजींनी मजला व राजश्री बाजीस समागमें घेऊन जाऊन माझी भेट केली आणि सविस्तर साहेबांकडील वर्तमान सांगितलें. दौलतसंबंधीं वर्तमान आज्ञेप्रमाणें चि. दादाजींकडून व बाजीसहित वर्तमान यथाज्ञानें नानांसी बोललो. सविस्तर विनंती केली. एक प्रहरपर्यंत एके ठाईं बैठक होऊन बोलणीं जाहली. पत्रें अक्षरशः जातीनिशीं आपली व सुभेदार यांचीं वाचून पाहिलीं. मर्जी फार सुप्रसन्न झाली. वाकीफगारीच्या गोष्टी बोलणीं कै. सुभेदारसाहेबी शेवटास कशी केली व श्री. पंतप्रधान लोभ कसा करीत आले, त्या गोष्टी सर्व वाकीफ आहेत. कोणी फैल लिहितील, समक्ष बोलतील त्याजवर न जावें. खरें खोटें पहात जावें. पण श्री यात्रेस न जावें. दौलतीचा बंदोबस्त करावा अशीं आपली पत्रें आली त्याजवरून मनःपूर्वक दवलतीचे स्वरूप कै. सुभेदारसाहेबांचे वेळेस होतें त्याप्रमाणें आपण मनःपूर्वक राखावे म्हणजे राहिल्याचे स्वरूप. नाहींतरी मजला अगोदर निरोप 'श्री'स जाणेचा द्यावा मग जसें कर्तव्य तसें करावे. स्वरूपास उणें केलियास सोसणार नाही. या अन्वयें सविस्तर विनंती केली. फार संतोषी जाहले. आज्ञा केली कीं, ''बाईचें करणें फार चांगले. आमची खातरजमा येविषयींची आहे व रा. दादाजी वारंवार कळवीत आहेत तेणेंकरून खातरजमेविषयीं कसर राहिली नाहीं. अलीकडे ऐकतों कीं बाई व सुभेदार एकचित्तें आहेत. तेणेकरून फार संतोष जाहला. बाईंनीं मनापासून चित्तावर धरलें तर श्री. पंतप्रधान यांची सेवा कै. सुभेदारानीं केली त्याप्रमाणें सेवाही करतील व दौलतीचा बंदोबस्त करतील ही आमची खातरजमा आहे. आम्हाकडील मजकूर मागें आम्ही बाईंविसीं व सुभेदारांविसीं व दौलतीविसीं कमी केली नाही व पुढेंही आमचे तर्फेने खातरजमा असो द्यावी. येविसीं कधीमधी रा.दादाजी गंगाधर यासीं बोलत असतां ते सविस्तर लिहीत असतील त्यावरून कळत असेल. असें बोलणे दादाजीसीं व रा. बाजीसहित मजसीं फार बोलिले व सोबत्याविसींचा मजकूर तर श्री. पंतप्रधान थोरले बाजीराव साहेब यांजपासून उभयतां सरदार बरोबरीनें राखीत आले. त्यात अंतर करणार नाही. वडील सरदारी तुमची. परंतु आम्ही मात्र जागे व्हावें मागें चाकरी कशी केली, आतां कशी

करितां याचा विचार करावा. तुमचे घरचा बंदोबस्त उभयतां एक झाले असतां न होय तेव्हां चांगलें नव्हे. या अन्वयें फार बोलणीं झालीं. ते सविस्तर चि. दादाजींनी रा. गोविंदपंतदादांस श्री. रा. नानांकडे नेऊन निरोप देविला त्याप्रमाणें सावधानी श्रीमंतांचे सेवेसीं जपावें. मुलाचे लग्नाविसीं घरी जाऊन बसलों नाही. चिरंजीवापाशीच आपले आज्ञेप्रमाणें राहून सरकार कामास आपले मर्जीप्रमाणें जपत आहे. श्री. नानांचे पत्राचे उत्तराची परवानगी चिरंजीवांनीं घेतली आहे. दोचौ दिवसांनी तयार होतील. तयार जाहली म्हणजे सेवेसीं रवाना करूं. साहेबीं कोणे गोष्टीचा संशय चित्तांत न धरावा. यजमान साहेबांस लिहून महेश्वरास आणवावे हे चांगले. रा. बापूजी होळकर जयपूर प्रांतीं आहेत. त्यास आज्ञा असावी कीं, जसें आम्ही लिहित जाऊं त्याप्रमाणे करीत जाणें आणि पत्रें जात असावी. सविस्तर साहेबांचे सेवेसीं चि. रा. दादाजींनीं व रा. बाजींनीं लिहिले आहे. त्याजवरून कळेल. देवजींनीं सर्व गोष्टींची खातरजमा धौम्याचे देखत केली आहे. किती एक मजकूर पत्रीं लिहितां ठीक नाही. सदोबा तुम्हाकडे आले आहेत. ते सर्वांचें वर्तमान सेवेसीं निवेदन करतील त्याप्रमाणें तरतूद साहेबांकडून व्हावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 649 12-2-1793 A.D.

Vinayak Bajirao form Poona writes to Ahilyabai regarding his interview with Nana Fadanvis : Nana acknowledges past services but desires diligence on your part for the present. Your going to Benares he does not agree to.

Please ask Bapu Holkar to move, as we may direct, in Rajputana from time to time.

---

**अ. नं. ६५०** **श्री**

ता. २२ फेब्रुवारी, इसवी सन १७९३

विनायक बाजीरावांचे पत्र अहिल्याबाई होळकर यांस. विशेष. आमची सरदारी कैलासवासी सुभेदारपासून भोळी आहे. एकनिष्ठ सेवा करीत आले व हल्लींही सरदार एकनिष्ठपणें सेवा करतात इतकेंच मात्र आम्ही जाणतों. कुकावेशी आम्ही जाणत नाहीं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 650 22-2-1793 A.D.

Vinayak Bajirao to Ahilyabai : We have been serving the Sarkar conscientiously since the times of the late Subhedar Malharji. We know

no other object but honest and disinterested service of the master.

---

अ. नं. ६५१ **श्री**

ता. २५ मार्च, इसवी सन १७९३

रोजकीर्द १२ साबान १२०० फसली. रामभट केशवभट यांचे तक्रारीवरून कमाविसदारास ताकीद पत्र. धर्माचे कामांत सरकारांतून दिक्कत करावयाची नाहीं. जशी मागून वहिवाट चालत आली असेल, तशी पुढें चालविणें. येविषयींचा फिरोन बोभाट येऊं न देणें. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 651 25-3-1793 A.D.

On a complaint being filed by Rambhatt Keshavbhatt, orders were issued that no interference will be tolerated by the Sarkar in religious matters . Old precedents must be honoured.

---

अ. नं. ६५२ **श्री**

ता. १० एप्रिल, इसवी सन १७९३

मिस्टर बाईड साहेबाचें मातोश्री अहिल्याबाईंस पत्र विशेष : बहुत दिवस अमृतमय पत्र येऊन आज्ञाधारकास वर्तमान कळत नाही त्यास हरघडी वर्तमान लेखन पत्रीं आज्ञा असावी. यानंतर आम्ही पुण्याहून ता. ३०-१-९३ रा. यशवंतराव गंगाधर दिवाणजीचा निरोप घेऊन निघालो. नंदुरबारेस यावयास वाटेनें मोठ्या भयानें पुण्यापासून शिंद्यांचे धाकास्तव नंदुरबारीं ता. २१-२-९३ स दाखल झालों. बंदुका पुण्याहून येतेसमयीं, बरोबर आणावयास बनलें नाहीं, लोकही फुटून बाहेर काढिले होते. कोणी आले नाहीं व कांहीं आले. येथें नंदुरबारेस आल्यापासून, आपल्या पायाजवळ लौकर यावें म्हणून तरतुदींत आहों. बंदुका आणावयाकरितां सुरतेस गेलों. रस्त्यानें सोनगडास गायकवाडाचे लोकांनीं पंधरा वीस दिवस खोळंबा केला. तेथून निघून सुरतेस गेलों. बंदुका वगैरा सरंजाम घेतला आहे. नंदुरबारेस लवकरच येतों. नंदुरबारेस आल्यावर आपल्या पायाजवळ येण्यास बहुत दिवस लावीत नाहीं. ज्या गोष्टीची जलदी धनी साहेबांस आहे ती जलदी मला फार आहे. सुरतेस खुद्द आम्ही गेलों म्हणून बरें झालें. बाजारांत बंदुका कोठें मिळत नव्हत्या. इंग्रजांचे कोठींतून भीड घालून घेतल्या

व इतरांस बंदुक सुरतेस बेपारी कोणी विकीत नाहीत. आपल्या पुण्यप्रतापेंकरून काम फत्ते झाले आहे. लवकरच येतों. आमची भिस्त व सचोटी धन्याच्या कामास प्रसंगीं उपयोगी पडो. त्यासमयीं आम्ही माणूस कसे आहो हे ध्यानात येईल. उगाच पत्रीं प्रौढपणा दाखवावा हें नाहीं. नूतन कामाचा सरंजाम तयार होणें, त्यांत अडचण यामुळें दिवसगत लागली. परन्तु याजवर रागें भरूं नये. आपला पैका घेऊन उगीच वावगी वर्तणूक करावी हे मनुष्य आम्ही नव्हे. आपल्या उरूबरू हा काळपावेतों वर्तमान झाले आहे ते साद्यंत चरणापाशीं विनंती निवेदन करीन. इतके दिवस दिवसगत लागले ते लागले. परन्तु आतां दिवसगत लागणार नाही. आपल्या चरणापाशीं लवकरच येऊन पोहचतो. जादा काय लिहिणें. प्यार मोहबत असो द्यावी हे किताबत. पैवस्त छ. २८ साबान

**सरकारी रेकॉर्ड**

No. 652 10-4-1793 A.D.

Mr. Boyd to Ahilyabai : He was delayed on his road as he had to go to Surat to purchase arms. He requests to be excused for the delay.

---

**अ. नं. ६५३** **श्री**

ता. ११ एप्रिल, इसवी सन १७९३

तुकोजीराव यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र मुक्काम नजीक इसरदे प्रांत धुंडाड. पत्र. आपण चांदवडीहून छ. १८ साबानाचे पत्र महेश्वरीं पाठविले तें येथें येऊन वर्तमान समजण्यांत आलें. महेश्वरीं रा. रावजींनीं पत्रार्थ श्रवण करून उत्तर सरकारचें घेऊन आपणाकडे पाठविलें. त्या अन्वयें आलीकडे यावयाचें घडले किंवा धमाजीचे लिहिल्यावरून करावी लागेल येविशींचा विचार पाहिजे. फार करून यावयाचा विचार ++[१] चें येण्यापूर्वी व्हावा हें चांगलें आणि आपण बरोबर आणल्यानेंहि यजमानांचा संतोष आहे. महेश्वरीं आल्यावर मर्जीस येणार नाहीं हे कठीण पडेल. तर तेथें न ठेवतां जाबत्यानें इकडे रवानगी करून द्यावी. म्हणजे दोन्हीकडील समाधान राहून आपण मोकळे आणि यश असें आहे. यावर वडिलांची मर्जी. आपलेबरोबर मंडळी व खटला फार म्हणून ऐकिलें यास तूर्त +++[२] नव्हतें. वडिलांची मर्जी +++[३] बापूसही घरीं पोहचऊन दोन चार मास होत आले. आपण महेश्वरीं आल्यावर त्याजला इकडे बोलवून घेतल्यास चांगलें आहे. याजवर दिसेल तसें करावें. येथील वर्तमान येथवार खुले आहे. आपण महेश्वरीं येत तोंपावेतों गोविंदराम जिवाजी येऊन पोहचतील व वर्तमान निवेदन करतील. श्रवण करून अर्थ सर्व समजाऊन त्यांजला

अथवा दुसरियास महेश्वरीं +++[४] पाठवून द्यावे. म्हणजे +++[५] अन्वयें सारांश मनानें पुढील विचाराचें धोरण राखावयास करावयास, येईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ. ५ रमजान वैशाख मास सन १२०२ ता. १७ एप्रिल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 653 11-4-1793 A.D.

Tukojirao to Ahilyabai : Desires that Malharrao (his son) should be brought to Maheshwar and then sent to his camp.

---

**अ. नं. ६५४** **श्री**

ता. १३ एप्रिल, इसवी सन १७९३

यादी डाकेच्या चौक्या महेश्वरापासून पुणियापर्यंत दहा कोसांचे टप्प्यानें मार्फत पदमसी राजसी सावकार गुजारत भगवान काशीद नथे मानधाता मिरधा सन १२०२ शके १७१५ काशीद जोड्या सुमारी २० दरमहा मक्ता येणेंप्रमाणें.

| | | | अनुक्रमांक | | | | अनुक्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नावडा तावडीस | जोडी | १ | १ | बलकवाडा | जोडी | २ |
| १ | नागलवाडी | ,, | ३ | १ | थोवरगड | ,, | ४ |
| १ | सांगवीस | ,, | ५ | १ | थालनेरास | ,, | ६ |
| १ | कापडणे | ,, | ७ | १ | लर्लिंग | ,, | ८ |
| १ | टोकेस | ,, | ९ | १ | मालेगांव | ,, | १० |
| १ | दहीगांव | ,, | ११ | १ | पाटोदे | ,, | १२ |
| १ | शेरास | ,, | १३ | १ | संगमनेरास | ,, | १४ |
| १ | आंबे धारगांव | ,, | १५ | १ | आळे | ,, | १६ |
| १ | लोणी | ,, | १७ | १ | भीमेचे कांठीं | ,, | १८ |
| १ | पुणें | ,, | १९ | १ | सरबरा | ,, | २० |

एकूण वीस जोड्यांचा दरमहा रोजमुरा मक्ता रुपये २०४ दोनशे चार दरमहाचे दरमहा पावत जाईल. पत्रें पुणियाहून महेश्वरी येतील. पुणियास साडेपाच सहा दिवसांचे मुदतीनें नेत आणीत जावींत. कदाचित सात आठ दिवसांचे मुदतीचें कागद येऊं जाऊं लागल्यास मक्त्यांत कमी केले जाईल. कागद पत्रांची गफलत होऊं देऊं नये. गफलत झाल्यास पैका

---

१ ते ५ : मूळ दस्तऐवजाचा कागद फाटल्यामुळे हे शब्द आले नसावेत.

सावकार मजकुर यांचे विद्यमानें माघारा घेतला जाईल. येणेंप्रमाणें करार सदरहू दोनशें चार रुपयाची चिठ्ठी पदमसी राजसी याजवर करून देणें. पैवस्त छ.१ रमजान आधिक वैशाख सलास तिसेन मयाव अलफ. मुक्काम महेश्वर चिठ्ठी दिली.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 654 13-4-1793 A.D.

Postal arrangements between Maheshwar and Poona.

Every stage of 10 Koss.

20 pairs of messengers with a monthly payment of Rs. 204/- in all.

---

**अ. नं. ६५५** **श्री**

ता. ३१ जुलाई, इसवी सन १७९३

अहिल्याबाईंचे श्रीमंत पेशव्यांस पत्र विशेष : स्वामींची पुण्याई आणि प्रताप थोर तेणेंकरून अशा गोष्टी सहजांत घडून शत्रू पादाक्रांत होतात. अलीकडे खुशीचें वर्तमान आल्यास लेखन करावयाशी आज्ञा करणर स्वामी समर्थ आहेत म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 655 31-7-1793 A.D.

A congratulatory letter from Ahilyabai to the Peshwa on his victorious arms.

---

**अ. नं. ६५६** **श्री**

ता. ७ सप्टेंबर, इसवी सन १७९३

सनद सुभा राजश्री तुकोजी होळकर वर्तमान भावी कमाविसदार परगणे चांदवड यांसीं कीं, यशवंतराव फणसे शके १७१३ त पंचत्व पावले. ते समयीं सौ.मुक्ताबाई फणसे यांनीं सहगमन केले. ते कालीं वे.रा.चिमणभट व बाळंभट व बाबादेवभट बिन नारायण भट उपनाम उपासनी गोत्र सेंधवान सूत्र कात्यायन शाखा वाजसनै कसबे धरणगांव परगणे कुंभारी हे आपले उपाध्ये कुटुंबवत्सल यांचें चालविल्या श्रेयस्कर जाणोन त्यांजला गांव एक इनाम द्यावयाचा संकल्प करून ती. मातोश्री बाईसाहेब यांसी बोलली होती. तो संकल्प पूर्ण केला पाहिजे यास्तव शके १७१५ प्रभावी नाम संवत्सरे श्रावण वद्य अमावास्या सूर्यग्रहण पर्वकालीं मौजे

उसाड प्रगणे मजकुर हा गांव फणसे यांजकडे चालत होता तोच भटजींकडे हक्कदार, इनामदार, मोकासारखेरीज करून बाकी अमल जागीर सरदेशमुखी व कुलबाब कुलकानू, जल, तरू पाषाण निधिनिक्षेप सहित धर्मार्थ इनाम द्यावयाचा करार करून देऊन हे सनद सादर केली असे. तरी तुम्ही साल मजकुरपासून अमल दुमाला करून देऊन त्रिवर्ग बंधू यांजकडे पुत्रपौत्रादिवंश-परंपरे इनाम चालवणें. दरसाल नवीन पत्राचा आक्षेप न करितां या सनदेची प्रत लिहून घेऊन हे अस्सल सनद भोगवटियास भटजीपाशीं माघारीं देणें. म्हणोन दानपत्र.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 656 7-9-1793 A.D.

Saubhagyawati Muktabai Phanse requested her mother to grant one village Inam to her family priests, when she went Sati.

To fulfil that word it is hereby ordered that Mauza Usad is granted Inam in charity hereditarily to three brothers surnamed Upasani.

---

**अ. नं. ६५७** **श्री**

ता. २६ नोव्हेंबर, इसवी सन १७९३

लाखेरीहून बापूजी आनंदराव यांजकडून अहिल्याबाईंस पत्र विशेष. येथील वर्तमान वरचेवर लिहितच गेलो. अंतर्गर्भ मारवाड कछवे व हाडे सर्व एकजीव झाले आहेत. क्रियाशपथा परस्परें बळकट्या झाल्यात. कोटेवाले बाह्यातकारें वेगळे ठेविले आहे. आतून कोटे बुंदी एक झाले आहेत. मुख्यत्वेंकरून बुंदीत उभयतां राजे एकत्र झाले ते समयीं कैलासवासी श्रीमंत सुभेदार साहेबांच्या कृपेचे हे दिवस आहेत. त्याची ग्वाही राजे आहेत. अंतर्गर्भ कांहीं दक्षिण्यांची नाहीं असा आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 657 26-11-1793 A.D.

Bapujee Anandrao from Lakheri informs Ahilyabai that all the Rajputs have made a common cause against the Deccanis.

---

**अ. नं. ६५८** **श्री**

ता. १५ मे, इसवी सन १७९४

तुकोजीराव होळकर यांजकडून बापू होळकर यांस पत्र विशेष. चि. रा. मल्हारराव यांस हस्तगत करून तुम्ही डेऱ्यास आणून ठेविले. याउपरि कूच करून घेऊन येणार, म्हणून ऐकण्यांत आले. त्यास इकडे आणावयाचें प्रयोजन नाहीं. तेथून जाबत्यानें परभारें कुशलगडास नेऊन तेथें कारकून व किल्लेदार आहेत त्यांचे स्वाधीन करणें आणि चिरंजीवाकडील खिदमतगार असतील त्यांस कैदेत असूं देणें. चिरंजीवाचे रवानगीविषयीं व खिदमतगाराचे कैदेविषयीं आळस न करणें. खिदमतगार येथून पाठविले आहेत. तें चिरंजीवाजवळ रहातील. त्याचे माणसांपैकीं एकही माणूस न ठेवणें. तुमचे पत्र आलें तेंही पावलें चिरंजीवास वडिलांकडे घेऊन येतो. त्यास इकडे न आणितां परभारें कुशलगडास घेऊन जाणे म्हणोन.

१ सदरप्रमाणें ताकीदपत्र येसाजी खंडेराव किल्लेदार कुशलगड याचे नांवें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 658 — 15-5-1794 A.D.

Tukojeerao to Bapujee Holkar. Please do not bring Malharrao to me. Take him direct to Fort Kushalgad, and keep him under watch and ward of the Killedar etc. The Killedar is also ordered to the same effect.

---

**अ. नं. ६५९** — **श्री**

मे, इसवी सन १७९४

रंगो भिकाजी ठाणें जांब यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष साहेबांपासोन स्वार झालो तो ठाणें मजकुरीं संध्याकाळीं पावलों. दुसरें दिवशीं बुधवारीं प्रातःकाळीं स्वार होऊन किल्ले कुशलगडास दाखल झालों. तेथें श्रीमंत बाबासाहेबांस (मल्हाररावास) भेटून वर्तमान सांगितलें. ते ऐकून बहुत बरे म्हणून भोजनउत्तरीं स्वार होऊन ठाणें मजकुरीं मागील चार घटका दिवस राहतां दाखल झालों. श्री. बाबासाहेब म्हणो लागले कीं ''तीर्थस्वरूप मातुश्री साहेबांचे पाय पाहिल्याखेरीज माझें पाप जाणार नाहीं. वडिलांचे चरण पाहिले म्हणजे मी मुक्त होईन '' हजामत केली नाहीं. पांघरूणें तसेच राहिली आहेत. श्रुत होय हे विज्ञापना.

१ आज्ञाधारक जिवाजी बाबुरा विज्ञापना ऐसीजे. येथील मजकूर रा. रंगो भिकाजी यांनीं विनंतींत आणिला आहे. मर्जीस येईल त्याप्रमाणें आज्ञा करणार धनी समर्थ आहेत. आम्ही आज्ञांकित. येथील भाव दृष्टीस पडला ते विनंती लेखन केली आहे. हे विज्ञप्ती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 659 May, 1794 A.D.

Rango Bhikajee from Jamb writes to Ahilyabai : Malharrao has expressed a desire to see Your Highness. He has left his clothes, and gone away.

---

**अ. नं. ६६०** **श्री**

ता. २० जून, इसवी सन १७९४

होळकर वकील नागपूर यांजकडून अहिल्याबाईंस पत्र विशेष. ज्येष्ठ वद्य सप्तमीस हरीपंतांचा काळ जाहला. हे ऐकून परम खेद सेनासाहेबांनीं केला. राज्यातील मोठा माणूस योग्य समेटीचा गेला. ईश्वरें या दिवसांत दोन्ही माणसे मोठी नेली. श्रीमंत नानांस मोठी विश्रांत होती. आतां तरी श्रीमंत आतून बाहेरून श्रीमंत नानांची मर्जी संरक्षून आहेत.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 660 20-6-1794 A.D.

The Holkar ambassador at Nagpur to Ahilyabai : The Sena Saheb was greatly grieved at the sad news of the death of Haripant Phadke. He was greatly trusted by Nana. It is hoped that the Peshwa and Nana will be on better terms now.

---

**अ. नं. ६६१** **श्री**

ता. ९ जुलाई, इसवी सन १७९४

सिद्धेश्वर दादाजी परचुरे यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष. आषाढ शुद्ध द्वादशी शके १७१६ मुक्काम अयोध्या येथें सुरक्षित असो विनंती कीं येथे श्री अयोध्येस आपली मूर्त श्री रामचंद्र चरणीं आहे, ती पाहून बहुत समाधान झाले. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 661 9-7-1794 A.D.

Siddheshwar Dadajee Parchure to Ahilyabai : I was greatly delighted at the sight of your statue at the feet of Shree Ramchandra in the Ayodhya temple.

---

**अ. नं. ६६२** **श्री**

ता. २४ जुलाई, इसवी सन १७९४

अप्पाजी चिमणाजी गोंधळेकर यांजकडून अहिल्याबाईंस पत्र विशेष. इकडील वृत्त गतवर्षी लिहिलेंच होतें. त्यावरून विदित झालेच असेल. वर्तमान कीं हरीपंतांचा काळ जाहला व श्री. पाटलांचा काळ झाला. हें वर्तमान कळलेच असेल. श्रीमंत सुभेदारांची रवानगी लवकर करावी अशी विनंती पेशजी केली होती. येणेंच्या आवया येतात. मात्र येत नाहीं. तेव्हां माझें लिहिणे निरर्थक आहे. आपण म्हणाल कीं तुम्ही संकटांत म्हणोन लिहितां. त्यास आमचे दैव आम्ही भोगीतच आहों. ज्यानीं आम्हास संकटांत घातलें त्यांस शरम असावी. ती तर नाहींच तेव्हा त्यांजला लिहून फळ काय? आमचे हाल पाहून ते दौलत भोगतात, त्यांजला लाज आहे कीं नाही हे आपण धर्मपरायण आपले ध्यानांत आहेच. परंतु श्रीमंत कै. सुभेदार यांचे अन्नाचा प्रताप माझे अंगीं आहे. याजकरितां इकडील हुजरातीचे कार्यभाग उरकावयाचें यश आपले सरदारीकडून व्हावें, हे माझें मनांत येते. म्हणून वारंवार आपल्यास लिहित असतों. असें असतां आपलेकडून आळस होतो. यास्तव माझे जिवास हळहळ लागते. तर याउपर लौकर रवानगी करावी. फार काय लिहूं? माझे लिहिण्याचा आशय पुढें आपणांस कळेल, तेव्हां माझें स्मरण आपण कराल. समागमें श्री. मल्हारराव सुभेदारांस द्यावें. जवळ चांगला माणूस नेमून द्यावा कीं त्याचे सूत्रानें चालावे. असा बंदोबस्त करून रवानगी करावी. त्यांत कांही चमत्कार आहे. याचा अर्थ पुढें साहेबांचे ध्यानांत येईल. खर्चाविशीं पूर्वी विनंती केली होती, परंतु कांहींच अनुकूलता केली नाहीं. बरें, आमचे हाल आपण पाहत असावें, उत्तम आहे. सविस्तर खुशालसिंग पवार जबानी अर्जी करितां ध्यानांत येईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

पैवस्त छ.१५ मोहरम १२०४.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 662 24-7-1794 A.D.

Appajee Chimnajee Gondhalekar to Ahilyabai. Haripant and Mahadajee are no more. Requests her to send Tukojeerao very early to Poona with Malharrao. It is my earnest desire to see that the Holkar State regains its former splendour etc.

---

**अ. नं. ६६३** **श्री**

ता. ६ आक्टोबर, इसवी सन १७९४

अहिल्याबाई होळकर यांजकडून चि. तुकोजी होळकरांस पत्र विशेष. प्रांत नेमाड व माळवा येथें दहक वगैरे सहा कलमांचे ऐवजीं वरात करून पागा पथकाचे कारकुन वसुलास रवाना केले. त्याजसमागमें पत्र पाठविलें ते पाहून लेखनार्थ अवगत जाहला. हे आपल्यापाशीं आल्यावर कागदपत्र पाहून महालीं रवाना करावे. सरंजामियापासोन कर्जपट्टीचा ऐवज घ्यावा व हा जाबसाल सर्वांप्रमाणें रा. तुळसाजी वाघ यासीही बोलत असतां निश्चयावर जाबसाल न करतां काठापुरीं जाऊन बसले आहेत. याजकरितां पागा महतपूरची जप्ती व इतर सरंजामी यांचें महालीं दहक वगैरे कलमाचे ऐवजास्तव कारकून पाठविले आहेत ते सविस्तर निवेदन करतील. त्याअन्वयें बंदोबस्त करून देववावा म्हणोन लिहिलें. ऐसियासी दहक वगैरे सहा कलमांचा ऐवज देशीं व खानदेश प्रांतीं घेतला त्याप्रमाणें इकडेही घेऊं म्हटल्यास मिरासदार कुणबी अथवा वतनदार पाटील व कुलकर्णी कोठें नाहींत. एकसाल कौलापेक्षां कांहीं अधिक घेतल्यास पुढें त्यानें गांवची लावणीटुपणीं करावी. पाटलाचे कारणच पडत नाहीं. कदाचित कोठें असलाही तरी शेत वाहून सारा द्यावा. हक्कदस्तूर अथवा इनामें ही रीतच नाहीं. तैसाच पटवारी वर्षभर झाल्यावर कामाचा नसल्यास नवा जुना करावा. जमीदाराचा प्रकार पहातां इंदूरचे मुक्कामीं सर्वांपासोन पेशकसी घेतलीच आहे. त्यावरही गुदस्तां दौ चौ महालचे जमीदारांवर ऐवज ठरावून घेतला. त्याची अद्याप फेड झाली नाहीं. इतक्यांत आणिक ऐवज मागितल्यास त्यांनीं कोठून द्यावा? कमाल जमेची दहक रयतेपासून घेणें तेव्हां कौलापेक्षां एक रुपया अधिक घेतली तर सोईस पडत नाहीं. मग दहकेचा प्रकार समजतच आहे. तशांत घेणें तरी खरीपीचे हंगामावर युक्तीनें घेतल्यास त्याजला अवघड पडत नाहीं. तो अर्थ पाहतां खरीप होऊन रबीचाही बहुत करून गुंता उरकण्यांत आला. आतां रयतेपासून पांच रुपये घेतल्यानें पुढें पंचविसाचे नुकसान होऊन लावणीस पेंच पडून लाखोंचे महाल खराबींत येऊन पैसा येणें कठीण. स्वल्प स्वार्थावर दृष्टी न ठेवितां ज्यावर दौलतीची भिस्त तें राखावें हें उत्तम. यास्तव तूर्त दहकेचा जाबसाल महकूब ठेऊन महालीं कारकून पाठवूं नयेत. पेस्तरसालीं हंगामसीर जाबसाल जसा उगवेल तसा उगवून घ्यावा. सरंजामीं याचा मजकुर वाघ, बुळे, बारगळ, आदिकरून लहानमोठे सरंजामी बहुतां दिवसांचे वडिलांनीं माणसांची जोड केली आणि पुढेंहीं चार माणसें जुनीं, केलेल्या कामाचीं पदरीं असल्यातच दौलतीचें स्वरूप. तेही आपल्यास प्रतिकूल काय? पेशजीं पुण्याचे मुक्कामीं ऐवज घेतला त्याजवर इंदुरीं समजाविशींचे समयीं निकड प्रसंगास चार रुपये मागितले ते दिले. पुढेंही त्यांची चाकरी सरंजाम पाहून खुश राहून जाबसाल केल्यास त्यांच्यानें दुसरी गोष्ट होणार नाही. त्यांच्या जप्त्या केल्यानें माणसें दुखतात. तशांत वाघाचे राऊत चिरंजीव राजश्री बापू होळकर याज समागमें आहेत. त्यांची हाजरी बिंबा जाधवानें घेतली. याशिवाय मशारनिल्हे जातीनिशीं सरंजामसुद्धां तुम्हां समागमें असोन जप्ती करावी तर फौजेस ऐवज त्यांनीं कोठून द्यावा? याजकरितां बापूजी आनंदराव पाठविले आहेत. सविस्तर बोलतील. अर्थ मनन करून उत्तर यावें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 663 6-10-1794 A.D.

Ahilyabai to Tukojeerao : An argumentative and exhaustive reply to his proposal of exacting extra-payment from the Saranjamis.

---

**अ. नं. ६६४** **श्री**

ता. १६ आक्टोबर, इसवी सन १७९४

रोजकीर्द सुभा राजश्री तुकोजीराव होळकर सन १२०४ दफाते. दयाळभट व रघुनाथभट व अनंतभट बिन त्रिंबकभट उपनाम देवळालीकर गोत्र चंद्रात्र सूत्र कात्यायन वाजसनीय वास्तव्य क्षेत्र श्री त्रिंबकेश्वर यांसी कीं, क्षेत्र मजकुर येथील आमचें तीर्थ-पुरोहितपण पूर्वीपासोन तुमचे तीर्थरूप कैलासवासी मल्हारजी होळकर सुभेदार यांनीं पूर्वीचे पत्र पाहून त्याप्रमाणें आपले नावें पत्र शके १६५५ सुभानुनामसंवत्सरे कार्तिक शुद्ध १० मितीस लिहून दिलें आहे. त्याज उपरि अलीकडे तीर्थरूप मातुश्री अहिल्याबाई साहेब तेथें शके १६८५ मार्गशीर्ष शु. १० स यात्रेस गेल्या होत्या त्यांनीही आपले नांवें पत्र लिहून दिलें आहे. ते दोन्हीं पत्रें पाहून हल्लीं हें पत्र लेखन केले असे तरी क्षेत्रीं आम्ही अथवा आमचे वंशीचा कोणीही येईल तो तुमचें पूजन करीत जाईल. अन्यत्र ब्राह्मणास त्रिंबकेश्वरीं तीर्थपुरोहितपण लिहून दिलें असल्यास ते रद्द असे. तीर्थरूपजींनीं आपले पत्रांत लिहून दिलें ते आम्हास मान्य आहे. मिती शके १७१६ आश्विन वद्य ५ म्हणोन पत्र.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 664 16-10-1794 A.D.

Subhedar Tukojeerao passes a Sanad granting Tirthopadhyaship of Trimbakeshwar to three brothers surnamed Dewalalikar, after seeing past notes of Subhedar Malharrao and Devi Ahilyabai.

---

**अ. नं. ६६५** **श्री**

ता. २० आक्टोबर, इसवी सन १७९४

सुभा राजश्री तुकोजीराव होळकर छ.७ जिलावल आश्विनमास मुक्काम महेश्वर. दफाते पत्र सन १२०४ वामनाजी हरी कमाविसदार प्रगणे अंबाड यांसीं कीं, हरिभक्तिपरायण चिमाबाई हरदासीन इजला प्रगणेमजकुरीं समाईक ऐवज पैकीं वर्षासन रु.१०५ एकशें पांच पेशजीपासून चालत होतें. तिचा काळ झाल्यानंतर जप्त केल्यामुळें

चिमाबाईचे शिष्य देवबाबा व कन्या मुक्ताबाई यांनीं सरकारांत येऊन विनंती केली कीं, त्यांजकडील उत्सव वगैरे आम्ही करितो. वर्षासनाचा ऐवज देविला पाहिजे म्हणोन. त्याजवरून सालगुदस्तांपासोन वर्षासनाचा ऐवज पेशजीपासोन पावत आल्याप्रमाणें पुढेंही देत जाणें ऐसे ठरावून हें पत्र सादर केलें असे. तरी तुम्हीं सालगुदस्तचे ऐवज देऊन पुढें साल मजकुरापासोन सदरहू १०५ रु. चिमाबाईंची कन्या मुक्ताबाई व शिष्य देवबा यांजला देऊन पावती घेत जाणें. म्हणोन पत्र हुजूर ताा वेंकाजी आबाजी कारकून निसबत मामलेदार.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 665 20-10-1794 A.D.

Subhedar Tukojeerao's orders to the Kamavisdar, Pargana Ambad :

Chimabai Hardasin was assigned an annual grant of Rs. 105/-She is now dead. Her daughter Muktabai and her disciple Devababa have been continuing the late Chimabai's celebrations of Gods etc., The grant shall, therefore, be continued to these persons.

---

**अ. नं. ६६६** **श्री**

ता. २२ आक्टोबर, इसवी सन १७९४

हरी सदाशिव जोग यांजकडून मातुश्री अहिल्याबाईंस पत्र विशेष. इनायतखान याजबरोबर पत्र पाठविलें त्यांत आज्ञा कीं हिदायत मोहिखान याजला एकंदर कबाल्याची चिठ्ठी करून दिली आहे. त्याप्रमाणें कबालाचा फडशा होऊन ऐवज ज्याचा त्यास द्यावा. झाडून ऐवज हिदायत मोहिखान याचे पदरीं घालावा म्हणून आज्ञा. ऐसियास महेश्वरचे मुक्कामीं रुपये १४०० चौदाशें हल्लीं शिक्का त्याजला दिले ते त्यास पावले. बाकी ऐवज चिठ्ठीपैकीं राहिला तो आपली आज्ञा येईल त्याप्रमाणें व्यवस्था करू. मीही आज्ञापत्र घेऊन उदईक दर्शनास येतो. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 666 22-10-1794 A.D.

Hari Sadashiv Jog to Ahilyabai. In obedience to your commands I have paid Rs. 1,400/- to Hidayat Mohikhan. The rest will be paid as Your Highness may direct.

---

अ. नं. ६६७ **श्री**

ता. ३०-१२-१७९४.

विष्णु लक्ष्मण यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र मुक्काम पुणियाहून पौष शुद्ध ९ सुभेदार श्रीमंत रा. तुकोजीराव साहेब दाखल जाहले. श्रीमंतांची भेट बहुत उत्तम प्रकारें झाली.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 667 30-12-1794 A.D.

Vishnu Laxman from Poona writes to Ahilyabai. Subhedar Tukojeerao arrived here, and was well received by the Peshwa.

---

अ. नं. ६६८ **श्री**

ता. ३१ आक्टोबर, इसवी सन १७९४

तुकोजीराव यांजकडून भगवंत बल्लाळ यांस ताकीदपत्र विशेष. चिरंजीव राजश्री काशीराव यांजला आपले साधनावर दृष्टी देऊन मनस्वीपणें समजावून मामल्याच्या वगैरे घालमेली करविल्या. पुढेंही त्याच अन्वयें वर्तणूक घडत आहे म्हणोन समजलें. ऐसियासीं तुम्ही जुन्या माहितगारीचे, काम लागल्यास चिरंजीवास समजावून असावें तें न करितां कारभारांत शिरून नवे जुने करवितां हे ठीक नसे, यास्तव हे पत्र सादर केलें असे. तरी इतःपर तुम्ही कारभारांत एकरूप न येणें. जाणिजे छ.६ रविलाखर बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**संस्थान पळसी रेकार्ड**

No. 668 31-10-1794 A.D.

Tukojeerao to Bhagwant Ballal : It is learnt that you misguide my son Kashirao.

It is hereby ordered that you shall nowise interfere with the administrative work. Your proper business was to supply information of the past when asked for.

---

अ. नं. ६६९ **श्री**

ता. १४ जानेवारी, इसवी सन १७९५

बातमीदार पुणें यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र : विशेष हल्लीं पुण्यास सरदार मंडळी बरीच जमली आहे. येथें लौकिक वार्ता कीं श्रीमंत सुभेदारसाहेबांची फौज पुण्य प्रांतीं ठेवावी. हें निश्चयांत नाही. मकरपर्वणी त्या काळीं झाली. पुढें कूच झाल्यावर उमजले. या प्रसंगी असें होणार नाहीं. भारीपणा व यश प्रतापी कदीम लढाया आवलोकनांत आलेले सरदार दुसरें असे नाहीत. दुसरें नूतनवयी आहेत. तेव्हां श्रीमंत नानांस इतकाच भरंवसा आहे. आजपर्यंत मदारुलमहा नाना. रा. हरीपंत तात्यांचे भरवशावर बेफिकीर होते. आतां सल्लामसलत माहिती आपल्या सरदारी विरहित दिसत नाहीं. महाराजांचे (अहिल्याबाई) लक्ष श्रीमंतांचे दौलतीचे प्रतापावर विशेष आहे व आपलेकडून वरचेवर साहित्यही होत असतें.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 669 14-1-1795 A.D.

News-writer from Pune to Ahilyabai : Nana Phadnavis, until now, depended on the military strength of Haripant Phadke.

There is, at present, none so old and experienced a head as the Subhedar to be serviceable to Nana, etc.,

---

**अ. नं. ६७०** **श्री**

ता. १९ जानेवारी, इसवी सन १७९५

तुकोजीराव होळकर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र विशेष. प्रगणे अंबाड येथील राजश्री बळवंत गोविंद वाकडे याचे रदकर्जी एक लाख रुपये वडिलांकडून देविले. त्यापैकीं पन्नास हजार सांवतराम पारख याकडे देऊन बाकी पन्नास हजाराचा हवालाही त्यांजकडे देविला. याप्रमाणें वडिलांचे लिहून आलें. परंतु पारख मजकुर याचें पत्र ऐवज पावल्याचें वाकड्याचे गुमास्त्यास येत नाहीं. यामुळें हे ऐवज पावला नाहीं म्हणून म्हणतात. याकरितां सेवेसीं लिहिलें असे तरी वडिलीं ऐवज सावकाराकडे दिला. त्याप्रमाणें ताकीद करून त्याचे पत्र वाकड्याकडे ये, तें केले पाहिजे. तरी सांवत पारखाची पावती पाठविली पाहिजे. ती आल्यांवाचून सावकाराची खातरजमा होत नाहीं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 670 19-1-1795 A.D.

Tukojeerao to Ahilyabai. The debt of Wakde (Rs. one lac) was paid by you through Sanwataram Parakh. Parakh has not yet presented receipt

of the same to the agents of Wakde. Please see that he does it.

---

**अ. नं. ६७१** **श्री**

ता. २६ जानेवारी, इसवी सन १७९५

तुकोजीचे मातोश्री अहिल्याबाईंस विनंती पत्र.

विशेष : पुणियास आल्यावर मागील खटले उठून पुढील संचणीचा बेत घडावा येविषयीं रा. बाळाजी लक्ष्मण यांसी बोलण्यांत येत गेलें. मशारनिल्हेनीं पुणियांत जाऊन येऊन बहुत धवधूप केली परंतु कोणी सावकार उभा राहून पैशाची सजल न पडे. लोक होते ते उठोन गेले. पुढें मसलतीचा प्रकार पाहतां फौज आणि पैका दोन गोष्टींची बळकटी असल्याव्यतिरिक्त आपले स्वरूपास नीट नाही. त्यांत श्रीमंतांबरोबर असतां गळाठा नसावा. या अन्वयें बंदोबस्ताची पैरवी कोणत्या अन्वयें करावी? सावकार कोण? आपले घरचा प्रकार पाहतां महालचा ऐवज दोन दोन साला येऊन चुकला. तेव्हां सावकार एक खातरजमेचा आणून त्याशी बोलून चालून गाडें चालतें करावे. सरकारचे कूच होऊं लागलेस आपल्यास राहतां नये. यामुळें अगोदरच येविषयीं जपून बंदोबस्त करणें तसा करावा. याप्रमाणें बोलणें घडतच होते. तितक्यांत रा. बाळाजीपंतनाना यानीं मशारनिल्हेस आपलेकडे नेऊन तुम्ही सरदारीचा बंदोबस्त कसा केला हे समजावून देऊन आम्ही सरकारातून सांगूं तसा फौजसरंजाम जमवून मसलतीचा समेट होय तोपावेतों खर्चाचें कमी पडूं नये या गोष्टीची खातरजमा करावी. तेव्हां आम्हांकडून कारभार होत नाहीं असे उत्तर करून येथेंही येऊन सांगितलें. नंतर रा. यशवंतराव गंगाधर याजला त्यांनीं बोलावून आणून त्यांजकडून कांहीं तजवीज करून घेऊन काम चालीस लावून बखेडा तोडून पुढील बंदोबस्ताचा विचार कर्तव्य तसा करावा अशी योजना करून वडिलांस लिहिलेंच आहे. मशारनिल्हे स्वारी पुण्यास आल्यापूर्वी एक दोघे मातबर सावकारासीं ऐवजाविषयीं बोलले होते. त्यासमयीं त्यांची बोलणीं खचित झाली. त्या कायमीवर त्यांकडे ऐवज मागावयास कारकून पाठविलें असतां त्यांनीं ओळख सोडून गोष्टी सांगितल्या. भरवंशाचे सावकार त्यांनीं वेळेस टाळा दिला. तेव्हां समयास कोण अनुकूल होतो? तत्रापि याबाबत यत्न धावधूप करितात. परंतु कोणीकडून उपयोग घडावा असे दिसोन येत नाही. सरदारीचा गळाठा, शिलेदार उठोन गेले. पागेत घोड्यावर बारगीर पोरें नाहीत. शागीर्दपेशाचा प्रकार असाच. पलटणास दरमहा द्यावा लागतो. याखेरीज दरमहा चंदीचा बेत राहिला पाहिजे. प्रसंग अडचणीचा. कोणें समयीं गांठ पडून लढाईचा मोहरा येऊन प्राप्त होईल? जमियत व पैशावांचून काय करावे? याउपर वडिलांकडून खर्चाची सरबराई होऊन आल्यास प्राप्तप्रसंगीं अनुसरणता होऊन सरकार मर्जी राहून आपले स्वरूपाची गोष्ट घडेल. याजकरितां वडिलीं तेथून खर्चाचा उप्पर राखून सांप्रत संचनी करणें. त्याचा बेत पुढें आगोठीपावेतों तरी बोभाट न पडे असें असावें.

येविषयीं व्यवधान देऊन उचित ते करण्यांत आलें पाहिजे. आम्ही यापुढें जीवित्वाची काळजी वहावी आणि शरीरही दिवसेंदिवस क्षीण होत जाते. यापेक्षां याप्रसंगीं खर्चाची सरबरा होऊन जमाव पडो न पडो परंतु एकवेळ स्वामीसेवेंत पुढें होवून उजळणी करावी. त्यांत श्री मार्तंड जसें घडविणार तसें घडेल. ईश्वरें जी गोष्ट नेमली असेल ती आज, उद्यां केव्हां सुटत नाहीं. वडिलांचे पुण्यप्रतापें घडेल तें खरें. मि।। माघ शु.६

**सरकारी रेकॉर्ड**

No. 671 26-1-1795 A.D.

Tukojeerao to Ahilyabai : Campaign is looming large, and we have to be ready in anticipation thereof. Former Sowkars have turned strangers, and none new ones can be found out. Please make arrangements for securing money.

---

**अ. नं. ६७२** **श्री**

जानेवारी, इसवी सन १७९५

मातोश्री अहिल्याबाई यांजकडून गणपतराव नारायण यांस पत्रः विशेषः तुम्ही वद्य ४ दोन प्रहर रात्रीचें पत्र पाठविलें ते वद्य १४ प्रहररात्रीं पावून लेखनार्थ अवगत झाला. येथील प्रसंगीं जालेलें वर्तमान वरचेवर लिहीत गेलों. त्यावरून ध्यानास आलेंच असेल. आम्ही आपल्याकडून सरकार कामाविषयीं जपावयास अंतर न करितां कामाकाजास सिद्ध असोन घालमेलीच्या वाटाघाटी चालल्या आहेत. याजमुळें आळा न राहतां सावकारासही विचार पडून कोणाची हिंमत चालती? कोणी मागेंपुढें पाहतात. सर्व गोष्ट धन्याच्या पुस्तपन्हेवर आहेत. श्रीमंत राजश्री नानानीं साहेबांचे पत्राचा अक्षेप घेतला आहे. जसें पत्र येईल तसे करतील. आम्ही देण्याचे पेचांत येऊन सहा महिन्यांत असा प्रकार घडल्यानें लौकिकांत कसें दिसतें, याचा विचार करणें धन्याकडे आहे म्हणोन, विस्तारें करून लिहिले. ऐसियासी तुमचे पत्रापूर्वी एक दिवस चिरंजीव रा. तुकबाचे पत्र आलें होते. त्यांत तुम्ही हात टेकून आमच्यानें गाडें चालत नाहीं असें जाबसाल करितां, तेव्हां दुसरी तजवीज करणें प्राप्त असे भावें लिहिलें होतें. त्याचे उत्तर चिरंजीवास ल्याहावयाचे ते लिहिले आहे. सारांश, दौलत मोठी, सरकारांत पैशाची ओढ, श्रीमंतांस मसलत, चिरंजीव प्रसंगीं जाऊन पोहचले. वरकड सरदारांची तयारी होऊन ते सिद्ध आहेत आणि इकडील अद्याप बंदोबस्त कांहींच नाही, हे ऐकून चित्तास वाईट वाटतें. या प्रसंगीं सर्वांनीं एकदिल राहून धनी व कारभारी यानीं ऐक्यतेनें चालावे, यात कामाचा आळा. सावकारासी पत राहील ही गोष्ट जतन होऊन सरकार चाकरी घडून दौलतीचा आबताब राहून गाडें चालतें. तो

प्रकार न घडतां वेगळाल्या चाली पडून अशा गोष्टी घडतात हें कोणासही चांगले नाही. राजश्री बाळाजीपंत नानांस दौलतीचा सर्वोपरी अगत्यवाद. मार्गाच्या करण्यास ते अनुकूल आहेत. कोणांत कोणीं न मिळतां आपापलेपरी बोलणी पडू लागल्यास त्यांनीं तरी काय करावें? तुम्ही आपल्याकडून कामाकाजास सिद्ध असतां सहा महिन्यांत घालमेल होऊं लागल्यास दुतर्फाही चांगलें नाहीं. ओढीच्या प्रसंगास वचनाची प्रामाणिकता व सचोटीस जपलें तरीच चालतें. हे अर्थ रा. बाळाजीपंत नानांचे ध्यानांत आहेत व चिरंजीवास लिहिलें आहेत विचार करून उचित तें करतील. तुम्ही घाबरें न होतां हिंमत धरून आपल्याकडेस शब्द न ये या गोष्टीस जपून चिरंजीवाचे सांगितल्याबरहुकूम वर्तणूक करणें. एकनिष्ठपणें सरकार चाकरीवर लक्ष ठेवून असल्यास ईश्वर उत्तम तेच करील. हल्लीं चिरंजीवांसही पत्र पाठविलें आहे. सावकारास चिरंजीवापाशीं घेऊन जाऊन त्यांनीं व तुम्ही मिळून त्याची खातरजमा करून त्याजपासून ऐवज घेऊन गाडे चालवून प्राप्त प्रसंग विलग न पडे तें करणे. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 672 January, 1795 A.D.

Ahilyabai to Ganpatrao Narayan : Take heart; take some Sowkar to Tukojeerao and see that our preparations for the war are at par with those of others.

---

**अ. नं. ६७३** **श्री**

फेब्रुवारी, इसवी सन १७९५

मातोश्री अहिल्याबाई यांजकडून श्रीमंत पेशवे साहेबांस विज्ञापना विशेष. स्वामी कडून छ.२५ चे रजबचे पत्र आलें ते प्रविष्ट होऊन बहुत संतोष जाहला. तुमचीं पत्रें रा. यशवंतराव गंगाधर यांस येत गेलीं कीं, रा. शिवाजी गोपाळ यांजविशीं सरकारांत विनंती करून आम्हाकडे पाठऊन द्यावें, म्हणून त्याजवरून तुम्हांकडे शिवाजी गोपाळ याची रवानगी केली आहे, तरी तुम्ही व राजश्री तुकोजी होळकर एक होऊन आपले घरचा व दौलतीचा रीतीनें बंदोबस्त करून पहिल्यापासून सरकार लक्ष धरून चाल चालत आल्याप्रमाणे चालणें म्हणोन पत्रीं आज्ञा. ऐसियास मशारनिल्हेस आज्ञा होऊन तेथें येऊन ते पावले. आज्ञेचे भाव सर्व सांगितले. येथील व चिरंजीव रा. तुकोबाचे दोन विचार नाहींत. घरचा व दौलतीचा रीतीनें बंदोबस्त घडून सरकार चाकरीस जपावें, हेंच पहिल्यापासोन आहे आणि पुढेंही त्यास लक्षोन चालावें, याहून दुसरा अर्थ विशेष तो कोणता? सर्व प्रकारें निर्वाह पूर्वीपासून घडत आला, त्याअन्वयें पुढेंही करणार

स्वामी समर्थ आहेत. वरकड इकडील अर्थ सविस्तरें राजश्री यशवंत गंगाधर विनंती करतील. म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 673 February, 1795 A.D.

Ahilyabai to Shreemant Peshwa : Tukojeerao and myself united, have no other object before us except unity at home, and service of the Sarkar abroad as before.

---

**अ. नं. ६७४** **श्री**

ता. २२ मार्च, इसवी सन १७९५

संताजी होळकर यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र. विशेष : किल्ले जलघोण येथील ठाणें बडवाणीकरांकडील असता तेथें आपले ठाणें येऊन बंदोबस्त केला म्हणोन विदित झाले. ऐशियास संस्थान अबास बडवाणी येथील बंदोबस्त आजपर्यंत सरकारातून राखल्यामुळें राहिला. प्रस्तुत राणा उमेदसिंगाचा काळ जाला. अशांत त्याची जागा घेतल्यास लौकिकांत नीट दिसणार नाहीं. म्हणून हे पत्र लिहिलें असे. तरी तुम्ही किल्ले जलघोण येथील ठाणें वस्तभावसुद्धां त्यांचे त्यांच्या स्वाधीन करणे म्हणोन आज्ञा. ऐसियास आग्रह आमचा काडीमात्र नाहीं. वडिलांची आज्ञा प्रमाण. निमित्य कीं त्याकडून बंदोबस्त राहून भिल्लांचा उपद्रव सरकारी महालास न व्हावा एतदर्न्नी विज्ञप्तिपत्र लेखनांत येऊन मीही मागाहून वडिलांचे सेवेसीं येतो.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 674 22-3-1795 A.D.

Santajee Holkar to Ahilyabai : Ahilyabai disapproved Santajee's action in taking possession of fort Jalghon belonging to the Barwani State. Santajee respects her orders, and submits his reasons for the action taken before.

---

**अ. नं. ६७५** **श्री**

ता. २९ मार्च, इसवी सन १७९५

खंडो रामाजीचें मुक्काम रामपुराहून मातोश्री अहिल्याबाईंस विनंती पत्र विशेष. महाराजांचे आज्ञापत्र आले कीं, भवानसिंग चंद्रावत यांजकडील पांच कलमांचा जाब उगवून घेऊन उठंत्री पाठविली आहे. हे देऊन त्याजला गांवीं आणोन बसवावे. त्याजवरून आज्ञेप्रमाणें मशारनिल्हेकडील कारकुनासी बोलणें होऊन कलमबंदीचे जाब येणेंप्रमाणें ठरावून घेतले तपशील :

१ वर्तणूकीचे जामीन राजश्री रावत भीमसिंग चंद्रावत यांजला दिल्ले. त्यांचा दस्ताऐवज असलपत्र सरकारांत घेणें म्हणोन त्याजवरून पेशजी जामीनकीचें पत्र आणिलें व तें मागाहून सरकारआज्ञेप्रमाणें कमाविसदाराकडील कारकून सलुंबरेस जाऊन रावतजीचें पत्र सरकारचें नांवें आणिलें तें ऐसीं अस्सल दोन्हीं पत्रें घेतली. कलम १

१ सरकार चाकरीस रुजू राहून कामकाज घडल्यास मामलेदाराशीं सामील होऊन चाकरीस जपत जावे. याअन्वयें त्यासी बोलण्यांत आणोन सरकारपत्रीं जाब उगवून घेतला. कलम १

१ आगोदर अंतर पडले याउपर एकनिष्ठपणें वर्तणूक करावी. इतक्यावर दुसरी गोष्ट घडल्यास गांव जप्त करावे त्यास : येविशीं अंतर पडावयाचें नाहीं असे सरकारपत्रांत लिहून घेतले. कलम १

१ आमद व आमदगांव दोन्ही सरकारांत ठेविले. त्यांजला काडीमात्र उपसर्ग देऊं नये. त्याचा जाब रांगडी पत्रांत कीं बैठक जागा सरकारांत ठेविली. आमद वगैरे गावांसी उपसर्ग होणार नाही. कलम १

१ नजराण्याचे रुपये पंचवीस हजाराचे लिखतंग करून द्यावें. मागाहून पुरवणी पत्रीं आज्ञा कीं, अखेर सालपर्यंत भरणा करून द्यावा. न दिल्यास पुढें व्याजसुद्धां देऊं. याअन्वयें लेख घ्यावा. त्यास : येविषयींची विनंती पूर्वी महाराजांस लिहिली कीं पंचवीस हजारांचा जाब बोलण्यांत आला आहे. त्याप्रमाणें सरकार आज्ञाही आली. त्याचे घरांत ऐवज देण्यास जागा आहे नाही हे सर्व महाराजांचे ध्यानांत आहे. सरकार आज्ञेस उजर नाहीं. निदान त्यांसी बोलणें बहुत केलें. नजराण्याचे ऐवजास व्याज लिहून घ्यावें. परंतु जाब सुधरता न दिसतां सर्वांनुमतें कीं जाब तुटतो तेव्हां आणखी बोलणें करून पांच हजार रुपये नजराणा जास्त ठरावून तिसा हजाराचे लिखतंग करून घेतले. कलम १

..............

५

सदरहू पांच कलमें उगवून घेऊन त्यांजकडे आपल्याकडून रा. नारो आबाजी निसबत शरीफभाई व रा. राघोपंत भाऊकडील नरहर बापूजी, कमाविसदाराकडील रा. कृष्णाजी महादेव असे त्रिवर्ग कारकून पाठवून मौजे डोयली तालुके पठार येथें आणोन चंद्रावताचा

मुक्काम करविला. तेथून आम्ही सरंजाम सुद्धां मौजे बिसम तालुके पठार येथे जाऊन मुक्काम केला. चैत्र शुद्ध ४ स भेटीचा निश्चय करून मंडळीसुद्धां पुढें गेली. झाडून सरंजामसुद्धां येथें यावे, तर महलास उपद्रव लागेल. म्हणून तालुके पिंपल्यानजीक नारायणगड येथें येऊन सडेच आलों. समागमें स्वार दीडशेंपर्यंत व पायमाणसें शेंसवाशेंपर्यंत होती. तिकडून चंद्रावत आले. त्याजसमागमें सरंजाम शेदीडशें स्वार व लोक व पायेची माणसें तीनशें चारशें पावेतों होती. भेटी व्हावया त्यांचे आमचे अंतर बाणाचें खास राहिले. सावकार मंडळी त्यास भेटावयास पुढें गेली तों भवानीसिंग घोड्याखाली उतरला. भेट होती इतक्यांत त्याजकडील शिपायांच्या बंदुकीचा तोडा लागून आग लागली. दोन तीन माणसें बहुत जळाली. भवानसिंगाची डाव्या हाताची पोटरी जळाली. डाव्या अंगे केसांना व पापण्यास आंच लागली. अंगावरील पोषाख जळाला. कमरेस बंदुकीचा साज होता त्यास महाराजांचे कृपेकरून आंच न लागलेमुळें त्याचा बचाव आला. ते समयीं त्यास दगा भासून तरवारी निघाल्या तों आपल्याकडील कारकून जवळ होते. त्यांनीं भवानसिंगास सांगितले कीं आम्हाकडील दगा करावयाची चालच नाही. तुम्ही आपसांत शोध करावा. त्याजवरून मशारनिल्हेनीं शोध करतां त्याचेच शिबंदीचे माणसाचे सिंगाड्यास दारूमुळें तोडा लागून आग घेतली. म्हणोन ताकीद देऊन तरवारी मेणांत घातल्या. त्या गडबडींत सावकार जवळ होते., त्यांचेही पांघरुणास आंच लागली. महाराजांचे प्रतापेकरून खैर जाहली. नंतर मशारनिल्हेनीं सांगून पाठविलें कीं भेटीचा मुहूर्त जाऊं देऊं नये. त्यावरून परस्परें भेटी होऊन त्यास समागमें घेऊन बसेल्याचे मुक्कामीं आलो. दोन दिवस राहून त्यांचे शरीर स्वस्थ जालें. उपरांतिक सरकार आज्ञेप्रमाणे बोलणें होऊन सरकारी दस्तऐवजीं कागदपत्र मी आपलेपाशीं घेतले. उठंत्री पत्र त्याचे गांवचे त्यांचे हवालीं केलें आणि सरकारची वस्त्रें त्यास व त्याचे मंडळीस दिलीं. परस्परें सन्मान होऊन सरकार नजरेचा घोडा सारंगा त्यांचे बसण्याचा त्यानें नजर केला व सरकारचे पागे वगैरे मंडळीस त्यांनींहीं वस्त्रें दिली. त्याजसमागमें रा. नारो आबाजी व मामलेदाराकडील कृष्णाजी यांजला मौजे पगारा जहागिरीचा गांव आहे तेथें नेऊन बसविलें आहे. सध्यां ते गांव उजाड आहे. राहण्यास घरे बांधतील. आम्ही मंडळीसुद्धां स्वार होऊन रामपुरियास काल आलो. चंद्रावताकडील दस्तऐवजीं कागदाच्या नकला व परस्परें सन्मान जाला. याच्या यादी सेवेसीं पाठविल्या आहेत, त्यावरून ध्यानास येईल. सारांश, भवानीसिंगाची चाल पाहतां इतका प्रकार घडावा असें नाहीं. परंतु होणारानुरूप चौघांचे बुद्धिभ्रंशामुळें सर्वोपरी नाश जाला. आतां सरकार चाकरीवर लक्ष ठेवील असे दिसते, म्हणोन मशारनिल्हेस खातरजमेचे पत्राची आज्ञा करणार धणी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्त छ.१० रमजान सन १२०४.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 675 29-3-1795 A.D.

Khando Ramaji from Rampura sends the copy of agreement arrived

at between Bhawansing Chandrawat and the Sarkar. Incidentally he describes how the visit took place etc.

---

**अ. नं. ६७६** **श्री**

ता. २० एप्रिल, इसवी सन १७९५

खंडो बाबुराव यांजकडून मातोश्री अहिल्याबाईंस पत्र विशेष. आज्ञेप्रमाणें बाकीची याद महादजी पंतापाशीं पाठविली आहे, ते ध्यानांत आणून बाकीचा ऐवज आमचे फाजिलांत लावून द्यावा, म्हणजे दारनादार असाम्या युक्तीप्रयुक्तीनें दोन तीन वर्षांत वसूल घेऊं, साहेबींही पूर्वी समक्ष आज्ञा केली होती कीं, बाकीच्या यादी आल्या म्हणजे फाजीलाचा निकाल करून देऊं. तरी यादी पाठविल्या आहेत. तो ऐवज फाजीलांत लागलेनी आमची निभावणी होऊन लज्जा राहील. म्हातारपणीं आब्रु राहील. पूर्वीपासून लौकिकास चढविलें तो समय निभावला पाहिजे. येथें सरकारी जासूद वरातीवर आला आहे. तो नित्य पाणी बंद करितो, भोजन होऊं देत नाही तेणेंकरून माझी अप्रतिष्ठा होते. हें संरक्षण करणें महाराजास अगाध नाही. सरकारांत करोडोंच्या घडामोडी होतात तेथें माझा अर्थ तो किती? मी श्रीमंत कै. रावसाहेबांचा स्थापित आहे. त्याचा अभिमान साहेबास असावा. आमचे संकट या काळीं दूर करणार साहेब समर्थ आहेत. श्रुत होय हे विज्ञापना.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 676 20-4-1795 A.D.

Khando Baburao to Ahilyabai. Account-sheets, as ordered, are submitted. I am now old, and look up to you for protection as my guardian.

---

**अ. नं. ६७७** **श्री**

ता. ३० मे, इसवी सन १७९५

तुकोजीराव होळकर यांजकडून रामराव अप्पाजीस पत्र विशेष. तुम्ही पत्र पाठविलें ते पाऊन मजकूर ध्यानास आला. साहेबांची आज्ञा घेऊन स्वार जाहलों ते सेंधव्याचे घाटानें ज्येष्ठ शुद्ध ३ गुरुवारीं रेवा दक्षिणतीरीं दाखल जाहलो. ते रोजीं दिनशुद्धी चांगली नव्हती याजमुळें तिकडेच राहून शुद्ध ५ पुष्यावर मंदवारीं दोप्रहरां अलीकडे येऊन श्रीमंत मातोश्री साहेबांचे दर्शन घेऊन स्थूलमानें लढाईचें वगैरे वर्तमान निवेदन केलें. काल रविवारीं दोन

वेळां जाऊन येण्याचा उपक्रम केला आणखी दो, चौ, रोजांत दोन तीन बैठकींत आदिअंत वर्तमान निवेदन करून मर्जीचे भाव जसे असतील तसें लिहून पाठवूं. इकडील उष्णकाळ भारी. मातुश्री साहेबांचे शरीर अशक्त तशांत मासपक्ष समाधान नाहीं. ज्वरांश आहे याजमुळें कचेरीचा राप्ता बहुतेक नसतो. कालपासून ज्वर अधिक आहे. याजमुळें मर्जी दिलाबाहेर आहे. दो रोजा शरीरीं स्वस्थता आली म्हणजे प्रसंग पाहून विनंती करीन. त्याजलाही मनन तिकडील आहेच. शरीर प्रकृती नीट नाही याजला उपाय काय? मागाहून सविस्तरें लिहून पाठवू. राजश्री संताजी बाबाही अद्यापि आले नाही. तेही दो, चौ, रोजांनीं येतील तोवर मातुश्री साहेबांची मर्जी कांहींशीं नीट होईल असे दिसतें, म्हणोन विस्तारें लिहिले. ऐसियास अलीकडे तीर्थरूप मातोश्री साहेब यांचे शरीरीं आरोग्य होऊन मर्जी नीट जाहलीच असेल. चिरंजीव राजश्री संताजी होळकरही सेंधव्याहून येणार होते तेही आले असतील. त्यांस इकडील खर्चाची अडचण वगैरे आंतील बारीक मोठे विचार तुम्हांशीं बोलण्यांत आले आहेत त्या अन्वयें सविस्तरें तीर्थरूप मातोश्रीसाहेबांस श्रुत करून मर्जी प्रसन्न राहून बहुत दिवस न लागतां खर्चाचा वगैरे लौकर बंदोबस्त होऊन प्रसंगास उपयोगी पडेल. चंदीचे वगैरे नागे नित्य होतात. याजकरितां चिरंजीव राजश्री संताजी होळकर व तुम्ही मातोश्रीसाहेबांची मर्जी प्रसन्न पाहून विनंती करून अर्थ घडे तें सत्वर करणें. रवाना चंद्र २२ जिल्काद सुरूसनसीततिसनेमयाव-अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**पळसीकर दिवाण रेकॉर्ड**

No. 677 30-5-1795 A.D.

Tukojeerao Holkar to Ramrao Appaji : Acknowledges receipt of his letter in-forming of the illness of Ahilyabai; requests Ramrao to open up the subject of money when he finds her in better health and mood, in conjunction with Santaji Holkar.

---

**अ. नं. ६७८** **श्री**

ता. १५ जून, इसवी सन १७९५

मातोश्री अहिल्याबाई यांजकडून चि. तुकबा होळकरांस पत्र विशेष. तुम्ही पाठविलेलें पत्र पावून लेखनार्थ अवगत जाहला. ओढीताडीचे प्रकार समजून व्यवस्था करावी यास्तव राजश्री रामराव अप्पाजी पाठविलें आहे. सविस्तरें विनंती करतील म्हणोन लिहिलें व मशारनिल्हेनीही साद्यंत निवेदन करून आजमासाच्या वगैरे यादीबिदी समजाविल्या. ऐसियासी तेथील ओढीताडीचे अर्थ लिहावें तेव्हां समजावे ऐसें नाही, आपले घर आपल्यास हजार कोसांवरून दिसतच आहे, ओढीचा प्रकार. त्यास तूर्त महाल त्यास मोठी पराकाष्ठा दुसाला

रसदा घेतल्या म्हणजे तथा राहिली नाही, मामलतीच्या घालमेलीही केल्या तरी दुसालास आणिक पैका कोणी देणार नाहीं, त्याअर्थी जुने मामलेदारांची लाखोंची नुकसानी करून बिनव्याजी लाखोच रुपये देणें त्याच्या घालमेली केल्यानें स्थित राहत नाही; यास्तव त्याजलाच पत्रें पाठवून आपल्यापासीं बोलावून आणून गोड बोलून त्यांचे हरिद्र व महालाचे अजमास समजून तुमचे त्यांचे विचारें चार रुपये कमबेशी ठेरावून मामलती त्यांच्या त्यांजकडे बहाल ठेवून ऐवजाचा निकाल करून घेऊन महालीं मार्गस्त करणें, अशा रीतीनें बंदोबस्त केल्यानें त्यांची थोब राहून महालच्या आबादीत अंतर न पडतां सरकारचाही अर्थ घडतो. दौलतीच्या ओढी मोठ्याच आहेत, ह्या केवळ महालावर वारतात ऐसें नाहीं. येविषयींचे बंदोबस्त सरकारांतून जाहले पाहिजेत याचे पर्याये अगोदर एक दोन वेळां पत्रीं लिहिलेंच आहे व हल्लींही मशारनिल्हेसी बोलण्यांत आणिले आहे हे सविस्तरें बोलतील. मनन करून त्या अन्वयें सरकारांत राजश्री बाळाजीपंत नानांसी बोलून बंदोबस्त दोन्ही दौलतीची समानता होवून सरकारचाकरी घडें तें करणें; आधीच तुमचें शरीर अशक्त आधीव्याधीची हरणें काळजी केल्यानें अधिकोत्तर शरीराची मात्र क्षीणता होते, कोणी पैका देऊन ओढी वारतात ऐसें नाही. यास्तव घाबरे न होतां हिंमत धरून मिजास कायम ठेवून सचोटीस जपत गेल्यानें ईश्वरच अनुकूल होऊन सर्व गोष्टी पारंगत करील. चिंता न करणें. आम्हांस रात्रंदिवस चिंतन तिकडीलच आहे, तेथील थोब राहिल्यानें सर्वांस चांगले ऐसे जाणून आजपर्यंत घडलेल्यास अंतर केलें नाहीं व पुढेंही चुकावयाचे नाहीं. कापडाविषयीं लिहिलें होते त्याजवरून, खरीदी होऊन आली. त्याची रवानगी मशारनिल्हे समागमें उंटे वगैरे जाब्ता देऊन केली असे. त्याच्या यादी अलाहिदा आहेत. त्याप्रमाणें सांभाळून घेऊन उत्तर पाठविणें. स्वारीतील रुमाल येथें होते, ते राजश्री महिपतराव गिरमाजी सहित पाठवावयाविषयीं एक दोनवेळां लिहिले होते. त्यावरून उंट वगैरे सरंजाम देऊन मशारनिल्हेची रवानगी केली असे. रा. चंद्र २७ जिल्काद सुरुसन सीततिसेन मयावआलफ. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. मोर्तबसुद.

**संस्थान पळसी येथील दिवाणाचे दप्तर**

No. 678 15-6-1795 A.D.

Ahilyabai to Tukojeerao : Exhorts him to take heart, and open the subject of “relations between the Holkar and Scindia” to Nana Fadnavis.

---

**अ. नं. ६७९** **श्री**

ता. १८ जून, इसवी सन १७९५

मातोश्री अहिल्याबाईंकडून रा. रामराव अप्पाजीस पत्र विशेष. लाक्षातेल शरीरास

लावल्यानें दाह शमन होतो म्हणून श्रवणांत आले. सबब त्याचा तलाश होऊन सरकारांत प्रविष्ट जाहलें पाहिजे. याकरितां तुम्ही पुणियासी गेल्यावर राजश्री बाळाजीपंत नाना यांजला पुसून त्यांजकडून अथवा शहरांत वैद्य वगैरे आहेत. त्यांजपाशी संग्रही असल्यास पावशेर आदशेर मिळेल ते घेऊन मुजरद काशिदाबरोबर जलद पाठवून देणें. रवाना चंद्र ३० जिल्काद बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**दिवाण पळसीकर रेकॉर्ड**

No. 679 18-6-1795 A.D.

Ahilyabai to Ramrao Appajee (Palshikar) : Please arrange to send us Laksha oil as much as can be secured in Poona. It cools heat.

---

**अ. नं. ६८०** **श्री**

ता. २३ जून, इसवी सन १७९५

मातोश्री अहिल्याबाईंकडून रामराव अप्पाजीस पत्र विशेष. तुम्ही बलकवाडा येथून कूच करून गेल्यावर मार्गी पाऊस लागला. तेणेंकरून दप्तरच्या कंठाळीस कांहीं पावसाचा असार लागला, म्हणून विदित जाहले. त्यावरून हें पत्र लेखन केलें असे. तरी तुम्ही एक मुक्काम करून कागद भिजले असतील ते वाळवून इतकियावर मार्गाचा जाप्ता चांगला करून पुन्हा न भिजेत ऐसें करणें व स्वारीकरितां एक उंट आणावा व बुरणीस व मोमजामे सुमारी चार याप्रमाणें पाठविले आहेत. सांभाळून घेऊन उत्तर पाठविणें. रवाना चंद्र ५ जिल्हेज सुरू सन सीततिसेनमयावआलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**पळसीकर दिवाण यांचे दप्तर**

No. 680 23-6-1795 A.D.

Ahilyabai to Ramrao Appajee : There was rain-fall on your way. The rain spoilt the Duftar. Pieces of new cloth are sent. Please make good arrangements for your travel, and then start.

---

**अ. नं. ६८१** **श्री**

ता. १३ आगस्ट, इसवी सन १७९५

काशीराव होळकरांकडून तुकोजीराव यांस पत्र विशेष. लोकांचा ऐवज पांच लक्ष

रुपये अजमासे देणें त्यापैकीं तीर्थस्वरूप मातोश्री बाईसाहेबांनीं आरंभ करावयास दीड लक्षाच्या वराता करून दिल्या. मागून काळ होणार त्याचे पूर्वी दोन रोज तीर्थस्वरूप राजेश्री संताजी बाबांस देण्याविषयीं वगैरे कित्येक प्रकारें निरवानिरव केली, त्यावरून त्यांनीं दोन लक्षाच्या वराती करून दिल्या.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 681 13-8-1795 A.D.

Kashirao Holkar to Tukojeerao : We owe a debt of about 5 lacs. Ahilyabai has taken the matter into serious consideration; and as a mark of a beginning she has passed notes of a lac and a half etc. Santajee Baba was taken into confidence, and final arrangements were talked about.

---

**अ. नं. ६८२** **श्री**

ता. ४ सप्टेंबर, इसवी सन १७९५

१ विश्वंभरदास याचे रामपुरा येथून काशीराव होळकरांस पत्र विशेष. श्रीमंत मातोश्री साहेबांचें वर्तमान इकडे कळल्यावर सर्वांचे धैर्य जाऊन परम दुःख प्राप्त झालें. इच्छा ईश्वराची. त्याला कोणाचा उपाय नाही. इतःपर सर्वांस आधार साहेबांचे चरणांचा आहे.

२ कृपाळसिंग याचे रामपुरा येथून काशीराव होळकरांस पत्र विशेष. श्रीमंत मातोश्री बाईसाहेबांनीं कैलासधाम केल्याचे वर्तमान आले. येणेंकरून खेद प्राप्त झाला. त्याचा तपशील विनंतीपत्रीं लिहून फायदा नाही. ईश्वरे मोठाच नाश केला. सर्वांचे छत्र गेले. या गोष्टीस कोणाचा उपाय नाही. आता सर्वांचे छत्र श्रीमंत राजश्री सुभेदारसाहेब आहेत.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 682 4-9-1795 A.D.

Vishwambhardas and Kripalsing both from Rampura express their great grief to Kashirao Holkar on the death of Devi Ahilyabai.

---

**अ. नं. ६८३** **श्री**

ता. ५ सप्टेंबर, इसवी सन १७९५

रोजकीर्द छ.२० सफर १२०५ फसली. गरूड पुराणा आधारें. ''तीर्थरूप बाईसाहेब

कैलासवासी झाल्या. त्यांजला परलोक सुखार्थ आम्रवृक्ष दान करावे याचा विधी'' गरूडपुराणीं आहे. त्याजवरून :

मौजे भोगांव तालुके सरकार बिजागड येथील गंगाबागेंतील, दोन आम्रवृक्ष मांधाता येथील मोहनभट बाबुभट व्यास यांस दान दिले.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 683 5-9-1795 A.D.

Tukojeerao grants two mango-trees of the Ganga-baug (Mauza Bhongaon, Sarkar Bijagarh) to Mohanbhat Vyas for the salvation of Devi Ahilyabai's soul. (according to the dictates of Sri Garud Purana.)

---

**अ. नं. ६८४** **श्री**

ता. २० सप्टेंबर, इसवी सन १७९५

श्रीमंत तुकोजीराव यांजकडून रामराव अप्पाजीस पत्र विशेष. चिरंजीव राजश्री काशीराव यांस ज्याचे काम त्याचे हाते घेऊन कारभार तुम्हांस घेऊन करण्याविषयीं जातेसमयीं समक्ष आज्ञा करून चिरंजीवास लिहिण्यांत आले आहे आणि हल्लींही लेखन केले असे. तरी तुम्ही दूरंदेशी करून जो कारभार तेथें कर्तव्य त्याजविशीं अगोदर सरकारांत लिहून सरकारची आज्ञा नेऊन करीत जाणें. येथील आज्ञेखेरीज कोठीलही मामल्याची घालमेल अथवा लहान मोठे कामाची फेरबदली अगर वरात एकरूप न करणें. पेशजीपासून कागदपत्र पुर्ता करणे तो राजश्री बाबाजी अनंत करीत आल्याप्रमाणें करतील. तुम्ही त्यांत मन न घालितां आपले ओहद्याचें काम व तेथील कारभार करून होईल वर्तमान ते दर पै लिहित जाणें. रवाना चंद्र १५ रविलावल. मोर्तबसुद.

**पळसी रेकॉर्ड**

No. 684 20-9-1795 A.D.

Tukojeerao to Ramrao Appajee. Kashirao should get exact work done from persons appointed on each post. You must first 'refer matters to us and then do as we may desire. Babajee Anant will transact business as before.

---

**अ. नं. ६८५** **श्री**

ता. २२ सप्टेंबर, इसवी सन १७९५

श्रीमंत तुकोजीराव होळकरांकडून रामराव अप्पाजीस पत्र विशेष. मिस्टर बाईड इंग्रज याचा बंगला महेश्वरीं आहे. त्या बागांतील शाकभाजी वगैरे जिवाजी गिरमाजी धटाई करून नेतो त्याजला इंग्रजाकडील माणसें मना करीत असतां ऐकत नाही, म्हणोन विदित झालें. त्यावरून हें पत्र तुम्हांस लिहिलें असें. तरी इंग्रजाचे बागांतील सरकारी वगैरे जिवाजी गिरमाजी याजला न्यावयाचे प्रयोजन काय? याउपर त्याजला निक्षून ताकीद करणें. इंग्रजाची माणसें बागाचा जाप्ता करतील त्यांजला दिक्कत न पडे, तें करणें. रवाना छ ८ रविलावल मोर्तबसुद.

**पळसीकर रेकार्ड सं. विभूते**

No. 685 22-9-1795 A.D.

Tukojeerao Holkar to Ramrao Appajee : We learn that Jiwajee Girmajee takes away vegetables etc., from the Maheshwar garden of Mr. Boyde. He should be ordered not to do so in future.

---

**अ. नं. ६८६** **श्री**

ता. २ आक्टोबर, इसवी सन १७९५

श्रीमंत तुकोजीराव होळकर यांजकडून रामराव अप्पाजीस पत्र विशेष. श्रीमंतांकडून कैलासवासी तीर्थरुप मातोश्री बाईसाहेबांपाशीं वकिलीचे कामावर राजश्री केसो भिकाजी होते. प्रस्तुत त्यांजकडील राजश्री कचो जनार्दन कारकून आहेत. त्याची वहिवाट चालत आली त्याप्रमाणें पुढें चालली पाहिजे याजकरितां चिरंजीव राजश्री काशीराव यांजला लिहून हे पत्र तुम्हांस सादर केले असे. मातोश्री साहेबांचे क्रमाप्रमाणें चालवून गौर करीत जाणें. हे विनंती मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 686 2-10-1795 A.D.

Tukojeerao to Ramarao Appaji : Kacho Janardan is, at present, working as ambassador of the Poona Court with us. His comforts should be well looked after, as before.

---

**अ. नं. ६८७** **श्री**

ता. १० आक्टोबर, इसवी सन १७९५

रोजकीर्द श्रीमंत सुभा तुकोजीराव होळकर : श्रीमंत पेशवे यांजकडील हुजरे व काशीद नेपाळास श्री शालिग्राम आणावयास पुण्याहून महेश्वरीं आले त्यास इनाम पोषाख वगैरे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 687 10-10-1795 A.D.

Inam and dresses were distributed to the Huzres etc., of the Poona Sarkar who were on their way to Nepal to fetch Shree Shaligram.

---

**अ. नं. ६८८** **श्री**

ता. २० आक्टोबर, इसवी सन १७९५

तुकोजीराव होळकरांकडून रामराव अप्पाजीस पत्र विशेष. तेथें लहान मोठी मंडळी मिळून कारभार बहुतजण करितात. येणेंकरून कोणताही कारभार सोईचा न होतां बोभाट मनस्वी येतात. याजकरितां कोणी एकास कारभारांत न घेता तुम्हांस व रा. बाबाजी अनंत यांस घेऊन कारभार करण्याविसीं चिरंजीव रा. काशीराव यांसी लेखन करून हें पत्र तुम्हांस लिहिलें असे. तरी तुम्ही चिरंजीवास सांगून तेथील मंडळींपैकीं कोणी एकास कारभारांत न घेतां व शागिर्दाचे सांगितल्याचे न ऐकतां तुम्ही व बाबाजी अनंत जो कारभार कर्तव्य तो समजोन घेऊन चिरंजीवास समजाऊन कोणेविशीं शब्द न ये, सरकार नुकसान न होय अशा चालीनें करीत जाणें. नासल्या, बिघडल्याचा जाबसाल तुम्हास पुसावा लागेल. वरकड कित्येक मजकूर चिरंजीवास लेखन केले आहेत त्याअन्वयें वर्तणुकींत आणणें. रवाना चंद्र ६ रविलाखर मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 688 20-10-1795 A.D.

Tukojeerao to Ramrao Appajee : My son Kashirao has been instructed to consult you and Babajee Anant alone in state-matters. Both of you will be held responsible if anything goes wrong.

---

**अ. नं. ६८९** **श्री**

ता. २७ नोव्हेंबर, इसवी सन १७९५

तुकोजीराव होळकरांकडून रामराव अप्पाजीस पत्र विशेष. चि. रा. काशीराव इकडे

यावयाचें करतील. मागें किल्ल्याचा जाबता राखणें यांस माहितगार आणि आळ्याचा माणूस पाहिजे याकरितां हे पत्र लिहिलें असें. तरी चि. भारमल होळकर यांचा तेथील हशमी वगैरे माणसांस आळा पेशजीपासून आहे. याजकरितां त्यास हाताखालीं ठेऊन किल्ल्याचे चौकी पाहऱ्याचा बंदोबस्त त्यांजकडे सांगून तुम्हीही देखरेख करीत जाणें. रवाना. चंद्र १४ जमादिलावल मोर्तबसुद.

**रेकॉर्ड दिवाण पळसीकर**

No. 689 27-11-1795 A.D.

Tukojeerao to Ramrao Appajee : Kashirao may be thinking of coming here. You should take Bharmal Holkar under you who is well trained up in matters of good order and management.

---

**अ. नं. ६९०** **श्री**

ता. १६ फेब्रुवारी, इसवी सन १७९६

बालाजी रावजी याचे रामपुरियाहून श्रीमंत काशीराव होळकरांस पत्र विशेष : भवानीसिंग चंद्रावत याजला कैलासवासी मातोश्री बाईसाहेब यांनीं खातरजमा करवून प्रगणे मजकुरीं आणविला व पठारावर मौजे पगारा येथें पागा रहावयास दिली. तेथील पाणी लागतें. बहुत श्रमांत आहे व पांच गांव त्याचे जहागिरीपैकीं दुर्जनसिंग चंद्रावत यांजकडे आहेत ते माझे मजकडे देवावे. एक वर्ष झाले. आता दम निघत नाही. हर कोठें कालहरण करीन म्हणतो. उठून गेल्यास सध्या महालांत फंद उभा राहतो. त्यास पांच ५ गांव परभारें दुर्जनसिंगांकडे आहेत ते त्यांजकडे चालते व्हावे. हें न जाल्यास जातो आहे. आज्ञा येईल त्याप्रमाणें करूं.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 690 16-2-1796 A.D.

Balajee Raojee from Rampura to Kashirao Holkar : Bhawanising Chandrawat demands that 5 of his villages given over to Durjansing should be returned back to him; otherwise he proposes to leave the territory: this plan would produce unrest. We solicit your orders.

---

**अ. नं. ६९१** **श्री**

ता. २३ एप्रिल, इसवी सन १७९६

नारो सिद्धेश्वराकडून होळकर दरबारांत पत्र विशेष. शुद्ध पोर्णिमा (चैत्र) ते दिवशीं दोन प्रहर दिवसास दादा गजरे यांचे येथें मूर्तिस्थापना होत असतां वाड्याबाहेर गारद शिबंदी व तोफा उत्साहास उभे असतां मिस्टर बाईड यांजकडील फिरंगी १० दहा असामी तमाशा पाहावयास वाड्यांत चालले. मना करितांना बळेंच रेटारेटी करतां कटकट जाहली. शंभर माणूस ठार व शेसवासे जखमी. गांवचे तमाशबीनपैकीं एक बायको व दोघे ब्राह्मण मारले गेले. अडचा प्रहर नंतर निवळ जाले. आज शिंद्याकडील कटकट दिसतें. मोगलांचा कूच होऊन कवडीच्या मुक्कामीं गेले असे लौकिकांत दिसतें. परंतु आतून बेत काय आहे याचा अंत लागत नाहीं. निदर्शनास येईल तें खरे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 691 23-4-1796 A.D.

Naro Siddheshwar to the Holkar Durbar : Ten Firangees in service of Mr. Boyde forced their way into the hall of Mr. Dada Gajre when the ceremony of an idol-installation was to take place. This resulted in casualties.

It is reported that the Mogul army went to Kawadi in camp.

---

**अ. नं. ६९२** **श्री**

ता. ७ जून, इसवी सन १७९६

श्रीमंत काशीराव होळकरांकडून रामराव अप्पाजींस पत्र विशेष. राजश्री मेहता छबीलराम जयपुरचे संस्थानीं सरकारांतून वकिलीचे कामावर आहेत. त्यास त्याजला खर्चाकरितां महेश्वर ऐवजी राजश्री येसाजी खंडेराव यांजवर दोनशें रुपयांची वरात दिली आहे, तर वरातीप्रमाणें ऐवज मशारनिल्हेस जरूर पावता करणें. रवाना चंद्र १ जिल्हेज बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 692 7-6-1796 A.D.

Kashirao Holkar to Ramrao Appajee : Mehta Chhabilram is appointed ambassador at Jeypore. Yesajee Khanderao is asked to pay him Rs. 200/- Please see that this is done.

---

**अ. नं. ६९३** **श्री**

मु. हैद्राबाद ता. ८ सप्टेंबर, इसवी सन १७९६

नागोराव लक्ष्मण यांचे श्रीमंत काशीराव होळकरांस पत्र विशेष. सवाई बाजीरावांची कीं, प्राणत्याग होईल उत्तम. परंतु कारागृहीं कोठवर असावे?

१ नबाबसाहेब विचारतात सुभेदार बौद्धावतार धरून आहेत याचे कारण कोणते? मी जबाब दिला ''साम्यतेस सलाह मसलतीस कोणता पुरुष आहे कीं, त्यासी भाषणें करावी? एक नाना व हरीपंत त्यांची ते दशा. यास्तव समय पाहून आहेत.''

**सरकारी रेकॉर्ड**

No. 693 8-9-1796 A.D.

The Hyderabad ambassador to Srimant Kashirao Holkar. The Nizam asks the reason of your father's present silence regarding the Peshwaship.

---

**अ. नं. ६९४** **श्री**

ता. २३ आक्टोबर, इसवी सन १७९६

श्रीमंत तुकोजीराव यांजकडून रामराव अप्पाजीस पत्र विशेष. राजश्री चिमाजी बुळे यांजकडील प्रगणे चिखलदे व झाबवे, येथील जप्ती करून त्या कामावर सरकारांतून राजश्री बळवंत आबाजी यांजला रवाना केले ते तुम्हापाशीं आले असतां अद्याप पुढें रवाना केलें नाहीं म्हणोन विदित जाले, ऐसियासी. सरकारांतून महालचे जप्तीस कारकून पाठविला त्याचे जाण्यास दिवसगत लागल्यानें बुळे वसूल घेतील हे गोष्ट चांगली नाहीं. याजकरितां हें पत्र लेखन केलें असे. तरी या उपरि पत्र पावतांच मशारनिल्हेची रवानगी करून महालीं ठाणें बसवून देणें. रवाना चंद्र २१ रविलाखर मोर्तबसुद.

**संस्थान पळसीकर रेकॉर्ड**

No. 694 23-10-1796 A.D.

Srimant Tukojeerao to Ramrao Appajee : We sent Balwant Abajee to cofiscate Bule's Parganas. You have not sent him on the spot yet. Send him with proper military without delay.

---

**अ. नं. ६९५** **श्री**

ता. २६ आक्टोबर, इसवी सन १७९६
छ. २४ रविलाखर सु।। सबातिसेनमयावअलफ

श्रीमंत काशीराव होळकर यांजकडून पदमसी राजसी सावकारास पत्र विशेष. श्री क्षेत्र द्वारकानाथजी, श्री रणसोडरायजीस तुळसीपत्र अर्पण करावयास दर रोज.

७२ खरीदी तुळसी सुमारे १४४००००

२८ तुळसी वाहणारा असामी येक यास.

.......

१००

शंभर रुपये येकसाला इस्तकबील सनअर्बा तिसैन शके १७१५ तागाइतसन सबा-तिसेन आखेर साल शके १७१८ एकूण सालें चार ४ दर साल रुपये १०० प्रमाणें रु. ४०० चारशे सदरहू चारशें रु देविले आसते. तरी हरीराम नरसिंगदास व मनसाराम यांस देऊन पावलियाचा कबज घेणें. जाणिजे छ.२४ र. खर. बहुत काय लिहिणें मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 695 26-10-1796 A.D.

Kashirao Holkar to Padamsey Rajsey : Please pay Rs. 400/-to Narsingdass and Mansaram for 4 years service of worshipping Shree Krishna of Dwarka with Tulsee-leaves.

---

**अ. नं. ६९६** **श्री**

ता. ४ नोव्हेंबर, इसवी सन १७९६

श्रीमंत तुकोजीराव होळकर यांजकडून रामराव अप्पाजीस पत्र विशेष. सांप्रत येथें निक-डीचा प्रसंग यासमयीं फौजेचा जमाव हुजूर असला पाहिजे, याजकरितां हे पत्र लेखन केलें असे. तरी तुम्ही तेथील बंदोबस्तास कार्याकारण पागा लागतील तितक्याच ठेऊन वरकड चि. भारमल होळकर व रामसिंग वगैरे यांच्या पागा मोठ्या आहेत त्या इकडेस रवाना करणें. प्रसंग नाजूक आहे. यास्तव चिं. रा. काशीराव याजबराबर पागा येतील असे मनांत न आणितां पत्र पावतांच कूच करून मोठाल्या मजलीनें सत्वर येऊन पोहचें असें करणें. रवाना छ. ३ जमादिलावल सबातिसेनमयावअलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**दिवाण पळसीकर रेकॉर्ड**

No. 696 4-11-1796 A.D.

Shrimant Tukojeerao to Ramrao Appajee : Urgency demands a great military force here. Bharmal and Ramasing have, at their command, a great number. Please send them immediately.

---

अ. नं. ६९७ **श्री**

ता. ३० जानेवारी, इसवी सन १७९७

यादी श्रीमंतांनी वस्त्रें व बहुमान दिला. सुरू सन सबातिसनमयावआलफ सन १२०६ माहे साबान ऊर्फ माघमास छ.१ शुद्ध २ रोज रविवार मुक्काम पुणें :

१२ श्रीमंत बाळासाहेब (काशीराव,)

५ वस्त्रें पांच. १ तिवट हैदर पैठणी, १ शेला हिरवा पैठणी, किनखाप १, महद्याजोडी २, एकूण पांच :

३ भूषणें. १ शिरपेंच, १ मोत्याची कंठी, १ जीगा, एकूण ३

४ आयुधें. २ ढाल, तलवार १, हत्ती नग १, घोडा १, एकूण ४

.....

१२

. ७ रा. बापूसाहेब होळकर ( तुकोजीरावांचे पुतणे )

५ वस्त्रें. पैठणी १, तांबडा शेला १, तिवट १, किमखाप १, महसुदी १

२ भूषणे. कंठी मोत्याची १, १ शिरपेंच

....

७

....

१९

येणेंप्रमाणें वस्त्रें व आलंकार भूषणें आली असत.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 697 30-1-1797 A.D.

List of ornaments and arms granted to Kashirao and Bapurao Holkar at the time of the grant of Subhedarship to the former.

---

अ. नं. ६९८ **श्री**

ता. ५ फेब्रुवारी, इसवी सन १७९७

आबाजी खंडेराव यांजकडून आबाजीचे नावें कीं विशेष : अलीकडे मासपक्षांत सेवकाचा परामर्ष होत नाही. त्यास असें न करितां निरंतर पत्र पाठवून सांभाळ करावा. यानंतर येथील वर्तमान श्रीमंत राजश्री बाळासाहेब श्रीमंत राजश्री सुभेदारांची शरीरप्रकृती क्षीण वार्धक्यदशा दौलतीसंबंधीं एखादा बंदोबस्त श्रीमंतांचें हातून त्यांचे देखत घडावा येविषयीं सर्वांचें मानस आणि जपणें म्हणोन, तेथून निघून दरमजल गंगातीरपावेतों येऊन

तेथें सुभेदारांचें शरीर बहुत काहिली, हें वर्तमान ऐकिल्यावरून सडे होऊन येथें आलें. तेच दिवशीं लहानमोठी मंडळी आपली एकत्र करून सुभेदारसाहेबांनीं आपला मनोदय पूर्ण केला. पुढें श्रीमंतांचे हातून एखादी गोष्ट घडावी हा बेत होताच. त्यागोष्टीस सोबत्याचीही बालंबाल अंतःकर्णपूर्वक. दरम्यान श्रीमंतांचे कुटुंब निवर्तल्यामुळें व दिनशुद्धीचे घालमेलीमुळें दोन दिवस आधिक सांगून माघ शुद्ध २ रविवारीं सायंकाळीं (ता.२९-१-१७९७) दौलतीविषयीं श्रीमंतांचीं वस्त्रें जालीं. येणेंकरून श्रीमंत सुभेदार साहेबांचे पूर्ण होऊन प्रकृतीसही अंमळसे सावकाश वाटूं लागले. आपले साऱ्याचें जपणे इतके दिवस होते, त्याचेही सार्थक श्री मार्तंडानें केलें. वस्त्रें बहुमान आला त्याची आलाहिदा आहे, त्यावरून कळेल. श्रीमंत सौभाग्यवती आनंदीबाई एक-दो दिवसांनीं श्री जेजुरीचे यात्रेस जाऊन देवदर्शन घेऊन आले म्हणजे सौभाग्यवती भागाबाईसुद्धां त्यांची रवानगी तेथें करावी ऐसा बेत आहे. एकादो रोजांत रवानगी होईल. शुशू (गोविंदराव गायकवाड) गेलेत. त्यांचा समेट अद्याप होत नाही. खायाखर्चाचा ताण व लोक राजकारणें करतात येथें यांतच निशिष्ट. दौलत मोठी, धनी कारभारी काळजी करितात. आळा मिळून पैसा तो दिसेना. सांप्रत जेजूरकराचे पुत्रांनीं सोबत्याकडे जाण्यायेण्यांत देवजीकडील लक्ष सोडविलें हें प्रशस्त नाहीं. शेवट कोणते थरास जाईल तो जावो. राजकारणें नित्य नवी तेव्हा लिहावें काय. निदर्शनास येते तितकें मात्र लिहिणेंत येतें. आपली तेथील अडचण येविषयीं यावतशक्य यजमानासीं बोलणें तें बोलतों. तेही काळजी करितात परन्तु कोठें जागा नाही. बंदोबस्त महालाचा ऐवज खाऊन चुकले. येथील पागा हुजरात पलटणी हाका मारतात. धरण्याची गांठ, चंदी नाही. नागे होतात, हे लिहिण्यानें आपली हिंमत राहणार नाही, परन्तु करावें काय? आहे तसें लिहिणें प्राप्त. याउपर लौकरच येऊन पोहचतील. धनी आलियावर काळजी त्यांची त्यास अथवा ते लिहूं लागल्यावर येथून करणार करतील. जालें वृत्त ते नारोबातात्या व बाबाजी लिहितच आहेत. नवलविशेष घडेल तसें लिहून पाठवीन. श्रीमंतांकडील सरंजाम पट्टीचा, घोडे अवघ्यास आहेत, आज उद्याचे म्हणतात पुढें कोणी होत नाही. या आपले मंडळीची भीड दरबारांत पडावी असे नाही. तत्रापि आपले घरचा घोळ यामुळे देतो घेतो अशी अवघ्यांचीं बोलणीं आहेत, या उपर येविषयींचा विचार कसा हेंही पाहावें. अधिक मास आला आहे. ईश्वर इच्छा. दौलतीत आपण. तेव्हां येवढें कार्य योजण्याचें आहे, सार्वकाल पत्रीं सनाथ सेवकास करावें याची आज्ञा जाली पाहिजे. श्रुत होय हे विज्ञप्ती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 698 5-2-1797 A.D.

Abaji Khanderao to Abajee : Tukojeerao's health is declining. Dress of Subhedarship is granted to Kashirao on 29-1-1797. The general condition of affairs is going from bad to worse. Disaffection prevails in the army on account of non-payment.

**अ. नं. ६९९** **श्री**

ता. २२ मार्च, इसवी सन १७९७

श्रीमंत काशीराव होळकर यांजकडून रामराव अप्पाजींस पत्र विशेष. तीर्थस्वरूप मातोश्री मावशीबाई इकडे आल्यामुळें कसबे इंदूर व महेश्वर येथील शेट सावकार व वाणी उदमी उदासीन जाहले. तशांत जागा भिलाभामराचा उपसर्ग लागतो या दहशतीमुळें किती एक प्रकारचे अंदेशे करितात म्हणोन हुजूर समजलें. त्यावरून रयतीस खातरजमेची अलाहिदा पत्रें सादर करून हे पत्र तुम्हांस लेखन केलें आहे, तर तुम्ही इंदूर, महेश्वर येथील शेट सावकार वगैरे रयतेची दिलभरी खातरदास्त करून त्यांचे मनांत कोणतेही विषयी संदेह उत्पन्न होऊं न देतां शहरचे जाप्ते यथास्थित ठेऊन उदीम व्यवसाय पहिल्यापासोन करीत आले त्याप्रमाणें करावयास सांगणें. जागजागीं नाक्यांनीं घाटबंदी करून भीलभामराचे पारिपत्य एकवेळ निक्षून करणें. म्हणजे पुन्हा उपद्रव होऊं पावणार नाही. रयतेचे बोभाटाच्या आवाया इकडे बहुत येतात. याजकरितां मासपक्ष याच्या प्रयत्नांत लागोन जेथें हरामखोर आढळोन येतील त्यांचे पारिपत्य निक्षून करून शहरांतील वगैरे रयत आबाद राहे असें करणें. छ. २२ रमजान सु. सन सवातिसेनमयावआलफ. कळावें हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 699 22-3-1797 A.D.

Kashirao Holkar to Ramrao Appajee : We learn that traders and merchants there are filled with anxiety regardig safety of life and property.

Please be on diligent search, and punish the offending Bhills etc.

---

**अ. नं. ७००** **श्री**

ता. ३ मे, इसवी सन १७९७

विनायक बाजी यांचे आबाजी व बाबाजीस पत्र विशेष. मुक्काम पुणें. आपले पत्र चैत्र शुद्ध ४ आले. त्याचे उत्तर पूर्वीच पाठविलें आहे. येथे आल्या दिवसापासोन श्रीमंत राजश्री बाळासाहेबांस महेश्वर संस्थानची खर्चाची आबाळ फार, शीमेवेगळीं व कारभारी यांस बोलत गेलो परंतु मनावर घ्यावें ही गोष्ट मनांत नाही. राजश्री खंडोपंतबाबासीं फार बोलत गेले. होय, बरें, असें बोलतात. तेव्हां दोन चारदां बाळासाहेबांस एकांतीं गाठून बहुत प्रकारें बोललो तेव्हां सोय करावी असें माझे चित्तात परंतु उपाय नाही. तेव्हां सुचविलें मी महेश्वरीच ऐवज देविणें असे बोलून तुम्हांकडील राजश्री नारोपंत यांजकडून सविस्तरें तुम्हांस लेखन करविलें आहे. त्यास आठ रोज जाहले. नारोपंताचें पत्र पावलें असेल.

हिम्मत करून शागीर्दपेशाचा व आबाजीकडील एक रोजमरा देवावा. पुढें पाहतच अहो. साल मजकुर तर प्रथम दिवस आहे. आमची रवानगी लौकर करावी. ऐसी पत्रें बाळासाहेबांस पाठविणें. राजकी वर्तमान फारसी पत्रांत येतच असेल. मदारुल मुलूख येथून पंचवीस कोस पावेतों गेला आहे. परस्परें कोठें शुद्धता नाहीं. आपले यजमानाचें शरीर अशक्त याजमुळें दौलतीस व स्वरूपास फार कमती. बाबासाहेब वेगळे जाऊन राहिले, त्याजमुळें त्याजकडील उपद्रव सरकारचे परगण्यांस लागतो. त्याला रक्षावयास नाहीं. यजमान म्हणतात व देवजी म्हणतात त्याची एखादी सोय काढावी. बाळासाहेब कारभारी यांस ये गोष्टीची काळजी आहेच. परंतु होईल तेव्हां खरें. कहीचा उपद्रव गंगापार पावेतों गेला. कोकणांत पंचवीस कोसपर्यंत कही गेली. फौजा पुण्यांतच चातुर्मास राहिल्या तर लावणी होणें कठीण. पलटणचे लोक ब्राह्मण बायकांस उपद्रव देतात. सारांश, बाळाजी नाना पेशवे यांचे राज्य झाल्यापासून रयतेनें असे दुःख दक्षिणेंत पाहिलें नाहीं. पुढें काय होणार हे कळत नाही. चिरंजीव राजश्री बाबाचा परामर्श सर्वदा करीत जावा. बहुत काय लिहिणें लोभाची वृद्धी करावी हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 700 — 3-5-1797 A.D.

Vinayak Bajee to Abajee and Babajee : Since my arrival I have been talking and talking to persons concerned about the state-affairs; but none seems to take the matter seriously. Money is already overdrawn, and we are respected nowhere. God alone knows what is in store.

---

**अ. नं. ७०१** — **श्री म्हाळसाकांत प्रसन्न**

छ. ४ मोहरम, ता. २९ जून, इ. स. १७९७

राजश्री बाळाजी यादव व कल्याण मेहता कमाविसदार परगणे झाबवे निसबत बुळे गोसावी यांसी स्नेहांकित काशीराव होळकर. राजश्री पदमसी राजसी सावकार याचे रदकर्जी स्वारीतून खासगीकडील शेरी नजराण्याऐवजी तुमचे नांवें वरात जाहली, तो ऐवज हा कालवर पावला नाहीं, म्हणोन मशारनिल्हेकडून हुजूर विदीत झालें. त्यावरून वसुलास खासदरबार असामी २ दोन पाठवून हें पत्र सादर केलें असे. तरी सावकार मजकुर याचे वरातीस इतःपर दिवसगत न लावितां जलद फडशा करणें. येविशीं पुन्हः बोभाट येऊं न देणें. जाणिजे छ. ४ मोहरम. बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 701 — 29-6-1797 A.D.

The Kamavisdars of Zabuwa (on behalf of Buley) are ordered to pay

the amount of bill made in the name of Padamsey Rajsey, from the revenue of the Pargana. No delay will be tolerated.

---

अ. नं. ७०२ **श्री**

ता. २ जुलाई, इसवी सन १७९७

सखाराम राजाराम यांजकडून श्रीमंत काशीराव होळकरांस पत्र विशेष. सांप्रत कालीं सोबती कारभार राज्याचा करतात. नकार नामक (नाना फडणीस) महाडास आहेत. त्यांचे सूत्र सर्व सरदारांकडे आहे. पुढें काय होईल न कळे. राजश्री परशरामभाऊ मुख्य स्थानीं कारभारी. परंतु पेशजीचे कारभाराप्रमाणें कांहीं दाब नाही.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 702 2-7-1797 A.D.

Sakharam Rajaram to Kashirao Holkar : Scindia is all in all now in the central administration. Nana Fadnis is in correspondence with all the Sardars etc.

---

अ. नं. ७०३ **श्री**

ता. १९ जुलाई, इसवी सन १७९७

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसी. सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित काशीराव होळकर दंडवत विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावें विशेष. आमचे तीर्थरूपाचा वृद्धापकाळ, शरीर बहुत क्षीण जाले. याजमुळें दौलतीत बैदेबखेडे होऊन खराबींत बहुत आली. कोणे प्रकारें बंदोबस्त होय, त्यास वडिलांचे ठिकाणीं आपण आहांत. आमचे सरदारीतील बईदा मोडून दौलतीचा बंदोबस्त यथास्थित होऊन सरकार चाकरी घडेल, अशी व्यवस्था आपण करून देऊन दौलत नांदवावी. आपण ज्याप्रमाणें व्यवस्था करून देतील त्याअन्वयें वर्तणूक करूं. आज्ञेंत अंतर करूं तरी आम्हांस श्री कुलस्वामीची, वडिलांचे पायांची शपथ असे. छ. २४ मोहरम समानतिसेनमयावआलफ. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे ही विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 703 19-7-1797 A.D.

Kashirao Holkar to Nana Fndnis : Age and infirmity of my father have given rise to many a disrupture in our State. We look up to you for

guidance and pledge word that your directions will be honoured.

---

**अ. नं. ७०४** **श्री**

ता. २० जुलाई, इसवी सन १७९७

श्रीमंत काशीराव होळकरांकडून रामराव अप्पाजींस पत्र विशेष. चिरंजीवाकडील प्रसर चहूंकडे जाहला. जातीनेही नेमाड व माळवे प्रांतीं जावें असा इरादा आहे म्हणोन ऐकण्यांत आलें. त्यास येविषयींची बातमी बारकाईनें घेऊन त्याचा पाय तिकडे न शिरे याचा बंदोबस्त पक्केपणीं ठेऊन सावधानींत कोठेंही व्यंग पडूं न देतां वरचेवर पत्र पाठवून वर्तमान लिहित जाणें म्हणोन.

**सरकारी रेकॉर्ड.**

No. 704 20-7-1797 A.D.

Kashirao Holkar to Ramrao Appajee : The revolt of my brother is daily gaining in strength. I learn that he wants personally to go to Malwa and Nimar. Be on your guard, and see that he gets no entrance there.

---

**अ. नं. ७०५** **श्री**

ता. १७ आगस्ट, इसवी सन १७९७

श्रीमंत काशीराव होळकर यांजकडून रामराव अप्पाजींस विशेष. तीर्थरूप बाबासाहेब यांचे शरीरीं स्वास्थ्य नव्हतें, शरीर रोगग्रस्त होऊन क्षीण जाहलेंच होतें. दैवी मानवी यत्न करावयाचे ते केले. परंतु कांहीं एक गुणास न येतां श्रावण वद्य ८ अष्टमी मंगळवारीं दीड प्रहर दिवस चढतां देहावसान झालें. (ता.१५-८-१७९७) ईश्वरें मोठा अनर्थ केला. सर्वांचे छत्र जाऊन दुःखाचे पर्वत जाले. भगवत् सत्ता प्रमाण. जालें वर्तमान तिकडे कळल्यावर भील भूमे वगैरे यांच्या नजरा ठिकाणी राहणार नाहींत. येविषयींचा बंदोबस्त जाला पाहिजे. याजकरितां हे पत्र लेखन केलें असे. तरी तुम्ही धैर्य करून तिकडील बंदोबस्तांत कोणेविषयीं कमती पडू न देतां महालानिहायचे मामलेदार व किल्लेदार वगैरे यांजला दिलजमियतीचे पत्रें लिहून हुषारीनें राहून वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. रवाना छ. २३ सफर समानतिसेनमयावअलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकार्ड**

१ ह्याच तारीख मितीचें एक पत्र याच मजकुराचें भारमल होळकराचे नांवें जारी झालें आहे.

No. 705 17-8-1797 A.D.

Kashirao Holkar to Ramrao Appajee : Expresses his regret at the death of his father which took place at Poona on the 15th of August 1797; Asks Ramrao to keep good watch all round.

A similar letter was addressed to Bharmal Holkar.

---

**अ. नं. ७०६** **श्री**

ता. १० सप्टेंबर, इसवी सन १७९७

श्रीमंत काशीराव होळकर यांजकडून येसाजी खंडेरावास पत्र विशेष. चिरंजीव राजश्री मल्हारराव होळकर यांजकडील जमियत खानदेश प्रांतीं आहेच, माळव्यांतही शामराव महाडिक यांनीं जमियत गोळा केली म्हणोन ऐकण्यांत आलें. त्यास त्याचे पारिपत्याविषयीं रा. रामराव अप्पाजीस पेशजी लिहिण्यांत आलें आहे. ते सरंजामासह गाठ पाडून पारिपत्य करतील. किल्ले कुशलगड येथील जाप्ता यथास्थित जाहला पाहिजे याजकरितां हे पत्र तुम्हांस लेखन केलें असे. तरी तुम्ही तेथील सावधानीविषयीं कोणाचे भरवंशावर न राहतां फंदफितूरी असल्यास कैद करून ठेऊन ज्याचे लक्ष तुमचेपाशीं असेल त्यास पोटाशीं लावून हरएकविषयीं सरकारनक्ष कायम राहे ते करणें. रवाना चंद्र १८ रविलावल सुरुसन समानतिसेनमयावआलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**पळसीकर रेकार्ड**

No. 706 10-9-1797 A.D.

Srimant Kashirao Holkar to Yesajee Khanderao : My brother Malharrao and Shamrao Mahadik both are up in arms, each in his own way. Ramrao Appajee is addressed in the matter. You will also be on your guard regarding Kushalgad side affairs.

---

**अ. नं. ७०७** **श्री**

ता. १३ सप्टेंबर, इसवी सन १७९७

सौभाग्यवती आनंदीबाई होळकर यांजकडून मल्हारराव यांस पुणियास पत्र विशेष.

तुम्ही कोणे गोष्टीचा वसवसा न धरितां यजमान साहेबांनी पत्रें लिहिली आहेत ते मनन करून त्या अन्वयें बंदोबस्त राखावा. अनमान करूं नये. हा दिवस मागेंपुढें यावयाचा नाहीं. तुम्ही पहिल्यापासून याच दौलतीचे विभागी आहांत. विस्तारेंकरून ल्याहावेसें नाहीं. सर्व सूज्ञ आहांत त्याअर्थी सूचनार्थ लिहिलें आहे.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 707 13-9-1797 A.D.

Saubhagyawati Anandibai Holkar to Malharrao at Poona. Please arrange your affairs as directed by my lord. You are a partner of this state sovereignty.

---

**अ. नं. ७०८** **श्री**

ता. २१ सप्टेंबर, इसवी सन १७९७

संताजी होळकर यांजकडून रामराव अप्पाजी व बाबाजी अनंत यांस पत्र विशेष. येथील वर्तमान आजमितीस पुण्याहून पत्र आलें त्यातील भावार्थ राजश्री दौलतराव शिंदे सैन्य तैयार करून वद्य ६ षष्ठीस चिरंजीव मल्हारराव होळकर यांचे पारिपत्यास सादर जाहले त्यादिवशीं राजश्री नानांनीं मना करून पाठविले. नंतर वद्य ८ अष्टमीस मागील प्रहर रात्र राहतां मागती शिंदे तैयार होऊन चिरंजीवाभोवतां वेढा घालून चिरंजीव गाफल असता घात केला. (ता. १४ सप्टेंबर गुरुवार इसवी सन १७९७) ईश्वरें मोठा अनर्थ केला तो पत्रीं लिहितां पुरवत नाही. श्री सत्ता प्रमाण. पुढें संस्थानाचा वगैरे बंदोबस्त झाला पाहिजे याजकरितां हे पत्र तुम्हांस लेखन केले असे. तर पत्रदर्शनीं संस्थान आदिकरून घाटनाक्याचा बंदोबस्त यथास्थित करून पै दर पै लिहीत जाणें. छ. २० रविलावल.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 708 21-9-1797 A.D.

Santajee Holkar to Ramrao Appajee and Babaji Anant : Expresses his great regret at the way in which Malharrao met his death in Poona, at the hands of Scindia.

---

**अ. नं. ७०९** **श्री**

ता. २९ सप्टेंबर, इसवी सन १७९७

श्रीमंत काशीराव होळकरांचे रामराव अप्पाजींस पत्र विशेष. मल्हारी होळकर वगैरे यांचे बखेड्याचा व तेथील खर्चाचा मजकुर लिहिला तो साकल्य कळला. ऐसीयास चिरंजीवाचा प्रकार असा झाल्यामुळें त्यांजकडील जमियत जागजागा होती, ते ज्यास जिकडे वाट फुटली तिकडे निघून गेली. त्यांचा बंदोबस्त करण्याविशीं ति. संताजी बाबा व राजश्री चिमाजी बुळे यांजला पत्रें लिहिली आहेत. तुम्हीही शामराव महाडिक वगैरे फितुरी आढळतील त्यांचा बंदोबस्त करणें. तुमचे खर्चाची बेगमी करून पाठविली जाईल. छ. ८ रविलाखर. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 709 29-9-1797 A.D.

Srimant Kashirao Holkar to Ramrao Appajee : The death of Malharrao has scattered his army. You please see that Mahadik is properly punished for his revolt.

---

**अ. नं. ७१०** **श्री**

ता. ५ आक्टोबर, इसवी सन १७९७

श्रीमंत काशीराव होळकर यांजकडून रामराव अप्पाजींस पत्र विशेष. चिरंजीव मल्हारराव होळकर यांचे झाले वर्तमान तेथें समजून तुम्ही पत्र लिहिलें ते पावून लेखनार्थ अवगत जाहला. ज्याकाळीं जे घडावयाचें ते घडतें. पुढील पैरवीस जपावयाचें ते प्रसंगानुरुप घडतच आहे. होईल तसें तुम्हास लिहिलें जाईल. रवाना छ १४ रविलाखर बहुत काय लिहिणें. मोर्तबसुद.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 710 5-10-1797 A.D.

Srimant Kashirao Holkar to Ramrao Appajee : Your letter regarding Malharrao's death to hand. Destiny cannot be helped. Be careful for the future.

---

**अ. नं. ७११** **श्री**

ता. २२ आक्टोबर, इसवी सन १७९७

विनायक बाजीराव यांजकडून भीमराव आबाजीचे नांवें पत्र विशेष. येथील वर्तमान दिनचर्येचे तुम्हास, तुम्हाकडील राजश्री नारोपंत हे लिहित असतात त्यावरून कळतच असेल. नवल विशेष आम्ही त्यास सांगत असतों. ते लेखन करितात त्याअर्थी आम्ही लेखन करणें विशेष नाही. सर्व दौलतीचे ओझें श्रीमंत राजश्री बाळासाहेबांवर, ते कायम मिजाजीने एकावर विश्वास ठेवतील तर दौलतीचा बंदोबस्त होईल. हे होणें कठीण याजकरितां दौलत झोकें खाती. मोठे वाईट वाटतें. कैलासवासी थोरले सुभेदार यांनीं व कारभारी यांनीं मोठी संकटें करून दौलत मिळविली. परिणाम कसा होईल याचा विचार पडतो. मनसबियाचे मार्ग झाले तर दौलतीस तेजगी येऊन सर्व बंदोबस्त होईलसें वाटते. चिरंजीव राजश्री बाबाचा परामर्श करितां त्यापेक्षां दिवसें दिवस अधिक करीत जावा. रोजमुरा तेथें होतो. आमचा व पालखीचा रोजमुरा घ्यालच. इकडील वर्तमान थोडें थोडें चिरंजीव राजश्री बाबा सांगेल. बहुत काय लिहिणें हे विनंती.

**सरकारी रेकॉर्ड**

No. 711

22-10-1797 A.D.

Vinayak Bajirao to Bhimrao Abajee : Shreemant Balasaheb (Kashirao) will be well-advised to give his confidence to some one person; but that seems impossible. The State-affairs are drifting from bad to worse.

---

**अ. नं. ७१२** **श्री**

ता. ३१ डिसेंबर, इ. स. १७९७

बाळाजी नारायण व नारो खंडेरावकडून बाबाजी व बाळाजीस पत्र. विशेष. पौष शुद्ध १३ रविवार. इकडील वर्तमान सोबत्याकडील तगादा बहुत जसा व्हावा तसा झाला. यामुळें रा. दाजीबा गांवांत आज १७ दिवस जाले गेलेत. त्यांनीं श्रीमंत रा. नानांस विनंती करून त्यांजकडून सोबत्यास सांगून तगाद्याचे स्वार काढून प्यादे उठवून नेलेत. पुढें चार दिवस गांवांतच राहून पुर्ता बंदोबस्त करून येतील. वरकड येथील प्रकार दुहीचा कारभार आहे. तें सर्व ध्यानांत आहेच. ताजा कलम. श्रीमंत रा. नानांची स्वारी चार घटका दिवस राहतां सोबत्याकडे गेली. दोनतीन घटका बोलणें झाले नंतर अवसर पाहून सोबत्यांनीं नानांस हस्तगत केलें.

**सरकारी रेकार्ड**

No. 712 31-12-1797 A.D.

Balajee Narayan and Naro Khanderao to Babajee and Balajee : Shinde has put Kashirao into great trouble; the guard round the camp was removed after Nana Fadnis remonstrated.

Nana is also kept under guard by Scindia.

---

# संदर्भग्रंथ सूची


१. होळकरशाहीचा इतिहास, भाग १ व २
संपादक : वा. वा. ठाकूर (इ. स. १९४४/१९४६)

२. होळकर राज्याचे सरकारी रेकॉर्ड

३. हुजूर फडणीशी रेकॉर्ड

४. जहागीर दप्तर

५. दिवाण पळसीकर दप्तर

६. पळसी संस्थानचे दप्तर

७. सरकार बुळे यांचे दप्तर

८. कोटा येथील गुलगुले दप्तर

९. श्रीहरी नरहर जोशी, महेश्वर यांचे दप्तर

१०. व्याससंदीपन दप्तर

११. सरदार खाजगीवाले यांचे दप्तर

१२. चंद्रचूड दप्तर

१३. जेजुरी उपाध्ये यांचे दप्तर

१४. लवाणी रेकॉर्ड

१५. विभूते दरखी अमीन, पेटलावद यांचे दप्तर

१६. पेशवे रेकॉर्ड

१७. पंढरपूर येथील एकनाथ गोविंद उत्पात यांचे दप्तर

१८. वा. वा. खरेकृत ऐतिहासिक लेखसंग्रह

१९. इतिहासाचार्य राजवाडे यांचे ऐतिहासिक ग्रंथ, खंड २, खंड ३, खंड ६

२०. पुणे एलिनेशन रेकॉर्डपैकी सरंजाम, झाडे, राजमंडळ, स्वारीचे हिशोब वगैरे

२१. श्री. अ. ना. भागवत यांनी संशोधन केलेले कागदपत्र

२२. उर्दू-मराठी शब्दकोश - संपादक : श्रीपाद जोशी, प्रा. एन्. एस्. गोरेकर,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ, मुंबई, १९६८

२३. आदर्श मराठी शब्दकोश - डॉ. प्र. न. जोशी
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे, २००७.


•

## परिशिष्ट

# होळकर रियासतीतील विविध पदनामे आणि त्यांची कार्ये

| | | |
|---|---|---|
| **कमाविसदार** | – | शेतसारा वसूल करणारा, कलेक्टर |
| **कासीद (काशीद)** | – | संदेशवाहक, गुप्तहेर |
| **कारकून** | – | लिपिक |
| **कारभारी** | – | कार्यवाह |
| **किल्लेदार** | – | किल्ल्याची देखभाल आणि रक्षण करणारा प्रमुख |
| **खिदमतगार** | – | सेवक |
| **खिजमदगार** | – | सेवक |
| **खासगी** | – | होळकर घराण्यातील स्त्रियांची व्यक्तिगत संपत्ती |
| **खासगीवाले** | – | खासगीचा हिशोब ठेवणारे |
| **गाडदी/गारदी** | – | पहारेकरी, रक्षक |
| **गिराशा** | – | लूटमार करणारा |
| **गुमास्ता** | – | मुनीम |
| **चिटणीस** | – | पत्रव्यवहार करणारा, सचिव |
| **चोपदार** | – | रक्षक |
| **जमीदार** | – | वतनदार |
| **जासूद** | – | पत्रवाहक |
| **जासूस** | – | गुप्तहेर |
| **जहागिरदार** | – | जहागिरीचा मालक |
| **तोफदार** | – | तोफा उडविणारा |
| **दिवाण** | – | मंत्री, मुख्य अधिकारी |
| **नायब** | – | प्रतिनिधी |
| **पागेदार** | – | घोडेस्वारांचा नायक |
| **पागनीस** | – | घोडदळाचा अधिकारी |
| **पातशहा** | – | दिल्लीचा बादशहा |
| **परगणा** | – | तालुका |
| **पेंढारी** | – | लूटमार करणारे हंगामी सैनिक |

| | | |
|---|---|---|
| **फडणीस** | – | दप्तराचा अधिकारी |
| **बारगीर** | – | सामान्य सैनिक |
| **बारदार** | – | बंदुकधारी |
| **बल्लाळ** | – | पराक्रमी |
| **बुणगे** | – | सैन्यातले लढाई न करणारे लोक |
| **भालदार** | – | द्वारपाल |
| **महालनवीस** | – | जिल्हा अधिकारी |
| **मामलेदार/मामलतदार** | – | तहसीलदार, वसुली अधिकारी |
| **मोकाशी** | – | इनामदार, वतनदार. ज्यास गांव व जमीन इनाम वा चाकरीबद्दल दिले अशी व्यक्ती |
| **मंडल** | – | क्षेत्र, विभाग |
| **मंडलेश्वर** | – | क्षेत्राधिकारी, विभाग अधिकारी |
| **महाल** | – | जिल्हा |
| **रिसालेदार** | – | घोडदळ पालक |
| **राऊत** | – | घोडेस्वार |
| **वकील** | – | राजदूत, प्रतिनिधी |
| **शिलेदार** | – | स्वतःचा घोडा असलेला सैनिक |
| **शिबंदी** | – | किल्ला वा शहररक्षक फौज |
| **श्रीमंत** | – | पेशवे (पुणें) |
| **सईस (मोतद्दार)** | – | घोड्याला खरारा आणि त्याची देखभाल करणारा |
| **सरकार** | – | पेशवे |
| **सबनीस** | – | पगार वाटणारा अधिकारी |
| **सुभेदार** | – | प्रांताचा राजा |
| **सावकार** | – | व्याजावर कर्ज देणारा |

(सौजन्य : प्रा. ना. ग. काळे, इंदूर)

•

# शब्दार्थ / टीपा

| पत्र क्र. | पृष्ठ क्र. | शब्दार्थ / टीपा |
|---|---|---|
| ६ | ५ | **इमानकुली** - मनोभावे सेवा |
| ९ | ७ | **मुकासा/मोकासा** - लष्करातील नोकरीची अट घालून त्यासंबंधात दिलेला आगाऊ पगार वा इनाम म्हणून दिलेले गांव किंवा जमीन |
| | | **खलेल** - अडथळा, व्यत्यय, विरोध |
| ११ | ९ | **दामदिरीम** - इथे अर्थ, बाकी<br>*आपला दामदिरीम राहिला नाही.* |
| | | **सायर** - मालावरचा कर, जकात |
| १६ | १२ | **माफिक** - योग्य ते<br>**पोख्ता** - भरीव<br>*त्यात माफिक कबूल करून तूर्त पोख्ता ऐवज जमा करून पाठविणें.* |
| २४ | १७ | **वस्तभाव** - चीजवस्तु, अलंकार<br>*मवाशांनीं तपिया याच्या गांवची वस्तभाव घेतली ती फिरोन देणें.* |
| २५ | ,, | **उजूर न करणें** - उशीर न करणे |
| ४२ | ३१ | **झाडा** - हिशोब चुकता करणे<br>*आजींपावेतों झाडा वसुलाचा केला नाही हे कोण गोष्ट ?* |
| ५० | ३६ | **अवर्जा / (अवारजा)** - जमाखर्चाची वही<br>**बार** - तपासणी<br>*दफतरी अवर्जा आणून बार करावी.* |
| ५५ | ४० | **वाटी** - वाटणी |
| ५७ | ४२ | **इस्तकबील** - सुरुवातीपासून<br>*इस्तकबीलपासून आजपावेतों तुमचा हिशेब, घेतला त्यास हिशेबासंबंधीं तुमचेकडे रुपये निघाले.*<br>**लिगाड** - लचांड, संकट |
| ६० | ४४ | **गई** - हयगय |
| ६४ | ४६ | **मुजाहम** - हरकत, आक्षेप (मूळ अरबी शब्द मुजाहिमत)<br>*हरएक बाबत से मुजाहम न होय.* |
| ६५ | ४७ | **तहरह** - तह, करार<br>*येथील तहरह झालियानंतर उदेपूर प्रांतें जाऊन येतो.* |
| ६८ | ४९ | **मजमु** - वसुलीचे काम |

| पत्र क्र. | पृष्ठ क्र. | शब्दार्थ / टीपा |
|---|---|---|
| ६९ | ५० | **खैरख्याही** - कर्तबगारी, प्रगती, खुशहाली<br>*आपली खैरख्याही सरकारचे दृष्टीस पडेल.* |
| ७२ | ५२ | **ताराज करणें** - नष्ट, पराभूत करणे<br>*चार घटका युद्ध झाले. जाट मोडून ''ताराज'' केले.* |
| १०५ | ७२ | **पायाबा** - नदीचा उतार, नदी ओलांडून पलिकडच्या किनाऱ्यावर जाण्याची जागा |
| १०६ | ७३ | **बमोजीब** - बरहुकूम<br>*रुपये सहाशें करार बमोजीब सरकारांत पावीत जाणें.* |
| १३६ | ९२ | **मुजरत** - खास नेमलेल्या<br>*आमच्या सैन्याच्या मुजरत जोड्या पांच सहा गेल्या.* |
| १३७ | ९३ | **जमाबंदीचा ऐवज** - वसुलीचा ऐवज |
| १४५ | ९७ | **गईगुदर** - दिरंगाई, टंगळमंगळ (मूळ फारसी शब्द गईगुदर) |
| १५९ | १०७ | **दस्तक** - परवाना<br>**हासिल** - कर, जकात<br>*दस्तक असतां हासिल घ्यावया प्रयोजन काय ?* |
| १६५ | ११० | **पैरवी** - व्यवस्था<br>*त्या अन्वयें येथील जाबसाल, पैरवी होईल.* |
| १७१ | ११४ | **सुदामतप्रमाणें** - वहिवाटीप्रमाणे<br>*नजराणा सुदामतप्रमाणें देत जावा.* |
| १९४ | १२८ | **इस्तावा** - वाढता सारा देण्याची पद्धत<br>*प्रगणे शेगांव हा गांव पूर्वीपासून आम्हाकडे इस्ताव्यानें चालत आला.* |
| १९५ | १२९ | **शिबंदी** - हंगामी फौज |
| २१३ | १३९ | **उपसर्ग** - त्रास, उपद्रव |
| २२५ | १४७ | **ऐंदा** - लवकरच, यंदा (याच वर्षी) |
| २२९ | १५० | **पायर** - देखरेख, व्यवस्था<br>*फौज आलियावर पायर उत्तम करून लक्ष राखणें.* |
| २३२ | १५१ | **उस्तवारी** - दुरुस्ती, डागडुजी<br>**मुशाहिरा** - मासिक पगार |
| २४० | १५५ | **मामलत** - अंमल<br>**ब्याहडे** - अंदाजपत्रक<br>*राजश्री त्रिंबक महादेव यांस देण्याबाबत ब्याहडे खर्च मंजूर करणें.*<br>**पायगा** - फौजेच्या संरक्षणासाठी दिलेली जहागीर वा इनाम |
| २४१ | १५६ | **गुजारत** - कायदेशीर मान्यता |

| पत्र क्र. | पृष्ठ क्र. | शब्दार्थ / टीपा |
|---|---|---|
| २४४ | १५८ | **शुक्का** - हुकूम, फर्मान |
| २४५ | १५९ | **मखल्याप्रमाणें** - कराराप्रमाणे, ठरल्याप्रमाणे |
| २४९ | १६२ | **सरबराह** - पूर्तता<br>**क्षेपनिक्षेप** - खात्रीपूर्वक<br>**चांदणीत** - रात्रीच्या वेळी |
| २५० | १६२ | **आंख** - रक्कम, आकडा |
| २७१ | १७७ | **बमोजीब** - बरहुकूम |
| ,, | १७८ | **मजरा** - कमी |
| २७३ | १७९ | **इस्तकबाला** - भविष्यातला (कर)<br>**इस्तक** - पुढील कर भरण्याचे हप्ते<br>**नातवाणी** - गरीबी, चणचण |
| २८१ | १८४ | **महजर** - सनदपत्र, हुकूमनामा (मूळ अरबी शब्द महजर)<br>*कसबे मजकुरचे महजर तीर्थस्वरूप सुभेदार यांचे नांवचे आहेत.* |
| २८२ | १८५ | **मजरा पडणें** - कमी होणे<br>**अजमा** - इथे अर्थ, हिशोबाचे पत्रक |
| ३०५ | १९९ | **सांग** - लोखंडी भाला |
| ३०८ | २०२ | **काशीद (कासीद)** - पत्रे पोचवणारा |
| ३०९ | ,, | **बरकरार** - कायम, स्थिर |
| ३१२ | २०४ | **नालबंदी** - घोडेस्वारांना युद्धाच्या मोहिमेवर पाठवताना किंवा चाकरीवर ठेवताना त्यांच्या पगारातील आगाऊ दिलेली रक्कम |
| ३२१ | २०९ | **नाल, मुख, तंग, तोबरा** - घोड्याची जिन, पट्टा, खोगीर व तोबरा म्हणजे हरभरे, चंदी भरलेली चामड्याची पिशवी आदी वस्तू घेऊन व मोहिमेसाठी तयार असणे. नाल, मुख, तंग तोबरा करून सिद्ध असणे. |
| ३२५ | २११ | **किरसान** - मालक |
| ३३८ | २२० | **उपराळा** - वजन करून हिशोब करणे.<br>*जास्त ऐवजाचा उपराळा होऊन योग्य ते करावे.* |
| ३५८ | २३६ | **फुरोई** - दंडाची रक्कम<br>**फाजिल** - अधिक, वाजवीपेक्षा जास्त<br>*साडेचार पैकी कांहीं फाजिलात ऐवज द्यावा हे त्याच्या रदबदली फार आहे.* |
| ३७१ | २४५ | **दरोबस्त** - संपूर्ण, एकूण एक, तमाम |
| ३९४ | २५८ | **दारमदार** - करारमदार, ठराव (मूळ फारसी शब्द दारमदार) |

| पत्र क्र. | पृष्ठ क्र. | शब्दार्थ / टीपा |
| --- | --- | --- |
| ३९५ | २६० | ***सोदा*** *- बदमाश*<br>*गरोठकडे सोद्यांनीं उपद्रव दिला आहे.* |
| ३९८ | २६२ | **पुस्तपन्हा** - मदत |
| ,, | २६३ | **इतल्ला** - खबर, वार्ता<br>*राजश्री पाटीलबाबांकडे याचा इतल्ला द्यावा.* |
| ४०७ | २६९ | **सरबरा** - व्यवस्था, सरबराई<br>**असुदगी** - शांतता, भरभराट |
| ४१३ | २७३ | **भारबदारी** (भारबबारदारी) - लवाजम्याचा अंमल<br>*कांहीं दिवसांत भारबदारी चालेल.* |
| ४१७ | २७६ | **अडचा** - अडीच |
| ४२९ | २८३ | **तहगीर** - बडतर्फ |
| ४३३ | २८६ | **रवारत खाणें** - धीर खचणे<br>**बदनक्ष** - अप्रतिष्ठा, बेअब्रू (मूळ संस्कृत शब्द बदनक्ष) |
| ४४२ | २९२ | **मिस** - निमित्त<br>**बदमामली** - गैरकृत्य |
| ४४४ | २९३ | **इतलाखी** - स्वतंत्र होणे, मोकळे होणे |
| ४४७ | २९५ | **जामनीचा** - जामीनाचा |
| ४५२ | २९८ | **जुग** - जोडी<br>*दोघांचे जुग फुटलें.* |
| ४९६ | ३२४ | **इरे** - ईर्षा<br>*ज्या गोष्टीची इरे धरली ती गोष्ट शेवटास नेईल असे वाटते.* |
| ५०३ | ३३० | **लिगाड** - संकट<br>**तिजाई** - तिसरा भाग |
| ५०७ | ३३४ | **जघन्य** - जगजाहीर (मूळ संस्कृत शब्द जघन्य) |
| ५१२ | ३३७ | **इतबार** - विश्वास, भरवसा |
| ५१४ | ३३८ | **मुखलीफ** - शत्रू, वैरी (मूळ अरबी शब्द मुखालीफ) |
| ,, | ३३९ | **अजुरदा** - खिन्न, नाराज |
| ५२५ | ३४७ | **बेहबुधी** - सुस्थिती, मजबुती |
| ५३८ | ३५७ | **मुतवजे** - उद्युक्त, तयार |
| ५४४ | ३६१ | **महकूब** - रहित, तहकूब |
| ५४६ | ३६३ | **दोहरा** - दोहा |
| ५७१ | ३८० | **कायल** - जेरबंद<br>*त्याजला चांगले कायल करून आनंदरावाबरोबर इकडे येते करावे.* |

| पत्र क्र. | पृष्ठ क्र. | शब्दार्थ / टीपा |
|---|---|---|
| ५७२ | ३८१ | **खरिता** - फर्मान, खलिता<br>**आलकाव** - सांत्वनपर पत्र<br>**नेक जागीं** - चांगल्या, लोकहितकारी कामासाठी<br>*होळकरांची कमाई ह्या बाईंनी नेक जागीं खर्च करून आपला देह ईश्वरार्पण केला.* |
| ५८७ | ३८९ | **पडतपोशी** - गुप्तता, गुप्ततेचा पडदा |
| ५९३ | ३९३ | **खतखतूत** - इथे अर्थ, फर्मान, हुकूम<br>**नाबूद** - नेस्तनाबूद<br>**जाहीरदारी** - प्रसिद्धी |
| ६०८ | ४०१ | **वाखा होणें** - कॉलऱ्याचा आजार होणे, उलट्या होणे |
| ६२० | ४१० | **मरदुमी** - पराक्रम |
| ६४२ | ४२३ | **तदबीर** - तजवीज |
| ६४७ | ४२९ | **इल्म** - ज्ञान, विद्या (मूळ अरबी/फारसी शब्द इल्म)<br>*शिपाईगिरीचे इल्म सर्व सांगून कांहीं उपयोग न जाहला.* |
| ६४९ | ४३० | **वाकीफगारी** - माहितगारी, जाणतेपणा |
| ६५० | ४३१ | **कुकावेशी** - चुकीचा विचार, कुविचार<br>*कुकावेशी आम्ही जाणत नाही.* |
| ६५२ | ४३३ | **उरूबरू** - समक्ष, रूबरू |
| ६७१ | ४४५ | **पैरवी** - व्यवस्था<br>*बंदोबस्ताची पैरवी कोणत्या अन्वयें करावी?*<br>**गळाठा** - घालमेल, गोंधळ |
| ६७२ | ४४६ | **आबताब** - प्रतिष्ठा<br>*दौलतीचा आबताब राहून गाडे चालते.* |
| ६७५ | ४४९ | **लिखतंग** - लेखपत्र, कागदपत्र |
| ६७८ | ४५२ | **थोब** - दबाव (मूळ शब्द थोप)<br>*बंदोबस्त केल्याने त्यांची थोब राहून महालाच्या आबादीत अंतर न पडता सरकारचाही अर्थ घडतो.* |
| ६९९ | ४६५ | **खातरदास्त** - इथे अर्थ, खातरजमा, खात्री<br>**जाप्ते** - पहारे |
| ७०३ | ४६७ | **बईदा** - बंडाळी, गोंधळ (मूळ शब्द बैदा) |
| ७०४ | ४६८ | **व्यंग** - कमतरता, त्रुटी |
| ७०६ | ४६९ | **जाप्ता** - बंदोबस्त |

●

# सूची

(टीप : सूचीतील अनुक्रमांक पत्रांचे आहेत.)

## अ

अनंतभट देवळालीकर : ६६४

अप्पाजी जाखदेव : ४२५

अमृतराव डफाळ (जत संस्थान) : ४३०

अर्जुनसिंगजी देव (संस्थान चरखारी) : ४३९

अली बहादुर : ४८०, ६३४, ६३७

अहिल्याबाई होळकर : १, २९, ७६, १९१, १९७, २०५, २०६, २०७, २०८, २०९, २१०, २११, २१२, २१४, २१५, २१६, २१७, २१८, २१९, २२०, २२१, २२२, २२३, २२४, २२५, २२६, २२७, २२८, २२९, २३४, २३५, २३६, २४०, २४२, २४९, २५०, २६२, २६५, २६८, २६९, २७६, २७८, २७९, २८०, २८२, २८४, २८५, २८६, २८८, २८९, २९०, २९३, २९४, २९५, २९६, २९७, २९८, ३०१, ३०२, ३०३, ३०४, ३०५, ३०६, ३०७, ३०९, ३१०, ३१३, ३१५, ३१६, ३२०, ३२१, ३२४, ३२५, ३२६, ३२७, ३२८, ३२९, ३३१, ३३२, ३३३, ३३४, ३३५, ३३८, ३३९, ३४२, ३४३, ३४९, ३५०, ३५१, ३५२, ३५३, ३५५, ३५६, ३५८, ३५९, ३६०, ३६४, ३६७, ३७०, ३७१, ३७२, ३७३, ३७४, ३७५, ३७६, ३७७, ३७८, ३८१, ३८३, ३८४, ३८५, ३८६, ३८८, ३९२, ३९३, ३९४, ३९५, ३९६, ३९७, ३९८, ३९९, ४००, ४०१, ४०२, ४०३, ४०४, ४०५, ४०६, ४०८, ४०९, ४१०, ४११, ४१२, ४१३, ४१४, ४१५, ४१६, ४१९, ४२०, ४२१, ४२३, ४२४, ४२५, ४२६, ४२८, ४२९, ४३०, ४३१, ४३२, ४३३, ४३४, ४३५, ४३६, ४३७, ४३८, ४३९, ४४०, ४४१, ४४२, ४४३, ४४४, ४४५, ४४६, ४४७, ४४८, ४५२, ४५३, ४५४, ४५७, ४५८, ४५९, ४६०, ४६१, ४६२, ४६३, ४६४, ४६६, ४६७, ४६८, ४६९, ४७०, ४७१, ४७२, ४७३, ४७४, ४७५, ४७६, ४७७, ४७८, ४७९, ४८०, ४८१, ४८२, ४८३, ४८४, ४८५, ४८६, ४८७, ४८८, ४८९, ४९०, ४९१, ४९२, ४९३, ४९४, ४९५, ४९६, ४९७, ४९८, ५००, ५०१, ५०२, ५०३, ५०४, ५०५, ५०६, ५०७, ५०८, ५०९, ५१०, ५११, ५१२, ५१३, ५१४, ५१५, ५१७, ५१८, ५१९, ५२०, ५२१, ५२२, ५२३, ५२४, ५२५, ५२६, ५२७, ५२८, ५२९, ५३०, ५३१, ५३२, ५३३, ५३४, ५३५, ५३६, ५३७, ५३८, ५३९, ५४०, ५४१, ५४२, ५४३, ५४४, ५४५, ५४६, ५४७, ५४८, ५४९, ५५०, ५५१, ५५२, ५५३, ५५४, ५५५, ५५६, ५५७, ५५८, ५६०, ५६१, ५६२, ५६३, ५६४, ५६५, ५६६, ५६७, ५७०, ५७२, ५७३, ५७४, ५७७, ५७८, ५८१, ५८२, ५८३, ५८४, ५८५, ५८६, ५८७, ५८८, ५८९, ५९०, ५९१, ५९२, ५९३, ५९४, ५९५, ५९६, ५९७, ५९८, ५९९, ६०२, ६०३, ६०४, ६०५, ६०६, ६०७, ६१०, ६११, ६१२, ६१३, ६१५, ६१६, ६१९, ६२०, ६२१, ६२२, ६२३, ६२५, ६२६, ६२७, ६२८, ६२९, ६३०, ६३१, ६३४, ६३५, ६३६, ६३७, ६३८, ६४०, ६४३, ६४५, ६४६, ६४७, ६४८, ६४९, ६५०, ६५२, ६५३, ६५५, ६५७, ६५९, ६६०, ६६१, ६६२, ६६३, ६६६, ६६७, ६६९, ६७०, ६७१, ६७२,

६७३, ६७४, ६७५, ६७६, ६७७, ६७८, ६७९, ६८०, ६८१, ६८२, ६८३

## आ

आत्माराम आप्पाजीराम : २०८, २१०
आनंदराव नरहर (कमाविसदार) : २६३
आनंदराव सदाशिव (कमाविसदार) : १६८
आनंदराव होळकर : ५५७, ५८८
आनंदीबाई वाघमारे : ४४१
आनंदीबाई होळकर : ७०७
आप्पाजी गीते : २९७
आप्पाजी गीते : २९७
आप्पाजी चिमणाजी गोंधळेकर : ६६२
आप्पाजी मोरेश्वर (कमाविसदार) : २४५
आप्पाजीराम गोसावी पळसीकर : ८, ९७, ९८, १००, १०६, २१०, ३१५, ३१६, ३२८, ३४८, ३६६
आबाजी : ६९८, ७००
आबाजी खंडेराव : ६९८
आबाजी महादेव शिंदे : ३१७
आबाजी रघुनाथराव (कमाविसदार) : ६८, १३४
आबाजी विश्वनाथ : ४४६
आबाजी विष्णु (कमाविसदार, अंबाड) : २२७
आबाजी विष्णु (कमाविसदार, थालनेर) : ३८९
आबाजी विष्णु (कमाविसदार, रामपुरा) : ३८३, ३९५, ३९७
आलमपूर : २५४
औंढा नागनाथ : ४१४

## इ

इंद्रमल नारायण गोसावी : ३१६
इन्दूर : २, ३, ५, ८, ९, १५, १६, १७, १८, १९, २३, २५, २६, २९, ३२, ३३, ४०, ५१, ५४, ५९, ६९, १०३, १२८, १४७, १५८, १६३, २१४, २२८, २३९, २४०, २६४, २६८, २८५, २९०, ३११, ३१९, ३२७, ३२९, ३३८, ३४४, ३४६, ३७५, ३७७, ४९८
इन्दूर टाकसाळ : ३०६, ३४१

## ई

ईश्वरनाथ शुक्ल : १४९
ईसाजी देवाजी : ६४

## उ

उदाजी पवार : १३
उदाबाई वाघमारे : २५१
उमेदसिंग बुंदीवाले : ११३

## ए

एकनाथ गोविंद उत्पात : ७५, ७६
एसाजी त्रिंबक : ५३

## अं

अंतर्वेद (अंतरवेद) : ११०, १११, ११४, १३०, १३७, २१८, २२१, २२२, ४८९, ५०५
अंताजी नारायण : १६३
अंबाजीपंत गोसावी : ६
अंबादास पुराणिक : १६४
अंबोजी इंगळे : ४२९, ४३८

## क

कर्नल ल्युअर्ड : २४३
कल्याण मेहता (कमाविसदार) : ७०१
कान्होजी होळकर : ४४३
काशिनाथ आप्पाजी : ५९८, ६३८
काशीराव होळकर : ४६१, ५२६, ५६०, ५९६, ६००, ६०१, ६०८, ६०९, ६१७, ६१८, ६२३, ६३६, ६८१, ६९०, ६९२, ६९३, ६९५, ६९९, ७०२, ७०३, ७०४,

७०५, ७०६, ७०९, ७१०, ७११
कुसाजी महिपतराव (कमाविसदार) : २७५, २७६
कृपाळसिंग : ४९६
कृष्णराव गंगाधर : २१२, २१६, २२२, २२४
कृष्णराव महादेव : २७
कृष्णाजी तानदेव : २४०, २९५
केदारजी शिंदे : १९९
केसो गणेश कुंटे : ४३२, ४५१, ४८३

## ख

खंडेराव व्यंकटेश (कमाविसदार) : ३०२
खंडेराव होळकर : ३२, ७५, १०२, १०५, ११३, १२५, १२६, १२७, ३४५, ३६१, ४१७, ५११, ५६८
खंडो जगदेव (वकील, अयोध्या संस्थान) : ४४२
खंडो जगदेव (वकील, औंध संस्थान) : ३९४
खंडो बाबूराव (कमाविसदार) : ७४, १०३, २८४, ३२७, ३४१, ३५५, ३६०, ३६४, ३६५, ४१६, ४५८, ५०४, ५४६, ६७६
खंडो रामाजी : ६७५
खंडो सदाशिव (कमाविसदार) : ३१५
खंडोजी आबाजी : १००
खंडोजी कोपरे : १९४
खेडापती मारूती : ५१
खेतसी करमसी : २९६, ३०७, ३१०

## ग

गणपतराव नारायण : ६७२
गणपतराव बापूजी हिंगणे : ५३४
गणेश नारायण : ५१९
गणेशराम गुमास्ते : ३६९
गया : २५६
गाजुदीन खान : २०५, २०६
गेहनाबाई पवार : ४०५
गेहलाखा (कमाविसदार) : ३९६
गोपाळ बल्लाळ : २५२
गोविंद कृष्ण : २४८, २८३
गोविंद बल्लाळ : ११०, १३६, १३७
गोविंद रघुनाथ गानू : २७६, ३३६, ४७८
गोविंद संभाजी : ५४
गोविंद सखाजी : १११
गोविंद सामराज : १६७
गोविंदपंत गोसावी : १०७, १०८
गोविंदराव बाळाजी : १६१
गोविंदराव बुळे : ७३, ९२, २३४, ३४७
गौतमाबाई होळकर : ११२, १३६, १५२, १६२
गंगाजी भागवत : ३४९
गंगाधरपंत तात्या (गंगाधर यशवंत चंद्रचूड) : ५०, ११५, १३३, १६७, २०७, २१०, २१४, २१६, २२१, २६२

## घ

घमंडीपंत : १५१

## च

चतुर्भुजदास कानगो : ५९, ६९
चिमणाजी गोविंद (कमाविसदार) : १२२, १३२, २६६
चिमणाजी बल्लाळ : ९, ४३, ८९
चिमाजी अप्पा : ५४१
चिमाजी बुळे : ७३, ४०६, ४१२, ४७३
चांदवड : ९८, २६४, २६७, २७१, ३०४, ३१८, ३२०, ३३३, ३६८, ४११, ६५६
चिंतामण मोरेश्वर : ५४१
चिंतो नारायण (कमाविसदार) : ३१८, ३२०
चौंडीकर शिंदे : ३१२

## ज

जनकोजी शिंदे : ११९, १३५
जयाजी शिंदे : ६६, ६७, ६८, ८२, ८३, ८५, ८७, ८८, ९६, १३५, १४२
जालमसिंग झाले (संस्थान कोटा) : ३८१
जेजुरी : १२३, ४६५, ५७४

## झ

झाबवे : ७३, ३४६, ४१२, ६९४, ७०१

## ट

टिळागीर गोसावी : ४१६, ४२०

## ठ

ठाकूर केसरीसिंग : ९२

## ड

डाक व्यवस्था : ६३२, ६५४

## त

तिलभांडेश्वर मंदिर (तराणा) : ४७
तिलोकजी पदमसी सावकार : ४२७, ६३१
तुकोजीराव होळकर : २४८, २५०, २६८, २६९, २७०, २७१, २७४, २७६, २८०, २८४, २८५, २९१, २९८, ३०३, ३११, ३१३, ३१५, ३१९, ३२०, ३२१, ३२३, ३३०, ३३५, ३३७, ३३८, ३४२, ३४३, ३४४, ३४८, ३५३, ३५४, ३५८, ३५९, ३६२, ३६३, ३६४, ३६५, ३६६, ३७३, ३८४, ३८७, ३८९, ४११, ४१६, ४१८, ४२२, ४२६, ४२७, ४४९, ४५०, ४५४, ४५५, ४५६, ४५९, ४६३, ४६४, ४६७, ४७१, ४८२, ४८५, ४८६, ४८७, ४९०, ४९२, ४९३, ४९७, ५०५, ५०७, ५११, ५१५, ५१८, ५२२, ५२५, ५२७, ५२९, ५४२, ५४५, ५५५, ५५९, ५६५, ५६६, ५६९, ५७१, ५७९, ५८२, ५८५, ५९४, ५९७, ६००, ६०४, ६०६, ६०९, ६१०, ६१३, ६१७, ६१८, ६१९, ६२१, ६२२, ६२३, ६२४, ६२५, ६२६, ६२८, ६३६, ६४१, ६४३, ६४५, ६४७, ६५३, ६५६, ६६४, ६६५, ६६८, ६७०, ६७१, ६७८, ६८१, ६८४, ६८५, ६८६, ६८७, ६८८, ६८९, ६९६, ६९७, ७००, ७०७
तुळसाजी वाघ : ४६६, ४६७, ५७६
तुळाजी शिंदे : ४४५

## त्र

त्रिंबक बाबुराव (कमाविसदार) : २७७, ३२५, ३३१, ३३२, ३३३, ३४१, ३५६
त्रिंबक मुकुंद : ४९
त्रिंबक राजदेव (कमाविसदार) : २४०, २८५
त्रिंबकजी इंगळे : ३६४
त्रिंबकराव अप्पाजी : २८९

## द

दयाराम कुटी : २५६
दयाळभट देवळालीकर : ६६४
दादो मैराळ : ४२५
दादोबाराव गोडसे : २७
दामाजी गायकवाड : १६५
दामोदर (बापूजी) महादेव गोसावी : ४५, ६०, ७१, ७२, ७९, ८०, ८२, ८५, ९१, ९९, १०१, १०२, १०४, १०५, ११५, १३१, १३९, १४४, १४५, १४६, १४७, १४८, १४९, १५०
दिनकर अनंत (कमाविसदार) : २७९, २८३, ३०१
दिल्ली : २२१, २२५, २७१, ३१०
दीक्षित स्वामी : ८१, ८९, ९५

देवराम महादेव गोसावी : १४६
देवीप्रसाद शुक्ल : १८९

### ध

धोंडिबा फणसे (नथ्याबा फणसे) : ४७४, ४७६, ४७७, ५००, ५६०, ५८४
धोंडो जमादार : १८८
धोंडोराम : २४४

### न

नजीब कुलीखान : ३९०
नथा बाळाजी : २८४
नरहर मुरार (कमाविसदार) : ३६७
नवाब गाजुद्दिनखान : ९४
नागोराव लक्ष्मण : ६९३
नाना फडणवीस : पहा, बाळाजी जनार्दन
नारायण गोविंद (कमाविसदार) : ५१२, ६३०
नारो खंडेराव : ७१२
नारो गणेश : ३११, ४६२, ४९५, ५०३, ५०६, ५२८
नारो गणेश गाडगीळ : ३६९
नारो बाळाजी : १३५, १७२, २७१
नारो यशवंत : ५३७
नारो विश्वनाथ : ५३९
नारो शंकर : १३, १७, २२, २८
नारो सिद्धेश्वर : ६९१
नारो हरी : ४३८
निळो परशुराम : ४७५
नीळकंठ तुकदेव चिटणीस : ६१५
नंदराम फघडे : १९८

### प

पत्रांचे मायने : ४०८
पदमसी राजसी सावकार : ४९८, ६३९, ६५४, ६९५, ७०१
पांडुरंग नारायण (कमाविसदार) : ३७२
पांडुरंग शंकर : २९३
पागे : ३४३
पाराशर दादाजी : ५२३, ५४०
पार्वतीबाई वाघ : ५२१
पिराजी ढमढेरे : ९८
पिराजी नाईक निंबाळकर : १९५, १९६
पुणे : ३२, ४८, ५०, ८८, ११२, १५०, १६५, १६७, १६९, १७१, १९७, २३०, २५४, ३०२, ३२२, ३६२, ३३९, ३७४, ३९८, ५८७, ५९०, ६३७, ६५४, ६६८, ६६९, ६९७, ७००, ७०७
पुरुषोत्तम महादेव गोसावी : ८२, ८५, ९१, ९९, १०१, १४१, १४३, १४४, १४६, १४७, १४८, १५०
प्रल्हादभट गंगाधरभट बडवे (पंढरपूर) : ३४०
पंढरपूर : ७५, ७६, ४३४, ५७५

### ब

बाजीराव पेशवे (प्रथम) : ७, ९, १४, २३, २६, ३०
बाजीराव रूखमानंद गोसावी : १०९
बापू होळकर : २७९, ५४९, ५५३, ५५८, ६३५, ६५८, ६९७
बापूजी आनंदराव : ४८४, ६५७
बापूजी महादेव गोसावी : ४५, ७२, ११५, १४२, १४७
बाबाजी : ७००, ७०८, ७१२
बाबाजी पंत (कमाविसदार) : १८९
बाबाजी प्रल्हाद (कमाविसदार) : १७९, १८१, १८३, २२९, २६१, २६५
बाबाभट मुकुंदभट वैद्य : १९३
बाबुराव गोपाळ : १५१
बाबुराव बल्लाळ : ११८
बाबुराव वाघमारे : ३२९, ३९३

बाबुराव विश्वनाथ वैद्य : ४२९
बाबूराव मल्हार : ३१
बालाजी रावजी : ६९०
बाळाजी जर्नादन (नाना फडणवीस) : ३३०, ३५१, ३७४, ३९२, ३९९, ४८१, ५२०, ५३८, ५४४, ५५४, ५५९, ५७०, ५७१, ६१२, ६६९, ७०३
बाळाजी नारायण : ७१२
बाळाजी पंडित : ७८, १२३
बाळाजी बाजीराव (नानासाहेब) पेशवे : ६६, ६७, ८९, ११६, १२३
बाळाजी महादेव (कमाविसदार) : १६६
बाळाजी यशवंत (कमाविसदार) : ६५, ६८, ८४
बाळाजी यादव : ७०१
बाळाजी लक्ष्मण : ४२४, ५५१
बाळाजी विश्वनाथ पेशवे : २४४
बाळाजी शेळके : ३०४
बुंदेलखंड : २२१
ब्रम्हगिरी महादेव गोसावी : २६७
बंदेखान हिंमतखान : ३७५

## भ

भगवंत बल्लाळ : ६६८
भगवंतराव जगताप : ५३६
भाऊसाहेब पेशवे : ८८
भागोजी गवरी : ४२१
भारमलदादा होळकर : ६२९, ७०५
भास्कर हरी : १९७
भिकाजी उद्धव : ५१६
भिकाजी खटके : ३४९
भिवजी बाबुराव (कमाविसदार) : १२१
भीमराव आबाजी : ७११
भोजराज बारगळ : ५५

## म

मकाजी गीते : २१३, ३२६, ६२०
मकाजी ढमढेरे : १७१
मगनीनाथ (मणीराम) नागनाथ (कमाविसदार) : ३२८, ३३७, ३४०, ३७८
मनोहरदास सावकार : ३०६
मयाराम दयाराम कुटी : २५६
मलकाजमानी : १२६
मल्हार गोपाळ : १७
मल्हार सोयराजी : ४४९, ५७७, ६१६
मल्हारराव गोविंद : ३०५
मल्हारराव होळकर (द्वितीय) : ३७३, ३८६, ३९१, ५२२, ५३५, ५६२, ५७१, ५७३, ६४८, ६५९, ७०७
मल्हारराव होळकर : १, २, ३, ५, १२, १३, १५, १६, १८, १९, २०, २१, २२, २४, २५, २६, २७, २८, ३०, ३१, ३२, ३३, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४८, ४९, ५०, ५१, ५३, ५४, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६१, ६२, ६३, ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७४, ७७, ७८, ७९, ८०, ८१, ८२, ८३, ८४, ८५, ८६, ८७, ८८, ९०, ९१, ९२, ९३, ९४, ९५, ९६, ९७, ९८, ९९, १००, १०१, १०३, १०४, १०६, १०७, १०८, १०९, १११, ११४, ११५, ११८, ११९, १२०, १२१, १२२, १२४, १२६, १२९, १३०, १३१, १३२, १३३, १३४, १३५, १३६, १३८, १३९, १४१, १४२, १४३, १४४, १४५, १४६, १४७, १४८, १४९, १५०, १५१, १५५, १५६, १५८, १६०, १६१, १६२, १६३, १६४, १६५, १६६, १६८, १६९, १७०, १७२, १७३, १७४, १७५, १७६, १७७, १७८, १७९, १८०, १८१, १८२, १८३, १८४, १८५, १८६, १८७, १८८, १९३, १९४, १९५, १९६,

१९८, १९९, २००, २०१, २०२, २०३, २०४, २०५, २०६, २०८, २११, २१३, २१४, २१६, २१७, २१८, २१९, २२०, २२३, २२५, २२६, २२७, २२८, २३०, २३२, २३३, २३५, २३७, २३८, २३९, २४१, २४२, २४३, २४६, २४८, २४९, २५०, २५१, २५३, २५४, २५५, २५६, ३१४, ३२९, ३३५
महादजी कोन्हेर : ५४७
महादजी थिटे : ३१४
महादजी शिंदे : ३५०, ३७८, ३७९, ४५२
महादेवभट गोविंदभट हिंगणे : ४६, ४८
महाराजा रामसिंग : १२९
महालक्ष्मी नैवेद्य : ४९९
महिपतराव त्रिंबक पुरंधरे : २८०
महेश्वर : २८, २९, ४०, २५७, २५८, २५९, २७१, २७६, २७७, २७८, २८१, २८४, २८७, २८९, २९५, ३०७, ३०९, ३११, ३१७, ३२५, ३२८, ३३६, ३३९, ३४१, ३४३, ३४६, ३५९, ३६३, ३७५, ३८२, ३९८, ४०७, ४१४, ४१६, ४४९, ५५५, ६०४, ६४०, ६५३, ६५४, ६६५
महेश्वरबाबत हकीगत : २९
माधवराव कृष्ण भुसकुटे : ५०२
माधवराव गणेश : १९७
माधवराव पेशवे : १५९, १९८, २३८, २५३, २६९, २८०, २८२, २९८, ३००, ३०२
माधवराव रघुनाथ (कमाविसदार) : २९१
माधवराव लक्ष्मण (वकील, हैदाराबाद) : ३७६, ४०३, ४०५, ४६८, ५०८, ५१३, ५१४, ५५०, ५६४, ५७२, ५८०, ५८४, ५९३, ५९५, ५९९
माधवराव शिंदे : १९९
मार्तंड खंडेराव (कमाविसदार) : ४६९
मालेराव होळकर : ११७, ११९, १२०, १४०, १५५, १७०, २०३, २२९, २३५, २३६, २३९, २४६, २५२, २५४, २५५, २५६, २५९, २६०, २६२, २६३, २६४, २६६, ६३९
मालोजी लांबहाते : ४३६, ४४४
माळवा : २२, २६, ३०, १८०, २५५, ७०६
मिर्झा आदिलबेग : ५४, ५५, २३२, २५८
मिस्टर बाईड : ६५२
मुकुंद नरहर : ११
मुकुंदराव आबा : ५१३
मुकुंदराव हरी : ३११, ५८९, ६२५
मुक्ताबाई फणसे : १८१, ४७६, ६२७, ६५६
मुक्ताबाई फणसे : २८१, ६५६
मेघःश्याम जिवाजी : ५०९
मोरो विनायक (कमाविसदार) : ३१३
मोहनीराज मुरार (गया) : ४१३
मोहाजी पाटील : १६६
मंडलोई तेजकर्ण : १६, १७, १९, २३, २४, २५, ३३, ४२, ५५, ७४
मंडलोई नंदलाल : २, ३, ४, ५, ८, ११, १३, १४, १५, १८, २३
मंडलोई न्याहालकर्ण : १६, १७, ३३, ४२, १५८, २३९
मंडलोई बलकर्ण : १२८, १५८

## य

यशवंतराव गंगाधर चंद्रचूड : ३९९, ४१०, ४१६, ५३१, ५५३, ५५७, ५६४, ५८८, ६०३, ६०४, ६२८, ६३८, ६४५
यशवंतराव फणसे : ४३४, ४८८, ६५६
यादवराव रघुनाथ भागवत : २९८, ३०२
येसाजी खंडेराव : ७०६

## र

रखमाबाई शिंदे : २८७

रखमाबाई होळकर : ३७१, ३८५, ५२४, ५३३, ५८३, ६०८
रघुनाथ शंकर पारनेरकर : २७३
रघुनाथभट देवळालीकार : ६६४
रघुनाथराव पेशवे : ११४, १३०, १३३, २४४, २६९
रघोजी भोसले : ७, ५६७, ५९२, ६६०
रणजितसिंग बहादुरजंग : ५६८
राघो अनंत (कमाविसदार) : २३४
राघो बल्लाळ : ३४४
राघो रणछोड : २९४, २९५, ३२१, ३२२, ३२३
राघो हरी गोसावी : ४४
राजाराम गंगाधर (वकील) : ५१०
राणा उमेदसिंग (बडवाणी) : ३००, ३८८
राणी बखतकुंवर (बडवाणी) : ४३१
राणेखान : ४४८, ४९४
राणोजी शिंदे : १६, १९, ६२, ७१
राधाबाई बुळे : ६२९
रामचंद्र कृष्णराव : १३३
रामचंद्र महादेव गोसावी (कमाविसदार) : १६५, २३३
रामजी आघाडे : २९०, २९९
रामजी गंगाधर : ५०
रामपुरा : १५७, २६०, ६८२
रामभट केशवभट : ६५१
रामराव आप्पाजी गोसावी पळसीकर : ३६७, ४१८, ४२२, ४२३, ४३४, ४४०, ४४७, ५३२, ६०५, ६३६, ६७७, ६७८, ६७९, ६८०, ६८१, ६८४, ६८५, ६८६, ६८८, ६८९, ६९२, ६९४, ६९६, ६९९, ७०४, ७०५, ७०८, ७०९, ७१०
रामाजी यादव पळसीकर : २०, २१, २२, ४३, ५०, ५२, ५७, ५८, ७०, ७७, ९०, ११५
रामाजीपंत गोसावी : ४१
रावजी फडके : १८८
रावत सामंतसिंग : ५१७
रूपदास बाबा : ५१
रंगो भिकाजी : २८५, ६५९

## ल

लक्ष्मण कृष्ण (कमाविसदार) : ६३८
लक्ष्मण नरहर (सबनीस) : ६०७
लक्ष्मण भटजी : १५१
लक्ष्मणसिंग चंद्रावत (रामपुरा) : १६१, २६८
लाखेरी सनद : ११३
लाला हरनारायणजी : ९, १३, १४
लालाजी बल्लाळ : १५६, १६०
लिंबाजी आबाजी : १७८
लेकावळे : ३४३

## व

वकीलांचे बातमीपत्र (जयपूर संस्थान) : ४१०
वामनाजी हरी (कमाविसदार) : ६६५
वासुदेव दीक्षित : ८८, ९५, ११८
वासुदेव संभाजी (कमाविसदार) : १४०, १५३, १८२, १८७, १९२, २०१, २०२, २४१
वासुदेवभट खोचे : ४९१
वाफगांव : १७३, ३९१, ४११
विसाजी कृष्ण : ३०७
विठ्ठलदास कानगो : २९, २२७, २५७
विठुजी बुळे : ४०
विठ्ठल गणेश : ३०८
विठ्ठल रघुनाथ जोशी : ११०, १११
विठ्ठलभट त्रिंबकभट : ४१४
विठ्ठलराव शिवदेव : २५३
विनायक त्रिंबकराव दीक्षित : १३८
विनायक बाजीराव : ३११, ५९०, ६४९, ६५०, ७००, ७११

विनायक विठ्ठल : ४७०
विश्वंभरदास : ६८२
विसाजी रंगनाथ : ३११, ३१२
विश्वासराव लक्ष्मण : ९७
विष्णु महादेव (कमाविसदार) : ८३
विष्णु महादेव गद्रे (सावकार) : २३०, ३१९
विष्णु लक्ष्मण : ६६७
व्यंकटराव कृष्ण (वकील) : ५०१

## श

शरीफभाई शेख : ४३५, ५६१
शिलालेख : ३५, ३६, ३७, ३८, २९२, ३२९, ४७१, ५७४, ५७५
शिवराम कृष्ण : १९७
शिवराम गणेश (कमाविसदार) : २०, ६१
शिवराम पाटील ६१४
शिवराम भास्कर : १६५
शिवराम मल्हार : २४६
शिवाजी गोपाळ : ३५१
शिंदे यांचे जहागीर महाल : ३४६
शेषंभट लक्ष्मणभट : २५९
शंकरभट तानभट खाडे : १२

## श्र

श्रीपतराव मैराळ (कमाविसदार) : १५२

## स

सकवारबाई पवार : २८८
सकुबाई पळसीकर : ३५२
सकुबाई शिंदे : ४०२
सखाराम राजाराम : ७०२
सखाराम विठ्ठल : ३४९
सटवाजी गायकवाड : १५३, १८७, १९०, १९१, १९२, २०३
सटवाजी संभाजी : १८२
सटवोनारायण केशोनारायण (वेदमूर्ती) : २६५
सदाशिव गोपाळ (कमाविसदार) : १३५, २६०
सदाशिव बापूजी : ४५३
सदाशिव रघुनाथ (कमाविसदार) : ३८७
सदाशिव रामचंद्र : ३१७
सय्यद मोहीद्दिन : १८६
सर जान मालकम : २४३
सरंजामी सरदारांचा खर्च : ३५४
सरकार बिनागड : २८४, २९८, ३०९, ३२५, ३३१, ३३२, ३५६, ३७२, ६३८, ६८३
सवाई माधवराव पेशवे : ४२२, ४७२, ५७९, ६२४, ६५५, ६७३
साळुबाई वाघ : ४५७
साहेबराम अमृतराम वैद्य : २६२
सिद्धेश्वर दादाजी परचुरे : ६६१
सीताराम भास्कर (कमाविसदार) : ४५०
सुबराव घोरपडे : ४९३
सुलतानसिंग : ४५५
सूर्यनारायण शास्त्री : ११४, ११६
संकराजी महादेव : ६१
संताजी भोसले : ८
संताजी वाघ : ४०
संताजी होळकर : २२८, ३२८, ६७४, ७०८

## ह

हरकुबाई होळकर : ३१६, ३७८, ३८९, ५३५
हरी दामोदर : ८७
हरी बल्लाळ (कमाविसदार) : ६५, ६८
हरी बल्लाळ (हरीपंत) फडके : ३२२, ३५८, ४००, ४०१, ५४३, ५४८, ६६९
हरी सदाशिव जोग : ६६६
हरीप्रसाद भट : १७४
हरीराम फघडे : १९८
हिंमतखान आजमतखान : ३७५
होळकर सरकारांचे सरंजामी महाल : २४३
होळकरांचे जहागीर महाल : ३४६

●

## संपादक परिचय

### डॉ. देवीदास पोटे

- जन्म : डुबेरे, ता. सिन्नर, जि. नाशिक
  ७ मे १९५०
- निवृत्त सहाय्यक विक्रीकर आयुक्त
- संतसाहित्य अभ्यासक, अहिल्याचरित्र आणि इतिहास अभ्यासक, लेखक, कवी, संपादक.
- सदस्य, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
- ''युगबोध'' आणि ''मुक्त आनंदघन'' या संत साहित्यविषयक दिवाळी विशेषांकांचे संपादन : १९९३ ते आजपर्यंत. या अंकांना विविध मान्यवर संस्थांचे पन्नासहून अधिक पुरस्कार प्राप्त.
- अहिल्याबाई चरित्रविषयक 'महेश्वरच्या घाटावरून' आणि 'युगप्रवर्तक अहिल्याबाई' या ग्रंथांचे लेखन. तसेच होळकर रियासतीचा सांस्कृतिक इतिहास, अ.. अहिल्याबाईंचा, अहिल्यायन, शिवयोगिनी, ती एक अहिल्या होती या ग्रंथांचे संपादन. यापैकी दोन ग्रंथांना महाराष्ट्र शासनाचे उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार.
- गंधयात्रा, प्रवासाचे क्षण, शब्द, मन, प्रेम, टिंब टिंब, मांदियाळी, दिंडी चालली आदि कवितासंग्रह प्रकाशित.
- संत साहित्यविषयक भारतीय संत कवयित्री, कैवल्याचे लेणे, चैतन्याचा ज्ञानदीप, कबीर चिंतन, श्रीकृष्ण : एक अभ्यास, महान भारतीय संत, अवघाचि विठ्ठल या ग्रंथांचे संपादन.
- वारी, अद्वितीय युगप्रवर्तक : संत तुकाराम, संतशब्दांचा परिमळु, कबीरायन, अवघाचि राम, अहिल्यानीती हे आगामी ग्रंथ प्रकाशनाधीन.
- अनेक सामाजिक / सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध पदांची जबाबदारी. साहित्यिक / सांस्कृतिक / सामाजिक कामाबद्दल महाराष्ट्र आणि बृहन्महाराष्ट्रातील विविध मान्यवर संस्थांचे वीसहून अधिक पुरस्कार.
- भ्रमणध्वनी : ९८२०३ ३२१२८, Email : dspote7@gmail.com

'होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें' हा दोन खंडांतील पत्रसंग्रह आहे. या ग्रंथांमध्ये अकरा होळकर राज्यकर्त्यांच्या कारकीर्दी समाविष्ट आहेत. त्यातील प्रमुख कारकीर्दी म्हणजे थोरले मल्हारराव होळकर, अहिल्याबाई होळकर, प्रथम तुकोजीराव होळकर, यशवंतराव होळकर, द्वितीय मल्हारराव होळकर, हरीराव होळकर आणि द्वितीय तुकोजीराव होळकर यांच्या आहेत. या पत्रसंग्रहांत मल्हारराव, अहिल्याबाई, यशवंतराव आदी राज्यकर्त्यांना आलेली श्रीमंत पेशवे, सरदार, कमाविसदार, कारभारी, पुजारी, भारमलदादा होळकर, गोविंदराव गानू आणि इतर अनेकांनी लिहिलेली पत्रे आहेत. इ. स. १७२० ते १८८५ या होळकर रियासतीच्या प्रदीर्घ कारकीर्दींतील प्रशासन, सैन्य, शेती, शिक्षण, व्यापार, उद्योग, पर्यावरण, टपालव्यवस्था, न्यायदान, लग्न समारंभ, धार्मिक विधी आदी अनेक प्रशासकीय आणि कौटुंबिक विषयांबाबतचा पत्रव्यवहार यात आला आहे. होळकर राज्यकर्त्यांचा प्रगतीशील आणि लोकाभिमुख विचार आणि कर्तृत्व यांचा आलेख या पत्रांमधून आपल्यासमोर उलगडत जातो.

अहिल्याबाई म्हणजे होळकरशाहीचा कळसाध्याय. त्यांचे राज्य हा आदर्श राज्याचा सर्वोत्तम नमुना होता. ते आधुनिक काळातले रामराज्यच होते. प्रशासन, युद्धनीती, परराष्ट्रधोरण, शेती, व्यापार, दळणवळण, स्त्रीहक्कविषयक निर्णय, न्यायदान, लोकहितकारी कामे या सर्व बाबतीत त्यांनी केलेल्या कामांचे स्वरूप या पत्रसंग्रहात प्रतिबिंबित झाले आहे. राज्यपद असूनही साधी, सात्त्विक राहणी आणि 'इदं न मम' या भावनेने राज्यकारभार सांभाळणे हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष अनेक प्रसंगांतून प्रत्ययाला येतात.

या पत्रसंग्रहातील पत्रे म्हणजे इतिहासाच्या एका कालखंडाची अनेकस्पर्शी स्पंदने आहेत. मल्हारराव, अहिल्याबाई, यशवंतराव आणि द्वितीय तुकोजीराव यांच्या यशस्वी कारकीर्दीतील अनेक बाबी यात बारकाव्यांसह आल्या आहेत. मराठेशाहीच्या वा होळकरशाहीच्या अभ्यासाच्या दृष्टीने या पत्रांचे ऐतिहासिक मोल निर्विवाद आहे.

एकशे पासष्ट वर्षांच्या कालखंडातील राजकीय, प्रशासनिक, सामाजिक आणि कौटुंबिक अनुबंधांचे अनेक चढउतार, विविध वळणे यांचे दर्शन या पत्रसंग्रहांतून घडते.